दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा

# मेहता मराठी ग्रंथजगत

दीपावली विशेषांक ४० रुपये
वर्ष पाचवे अंक अकरावा



# मेहता मराठी ग्रंथजगत

दीपावली विशेषांक · वर्ष पाचवे · अंक अकरावा

संपादक
सुनील मेहता

कार्यकारी संपादक
शंकर सारडा

संपादन सहाय्य
सुनीता दांडेकर

अंकाची किंमत ४० .

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
१५ ऑक ोबर २००५

मांडणी-अक्षरजुळणी
*मेहता पब्लिशिंग हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, ेलिफोनभवनसमोर, पुणे-३०.
फोन : २४४७६९२४ फॅक्स :०२०-४४७५४६२
Email - mehpubl@vsnl.com Website - mehtapublishinghouse.com

● वार्षिक वर्गणी १०० . ● तीन वर्षांची २०० . ● पाच वर्षांची ३०० .
● ३ व ५ वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भे !

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

# अनुक्रमणिका

## पहिले दिवस


चिं. स. लाटकर ...८
अविनाश पंडित ...१२
न्या.सुरेश वसंत नाईक ...१६
ल. म. कडू ...१९
रजनी अपसिंगेकर ...२३
दिनकर शिलेदार ...२५
आशा कर्दळे ...३०
प्रशांत कुलकर्णी ...३३
रवींद्र खरे ...३७
अजित धर्माधिकारी ...४०
उषःप्रभा पागे ...४३
संजय चव्हाण ...५०
बाळ राणे ...५४
डॉ. प्रभा गोखले ...५७
जयश्री बेलसरे ...६१


## मुलांचे भावविश्व फुलवताना


राजीव तांबे ...१३५
सुरेखा पाणंदीकर ...१३७
माधवी कुंटे ...१४०
सुनीता नागपूरकर ...१४४
प्रकाश पारखी ...१५०
श्याम कुरळे ...१५४
मंजूषा आमडेकर ...१५८
अलका साठे ...१६१


## वाचकांची खुषीपत्रे लेखकांचे टॉनिक


डॉ.आनंद यादव ...६६
प्रा.रा. ग. जाधव ...७२
प्रा.राम शेवाळकर ...७५
प्रा.रा. रं. बोराडे ...७८
विजय देवधर ...८१
शिरीष पै ...८४
निरंजन घाटे ...८७
गंगाधर महाम्बरे ...९०
शिवराज गोर्ले ...९२
रेखा बैजल ...९६
प्रा.लक्ष्मीकांत तांबोळी ...१००
अशोक जैन ...१०३
सिसिलिया कार्व्हालो ...१०५
बाबा कदम ...१०७
डॉ.लीला गोविलकर ...१०९
उज्ज्वला केळकर ...११२
यशोधरा भोसले ...११४


## बालनगरी


नाटुकली - डॉ. मीरा बोन्द्रे ...१७५
गंमत जंमत -
- रस्ता शोधा ...१८२
- चित्र जोडा ...१८३

जपानी लोककथा ...१८४
- मंजूषा आमडेकर

मजेदार स्पर्धा -
- कोणती सावली कोणाची ?...१८९
- याला काय म्हणतात ? ...१८९

धमाल कथा - राजीव तांबे ...१९०
चित्र रंगवा ...१९२
चित्रपट ओळखा ...१९३


## झेप नव्या क्षितिजाची


यतीन तांबे ...११७
दिपा साठये ...१२३
चारुदत्त आफळे ...१२६
पंकजा वल्ली ...१३१


## स्पर्धा निकाल

### साहित्यिक अड्डा


रसिकमैत्र - सुचेता नाडकर्णी ...१६८
संवादिनी - रेवती पैठणकर ...१७०
चौकोनी कुटुंबातला
आमचा अड्डा - अनिता दाते ...१७२


### मला आवडलेले पुस्तक


सौ. सुमेधा पोळ ...१५
सौ. कुमुद गाडगीळ ...१५
जुई सुहास अंजळ ...३६
डॉ. अरुणा रांगणेकर ...३९
श्री. वि. ग. शिंदे ...४९
श्री. वि. दा. पुंडे ...४९
श्री. बापू तारदाळकर ...५३
सौ. अनिता मुसळे ...१३३
सौ. लता विद्वांस ...१३३
सौ. उषा साठे ...१०८

# संपादकीय

## फराळ : वैचारिक आणि वाङ्मयीन

'मेहता मराठी ग्रंथजगत'चा नेहमीपेक्षा वेगळ्या आकारातील आणि अधिक पृष्ठांचा हा दीपावली अंक सादर करताना आनंद होत आहे. ग्रंथविश्वातील, साहित्यक्षेत्रातील वेगवेगळ्या घटनांचा मागोवा घेणाऱ्या 'ग्रंथजगत'ला आरंभापासूनच वाचकांचा उत्साहवर्धक प्रतिसाद लाभला आहे; त्यामुळे त्यात वेगवेगळे प्रयोग करण्यालाही चालना मिळते. पृष्ठसंख्येत वाढ करून नव्या उपक्रमांनाही त्यात स्थान देण्यात येते. 'ग्रंथजगत'च्या वर्गणीदारांना पुस्तकांच्या खरेदीतही भरघोस सवलत मिळते आणि मोठी बचत साधता येते. साहजिकच गेल्या आठ वर्षात 'ग्रंथजगत'ला चोखंदळ मराठी वाचकांचा वाढता प्रतिसाद मिळत राहिला आहे.

दरवर्षी दिवाळी अंकाच्या निमित्ताने निरनिराळे विषय हाताळण्यात येतात; त्यात नवनव्या लेखकांना सामावून घेण्यात येते. त्यामुळे गावोगावच्या विक्रेत्यांकडूनही दिवाळी अंकाला चांगली मागणी येते. हे लक्षात घेऊन यंदाच्या दिवाळी अंकाचा आकार इतर दिवाळी अंकांसारखा करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याची पृष्ठसंख्याही अधिक असावी; असेही ठरवले. वेगवेगळ्या स्पर्धा आणि सदरे यांची आखणी करण्यात आली. स्पर्धक आणि लेखक यांचा प्रतिसाद इतका प्रचंड मिळाला की अपेक्षित पृष्ठसंख्येत बरीच वाढ करणे क्रमप्राप्त ठरले. वाचकांना त्यामुळे दिवाळीचा द्विगुणित आनंद मिळेल याचे समाधान आहेच!

या दिवाळी अंकाच्या निमित्ताने आमच्या वाचकांसाठी दोन स्पर्धा जाहीर केल्या होत्या. त्यांमध्ये वाचकांनी मोठ्या प्रमाणावर भाग घेतला याचा आनंद वाटतो.

वाचक कोणती पुस्तके वाचतात, कोणती पुस्तके त्यांना महत्त्वाची वाटतात, कोणती पुस्तके त्यांच्यापर्यंत पोचतात; त्यातील त्यांना कोणती पुस्तके विशेष आवडतात याचा शोध घेण्याचे काम अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते. त्या दृष्टीने 'मला आवडलेली दहा पुस्तके कळवा' ही स्पर्धा आम्ही जाहीर केली होती. दहा पुस्तकांच्या नावाबरोबर एका पुस्तकावर दहाबारा ओळीत आस्वादात्मक मजकूरही पाठवावा असे सुचवले होते. दहा निवडक स्पर्धकांच्या आवडीनिवडीला या अंकात स्थान दिले आहे. उरलेल्या काही आवडीनिवडी पुढे प्रसिद्ध करण्याचा विचार आहे.

तीच गोष्ट 'आमचाही एक साहित्यिक अड्डा' या स्पर्धेची!

वाचनसंस्कृतीच्या अभिवृद्धीसाठी जागोजाग जागरुक वाचकांनी नियमितपणे एकत्र येऊन नवनव्या पुस्तकांबद्दल चर्चा करायला हवी; आपल्या आवडीच्या साहित्याबद्दल, लेखकांबद्दल एकमेकांशी बोलायला हवे; नव्या पुस्तकांची माहिती मिळवत राहयला हवे. या दृष्टीने अनौपचारिक, अल्पखर्चिक मार्ग शोधायला हवेत. साहित्यिक अड्डा किंवा कट्टा हा एक उत्तम सोयीस्कर मार्ग आहे. असे अनेक अड्डे पुण्यात व अन्यत्र चालू आहेत; ते वाचनसंस्कृतीला पोषक वातावरण चांगल्या प्रकारे निर्माण करीत आहेत असे आलेल्या लेखांवरून निश्चितच जाणवते. या अंकात खरे तर छापण्यासारखे पंधरा एक लेख निवडावेसे वाटत होते. परंतु जागेच्या अभावी पहिले तीन लेख छापत आहोत. इतर लेख नेहमीच्या अंकांत प्रसिद्ध करण्यात येतील.

या दोन्ही स्पर्धांमध्ये भाग घेणाऱ्यांना मन:पूर्वक धन्यवाद.

लेखक लिहीत असतो; पण ते वाचकांपर्यंत कितपत पोचते हे जाणून घेण्याचा प्रयत्न जसा वाचकांशी संपर्क साधून करता येतो, तसाच स्वत: लेखकांनाही विचारून होऊ शकतो. या दृष्टीने वाचकांची येणारी पत्रे, वाचकांचा मिळणारा प्रतिसाद कसा असतो - याविषयी स्वत: लेखकांनीच कळवावे असे आवाहन आम्ही केले. राम शेवाळकर, रा. ग. जाधव, आनंद यादव, रा. रं. बोराडे, बाबा कदम, यांच्यापासून यशोधरा भोसले यांच्या पर्यंत जुन्या नव्या लेखकांनी यावर भरभरून लिहिले. सतरा लेखकांचे या विषयावरचे लेख वाचक-लेखक संबंधांवर उद्बोधक प्रकाश टाकतील. काही लेखकांचे लेख उशिरा आल्याने प्रसिद्ध होऊ शकले नाहीत. ते नंतर देऊ.

आज मराठी माणसाच्या कर्तृत्वाला वेगवेगळी क्षेत्रे आवाहन करीत आहेत; आणि कुठल्याही क्षेत्रात पाय रोवण्यासाठी आरंभी खडतर वाटचाल करणे क्रमप्राप्त ठरते. 'पहिले दिवस' या लेखमालेत अशा भिन्नविभिन्न क्षेत्रातील वाटचालीच्या संदर्भातील मनोगते देण्यात आली आहेत. मराठी माणसाच्या भव्य स्वप्नांची आणि कर्तृत्वाची ही नोंद वाचकांना प्रोत्साहक व प्रेरणादायक ठरेल.

.....आणखीही खूप काही या अंकात आहे. त्यामुळे या दिवाळीत मेवामिठाई, फटाके, भेटीगाठी याचबरोबर आमच्या वाचकांना वाङ्मयीन आणि वैचारिक फराळही मस्तपैकी मिळेल असा विश्वास वाटतो.

आमचे सर्व लेखक, चित्रकार, सहकारी, वाचक-ग्राहक, ग्रंथविक्रेते, मुद्रक, जाहिरातदार यांना ही दिवाळी आणि नवे वर्ष सुखसमृद्धीचे जावो ही प्रार्थना.

## विविध क्षेत्रातल्या प्रतिभावंतांचे पहिलेवहिले अनुभव...

मुद्रणक्षेत्र

ग्रंथसंपादन

न्यायाधीश

चित्रकार

पत्रकारिता

जाहिरातक्षेत्र

वृत्तनिवेदन

ध्वनीमुद्रण

नाट्यक्षेत्र

फोटोग्राफी

गिर्यारोहण

प्रशासन

काव्यलेखन

शिक्षणक्षेत्र

भविष्यकथन




| | |
|---|---|
| चिं. स. लाटकर | ८ |
| अविनाश पंडित | १२ |
| न्या. सुरेश वसंत नाईक | १६ |
| ल. म. कडू | १९ |
| रजनी अपसिंगेकर | २३ |
| दिनकर शिलेदार | २५ |
| आशा कर्दळे | ३० |
| प्रशांत कुलकर्णी | ३३ |
| रवींद्र खरे | ३७ |
| अजित धर्माधिकारी | ४० |
| उष:प्रभा पागे | ४३ |
| संजय चव्हाण | ५० |
| बाळ राणे | ५४ |
| डॉ. प्रभा गोखले | ५७ |
| जयश्री बेलसरे | ६१ |

# सुरुवातीचे दिवस

चिं. स. लाटकर

ग्रंथमुद्रण क्षेत्रातील आतापर्यंतच्या वाटचालीच्या सुरुवातीच्या दिवसाबद्दल लिहायचे ते केवळ आठवणींच्या मदतीनेच लिहिणे क्रमप्राप्त आहे. डायरी लिहायची सवय असती, तर त्याचा उपयोग झाला असता. पण तसे घडले नाही. माझी ओळख मराठी माणसाला व महाराष्ट्राला जी आहे, ती एक ग्रंथमुद्रक म्हणून आहे. मराठी भाषेतील जवळजवळ सर्व नावाजलेल्या लेखकांचे साहित्य माझ्या 'कल्पना मुद्रणालयात' गेल्या ५० वर्षांत मी छापले आहे.

कोणताही ग्रंथ, मासिक अथवा साप्ताहिक मुद्रित स्वरूपात बाहेर आले तर त्यावर तो छापणाऱ्या मुद्रकाचे नाव असलेच पाहिजे असा ब्रिटिशांच्या राजवटीत कायदा होता. आजही तोच कायदा चालू आहे. त्यामुळे मी छापलेल्या प्रत्येक ग्रंथाच्या दुसऱ्या पानावर माझे मुद्रक म्हणून नाव घालावे लागत असे. माझ्या नावाची ओळख महाराष्ट्राला जी झाली त्याचे हे प्रमुख कारण असावे असे मला नेहमीच वाटत आले आहे.

गेली ५० वर्षे ग्रंथमुद्रणाचा व्यवसाय मी केला. तथापि माझ्या अगोदरच्या पिढीचा मुद्रणाशी कसल्याही प्रकारचा संबंध नव्हता. उत्तम नोकरी, बाकी सर्व कनिष्ठ अशी समाजाची मानसिकता त्या काळात असताना, वयाच्या विसाव्या वर्षी टाईप, खिळे, मशीन, शाई याची कसलीही माहिती नसताना मी ग्रंथ मुद्रणाच्या व्यवसायात १९४८ साली आलो ते केवळ अपघातानेच. त्याचे कारण समजण्याच्या दृष्टीने त्यावेळच्या काळाचा थोडा परिचय करून देणे आवश्यक आहे. ३ सप्टेंबर, १९३९ साली दुसरे महायुद्ध सुरू झाले आणि १९४५ साली नागासाकी व हिरोशिमा या शहरांवर ॲटम बॉम्ब टाकल्यानंतर ते संपले. या सर्व काळात भारतात स्वातंत्र्याच्या चळवळीने जोर धरला होता. आमची सर्व पिढी या चळवळीत गुंतली होती, भारून गेली होती.

१९४१ साली मी पुण्यात सेवादलाच्या टिळक रोडवरील पंतांच्या गोटातील शाखेचा प्रमुख होतो. १९४२ सालची 'छोडो भारत' चळवळ पेटली, कालांतराने विझली. आझाद हिंद सेनेची स्थापना, नाविकांचे बंड, असे एकापाठोपाठ एक घडत घडत १५ ऑगस्ट, १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. या काळात डाव्या चळवळीकडे झुकलेल्या काही स्वयंसेवकांत मीही सामील झालो. भारताचे स्वातंत्र्य बेगडी आहे. खरी क्रांती घडवून आणण्यासाठी १९४८ साली डाव्या मंडळींनी चळवळ सुरू केली होती. तो वेडेपणाच असल्याने कालांतराने ती विझली. तथापि नेमक्या याच काळात सांगलीला असलेला पक्षाच्या छापखान्यावर बंदी येण्याची शक्यता निर्माण झाल्यामुळे एका रात्रीत तो छापखाना पुण्यास हलविण्यात आला. पक्षाचा आदेश म्हणून छापखान्याची जबाबदारी माझ्यावर सोपविण्यात आली. या अपघातानेच माझा मुद्रण-व्यवसायाशी प्रथम संबंध आला. चळवळीशी माझे संबंध १९५४-१९५५ मध्ये संपले. तथापि मुद्रण व्यवसायाशी सुरू झालेले संबंध मात्र तसेच पुढे चालू राहिले. याचे मुख्य कारण या व्यवसायाबद्दल मध्यंतरीच्या काळात निर्माण झालेले प्रेम हे असले पाहिजे.

सुरुवातीच्या या वाटचालीबद्दल बरेच काही लिहिता येईल. पुण्यातल्या मुद्रण धंद्याची १९४८ सालची अवस्था इतकी गंभीर होती की, कोणीही शहाण्या माणसाने या व्यवसायात, विशेषत: ग्रंथ मुद्रणाच्या व्यवसायात पदार्पण करण्याचे धाडस केले नसते.

जानेवारी १९४८ मध्ये मी 'साथीदार प्रिंटर्स' या नावाने मुद्रणाचा व्यवसाय पंतांच्या गोटात सुरू केला. पुण्यात त्यावेळी सर्वत्र छपाईच्या कामाला प्रचंड मंदी होती. ग्रंथ मुद्रणाच्या व्यवसायात तर त्या मंदीचा फटका मोठा होता. त्याचे एकच उदाहरण देतो. १९४८ च्या मे महिन्यात त्यावेळी पुण्यातील मुद्रकांची एक

*मुद्रणश्रेष्ठतेच्या पहिल्या राष्ट्रीय पारितोषिकाच्या वेळी (१९७५)*



*चेहऱ्यावर असा भाव सुरुवातीला असेल तर प्रगती निश्चितच!*

बैठक बोलाविण्यात आली होती. मुद्रणाच्या कामाची टंचाई लक्षांत घेऊन छापखान्याचे कामाचे तास ८ ऐवजी ६ करावे का? हा या सभेचा चर्चेचा विषय होता!

## पेपर कंट्रोल ऑर्डर

त्या काळात 'पेपर-कंट्रोल ऑर्डरचे' महत्त्व विलक्षण होते. तुम्ही छापखाना चालविला नाही तरी चालेल पण कागदाचा कोटा एकदा का तुम्हांला मिळाला की त्याच्या सहाय्याने छापखाना न चालविताही धंद्याला बरकत येत असे! पण हे गणित लक्षात यायला फार काळ घालवावा लागला. असाच एक दिवस. सायंकाळची वेळ. शाळेच्या प्रश्नपत्रिकांची छपाई चालू असताना एक गृहस्थ प्रेसच्या तळघरात दाखल झाले. प्रेसची जागा त्यावेळी तळघरात होती. 'कागदाचा कोटा' किती आहे, तो दाखवा असे त्यांनी विचारल्यावर कोटा नावाची चीज आमच्यापाशी नाही हे त्यांना सांगितले. त्यानंतर माझे जे काही हाल झाले ते सांगणेही कठीण व तुम्ही वाचणेही कठीण. आलेल्या त्या इन्स्पेक्टर नावाच्या माणसाशी आमच्यापैकी एका सहकाऱ्याने बोलता बोलता मित्रत्वाचे संबंध कसे प्रस्थापित केले, त्यामुळे येऊ घातलेले संकट कसे टळले याची आठवण अद्यापीही विस्मृतीत गेलेली नाही.

**'कल्पना मुद्रणालया'ची सुरुवात चिं. स. लाटकर यांच्यापासूनच झाली. प्रथमच सुरू केलेल्या या उद्योगाचे सुरुवातीचे दिवस कसे होते, आलेल्या अडचणींना जिद्दीने तोंड देऊन त्यांनी व्यवसाय भरभराटीला कसा आणला व मानाचे स्थान कसे मिळवले याचा हा हृद्य आलेख**

## फॅक्टरी इन्स्पेक्टर

सुरुवातीच्या दिवसातील आणखी अशीच घटना मला अजून आठवते. पुण्यातील पंतांचा गोट ज्यांना माहीत आहेत त्यांना त्या ठिकाणची कोपऱ्यावरची विहीरही माहीत असेल. सायंकाळी ७ चा सुमार असेल. तळघरातल्या उकाड्याने हैराण होऊन बाहेर विहिरीच्या कटट्यावर वाऱ्यासाठी येऊन गप्पागोष्टी करीत मी बसलो होतो. खाली प्रेसमध्ये 'ओव्हरटाईम' करीत प्रेसमधील जवळजवळ सर्व कामगार काम करीत होते. 'लाटकर कोण आहेत'? अशी चौकशी करीत साधारण मध्यम वयाचे एक गृहस्थ तेथे आले. मीच तो असे सांगितल्यावर मी फॅक्टरी इन्स्पेक्टर आहे अशी स्वत:ची ओळख त्यांनी करून दिली. प्रेसची तपासणी करण्यासाठी मी येथे आलो आहे. सध्या येथे 'ओव्हरटाईम' काम चालते अशा तक्रारी आमच्याकडे आल्या आहेत. तर काय परिस्थिती आहे? असे त्यांनी विचारले. मनातून भयभीत झालो असलो तरी उसने अवसान आणून मी उत्तर दिले की 'होय. परिस्थिती खरी आहे.' मग मी काय करावे अशी तुमची इच्छा आहे असे इन्स्पेक्टरनी विचारले. त्यावेळेपर्यंत धीर आला होता. 'मी खरं सांगू? तुम्ही काहीही चौकशी न करता परत जावे असे मला वाटते. कारण आता जर मी काम केले नाही तर उद्याच्या शाळेच्या परीक्षा वेळेवर होणार नाहीत' असे मी त्यांना सांगितले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे ते फॅक्टरी इन्स्पेक्टर तपासणी न करता परत गेले. तुम्ही जे खरे सांगितले त्यावरून मी हा निर्णय घेतला आहे असे जाताना सांगून गेले. पहिल्या अनुभवापेक्षा किती वेगळा हा अनुभव! त्यावेळचे हे फॅक्टरी इन्स्पेक्टर नंतर रोटरी क्लबमध्ये माझे स्नेही झाले.

## ग्रंथमुद्रण

ग्रंथमुद्रण करावयाचे ही जिद्द या वेळेपर्यंत निर्माण झाली होती. अशा वेळी मुंबईच्या त्यावेळच्या एका नामवंत प्रकाशकाने एक नाटक छापणार का अशी विचारणा केली.

आपल्याबद्दल, आपल्या छापखान्याबद्दल मुंबईपर्यंतच्या प्रकाशकांचे मत चांगले होत चालले आहे अशी उगीचच समजूत करून घेऊन त्यावेळी मी सुखावलो होतो.

पण पुस्तक कसे करावयाचे? पाने कशी बांधावयाची? मशीनला छापण्यासाठी फॉर्म घ्यावयाचा तो कसा घ्यावयाचा याबद्दल संपूर्णत: अडाणी असलेला मी त्यावेळचा मुद्रक होतो. तथापि जिद्दीला कठीण परिस्थितीची पर्वा नसते या उक्तीप्रमाणे मी ते काम स्वीकारले. त्या नाटकातील एकतृतीयांश मजकूर मी स्वत:च्या

हाताने जुळणी केला होता. याचाही 'अभिमान' त्यावेळी होता. दिवसभर जुळणी करावयाची व सायंकाळनंतर बाहेरच्या प्रेसमधून हुशार कामगारांना बोलावून त्या मजकूराची पाने तयार करावयाची असे तंत्र अवलंबले. अशा तऱ्हेने पुस्तक तयार झाले. पुस्तक छपाईला तयार झाले तोपर्यंत सांगलीहून आलेले सिलिंडर मशीन जोडून झाले होते. पण त्यासाठी लागणाऱ्या विजेचा पत्ता नव्हता. येथेही अडचणी होत्याच. आज हे सांगितले तर कोणालाही पटणार नाही. पण तो धोका पत्करूनही सांगतो, की या पहिल्या नाटकाची छपाई आम्ही हाताने सिलिंडर मशीन चालवून पुरी केली होती. या पुस्तकानंतर मात्र एकामागून एक अशी चार मोठी पुस्तके मी छापून पूर्ण केली, ती विजेवर चालणाऱ्या सिलिंडर मशीनवर. पण नाटक इथे संपले नव्हते! या कामाचे बील लगेच देण्याची शक्यता नसल्याने प्रकाशकांनी पुढील तारखेचे चेक दिले. हे चेक मुदतीत न वटल्यामुळे ऐन दिवाळीत माझे कसे हाल झाले असतील याची वाचकांना कल्पना येऊ शकेल.

**स्वत:चा छापखाना**

अशा अवस्थेत आयुष्याचे फार दिवस कुजत घालविण्यात मनाची तयारी नव्हती. अर्थकारणाचीही समस्या यातून सुटणे कठीण आहे, हे लवकरच माझ्या लक्षात आले. आणि मी संपूर्णपणे माझा स्वत:चा छापखाना. १९६० सालच्या दसऱ्याला सुरू केला. त्यासाठी त्याच ठिकाणी लीजने जागा घेऊन प्रेससाठी जागाही बांधली. माझ्या सुरुवातीच्या वाटचालीचा हा पहिला टप्पा संपून दुसऱ्या टप्प्याची सुरुवात झाली होती.

दुसऱ्या टप्प्याची सुरुवातीची वाटचाल पहिल्या टप्प्यातल्या वाटचालीपेक्षा सुखद होती असे म्हटले पाहिजे. पंतांच्या गोटातच प्रेससाठी जागा मिळणे ही केवढी सुखद घटना होती! या गोटात मी १९४१ सालापासून वावरत होतो. मी फेंग-शुईच्या शास्त्रावर संपूर्ण विश्वास ठेवणारा नसलो तरी वास्तू, वास्तूची जागा या गोष्टींना नशीब घडविण्याच्या स्वत:च्या प्रयत्नांत महत्त्वाचे स्थान आहे अशी माझी त्यावेळीही श्रद्धा होती व आजही आहे. आलेल्या अनुभवामुळेही ही श्रद्धा दृढ झाली असण्याची शक्यता आहे. पंताच्या गोटात मी जागा वार्षिक भाड्याने घेऊन सुरुवातीला इमारतीचा जो प्लॅन महानगरपालिकेत दाखल केला तो चिखलातील वीटकाम व सिमेंटच्या पत्र्याचे छप्पर असा होता. प्लॅन मंजूर होऊन आला आणि बांधकामास सुरुवात करणार एवढ्यात एके दिवशी आमचे कौटुंबिक स्नेही श्री. ना. बनहट्टी माझ्या घरी आले. तुम्ही प्रेससाठी जागा बांधत आहात पण कच्ची शेड न बांधता सिमेंट काँक्रिटची पक्की इमारत बांधा असा आग्रहाचा सल्ला त्यांनी दिला. त्यासाठी लागणारी आर्थिक मदतही देण्याची तयारी त्यांनी दर्शविली. मी पक्क्या इमारतीचा प्लॅन दिला आणि बांधकामाला सुरुवात केली. अवघ्या ५ हजार रुपयांच्या आधारावर पक्की इमारत बांधायची हिंमत तर मनाशी बांधली. पण मशीनचे काय करायचे?

**पुस्तक कसे करावयाचे? पाने कशी बांधावयाची? मशीनला छापण्यासाठी फॉर्म घ्यावयाचा तो कसा घ्यावयाचा याबद्दल संपूर्णतः अडाणी असलेला मी त्यावेळचा मुद्रक होतो. तथापि जिद्दीला कठीण परिस्थितीची पर्वा नसते या उक्तीप्रमाणे मी ते काम स्वीकारले.**

**मशीन आले**

पुन्हा प्रश्नचिन्ह! परंतु इमारतीच्या स्लॅबचे काम चालू असतानाच मशीनचा एक व्यापारी 'पेटी पॅक मशीन' मुंबई बंदरात नुकतेच उतरले आहे ते घ्या असे सांगण्यासाठी आला. मध्यंतरीच्या काळात माझे प्रकाशक-लेखक-कागदाचे व्यापारी यांच्याशी विश्वासाचे व सलोख्याचे संबंध निर्माण झाले होते. शरत ट्रेडिंग कंपनीचे श्री. सदुभाई मेहता हे असेच स्नेही बनलेले कागद व्यापारी. मशीनचे हे वृत्त कळताक्षणीच त्यांनी मशीनची ऑर्डर देण्यास सांगितले. काहीही खर्च करावा न लागता दारात मशीन येऊन उभे राहिले. मला तर विश्वास न बसणारी ही घटना वाटली. यथावकाश या सर्वांचे पैसे मी फेडले. परंतु या घटनेची आठवण झाली की आजही सदुभाई मेहता यांच्याबद्दल मन आदराने भरून येते. केवढा हा विश्वास आपण संपादन केला आहे याची प्रचीती त्यावेळी मला आली. आणि जिद्दीला जणू पंख फुटल्यासारखे झाले. स्वत:वरचा विश्वास अनेक पटीने वाढला. 'कल्पना मुद्रणालय' सुरू झाले.

परंतु यशाच्या मार्गात खड्डे, खाचखळगे, काटेकुटे असतात याची प्रचीती लवकरच आली. मशीन सुरू करून २/३ महिनेही झाले नव्हते आणि एके दिवशी दुपारच्या सुमारास मशीनच्या मागे काम करीत असलेल्या मशीन सहाय्यकाचा पाय मशीनमध्ये अडकला व तो जखमी झाला. कोणाचाही दोष नसला तरी घडू नये ते घडले. त्या कामगाराला लगेच हॉस्पिटलमध्ये हलविले. उपाययोजना झाली कालांतराने तो पूर्ण बरा झाला. पुन्हा कामावर रुजू झाला. तरी प्रत्यक्ष अपघात झाला त्यावेळेला ब्रह्मांड आठवले असल्यास नवल नाही.

**पानशेत**

'कल्पना मुद्रणालय' नुकतेच कुठे सुरू होऊ लागले असताना मला एका भयंकर संकटाला तोंड द्यावे लागले. ११ जुलै, १९६१ रोजी पानशेत धरण फुटले खडकवासला धरण फुटले अशा बातम्या कानावर येऊ लागल्या. ११ जुलैचा

तो काळा दिवस आज इतकी वर्षे होऊन गेली तरी स्मरणात ताजा आहे.

लकडी पुलापर्यंत (सध्याचा संभाजी पूल) पाणी आले आहे. ओंकारेश्वराला स्नान झाले आहे, पूल वाहतुकीस बंद झाला आहे, पुलावरून पाणी वाहू लागले आहे. पाणी शहरात घुसले आहे, अशा बातम्या एका पाठीमागून एक कानावर येऊ लागल्या. आणि प्रसंगाच्या गांभीर्याची कल्पना आली. भराभर प्रेस बंद केला, कामगारांना घरी पाठविले, इमारतीच्या आवारातच असलेले सुविचार प्रकाशन बंद करण्यास सांगितले. माझे मित्र त्यावेळी प्रेस शेजारच्या घरात राहत होते, त्यांना घाईघाईने घराबाहेर काढले. पंतांच्या गोटात टिळक रस्त्यावर फाटकांच्या दवाखान्याची भक्कम दगडी इमारत मात्र पुराला दाद न देता अविचल उभी होती. त्यामुळे पाण्याचा लोंढा काही काळ अडला, पण पाण्याने कुमठेकर रस्त्याने वाट काढीत काढीत दहा मिनिटांच्या आत कल्पना मुद्रणालयाला वेढा घातला. सबंध मुद्रणालय ८ फूट पाण्यात गेले. हे सर्व काही क्षणात डोळ्यांसमोर घडत असलेले पाहिले. जीव वाचविण्यासाठी पहिल्या मजल्यावर गच्चीत गेलो त्यावेळेला मी, प्रेसमधील एक कामगार असे दोघेच राहिलो होतो. पण दैव बलवत्तर असले पाहिजे. त्यावेळी स. प. कॉलेजसमोर डॉ. भावे यांचा डोळ्यांचा दवाखाना होता. डॉक्टर भावे हे काही स्वयंसेवक बरोबर घेऊन मदत करण्यासाठी हिंडत होते. त्यांनी दूर अंतरावरून आम्हाला पाहिले आणि टिळक रोडवर न्यू इंग्लिश स्कूलच्या बाहेरच्या भिंतीपासून दोर टाकून त्यांनी आमची सुटका केली.

सकाळी ११ ते सायंकाळी ७ पर्यंत न्यू इंग्लिश स्कूलच्या भिंतीवर विचारशून्य अवस्थेत घालविलेला तो दिवस मला इतकी वर्षे गेली तरी आजही डोळ्यांसमोर दिसतो.

पानशेतच्या प्रलयावेळेची एक आठवण मला अजूनही आहे. पाणी आत शिरू लागले तसे तळमजल्यावरील जुळणी चालू असलेल्या एका पुस्तकाचे हस्तलिखित घाईघाईने कामगारांनी पोटमाळ्यावर नेऊन ठेवले. आमच्याबरोबर ते हस्तलिखितही या पुरात शाबूत राहिले. म. ना. सहस्रबुद्धे यांचे शाहिरी वाङमयावरील संशोधनपूर्व ते लिखाण होते. त्यांचे वय त्यावेळी ८० च्या आसपास असावे. हस्तलिखिताची दुसरी प्रत नव्हती. हे हस्तलिखित जसेच्या तसे पानशेतच्या प्रलयातून वाचले याचा केवढा आनंद श्री. म. ना. सहस्रबुद्धे लेखक, व प्रकाशक श्री. ग. ल. ठोकळ यांना झाला आणि त्या दोघांपेक्षाही मी जास्त आनंदित झालो होतो, ते माझ्या अजून लक्षात राहिले आहे.

## पुनर्वसन

पुरानंतर कल्पना मुद्रणालयाच्या पुनर्वसनाला काही काळ जाणे स्वाभाविक होते. असे म्हणतात की लंडनच्या भीषण आगीनंतर लंडन शहराचा कायापालट झाला. पानशेतच्या प्रलयानंतर पुण्याच्या बाबतीत असेच म्हणावे लागेल. जुने पुणे पानशेतनंतर पूर्ण बदलले. पुण्याबरोबर कल्पना मुद्रणालयही नंतरच्या काळात बदलले.

सुरुवातीच्या या संकटानंतर मात्र कल्पना मुद्रणालय वाढले. विस्तारले आणि कीर्तिशिखराच्या पायऱ्या चढू लागले. त्यानंतरच्या काळात मी कधी मागे वळून पाहिले नाही. पुणे सुधारत चालले तसे कल्पना मुद्रणालयही विस्तारत चालले. व्यापाने आणि कीर्तीने सुद्धा. सुबक, अत्यंत झपाट्याने व मुख्य म्हणजे वेळेवर देणाऱ्या हाताच्या बोटावर मोजता येणाऱ्या ग्रंथमुद्रकांत 'कल्पना मुद्रणालयाचे' नाव झळकू लागले. महाराष्ट्रातील बहुतेक नामवंत लेखकांचे वाङ्मय, तसेच ते प्रकाशित करणाऱ्या जवळजवळ सर्व प्रकाशकांची प्रकाशने यांच्यावर कल्पना मुद्रणालयाची मोहोर त्या काळात उठलेली आहे. १९७५ पासून सुबक ग्रंथमुद्रणासाठी देण्यात येणारा राष्ट्रीय पुरस्कार त्या त्या वेळच्या राष्ट्रपतींच्या हस्ते सातत्याने दहा वर्षे मिळविणारे एकमेव मुद्रणालय अशी ओळख त्यावेळी महाराष्ट्रभर झाली. कल्पना मुद्रणालयातच आपले लिखाण छापावे असा आग्रह प्रकाशकांकडे धरणारे अनेक लेखक माझ्या परिचयाचे आहेत. ग्रंथमुद्रणाच्या क्षेत्रातील मिळविण्यासारखे मानसन्मान आज तरी माझ्याकडे काही राहिलेले नाहीत.

एक खंत मात्र माझ्या मनात अजून कायम आहे. जग बदलून टाकणाऱ्या चाकाच्या शोधानंतर मुद्रणकलेचा शोध हा मानवाच्या प्रगतीतील महत्त्वाचा टप्पा असला तरी मुद्रणकलेची सेवा करणाऱ्या मुद्रकाला मात्र ग्रंथ व्यवहारात आजही त्याचे योग्य स्थान मिळालेले नाही. तो आजही अस्पृश्य राहिला आहे. परभणी येथील साहित्य संमेलनात ग्रंथव्यवहारातील घटक म्हणून व्यक्तिश: माझा गौरव झाला असला, असा मान मिळालेला मी एकमेव ग्रंथ-मुद्रक महाराष्ट्रात असलो तरी तो अपवाद आहे असेच मला वाटते.

ग्रंथ-मुद्रणाच्या तंत्रज्ञानात गेल्या काही वर्षांत अनेक स्थित्यंतरे झाली आहेत. ऑफसेट तंत्रज्ञान आले, त्या पाठोपाठ आलेल्या डी.टी.पी. तंत्रज्ञानाने तर सुट्या टाईपाच्या साहाय्याने अनेक शतके चालू असलेले मुद्रण संपुष्टात आले. प्लेट मेकिंगच्या तंत्रज्ञानात बदल होऊन संगणकाच्या मदतीने तयार प्लेटस् तयार होण्याचे नवे तंत्र आले. या सर्व तंत्रज्ञानाचे बदल 'कल्पना मुद्रणालयात' झाले असले तरी त्या त्या तंत्रज्ञानाच्या वापराच्या सुरुवातीच्या दिवसात अनेक अडचणीही आल्या. मात्र अशा सर्व सुरुवातीच्या अडचणींचा उल्लेख या ठिकाणी मी केलेला नाही. पन्नास वर्षांनंतर मी मुद्रणाच्या व्यवसायातून आता निवृत्ती स्वीकारली आहे. परंतु माझा मुलगा आनंद या धंद्यातच आला आहे व यशस्वीपणे पुढील प्रगती करीत आहे. दुसरा मुलगा उल्हास प्रकाशन-विश्वात स्थिर झाला असून नवी वाट यशस्वीपणे चोखाळत आहे. खेळ पुढे चालूच आहे. (Show is going on.) त्यामुळे सुरुवातीच्या दिवसातील कडू-गोड अनुभवांतील फक्त चांगल्या स्मृतीच आज माझ्या मनात रेंगाळत आहेत.

११९५/२, आनंदी गोपाळ
फर्ग्युसन रोड, दीनदयाळ हॉस्पिटल समोरची गल्ली,
शिवाजीनगर, पुणे ५

# प्राध्यापकी ते आंतरराष्ट्रीय प्रकाशन संस्थेतील ग्रंथ संपादन

## अविनाश पंडित

प्रकाशनाशी खरा संबंध जवळजवळ पंचवीस वर्षांपूर्वी आला. सरकारने १९६० साली प्राध्यापकांची ॲकॅडमिक कन्सिस्टन्सी तपासण्याचे आदेश महाविद्यालयांना दिले आणि प्रा. पंडितांची म्हणजे आस्मादिकांची दांडी उडाली.

कुठल्यातरी बाबूच्या डोक्यात उगम पावलेल्या शैक्षणिक सातत्य मोजण्याच्या सूत्रामध्ये माझे पदव्युत्तर, पदवी आणि इंटर आर्टस यांचे गुण जमेनात आणि मी पदवीच्या वर्गांना शिकवण्यास अपात्र ठरलो. शिक्षणक्षेत्रात सध्या फार गोंधळ आहे असे म्हणतात. पण त्यावेळीही कुणाचा पायपोस कुणात नव्हता. मला मुंबई विद्यापीठात पदव्युत्तर वर्गांकरता ज्या व्याख्यातांकरता मुलाखती होणार होत्या, त्याचे निमंत्रण मिळाले होते आणि माझी प्रथमवर्ष बी.ए.च्या चीफ एक्झॅमिनर तथा पेपरसेटर म्हणून नेमणूकही झाली होती!

तेव्हा अध्यापनक्षेत्र सोडणे क्रमप्राप्त झाले होते. मी सांगली बँकेत एक अर्ज (मनाविरुद्ध) केला होता. मनाविरुद्ध कारण उजव्या बाजूला डेबिट आणि डाव्या बाजूला क्रेडिट (चू.भ.द्या.घ्या.) मला जमण्यासारखे नव्हते याची शंभर टक्के खात्री होती.

ड्रॉईंग आणि पी.टी. सोडून शाळा-कॉलेज यातील सर्व विषय शिकवणाऱ्या क्लासरूपी ॲकेडमी जन्म घेत होत्या; पण क्लासेस काढणे मनाला पटत नव्हते. 'महात्मा गांधी यांचा जन्म पोरबंदर येथे २ ऑक्टोबर १८६९ या दिवशी झाला' या वाक्यातून कुणाचा जन्म पोरबंदरला झाला, पोरबंदरला २ ऑक्टोबर १८६९ ला कुणाचा जन्म झाला, महात्मा गांधीचा जन्म कुठे/केव्हा झाला यासारखे प्रश्न घुसळून 'नवनीत' निर्मिती करण्याचा आणि चेतनादायी जीवनदीप होण्याचाही एक सल्ला पुढे आला.

### ओरिएंट लाँगमन

बोगद्याच्या दुसऱ्या बाजूचा प्रकाश दिसेपर्यंत सुमारे सहा महिने गेले. डिसेंबर ८०च्या शेवटी ओरिएंट लाँगमनची जाहिरात पाहण्यात आली. दोन महिन्यांत मुलाखत वगैरे घेऊन सहसंपादक म्हणून नेमणूकही झाली. अभ्यासक्रम, परीक्षा संपवून थोडी सुट्टी घेऊन लाडक्या विद्यार्थी (विद्यार्थिनीसुद्धा) यांचा निरोप घेऊन मी मे अखेरीस येऊ का असे ओ.एल.ला विचारले आणि पहिल्या दिवसातला पहिला गोड झटका मिळाला. फोनवरूनच त्यांनी माझी विनंती मान्य असे कळवले. Your suggestion has been forwarded to the concerned department for further necessary action असले काही नव्हते.

माझी खरी भीती वेगळीच आणि कामाबद्दलची होती. त्यापूर्वी काही वर्षे मुंबई विद्यापीठात शिकवत असताना मी एका अखिल भारतीय स्पर्धा परीक्षेत यशस्वी होऊन क्लास वन म्हणून सरकारी नोकरीत रुजू झालो होतो. मी भूगोलाचा विद्यार्थी. अत्यंत सुसज्ज प्रयोगशाळा, नकाशे, हवाई छायाचित्रे, उपग्रहाद्वारे घेतलेली छायाचित्रे अशी साधने पाहिल्यावर स्वाभाविकपणे त्या सरकारी कार्यालयात उत्साहाने पाऊल टाकले. पण पहिल्या काही दिवसात भ्रमनिरास झाला. मला ग्रंथालयातील पुस्तके त्यांच्या उंचीप्रमाणे लावा असा आदेश वरिष्ठांनी दिला आणि मग दंड भरून का होईना पण गाशा किती लवकर गुंडाळता येईल याकडे मी माझा मोर्चा वळवला होता.

माझ्या विनंतीला ज्या त्वरेने व पद्धतीने प्रतिक्रिया मिळाली होती, त्यामुळे तेथे त्या सरकारी कार्यालयातील अनुभवासारखे होणार नाही याची खात्री पटली. काहींचे एक म्हणणे त्रास देत होते : दिवसाला तीन लेक्चर्स घेऊन, वर्षातले चार महिने सुट्टी घेणाऱ्या तुला आठवड्याला पाच दिवस रोज साडेनऊ ते पावणेसहा मानवेल काय हा त्यांचा प्रश्न होता. लेडी जमशेटजी रोडचे शिवाजी पार्कचे टोक माहीत असणाऱ्या पण तो रस्ता कुठे संपतो याबद्दल अनभिज्ञ असणाऱ्या आमच्या एका नातेवाईकांना विलेपार्ले (घर) ते बॅलॉर्ड इस्टेट (कार्यालय) मी कसा जाणार याची चिंता होती. बरीच मंडळी त्या सुमारास (१९८०-८१) इंदिरा काँग्रेसमध्ये 'स्वगृही' परतली होती. मी सुद्धा सरकारी फतवा दूर झाल्यास स्वगृही परतेन

असे काहींना वाटत होते. प्रकाशन क्षेत्रात भाषेचे ग्रॅज्युएट्स त्यावेळी अधिक होते. माझ्यासारख्याचा तेथे कसा निभाव लागणार याची चिंता असणारेही काही मानव होते. कहर म्हणजे लाँगमनमध्ये स्टर्लिंग पौंडात पगार मिळतो अशी गोड (गैर) समजूत करून घेणारे आत्मेही भेटले. त्यावेळी एक पौंड साधारण ३७ रुपये होता. हे लोक ३७ च्या पाढ्याची उजळणी करत होते.

### प्रभाकर वर्टी

सगळ्याच जणांच्या प्रतिक्रिया अशा अफलातून नव्हत्या. इंग्रजी आणि त्यातसुद्धा ब्रिटिश प्रकाशनगृहाशी संबंधित व्यक्तींचे सल्ले फारच उत्साहवर्धक होते. यात मला प्रभाकर वर्टी जे लाँगमन्स ग्रीनपासून ओरिएंट लाँगमन या बदलेल्या कारकीर्दीचे साक्षीदार होते व पुढे सोमैय्यामध्ये अखेरच्या क्षणापर्यंत कार्यरत होते यांचे मार्गदर्शन अत्यंत उपयुक्त होते.

वर्टी हे बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते. प्रकाशनाशी संबंधित व्यवहार, लेखक-मुद्रक-चित्रकार यांच्याशी संबंध इ. त्यांनी खुबीने सांगितले. माझ्या प्राध्यापकीच्या पहिल्या काही महिन्यांतच त्यांनी माझ्याकडून भूगोलाच्या अकरावीच्या अभ्यासक्रमावर आधारित पुस्तक लिहून ते उच्च माध्यमिक बोर्डात लावून घेण्याचा भीष्मपराक्रम केला होता. त्यावेळी व नंतरही मला त्यांना जवळून पाहण्याची संधी मिळाली होती. आता टेबलाच्या दुसऱ्या बाजूला - संपादक म्हणून - कसे बसावे याच्या त्यांनी बहुमोल टिप्स दिल्या.

### संपादन पहिलाच दणका!

आवडते क्षेत्र सोडून नव्या क्षेत्रात प्रवेश करताना असे संमिश्र वातावरण होते. मनावर दडपण होते

खरे परंतु एम.ए. झाल्यावर शालान्त परीक्षा मंडळासाठी नव्या दहावीच्या पुस्तकाचे काम, नव्या अकरावीला लागलेले पुस्तक व पुढे बारावीला न लागलेले पुस्तक या तिन्ही प्रसंगी स्वत: केलेले संपादन, मुद्रितशोधन याचा थोडासा अनुभव पाठीशी होता. इंग्रजी भाषेमध्ये हे काम केल्याने इंग्रजी प्रकाशनगृहात आपल्याला काम अवघड जाणार नाही हा विश्वास होता.

हा विश्वास ओरिएंट लाँगमनमध्ये म्हणजे माझ्या प्रकाशन क्षेत्रातील पहिल्या नोकरीमध्ये अगदीच चुकीचा ठरला नाही. पहिलेच हस्तलिखित थंगम फिलिप्स या केटरिंग आणि हॉटेल व्यवस्थापन या क्षेत्रातील अधिकारी व्यक्तीचे बेकिंगवर होते. जेमतेम वरण आणि भात करणे एवढीच माझी पाकशास्त्रात प्रगती असल्याने मला पण असेच ज्या विषयात मला गती नाही असे हस्तलिखित हवे होते. आणि अहो आश्चर्यम्! चादरीत ढेकूण सापडावेत तसे थंगमबाईंच्या लेखनात कच्चे दुवे मिळाले.

**थंगमबाईंचे हस्तलिखित मला हातात देताना माझ्या प्रकाशनातील गुरू - प्रिया आडारकर - यांनी ज्या सूचना दिल्या तो या क्षेत्रातील पहिला धडा म्हणजे आदर्श पाठ होता. ग्रंथ संपादकाने हस्तलिखितावर संस्कार करताना काय करावे, काय करू नये या सूचना ऐकताना आपोआपच बऱ्याच गोष्टी उलगडत गेल्या.**

थंगमबाईंचे हस्तलिखित मला हातात देताना माझ्या प्रकाशनातील गुरू - प्रिया आडारकर - यांनी ज्या सूचना दिल्या तो या क्षेत्रातील पहिला धडा म्हणजे आदर्श पाठ होता. ग्रंथ संपादकाने हस्तलिखितावर संस्कार करताना काय करावे, काय करू नये या सूचना ऐकताना आपोआपच बऱ्याच गोष्टी उलगडत गेल्या.

उदाहरणार्थ, शब्दकोशाचे महत्त्व. इंग्रजी शब्दाचे नक्की अर्थ आणि तो कसा चालवायचा याला संपादकीय संस्कारात जे स्थान आहे ते कळू लागले. मी एकदा papercraft या अर्थी paper-work हा शब्द वापरला होता. आडारकर बाईंनी मी शब्दकोश पाहिला आहे काय एवढेच मला विचारले आणि मला चूक काय ती कळली. दहावीच्या पुस्तकाकरता काम करत असताना माझे मार्गदर्शक डॉ. सी. डी. देशपांडे होते. एकेकाळी शालान्त परीक्षा मंडळाचे अध्यक्षपद व महाराष्ट्र राज्याचे शिक्षण संचालक असणारे सी. डी., भूगोलाचे पुस्तक लिहिताना प्रत्येक वाक्य लिहिताना संदर्भग्रंथ तपासत असत आणि विद्यार्थ्यांसाठी भाषा नीट आहे ना यावर भर देत असत. त्यावेळी अर्धवट भाजलेले माझे मडके पूर्ण भाजायचा प्रयत्न बाई करत होत्या.

### टीमवर्क

प्राध्यापकी करत असताना कामाच्या बाबतीत आपण बहुतांश स्वतंत्र असतो. आपण आणि आपली व्याख्याने यात परीक्षेनिमित्त इतरांशी संपर्क, अभ्यासक्रमासंबंधी सहकाऱ्यांची चर्चा, जिमखाना, एन. एस. एस. या उपक्रमांशी निगडित सहभाग इत्यादी असते पण ते त्यामानाने कमी. संपादक म्हणून काम करत असताना मात्र असे नसते. लेखक, मुद्रक, अक्षरजुळणीकार, चित्रकार यांच्याशी संबंध येतोच. पण प्रकाशनगृहातील सहकाऱ्यांशी काही वेळा जवळजवळ एकाच वेळी बोलावे लागते. बरे ते देखील विविध विषयांवर. निबंध विभागातील सहकाऱ्याशी मुद्रकाच्या अडचणींबद्दल तर हिशेब विभागातील लोकांशी बिलांबद्दल. लेखकाला आणखी प्रती हव्या असल्यास तो तुम्हालाच विचारतो. याच वेळी एखादा आपला प्रकाशन प्रस्ताव घेऊन आला की संपलेच.

अशा अनेक आघाड्यांवर लढाई करणे पहिल्या दिवसात थोडे फार जड गेले. विशेषत: प्रकाशन प्रस्ताव घेऊन येणाऱ्या लोकांसमोर माझी पंचाईत होत असे. एक तर ती मंडळी प्रचंड चिवट असतात आणि नाही म्हणणे मला (अजूनही) जमत नाही. इंग्रजी साहित्यातले सर्व बहुमान

मलाच मिळणार असे तडफेने सांगणाऱ्या लेखक/लेखिका यांना तुझे लिखाण प्रूफरीडरशिवाय कोणीही दुसरे वाचणार नाही हे सांगणे मला जीवावर येत असे व तेवढे सांगायचे धैर्यही नव्हते.

पण मला मनापासून दु:ख होई ते रक्ताचे पाणी करून, प्रचंड संशोधन करून विद्वत्तापूर्ण लेखन करणाऱ्यांना नाही म्हणायचे. अशा पुस्तकांना उठाव नसतो आणि ती आर्थिकदृष्ट्या किफायतशीर नसतात यामध्ये यांचा काय दोष असे वाटायचे. एका विदुषीने प्राचीन संस्कृतीतील काही भाषांमधील (संस्कृत, लॅटिन नव्हे) साम्ये दाखवून त्यावेळच्या दळणवळणावर काही निष्कर्ष काढले होते. तो हस्तलिखिताचा आकार, इंग्रजीखेरीज तीन वेगवेगळ्या भाषेतील अक्षरजुळणी अशा कारणाने निर्मिती खर्च वाढून पुस्तकाची किंमत फार होणार होती. प्रकाशनप्रस्ताव का स्वीकारता येत नाही हे त्यांना सांगितल्यावर सत्य पचवणे त्यांना जसे जड गेले तसे मलाही झाले.

### मी चक्रम आहे का?

या सुरुवातीच्या काळात आणखी काही कठीण प्रसंग आले. सोमवार सकाळ, नेहमीप्रमाणे अप्रसन्न वेळ. त्यातच कार्यालय उघडून काही क्षण होतात न होतात तर फोन खणखणला. कर्करोगावर पुस्तक लिहिणाऱ्या लेखकाचा फोन होता. ते इतकी माहिती अद्ययावत देण्याचा आग्रह धरत की प्रुफात सारखा बदल करत. लेटरप्रेसचे ते दिवस होते. सारखे बदल करून प्रेसचे लोक कंटाळले होते. बाईंनी लेखकाला विनंतीवजा पत्र लिहिले की फार बदल करू नयेत, प्रेसचे लोक वैतागतात कारण त्यांना अद्ययावतपणाचे कौतुक नसते. मुद्रकाला दुसरे पत्र पाठवून लेखकाला समजून घेण्याची विनंती केली. लेखक विद्वान आहेत, विद्वान माणसे विक्षिप्त असतात इ. त्यात होते.

फोन घेतल्याक्षणी लेखकमहाशय कडाडले, ''मी चक्रम काय?'' पुढचे सांगितले तर फुल्याच फुल्या होतील. थोड्या वेळाने प्रेसमधून फोन आला, ''मी तो रेम्याडोक्या बोलतोय. मला कौतुक नाही काय?'' प्रसंग बाका होता. दोघांनीही सॉरी म्हणून वेळ निभावली. बाईंच्या कानावर डिस्पॅच क्लार्कने केलेला हा गोंधळ घातला. असे प्रसंग आले की कसे वातावरण निवळायचे ते त्या दिवशी शिकायला मिळाले.

### विश्वकोश

मी प्रकाशनक्षेत्रात शिरलो आणि एकाच महिन्याने मराठी विश्व-कोशात भूगोलासाठी अभ्यागत संपादक म्हणून आमंत्रण आले. रीतसर परवानगी वरिष्ठांकडे मागणी करण्यापूर्वी मिळाली. मराठी विश्व-कोशाची, तर्कतीर्थांची, वाईच्या सांस्कृतिक महत्त्वाची ओरिएंट लाँगमन-मधील बुजुर्गांना माहिती होती, या सर्वांचे महत्त्व ते जाणून होते. याचे कौतुक आणि नवल वाटले. मी विश्वकोशात गेल्याने त्यांना त्याचा फायदा होणार होता ही गोष्ट क्षणभर बाजूला ठेवली तरी त्यांनी मला दिलेले प्रोत्साहन नक्कीच मनाला उभारी देणारे होते.

आता मागे वळून बघताना अनेक वेळा मनात येते. पहिले दिवस इतके आनंददायी का ठरले असतील? पुस्तकाची आवड म्हणून की पाहिजे असलेले शिक्षणाशी संबंधित क्षेत्र मिळाले म्हणून?

डॉ. सी. डी. देशपांडे यांनी रचलेल्या पायावर आडारकर बाई आणि तर्कतीर्थ जोशी यांनी चढवलेल्या इमारतीमुळे? कार्यालयातील इतर विभागातील मदतीकरता तत्पर आणि मनमिळावू सहकाऱ्यांमुळे आणि समजून घेणाऱ्या वरिष्ठांमुळे?

याच काळात माझ्यावर एक दु:खद प्रसंग आला होता. त्यावेळी मला धीर देऊन तो विसरायला लावणाऱ्या कार्यालयातील मित्र-मैत्रिणींमुळे?

मला ग्रंथाचा शिक्षक म्हणून पाहणाऱ्या माझ्या लेखकांमुळे की इतर मुद्रक, बाईंडर्स यांनी मला काही तांत्रिक माहिती नाही असे कळल्यावर मला त्या क्षेत्रात मदतीचा हात दिला त्यांच्यामुळे?

पाहुण्याला चहा द्यायला सांगितला की आमचा प्रभुलाल नामक चहावाला त्याच्यासमोरच ''इसका पैसा कौन देगा?'' असे विचारायचा. कदाचित असे नगही आनंद देत असतील. आर्थिक अडसर मी माझ्याच भोटमपणाने सोडवला होता. मुलाखतीला साहेबांनी पगाराची अपेक्षा काय विचारले होते. मी उतावळेपणाने माझा एकूण पगार सांगितला. साहेबांनी मला नखशिखान्त पाहिले. पुढचे काम माझ्या रूपेरी केसांनी केले. साहेबांनी तो आकडा बेसिक समजून काही आकडेमोड केली आणि संपादक पंडित, प्राध्यापक पंडितांपेक्षा श्रीमंत झाले.

मला तो दिवस चांगला आठवतो. बाई दोन-अडीच महिने कामाकरता व रजेनिमित्त परदेशी जाणार होत्या. त्यावेळी संपादकीय विभाग मी सांभाळायचा असा फतवा हाती आला होता. माझे मन एकदम लग्नानंतरच्या दिवसांकडे गेले. मी घरी उशिरा गेलो की माझी पत्नी विचारायची, ''आज उशीर का झाला? तुझ्याच लोकलखाली कशी माणसं मरतात?''

मग पुढे एके दिवशी तिने आज लवकर कसा आलास अशी पृच्छा केली. उत्तर देण्यापूर्वी मी ताडले, नवलाई सरली.

त्या फतव्यानेसुद्धा मला पहिले दिवस संपल्याचाच इशारा दिला होता.


**अविनाश पंडित**

| | |
|---|---|
| शिक्षण : | एम.ए., डिप्लोमा इन बुक पब्लिशिंग<br>सेंट झेवियर्स हायस्कूल (विलेपार्ले), पार्ले कॉलेज; मुंबई विद्यापीठ; भारतीय विद्याभवन |
| अध्यापन: | सोमय्या महाविद्यालय, मुंबई विद्यापीठ, कीर्ती महाविद्यालय. |
| प्रकाशन अनुभव : | संपादक, ओरिएंट लॉगमन प्रमुख संपादक, सोमय्या पब्लिकेशन्स. |
| विशेष : | अभ्यागत संपादक, मराठी विश्वकोश<br>माजी सदस्य, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ. |

# माझी आवडती दहा पुस्तके स्पर्धा निकाल

## सौ. सुमेधा पोळ

| | |
|---|---|
| १. वाईज ॲण्ड अदरवाईज : सुधा मूर्ती | अनु. लीना सोहोनी |
| २. गोष्टी माणसांच्या : सुधा मूर्ती | अनु. लीना सोहोनी |
| ३. आणि मी | मंगला गोडबोले |
| ४. डॉलरच्या देशा | शिरीष कणेकर |
| ५. स्पीड पोस्ट | शोभा डे |
| ६. काबुलीवाल्याची बंगाली बायको | अनु.मृणालिनी गडकरी |
| ७. झुंबर | प्रकाश नारायण संत |
| ८. नॉट विदाऊट माय डॉटर : बेट्टी महमूदी | अनु. लीना सोहोनी |
| ९. माझा गांव | रणजित देसाई |
| १०.आय डेअर : किरण बेदी | अनु.लीना सोहोनी |

**गोष्टी माणसांच्या**

सुधा मूर्तींची दोन्ही पुस्तके छान आहेत. पण मला लिहावसं वाटतंय ते 'गोष्टी माणसांच्या'या पुस्तकाबद्दल! छोट्या छोट्या अनुभवकथनातून त्यांनी सहज ओघवत्या शैलीत खूप मोठी शिकवण दिलीय. हे अनुभव जसे त्यांना खूप काही शिकवून गेले तसेच ते वाचकांनाही शिकवून जातात. विचार करायला लावतात.

उदाहरणच द्यायचे झाले तर 'रशियातील लग्न सोहळा' या लेखाचे देता येईल. रशियात लग्न कोणत्याही ऋतूत झाले तरी वधुवरांनी त्या त्या शहरातील युद्ध स्मारकांना भेट द्यायची असते. कारण हे कृतज्ञतेचे प्रतीक मानले जाते. युद्धात ज्यांनी देशासाठी आत्मसमर्पण केले त्यांच्यामुळेच आपण स्वतंत्र रशियात रहात आहोत याचे स्मरण प्रत्येकाने ठेवले पाहिजे. लग्न समारंभाच्या डामडौलापेक्षा देशप्रेम श्रेष्ठ असतं.

अनुभव छोटासा पण किती अर्थ भरलाय त्यात! आम्ही कधी तरी असा विचार केलाय का? एवढा स्वातंत्र्य संग्राम आमच्या पूर्वजांनी लढलाय पण नवीन पिढीला खरा इतिहास आम्हाला किती समजावून सांगता आलाय? आपसांतील राजकीय चढाओढीमुळे आजही आम्ही नव्या पिढीपर्यंत खरा इतिहास पोहचवू शकलो नाही.राजकारणी नेते, उद्योगपती, आपल्या आप्तांच्या, मुलामुलींच्या लग्नात कोट्यवधी रुपये खर्च करून स्वत:ला सर्वश्रेष्ठ समजण्यात धन्यता मानू लागलेत. काय ही समाजाची दुर्दशा!

अशाच लहान लहान अनुभवांतून लेखिकेने वाचकांना अंतर्मुख केलंय. विचार करायला लावलंय. म्हणून मला हे पुस्तक आवडले

---

११२६ 'मैत्र' समाधान अस्पतालके पास, राईट टाऊन,
जबलपूर (मध्य प्रदेश)४८२ ००२.

## सौ. कुमुद गाडगीळ

| | |
|---|---|
| १. धागे : गुलजार | अनंत दीक्षित |
| २. नॉट विदाऊट माय डॉटर | अनु. लीना सोहोनी |
| ३. चीयर्स | व. पु. काळे |
| ४. आय डेअर | आशा कर्दळे |
| ५. डिफिकल्ट डॉटर | अनु. रेणुका गावसकर |
| ६. गॉन फॉर गुड | अनु. अजित ठाकूर |
| ७. नापास मुलांची गोष्ट | संपा. अरुण शेवते. |
| ८. स्थलांतर एका कारखान्याचे | प्रकाश चितळे |
| ९. अम्लान कथा | आशा साठे |
| १०.कथांतर | डॉ. सुनीति देशपांडे |

**अंतर मिळविणारे 'कथांतर'**

अनुवादित पुस्तके प्रकाशित करण्याची मेहता प्रकाशनची परंपरा आहे. त्यात डॉ. सुनीती देशपांडे यांच्या रशियन कथांच्या अनुवादित पुस्तकाने भर घातली आहे. त्यात सतरा लेखकांच्या सतरा कथा अनुवादित केल्या आहेत. माणसामाणसांतील स्थानिक अंतर जास्त असले तरी सर्व माणसांतील भावनिक रूपात अंतर नसते. हे कथा वाचताना पदोपदी जाणवते.

'एका पामराची अखेर' या पहिल्याच कथेत खालच्या पदावरील लोकांची दबलेली मनोवृत्ती दिसून येते. 'लागली पैज' ही कथा वाचताना जगाच्या पाठीवरील सगळ्या बायका, आज्या, लहान मुले, नातू इथून तिथून सारखेच हे मनोमन पटते. गरज असेल तेव्हा गोड बोलून आईचा वापर करायचा पुढे तिला विचारायचेही नाही. ही सर्वत्र आढळणारी मनोवृत्ती 'ही आई कुणाची रे' या कथेत दिसून येते. यातील कथा वाचताना लेखिकेचे मातृभाषेइतकेच रशियन भाषेवरही प्रभुत्व आहे हे जाणवते.

आज जाती-जातींमध्ये, धर्मा-धर्मामध्ये व देशादेशांमध्ये कलह माजला आहे. अशावेळी विश्वातील सर्व मानवांना सुख-दु:ख, भावना व विचार यांच्या समान धाग्यात गुंफणाऱ्या 'वसुधैव कुटुंबकम्' हा संदेश पोचविणाऱ्या या कथांचे स्वागतच व्हायला पाहिजे.

---

आय-१, मंत्री पार्क,
तेजस नगर, कोथरुड,
पुणे ४११ ०३८.

# 'ते हि नो दिवसाः गताः।'

## सुरेश वसंत नाईक

न्यायाधीशाबद्दल सर्वसामान्य माणसाला कुतूहल असते. मी जेव्हा प्रथम न्यायाधीश झालो तेव्हा मलाही त्याबद्दल न्यायाधीशाचे आयुष्य जाणून घेण्याची उत्सुकता होती. मी कोणत्या दृष्टिकोनातून न्यायाधीशाच्या जीवनाकडे व त्याच्या कार्यप्रणालीकडे पहात होतो तो दृष्टिकोन समजून घेण्यासाठी त्या काळचा न्यायसंस्थेबद्दल व न्यायाधीशांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन व माझाही दृष्टिकोन समजून घेण्यासाठी त्या काळची परिस्थिती कशी होती हे पहाणे जरूरीचे आहे.

१९६३ साली म्हणजे सुमारे ४३ वर्षांपूर्वी मी न्यायाधीश झालो. त्याकाळी न्यायसंस्थेला व न्यायाधीशांना समाजात बराच मान व त्यांचा दबदबा होता. मराठवाडा नुकताच संयुक्त महाराष्ट्रात सामील झाला होता. त्यातील मोगलाई रितीरिवाज पश्चिम महाराष्ट्रातील रीतीरिवाजांपेक्षा फारच भिन्न होते. न्यायाधीशांबद्दल खूपच आदर समजात होता. रस्त्यातून न्यायाधीश चालू लागला तर लोक संस्थानिकास मान देत तसा मान देऊन रस्त्यातून बाजूला होत, तर काही ठिकाणी लोक अगदी कमरेतून लवून नमस्कार करीत. मुजरे करीत. खानदेशातील आदिवासी भागात तर लोक न्यायाधीशाचे टेबलालाही ती विष्णूची गादी आहे म्हणून स्पर्श करीत असत. न्यायाधीश हा प्रत्यक्ष परमेश्वरच आहे अशी त्याची धारणा असे. म्हणून कोणी खोटे बोलावयास धजत नसत. सध्याची सर्व ठिकाणची परिस्थिती आता पार बदलली आहे. त्यामुळे त्या काळची परिस्थितीचे नीट आकलन होणार नाही.

मला न्यायाधीशपदावर काम करावे असे कधी वाटले नव्हते. त्या काळात माझी वकिली बरी चालली होती व पुढे आपण ह्या क्षेत्रात वर येऊ असे वाटत होते. न्यायाधीश झाले म्हणजे आई-वडील इतर नातेवाईक व विशेषत: पुणे सोडून जावे लागेल. म्हणून मला त्या पदाचे आकर्षण नव्हते. बीड, उस्मानाबाद, चांदा ह्या जिल्ह्यातल्या कोणत्यातरी तालुक्याच्या गावी न्यायाधीश होण्यापेक्षा पुण्यात कायम रहावयास मिळणार असेल, तर साधा कारकून होणे बरे असे अनेक पुणेवासीयांना वाटणे स्वाभाविक होते. खुद्द न्यायाधीशाबद्दल मला भीती वाटत असे. त्यांनी काही कामासाठी त्यांचे खासगी कक्षात (चेंबरमध्ये) बोलावले तर छातीत जरा धडधड होई. मारकुट्या मुख्याध्यापकांनी बोलावल्यावर वाटते तसे वाटे. कित्येकवेळा काही न्यायाधीश इतके विक्षिप्त व चमत्कारिक वागत म्हणून वकीलवर्गात तो थट्टेचा विषय होई. पुण्यात त्या काळी एक न्यायाधीश बाथरूमला जाण्यासाठी त्यांच्या कक्षातून केवळ आपली विजार घालून, कानावर जानवे घालून लोकांतून जात. तेव्हा त्यांचा पट्टेवाला त्यांच्यापुढे जाऊन लोकांना शूऽ शूऽ करून दूर करून त्या न्यायाधीशांना वाट करून द्यायचा. ही वरात पाहणे फार हास्यास्पद वाटे. माझी न्यायाधीश म्हणून नेमणूक झाल्याचे कळल्यावर माझे वकील मित्र व इतरही तुला आता अशीच वरात काढावी लागेल अशी थट्टामस्करी करीत. त्यामुळे न्यायाधीश हा त्याचे न्यायालयाबाहेर पुण्यासारख्या ठिकाणी थट्टेचा विषयही होता. अर्थात पुण्यात कोणाची थट्टा होत नाही?

माझी जळगावला न्यायदंडाधिकारी व दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ वर्ग ह्या पदावर नेमणूक झाल्याचे पत्र अचानकपणे हाती आले. आणि एकदम धांदल उडाली.

सर्व कामे मी आटोपती घेतली. निरोप समारंभ सत्कार समारंभ झाले. पण मी त्यात मनापासून रस घेऊ शकत नव्हतो.


हे न्यायाधीशपद आपणास किती व कसे झेपेल शिवाय वेगवेगळ्या तालुक्यांना सबंध महाराष्ट्रभर बदल्या, रजेचे प्रश्न. अनेक गोष्टींनी मी दिङमूढ झालो होतो. बळीच्या बोकडाला हारतुरे घालून मिरवतात तसे वाटले. जायच्या दिवशी वकील म्हणून शेवटचे काम आटोपून संध्याकाळच्या गाडीने जळगाव गाठायचे होते. घरच्या निरोपसमारंभास झाडून सारे नातेवाईक हजर होते. अवकाश-यानाच्या प्रवासालासुद्धा इतका हृदयस्पर्शी निरोप मिळत नसावा.

## ट्रान्सफर सीन

जळगाव स्टेशनावर उतल्याबरोबर मला तिकीट तपासनीसाने हटकले. मुलीच्या दुधाची छोटी बॅग वजन केलेली नव्हती म्हणून काहीतरी खोटे कारण काढून पैसे उकळण्याच्या बेतात होता. मी गोंधळून कावराबावरा झालो. कायद्याने अशा बॅगचे (अॅटॅची) वजन करण्याचे नसते वगैरे सांगूनही तो काही ऐकेना. मी कोणी न्यायाधीश वगैरे आहे असे सांगितले नव्हते. एक तर मी अजून ते पद ग्रहण केले नव्हते व आपण असे सांगण्याने आपला काही फायदा होईल असेही मला वाटले नव्हते. त्याने मला मुख्य स्टेशनमास्तरकडे शिपाई चोराला पकडून नेतात तसे नेले. तोही माझे ऐकून घेण्याचे मन:स्थितीत नव्हता. तेवढ्यात ब्रेकव्हॅनमधले सामान आले. त्यातल्या एका पेटीवर माझा पत्ता व हुद्दा होता. त्याने विचारल्यावर मीच न्यायाधीश आहे हे कळल्यावर एकदम ट्रान्सफर सीन झाला. चेकर पळून गेला, स्टेशनमास्तर गयावया करू लागला. आयुष्यात प्रथमच मला मॅजिस्ट्रेट ह्या पदाच्या अधिकाराचा अनुभव आला. जरा गंमत वाटली. हसू आले.

## न्यायालयात

न्यायालयात प्रथम गेलो तेव्हा असाच अनुभव आला. मी त्या दिवशी १०.४५ वाजताच कोर्टात सायकलवरून गेलो. मला ह्या पदाचा चार्ज घ्यायचा म्हणजे नक्की काय करायचे हे माहीत नव्हते. अर्थात, त्याचे तसे कारणही कधी पडले नव्हते. मी सायकल जिन्याखाली लावली. तिथं सायकल का लावली म्हणून चौकीदार रागावेल म्हणून जरा गोंधळलो होतो. कारकून वगैरे मंडळी अस्ताव्यस्त कशीही बसून चकाट्या पिटत होती. अजून न्यायालय अधीक्षक आले नव्हते. किंबहुना साडेअकरा वाजेपर्यंत फारसे कोणी आले नव्हते. हा कोणीतरी चमत्कारिक चांगले सूटबूट घातलेला माणूस आला आहे. बहुतेक पक्षकार किंवा दुसऱ्या खात्यातला कोणी असेल असे समजून काही कुतूहलाने तर काहीजण पाहिले न पाहिले असा आव आणून होते. माझे नातेवाईक असलेल्या न्यायाधीशांस मी भेटावयास गेलो तेव्हा त्यांच्या शिपायाने मला फटकारले होते. पण मी माझे नाव लिहून आत चिठ्ठी पाठवल्यावर त्या न्यायाधीशांनी मी सुद्धा एक न्यायाधीश आहे असे सांगितल्याबरोबर एकदम वातावरणात बदल झाला.



सुरेश वसंत नाईक

झालेले बदल मला नको कसे वाटले त्याबद्दल मी माझ्या वडिलांना पत्राने कळवले होते. सुदैवाने ते पत्र उपलब्ध आहे. त्यात मी लिहिले होते -

''मी जाताना उगाचच लोक अंग चोरून उभे राहू लागले. पट्टेवाले, कोर्ट ऑर्डर्ली, बेलीफ ठेवणीतला सलाम करू लागले. असा सलाम केला की त्यांना टिप किंवा दिवाळी द्यावी लागते हा आत्तापर्यंतचा अनुभव होता म्हणून जरा दचकलो होतो. पण आता मात्र पैसे द्यावे लागणार नाहीत हे कळल्यावर एकदम हायसे वाटले. म्हटलं करा सलाम किती करता ते.''

सगळ्यात जर हाल कुठले झाले असतील तर ते म्हणजे न चुकता बरोबर ११ वाजता खुर्चीत बसावे लागले ते २ वाजेपर्यंत. पुन्हा अडीच वाजल्यापासून ५ वाजेपर्यंत. काही हालचाल करावयाची नाही. **मला तर खुर्चीत फार वेळ बसण्याची आणि तेही पुतळ्यासारखं काधीच सवय नव्हती. गुडघे दुखून येत. शिंक, जांभई सुद्धा देणं गैर समजले जाई. सारखे खाली पाय सोडून बसल्याने चांगलीच रग लागे. त्याचबरोबर चेहरा नेहमी गंभीर ठेवणे फार अवघड होते. मधेच पाणी चहा वगैरे घेणे आता शक्य नव्हते.** वकिलांना असे कुठलेही बंधन नसते. सर्वांत स्वातंत्र्यावर आणखी गदा म्हणजे आपण आपला कोट उतरू शकत नव्हतो. थर्मासमधून चहा कपात ओतून टिपॉयवर कागद ठेऊन तो टिपॉय आपल्यासमोर आणून ठेवल्यानंतर जेमतेम आपण कप तोंडाला लावण्याचेच स्वातंत्र्य. साधे गाणे गुणगुणावेसे वाटणेसुद्धा चमत्कारिक वागण्यात जमा होण्याची शक्यता. बाथरूम जरा दूर असेल तर पुढे शिपाई शुक शुक करीत बाथरूपर्यंत व परत ही वरात चेंबरपर्यंत. **न्यायालयाचे बाहेर कुठेही पाणीपुरी भेळ वगैरे खाणे मनातसुद्धा आणणे शक्य नव्हते. कुणाशीही साध्या औपचारिक गप्पा मारणे शक्य नव्हते. थोडक्यात तुरुंगात कैद्यालाही जेवढ्या सुविधा किंवा स्वातंत्र्य होते तेवढेही न्यायाधीशास नसते हे अनुभवान्ती कळून आले.** संध्याकाळी रात्री खटल्याची कागदपत्रे व नवीन कायद्याचे निर्णय वाचणे भागच होते. कित्येकवेळा वाटे पुण्यात काय कमी होते, द्यावा राजीनामा अन् पुन्हा आपले स्वातंत्र्य मिळवावे. समोर येणारे बरेचसे वकील, कर्मचारी वगैरे तोंडावर स्वार्थापोटी खोटी स्तुती, कौतुक करणारे; मागे काय म्हणत असतील त्याचीही कल्पना करता येणे शक्य होते.

## रात्ररात्र अभ्यास

सर्वात महत्त्वाचे म्हणजे रोज संध्याकाळी रात्री इंग्रजी, कायदा ह्याचा अभ्यास करणे भाग पडे. भर न्यायालयात साक्षीदार मराठीतून जबानी देई. त्याचे कित्येक वेळा इंग्रजीत भाषांतर करून टंकलेखकाला सांगणे जरूर होते. मी कित्येक न्यायाधीशांचे हे भाषांतर करणे इतके हास्यास्पद झालेले ऐकले होते की त्याची बाहेर टिंगल, टवाळी होई. आपले असे हसू होऊ नये असे वाटे. तो ऊस गाळत होता चे भाषांतर ही वॉज ओमिटींग उस, तर एका न्यायाधीशाने ही केप्ट अ लोटा ऑन द ओटा ऑफ न्हाणी, असे इंग्रजी केले होते. व्याकरणाच्या चुका तर अनेक होत. ही वेन्टेड टू बॉम्बे, ही फेल ब्रेव्ह (तो पडला शूर), घोड्याचे शिंगरू चे भाषांतर द चाईल्ड ऑफ हॉर्स, धंदा सुखवस्तूचे भाषांतर हॅपी बिईंग, तर दूधभाऊ (सावत्रभाऊ) चे भाषांतर मिल्कब्रदर. हे सर्व टाळण्यासाठी रेन मार्टिन, ते नेस्फील्डची ग्रामरची पुस्तके आणून पहिल्यापासून सुरुवात करून वाचून अभ्यास करणे जरूर होते. त्याशिवाय इंग्रजी भाषेसाठी अनेक प्रकारची पुस्तके व इंग्रजी न्यायाधीशांची निकालपत्रे-पुस्तके वाचणे व त्याचाही अभ्यास करणे भाग होते. लॉर्ड डेनिंगची सर्व पुस्तके त्याच्या भाषेच्या अभ्यासासाठी वाचावी लागली. शाळा-कॉलेजमध्ये केला होता त्यापेक्षा कितीतरी अभ्यास करणे भाग पडत होते.

एकंदरीत हे न्यायाधीशाचे आयुष्य दुरून डोंगर साजरे असेच वाटत होते. सौभाग्यवती कंटाळून चला आपण परत पुण्याला जाऊ म्हणून वारंवार सांगू लागली.

न्यायालयात सुरुवाती-सुरुवातीला अनेक गमतीदार प्रसंग येत. त्यामुळे बराच गोंधळ उडे.

आरोपीला अटक केल्यावर चोवीस तासात न्यायाधीशासमोर आणणे कायद्याने पोलिसांना भाग असते. मग ते केव्हाही सुटीच्या दिवशी सकाळी, रात्री न्यायाधीशाच्या घरी हजर करतात. प्रथमच आरोपीला माझे घरी हजर केल्यावर मीच गोंधळून गेलो होतो. आता ह्याला कुठे ठेवायचे? पोलिसांनी आरोपीला न्यायालयाचे ताब्यात द्यावे म्हणून विनंती केली, ही न्यायालयीन कोठडी कुठे आहे, त्यात  ठेवायचे म्हणजे काय करायचे? हे काम कोण करणार ह्याची मला काही जाणीव नव्हती. मी कागदावर पोलिसांची विनंती मंजूर म्हणून लिहून दिले. ते पोलिसही नवे असावेत, ते कागद घेऊन जेलवर गेले तर जेलखात्यात आरोपीला घेईनात. वॉरंट आणा म्हणाले. जेल चांगले २ मैल तरी लांब. तेथून ही सारी वरात परत घरी आली. बरे न्यायालय बंद. कुणा कर्मचाऱ्याचे घर माहीत नाही. शेवटी मी उठून सल्ल्यासाठी दुसऱ्या न्यायाधीशाच्या घरी गेलो. तर ते घरी नव्हते. त्यांच्या गड्याने वॉरंटचा एक फॉर्म दिला. मी तो भरून पोलिसांच्या ताब्यात दिला. ते सर्व परत जेलला गेले.

रात्री परत ही वरात घरी हजर, कारण जेलरने शिक्का असल्याशिवाय त्या हुकूमावर कारवाई करण्याचे नाकारले. जवळजवळ मध्यरात्र होत आली होती. तेव्हा प्रथम कळले की आपल्या सहीला काही किंमत नसते. शेजारी शिक्का हवा. कोणताही सरकारी शिक्का कधीही नीट उठलेला अजून कोणी पाहिला नाही. पण कसाही अस्पष्ट उठला तरी तो हवाच असतो. शेवटी मीच ही सर्व अडचण जेलरला फोन करून सांगितली व त्याने त्या कैद्याला आत घेतले.

## निकालपत्र

असे अनेक प्रसंग आले. एकदा एका न्यायालयात आरोपीला पुकारल्यावर फिर्यादीच हजर झाला. त्याला वाटले आपली केस पुकारली. न्यायाधीशाने शिक्षा सांगितली. फिर्यादीला वाटले त्यालाच शिक्षा झाली म्हणून तो निमूटपणे आत गेला. जेलमध्ये भरती करताना अंगावरच्या खुणांवरून चूक लक्षात आली व पुढचा प्रसंग टळला. सुरुवातीला आरोपीला नक्की किती शिक्षा द्यावी ह्याबद्दल काही अंदाज येत नाही. गुन्ह्याला १० वर्षे जरी शिक्षा असेल तरी नक्की किती शिक्षा द्यावी १ वर्ष की १० वर्षे का चांगल्या वर्तणुकीच्या जातमुचलक्यावर सोडावा हे ठरवताना नाकी नऊ येतात. सर्वात पहिले निकालपत्र लिहिताना उडणारा गोंधळ हा विनोदाचाच विषय शोभावा.

न्यायाधीशपदाच्या सुरवातीला दिवसाच्या आठवणी आता मनाला विरंगुळा व आनंद देतात. त्यावेळेला जे काही नवे नवे प्रसंग आले ते आठवले की हसू येते. त्या दिवसाच्या पायावरच पुढच्या आयुष्यात इमरतीची उभारणी झाली. त्या दिवसांनी मला खूप शिकवले. नव्याने नेमणूक झालेल्या न्यायाधीशांना त्या अनुभवावरच्या जोरावरच मार्गदर्शन करता येते. ते दिवस आठवले की उत्तररामचरित्रातील रामासारखे विषण्णतेचे उद्‌गार मनात येतात, 'ते हि नो दिवसा: गता:।'

**सुरेश वसंत नाईक**

**पत्ता** : वकील नगर, बिल्डिंग नं. ५, प्लॉट नं.५, एरंडवणा, पुणे ४
**शिक्षण** : बी. एस्सी. एल.एल.बी.
**व्यवसाय** : निवृत्त जिल्हा न्यायाधीश, अध्यक्ष औद्योगिक न्यायालय
**इतर कार्य** : विश्वकोश अभ्यागत संपादक म्हणून लेखन निरीक्षण
**स्फुट लेखन** : मासिक वृत्तपत्रांमधून विविध विषयांवर लेखन प्रवासवर्णन, रामदासस्वामी न्यायसंस्था, इ. कृषिवल, केसरी, श्री समर्थ मासिक,साईबोध मासिक

खरं तर सुरुवात कुठून झाली? कशी झाली? या प्रश्नांची उत्तरं सापडणं कठीणच आहे. मुळातच माझा जन्म एका निसर्गरम्य खेड्यातला. तिथंच धूळपाटी गिरवली. खडकावर चित्रं काढली. साधनांसाठी अडायचं कारण नव्हतं. रानातले ठिसूळ लाल-पिवळे दगड रंग म्हणून होते. काडीला कापड बांधलं की कुंचला व्हायचा. तेव्हा मार्गदर्शक भेटलाच नाही. गरजही वाटली नाही. तरीही ह्या उर्मी कशा निर्माण झाल्या असतील कोण जाणे! जिथं कसलंच वातावरण नव्हतं, केवळ निसर्ग होता त्या ठिकाणी चित्रकलेचे धडे माझे मीच गिरवले!

अठ्ठावन्न साली पुण्यात आलो. टिळक रस्त्यावरच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये प्रवेश मिळाला. तिथूनच एक वेगळी दिशा मिळत गेली. चालना मिळत गेली. चित्रकला हा विषय अभ्यासक्रमात असू शकतो हे पुण्यात आल्यावर कळलं. त्यापूर्वी तो स्वत:पुरताच गमतीचा विषय होता. चित्रकला, खेळ, नाटक आणि अभ्यासही करता करता शाळेचे दिवस कापरागत उडून गेले. पण या दिवसात पुस्तकांच्या पलीकडलं खूप काही शिकून झालं होतं. तेव्हा शाळेत वसंत व्याख्यानमाला असायची. त्यात कार्यकर्ता म्हणून सहभागी होऊन अनेक थोरांचे विचार ऐकले. घराजवळच गोखले हॉलमध्ये शासकीय ग्रंथालय होतं. वाचता येईल तितकं वाचलं. वाचता वाचता हसलो, रडलो, गंभीर झालो आणि मनाला उभारीचे धुमारेही फुटले. मला वाटतं, एखाद्या क्षेत्रात काम करणाऱ्यामागे काही इतिहास असतो. त्याची पाळंमुळं आधीच रुजलेली असतात.

शालेय जीवनाचा टप्पा ओलांडताना स्वत:ची स्वत:ला बऱ्यापैकी ओळख पटलेली होती. नेहमीची चाकोरी सोडून काहीतरी करायचं हा स्वभाव. प्रयत्न खरा. कुणावर विसंबून रहायचं नाही. त्याला परिस्थितीही कारणीभूत होती.

इतर मुलांप्रमाणे सुरक्षित वातावरणात माझी शाळा झाली नाही. शाळेबाहेरचं जग त्या बालवयातच पाहिलं. अनुभवलं. स्वत:बद्दल विश्वास निर्माण होत गेला. त्यातूनच निर्णय झाला की, इथून पुढं बरंच काही शिकायचं पण स्वत:च्या हिंमतीवर. 'कमवा आणि शिका' या पद्धतीनं पुढं जाता जाता पायाचा एक एक दगड भक्कम होत गेला. आलेल्या यशापयशातून स्वत:ची पारख व्हायला लागली. आपलं बळ आणि मर्यादा यांचा उलगडा होत गेला. बिनभिंतीच्या उघड्या शाळेत शिकताना कुणाचा आधार मिळावा अशी अपेक्षा ठेवू नये. पंखातलं बळ अजमावून झेप घ्यावी. ही अनुभवानं आलेली समज होती.

तसं पाहता शाळेपासूनच चित्रकलेची लहानसान कामं सुरू होती. ती बहुतेक बिनामोबदलाच असत. तेव्हा अनुभव हाच मोबदला म्हणून खूप होता. पुढं केवळ तेवढ्यानं भागणारं नव्हतं. रोजच्या जगण्याचा प्रश्न होता. धडपड करायलाच हवी होती. ती केलीसुद्धा! अगदी आनंदानं केली. टक्केटोणपे खात यश मिळत आणि हुलकावण्या देत राहिलं. गरजेपेक्षा खूपच कमी पैसे मिळत होते. नोकरी केली असती तर भागणारं होतं. पण करायची नाही हे ठरलं होतं. एका मोठ्या जाहिरात कंपनीला यदुनाथ थत्ते यांनी चिठ्ठीही दिली होती. नोकरी नक्की होती. मी नकार दिला. त्यांनी समजूत काढायचा प्रयत्न केला. अनुभव म्हणून तरी काही दिवस नोकरी करावी असं सुचवलं. एका अर्थानं त्यांचं म्हणणं व्यवहार्य होतं. माझी परवड दिसत होती. निदान वणवण कमी झाली असती. शिक्षण सुरळीत झालं असतं. पण मी ठाम राहिलो.

चित्रकला हा विषय घेऊन जर व्यवसाय करायचा असेल तर त्यातल्या विविध प्रकारांची माहिती असणं

# आभाळाखालच्या शाळेत खूप काही शिकलो

## ल. म. कडू

गरजेचं आहे. मी फक्त मुखपृष्ठ करतो किंवा प्रसंगचित्र काढतो एवढ्यावर भागणारं नव्हतं. बऱ्याच गोष्टी हाताखालून जायला हव्यात. शाळेतले जवळजवळ सगळे दिवस आणि अभिनवमध्ये शिकतानाचा काही काळ मी एका पेंटरच्या दुकानात घालवला. ती नोकरी नव्हती. केवळ शिकणं होतं. आम्ही रहात होतो त्या वाड्यात एक पेंटरचं एक छोटंसं दुकान होतं. दुकान इतकं छोटं की त्यात मालकसुद्धा धड बसू शकत नव्हता. वाड्यात मोकळी जागा भरपूर होती. पेंटिंग काम तिथंच चालायचं. तासंतास बघत रहायचो. ते रंग, वेगवेगळे ब्रश पाहून वाटायचं आपणही करून पहावं. पण शक्य नव्हतं. कदाचित तसं काही विचारलं तर पेंटर पाहूही देणार नाही अशी भीती मनात दडली होती. केवळ पहात राहायचं. माझी ओढ पेंटरच्या लक्षात आली असावी.

### पेंटरकडे काम

एकदा पेंटरकडे एक मोठं काम आलं. एकाच प्रकारच्या अनेक पाट्या रंगवायच्या होत्या. अवधी थोडाच होता. मोठी धांदल उडाली. माणसं मिळणंही कठीण. शोधाशोध सुरू होती. ते माझ्या पथ्यावर पडलं. सहज इच्छा व्यक्त केली. तेवढी भीड चेपलेली होती. पेंटरने तात्काळ ब्रश आणि रंगाचा डबा माझ्या हाती दिला. त्या पाट्यांवर काही चौकौन रंगाने भरायचे होते. रंग नेमका भरायला हवा होता. इकडंतिकडं जाऊन चालणारं नव्हतं. लाकडी पट्टीच्या आधाराने ब्रश सरळ रेषेत कसा ओढायचा ते शिकलो. ब्रशमध्ये किती रंग घेतला तर तो ओघळत नाही ह्या साऱ्या गोष्टी त्या उघड्या शाळेत शिकलो. सुरुवातीला पेंटरनं सुधारून घेतलं. नंतर मी सरावलो. पेंटर वेगवेगळ्या गोष्टी सोपवू लागला.

### अक्षरांची वळणे

त्यातूनच अक्षरांची अनेक वळणे पहायला मिळाली. करून पाहिली. ते टायपाचे नमुने कधीच पुस्तकातून दिसले नाहीत. आर्टस्कूलमध्ये शिकवले गेले नाहीत. त्याचंही शास्त्र आहे. पेंटरकडे काम करणाऱ्या माणसाकडून ते शिकलो. तो माणूस टाइप करण्यात तरबेज होता. व्यवसायाप्रमाणे तो अक्षरांची वळणं काढायचा. हॉटेल असेल तर वेगळी अक्षरं. कापडाच्या दुकानासाठी वापरलेलं वळण शिक्षण संस्थेच्या पाटीसाठी नसायचं. पुढं आर्ट स्कूलमध्ये 'लोगो' हा प्रकार शिकलो. तो प्रकार बालवयातच माहित झाला. फक्त त्याला लोगोबिगो म्हणतात, हे ठाऊक नव्हतं. सगळ्यात महत्त्वाची गोष्ट अशी होती की ती अक्षरांची आकर्षक वळणं काढणारा माणूस निरक्षर होता. त्याच्याकडूनच अक्षरांना शेडिंग करणं, स्केल टाकून चित्र मोठं करणं असल्या गोष्टी शिकता आल्या. जमिनीपासून तीसेक फूट उंचीवर बांबूच्या पहाडावर उभं राहून साठसाठ फूट लांबीच्या पाट्या रंगवायचं धाडस करून पाहिलं. ध्यास एकच होता की प्रत्येक काम आपल्याला किमान माहीत असायला हवं.

बहात्तर साली अभिनव कला महाविद्यालयातून बाहेर पडलो. त्यावेळी पुण्यात फारसं काम नव्हतं. काही मासिकं होती. पुस्तकं निघायची. पण सारे व्यवहार ठराविक चौकटीत चालायचे. ठरलेले मुद्रक. त्यांचे ठरलेले लेखक. लेखकांचे चित्रकार. असं सारं ठरलेलं. नवख्याचा शिरकाव होणं कठीण. बऱ्याच भिंती उभ्या होत्या. अडथळे होते. पाठीवर कुणाचा हात नव्हता. कसलीच परंपरा नव्हती. ओळखी नव्हत्या. होत्या त्या कामाच्या नव्हत्या. तुमच्यात गुण असले, क्षमता असली तरी ती सिद्ध करायला लागते. ते अडथळे, भिंती भेदून जाणं अवघड वाटायला लागलं. पण निराशेचं सावटसुद्धा आलं नाही. अधिक जोमानं धडपड सुरू झाली.

### प्रकाशक

शाळेतल्या मित्रामुळं एक भला प्रकाशक भेटला. त्यांच्याकडे हरतऱ्हेची पुस्तकं निघायची. मोठा व्याप होता. कामच काम होतं. इतर प्रकाशकांच्या तुलनेत मोबदला कमी असायचा पण नक्की मिळायचा. पुढं कामही चालू रहायचं. त्यांची कामाची पद्धत ठरलेली होती. ती चौकट मोडायची नाही. पटणारं नव्हतं आणि गत्यंतरही नव्हतं. काम एवढं वाढलं की याला दुसरं काही करायला सवडच मिळेनाशी झाली. त्यात अडकून पडायचं नव्हतं. नवंही करायचं होतं. मराठी प्रकाशनात बदल जाणवत होते. तुरळक का होईना पण चौकटीपलिकडची मुखपृष्ठं दिसायला लागली. आतील मांडणीला महत्त्व येऊ लागलं. ते करून बघायचं होतं. तोवर थोडं नावही झालं होतं. पण संधी मिळत नव्हती.

**तुमच्यात गुण असले, क्षमता असली तरी ती सिद्ध करायला लागते. ते अडथळे, भिंती भेदून जाणं अवघड वाटायला लागलं. पण निराशेचं सावटसुद्धा आलं नाही. अधिक जोमानं धडपड सुरू झाली.**

### साधना प्रेस

शाळेपासूनच साधना प्रकाशनाशी संबंध आला होता. एक उन्हाळी शिबिर होतं. त्यात मी होतो. तिथंच यदुनाथ थत्तेंची गाठ पडली. त्यांच्या सांगण्यावरूनच अधूनमधून साधनेत जात राहिलो. शाळा संपल्यावर जाणं येणं खूप वाढलं. 'साधना' जणू घर असल्यासारखं वाटायचं. काळवेळेचं बंधन नसायचं. त्या वास्तूत अफाट व्यक्तिमत्त्वाची माणसं भेटली. जवळून अनुभवली. तिथं नवनवे प्रयोग

करायला अगदी मोकळीक असायची. छपाईचं तंत्र, आजच्या एवढं प्रगत नव्हतं. एकेक खिळा जुळवून मजकूर 'कंपोज' केला जायचा. वेळ फार जायचा. नंतर टाईप बदलावा वाटला तर शक्य नसायचं. पुन्हा तेवढा वेळ नसायचा. ठराविक तयार ब्लॉक, रुळ, नक्षीच्या पट्ट्या, दाणे एवढ्या सामग्रीवर मांडणी करावी लागायची. टाईपही ठराविक होते. बरीच पुस्तकं प्रकाशित झाली. हळूहळू लोकांपर्यंत पोहोचलं. प्रकाशक येऊ लागले. काही कादंबऱ्यांच्या सुरुवातीच्या पानात चित्रांचा समावेश केला. विषयाप्रमाणे शैली वापरली. हा प्रकारच चांगलाच भावला. पुढं पुढं असं व्हायला लागलं की मुखपृष्ठ वेगळं आणि आतिल मांडणी माझी. तशा प्रकारची बरीच पुस्तकं बाजारात आली

## स्केचेस

काही पुस्तकांच्या मलपृष्ठावर लेखकाचा फोटो असायचा. प्रयोग म्हणून त्या फोटोवरून स्केच करून ते छापलं. तोही प्रकार वाढत गेला. काही लेखक त्यासाठी येऊ लागले. यातून एक गोष्ट पक्की लक्षात आली की वेगळी कल्पना लोकांना पसंत पडते; पण त्यात फार अडकलो नाही. वेगवेगळ्या गोष्टी करायच्या होत्या. साधना प्रेसमध्ये संपादक ते कंपोझिटर असा सर्रास वावर असायचा. मधे भिंतीच नव्हत्या. इथंच कंपोझिटर बाबूरावांकडून गॅल्या, रुळा, दाणे, कंपोज हे प्रकार शिकलो. ब्लॉकला पॅकिंग, मेजर, फ्लॅशकट हे प्रकार तिथंच पुरते समजले. सुतारभाऊंच्या आवडत्या 'हायडेलबर्ग'जवळ उभं राहून छपाईतल्या शाया अनुभवल्या. ब्लॉक छपाई करताना रंगांचा क्रम ठरलेला असायचा. तो उलटसुलट केला तर रंग वेगळे परिणाम साधतात. एखाद्याच पारदर्शक रंगात किंचित पांढरा मिसळला तर ओव्हरलॅपिंगची छटा वेगळी येते. हे थेट शिकलो. त्याचा पुरेपूर वापर केला. छपाई एकदाच पण रंग अनेक हे 'रेनबो' तंत्र इतकं हाताळलं की त्या कामांचा ओघच सुरू झाला. तसं काम करून देणारे प्रेस फार कमी असत. मग 'मुखपृष्ठ छापूनही द्या' अशी मागणी वाढत गेली. तेही केलं.

## अहवालांचे काम

केवळ पुस्तकांची सजावट करून भागणारं नव्हतं. काम होतं पण हवी तेवढी प्राप्ती नव्हती. सत्तरच्या आसपास ग्रामीण भागात शिक्षण संस्था, साखर कारखाने, सहकारी संस्था, पतपेढ्या, बँक मूळ धरू लागल्या होत्या. त्यांना चांगल्या कामाची गरज होती. तालुका पातळीवर सोयी नव्हत्या. तिथले प्रेसवाले पुण्याहून काम करून नेत असत. पुण्यात चांगलं काम करणारी फळीच होती. टाईप फौंड्री, ब्लॉक मेकर, प्रेस, शाई विकणारे, कागदाचे दुकानदार, लेखक, चित्रकार, प्रुफरिडरपर्यंत सारं उपलब्ध होतं. दोन प्रेस असे होते की या सर्व सेवा एकाच छताखाली देत होते. त्यांची कामाची पद्धत पाहता आली. वाटलं, आपणही असं करून पहावं. पण ते लोक काही माझ्याकडे चालून येणार नव्हते किंवा मलाही गावोगावी जाऊन भेटी घेणं शक्य नव्हतं. त्यातूनच छोटीशी वाट सापडली. या प्रेसवाल्यांची ठराविक ठिकाणं म्हणजे टाईप फौंड्री किंवा ब्लॉकमेकर. विशेष करून ब्लॉकमेकरचा खूप उपयोग झाला. दोन ब्लॉकमेकर चांगले ओळखीचे होते. शिकत असताना त्यांच्याकडे प्रॅक्टिकल होत असत. त्यामुळे जास्त ओळख होती. काम असो, नसो त्यांच्याकडे एक तरी चक्कर व्हायची. त्याचा योग्य तोच परिणाम झाला.

## सबकुछ एकसाथ

पुण्याबाहेरून आलेल्या लोकांची वेगळीच अडचण होती. त्यांना शक्यतोवर काम उरकून संध्याकाळची गाडी गाठायची असायची. टाईप फौंड्रीला ते पत्रानं कळवित तसं पार्सल तयार असायचं. ब्लॉकचं तसं नव्हतं. ते सकाळी येताना चित्राची कल्पना घेऊन येत. चित्रकाराकडे जाऊन चित्र काढून घेऊन त्याचा ब्लॉकही संध्याकाळपर्यंत व्हावा अशी त्यांची अपेक्षा असायची. ते अवघड होतं. नेमका त्याच गोष्टीचा उपयोग करून घेतला. तेव्हा फोनचा सुळसुळाट नव्हता. मोबाईल कल्पनेत होता. ब्लॉकमेकर आलेल्या माणसाला थेट माझ्याकडे पाठवित. त्वरीत चित्र काढून ब्लॉकमेकरकडे पाठवायचं. ब्लॉक तयार व्हायचा. ग्राहक संध्याकाळी गाडी गाठायचा. ही इतकी साधी वाटणारी गोष्ट सोपी मात्र नक्कीच नव्हती. एवढ्या कमी वेळात ग्राहकाच्या पसंतीस उतरेल असं चित्र करणं एक दिव्य असायचं. प्रत्येकालाच 'अॅट्रॅक्टिव्ह', 'पूर्वी कधीच न झालेलं' असं चित्र हवं असायचं. ते मी नक्की करू शकेन असा विश्वासही व्यक्त व्हायचा. त्याला तडा जाणार नाही हे पहावं लागायचं. त्यासाठी ग्राहकाची मानसिकता लक्षात घ्यावी लागायची. ही गोष्ट अनुभवाशिवाय येत नाही. काही अंदाज चुकलेही.

**प्रत्येकालाच 'अॅट्रॅक्टिव्ह', 'पूर्वी कधीच न झालेलं' असं चित्र हवं असायचं. ते मी नक्की करू शकेन असा विश्वासही व्यक्त व्हायचा. त्याला तडा जाणार नाही हे पहावं लागायचं. त्यासाठी ग्राहकाची मानसिकता लक्षात घ्यावी लागायची. ही गोष्ट अनुभवाशिवाय येत नाही. काही अंदाज चुकलेही.**

बहुधा संस्था, बँकांची बोधचिन्हे, चेक, जाहिराती, अहवालांची मुखपृष्ठं अशा स्वरूपाचं काम असायचं. फारच थोडे लोक जरा मुदत द्यायचे बाकीच्यांना एका दिवसात हवं असायचं. त्यासाठी वेगवेगळ्या उपाययोजना करून ठेवल्या. विषयवार संदर्भ फायली तयार केल्या. केवळ शेतीच्याच तीन फायली होत्या. प्रत्येक पिकाच्या

पानापासून दाण्यापर्यंत संदर्भ जमा केले होते. नवनवी अवजारं, वृक्ष, वनस्पती यांची चित्रे, छायाचित्रे, देशी-विदेशी दुभत्या जनावरांच्या जाती अशी नानाप्रकारची चित्रे नीट लावून ठेवलेली होती. देवधर्माची चित्रे असणारी फाईल वेगळी. इतिहास, अलिकडचे पुढारी इथपासून ते कारखान्याच्या संचालकमंडळाचे फोटोसुद्धा हारीने लावून ठेवलेले होते. ब्रोमाईड प्रिंटसची गरज पडायची. बाहेरून करून घ्यायला वेळ लागायचा. त्यासाठी स्वत:ची डार्करूम सुरू केली. स्क्रीन प्रिंटिंगचा विभाग चालू केला. एकूण काय काम वेळेत होण्यासाठी लागणारी जास्तीत जास्त सामग्री स्वत:कडे उभी केली. अर्थात काम वाढतच राहिलं.

### कामांची गर्दी


चांगलं काम वेळेत देणे एवढ्या भांडवलावर कामाचा व्याप इतका वाढला की माणसं वाढवूनही काम झेपेनासं झालं. ग्रामीण भागातल्या काही अहवालांना पुरस्कार मिळाले. अर्थात ते त्यांना मिळाले. ती मंडळी खूष झाली. परस्पर जाहिरात होत गेली. त्यातूनच मुंबईच्या एका मोठ्या शिक्षण संस्थेचं काम चालत आलं. त्यांचे तर एका वेळी बारा अहवाल असायचे. सर्वच्या सर्व अहवाल मुखपृष्ठं, आतील फोटो, पानांची सजावट करून बिनचूक छपाईसह निकालाच्या दिवशी मुंबईत पोहोच झालेले असायचे.

अहवाल, स्मरणिका इत्यादी कामाच्या गदारोळात प्रकाशकांच्या कामाला वेळ मिळेनासा झाला. काहींना त्यासाठी नकार दिला. प्रकाशन विश्वात माझं नाव जरा कमी दिसू लागलं. काहींच्या मते मी संपल्यात जमा होतो, पण प्रत्यक्षात श्वास घ्यायला सवड नव्हती. चित्रकला हा विषय आपण 'व्यवसाय' म्हणून निवडला आहे याचं भान ठेवून काम चाललं होतं. हळूहळू ऑफसेट तंत्र वाढत गेलं. तालुका पातळीवर प्रेस निघाले. संगणकाची घौडदौड सुरू झाली. काळाची पावलं ओळखून कृषिसाहित्य आणि बालसाहित्यांवर लक्ष केंद्रित केलं. या विषयावरची बरीच पुस्तकं, काही मासिकं मिळत राहिली. बालसाहित्याची चित्र काढणं हा तर माझा अत्यंत आवडीचा विषय. त्यात काम करताना जो आनंद मिळतो तो नेमक्या शब्दात सांगता येणार नाही.

### मूडचा नखरा नाही

मी चित्रकार आहे. मला मूड लागतो. जमेल तेव्हाच काम करीन असल्या भ्रामक कल्पना कधीच बाळगल्या नाहीत. व्यवसायाची किमान पथ्ये पाळायलाच हवीत. काळाशी ताठर भूमिका घेऊन चालणार नाही. काळाबरोबर चालणं, बदलणं हेच शहाणपणाचं लक्षण आहे हे समजायला तीसेक वर्षं खर्ची पडली.

चित्रकार किंवा कोणताही कलावंत हा उघड्या डोळ्यांनी वावरला पाहिजे. आपल्या क्षेत्रापलिकडं काय चाललंय हे लक्षात घ्यायला हवं. आपल्या कला, साहित्य, परंपरा, लोककला या साऱ्यांची जाण हवी. त्यातून कामाला एक प्रकारची खोली येते. निसर्ग धुंडाळून पहावा. मी तिथून बरंच काही शिकलो. जन्म खेड्यातला. चार इयत्ता तिथंच काढल्या. धूळपाटी गिरवता गिरवता झाडांवरल्या कावळ्या-साळुंक्यांचा कलकलाट ऐकला. बांबूच्या बेटात वाऱ्याचं गाणं ऐकलं. त्या आभाळाखालच्या शाळेत बरंच टिपलं. तेच आजवर पुरत आलंय.



**लक्ष्मण महिपती कडू**
३७९, शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०.
१० जुलै १९४७
जी. डी. आर्ट (कमर्शिअल)

* बालसाहित्याची दहा पुस्तके प्रकाशित
* 'रेड क्रॉस' या पुस्तकाला 'सेलू' येथील रा. दा. आंबेकर ग्रंथालयाचा १९९३ चा उत्कृष्ट बालसाहित्याचा पुरस्कार
* 'इंडिन्यूज' या कथेची उर्दू साहित्य अकादमी तर्फे उत्कृष्ट साहित्य म्हणून निवड व तिचे उर्दूत भाषांतर
* 'परिवर्तन' संस्था, औरंगाबाद यांचा १९९४ चा 'ग. ह. पाटील' पुरस्कार.
* 'मराठी बालकुमार साहित्य संमेलन' पुरस्कार

प्राथमिक शिक्षण खेड्यात झाले. पुढील शिक्षण पुण्यातील न्यू इंग्लिश स्कूल (टिळक पथ) येथे झाले. शालेय जीवनापासूनच साहित्याची आवड. तेव्हापासूनच 'स्वराज्य' , 'दैनिक मराठा', या वर्तमानपत्रांतून कथा प्रसिद्ध झाल्या. शालेय जीवनात नाट्यलेखन, अभिनय व क्रीडानैपुण्याबद्दल उत्कृष्ट विद्यार्थी म्हणून 'लॉर्ड रे' पुरस्कार मिळाला.

# कलावंतांच्या गप्पागोष्टीतून फुललेली सांस्कृतिक पत्रकारिता

## रजनी अपसिंगेकर

माझे माहेर मुंबईचे, लग्नानंतर ठाण्याला रहायला लागले आणि आता चार वर्षांपूर्वी आम्ही पुण्यात स्थायिक झालो आहोत. सांस्कृतिक पत्रकारितेतील पहिले दिवस सांगायचे म्हणजे मुंबईच्या वातावरणात पंचवीस वर्षं मागे जावे लागेल.

तेव्हा मी एसएनडीटी विद्यापीठातून नुकतीच बी.ए. झाले होते. विषय होता संगीत. पं. शंकर अभ्यंकर आम्हाला सतार शिकवायचे. त्यावेळेस संगीत विभाग प्रमुख होत्या डॉ. प्रभा अत्रे. बी.ए.ला स्कॉलरशिप मिळाली आणि एम.ए. चा अभ्यास सुरू झाला. सकाळी चार तास कॉलेज झाले की दिवस मोकळा मिळायचा. मग कॉलेजच्या नोटीस बोर्डवर नाहीतर डायरेक्ट त्या-त्या विभागात जाऊन कुठे कॉलेजतर्फे स्पर्धा आहे का? कथाकथन, एकपात्री, कवितालेखन, कथालेखन, नाट्यवाचन, गायन, वादन - अशा कुठच्याही स्पर्धेत सतत भाग घेत राहणं हा माझा आणि माझी मैत्रीण प्रीता भट्टे दोघींचाही 'जन्मसिद्ध हक्क' होता. दोघींना कुठचे ना कुठचे बक्षीस मिळायचेच. अभ्यासापेक्षा या इतर गोष्टींतच आमचे लक्ष असायचे. हे लिहितेय त्याचं कारण म्हणजे सांस्कृतिक पत्रकारितेला खत-पाणी मिळायला हीच पार्श्वभूमी कारण ठरली.

याच काळात ज्येष्ठ पत्रकार रामकृष्ण बाक्रे यांच्या मार्गदर्शनाखाली कॉलेजमध्ये पत्रकारितावर्ग घेतले जात. त्या वर्गाचा आम्हाला फायदा झाला. पत्रकारितेचा कोर्स आम्ही केला. पत्रकाराने पाच 'क'चा शोध कसा घ्यायचा ते समजले - का, कुठे, कुणी, कधी आणि कसे, अशा पाच प्रश्नांची उत्तरं शोधत वृत्तपत्रात लेखन कसे करायचे ते आम्ही शिकलो.

### युववाणी

तेव्हा आकाशवाणीच्या 'युववाणी' कार्यक्रमातही माझा सहभाग होता. त्यावेळेस युववाणीत प्रवीण दवणे, नीता भट्टे माडगुळकर, प्रीता भट्टे, अंबरिश मिश्र, भरत बेर्डे, निरंजन घाटे, उदय टिकेकर, आरती अंकलीकर असे आम्ही कार्यक्रमाच्या निमित्ताने भेटत असू. युववाणी कार्यक्रम विभागप्रमुख माधव कुलकर्णी होते. त्या आधी मुकुंद नाईक होते - नाईक सरांनी याच काळात 'युवकप्रतिष्ठान' ही संस्था स्थापन केली. त्यामुळे तिथेही कार्यक्रमांच्या निमित्ताने पुन्हा आम्ही होतोच. परीघ मोठा होत गेला. कलेतील चांगले-वाईट सारेच समजू लागले होते. कला ही मुळात वाईट अशी नसतेच तर तिचे सादरीकरण चांगले-वाईट प्रतीचे असू शकते. त्यामुळे वृत्तपत्रात लिहिताना या सर्व मित्रमैत्रिणींची मदत झालीच. हे सारेच जण कलाकार होते. आज तर आपल्या क्षेत्रात या सर्वांनीच नाव कमावले आहे. आकाशवाणीवर एका परिसंवादात भारतकुमार राऊत (आजचे महाराष्ट्र टाईम्सचे संपादक) तेव्हा म. टाईम्समध्ये नवीनच होते. त्यांनी मला 'हवा कॉलेजची' हे सदर लिहिण्यास सांगितले. त्यानंतर जोजेफ नरोन्हा यांनी 'सांस्कृतिक मुंबई' हे सदर म. टाईम्ससाठीच लिहायला सांगितले. गाण्याचा, चर्चेचा, भाषणाचा, परिसंवादाचा कुठचाही सांस्कृतिक कार्यक्रम असो, मी त्यात हजेरी लावू लागले. कार्यक्रम ऐकून तो जसाच्या तसा शब्दांकित करताना खूप आनंद व्हायचा. आपला लेख अधिकाधिक सजीव कसा वाटेल, संपूर्ण कार्यक्रम वाचकांच्या डोळ्यासमोर यायला पाहिजे असा मी प्रयत्न करू लागले. वाचकाला पुन:प्रत्ययाचा आनंद मिळायला पाहिजे. हा माझा खटाटोप असायचा.

गायनक्षेत्रातील बुजुर्ग पं. वि. रा. आठवले मला म्हणायचे, "रजनी, हे काय चाललंय तुझं? नुसतेच कार्यक्रम ऐकतेस. स्वत:चा रियाझ कधी करणार? लोकांची वाहवा कधी

मिळवणार? तुझं या लिहिण्याने स्वत:कडे मात्र दुर्लक्ष होतंय. संगीत शिकल्याचा उपयोग केवळ पत्रकारिता करण्यासाठीच होतोय. तुझ्यातला कलाकार जागा ठेव. अजूनही तू रियाजाकडे लक्ष दे; अगं लिहितेस चांगली पण एक क्षेत्र नक्की कर. संगीत किंवा साहित्य!''

### साहित्य विशारद

सरांची ही वाक्यं अजूनही आठवतात आणि त्यांनी म्हटल्याप्रमाणे पत्रकारिता करण्यासाठीच मला संगीत शिकल्याचा खूपच खूप उपयोग झाला. कलेतील बारकावे समजले; अनुषंगाने येणाऱ्या इतर कलांकडे पहाण्याचा दृष्टिकोन मिळाला. रसिक दृष्टी मिळाली. ती शब्दबद्ध करण्यासाठी साहित्याचाही मी अभ्यास केला. साहित्यसंघ मंदिर मुंबईच्या साहित्यविशारद पर्यंतच्या सर्व परीक्षा दिल्या. शब्दांशी खेळ करायला जमू लागले. शब्द आणि स्वर, चित्र आणि शब्द, नृत्य अन् लय शब्दांमध्ये घुटमळू लागली आणि कलेविषयी अनेक लेख तयार झाले. नवे-जुने कलाकार, अभिनेत्री, चित्रकार, शिल्पकार साऱ्यांशी मैत्री होत गेली. पत्रकारिता करण्याची नशाच चढली. वृत्तपत्रात आपण लिहिलेले छापून येतेय त्यासोबत आपले नावही येतंय. लोकं आपल्याला ओळखायला लागलेत. हा आनंद होता आणि मुख्य म्हणजे मानधनही मिळत होतेच.

### दिग्गज कलाकार

लोकसत्ताशीही याच काळात संपर्क आला. माझ्या वडिलांना म्हणजे श्री. मधुकर नांदापूरकर यांना राष्ट्रपतिपदक मिळाले होते. तेव्हा ते सी. बी. आय. चे उपमहानिरीक्षक होते. त्यांना दुसऱ्यांदा राष्ट्रपती पुरस्कार मिळाला होता म्हणून त्यांच्याविषयी मी लोकसत्तेत लिहावे असे त्यावेळेस लोकरंग पुरवणी पाहणारे श्री. प्रकाश कुलकर्णी यांनी सांगितले. मला खूप आनंद झाला. मी लेख लिहिला आणि त्यानंतर माझा 'लोकसत्ताशी' ऋणानुबंध वाढला. चतुरंग पुरवणी तेव्हा उज्ज्वला धर-पाटील आणि प्रशांत दळवी इ. पहात होते. त्यांच्या सांगण्यावरून अनेक दिग्गज कलाकारांच्याविषयी मी लिहू लागले - लता मंगेशकरांपासून आजच्या गायकांपर्यंत, तसेच प्रभाकर पणशीकरांपासून - साऱ्या नाट्यकर्मींविषयी, रवी परांजपे आदि चित्रकाराविषयी एकना अनेक लेख लिहिताना मलाही कलेतील विविध सौंदर्याचा साक्षात्कार होऊ लागला. प्रत्येक वेळेस नवे काहीतरी मिळत जाई. ते टिपताना त्याचे मर्म लोकांपर्यंत कसे पोहोचेल याची काळजी घेऊ लागले.

खरं तर कलाही दर्शनीय, श्रवणीय गोष्ट. ती शब्दात पकडून तिला त्याच स्वरूपात वाचनीय करणं तसं खूपच अवघड. त्यासाठी 'शब्द' शोधून योग्य शब्दांची मांडणी करणं कसतरीच होतं - पण सराव होत गेला. तेव्हाच दूरदर्शनचे नव्यानेच आगमन झाले होते - व्हिसीआर, व्हिसीडी मिळत होते - सांस्कृतिक कलाकारांना नवे कार्यक्षेत्र मिळत होते - त्यासंदर्भातील नवे नवे विषय मला लिहायला मिळाले. त्यावेळेचा 'व्हिडिओ पायरसी'वरचा लोकसत्तेतील माझा लेख लोकप्रिय झाला होता.

प्रत्येकच क्षेत्रात चांगल्या-वाईट दोन्ही गोष्टी असतात. त्यामुळे टीका करताना हळूच चिमटे कसे काढायचे तेही पत्रकारितेतून शिकायला मिळालं. कलेतील ज्ञान नसतानाही खोटा आव आणणाऱ्या आणि कलाकार म्हणून प्रतिष्ठा मिळवण्यासाठी धडपडणाऱ्या अनेकांना कसं डावलायचं आणि प्रसिद्धीपासून कसं बाजूला ठेवायचं आणि त्यातूनच त्यांच्या खोटेपणाचे बिंग कसं बाहेर काढायचं ते लक्षात आलं. या सुरुवातीच्या उमेदवारीच्या काळात प्रत्येक कामात थ्रिल वाटायचं. तरुण रक्त होतं. आशावादी स्वभाव त्यामुळे कुणाची भीती वाटायची नाही. सरळ जाऊन भेटणं, त्याबद्दल लिहिणं एक धमाल होती.




नाव : रजनी अनिल अपसिंगेकर

पत्ता : फ्लॅट नं. ८, दर्शनगड, महाबँक हाऊससमोर, प्रभात रोड, ९वी गल्ली, पुणे - ४११ ००४.

फोन : ३०९१४२४१, २५४५१२१३ पुणे, २८७५८१४३, २८७२२०४३ मुंबई


शिक्षण : एम. ए. एम. फिल्. (मराठी) - एस. एन. डी. टी. मुंबई
एम. ए. (संगीत - सतार) - एस. एन. डी. टी. मुंबई
पत्रकारिता प्रमाणपत्र कोर्स - एस. एन. डी. टी. मुंबई
साहित्यविशारद - साहित्य संघ मंदिर - मुंबई
पीएच्. डी. साठीचा प्रबंध पूर्णत्वाच्या मार्गावर (मुंबई-विद्यापीठ)

व्यवसाय : लेखन, पत्रकारिता

# जाहिरातक्षेत्रात आपला ठसा उमटवपणे सोपे नव्हते, पण -

## दिनकर शिलेदार

जुन्या आठवणी या झाडावरून गळून पडलेल्या पानासारख्या असतात. पिकलेलं पान गळून पडतं तसंच आपल्या आयुष्याच्या बाबतीत असतं. तिथे दररोज नव्या अनुभवांना सामोरे जावे लागते. मनात असो वा नसो, आपण त्याला तोंड देत रहातो.

कालचा दिवस सरला, आता उद्याचा येईल. काही सुखदु:खाचे प्रसंग उभे राहतील. घड्याळ्याचे काटे पुढे सरकत राहतात तसे अनुभवही पुढे सरकत राहतात आणि शेवटी उभी राहते ती अनुभवांची शिदोरी. त्याची एक गुंफलेल्या माळेतील मोत्यांसारखी अवस्था होते. मनात आणले की एकापाठोपाठ एक याप्रमाणे ते प्रसंग, त्या आठवणी अगदी ताज्या असल्यासारख्या आपल्या डोळ्यासमोरून पुढे सरकत जातात. मनाला विरंगुळा म्हणून त्याच्या आठवणीत आपले काही क्षण खर्च होतात. आठवणींचा एक इतिहासच तयार होतो. या इतिहासाची पानामागून पाने तयार होतात. काल काय घडले ते विसरायचे असते. उद्या काय घडणार आहे याचा विचार करायचा नसतो. पण आज काय करायचे आहे त्याचे व पुढचे नियोजन करायचे असते. मला अजूनपर्यंत मेंदू खूपच तल्लख असल्यामुळे ३० ते ३५ वर्षांपूर्वी काय घडले विचाराल तर गीतेतल्या तोंडपाठ झालेल्या अध्यायाप्रमाणे घडाघडा आठवणी सांगून टाकाव्याशा वाटतात. त्यामुळे मन कसे मोकळे वाटते. फुकटचं ओझं त्याला वाहून न्यायची जरूरी नसते. वर्तमानाला आकार देणारा प्रत्येकजण जेव्हा सिंहावलोकन करतो तेव्हा त्याला चुका दिसतात. कधी कधी जे जे त्या त्यावेळी योग्य म्हणून केले. पुढे पुढे आठवल्यावर त्या चुका वाटू लागतात, कारण आपल्या विचाराची चाके ही खूप गतिशील असतात. तिथे थांबायचे म्हटले तरी थांबावेसे वाटत नाही. उलट त्याची गतिमानता वाढवाविशी वाटते.

**अनुभवांची भेळ**

माझ्या आयुष्यात आलेल्या अनुभवांची एक भेळ तयार झाली आहे. घटकेत तिचा आंबटपणा, खारटपणा, गोडपणा जीभेला स्पर्शून जातो तशी त्याची अवस्था होते अन् त्याउपर भेळ खाऊन तोंडाला जसे पाणी सुटते तसे त्याला घुमारे फुटतात. जेव्हा खूप वाचतो तेव्हा खूप लिहावेसे वाटते पण वाचण्यात आणि लिहिण्यात फरक आहे याची जाणीव लिहायला बसल्यावर अथवा जे लिहायचे आहे ते लिहून झाल्यावरच होते. वाचताना मिळणाऱ्या आनंदापेक्षा लिहिण्यातला आनंद वेगळा मिळतो. कारण वाचन म्हणजे दुसऱ्याचे विचार ऐकणे आणि लिहिणे म्हणजे स्वत:चे अनुभव शब्दात रेखाटणे. उद्योगव्यवसायात आपल्याला स्वत:ला झोकून द्यायचे असते. दिवसाची रात्र व रात्रीचा दिवस जागवायचा असतो. तेव्हा यश वा अपयश पदरी पडत राहतं. यशाचा डोंगर वाढतो तेव्हा मानसिक संतुलन अधिक धष्टपुष्ट होते. फुकट विचार करण्यास मन धजावत नाही पण अपयश जेव्हा पदरी पडते तेव्हा मात्र मानसिकता खूपच बिघडते. बुडत्याचा पाय खोलात तसी त्याची अवस्था होते. एकामागून एक याप्रमाणे अपयश आल्यास मन खचून जाते. पण जेव्हा एखादी व्यक्ती हे वारंवार येणारे अपयश सहज लीलया झेलते तितके अधिक चांगले दिवस आले असे वाटू लागते. सत्य कटू असले तरी ते रिचवावे लागते. माझे विचार, माझे मनोगत ही माझी फिलॉसॉफी झाली. पण इतरांना ती मार्गदर्शक वाटू लागते.

काही प्रसंग मला जरुर सांगावेसे वाटतात. कारण ताज्या टवटवीत फुला–सारखे ताजेतवाने ते प्रसंग माझ्या मन:-चक्षूंसमोर पाहिजे तेव्हा उभे राहत. नोकरीमध्ये रमलो असताना फावल्या वेळेत आपण काही करायला हवे असा विचार मनात

सारखा घोळत होता. लेखणीच्या जोरावर काही करता येईल का म्हणून माझी पत्नी मीना हिने सहज चालू केलेल्या व्यवसायात आपणही हातभार लावावा म्हणून वृत्तपत्रातील काही जाहिराती पाहिल्यावर माझे मन फुरफुरले. कोणत्याही व्यवसायाची सुरुवात ही शून्यातून होते. आज भरपूर पैसे मिळविणाऱ्या माणसाने भरपूर पैसे टाकून स्वत:चा व्यवसाय उभा करायचा म्हटले, तर सहज शक्य आहे. परंतु काही वर्षांपूर्वी आणि माझ्यासारख्या विचाराच्या माणसांची गोष्ट वेगळी आहे.



सौ. मीना शिलेदार यांच्याशी व्यावसायिक चर्चा

कुणाचाही, कसलाही आधार न घेता मी व माझी धर्मपत्नी मीनाने व्यवसाय सुरू करायचा मनसुबा आखला होता. पुढे त्याचा वड होणार की पिंपळ होणार याची कल्पना नसते.

घरात चार भावांत एक असलेल्या सायकलवर स्वार होऊन १९७३ ते १९७६ च्या दरम्यान मोना पब्लिसिटी या छोटेखानी उद्योगासाठी फिरफिर फिरत राहिलो.

## फक्त चार तास झोप

गरवारे नायलॉन्समधील रात्रपाळी संपवून घरी आठ वाजता परतल्यावर मी ९.३० च्या सुमारास घराबाहेर पडत असे. दुपारी एकपर्यंत सर्वत्र फेरफटका मारून झाल्यावर घरी परतत असे. घर म्हणजेच ऑफिस. एकखांबी तंबू, मी आणि पत्नी दोघे मिळून खूप मेहनत घेत असू. जाहिराती तयार करून झाल्यावर प्रेसला नेऊन देत असे व फक्त चार तास झोप घेऊन पुन्हा बाजारात फिरून कामे मिळवीत असे. जाहिरातींना सुंदर शब्दांनी खुलवायचे व सजवायचे कार्य सुरू झाले.

## प्रिंटिंग व्यवसाय

व्यवसायात जम बसवताना मी प्रिंटिंगची कामेही स्वीकारू लागलो. वेगवेगळ्या प्रेसना भेटी दिल्या. प्रिंटिंगच्या व्यवसायातील बारकावे हेरून मला काही क्रिएटिव्ह कामे करण्याची संधी उपलब्ध झाली आणि मी तिचा चांगला फायदा करून घेतला. संधीा फायदा करून घेणे हे शेवटी तुमच्या हाती असते.

केवळ या स्वभावामुळेच इतरांपेक्षा मी अधिक प्रगती करू शकतो. मी पत्रिका पाहून काम करीत बसण्यापेक्षा स्वत:च्या मनगटावर विश्वास ठेवत गेलो. आपले कर्म हे नेहमीच आपल्या हाती असते म्हणून आपण चांगल्या कर्माच्या आधारे अधिक प्रगती करू शकतो. जगात शिकण्यासारखे खूप काही आहे. कितीही जन्म घेतले तरी आपले शिक्षण पुढे होऊ शकणार नाही इतकी क्षेत्रे आज कामासाठी उपलब्ध आहेत. दिवसाची रात्र आणि रात्रीचा दिवस केला नसता तर मी आजचे दिवस पाहू शकलो नसतो.

## पहिली स्कूटर

१९७६ साली लांबच्या नातेवाईकांची दिल्लीस बदली झाली. त्यांची स्कूटर विकत घेतली. स्वत:च्या घाम गाळून मिळविलेल्या पैशाने एखादी वस्तू विकत घेण्यातला आनंद किती वेगळा असतो याची प्रचीती मला तेव्हा आली. आज माझा माझ्यावरच विश्वास बसत नाही. तेरा वर्षाच्या काळात आठ तास नोकरी, येण्या-जाण्यात दोन तास, सात ते आठ तास काम, उरलेल्या वेळेत वैयक्तिक कामे आणि झोप. झोप तर केवळ चार ते पाच तास काढून मी ती तेरा वर्षे एक दिवसही सुट्टी न घेता अमाप कष्ट उपसले. तिथेच असंख्यांशी परिचय झाला. धडपडून काम करण्याची हौसही पुरी झाली. मला भेटलेली माणसेच माझे मित्र होते. त्यातल्या असंख्यांकडून खूप काही शिकायला मिळाले.

माझ्या या कष्टाच्या प्रवासाचे कौतुक अनेक वेळा उद्योगपती श्री. रसिकलाल धारिवाल, श्री. सी. जी. शेवानी, श्री. चंदनमल गांधी, श्री. जीवराज जैन यांनी तोंड भरून केले आहे. माझ्या आईला त्याचे कौतुक खूपच होते. या व्यवसायात माझ्या सर्व भावांनी, वहिनींनी खूप मदत केली. अन्यथा आम्ही दोघे काही घडवू शकलो नसतो हे आवर्जून सांगावेसे वाटते.

जाहिरात क्षेत्र अफाट आहे. तिथे रोजच नव्या गोष्टी घडत असतात आणि त्या आपण आत्मसात करीत राहतो. माझी लेखणी, तिचे कष्ट याच्या जोरावर एक उद्योगव्यवसायात त्याचे आज झालेले रूपांतर म्हणजे ३२ वर्षांच्या प्रदीर्घ प्रवासाचे फळ.

## पहिली जाहिरात

माझ्या लेखणीतून तयार झालेली पहिली जाहिरात सकाळ या वृत्तपत्रात दुसऱ्या दिवशीच्या अंकात छापून येणार होती म्हणून मी

खूप आनंदात होतो. जे हाताने लिहिले ते लेआऊटच्या रूपात उभ्या जगासमोर उद्याच्या अंकात झळकणार होते. आपली जाहिरात कशी दिसेल, काही राहिले नाही ना या समजाने दहा दहावेळा नजर फिरविली होती. जर का त्यात चूक झाली असती तर किंवा त्यात काही उणीव राहिली तर...अशा विचारांना माझ्याकडे थारा नव्हता. कारण जे काम करायचे ते चोख, बिनचूक असायला हवे या माझ्या आईवडिलांनी दिलेल्या शिकवणीची मला आठवण जशी आज होते तशी ती त्यावेळीही होत होती. फक्त उत्सुकता शिगेला पोहोचलेला मी पहाटे पाच वाजल्यापासून जागा होतो. कधी एकदा घरी सकाळ येतो आणि जाहिरात पाहतो अशी माझी अवस्था झाली होती. या आठवणीत गर्क असतानाच दारात धप्पकन पडलेल्या पेपरच्या आवाजाने मी भानावर आलो. दार लोटून ठेवले होते. लगबगीने उठून प्रथम आपली जाहिरात कोठे आहे, कशी दिसते आहे हे आसुसलेल्या डोळ्यांनी पाहिल्यावर आनंदाने मन तृप्त झाले. शाबास, अशी उगाचच एक थाप माझी मी माझ्या पाठीवर थोपटून घेतली. माझ्याशेजारी उभ्या असलेल्या माझ्या सौने ती डोळे भरभरून पाहिली. आईला दाखविली, मोठ्या वहिनीला, भावाला दाखवली. घरातल्या सगळ्या-सगळ्यांना दाखविली. घरगुती व्यवसाय सुरू झाल्याची ती पोचपावती होती. पहा इथला आनंद अगदी परमोच्च क्षण अनुभवल्यासारखा होता. कारण सगळं कसं मनासारखं घडलं होतं आणि पुढेही घडत गेलं.



**आंतरराष्ट्रीय लायन्स इंटरनॅशनलचे अध्यक्ष लायन अशोकभाई मेहता यांच्या बरोबर**

## अचूकता आणि एकाग्रता

एकदा आमच्या पप्पा केळकरांसाठी एक ब्लॉक बनवून पाहिजे होता. नुकताच रात्रपाळीहून आलेला मी फ्रेश होऊन बाहेर पडलो. टाईपसेट करून घाईघाईने मी ब्लॉक करून घेतला. दुपारची वामकुक्षी झाल्यावर पप्पा केळकरांना ब्लॉक नेऊन दिला. त्याबरोबर त्याचे प्रुफही जोडले होते. पप्पांनी वाचताना त्यात एका शब्दाच्या स्पेलिंगमध्ये चूक दर्शविली, डोळे खाडकन् उघडले. नकळत माझा हात माझ्या कानशिलावर धडकला. अरे, एवढे काय मनाला लावून घेतोस म्हणून सांत्वन करणाऱ्या शिस्तीचे भोक्ते असलेल्या पप्पांना मी त्वरित दुसरा ब्लॉक तयार करून दिला. त्या काळातसुद्धा झालेले दोन-चार रुपयांचे नुकसान मला खूपच मोठे वाटले. कानशिलावर बसलेल्या आघाताने मी पुरता जागा झालो, तो पुन्हा कधीही चूक न करण्यासाठी. गरवारे नायलॉनमधील रात्रपाळीमुळे झोप झालेली नव्हती. परंतु चूक होण्याचे ते कारण मला मान्य नव्हते. पुन्हा कधीही कामात चूक करणार नाही अशी शपथ मी पाळली आहे. इथे प्रत्येक कामात आपली एकाग्रता असणे अत्यंत जरुरीचे असते याची प्रकर्षाने मला जाणीव झाली.

## रसिकलाल धारिवाल

पुढे माझी गाठ उद्योगमहर्षी श्रीमान रसिकलालजी धारिवाल यांच्याशी पडली. कामानिमित्त त्यांना त्यांच्या जंगली महाराज रोडवरील ऑफिसात भेटायला गेलो. केबिनमध्ये जाण्यापूर्वी दारावर टक टक करून त्यांच्यासमोर स्थानापन्न झालो. कामाच्या पेपरवरील नजर दूर करून ते म्हणाले, ''अरे, तुम्ही आलात, या. तुम्हाला गंमत दाखवतो.'' असे म्हणून मी त्यांच्याबरोबर केबिनबाहेर आलो. तितक्यात त्यांच्या लक्षात आले की शिलेदारांचा चहा झाला नाही. त्यांनी प्यूनकडून चहा मागविला व चहा झाल्यावर आम्ही पुन्हा जंगली महाराज रस्त्यावरील त्यांच्या ऑफिससमोर उभ्या असलेल्या ऑडी या नवीन घेतलेल्या गाडीत बसण्यास सांगून युनिव्हर्सिटी रोडने निघून सेनापती बापट रोडने आणि पुन्हा कर्वे रोडमार्गे मला गाडीत फिरवून आणले. त्या नव्याकोऱ्या गाडीत बसून झालेल्या राइडने मला खूप आनंद झाला. गाडीवरचा त्यांचा ताबा, मला दिलेली राइड हा माझ्या आयुष्यातला आनंददायी प्रसंगांपैकी एक क्षण आजही पुस्तकातल्या पानात जपून ठेवलेल्या मोराच्या पिसासारखा वाटतो. माणसाचे मन कसे मोठे असते आणि त्याचबरोबर आधी लगीन कोंडाण्याचे या उक्तीप्रमाणे प्रथम आपल्याकडे येणाऱ्याचे चहाच्या कपाने होणारे स्वागत किती महत्त्वाचे आहे याची जाणीव श्री. रसिकशेठ यांनी करून दिली. पुढे मी त्यांच्याकडून खूप गोष्टी शिकतच गेलो. व्यक्तिमत्त्व इतके दांडगे, व्यासंगी की त्यांच्याकडून शिकावे तेवढे थोडे. या चहाच्या प्रसंगाने मला आठवतो तो लक्ष्मी-रोडवरील श्री. सी. जी. शेवानी यांनी व्यवसायाच्या अगदी पहिल्या आठवड्याला पाजलेला फक्कड चहा त्याची चव आजही ताजी आहे. पुढे आयुष्यात हजारो कप

चहा रिचविला परंतु तो चहा मी विसरू शकत नाही.

पुढील आयुष्यात श्री. जयवंतराव टिळक, श्री. प्रतापराव पवार यांचे बरोबर वार्तालाप करण्याचा प्रसंग अनेकवेळा आला. त्या पहिल्या पावसाच्या सरीसारख्या आजही पाठशिवणीचा खेळ करतात. व्यक्ती म्हणून, मित्र म्हणून अनुभवाला आलेले प्रसंग मला नेहमीच प्रोत्साहित करतात. मोठ्या व्यक्तीचे गुण नेहमी घ्यायचे असतात.

### आबासाहेब गरवारे

१९६९ ते ८१ या सालात गरवारे नायलॉन्समध्ये नोकरी करताना विद्यमान उद्योगपती श्री. आबासाहेब गरवारे यांनी दिलेली बहुमोल शिकवण आजही मला साद घालते. चांगल्या संधीवर तुम्ही झडप घालायला हवी, तरच ती तुम्हाला गवसते, विचार करीत बसलात तर ती कधी हातातून निसटून जाईल सांगता येणार नाही. म्हणून आपण म्हणतो जुने ते सोने. जे जुने आहे त्याला पॉलिश करून जतन केले तर ते जपले जाते. पारशी लोकांच्या गाड्या ३०-४० वर्षानंतरसुद्धा नव्याकोऱ्या कसा दिसतात तर त्यांनी घेतलेली गाडीची काळजी. सकाळी साखर झोपेतून उठल्यावर मला नेहमी स्मरण होते ते माझ्या आई आणि वडिलांनी दिलेल्या शिकवणीचे.

आपल्यावर प्रथमपासून झालेले संस्कार हे महत्त्वाचे असतात. अगदी लहानपणी घरोघरी तिन्ही सांजेला घरी यायलाच हवे असा आई-वडिलांचा दंडक पाळावा लागे. मग तुमची शाळा असो, सायंकाळचे मैदनावर जाणे असो.

तुमचे तुम्ही सर्व वेळेवर करून घरी परतल्यावर हातपाय धुऊन भीमरूपी स्तोत्र आणि रामरक्षा म्हटली जात असे. देवापाशी दिवा लावला जात असे. घरात एकापेक्षा अधिक मुले असली तरी हा रीतिरिवाज पाळला जात असे. मंगलमय वातावरण, देवापुढे लावलेला धूप - अगरबत्ती यांचा सुवास दरवळत असे. घरातील मोठा भाऊ अथवा बहीण यांच्याकडून रामरक्षा शिकवली जात असे. एकत्र कुटुंब पद्धत असल्याने घरात माणसेही खूप असत. खेळीमेळीच्या वातावरणात सर्वजण शाळेचा अभ्यास याविषयी चर्चा करून एकत्र जेवायला बसत असू. आजकाल अशी प्रथा लोप पावली आहे. जो घरी येतो तो आपापले जेवण करून आपल्या खोलीत जाऊन बसतो. ज्या घरात हे संस्कार पाळले गेले आहेत त्यांच्याकडे ते अजूनही पाळले जात आहेत. म्हणून प्रथमपासून ज्या ज्या घरातून या शिकवणीचा अवलंब करण्यात आला त्या घरातले प्रसन्न वातावरण आजही लहान शहरातून व कोकणातून पहायला मिळते. मोठ्या शहरातून बाजारीकरण झाल्याने या गोष्टी पहायला मिळणे दुरापास्तच झाले आहे.

### कविता लेखन

मला कविता करण्याचा नाद अगदी लहानपणापासून जडलेला आहे. फावल्या वेळात आपण कविता रचावी असे वाटत असे. खूप कविता लिहून आल्या आहेत. खूप लिखाण पडून राहिले आहे. वाढत्या वयाबरोबर ते जपून ठेवण्याची काळजी घेणे हे माझ्याकडून राहून गेले आहे. दररोज काही नवे सुचते आहे ते कागदावर उतरवित गेलो, पण ते टिकवून ठेवायला मात्र विसरलो.

माझ्या पहिल्या कवितेने मी असाच हुरळून गेलो होतो. कुणाला प्रथम काव्य करावेसे वाटते तर कुणाला प्रथम कुणावर तरी प्रेम करावेसे वाटते. काहींना तर गाणे गावेसे वाटते. माझ्या पहिल्या कवितेचा विषय होता 'पाऊस'. पाऊस हा मोठा विलक्षण असतो. जगात अनेक देशांत दोनच ऋतू समजले जातात. पण आपल्या भारताविषयी बोलायचे तर आपण उन्हाळा, पावसाळा, हिवाळा असे दर चार महिन्यांनी बदलणारे ऋतुचक्र मानत आलो आहोत. न सांगता आलेल्या पावसाने त्रेधातिरपिट उडते. काहीजण त्या पावसात भिजण्याचा आनंद लुटतात. तापलेल्या जमिनीवर पडलेल्या पावसाच्या थेंबाने मातीचा सुगंध सर्वत्र दरवळतो. पावसाचे प्रमाण वाढल्यावर हा मातीचा सुगंध लोप पावतो. पण त्या धुंद वातावरणात झालेल्या बदलाने कवी मन जागृत होते. अन् पावसाचे वर्णन जो तो आपल्या पद्धतीने कागदावर उतरवून टाकतो. अगदी बालकवी ठोंबरे यांना सुचलेले अजरामर काव्य हा त्यातलाच एक प्रकार. 'श्रावणमासी हर्ष मानसी' या काव्यपंक्ती तोंडातून आपोआप बाहेर पडतात. माझ्या पहिल्या काव्याने मला असाच दिलासा दिला. मी पावसावर प्रेम करता करता कल्पनेतल्या परीवर प्रेमकाव्य लिहिले. पावसावरचे प्रेम हे नेहमी स्फुरण पावणारे.

अजून एक प्रसंग चांगला आठवणीत राहिला आहे तो पहिली स्कूटर घेतल्याचा. नवी घ्यावी की जुनी घ्यावी या विचाराच्या चक्रव्यूहात मी पुरता अडकलो होतो. जुन्या स्कूटर्ससुद्धा चांगल्या मिळत. ते १९७६ साल होते. सायकलवरच्या प्रवासाला आता रामराम द्यावा, थोडे पैसे बँकेत शिल्लक पडले आहेत. काय हरकत आहे स्कूटर घेतली तर? जवळच्या एका नातेवाईकांची बदली झाली होती. त्यांची व्हेस्पा स्कूटर घरी ठेवूनच ते परगावी नोकरीवर रुजू झाले होते. पुण्याला आल्यावर त्यांच्यापाशी सहज विषय काढला. आमची स्कूटर का घेत नाही? झाले, मगाचा पुढचा विचार न करता सहा-आठ महिने वापरलेली ती स्कूटर मी विकत घेतली. तिची पूजा करून तिला अंगणात आणल्याचा आनंद माझ्या गगनात मावेनासा झाला. कष्टाचे चीज झाले. दिवसरात्र नोकरी आणि फावल्या वेळात आम्ही दोघांनी खांद्याला खांदा लावून उभारलेल्या व्यवसायात आम्हास नवा साथीदार त्या स्कूटरच्या रूपाने मिळाला होता. रोज सकाळी न चुकता ती स्कूटर धुतली जात असे. स्वत:च्या हाताने स्वत:चे कपडे धुवायचे. ही त्याकाळात एक फॅशन काही घरातून आढळत असे तसे माझे रोजचे स्कूटर धुण्याचे असे. आज त्या राहिल्या आहेत आठवणी. आजकाल प्रत्येक गोष्टीला आपल्याला नोकर लागतो. घरात बसून वा ऑफिसात बसून आपण हुकूम सोडून ही कामे करवून घेतो. पण त्याकाळाने आम्हा लोकांना खूप शिकविले. ज्यांनी ज्यांनी ते अंगिकारले त्यांनी ते जोपासले. स्वावलंबन हा माणसातला गुणधर्म आजकाल

खेड्यापाड्यात टिकून राहिला आहे. शहरीकरणाने आपण कित्येक प्रकारच्या आनंदाला मुकलो आहोत याची जाणीव होते. परंतु हा झाला काळानुरुपचा बदल. जग बदलले, आपण बदललो, संस्कृतीचा वारसा जपण्याची प्रथा मागे राहिली. अनेक सुविधा निर्माण झाल्याने काही प्रथांना बासनात गुंडाळून ठेवण्यात आले आहे. महाराष्ट्रातून आठ वर्षांपूवी मी लायन्सक्लबच्या कॅबिनेटमध्ये झालेल्या नेमणुकीमुळे चेन्नई येथे जाण्याचा प्रसंग आला. चार दिवस तिथल्या खेड्यातील शाळांना भेटी दिल्या असता सर्व गोष्टी ज्या लहानपणी अगदी पुण्या-मुंबईत पन्नास वर्षांपूर्वी जोपासल्या जात असत, त्या तिथे पाहायला मिळाल्या. गाव तेथे घर आणि घर तेथे ती संस्कृती.

**आपले छंद**

अनेक वर्ष मनात घोळत असणाऱ्या माझ्या विचारांनी अखेर मूर्त रूप घेतले. जाहिरात एजन्सी रौप्य महोत्सव जवळ आला होता. त्यानिमित्ताने 'आपले छंद' दिवाळी पहिल्या अंकाच्या कामाला सुरुवात केली. आणि अंकाचे प्रकाशन सुप्रसिद्ध अभिनेत्री मृणाल देव-कुलकर्णी हिच्या शुभहस्ते उद्यान प्रसाद कार्यालय येथे करण्याचे योजिले. अनेक लेखक, कवींना पाचारण करून लेख व कवितांची जमवाजमव करून ऐन दिवाळीपूर्वी अंक प्रकाशित झाला. खूपच मेहनत घेऊन अंकाच्या सजावटीसाठी अनेकांचा हातभार लाभला. ज्या दिवशी अंकाचे प्रकाशन होणार होते त्या दिवशी पुणेकरांना जाहीर निमंत्रण दिले होते. धो धो कोसळणारा पाऊस एक तासभर थांबला होता. अनेकांच्या उपस्थितीत त्याचे झालेले प्रकाशन मला खूपच मोठा आनंद देऊन गेला. कारण अंकाची विक्री चांगली झाली. त्याच्या प्रतिक्रिया मला लवकरच ऐकायला मिळणार होत्या. स्वत: काहीतरी आणि तेसुद्धा समाजासाठी घडविलेल्याचा आनंद कसा आणि किती वेगळा असतो त्याचा अनुभव मी त्यावेळी घेतला होता. माझ्या मातोश्री वा वडिलांचे तसेच श्री स्वामी समर्थ अक्कलकोट महाराज यांचे स्मरण करून मी अंक प्रसिद्धीसाठी मृणालच्या हाती सोपवला होता. असो.

त्या त्या काळाचे काही गुण तर काही दोष असतात. त्यामुळेच भूतकाळातील चांगल्या मूल्यांची शिदोरी सोबत घेऊन वर्तमानातील वाईटाला बाजू सारत उत्तम भविष्य घडवणे, हेच माणसाचे लक्ष्य असावे. 'माणूस भूतकाळात रमायला लागला की तो म्हातारा झाला असे समजावे' अशा अर्थाचं एक इंग्रजी वचन आहे. त्याचे स्मरण करून मी माझ्यातल्या 'म्हाताऱ्या'ला बाजूला सारतो अन् येणाऱ्या क्षणाचं भरभरून स्वागत करतो. अजून बरेच काही करायचे आहे, हा विचार मला पुन्हा तरुण करतो आणि मी आयुष्याचं पुन्हा एकदा नव्या उमेदीनं स्वागत करायला सज्ज होतो. अशावेळी कुसुमाग्रजांच्या पंक्ती प्रेरणा देत असतात,

**'अनंत अमुची ध्येयासक्ती, अनंत अन् आशा**
**किनारा तुला पामराला.'**

दिनकर शिलेदार
द्वारा मोना ॲडव्हर्टायझिंग
१३५१, शुक्रवार पेठ, बाजीराव रोड, नातू बाग, पुणे २

आपला जन्म
शिवाजीसारख्या
युगपुरुषाच्या
पोटी झाला आहे,
आणि
औरंगजेबासारख्या
कळिकाळाशी आपणास
जीवनमरणाची
झुंज द्यायची आहे,
या दोन्ही गोष्टींचा
क्षणभरही विसर
न पडलेल्या
महाराष्ट्रपुत्राची
अनोखी संघर्ष गाथा !

संभाजी
लेखक : 'पानिपत'कार
विश्वास पाटील

किंमत : ३८० रुपये प्रकाशनपूर्व सवलत : २८० रुपये
टी बुक क्लब व मेहता मराठी ग्रंथजगतच्या सभासदांना : २६० रुपये
पोस्टेज : ३० रुपये
नोंदणीची अंतिम तारीख : २१ नोव्हेंबर, २००५
प्रकाशनाची तारीख : १ डिसेंबर, २००५

सर्व प्रमुख विक्रेत्यांकडे नोंदणी सुरू

मेहता पब्लिशिंग हाऊस
१९४१ सदाशिव पेठ, बाजीराव रोड, पुणे - ३०. फोन - २४४७६९२४.
मेहता बुक सेलर्स, कोल्हापूर. फोन - २५४२३०४
E-mail : mehpubl@vsnl.com Website : mehtapublishinghouse.com

# प्रचंड आत्मविश्वास पेरणारे आकाशवाणीवरील वृत्तनिवेदन

## आशा कर्दळे

माझ्या आयुष्यात काही कालखंड अत्यंत संस्मरणीय असे येऊन गेले. आकाशवाणी पुणे केंद्रावर मी वृत्तनिवेदक म्हणून काम केलं तो असाच रम्य कालखंड. त्यातले प्रारंभीचे दिवस अजूनही आठवतात.

मी प्रासंगिक करारावर वृत्तनिवेदन करायला लागले, तेव्हा पुणे केंद्रावरून प्रादेशिक बातम्या नुकत्याच सुरू झाल्या होत्या. काही जणांचं पॅनेल होतं आणि महिन्या-महिन्याचे करार केले जात. पुढे ते कमी होत होत तीन दिवसांवर आले. त्यावेळी आम्हाला एका वाचनाचे ३५ रुपये मिळत.

हे काम मला मिळालं तेव्हा खरं म्हणजे मी पुण्यात नवीनच होते. लग्न होऊन अमरावतीहून आले होते. यजमानांनी प्रोत्साहन दिले आणि एक दिवस मी आकाशवाणीत येऊन धडकले. इतर दहा-बारा जणांबरोबर लेखी आणि आवाजाची परीक्षा दिली. लेखी परीक्षा म्हणजे सामान्य ज्ञान कितपत आहे ते बघण्यासाठी काही प्रश्न होते आणि २-४ बातम्यांचं भाषांतर करायचं होतं. त्यात पास झाल्यावर आवाजाची परीक्षा. तोवर स्टुडिओ म्हणजे काय, बातम्या कशा वाचायच्या काहीच माहीत नव्हतं. वाचताना तोंडाला कोरड पडली होती एवढं आठवतं. पण निसर्गत: आवाज चांगला असावा. त्यावर पुढे जाणीवपूर्वक वाणीसंस्कार केले.

तो काळ १९७४-७५चा होता. त्यावेळी आकाशवाणीची इमारत आत्ताची नवी नव्हती. एका बाजूच्या व्हरांड्यातून चालत गेलं की आधी ड्यूटी रूम, मग न्यूज रूम लागायची. न्यूजरूमच्या शेजारी टेलिप्रिन्टर्स असलेली लहानशी खोली. टेलिप्रिन्टर्स अखंड खडखडत असायचे आणि त्यावर पीटीआय, यूएनआयच्या बातम्या सतत येत असायच्या. सलग कागदाच्या रिळांमधून खाली घड्यांची चळत तयार व्हायची.

त्यावेळी आम्हाला पहाटे तीन वाजताच केंद्रावर हजर व्हावं लागे. आम्ही तिघं- म्हणजे तेव्हा असिस्टंट न्यूज एडिटर असलेले श्री. अष्टेकर, मी आणि भाषांतर करणारे श्री. कमलाकर पाठकजी. माझा तो हुद्दा 'न्यूजरीडर-कम-ट्रान्सलेटर' असा होता. त्यामुळे पीटीआय यूएनआयच्या मूळ इंग्रजी बातम्यांचं भाषांतरही करावं लागे. महत्त्वाच्या बातम्या अर्थात पाठकजी करत. प्रारंभी तरी आमच्यासारख्या नवोदितांकडे चार-चार ओळींच्या छोट्या बातम्या येत. म्हणजे त्या बुलेटिनमध्ये शेवटी लावल्या जाणाऱ्या आणि दहा मिनिटांत नाही गेल्या तरी चालू शकेल अशा असायच्या.

तेव्हा आम्ही डेक्कन जिमखान्यावर राहात होतो. तीन वाजता आकाशवाणीवर पोचण्यासाठी मी सव्वा-दोन अडीचलाच उठायची. चहा घेतल्याशिवाय झोप जायचीच नाही. माझ्यामुळे घरातल्या सगळ्यांची झोप मोडायची. पण यजमान आनंदानं खाली रस्त्यावर रिक्षास्टँडपर्यंत सोबत यायचे. त्यावेळी आमच्याजवळ कुठलं वाहन नव्हतं. बरं, वेळ अशी विचित्र, स्टँडवर एकादं-दोन रिक्षा असायच्या. रिक्षावाले थंडीत मस्त चादर गुरफटून झोपलेले. त्यांना उठवावं लागायचं. रिक्षा मिळणं फारच कठीण होतं. पुढचा आकाशवाणीपर्यंतचा प्रवास जीव मुठीत धरून किंवा देवाचं नाव घेत करायचा.

यजमान म्हणायचे, सात वाजून पाच मिनिटांनी 'आशा कर्दळे प्रादेशिक बातम्या देत आहे.' असं ऐकलं की मी सुखरूप पोहोचले असं समजायचं! त्यावेळी कॅज्युअल कॉन्ट्रॅक्टवर काम करणाऱ्यांना आकाशवाणीचं वाहन मिळत नसे. पण ती गैरसोयीची वेळ बघता, विशेषत: स्त्रियांना वाहन मिळावं असं निवेदन मी केंद्र निर्देशकांकडे दिलं. ती मागणी मंजूर झाली आणि आमच्यासारख्यांना न्यायला गाडी यायला लागली. अर्थात तोवर दोन-तीन वर्षं मी रिक्षानंच गेले.

## न्यूजरूम

पण फार मजा वाटायची. सगळं जग झोपेत असताना आपण काम करत आहोत ही जाणीव सुखकारक होती.

आल्याबरोबर आधी टेलिप्रिन्टर्सच्या खोलीत जायचं. लांबलचक कागदांच्या घड्यांचं भेंडोळं वळायचं. त्याच जगभराच्या बातम्या असत. त्यातल्या महाराष्ट्राशी संबंधित असलेल्या वेगळ्या काढायच्या. त्यासाठी असलेल्या लोखंडी पातळ पट्टीनं त्या भराभर कापायच्या. न्यूजरूममधलं वातावरण खेळकर होतं. गप्पा मारत भाषांतराचं काम सुरू व्हायचं. जास्तीत जास्त साडेसहापर्यंत साधारण १८-२० पानांचं बातमीपत्र तयार करावं लागे. शक्यतो एक-दोन वेळा वृत्तनिवेदकाला वाचायला मिळावं अशी अपेक्षा असे. ते दरवेळी मिळेच असं नाही.

काम करताना चहा खूप हवा वाटायचा. चार वाजता चहा यायचा.

साडे-पाच सहा वाजायला आले की बाहेरच्या वृक्षांवर पक्ष्यांचा किलबिलाट सुरू व्हायचा. दिवस उजाडायला लागलेला. इकडे साडेसहा वाजले की छातीतली धडधड वाढायला लागायची. कितीही शांत राहायचा प्रयत्न केला तरी ताण यायचाच.

## स्टुडिओ

सुरुवातीच्या काळात आम्हाला प्रशिक्षण वगैरे मिळालं नव्हतं. आधी सात वाजता दिल्लीवरून संस्कृत बातम्या आणि सात वाजून पाच मिनिटांनी आमच्या प्रादेशिक बातम्या. दहा मिनिटं आधीच मी स्टुडिओत जाऊन बसायची. उशीर झाला की कंट्रोल रूममधून लगेच फोन यायचा. खुर्चीत बसायचं, पानं एकमेकांना चिकटू नयेत म्हणून सुटी पसरून ठेवायची. श्वास रोखून धरलेला, वाचायला सुरुवात करण्यापूर्वी फीडर ऑन करायचा हे मनाला बजावून ठेवलेलं. स्टुडिओत कमालीची शांतता. फक्त घड्याळाची टिकटिक. शेजारी पाठकजी उभे. सुरुवातीला घड्याळाकडे लक्ष ठेवणं, बरोबर पाच मिनिटांनी ब्रेक घेणं.(म्हणजे 'या बातम्या आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून देण्यात येत आहेत' असं म्हणणं) वेळ संपत आला आहे असं लक्षात येताच शेवटी लावलेल्या, पण जायलाच पाहिजेत अशा बातम्या वर काढणं, तीस सेकंद बाकी असताना 'पुन्हा एकदा ठळक बातम्या' वाचणं ही सारी तंत्रं, कसरती जमत नसत. ते सगळं पाठकजी सांभाळत. काही वेळा वाचता वाचता एकदम पुढच्या मजकूरावर बोट ठेवत. मग मधला

**साडे-पाच सहा वाजायला आले की बाहेरच्या वृक्षांवर पक्ष्यांचा किलबिलाट सुरू व्हायचा. दिवस उजाडायला लागलेला. इकडे साडेसहा वाजले की छातीतली धडधड वाढायला लागायची. कितीही शांत राहायचा प्रयत्न केला तरी ताण यायचाच.**

गाळायचा. हे करताना कागदांचा आवाज होऊ द्यायचा नाही.

आत्ता हे लिहिताना सुद्धा माझा हात थरथर कापतोय् आणि हृदयाचे ठोके वाढले आहेत. असं वाटतं, ते वय होतं. त्यावेळी सगळं जमलं. आता बातम्या वाचायच्या म्हटलं तर हृदयक्रिया बंदच पडेल.

पहिल्या महिन्याचे ७-८ दिवस पार पडल्यावर वाचण्यात आत्मविश्वास आला. तरी पण एखाद्या शब्दावर अडखळले तर दिवसभर ते मनात डाचत राहायचं. एकदाही न अडखळता वाचायचा ध्यास लागला. पण ते शेवटपर्यंत नाहीच जमलं. 'संचालनालय' हा शब्द तर हमखास बोबडी वळवायचा. तथापि या कामानं मला अमाप प्रसिद्ध मिळवून दिली. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात माझं नाव आणि आवाज पोचवला. आज इतक्या वर्षांनीसुद्धा लोक 'बातम्या देणाऱ्या त्या तुम्हीच का' असं विचारतात. माझ्या वाचनाची आणि आवाजाची सगळीकडे खूपच प्रशंसा व्हायला लागली. आणि मग ती नशाच चढली.

## आणीबाणी

जून १९७५ मध्ये आणीबाणी सुरू झाली आणि हे सरकारी माध्यम म्हणून बातम्यांवर खूपच नियंत्रण आले. त्यामुळे बातमीपत्र रूक्ष वाटायला लागलं. पण केवढे तरी मजेदार अनुभव आले! बातम्या वाचून स्टुडिओतून न्यूजरूममध्ये परत आलं की चिकित्सक श्रोत्यांचे लगेच फोन सुरू व्हायचे. 'आज पानांचा आवाज जास्त झाला.', 'आज बातम्या पंधरा सेकंद उशिरा संपवल्या', 'वृत्तनिवेदिकेनं मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स म्हटलं.', वगैरे. एकदा तर मीच भाषांतर केलेल्या बातमीत 'टीक वृक्ष' असाच शब्द माझ्याकडून राहून गेला. लगेच प्रा. स. शि. भावे यांचा फोन आला.''मराठीत 'साग' हा शब्द असताना 'टीक' का वापरला? कोणी केलं भाषांतर? दिलगिरी व्यक्त करणारा खुलासा करा, नाहीतर केंद्र निर्देशकांना माझं पत्र जाईल.'' आम्ही अर्थात खुलासा केला.

## नर्व्हस

एकदा मी चुकून 'आकाशवाणीवरच्या बातम्या संपल्या' असं म्हटलं. वास्तविक 'प्रादेशिक बातम्या संपल्या' असं म्हणायला हवं होतं. चूक लक्षात आणून दिल्यावर मी ओशाळले. पाठकजी म्हणाले,'जाऊ द्या. काही लोक तर आकाशवाणीलाच संपवतात!' बातम्या वाचणं वाटतं तेवढं सोपं नाहीच. पाठकजींनीच सांगितलं की, एक जण तर फीडर ऑन केल्याबरोबर इतका नर्व्हस झाला

की त्याची जीभ टाळूला चिकटून बसली व खुर्चीतच त्याला चक्कर आली. त्याला बाजूला करून लगेच मी वाचायला लागलो जमेल तसं. एअरवर शब्द जायला हवे म्हणून. तेव्हापासून न्यूजरीडर्सबरोबर एक पर्यायी व्यक्ती ठेवावी, असं आम्ही सुचवलं.

मुंबई केंद्रावरून संध्याकाळी सात वाजता प्रादेशिक बातम्या ललिता नेने (आणखीही इतर) वाचायच्या. त्यांचं वाचन मला अतिशय आवडायचं. एकदाही न अडखळता. त्या वाचायच्या कधीमधी एखादी तरी चूक होईल म्हणून मी लक्षपूर्वक ऐकायची. पण कधीच अडखळल्या नाहीत त्या. इतकं तयारीचं वाचन घडायला खूप अनुभव आवश्यक असणार! त्याला सीझन्ड न्यूजरीडर म्हणता येईल. आम्हाला तर आमचे सहकारी सांगायचे, दिल्लीचे वृत्तनिवेदक चॉकलेट चघळत बातम्या वाचतात. इतक्या सहज. पुन्हा त्या वाचल्यासारख्या वाटायला नको. सांगितल्यासारख्या वाटायला हव्यात. मला तसंही फार जमलं नाही. पण वाचनाची एक छान लय साधली होती. त्यावेळी मला अस्थमाचा त्रास व्हायचा. खोकला येऊ नये किंवा खाकरावं लागू नये म्हणून मी व्हिक्सची गोळी तोंडात धरायची. हे आपलं तेवढंच दिल्लीवाल्यांशी साम्य!

आम्हाला संध्याकाळीही जावं लागे. मुंबईच्या बातम्या मॉनिटर करायच्या, दुसऱ्या दिवशीच्या बातम्या थोड्याफार भाषांतरित करून ठेवायच्या, फोनवरून तारांनी येणाऱ्या बातम्या टिपून ठेवायच्या, वगैरे कामं करायची. संध्याकाळी कुठलंच टेन्शन नसायचं. त्या काळात सगळं आनंददायक वाटायचं. आव्हानात्मक वाटायचं.

एकदा तर नरकचतुर्दशीच्या दिवशी माझंच वाचन होतं. ती पहाट आकाशवाणीतच गेली. बातम्या सुरू करण्यापूर्वी श्रोत्यांना दिवाळीच्या शुभेच्छा देताना केवढा थरार वाटला!

तसंच एकदा सात वाजून दोन मिनिटं झाली तरी काही अडचणींमुळे बुलेटिन पूर्ण तयार झालं नव्हतं. आमचे न्यूज एडिटर म्हणाले,'पहिली चार पानं घेऊन स्टुडिओत जा. बाकीचं मी घेऊन येतो.' मी खुर्चीत जाऊन जेमतेम बसले आणि दिल्लीच्या संस्कृत बातम्या संपल्या. मी फीडर ऑन केला आणि वाचायला सुरुवात केली. काही मिनिटांतच स्टुडिओचं दार हळूच उघडून संपादक आत आले. माझ्यासमोर मी एकदाही न पाहिलेले कागद ठेवले. त्यावेळी माझ्यात काय संचारलं होतं कोण जाणे. प्रत्येक शब्दावर पक्की नजर रोवत केलेलं ते सर्वात निर्दोष वाचन होतं!

**आत्मविश्वास**

या काळानं माझ्या व्यक्तिमत्त्वात प्रचंड आत्मविश्वास पेरला.

नुकसान सांगायचंच झालं तर मी एवढंच म्हणेन की, माझ्यात वृत्तनिवेदन इतकं भिनलं की, मी दुसरं काहीही वाचताना तोच आघात यायचा. माझ्यातला वृत्तनिवेदक घालवायला मला खूप प्रयत्न करावे लागले. अजूनही आवाजाचा एकच साचा मला वाटतो. अर्थात सगळ्या भावना पेलणारा लवचिक आवाज फार थोड्या जणांना लाभलेला असतो.

आज दूरदर्शनवरच्या इंग्रजी, हिंदी बातम्या ऐकताना असं वाटतं, ही तरुण मुलं-मुली किती उत्कृष्ट सादरीकरण करतात! तिथं तर चेहऱ्यावरची सूक्ष्म हालचालही कॅमेऱ्यात टिपली जाते. दिसणं सांभाळायचं, दोन कॅमेऱ्यांकडचे कटाक्ष सांभाळायचे, व्हिजुअल्सचंही भान ठेवायचं. पण हे सगळं कमालीच्या सफाईनं करतात हे लोक!

त्यामानानं प्रादेशिक बातम्या वाचणं म्हणजे काहीच नाही. तथापि त्या प्रारंभीच्या दिवसांनी मनात ठेवून दिलेली सूक्ष्म भीती आजही स्वप्नांच्या रूपानं प्रकट होते. अजूनही स्वप्नं पडतात- मी स्टुडिओत जाऊन बसले आहे. पण तोंडातून शब्दच फुटत नाहीत. कंट्रोलरूममधला तंत्रज्ञ धावत येतो. किंवा मी स्टुडिओत पाऊल ठेवते. तिथं खूप पाणी साचलं आहे. हातातले सगळे कागद पाण्यात पडतात....

जाग आल्यावर आवळलेला श्वास मोकळा होतो.

---

इंद्रायणी, पत्रकारनगर, पुणे-१६ फोन- २५६५७२३८





झुंजार व्यक्तिमत्वाची सुबोध ओळख.. प्रत्येक तरुणाने वाचावी अशी...

**डॉ. झिवागो**

बोरिस पास्तरनाक

किंमत : २५०रु.

अनुवाद : आशा कर्दळे



**आय डेअर : किरण बेदी**

परमेश डंगवाल

किंमत : २२५रु.

विसाव्या शतकातील एक महान, श्रेष्ठ नोबेल पारितोषिक विजेती कादंबरी

मेहता पब्लिशिंग हाऊस, १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,पुणे ४११०३०

# तबलावादन...ध्वनिमुद्रण... 'जरा हटके' असलेले दिवस

प्रशांत कुलकर्णी

एक कलाकार म्हणून देदीप्यमान यश मिळवलेले अनेक दिग्गज कलावंत आज आपल्यासमोर आहेत. त्यांनी या क्षेत्रात मिळवलेले स्थान, त्याकरिता घेतलेला ध्यास, परिश्रमाची पराकाष्ठा आज आपण बघतो. माझ्यासारख्या छोट्या कलावंताच्या मनात ही सगळी जणू दैवतंच आहेत.

'पहिले दिवस' असं म्हटल्यावर आपणच आपल्या भूतकाळाकडे त्रयस्थपणे पहावे, इतकी, एक कलाकार म्हणून आपली योग्यता नसली तरी, मनामध्ये निश्चित केलेल्या ध्येयापर्यंत पोहोचण्याकरिता एक सामान्य माणूस म्हणून घेतलेला ध्यास आजही मला मार्गदर्शकच ठरतो आहे. भविष्यातसुद्धा त्याच निष्ठेने काम करून नव्यानव्या वाटा शोधत राहणं हा माझ्या दृष्टीने न संपणारा प्रवास आहे.

मी तसा सर्वसामान्यच, मध्यमवर्गीय कुटुंबातला! शिक्षण, नोकरी अशा सरधोपट पठडीतला. परंतु, एका वेगळ्या ओढीने सदैव अस्वस्थ असलेला.

मला आठवतंय, त्यावेळी मी इयत्ता चौथीत होतो भावे प्राथमिक शाळेत. माझे आजोळ हे कीर्तनी परंपरेतले. माझे आजोबा म्हणजे आईचे वडील, ह.भ.प. श्री. राधाकृष्णबुवा बुरसे हे कीर्तनकार, संगीताच्या माध्यमातून अध्यात्मिक तत्त्व सोपे करून सांगणारे. माझा मामा आजोबांना तबल्याची साथ करत असे. मी सुद्धा कीर्तन ऐकायला आवडीने जात असे. पं. जी. एल. सामंत या एका चांगल्या गुरूकडे माझा मामा तबला शिकला होता. तबल्याची 'चाटी'चा नाद आणि डग्गयाचा 'घुमारा' याच्या विलक्षण ओढीने मी आपोआपच तबल्याकडे ओढला गेलो. मामाकडे प्राथमिक धडे घेतल्यानंतर शास्त्रशुद्ध शिक्षणासाठी पं. सुरेश सामंत यांच्याकडे मी जाऊ लागलो. तरीसुद्धा तबला हा माझा छंद होता मे महिन्यातल्या सुट्टीपुरता. परंतु माझी तबल्यातील प्रगती पाहून गुरुजींनी माझ्या आई-वडिलांना तबल्यातील पुढील शिक्षणाचा आग्रह धरला. तरीपण क्रमिक शिक्षणाचे काय? या भीतीची एक पाल घरच्यांच्या मनात चुकचुकत होती. त्यांची ही भीती मी खोटी ठरवली. वर्गात सदैव 'अ' तुकडीत पहिल्या पाचात माझा नंबर असे. एवढेच नाही तर इयत्ता १०वी मध्ये शालान्त परीक्षेत उत्कृष्ट गुणवत्ता प्राप्त करून 'आपटे ज्युनियर कॉलेज' मध्ये इलेक्ट्रॉनिक्स हा विषय घेऊन सायन्सला अॅडमिशन घेतली.

शाळेत असताना तबला या विषयाचा रियाज चालूच होता. याचा परिणाम म्हणून भारत सरकारच्या 'सेंटर फॉर कल्चरल रिसोर्सेस अॅण्ड ट्रेनिंग' या विभागातर्फे दिली जाणारी शिष्यवृत्तीसुद्धा मला मिळाली. तेव्हा माझे वय होते फक्त १३ वर्षे.

मातुल घराण्यातील कीर्तनी परंपरेतील माझा मामा, श्री. वासुदेवबुवा बुरसे, हा स्वतंत्र कीर्तन करू लागला होता. मी त्यावेळी मामाला तबल्याची साथ करू लागलो. शिक्षणाचे रूपांतर हळूहळू जाहीर कार्यक्रमात होऊ लागले. माझे तबला वादन हा इतरांच्या दृष्टीने असलेला कौतुकाचा विषय माझ्या 'करियर'ची पायाभरणी करू लागला.

शैक्षणिक प्रगतीसुद्धा तितक्याच तन्मयतेने होत होती. समवयस्क मित्रांच्या मार्गक्रमणेनुसार मी १२वी नंतर उत्तम गुणवत्तेच्या आधारावर आणि चाकोरी मानणाऱ्या आई-वडिलांच्या इच्छेनुसार 'विश्वकर्मा इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी' (V.I.T.) या कॉलेजमध्ये कॉम्प्युटर इंजिनिअरिंगला 'मेरिट लिस्ट'मध्ये प्रवेश मिळवला. परंतु विधिलिखित मात्र वेगळेच होते.

या प्रवेशाच्या वेळी 'सामायिक प्रवेश प्रक्रिया' बरीच लांबली. त्यामुळे १२वी नंतर अचानक मिळालेल्या ५-६ महिन्यांच्या मोठ्या सुट्टीत मी काय केले तर तबल्याचा भरपूर रियाज!

कॉलेज सुरू झाले पण मन लागत नव्हते. त्यामुळे सगळे करतात तसे चाकोरीबद्ध आयुष्य जगताना माझी घुसमट होत होती. यावर उतारा माझी मीच शोधला. सामंत गुरुजींच्या सांगण्यावरून मी इतर प्रतिथयश गायक-वादक यांच्याकडे रियाजासाठी जाऊ लागलो. नृत्यतपस्विनी गुरु रोहिणीताई भाटे यांच्या 'नृत्यभारती' या संस्थेतील गुरु मनीषाताई साठे यांच्या 'मनीषा नृत्यालय' या संस्थेतील कलाकारांच्या पदन्यासाबरोबर माझी बोटे तबल्यावर विविध बोल काढू लागली. तसेच अनेक एकल वादनाच्या स्पर्धांमधून, जुगलबंदीमधून माझी कला बहरत चालली होती. खूप आनंद व्हायचा मला. कॉलेजमध्येसुद्धा अभ्यासाबरोबर सांस्कृतिक वातावरणात मी जास्त रमू लागलो. 'फिरोदिया करंडक, कल्याणी करंडक, इनसिंक' अशा आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत तालवाद्यामध्ये आणि संगीत संयोजनामध्ये कायम 'प्रथम' क्रमांकाचे बक्षीस मी पटकावीत होतो.

### विधिलिखित


इंजिनिअरिंगचे शिक्षण घेत असताना माझ्यासारख्या मध्यमवर्गीय मुलाच्या घरची आर्थिक स्थिती दिवसेंदिवस बिकट होऊ लागली होती. परंतु भविष्यातील यशाच्या ओढीने आई-वडील आशेने डोळे लावून होते.

पण विधिलिखित वेगळेच होते. मनाची दोलायमान अवस्था अस्वस्थ करत होती. अशातच तापाने मी खूप आजारी पडलो. शैक्षणिक वर्ष वाया गेले. माझ्यासाठी ही देवाची कृपाच ठरली.

याच विश्रांतीच्या काळात वडिलांच्या अनुपस्थितीत मी तबल्याचा तुफानी रियाज केला. संध्याकाळी वडील घरी आल्यावर सगळे चिडीचिप! ते शीतयुद्धाचे पर्व होते. पण घडणारे अटळ होते. मला माझ्या आवडीच्या विषयातच प्रावीण्य मिळवायचे होते आणि त्यातच करियर करायचे होते. त्यामुळे विचारान्ती निर्णय घेतला, कॉलेज सोडण्याचा. आई-वडिलांना तो मोठा धक्काच होता. शिक्षण सोडण्याचे सूतोवाच करताच, आकाशपाताळ एक झाले. मतभेदाचे तीव्र पडघम घरी वाजू लागले. पण माझा निर्णय पक्का होता. इंजिनिअरिंगचे शिक्षण सोडून मी पुणे विद्यापीठाच्या 'ललित कला केंद्रामध्ये' तबल्यावर पदवी घेण्यासाठी प्रवेश घेतला.

रूढ अर्थाने शैक्षणिक क्षमता असूनसुद्धा कलेच्या ओढीपोटी मी घेत असलेल्या निर्णयाचे ललित कला केंद्राचे संचालक श्री. सतीश आळेकर यांनी मनापासून कौतुक केले.

आपल्या आवडीच्या विषयातील शिक्षण मिळाल्याने मी अत्यंत मोहरून गेलो आणि मनाची चलबिचल कमी झाली. त्यामुळे साहजिकच तबला, तबला आणि तबला हे माझे विश्व होऊन गेले. तबल्याच्या साथी, कार्यक्रम जोमाने सुरू झाले. याचवेळी संगीताची परंपरा असणारा तरुण जलतरंग वादक मिलिंद तुळाणकर याच्याबरोबर तबल्याची साथ करू लागलो. रागसंगीतातील ज्ञान वाढविण्यास मला यामुळे मदत झाली.



प्रशांत कुलकर्णी तबला वादन करताना

### ध्वनिमुद्रण

ललित कला केंद्राच्या अभ्यासक्रमात संगीत, नृत्य, नाटक यांच्या सादरीकरणासाठी ध्वनिमुद्रणाची आवश्यकता असते. त्याकरिता 'थिएटर ॲकॅडमी' या नावाजलेल्या संस्थेचे ज्येष्ठ कलावंत श्री. नंदू पोळ यांच्या 'नेहा ऑडिओ इफेक्टस्' या ध्वनिमुद्रण स्टुडिओमध्ये जाण्याचा योग आला. कलात्मक चित्रपट, नाटक, जाहिराती तसेच टी. व्ही. सीरियल्स यात बरेच व्यस्त असणारे नंदू काका यांचा सहवास आम्हा सर्व होतकरू कलावंतांना अत्यंत मार्गदर्शक असाच ठरतो. त्यामुळे त्यांच्यातील ज्येष्ठता जाऊन ते आमचे 'काका' कधी झाले ते कळलेच नाही. एक वडीलधारा माणूस वय विसरून आमच्यासारखा विचार करतो आहे, याकडे मी आकर्षिला गेलो. ध्वनिमुद्रण कलेतील त्यांचे कसब मला 'गारुड' घालीत होते. ते एरवी बी. जे. मेडिकलमध्ये नोकरी करत व संध्याकाळी ध्वनिमुद्रण करीत असत. ध्वनिमुद्रण कलेविषयी मला नवीनच ओढ निर्माण झाली. वारंवार स्टुडिओत जाण्याचा योग आला. त्यामुळे नंदूकाकांना ध्वनिमुद्रण मला शिकवाल का? असे मी विचारले. त्यांच्या तात्काळ होकाराने एका नवीनच कलेच्या क्षेत्राची दालने माझ्यासाठी उघडली गेली आणि जवळजवळ १२ वर्षे तबल्याचा ध्यास घेतलेला मी ध्वनिमुद्रण क्षेत्राकडे वाटचाल करू लागलो.

ध्वनिमुद्रण हे शास्त्र आहे की कला? या चर्चेत न पडता नंदूकाकांनी त्यातल्या तांत्रिक गोष्टींबरोबरच कलात्मक खुबी मला प्रात्यक्षिकांसह समजावून दिल्या. वाद्यांची कंपने, प्रत्येक वाद्याचा वैशिष्ट्यपूर्ण नाद (Timbre) मायक्रोफोनची प्लेसमेंट इत्यादी मूलभूत गोष्टी मी आत्मसात करू लागलो. ध्वनिमुद्रणाची व्यावसायिक कामे, वापरण्यात येणारे 'स्पेशल साऊंड इफेक्टस्' इ. आवश्यक



**प्रशांत कुलकर्णी ॲज ए रेकॉर्डिस्ट**

गोष्टींशी मी चांगला परिचित झालो आणि एक दिवस मी त्यांना विचारलं की, ''तुमच्या अनुपस्थितीत मी स्टुडिओत काम करू का?'' क्षणाचाही विलंब न करता काकांनी मला स्टुडिओची चावी दिली आणि सुरू झाला नव्या ध्येयाकडे प्रवास...

## वर्गमैत्रीण सुवर्णा

ललित कला केंद्रात शिक्षण चालू असताना नृत्य या विषयात पदवी घेणारी माझी वर्गमैत्रीण होती सुवर्णा दीक्षित. मैत्रीचे रूपांतर आणखीन कशात तरी होत आहे, हे दोघांनाही जाणवत होते आणि शेवटी व्हायचे होते, हवे होते तेच झाले. सुवर्णा माझी धर्मपत्नी झाली. नर्तन व तबला यांचे नाते अनादि कालापासून आहे. रुढी परंपरेला फटकून वागणारा मी या परंपरेशी मात्र 'प्रामाणिक' राहिलो. काय करणार? कलेचा ध्यास! सुवर्णा आता भरतनाट्यम् नृत्याचे वर्ग घेत आहे. आम्हाला एक मुलगा आहे, चार महिन्यांचा 'निनाद'...

नंदू काकांचा माझ्यावरचा विश्वास दांडगा, त्यामुळे स्टुडिओतल्या जागा आता बदलल्या होत्या. आता रेकॉर्डिस्टच्या खुर्चीत मी आणि सूचना देणारे नंदू काका मागे. ॲनालॉग ध्वनिमुद्रणात (Analogue Recording) येणाऱ्या 'लिमिटेशन्स्' मुळे आम्ही काळाच्या बरोबर जाणारी डिजिटल ध्वनिमुद्रण यंत्रणा (Digital Recording System) आणण्याचे ठरवले आणि सुरू झाला माझ्या नव्या धडपडीचा नवा अध्याय...

उपलब्ध साधने, यंत्र सामुग्रीच्या माहितीबरोबरच मुंबईत होणाऱ्या 'Broadcast India' या आंतरराष्ट्रीय पातळीच्या प्रदर्शनातूनही आम्ही महत्त्वाची माहिती मिळवली. व्यावसायिक दृष्टिकोन असणाऱ्या नंदूकाकांनी स्टुडिओतील कामाची सर्व जबाबदारी माझ्यावर सोपविली आणि केलेल्या कामाचे पैसेही मला मिळू लागले.

ही होती नवीन शतकाची सुरुवात.

बघता बघता हे नवीन तंत्रज्ञान मी लीलया आत्मसात केले. ध्वनिमुद्रणाची शास्त्रीय माहिती देणारी पुस्तके, नियतकालिके तसेच इंटरनेट वरील माहिती जमा करू लागलो आणि त्यानुसार स्टुडिओतील यंत्रणेची सिस्टिम कमतरता दूर करत राहून वेळोवेळी ती यंत्रणा अपडेट करत राहिलो आणि आजही ते चालूच आहे. या सगळ्याला लागते भक्कम आर्थिक मदत. काकांनी ही जबाबदारी उचलेलीच होती, मला फक्त काम करायचे होते आणि ते मी चोख करत होतो. ते काही फक्त पैसे मिळतात म्हणून नव्हे तर या क्षेत्रात काहीतरी चांगले करून दाखविण्याकरिता.

## भारतभ्रमण

तांत्रिक ज्ञानाबरोबर घौडदौड करत असतानाच सिंथेसायजर या वाद्यावर मी प्रभुत्व मिळवित होतो. त्यातूनच संगीत संयोजन (Music Arrangement) करण्याकरता या वाद्याचा ध्वनिमुद्रणासाठी कसा उपयोग होतो हे सुद्धा शिकत होतो. त्याबरोबर 'संतूर' हे वाद्यसुद्धा मी थोड्याफार प्रमाणात मी आत्मसात केले आणि व्यावसायिकरीत्या ह्या गोष्टी खूबीने वापरूही लागलो. एकीकडे तबलाही चालू होता. कार्यक्रमानिमित्त साथीसाठी भारतभ्रमण झाले.



**प्रसिद्ध अभिनेत्री नीना कुलकर्णी यांच्याबरोबर स्टुडिओत प्रशांत**

तसेच कार्यक्रमासाठी विदेश दौरा करून आलो. तबल्याचे, संगीताचे ज्ञान स्टुडिओच्या कामात मला खूपच उपयोगी पडत होते आणि नेहमीच ठरेल. सुगम अथवा शास्त्रीय संगीत कशाचेही काम करताना. एडिटिंगे, मिक्सिंग करताना तबल्याच्या ज्ञानाचा पुरेपूर वापर करता येतो.

## ध्वनिफीत सीडी

ध्वनिमुद्रणानंतर ध्वनिफीत (cassette or CD) बाजारात उपलब्ध होईपर्यंतची प्रक्रिया म्हणजे post production ची मी माहिती करून घेतली आणि सर्वांच्या सहकार्याने निर्मिती क्षेत्रात मी पाऊल टाकले आणि 'रेनबो म्युझिक कंपनी' तयार झाली. याद्वारे उत्तम निर्मिती करण्यासाठी मी, आम्ही प्रयत्नशील असतो. सौ. मालिनीताई राजूरकर यांच्या हस्ते उद्घाटन झालेल्या फ्रीडम आणि एक्सप्रेशन

या प्रसिद्ध हार्मोनियम वादक डॉ. अरविंद थत्ते यांच्या कॅसेटस् व सीडीज् तसेच तरुण गायिका अनुराधा कुबेर यांची सृजन ही रागदारी संगीतातील चैतन्य कुंटे यांच्या बंदिशीची सी.डी. ही 'रेनबो' ने केलेली निर्मिती आहे. या कामात माझी पत्नी सुवर्णा व माझा भाऊ आमोद (उत्तम तबलावादक आणि साऊंड रेकॉर्डिस्ट) यांचे बहुमोल साहाय्य मिळते.

**नवनवीन संधी**

आता मी या क्षेत्रात चांगला स्थिरावलो आहे. आम्ही ध्वनिमुद्रित केलेल्या कामांची देशात तसेच परदेशात चांगली दखल घेतली गेली आहे. प्रसिद्ध गायिका 'शुभा मुद्गल' यांच्या www.underscorerecords.com या वेबसाईटवर देखील रेनबो म्युझिक कंपनीच्या सी.डी.ज् वितरणासाठी उपलब्ध आहेत. या निमित्ताने ध्वनिमुद्रण व आधुनिक संगीतातील नवनवीन व्यावसायिक संधी माझ्या दृष्टिक्षेपात येऊ लागल्या आहेत. त्यामध्ये जिंगल्स, ॲनिमेशन, फिल्मचे संगीत, कॉर्पोरेट फिल्म्स, म्युझिक अल्बम, टी.व्ही. सीरियल्स् याचबरोबर नाटक, नृत्यनाटिका, फ्युजन म्युझिक यासाठी सुद्धा मी काम करतो.

आजच्या तरुणांचा प्रतिनिधी म्हणून आवर्जून काही गोष्टी माझ्या मित्रांना सुचवाव्यात असे वाटते. मार्गदर्शन किंवा सल्ला देण्याइतका ढुढ्ढाचार्य मी नक्कीच नाही; परंतु समवयस्कांशी या निमित्ताने सुसंवाद तरी साधता येईल.

आयुष्यात सदैव आदर्श तशी परिस्थिती (Ideal situation) आपल्यासाठी कधीच नसते. त्यातून ज्या सामाजिक आणि आर्थिक स्तरातून आपण येतो, तेथे सतर्कता, लढण्याची उमेद, शोधक व जागरूक दृष्टिकोन आणि कोणाचाही राग न धरता केलेला यशाचा प्रवास या गुणांच्या आधारे बराच लांबचा पल्ला गाठता येऊ शकतो हे मी माझ्या अनुभवावरून सांगू शकतो. आपला मुलगा किंवा मुलगी यांनी डॉक्टर, इंजिनियर, नोकरी इ. चाकोरीबद्ध अभ्यासक्रम निवडले म्हणजे आपले इतिकर्तव्य झाले असा दृष्टिकोन पालकांनी न ठेवता मुलाची आवड व कुवत लक्षात घेऊन आयुष्य जगण्याचा मार्ग त्यांचा त्यांना निवडू द्यावा. आई-वडिलांनी मार्गदर्शन जरूर करावे; पण अतिआग्रही भूमिका शक्यतो टाळावी, असे वाटते.

मी काही फार धाडसी आहे असे नाही; परंतु प्रवाहाच्या विरुद्ध ज्याला 'जरा हटके' असे म्हणतात, असा मार्ग निवडला. अडचणी येणारच पण निर्धार पक्का असेल तर पुढचा मार्ग स्वच्छ दिसू लागतो, यावर माझी अढळ श्रद्धा आहे.

आज तिशीच्या उंबरठ्यावर मागे वळून पाहतो ती वर्षे फार लांबची नाहीत, पण अनुभवसंपन्न नक्कीच आहेत. जन्मदाते नेहमीच 'आपल्या मुलाचे चांगले व्हावे' असाच विचार करतात. परंतु तो त्यांच्या दृष्टिकोनातून. कालांतराने त्यांचा दृष्टिकोन बदलतो आणि आपल्या मुलांच्या यशाने हर्षभरित झालेल्या डोळ्यांनी आनंदाश्रूंना वाट मिळते, तो क्षण आज मी अनुभवतो आहे आणि आत्मसमाधानाचे नेमके सूत्र कशात आहे तेसुद्धा डोळे भरून पाहतो आहे...


विठ्ठलवाडी, सिंहगड रोड,
फ्लॅट नं. ७, चिंतामणी एनक्लेव्ह, पुणे - ५१.
नेहा ऑडिओ इफेक्टस् - फोन नं. २४३३४९५०


## माझी आवडती दहा पुस्तके स्पर्धा निकाल

### ३ जुई सुहास अंजळ

| | |
|---|---|
| १. हृदयस्थ | डॉ. अलका मांडके |
| २. गंगेमध्ये गगन वितळले | अंबरीश मिश्र |
| ३. इडली आर्किड आणि मी | विठ्ठल कामत |
| ४. जात व महाराष्ट्रातील सत्ताकरण | सुहास पळशीकर |
| ५. विज्ञानेश्वरी | डॉ.दत्तप्रसाद दाभोळकर |
| ६. हृदयरोग:समज, गैरसमज व वास्तव | डॉ. नटराज द्रवीड |
| ७. जगाच्या पाठीवर | सुधीर फडके |
| ८. सांजवा | सुमेध वडावाला |
| ९. पृथ्वीवर माणूस उपरा | निरंजन घाटे |
| १०.माझी प्रकाशवाट | सविता भावे |

**हृदयस्थ**

वरील यादीतील प्रत्येक पुस्तक, त्या त्या विषयातील उच्च बिंदू गाठणारे आहे. भाषा, माहिती आणि विषयावरील प्रेमापोटी, त्यातील डावे उजवे करणे शक्य नाही. परंतु शब्दांची वेळेची आणि जागेची मर्यादा शोधता मी हृदयस्थ हे पुस्तक का आवडले हे थोडक्यात मांडते.

हे एक झपाटणारं पुस्तक आहे. उगीच नाही, ह्याच्या, मे, जून जुलै २००४ अशा महिना एक एक आवृत्त्या निघाल्या. बाळासाहेब ठाकरे यांची प्रस्तावना आहे. एका कनिष्ठ मध्यमवर्गीय माणसाने महाराष्ट्रातील जनतेसाठी जागतिक कीर्तीचे एक फाइव्हस्टार हॉस्पिटल काढण्याचं स्वप्न पाहिले. त्याकरिता स्वत:ला सपत्नीक तयार केलं व त्यातच त्याच्या आयुष्याची इतिश्री झाली आणि ती गाथा त्याच्या सुविद्य पत्नीने सांगितली. त्यात 'आहे मनोहर तरीचा दृष्टिकोन' न ठेवता विद्यार्थी दशेपासून नितू मांडकेच्या देदीप्यमान चरित्रात विरघळून केलेले योगदान सहजतेने मांडलेले आहे.


६/६१ लोकमान्यनगर, पुणे ४११ ०३०.

# भरत नाट्यमंदिर, ड्रॉपर्स, पुरुषोत्तम... यांनी व्यापून टाकलेले ते दिवस

## रवींद्र खरे

मी नाट्यक्षेत्रातील आहे. इतके दिवस या क्षेत्रात गेल्यावर आपण एका टप्प्यावर येऊन पोहोचल्याची जाणीव मला झाली आणि सहज मागे वळून पाहिलं की स्मरतात आपले पहिले दिवस उमेदवारीचे दिवस, हरखायचे दिवस, हरवायचे दिवस, हिरवे कच्चे आणि गाभुळलेले दिवस, काळाच्या गतीला मागे टाकून पुढे जाण्याचे वेड असलेले दिवस आणि तरीसुद्धा रुजण्यासाठी आवश्यक वेळ घेणारे दिवस.

सातवी-आठवीत असताना भरतनाट्य मंदिराच्या नाट्यशिक्षण वर्गाची जाहिरात वाचनात आली. मित्र दिलीप भोकटे याच्याबरोबर मी 'भरत'मध्ये गेलो. तिथल्या गृहस्थांना आम्हाला वर्गाला प्रवेश मिळेल का म्हणून विचारले. ते म्हणाले - मॅट्रिक झाल्याशिवाय नाही. चला पळा. मॅट्रिक झाल्यावर या. अगदीच निराश मनानं आम्ही परत आलो. मात्र नाटकात काम करायची हौस आमच्या शाळेच्या गॅदरिंगच्या निमित्ताने पूर्ण झाली. नू.म.वि. म्हणजे विद्या कला क्रीडांच्या संगमाचं प्रयाग क्षेत्रच. मॅट्रिकला पहिली येणारी मुलं, नाट्यस्पर्धेत पहिली येणारी शाळा आणि क्रीडा स्पर्धांत नामवंत शाळा! नू.म.वि. प्रशाला. तीनही क्षेत्रातले 'पंडित' मंडळी नूमवित होती आणि आपण सांगतो ते स्वत: करून दाखवायची क्षमता या शिक्षकांमध्ये होती

शाळेतलं आमचं पहिलं नाटक 'पांडवप्रताप' हे मांडके सरांनी बसवलं होतं आणि त्यात मी शकुनीमामाची भूमिका केली होती. ती शाळेतच गाजली. म्हणजे कशी-तर लहान व मोठ्या वर्गातली मुलं, शिपाई, शिक्षक मला कायम मामा म्हणून हाक मारायला लागली. यश किंवा प्रसिद्धीची ती पहिली तोंडओळख होती.


पाचवीसहावीत मी एक छोटे १० मिनिटांचे बिरबल बादशहाच्या गोष्टीवरचे नाटुकले केले होते आणि पुस्तकातल्याच एका धड्याचे नाट्य रूपांतर केले होते. महत्त्वाचे म्हणजे ही दोन्ही रूपांतरे माझी मीच केली होती. आणि सादरही आम्हीच कोणाही मोठ्यांची मदत न घेता केली होती. या एवढ्या भांडवलावर 'भरत'मध्ये घेतील असं वाटलं होतं. पण तेव्हा तो योग नव्हता.

यथावकाश दहावी झालो. अकरावी म्हणजे रेस्ट इयर असं उगाचच डोक्यात बसलं होतं.

त्या वर्षीच्या जुलै-ऑगस्ट महिन्यात पुन्हा एकटाच 'भरत'मध्ये धडकलो.

'भरत'चं ऑफिस. तिथे बाबूराव विजापुरे, विनायक गोडसे, शरद भिडे आणि बाबा साठे ही मंडळी गप्पा मारत बसली होती. दाखवायला आणलेल्या मुलीसारखा मी दारात उभा होतो. माझी शैक्षणिक, कौटुंबिक, नाट्यविषयक चौकशी सगळ्यांनी केली. एकमेकांकडे पाहिलं. थोडा वेळ शांतता. तो शांततेचा काळ अगदी जीवघेणा - हे काय म्हणतात? प्रवेश मिळेल की नाही? मी नर्व्हस.

मग बाबुराव म्हणाले. तू संध्याकाळी शाळा, कॉलेज, अभ्यास झाला की येत जा आणि मला भेट. मी तुला काय करायचं ते सांगेन. मी एकदम खुश. सायकलला टांग मारून घरी निघालो. डोक्यात नाटकाचेच विचार - नादात सायकल चालवत होतो आणि उपाशी विठोबाशी सायकल घसरून जोरदार आपटलो - चांगलाच खरचटलं. कोणत्याही क्षेत्रात किंवा कामात सावधगिरीने वाट चालायची असते, आंधळेपणानं नाही, याची परमेश्वरानं मला तिथेच जाणीव करून दिली. मी सावध व शांत झालो आणि रोज संध्याकाळी सातच्या सुमाराला 'भरत'मध्ये जाऊ लागलो.



## शारदा

दोन-तीन दिवसांनी बाबुरावांनी मला एक वाक्य वाचायला सांगितलं. नाटक होतं 'शारदा' आणि भूमिका नोकराची-गोरक्षाची. वाक्य एकूण दोन. पैकी दीड वाक्य झाल्यावर नायक वाक्य तोडत असे. बाबूरावांच्या तालमीचा मात्र मला खूप उपयोग झाला. हाड अन् हाड दिसणाऱ्या त्या कृश देहात किती अफाट ताकदीचं स्वरयंत्र होतं ते मला जाणवलं. गाणाऱ्या पात्रापेक्षा गद्य भूमिका वेगळी कशी असते याची जाणीव झाली. माझ्या त्या दीड वाक्यासाठी बाबूराव माझ्यावर रोज अर्धा तास खर्च करीत. ते वाक्य त्यांना हव्या असलेल्या स्वरानेच सुरू करायचे असे, अर्थवाही शब्दावर जोर कसा द्यायचा - वाक्याचा शेवटचा स्वर काय असला पाहिजे जेणेकरून नंतर बोलणाऱ्याची भावना त्याला पूर्णांशानं सहज व्यक्त करता येईल. हे, ते सातत्यानं करून घेत. आजही मला आश्चर्य वाटतं की, त्या दीड वाक्यासाठी मी रात्री साडेनऊ ते दीड दोन वाजेपर्यंत तालमीत बसून असे. पण तो वेळ अजिबात वाया गेला नव्हता. कारण जर एखादं पात्र, मग ते स्त्री किंवा पुरुष कोणाचंही असो, ते आलं नसेल तर मी पुस्तक घेऊन त्या जागी उभा राहायचो आणि जणू ती भूमिका मीच करतो आहे अशा पद्धतीने वाचायचो. बाबूरावांचा तसा आग्रहच असायचा. आणि असं करता करता पूर्ण शारदा नाटक मी एकपात्री करू शकेन इतपत तयार झालं. बाबुरावांनी माझ्यातली गुणवत्ता ओळखली होती. मात्र ते शब्दानं कधी तसं दर्शवित नसत.

मात्र एका प्रसंगानं मला त्यांच्या माझ्यावरच्या प्रेमाची आणि विश्वासाची जाणीव झाली.

## ड्रॉपर्स

'भरत'मध्ये त्यावेळी केवळ पारंपरिक नाटक करणारी मंडळीच होती असं नाही; तर 'ड्रॉपर्स' नावाची नवनाट्य, स्पर्धा नाट्य करणारी परंपरेपासून थोडी हटकर असणारी संस्था 'भरत'मध्ये विसर्जित झाली होती. त्यामुळे त्या संस्थेच्या सर्वश्री अनंत कान्हो, सुधीर मुंगी, दिलीप कोल्हटकर, डॉ. श्रीधर कानिटकर अशा अगदी आधुनिक वळणाच्या मंडळींचा राबताही 'भरत'मध्ये होता. आणि त्यांनी 'राजाचा खेळ' ही एकांकिका बसवली होती. त्यात एक रिंगमास्टर आणि सात विदूषक होते. मी जिम्नॅस्टिक्स् नॅशनल खेळलेलो. त्यामुळे स्टेजवरील कसरती, करामती मी पार पाडायचो. एकांकिका उत्तम व्हायची. पण याच वेळी काही कारणांनी ड्रॉपर्स पुन्हा 'भरत'मधून वेगळी झाली. मलाही त्यांची नाटकं आवडली होती. त्यामुळे मीही त्यांच्या ग्रुपमध्ये काम करायला लागलो. आणि 'भरत'मधले छोटे रोल टाळायला लागलो.

एक दिवस बाबूरावांनी अशा वागण्याबद्दल माझी व्यवस्थित कानउघडणी केली आणि समजावलं. ''अरे, ९० वर्षांची परंपरा असलेल्या संस्थेत तू काम करतोयस. काम छोटं का मोठं हे महत्त्वाचं नाही, तुझ्या मागे उभी असलेली पूर्वजांची पुण्याई महत्त्वाची आहे.''

त्या दिवसापासून आजतागायत 'भरत'मधलं कुठलही काम मी मानापमानापासून दूर ठेऊन करत आलो. त्याचा फायदा झाला. बाबूरावांनी इतर कोणाची समजूत घातली नाही, हेही महत्त्वाचं. पुढे मी दोन्हीचा समन्वय साधला. ड्रॉपर्स कडून राजाचा खेळ, क्रांती, आदि नाटकांमध्ये कामं केली.

## आदरस्थान

इथे एक फार महत्त्वाची घटना पहिल्यांदाच अनुभवली. माझे आदरस्थान अनंत कान्हो. आम्हा नवीन मुलांना एक नाटक वाचून यायला सांगत. त्या नाटकावर साधकबाधक चर्चा जुने नवे सदस्य करत. त्यावर आम्हाला आमची मतं मांडावी लागत. प्रत्येक व्यक्तिरेखेचं शब्दांकन करावं लागे आणि आठ दिवसात त्या नाटकातील पंधरा मिनिटांचा प्रवेश बसवून सादर करावा लागे. यात मी वि. वा. शिरवाडकरांचं 'बेकेट' नाटक निवडलं आणि त्यातला प्रसंग बसवला. आधीच चर्चेत बोलल्याप्रमाणे तो प्रसंग वठला. अपेक्षेपेक्षा चांगला झाला. सर्वच बुजुर्गांनी शाबासकी दिली. माझ्या दिग्दर्शनाचा पाया तिथे घातला गेला. आजही अनंत कान्होंचा आमचा आत्मविश्वास वाढवणारा दिवस माझ्या स्मृतीतून जात नाही.

पुढे कॉलेजमध्ये 'पुरुषोत्तम'ला 'राजाचा खेळ' मी पुन्हा सादर केलं. काही थोडेफार बदल आणि काही अनुकरण याचं ते मिश्रण होतं. पण नाटक पहिल्या नवात निवडलं गेलं नाही. तीनही परीक्षकांना मी कारण विचारलं. कारण मला एवढं नक्की माहीत होतं की स्पर्धेच्या चौकटीत ते नक्कीच उजवं होतं. पण सर्वांची उत्तरं वेगवेगळी आली. तेव्हा मला एक धडा मिळाला की स्पर्धा निर्णय जाणकारांपेक्षा, प्रेक्षागृहातील हजार

माझ्या त्या दीड वाक्यासाठी बाबूराव माझ्यावर रोज अर्धा तास खर्च करीत. ते वाक्य त्यांना हव्या असलेल्या स्वरानेच सुरू करायचे असे, अर्थवाही शब्दावर जोर कसा द्यायचा - वाक्याचा शेवटचा स्वर काय असला पाहिजे जेणेकरून नंतर बोलणाऱ्याची भावना त्याला पूर्णांशानं सहज व्यक्त करता येईल. हे, ते सातत्यानं करून घेत.

खुर्च्यांपैकी तीनच खुर्च्या ठरवत असतात. आणि तो त्यांचा अधिकार असतो. आपला नाटकाचा आनंद निकालाशी निगडीत असेल तर दु:खच होतं. त्या दिवसापासून मी कोणत्याही स्पर्धेच्या कुठल्याही निकालाबाबत उत्सुकता दाखविली नाही की मनापासून मला आनंद, दु:ख झालं नाही.

### बाबूराव विजापुरे

मात्र बाबूरावांची बोलण्यावरची कमांड, अनंत कान्होंचं टायमिंग आणि नाट्यवस्तूचा एकूणातील विचार. या पहिल्या दिवसात 'भरत'ने आयोजित केलेलं डॉ. जब्बार पटेल यांचं नाट्यशिबिर, ड्रॉपर्समुळे झालेल्या अनेक मान्यवरांच्या गाठीभेटी, पं. सत्यदेव दुबे यांचं तिथेच मिळालेलं अनौपचारिक मार्गदर्शन या सगळ्या संचिताचा ठेवा अगदी पहिल्या दिवसांतच माझ्या हाती लागला आणि एक उत्तम वळण आपोआप मिळत गेलं. नाट्यक्षेत्र हे अनेक कारणांनी भल्याबुऱ्या चर्चेत असतं, पण या दोनही संस्थांतल्या प्रत्येकाने माझ्या संपूर्ण निर्व्यसनीपणाचा, अभ्यासू वृत्तीचा आदरच केला आणि माझ्या मार्गापासून मला ढळू दिलं नाही. व्यसनांची भलावण करणारे लोक त्या उमेदवारीच्या काळात माझ्या आसपास नव्हते, ही देवाची कृपा!

पुढे बाबूराव विजापुरे स्वर्गवासी झाले आणि एक दिवस अचानक मला भरतचे तेव्हाचे कार्याध्यक्ष प्रभाकर करंदीकर म्हणाले, आज मिटिंगमध्ये ठरलं आहे, पुढचं संगीत नाट्य महोत्सवाचं नाटक तू बसवायचंस. बापरे! म्हणजे हे काय, एक टप्पा पार झाला, कसा कधी ते कळलंही नाही. पुढे गेल्यावर पुन्हा मागचे दिवस आठवतात. त्या आनंदात मन रमतं; पण काळ तुम्हाला मागे जाऊ देत नाही, त्याची चाहूलही लागत नाही.

म्हणूनच एका वळणावर मागे पाहताना आपलं पहिलेपण, तसंच ताजं, हसरं, निखळ, खट्याळ जसं होतं ना तसंच दिसतं.

१३५८, सदाशिव पेठ, गद्रे चेंबर्स, पुणे -३०

---

## माझी आवडती दहा पुस्तके स्पर्धा निकाल

### ४ डॉ. अरुणा रांगणेकर

| | |
|---|---|
| १. स्मरणगाथा | गो. नी. दांडेकर |
| २. डॉ. आयडा स्कडर | वीणा गवाणकर |
| ३. नामाचा गजर | लीला गोळे |
| ४. अग्निपंख : डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम | माधुरी शानभाग |
| ५. मृत्युंजय | शिवाजी सावंत |
| ६. स्वामी अपरान्ताचा | डॉ. लीला दीक्षित |
| ७. युगंधर | शिवाजी सावंत |
| ८. ययाति | वि. स. खांडेकर |
| ९. श्रीमान योगी | रणजित देसाई |
| १०.भारताकडून आम्ही (इंग्लंडने) काय शिकावे | ह. अ. भावे |

### डॉ. आयडा स्कडर

खरं तर प्रत्येक पुस्तकाबद्दल लिहिण्यासारखं आहे पण मी डॉ. आयडा स्कडरबद्दल लिहते.

१८९० ते १९५९! केवढा मोठा कालखंड! तो आठ दहा ओळीत बसवला तरी या काळात घडलेल्या इतिहासाचा आवाका प्रचंड आहे.

वीस वर्षाची तरुण आयडा १८९० मध्ये अमेरिकेहून हिन्दुस्तानात येते ती मनाविरुद्धच! त्यानंतर इथल्या लोकांची, खास करून स्त्रियांची परिस्थिती पाहून त्यांतल्या त्यांत प्रसूतीत होणारे मृत्यू पाहून - आपला बेत बदलते. डॉक्टर व्हायला ती अमेरिकेत जाते खरी पण परत येण्याकरताच! तिने पेरलेल्या बीजाचा आज जो वटवृक्ष झालाय तो पहाता चमत्कार माणसाच्या हातून सुद्धा होतात हे सिद्ध होत.. वेलौरचे Christian Medical College व त्याच्याशी संलग्न हॉस्पिटल चिकित्सा जगतात मानाचं स्थान पटकावून आहेत.

आजच्यासारख्या आधुनिक सोयी नव्हत्या. ॲनस्थेशिया सुद्धा प्रगत नव्हता परंतु तरी त्यांतूनही मार्ग काढत, वेळप्रसंगी उघड्या जागी झाडाखालीसुद्धा ऑपरेशन्स करत तिने कित्येक लोकांना जीवदान दिलं.

गेल्या महिन्यात वेलौर हॉस्पिटलमध्ये गेले असता ठिकठिकाणी 'इडा आंटी'चे फोटो लागलेले दिसले. हे त्यांच्याबद्दल लोकांना वाटणाऱ्या आदरांच व प्रेमाचं प्रतीक नाही का? मी एकच म्हणेन की 'जे का रंजले गांजले त्यासी म्हणजे जो आपुले
तोचि साधु ओळखावा, देव तेथेंची जाणावा'
म्हणूनच डॉ. आयडा स्कडरचं दिव्यत्व जिथे प्रचीतीला आलं, तेथे कर माझे जुळती.

---

'सौरभ'
ई/३, १८९ अरेरा कॉलनी,
भोपाळ ४६२ ०१६.

# फोटोग्राफीतले 'एक्सलंट' दिवस

## अजित धर्माधिकारी

"तुला जगायचं असेल तर नोकरी सोडावीच लागेल.'' डॉक्टरांनी निर्णायक वाक्य टाकलं आणि मग मात्र खरंच विचार करण्याची वेळ आली. ती वेळ अशी होती की आता नोकरीही नाही आणि दुसरा पर्यायही दिसत नाही. केमिकल फॅक्टरीतल्या नोकरीने फुफ्फुसे बाद करून तिचा इंगा दाखवून दिला होता. मग हातात काहीही नसताना नोकरी सोडली. अंधारात टाकलेली उडीच होती ती! नकळत पहिलं पाऊल वळलं ते जुन्या छंदाकडे, अर्थात फोटोग्राफीकडे! या क्षेत्रात पहिलं पाऊल पडलं मात्र आणि 'मराठी पाऊल पडते पुढे' या बाण्याने पुढे पुढे पडतच राहिलं. तिथे सुरू झालं होतं एक्सलंट फोटोज्!

बाळाचे पाय पाळण्यात दिसतात असं म्हणतात. अगदी पाळण्यात नाही; (तेव्हा पायावर पांघरुण होतं ना...) तरी कॉलेज जीवनात आमच्या या भविष्याची चाहूल लागली होती. चोर जसा आधी स्वत:च्या घरापासून चोरीला सुरुवात करतो, त्याप्रमाणे अस्मादिक स्वत:च्याच घरच्यांचे फोटो, घरीच चोरलेल्या कॅमेऱ्यानं चोरून काढायचे. पुढे कॉलेज जीवनात मित्रांच्या मदतीकरता हा छंद चांगलाच बहरला आणि आता तर काय? I have got licence to shoot people !

सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे संघर्षाच्या काळात काळोखातच उडी मारलेली होती. एक टुकार कॅमेरा सोडता आधुनिकच काय, पण पौराणिक उपकरणंही नव्हती. कलरचं काय? black & white TV ही नव्हता. कारण ती चैन परवडण्यासारखीच नव्हती. भाड्याचा व्हीसीआर वापरून केलेल्या पहिल्या डबिंग-एडिटिंगला कित्येक आठवडे लागले होते. तरीही ऑर्डर मिळवून, कॅमेरा मिळवून व्हिडिओ शूटिंग व फोटोग्राफीची कामं करायचो. एकदा तर डोंबिवलीला ऑर्डर होती आणि तिकडे कॉलऱ्याची साथ आलेली होती. मलाही उलट्या, जुलाब सुरू झाले. तरीही कॅमेरा धरला. उलटी करून यायचो आणि परत काम चालू. येतानाचं ट्रेनचं रिझर्व्हेशन झाले होते. तरी काम संपल्या-संपल्या आर्थिक तोट्याचा विचार न करता टॅक्सीने घरी आलो.

माझी पत्नी - स्वाती, हिलाही व्हिडिओ शूटिंग आणि फोटोग्राफी शिकवलं. खास महिलांच्या समारंभासाठी तिला ऑर्डर्स येऊ लागल्या. लग्नसमारंभात व्हिडिओ शूटिंग करणारी ती पुण्यातली पहिली महिला आहे याचा आम्हाला अभिमान वाटतो. तिची त्याबद्दल मुलाखतही झाली आणि कृतज्ञतापूर्वक नमूद करावंसं वाटतं की स्टेट बँक ऑफ इंडिया सारख्या संस्थेने तिचा सत्कारही केला.

या साऱ्या वाटचालीत कडू-गोड अनुभवही आले. मला स्वत:ला कुणाची साथ, किंवा आर्थिक पाठबळही नव्हतं. शून्यापेक्षा 'मायनस'मधून सारा व्यवसाय उभा केला. पण आम्ही मात्र खूप जणांना हे काम शिकवून, स्वत:बरोबर घेऊन पुढे नेलं, स्वत:च्या पायावर उभं केलं. त्यात कुणी असाही निघाला ज्यानी स्वत:पुरतं शिकून ऐन कामाच्या वेळेला दगा दिला.

मला तो प्रसंग आठवतो. दोन ऑर्डर एकाच दिवशी होत्या आणि सहायकांनी ऐनवेळी दगा दिला. स्वाती एका ठिकाणी गेलेली होती. शिवाय एक व्हिडिओफोटो जॉब होता. पण एक्सलंट काम म्हणजे कामात तडजोड नाही. मग मी स्वत: व्हिडिओ आणि फोटो दोन्ही केलं. माझी चार वर्षांची मुलगी लाईट धरण्यासाठी आली होती. आता तर माझा मुलगाही स्वेच्छेने फोटो काढायला येतो.

तो दीड वर्षांचा असताना घडलेला प्रसंग आहे.

त्याला हॉस्पिटलमध्ये सलाइनवर ठेवलेलं होतं आणि आम्हा दोघांनाही

**फोटोग्राफीतले**

कामं होती. तरीही कामं उत्तमरीत्या पूर्ण करूनच आम्ही दवाखान्यात गेलो. कारण - आधी लगीन कोंढाण्याचे...! स्वातीच्या कार्यालयात हे कळल्यावर तर त्यांनीच तिला लवकर जाऊ दिलं.

**बक्षीस**

अशी चांगली लोकंही खूप भेटली. आम्ही दोघंही असलो, तर



**स्वाती - अजित धर्माधिकारी**

आग्रहानं जोडीनं जेवायला बसवणारेही खूप आहेत. कामाची पद्धत आणि गुणवत्ता, फोटोचा दर्जा पाहून ठरलेल्या दरापेक्षाही जास्त 'बक्षीस' म्हणून घ्या किंवा 'आहेर समजून घ्या.' असं म्हणणारेही भेटले. कामाला वेळेपूर्वी पोचण्याच्या आमच्या सवयीमुळे कित्येकदा असही झालंय की देवक बसलंय किंवा घरचा आहेर द्यायचाय, पण ओवाळायला नातेवाईक मंडळी अजून आलेली नाहीत, मग ते स्वातीलाच ओवाळायला सांगायचे. एवढी लग्नं, मुंजी करताना आपल्याच कामात गुंतून न राहता आजूबाजूला लक्ष ठेवल्यामुळे आम्हाला भटजींचे मंत्रही पाठ आहेत आणि अगदी मुलीचा उखाणा लिहिलेला कागद हरवला, तरी आम्ही हवे तेवढे उखाणेही सांगू शकू अशी परिस्थिती आहे.

**विनोद**

कधीकधी मोठे विनोद देखील घडतात. सप्तपदीच्या वेळी भटजी मुलाला मुलीच्या खांद्यावर हात ठेवायला सांगतात. साधारण अनुभवाने, बघून, ऐकून हे सगळ्यांना माहित असतं. भटजींकरता तर हे नेहमीचंच असतं, त्याही दिवशी भटजी नवऱ्या मुलाला मंत्रांच्या प्रवाहात म्हणाले - (नाकात वाचा) - 'खांद्यावर हात ठेवा ऽ' आणि त्या मुलाने भटजींच्याच खांद्यावर हात ठेवला. उपस्थितांमध्ये एकच हशा पिकला. असंच एकदा मुलानं हार घालताना धक्का लागून मुलीचं गंगावन खाली पडलं आणि बॉयकट नको त्या वेळी उघडा पडला.

**हिशेब**

एकदा एका पार्टीनं जेवायला बसलेल्या प्रत्येक न् प्रत्येक माणसाचं शूटिंग घ्यायला लावलं. ते बघायला कंटाळवाणं होईल, कॅसेट उगीच लांबेल वगैरे समजावूनही आपला हट्ट त्यांनी सोडला नाही. नंतर एकांतात त्यांनी सांगितलं की ते म्हणतात तेवढीच पानं झाली आहेत याचा पुरावा त्यांना हवा होता. एकदा मला अजिबात बरं नसल्यामुळे आमच्या माणसाला एका ऑर्डरसाठी पाठवलं होतं. त्या मर्दानं आमच्या माणसाला तलवारच दाखवली - 'मला धर्माधिकारी पाहिजेत. तू का आलास?'

कित्येकदा काही ठराविक माणसं सतत पुढेपुढे किंवा खरंतर मधेमधे, करत असतात. कुणालाच त्यांची तिथे गरज नसते. पण त्यांना कुणी काही बोलूही शकत नसतं. अशावेळी पार्टीशी बोलून आम्ही बरोबर काम साधतो. प्रत्येक फोटोत आपण असलेच पाहिजे असा त्यांचा आग्रह असतो. तेव्हा आम्ही बरोबर ट्रिक करतो. कॅमेरा त्यांच्यावर रोखून धरतो. पण आम्ही कंपोझ केलेल्या फोटोच्या फ्रेममध्ये मात्र ते नसतात.

एकदा एका लग्नात घरचा आहेरच चोरीला गेला. शेवटी पोलिसात तक्रार करण्यापर्यंत ते आले होते. पण आमच्या कॅमेऱ्यानं



**भर दुपारी १२ वाजता पूर्ण उमललेले ब्रह्मकमळ**


संशयास्पद हालचाली टिपल्या होत्या. यजमानांशी बोलल्यावर त्यांनी तपासलं आणि सगळा आहेर त्याच माणसाकडे निघाला आणि तो माणूस नात्यानं अगदी जवळचा होता. असेही काही किस्से घडतात.

### स्वत:शीच स्पर्धा

इतक्या वर्षांनंतर आता फोटोग्राफी इतकी नसानसांत भिनली आहे की दुसरा फोटोग्राफर कसा येतो, बसतो, कॅमेऱ्याची बॅग कशी धरतो यावरून त्याचे फोटो कसे येतील हे सांगू शकतो.

दोन तपांचा दांडगा अनुभव असला तरी आजही मी सतत कामात नावीन्य शोधत असतो. नवनवे प्रयोग करत असतो.

आता अत्याधुनिक उपकरणं तर हातात आहेतच, शिवाय उगवत्या तंत्रज्ञानावर नजर ठेवून असतो. काळाबरोबर बदलायला




**एक्सलंट फोटोज्‌ची बलस्थाने**

हवं आणि नवं तंत्रज्ञान आत्मसातही करायला हवं. स्पर्धकांबरोबर तुलना करायचीच झाली तर केवळ दरांची नाही, तर गुणवत्तेची आणि इक्विपमेंटस्‌चीही. आधुनिकातलं आधुनिक आपल्याकडे असायला हवं. त्यांनं काम सोपं झालं तरी कलाकाराला कधीही मरण नाही हे माझं ठाम मत आहे. स्वयंचलित कॅमेरा घेऊनही आपली प्रतिभा दाखवता येते.

आणि शेवटी स्पर्धा तरी कुणाशी असते? - स्वत:चीच स्वत:शी. कालच्यापेक्षा आजचं काम मी अधिक चांगलं करतो आणि ज्याला स्वत:शिवाय स्पर्धकच नाही, त्याला हरण्याचं भय का असेल?

'एक धागा सुखाचा, शंभर धागे दु:खाचे!' याप्रमाणे सगळ्यांचं एकास शंभर हे प्रमाण नसलं तरी सगळ्यांच्या आयुष्यात दु:ख हे असतंच आणि आनंदही असतो. ते दु:ख पचवण्यासाठी जगण्याचे, आनंदाचे क्षण लांबवण्याचं काम आपण करतो. लग्नासारख्या गोष्टी (भारतात तरी, आणि अजूनपर्यंत तरी) एकदाच होत असतात. त्यामुळे ते क्षण एक्सलंट रित्याच साठवले गेले पाहिजेत. एक्सलंट फोटो नजरेसमोर तरळतो आणि मनात विरघळतो. कुठल्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी संधी व्हायला हवी आणि झाल्यावर कॅप्चर करता यायला हवी. नैसर्गिक शॉट टिपायला समयसूचकता हवी आणि मुख्य म्हणजे आपली कुंडली आपणच मांडायला हवी. त्यासाठी स्वत:वर ठाम विश्वास हवा. संधी तर प्रत्येकाकडेच येते. मात्र ती ओळखायला आणि पकडायला ॲपर्चर ओपन ठेवून कॅमेरा तयार असायला हवा.

### अभूतपूर्व प्रगती

या क्षेत्रातही आता खूप प्रगती होते आहे.

जड व्हिडिओ कॅमेरा खांद्यावर घेऊन शूट करायचे दिवस आता गेले. unipod आले, unipod, tripod stand आले.

या संदर्भात एक दुर्दैवी अनुभव आठवतो. आमचा माणूस एका लग्नात डॉलीवर ठेवलेल्या hydraylic gear असलेल्या सर्वोत्कृष्ट स्टँडवर कॅमेरा लावून नेहमीप्रमाणे शूटिंग करत होता. आदल्या दिवशी सीमान्त पूजनाला यावर कसलाही आक्षेप घेतला गेला नाही, अन् दुसऱ्या दिवशी मात्र कुणाच्या तरी कान फुंकण्यावरून ऑर्डर देणारा माणूस मोबाईलवर फोन करून माझ्याशी हुज्जत घालायला लागला की तुमच्या माणसाला शूटिंग जमत नाही म्हणून तो स्टँड वापरत आहे. त्यानी हातावरच, पण कॅमेरा अजिबात न हलवता काम करावं म्हणून तो भांडत होता. हातावर कॅमेरा घेण्यापेक्षा स्टँडवर स्टेबल शूटिंग करणं चांगलं हे ज्यांना पटत नाही त्यांच्याशी बोलताना खरंच मनस्ताप होतो. उलट तो दिवस आता दूर नाही जेव्हा सर्रास सगळे स्टँड आणि ट्रॉलीवरच कामं करतील. जसे वाईट अनुभव आले तशीच देवमाणसंही भेटली. खूप मोठमोठी लोकं जवळून बघायला मिळाली. लालूच दाखवणाऱ्या संधीही आल्या. भरपूर पैसा देणारी पण खूप वेळ मागणारी कामंही आली. पण मुद्दाम ठरवून अशी कामं घेतली नाहीत. स्वत:ला, मुलांना वेळ दिला. आयुष्याला, जगण्याला प्रथम प्राधान्य दिलं. या गोष्टीचा खूप अभिमान आहे. पत्नीची साथ तर लाभलीच, पण माझ्या गुणग्राहक सासूबाई श्रीमती विजया देविदास फडणीस यांचं नावही आदरयुक्त कौतुकानं नमूद करावंसं वाटतं. त्यांनी नेहमीच प्रोत्साहन दिलं. वेळोवेळी कौतुक केलं आणि कायमचं खंबीरपणे पाठी उभ्या राहिल्या.

असा हा स्वत:ला आणि लोकांनाही आनंद देणारा व्यवसाय. आपलं काम प्रामाणिकपणे करणं परमेश्वराची सेवा करण्यासारखंच आहे. तीच आमची पूजा आहे. असं हे एक्सलंट काम करण्याचा साधा मंत्र आहे -

अजित म्हणे स्वस्थ न बसावे,
जे जे होईल ते ते टिपावे,
खिशी असू द्यावे समाधान, समाधान!

# गिर्यारोहण क्षेत्रातील जादू गवसली आणि-

## उषःप्रभा पागे

**१९७० च्या आसपास माझ्या गिर्यारोहणाची सुरुवात झाली. त्यावेळीही हा छंद सरसकट लोकांना परिचित नव्हता. त्यामुळे जनमानसांत प्रतिकूलता नसली तरी फारशी अनुकूलताही नव्हती. थोडीफार उदासीनता किंवा तटस्थताच होती म्हणाना! या छंदाला फारशी प्रतिष्ठा नव्हती. पण गडकिल्ले भटकणाऱ्यांविषयी क्वचित कौतुकाचीही भावना असे.**

भटकन्ती करणाऱ्या आमची तशी फारशी दखल कोणी घ्यायचं नाही. पण गिरिभ्रमण वेडाचा ज्वर चढलेल्या आम्हाला त्याची फारशी फिकीरही नव्हती. इतरांना आमचं जग अनोळखी होतं. ओळख करून घ्यावी असंही ते त्यांच्या दृष्टीनं फारसं महत्त्वाचं नव्हतं. आमचं जग त्यांच्यापेक्षा निराळं होतं. त्यात झपाटलेले आमच्यासारखेच फक्त एकमेकांना जवळचे वाटायचो.

'वेडांत दौडले वीर मराठी सात' तसे आम्ही सह्याद्रीच्या कैफांत होतो. तरुण वय आणि आवडीचं क्षेत्र, त्यामुळे पहिल्यापासूनच मला त्यात चांगली गती होती.

अंगकाठी अनुकूल म्हणजे अंगाची 'काठी'च होती. सडसडीत अंग, त्यामुळे चपळाई होती. वृत्ती धाडशी होती. त्यामुळे चढायला, उतरायला चालायला काहीच प्रत्यवाय नव्हता.

डॉ. बापूकाका पटवर्धनांसारखे मार्गदर्शक होते. आनंद पाळंदे सारखे सह्याद्रीचे अभ्यासक होते. सह्याद्रीची नकाशासह खडान्खडा माहिती मिळत होती. गो. नी. दांडेकरांचा 'गडदाचा बहिरी' सारखा एखादा लेख ठिणगीचं काम करायचा.

सुरुवातीच्या या काळात तैलबुद्धीचा एकपाठी रवी अभ्यंकर इंजिनियरिंगचा अभ्यास असतानाही निमित्ते मिळताच भ्रमन्तीला बाहेर पडायचा. मलाही तसा कोणताच अडसर नव्हता.

मी तेव्हा पुण्याच्या रेडिओवर निवेदक होते. शिफ्ट ड्युटी असे. आठवड्यांतला कोणताही एक वार साप्ताहिक सुटी असायची. सुट्टीच्या अलिकडे सकाळची शिफ्ट आणि पलिकडे संध्याकाळची शिफ्ट अशी ड्युटी अरेंज करून दोन ड्युटींमधल्या अवधीत आम्ही गड, किल्ले किंवा घाटवाटा तुडवायला बाहेर पडायचो. खायचे घरातले अगदी साधे पदार्थ किंवा डाळ, तांदूळ, दाणे, गूळ, चिक्की असे बरोबर असे. पाठीवर पिट्टू असे.

ट्रेकिंगसाठी सॅक ही चंगळ होती. ती आम्हाला परवडत नसे. आज सरसकट ट्रेकिंगला अत्यंत सोईच्या भरपूर कप्पे असलेल्या, वजनाला हलक्या, तऱ्हेतऱ्हेच्या सॅक्स मिळतात. त्यावेळी तशा नव्हत्या. परदेशांतून आणलेली अशी सॅक क्वचित कोठे पाहिली की आम्हाला तिची फार 'असोशी' वाटे. तसंच हंटरशूज नवे वापरणं म्हणजे अगदी श्रीमंतीचं लक्षण वाटे. जुन्या बाजारांतून जुना पिट्टू आणि वापरलेले किंवा सेकंड क्वालिटीचे हंटर शूज मिळत. आम्हाला तेच कसेबसे परवडत. माझ्या पायाच्या मापाचा शूज मिळणं अवघड असे. मग मी एक साईज मोठ्ठा असे शूज वापरी. या ढगळ बूटांमुळे मी कितीतरी वेळा पडायची. पण शूज योग्य त्याच मापाचे घ्यायचं किती वर्षे सुचलं नाही. आजकाल शूज किंवा बूटांमध्ये किती सोयी, व्हरायटी, रेंज आहे तशी त्यावेळी नव्हती.

शिवाय आमचे आदर्श होते बापूकाका. गिर्यारोहणांतलं ते एक शिखरच होते. ते जुनेच खाकी कपडे-हाफ पॅन्ट, बाह्या दुमडलेला शर्ट शिवून शिवून वापरत. कधीमधी धुवत. अल्युमिनचा लहान थाळा, प्लेटिंग केलेला मग आणि ॲल्युमिनचं पातेलं त्यांच्या पिट्टूत कायम असे आणि चहा, साखर, मिल्क पावडरच्या पुड्या, कापडी पुरचुंडीत बांधलेल्या



असत. जुनापाना फोल्डिंग स्टोही ते जवळ ठेवीत. पेट्रोल म्हणजे चहा ट्रेकिंगमध्ये तीनदा ते करीत. तो सगळ्यांना हवा तेवढा प्यायला मिळे. ते एक रिच्युअल चं होतं. आणि ट्रेकर्स त्याचं मनोभावे पालन करीत. मी मात्र चहा न पिणारी होते.

## धर्म

आजकाल टुरिझममध्ये केवढे चोचले पुरवले जातात खाण्यापिण्याचे, राहण्याचे, आरामशीर बेडच्या खोलीचे! तेव्हा तसं काही नव्हतं. श्रमाची आणि कष्टाची ट्रेकर्समध्ये प्रतिष्ठा होती. बापूकाका स्वावलंबनाचे धडे द्यायचे. काटकसरीचा एक टोकाचा आदर्श होते. त्यांच्यामुळे थोडक्या, कमीत कमी खर्चामध्ये ट्रेकिंगची सवय आम्हाला लागली. त्यांच्याबरोबर ट्रेकिंगमध्ये शिस्तीचं पालन करायला लागे. त्यांतही फटी शोधून आम्ही खूप मजा करायचो. तेही सामील व्हायचे.

मिलिटरीमध्ये ते डॉक्टर होते आणि ठार बहिरे होते. निवृत्तीच्या या काळात त्यांनी 'गिर्यारोहण' हा धर्म मानला, त्याचंच पालन केलं. मरेपर्यंत त्यांनी त्यांच्या अनुयायांना या विषयाचं मार्गदर्शन केलं. संध्याकाळ झाली की एखाद्या गावाबाहेरच्या देवळांत किंवा उघड्यावरच मुक्कामाचा पडाव व्हायचा. गावकऱ्यांना मुक्कामाचा त्रास देणं बापूकाकांच्या नियमात बसत नसे. पाणी कोठे आहे ते विचारून ट्रेकर स्वत:च पाणी आणत. जळणासाठी काटक्या, सरपण गोळा करायचे. आधी चहा मग त्याच पातेल्यांत खिचडी करायची. कमीतकमी साधनांत भागवायचे, असा बापूकाकांचा खाक्या असे.

प्रत्येकाला ते काहीना काही विशिष्ट आणि समर्पक नाव देत असत. ते नावच त्या व्यक्तीचा परिचय असे. मी मादाम चँग होते. गिर्यारोहकाच्या प्रेमात पडून लग्न केलेली हेमा पार्वती होती, तर मंजिरी पत्त्यातल्या राणीसारखी दिसे म्हणून ती क्वीन.

आळीपाळीनं प्रत्येकाला ग्रुप लीड करावा लागे. मुक्काम सोडताना ती जागा स्वच्छ करावी लागे. पेटलेली आग पूर्ण विझवावी लागे. ट्रेकिंगच्या वाटेत कोठे मध्येच एखादे वाहन भेटले की वाटे लिफ्ट घ्यावी, पण बापूकाकांचा याला सक्त विरोध असे. ठरलेल्या बेतात बदल सहसा होत नसे.

मला आठवते की एका पडावावर पोचल्यावर जोराचा पाऊस आला होता. तर हा बाबा काही जागा सोडून आडोशाला गेला नाही. पाण्याची उधळपट्टीही त्यांना मान्य नसे. ज्या काळांत पाण्याची विपुलता होती, त्या काळातही त्यांनी गरजेप्रमाणे आणि गरजेइतकेच पाणी वापरायची शिस्त घालून दिली.

## गावकऱ्यांशी जवळीक

बापूकाकांबरोबर सुरुवात झाल्यानंतर ट्रेकिंगमध्ये माझे कितीतरी ग्रुप झाले. आम्ही मुक्कामाच्या ठिकाणी शक्यतो देवळांत किंवा शाळांत उतरायचो. मी गावकऱ्यांशी आवर्जून बोलायची. आम्ही त्यांच्या वेगळे, वरचे नाही, त्यांच्यातलेच आहोत हे त्यांना जाणवावे अशी माझी धडपड असे. दिवसभर खूप चालून आणि चढून दमून आल्यावर पुन्हा पाण्यावर जाणे काहीवेळा जीवावर यायचे. मग शेजारच्या घरातून पाण्याचा हंडा वा घागर आणायचो. देऊळ जवळ नसेल आणि वस्ती अगदी चार घरांचीच असेल तर आम्ही वस्तीवरच एखाद्या झोपडीत वा खोपट्यांत राह्यचो. अर्थातच मालकाच्या संमतीनेच.

आम्हा सगळ्या ट्रेकर्समध्ये मुलगी बहुश: मी एकटीच असे. त्या खास सवलतीचा उपयोग करून मी त्या घरातल्या आतल्या अंगाला असलेल्या चुलीपर्यंत जात असे आणि आमची खिचडी त्यावरच आम्ही शिजवत असू. जेवताना घरातल्या छोट्यांना, छोटे नसतील तर मालक-मालकिणीला बरोबर जेवायला बोलवत असू. ही सुशिक्षित, पांढरपेशी मंडळी अशी पायपीट का करतात ते त्यांना लक्षात येत नसे; पण ही मंडळी आपल्यामध्ये आपल्यांतली होऊन एक रात्र राहिली याचा त्यांना आनंद वाटे. आम्ही त्यांची आवर्जून ओळख ठेवायचो. नंतर जाणाऱ्या सवंगड्यांना त्यांच्याकडे जायला बजावयचो. अशी कितीक मंडळी आम्ही जोडली आहेत. कित्येकांचे आम्ही ऋणी झालो आहोत. माणुसकीचे हे ऋण थोडेच फेडता येते? त्यांच्या ऋणात राहणेच योग्य.

## किल्ले

किल्ल्यावर मुक्काम असे तेव्हा तर काय आमचेच राज्य. बहुतेक सगळ्या किल्ल्यांवर केव्हाना केव्हा मुक्काम झाला आहे. त्या किल्ल्यांवरच्या मुक्कामांनी अतीव आनंदाचे क्षण आम्हाला दिले. मी आणि माझ्याबरोबर असलेले डोंगर भाऊ, आमच्यातला समान धागा म्हणजे निसर्गाचे आणि साहसाचे प्रेम. पण त्या समान धाग्यामुळे आम्ही एकमेकांशी एकात्म होऊन जायचो.

रतनगडावर आम्ही दोघेतिघेच होतो. एकाखेपी रतनगडाच्या थोड्या खालच्या पांखीवर देवीचं देऊळ आहे आणि त्याशेजारच्या गुहेत आमचा मुक्काम आहे - समोर भंडारदऱ्याचा अफाट जलसंचय पसरला आहे. नीरव शांतता, दूरात कोठेतरी चमकणारे दिवे, मानवी संस्कृतीची चाहूल सांगताहेत. पौर्णिमेचा चंद्र वरवर येतो आहे आणि त्याचं प्रतिबिंब धरणाच्या पाण्यात पडलं आहे. चंद्रप्रकाशाचा पदर पाण्यावर पसरलेला, पाण्याच्या चंचलपणामुळे डहुळला जातो आहे. याचं गारुड पडलेले आम्ही तिघंचौघं, या सौंदर्याचे या घटकेचे या ठिकाणाचे साक्षीदार फक्त आम्ही!

## रायरेश्वर

पावसाळ्याच्या एका मोसमात मुंबईच्या गिरिविहार क्लबचा रायरेश्वरला ट्रेक होता. आंबवण्याला बसनं उतरलो आणि पावसाला सुरुवात झाली. जोरदार पावसामुळे आम्ही थांबलो. तासाभरानं

पाऊस थोडा थांबला आणि आम्ही निघालो; पण वाटेत गुडघ्याइतकं पाणी वहात होतं. रायरेश्वराच्या 'चढा'वरूनही पाणी खाली वाहात होते. गार गार वाऱ्याची एखादी जोरदार झुळूक आली की पावसाचा पडदा सरकायचा; पण भिजल्या अंगावर गार वाऱ्याची जोरदार झुळूक, थंडीनं अंग काकडत होतं. आम्ही मंदिरात पोहोचलो. तेव्हा पावसाचा जोर ओसरला. मंदिरामागच्या खोप्यांत स्टो पेटवून चहाची तयारी सुरू झाली. सॅकमधले प्लॅस्टिकमध्ये गुंडाळलेले पण सर्द झालेले कपडे अंगावर चढवले. ओले कपडे, देवळाच्या सोप्यांत दोरी बांधून त्यावर टाकले. गरम पेय पोटात गेल्यावर थंडी कमी झाली. ४-५ कार्यकर्ते खिचडीच्या तयारीला लागले. संध्याकाळ उतरायला लागली आणि महेशनं मेघमल्हारचे सूर आळवायला सुरुवात केली. बाहेर रिमझिम पाऊस आणि आत मेघमल्हारचे सूर, अंगावर रोमांच फुलत होते आणि मनात आनंदाचे कारंजे उडत होते. मनावर एक धुंदी आली होती. खिचडी खाऊन केव्हा झोपलो काही आठवत नाही. आठवतो तो रायरेश्वराच्या मंदिरात अंगावर झेललेला मेघमल्हार.

### वासोटा

वासोट्याचा तो प्रसंग आठवला की अजूनही अंगावरून सरसरून काटा येतो. वासोटा किल्ल्याकडे जाण्यासाठी बामणोलीला होडी करून पलीकडला तीर गाठावा लागतो. आम्ही १३ जण होतो. काही भिडू उत्तम पोहणारे होते. त्यांची टूम की मधलं पाणी पोहून पार करायचं. पोहायला येत असलं तरी येवढं पाणी पार करण्याइतकी ताकद नसलेले काहीजण आम्ही होडीत बसलो आणि ६ भिडू पोहून जायला पाण्यात उतरले. निम्मे अंतर गेल्यावर एका भिडूची दमछाक झाली आणि तो लटपटायला लागला. त्याच्या बाजूला असलेल्या दोघांच्या हे लक्षात आले आणि त्यांनी त्याला उत्तेजन दिले. सूचना दिल्या. गडी थोडा सावरला अन् पुन्हा हडबडायला लागला. बाकीच्या चौघांनी त्याला मधे ठेवले आणि दोघांनी त्याच्या बाहूंना खाली आधार देऊन त्याला पुढे रेटत रेटत एकदाचे काठावर लावले आणि सगळ्यांनी हुश्श केले. माझी मैत्रीण हेमा पट्टीची पोहणारी होती. तीही पाण्यात पोहत सुखरूप पोहोचली. तिच्या ताकदीचे आणि आत्मविश्वासाचे फार कौतुक वाटले होते.

### इंद्राई

किल्ल्यावरचा मुक्काम फार आवडायचा मला. कारण तिथे आम्हीच राजे. काड्याकुटक्या, वाळक्या फांद्या किल्ल्यावर मिळायच्या. इंद्राई किल्ल्यावर मात्र झाडी अजिबात नाही. सांबरखांडं मात्र खूप होती. निम्मीझिम्मी वाळलेली होती. ती जमा करून आम्ही जाळली होती. ती पटकन जळून जायची. आमचा स्वयंपाक कसाबसा पार पडला होता. गुहा असेल तर गुहेत नाहीतर आडोशाला आम्ही चूल पेटवायचो. एक दोघं भिडू चुलीतला जाळ सांभाळायला, एकदोघं टाक्याचं पाणी आणायला, तर एकदोघं जळण गोळा करायला जायचे. कधी कुणाला सांगायला लागले नाही. कुठले काम कधी अडले नाही. किल्ल्यावर भणाणा वारं असे, चुलीच्या उबेत बसायला सगळे धडपडायचे. कधी धक्का लागून चुलीवरचं पातेलं वाकडं व्हायचं. पाणी सांडायचं. आग विझायची. धूर व्हायचा. पुनश्च हरि ओम् किल्ल्यावर आम्ही पंचमहाभूतांच्या सहवासांत असायचो. म्हटलं तर अतिशयोक्ती नाही. मानवी स्पर्धा आणि रोजच्या जीवनक्रमाशिवाय किती वेगळेपण असायचे ते!

त्यामुळेच आमच्या व्यक्तिमत्त्वातला अस्सल, निरलंकृत आविष्कार तिथं व्हायचा. खोटेपणा, दिखाऊपणा या गोष्टींना या भटकंतीत थाराच नसे.

मी एक मुलगी, मुलांबरोबर आहे म्हणून मीही कधी कोणते नखरे केले नाहीत. अर्थात तसा माझा स्वभाव कधीच नव्हता. माझ्या 'बाईपणा'चा बाऊ मी कधी केला नाही. साप, विंचू दिसला की मुली घाबरतात, मग आपलं शौर्य दाखवायला मुलं आपलं शौर्य दाखवायला सरसावतात. पण मला कधी कशाची भीती वाटली नव्हती.

### पक्षीच पक्षी

निसर्गातल्या सगळ्या गोष्टींविषयी मला नवल वाटे. कौतुक वाटे, आपलेपणा वाटे. झाडांवरची फळे, शेंगा, फुले, कितीतरी वैविध्य सह्याद्रीच्या भटकन्तीत नजरेला जाणवे. कधी फुललेला वारस, कधी पळस, पांगारा तर कधी बहावा. कोकणातला ट्रेक असला की सागरकिनारी केवड्याच्या बनांतून केवडा दरवळायचा. पिवळा सोनटक्का तर कधी पांढरा सोनटक्का गावातून जाताना मोहवायचा.

कधी ब्लॅक बर्डच्या तर कधी कस्तुराच्या ताना कानी पडायच्या. 'पेरते व्हा, पेरते व्हा' सांगणारा पावशा, कर्कश्श ओरडत जाणारा ड्रोंगो किंवा कोतवाल श्रीवर्धनला हमखास दिसणारा हॉर्नबिल किंवा धनेश अशी वनस्पतिसृष्टी आणि प्राणी-पक्षी सृष्टीशी नकळत नातं जडून गेलं होतं.

### जंगलच्या वाटा

सह्याद्रीच्या भटकन्तीत कितीतरी वेगवेगळ्या वाटा जंगलांतून जातात. संध्याकाळ जवळ यायला लागली आणि आम्ही मुक्कामाला पोचलो नसू आणि जंगलातून मुक्कामाला नेणारी पायवाट सापडली नाही की मात्र वाढत्या अंधारात त्या जंगलाचं दडपण यायचं. ते अधिक गूढ वाटायचं. लोणावळ्याहून भीमाशंकरला जाताना असेच आम्ही भटकलो होतो. जंगलातून कसेबसे बाहेर जरा मोकळवणात आल्यावर वाहत्या झऱ्याकाठी उघड्यावरच आम्ही रात्र काढली होती.

एकदा आम्ही तिघीचौघी मैत्रिणी मिळून राजगडावर जायचं ठरवलं होतं. राजगडावर मी सगळ्या वाटांनी कितीतरी वेळा गेले होते. पण त्यादिवशी संध्याकाळी गड चढताना मैत्रिणींना दम लागत होता. वेळ लागत होता. त्यामुळे संध्याकाळ दाटून आली.

मंद चांदणंही पडलं. पण त्या मंद प्रकाशात आमची वाट मात्र चुकली. मग काय आम्ही तिघी सुवेळी माचीच्या खालच्या उतारावर वाढलेल्या गवतात बसून रात्र काढली होती. मी खूष होते, मैत्रिणी मात्र खूप घाबरल्या होत्या. त्यांचा असा हा पहिलाच अनुभव होता.

पहाट फटफटली आणि आम्हाला हुलकावणी दिलेली वाट सकाळच्या उजेडात नीट दिसली. पण त्या रात्री चांदण्यांनी लहडलेलं जे आकाश पाहिलं ते कायमचं लक्षात राहिलं.

## हरिश्चंद्रगड

हरिश्चंद्रगडाच्या कोकणकड्यावर गेलेल्यांना तो एक रोमहर्षक अनुभव वाटतो. एक ते दीड किलोमीटर अंतराच्या कंकणाकृती प्रस्तरकडा आहे. आणि खाली तळात कोकण आहे. हा कडा तीन-साडेतीन हजार फूट सरळ खाली उतरला आहे. या कड्यावरून खाली तळात डोकावून पाहताना अनेकांना भोवळ येते. खालून वारा वर येत असेल तर काय धमालच! किल्ल्यावरून फेकलेला दगड, कागद, रुमाल मुळी तळातून येणारा वारा वरवरच घेऊन जातो. खाली पडूच देत नाही. एरवी आया मुलींना बजावतात कड्यावरून डोकावू नकारे. आमच्याकडे उलट आहे माझी मुलं मला बजावतात 'आई कड्यावरून डोकावू नको हं. आम्हाला तुझी भीती वाटते.'

खरंतर निसर्गात भीती वाटावी असं काय आहे? मला तर माणसाची भीती वाटलेली आहे. एकदा सिधगड उतरून आम्ही पायवाटेनं एस.टी. थांब्याकडे निघालो होतो. तर एक दारूडा हेलपाटत वाटेवरून चालला होता. बापरे, मी जरा गडबडलेच. पण बरोबर असलेले डोंगरभाऊ न सांगता माझ्या दोन्ही बाजूनं चालत राहिले आणि नतंर मात्र साप, विंचू यांना न भिणारी बाई दारुड्याला भिते म्हणून माझी भरपूर चेष्टा केली. आम्ही खूप हसलो त्यावेळी. रात्रीच्या वेळी नंबर टू ला लांब जाताना कोणातरी डोंगरभाऊला बरोबर घेऊन त्याला निम्म्या वाटेत थांबवून, तो नजरेच्या टप्प्यांत आहे याची खात्री करून मी जाऊन येत असे.

## दोघंच हाय जणू

मधली काही वर्षं माझा भटकन्तीचा ग्रुप ठाण्याला होता. फोन सरसकट सगळ्यांकडे नव्हते. एका कोणाकडे निरोप जायचा की अमका अमका ट्रेक आहे. मी रात्रीच्या गाडीनं निघून ठाण्याला उतरते की ठाण्याच्या ग्रूपपैकी राजा, अशोक, विजू, नंदू मध्यरात्रीच मला स्टेशनवर उतरवून घ्यायला यायचे. लोकल चालू झाली की आसनगाव किंवा इगतपुरीला जाऊन माहुली किंवा अलंगकुलंग मंडणकडे आम्ही कूच करायचो. कधीकधी सगळ्यांना जमायचं नाही. राजा किंवा नाखवा किंवा कुमार कोणीतरी एकचजण बरोबर येऊ शकायचा. पण त्यामुळे कधीच काही बिघडलं नाही. डोंगर भ्रमन्तीच फक्त डोक्यात भरलेली. भलतंसलतं इतर काही उभयपक्षी कोणाच्याच मनात कधी काही आलं नाही.

ज्या वाटांनी आम्ही किल्ल्यांवर जायचो, तिथल्या वाड्यावस्त्यांतील लोकांना ४-५ मुलांमध्ये किंवा एका मुलाबरोबर एकच मुलगी याबद्दल कुतूहल असणार हे लक्षात येऊन मीच त्यांच्याशी बोलता बोलता सांगायची, तो काळेला आहे ना तो माझा धाकला भाऊ, बाकीचे त्याचे मित्र, माझे डोंगरभाऊ. एवढ्यानं त्यांचं समाधान होई.

पण केवळ शिवाजीचे किल्ले पाह्यला आम्ही एवढी पायपीट करून येतो याचे मात्र त्यांना नवल वाटे.

डोंगरावर किल्ल्यांवर जायचे ते गवत काढून आणायला किंवा वर्षाकाठी एकदा गडावरच्या देवीचा उत्सव असेल तरच जायचे एवढाच त्यांचा गडकिल्ले यांच्याशी संबंध.

एकदा राजा आणि मी दोघेच गोरखगडावर निघालो होतो. पायथ्याशी शेतात एक बाईबाप्या काम करत होते. त्यांना गडाची वाट 'पुसली', तर वाट सांगून बाईनं विचारलं, 'दोघंच हाय जणू.' मी म्हटलं, 'होय, हा माझा धाकला भाऊ आहे. आम्ही दोघंच आहोत. बाकीच्यांना जमलं नाही यायला.' तर ती बाई म्हणाली, 'धाकला भाऊ हाय व्हय, तवाच तोंडावल्यात सारखेपण हाय.' आता मोकाशींचा राजा अन् भिड्यांची उषा यांच्या तोंडवळ्यात कुठलं आलंय साम्य! पण त्या बाईचा निर्मल भाव तिच्या बोलण्यांतून प्रकट झाला.

याउलट शहरात राहणारा एक गाववाला भोरच्या एस.टी. स्टँडवर एस.टी. साठी थांबला होता. आम्हा पाचजणांना पाहून तो उद्‌गारला, ''नाटककंपनी दिसतेय तुमची!'' त्याच्या स्वरातला उपेक्षेचा भाव लक्षात आला अन् मला त्याच्या या शहरी विकृतीचा विषाद वाटला.

## ३५वर्षे भटकन्ती

साधारण १९७० सालापासून माझ्या भ्रमन्तीला सुरुवात झाली. ती सह्याद्रीपासून. सह्याद्रीतील गडकोट किल्ले, अवघड घाटवाटा तेव्हापासून माझे सुखनिधान होऊन राहिले आहेत. त्या भटकन्तीत पायपीटीचे कष्ट होते, वेळ पडेल तिथे मुक्काम करत असू. कधी गुहेत, कधी किल्ल्याच्या दरवाजाजवळच्या ओवरीत, कधी देवळांत, कधी टाक्याच्या काठांवर, कधी गोठ्यांत, तर कधी पायथ्याच्या वस्तीत, शेणानं स्वच्छ सारवलेल्या अंगणात मोकळ्या आभाळाखाली, तर कधी दगडधोंड्यांच्या पृष्ठभागावर. हे मुक्काम शारीरिकदृष्ट्या आरामदायी नव्हते. पण अत्यंत आनंददायी होते. निसर्गाच्या कुशीतले आम्ही निसर्गपुत्रच होऊन राह्यलो. कधी झऱ्याचं स्वच्छ वाहतं पाणी, कधी नदीचं, कधी किल्ल्यांवरील टाक्यांमधलं, खडकांतून झिरपून आलेलं, किंवा पावसाचं टाक्यांत साठलेलं.---

## गोड पाण्याची टाकी

सह्याद्रीतील बहुतेक गडकिल्ल्यांवर बांधकाम करताना पाण्याची सुंदर सुंदर टाकी बांधलेली आहेत. या उंचउंच दुर्गांवर अमूकजागी पाणी आहे असं त्या ऐतिहासिक काळात लोकांना कसं काय ज्ञान होतं?

किल्ल्यांवरील टाकी हा एक खरंच स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. अलंग,कुलंग या ठाणे जिल्ह्यातील किल्ल्यांवर सलग १०-१२ टाक्यांचा समूह कसा बरं खोदला असेल?

पुणे जिल्ह्यातील शिवनेरी, चावंड च्या किल्ल्यांवर ठिकठिकाणी पाण्याची कुंडं, टाकी कोरणाऱ्याच्या योजकतेचं कौतुक करावं तेवढं थोडं.

राजगडावर महाराजांचं वास्तव्य दोन तपं होतं. घोड्यांच्या पागेचं टाकं वेगळं, पद्मावतीचा मोठ्ठा तलाव वेगळा, गुंजण दरवाजानं आलं की वर पोचल्या पोचल्या अमृतासारखं पाणी आहे महार टाक्यांत. बालेकिल्ल्यावरही चंद्रकोरीचं टाकं आहे. बहुतेक ठिकाणचं पाणी थंड, गोड, स्वच्छ. अलीकडे मात्र पर्यटकांचे लोंढे विशिष्ट ठिकाणीच जात असल्यानं या पाण्याच्या साठ्यांत प्लॅस्टिक, कचरा, थर्मोकोल अशा पर्यावरण विघातक गोष्टी वाढायला लागल्या. आम्ही ट्रेकिंग केलं त्या काळात एस.टी. गाड्या मोजक्या होत्या आणि त्या शेवटपर्यंत कधीच नव्हत्या. एस.टी.तून उतरून पायी चालत किल्ल्याचा पायथा गाठावा लागे. मग चढून जायचं. मोठा ट्रेक असेल तर पहिल्या दिवशी एस.टी. तून उतरलं की सातव्या दिवशी परतीच्या वाटेवरच एस.टी. गाठून परतायचं.

## रोप वे

सह्याद्रीच्या दुर्गम डोंगररांगांवरच आपल्या पूर्वजांनी किल्ले, गड वसवले. या उंच रुद्र, राकट, अवघड सह्याद्रीच्या रांगांवर पायी जाणंही अवघड, तिथे रस्ते आणि वाहनं हे अशक्यच होतं. आता मात्र खुपशा दुर्गम भागांत किल्ले गडांच्या पायथ्यापर्यंत तरी निदान एस.टी. पोचली आहे. आतातर रायगडावर 'रोपवे'नं जाता येतं. यांत्रिक करामतीनं शारीरिक कष्टाचा मानच हिरावून घेतला. आजच्याइतकी हॉटेलं, चहाच्या टपऱ्याही खूप दुर्मिळ होत्या. 'रेडीफूड' त्यावेळी बोकाळलं नव्हतं. हाताशी असलेला वेळ आणि अंतर यांची स्पर्धाच असे.

मी सांगलीहून नोकरीसाठी पुणे आकाशवाणीवर आले. तोपर्यंत ट्रेकिंग शब्द मला माहित नव्हता. वयाच्या २५व्या वर्षी B.O.B.P Club ची रॉकक्लाईंबिंग कोर्स सिंहगडावर असल्याचं निवेदन वाचून मी लोहचुंबकासारखी तिकडे ओढली गेले. आणि भ्रमन्तीचं वेड माझ्या रक्ताच्या धमनींमधून पसरलं. तेव्हा माझं वय होतं पंचवीस. सुरुवात उशिरा झाली होती म्हणून की काय आधीच्या १०-१५ वर्षांतलं बुडालेलं डोंगर भ्रमण, मी नंतरच्या वर्षांमध्ये सव्याज फेडून घेतलं. माझ्या जीवनाला एक वेगळं वळण मिळालं. आयुष्याची दिशाच बदलून गेली.

## साहसी क्रीडा प्रकार

गिर्यारोहणाची अन माझी गाठभेट झाली तेव्हा मी नुकतीच एम.ए. प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले होते. नोकरी करीत असताना मी एम.ए. केलं. आवड म्हणून वृत्तपत्रविद्येची पदविकाही घेतली. पण गिर्यारोहण सापडल्यानंतर माझं व्यक्तिमत्त्व सांचलेपणातून, एका कंटाळवाण्या प्रांतातून मुक्त झालं. एम.ए.ला प्रथम श्रेणी मिळवल्यावर खरंतर मी पीएच.डी. चा विचार करणं स्वाभाविक होतं. पण गिर्यारोहण हा साहसी क्रीडाप्रकार आणि निसर्गाशी संबंधित छंद सापडल्यावर मला शिक्षण व्यर्थच वाटायला लागलं. नोकरी मात्र करणंच भाग होतं.

गिर्यारोहणाचा छंद आमच्या मध्यमवर्गीय अर्थस्थितीत बसणारा नव्हता. त्यामुळे रेडिओवरील निवेदकाची नोकरी सांभाळून उरलेला सर्व वेळ गिर्यारोहणाकारणी लागू लागला. शिफ्ट ड्युटीला ऑफ डे जोडून तिसऱ्या दिवशी तिसरी शिफ्ट घेतली की ४८ तासांचा अवधी मिळे. मग सह्याद्रीतील ट्रेक त्या वेळात बसवायचा. ड्युटी करून धावतपळत ट्रेक गाठायचा. अन ट्रेकवरून येऊन लगेच ड्युटी वर जायचं.

याचा एक फायदा असा झाला की माझा चालण्याचा आणि चढण्याचा वेग खूप चांगला झाला. इतका की काही वेळेस नवीन मुलं बरोबर असली तर त्यांची फरफट व्हायची. कित्येक वेळा एस.टी. बसेस, गाड्यांना उशीर व्हायचा. मग घरी जाऊन कपडे बदलून ड्युटीवर जाण्याएवढा अवधी मिळायचा नाही. ट्रेकच्या कपड्यांत मळक्या, गबाळ्या वेषांत, हंटर शूज मध्येच ड्युटीवर जावे लागे. चांगले कपडे, खूप कपडे हे आमच्या 'कोड'मध्ये बसत नव्हतं. तेवढा वेळही, फुरसतही नसे.

माझे जाड आणि बऱ्यापैकी लांब केस. या केसांचे या ट्रेकिंगमधल्या भटकंतीत फार हाल झाले. केस फारच जाड होते. जटा खूप व्हायच्या. मी खसाखसा त्या विंचरायची, केसांची, त्वचेची निगा वगैरे माझ्या तत्त्वांत बसत नव्हतं. थंडीच्या दिवसांत फारफार तर व्हॅसलिन लावायचं. सारखं उन, वाऱ्यांत, उघड्यावर भटकून त्वचा काळवंडायची, फुटायची. पण त्याची तमा नव्हती.

## गडदाचा बहिरी

खरंतर वाचायची मला यापूर्वी फार आवड होती, पण गिर्यारोहणानं आयुष्याचा रिकामा अवधी इतका व्यापून टाकला, की वाचनाला जास्त वेळ मिळेना. सह्याद्री, हिमालय यांविषयी वाचन आवर्जून व्हायचं. किल्ल्यांची माहिती, उल्लेख जिथे जिथे मिळे तिथून तिथून नोटसमध्ये उतरवलं जायचं. भा.इ. संशोधन मंडळांत जाऊन तिथली गॅझेटिअर्स वाचून सह्याद्रीतील नैसर्गिक परिस्थिती, वनस्पती, प्राणी, प्रेक्षणीय स्थळे, गडकोट किल्ले यांची सविस्तर नोंद पाहता येई. या दरम्यानच केव्हातरी किर्लोस्कर मासिकांत प्रसिद्ध झालेला गो. नी. दांडेकरांचा 'गडदाचा बहिरी' लेख वाचनात आला. त्या नाथपंथीयांच्या देवस्थानी स्त्रियांना जायला परवानगी नाही, हेही वाचलं. अन ताबडतोब तिथं जायचं मनानं घेतलं.

ढाकच्या किल्ल्याच्या बाहेरील अंगाच्या उभ्या चढावर खडकाच्या पोटात दोन गुहा आहेत. पहिल्या गुहेत थंडगार पाण्याची दोन टाकी आहेत. जवळच भिंतीलगत शेंदूर फासलेला बहिरी आहे. पुढ्यांत भक्तांनी वाहिलेले शूल आहेत. गुहेची उंची आठ ते दहा फूट आहे आणि सतरा-अठरा फूट लांबी तर रुंदी असेल सात-

आठ फूट. पाण्याच्या टाक्यांतच मोठ्ठाली भांडी टाकलेली आहेत. देवाला येणारे लोक बकरं खांद्यावर घेऊन येतात. बहिरीला बळी देतात आणि इथंच शिजवून 'प्रसाद' खातात. तो 'प्रसाद' शिजवण्यासाठी ही पातेली कायमची इथल्या टाक्यांत टाकून ठेवली आहेत. इथं यायची वाट रूढ अर्थानं थोडी अवघड म्हणावी. अशी डावीकडे डोंगरधार, उजवीकडे सह्याद्रीतला ढाक किल्ल्याचा विस्तार, दोन्ही मध्ये खिंड, खिंडीच्या डाव्या हाताला प्रस्तर सुळका उंच गेलेला. बहिरीच्या देवळाबाहेर ठेवलेली दीपमाळच जणू. खिंडीतून २५-३० फूट घळीतून घसरत यायचं. खालच्या प्रस्तरावर पाय टेकून उभे राहिले की खाली अडीच ते तीन हजारफूट खडा सह्याद्रीचा उतार, झाडीनं भरलेला.

बहिरीकडे जाण्यालाही उजव्या अंगाच्या ढाकच्या बाहेरच्या अंगाच्या उतारावरचा आडवा प्रस्तर काळजीपूर्वक पार करून चाळीस-पन्नास फूटांनंतर उजवीकडे वर चढायला खडकांत कोरलेल्या पायऱ्या आहेत. हातानं आधार घ्यायला खोबणी आहेत. दहा-पंधरा फूटांवर दगडाच्या खोबणीत उभं केलेलं वाळकं खोड आहे. मागच्या प्रस्तराला टेकून, त्याच्या आधारानं ते उभं आहे. त्याच्या फांद्यांच्या बेचक्यांत पाय देत पाच-सात फूट वर गेल्यावर त्या खोडाच्या शेंड्याला बांधला आहे कुंभाळ्याचा वेल. तो हाती धरून चढायचं, वेलाचं दुसरं टोक थोडं वर एका मेरेला बांधलेलं आहे. वेलाच्या आधारानं वर चढून आपलं पाऊल पडतं ते बहिरीच्या गडदांतच.

या अडचणीच्या वाटेनं चढून आलेला माणूस 'सुटलो एकदाचा बहिरीच्या कृपेनं' असं म्हणून बहिरीला साष्टांग दंडवत न घालेल तर नवलच! आणि आत्तापर्यंतच्या सगळ्या कष्टाचा परिहार करणारं टाक्याचं थंड, स्वच्छ पाणी. मग आठवण होते. अरे, आपण तर निम्मेच पार झालो आहोत. चढून आलेलं अंतर आपल्याला उतरून जायचं आहे. इथं यायला मला अगदी चेव यायचा. एकतर बायकांना निष्कारण निर्बंध आणि वाटेचं अवघडपण. मला खूप आवडायचं. कितीतरी नवनव्या मुलांना घेऊन मी आवर्जून गडदांतल्या (गुहा) या बहिरीला अनेकदा आलेली आहे. गुहेतून खाली सह्याद्रीचं दाट जंगल. त्या खाली कोकणांतील भातशेतीची हिरवी खाचरं आणि त्याहीपलिकडे पुणे-मुंबईची रेल्वेलाईन दिसायची. कड्यावरच्या घरट्यांत ये-जा करणारे ससाणा किंवा गरूड यांचं संथपणे उडणे किंवा गिरक्या घेणे किंवा हवेवर नुसतंच स्थिर तरंगत राहणे असे काही ना काही दिसे.

उन्हाळा आला की खालच्या जंगल आणि त्यापुढील भातखाचरांच्या सीमेवर फुललेले पळस, पांगारा किंवा काटेसांवर अग्निज्वालेसारखे दिसत. रेल्वेलाईनवरून एखादी गाडी नागिणीसारखी वळसे घेत धुरांच्या रेघा हवेत सोडत जाताना दिसे. अशा ठिकाणी वाटणारच ना की इथले राजे आपण आणि हा बहिरी!

### तीन दगड

अलंग, कुलंग, मंडण हे तीन गड म्हणजे कळसूबाईच्या क्षेत्राचे अनभिषिक्त सम्राटच. कळसूबाईचं शिखर सर्वोच्च पण सम्राटपद मात्र नि:संशय या तिघांचेच. अलंगच्या चढावर त्या चढाईच्या आव्हानानं आनंदानं फुलून आलेल्या माझ्या मनातील आनंद वेगवेगळ्या रूपांत अभिव्यक्त व्हायचा. कधी आवडती गाणी ओठावर येत.

पुढे माझ्या लहान मुलांना घेऊन मी ट्रेकिंगला गेले की मला वाटे आपल्यासारखंच त्यांनाही सह्याद्रीचं वेड लागावं. मुलांना सह्याद्रीचा निसर्ग खूप आवडला; पण सह्याद्रीत करावं लागणारं साहस झोकून देणं त्यांना आवडलं नाही. आणि ते पेलायसाठी शारीरिक कष्टाची त्यांची तयारी नाही. त्यामुळे मोक्याच्या अवघड जागी माझ्या ओठांतून गाणं बाहेर पडलं की मुलं मला रागवायची. 'इथं आमचा जीव तोंडात आलेला आणि तुला गाणं सुचतंय.'

चित्रकाराचा मुलगा चित्रकार किंवा गायकाचा मुलगा एकवेळ गायक होईल पण गिर्यारोहकाची मुलं गिर्यारोहक होतील असं अजिबात नाही. हा एक महत्त्वाचा धडा मला मिळाला.

### भ्रमणाची श्रीमंती

या डोंगरभ्रमन्तीमुळं मी मात्र खरंच खूप श्रीमंत झाले आहे असे मला वाटते. किती संपन्न, जिवंत, अस्सल अनुभव आणि आनंदाचे कण यामुळे माझ्या वाटेला आले आहेत. या व्यवहारी, हिशेबी दिखाऊ जगाला कोलून आणि टांग मारून मी कित्येकदा डोंगरदऱ्याखोऱ्यांच्या आश्रयाला गेले आहे. व्यवहार न जमल्यानं व्यवहारी जगानं कित्येकदा रक्तबंबाळ करणाऱ्या जखमा दिल्या. त्या चिघळल्या असत्या तर मी संपलेच असते. नशिबाचेही तडाखे बसले, असे की उभे राहता येऊ नये. पण प्रत्येकवेळी मला या डोंगरांनी, तिथल्या निसर्गानं आधार दिला. फुंकर घातली. कणखरपणा दिला. मी पराजित झाले नाही. गिर्यारोहणावर इंग्रजीतून फार उत्तम साहित्य निर्माण झाले आहे. त्यांनीही कितीतरी वेळा मनाला उभारी दिली आहे. मला ते मराठीत अनुवादित करायचे आहे.

भ्रमन्तीमध्ये शारीरिक क्षमतेच्या, वयाच्या मर्यादा नक्कीच पडतात पण या भ्रमन्तीतूनच निसर्ग निरीक्षण म्हणजे त्यातील प्राणी, पक्षी, झाडे, वेली, झुडुपं, फुलं, रानफुलं यांच्या अभ्यासाचा छंद विकसित झाला. निसर्गअभ्यासाचं अत्यंत व्यापक क्षेत्रच माझ्यापुढं खुलं झालं. ताडोबा, नागझिरा, दांडेली, भीमाशंकर, कान्हा, पचमढी इथला बहुविध निसर्ग, हिमालयातील निसर्ग या सगळ्यांचा आस्वाद घेता आला. डोंगरमित्र तर कित्ती मिळाले! आमचं मैत्र व्यवहारापल्याडचं, स्वार्थापलीकडचं होतं. त्यात कधी काही 'हीण' आलंच नाही.

हिमालयात पतीचा अपघाती मृत्यू झाला. नंतर हिमाखाली गाडला गेलेला त्याचा तंबू शोधण्यासाठी हिरा पंडित, जगन्नाथ राऊळ, विजया गद्रे असे सगळेजण धावून आले. माझ्या सख्ख्या भावंडांचा, आई-वडिलांचा भक्कम पाठिंबा मला लाभला.

छंदाची सुरुवात झाली तेव्हा मी माझ्या मामा-मामींकडे राहिले होते. रेडिओतली नोकरी तेव्हा शिफ्टमध्ये होती, उरलेल्या वेळी या छंदापायी मी घरी, कोणत्याच कार्यक्रमासाठी उपस्थित नसे. त्याचा विषाद त्यांना वाटला तरी ही करते आहे ते काहीतरी वेगळे आहे आणि त्यात वाईट काहीच नाही हे जाणून त्यांनी कधीही मला प्रतिबंध केला नाही. माझ्या या छंदाचं श्रेय या सर्वांकडे जाते.

**जीवनशैली**

या छंदामुळे माझी जीवनशैली ही काहीशी निराळी झाली. माझ्या घरा भौतिक साधनसंपत्ती, सुविधा तुलनेनं कमी आहेत. घर चकाचक नाही. दिखाऊ साधनांचा वापर कधी केला नाही. त्यामुळे साध्या राहणीचे संस्कार मुलांवरही झाले आहेत. छंदाला पूरक असा फोटोग्राफीचा छंद मी जोपासला. त्यावर खर्चही खूप केला. पण माझ्या संग्रहातले फोटो मला पुन:प्रत्ययाचा आनंद देतात. त्या आनंदाची मोजदाद कशी करणार?

माझी दोन्ही मुलं चांगली फोटोग्राफी करतात. इकॉलॉजिकल सोसायटीचे डायरेक्टर श्री. प्रकाश गोळे हे 'चिरंजीवी निसर्ग आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन आणि संवर्धन' यावर एक अभ्यासक्रम राबवतात. निसर्गानुकूल जीवनशैलीची भलावण करणारा हा अभ्यासक्रम मी आणि माझी मुलं तिघांनी पूर्ण करणं हे किती स्वाभाविक होतं. सेंद्रिय शेती हा विषय मुलीनं पीएच.डी.साठी निवडला आहे. तर मुलगा वाइल्ड लाईफ सायन्स मध्ये एम.एस्सी. करतो आहे.

भोवताली सर्वभर चाललेली भौतिक उन्नती (?), घसरणारी मूल्यं, प्रसारमाध्यमांची अनिष्ट स्पर्धा आणि निसर्गाचा ऱ्हास या गोष्टींचा विषाद नक्कीच वाटतो आणि निसर्गच यातून वाट दाखवील असा भरवसाही वाटतो.

सम्राज्ञी सोसायटी, ५८, लोकमान्य कॉलनी, पौड रोड, कोथरुड, पुणे ३८

## माझी आवडती दहा पुस्तके स्पर्धा निकाल

### ५ वि. ग. शिंदे

| | |
|---|---|
| १. हसत जगावं | रमा मराठे |
| २. कार्यरत | डॉ. अनिल अवचट |
| ३. माझा साक्षात्कारी हृदयरोग | डॉ. अभय बंग |
| ४. झोंबी | डॉ. आनंद यादव |
| ५. बलुतं | दया पवार |
| ६. नॉट विदाऊट माय डॉटर | बेट्टी महमूदी |
| ७. सिटी ऑफ जॉय | डॉमिनिक लापिअर |
| ८. वाईज अँड अदवाइज | सुधा मूर्ती |
| ९. आय डेअर | किरण बेदी |
| १०.गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज | अरुंधती रॉय |

**वाईज अँड अदरवाइज**

हा सुधा मूर्ती यांच्या छोटेखानी लघुनिबंधाचा/लघुलेखांचा संग्रह फारच उत्तम आहे. समाजकार्यानिमित्त भ्रमण करणाऱ्या लेखिकेला भेटलेल्या व्यक्तींचे चित्रण आणि प्रसंगाचे चित्रण फारच प्रांजळ असल्याने मनाला खूपच भावते. यातून हळूवारपणे काढलेला निष्कर्ष खूपच उद्बोधक वाटतो. वाचका शेजारी बसून गुजगोष्टी कराव्यात अशी निवेदन शैली वाटते. प्रवासवर्णन/निसर्गवर्णन याना दिलेला फाटा उल्लेखनीय आहे. थोडक्यात लेखिकेला सांगावेसे वाटणारे सर्व काही अत्यंत मुद्देसूदपणे सांगण्याची कला अवगत आहे. प्रत्येक सुजाण नागरिकाने स्वत: वाचून आपल्या सर्व कुटुंबियांना वाचायला लावावे असे हे पुस्तक आहे. मूल्यशिक्षणासाठी यातील बराचसा भाग घेण्यासारखा आहे.

'विश्वास' सरनोबतवाडी,कोल्हापूर ४१६ ००४.

### वि. दा. पुंडे

| | |
|---|---|
| १. स्वातंत्र्य संग्राम :शांत आणि अशांत | वि. स. वाळिंबे |
| २. शामची आई | साने गुरुजी |
| ३. चार शब्द | पु. ल. देशपांडे |
| ४. मी विजेता होणारच! | उमेश कणकवलीकर |
| ५. Reminiscences of the Nehru Age | M. O. Mathai |
| ६. सत्तावन्न ते सत्तेचाळीस | वि. स. वाळींबे |
| ७. इतिवृत्त | ह. मो. मराठे |
| ८. छावा | शिवाजी सावंत |
| ९. स्वामी | रणजित देसाई |
| १०.अग्निपंख | ए.पी.जे.अब्दुल कलाम |

**झोंबी**

मला आवडलेल्या पुस्तकांमध्ये ग्रामीण जीवनांचे दर्शन घडणाऱ्या कथा, कादंबऱ्या आणि कविता भावतात.

आनंद यादव यांचे झोंबी ही आत्मकथा ग्रामीण जीवन अजूनही बदललेले नाही याची साक्ष देते. आपल्या बालपणीची कथा सांगत असतांना केवळ कडुगोड अनुभवाचे दर्शन न होता सुंदर ललित कलाकृती झाली आहे. माझ्यापुढे जे उभे रहाते ते कधी स्वस्थ करणारे, कधी अस्वस्थ करणारे, कधी सुखवणारे, तर कधी खूप दुखवून जाणारे - नाना प्रकारच्या भाववृत्तींचा कल्लोळ करणारे एक शब्दशिल्प.

८४ अशोक नगर,पोस्ट ऑफिसजवळ,नांदेड ४३१६०५.

# लोकसेवेच्या इच्छेतून प्रशासकीय क्षेत्राकडे

## संजय चव्हाण

**शब्दांकन : उत्तरा पंडित**

प्रशासकीय अधिकारी म्हटलं की सामान्यपणे मनात संमिश्र भावना निर्माण होतात. सर्वप्रथम आपण संशयाने पाहतो. समाजात खोलवर रुजलेल्या भ्रष्टाचाराबद्दल सर्वप्रथम बोट दाखवले जाते ते प्रशासकीय अधिकाऱ्यांकडेच. कोणतेच काम पैशाशिवाय होत नाही असा एक दृढ समज आपल्या मनात वसलेला असतो. ज्यांच्या नियमबद्ध चौकटीपुढे आपण हात टेकलेले असतात असे हे पद. असेही अनेकदा वाटत असते - ही देखील माणसेच आहेत तुमच्या-आमच्यासारखी हे आपण विसरलेलो असतो.

आणि म्हणूनच प्रशासकीय अधिकारी म्हणून करिअर निवडणे ही एक तारेवरची कसरत झालेली आहे. तुम्हाला एकाचवेळी लोकांचा विश्वास संपादन करायचा असतो आणि लोकप्रतिनिधींनी आखलेल्या योजनांची अंमलबजावणीही करावयाची असते. विविध स्तरांवर वेगवेगळ्या भूमिकांमधून काम करण्याचे प्रचंड मोठे आव्हान प्रशासकीय अधिकाऱ्यापुढे असते. यातील अनेकजण खरोखरच लोकांसाठी काम करण्याची आच असलेले असतात. पण त्यांना ठराविक यंत्रणेतूनच काम करावे लागते.

पुण्याचे उपजिल्हाधिकारी संजय चव्हाण हे यातीलच एक. राजकीय पार्श्वभूमी असलेल्या घरातील हा मुलगा. आजोबा गणपतराव चव्हाण हे स्वातंत्र्यसैनिक सातारच्या प्रतिसरकार निर्मितीमध्ये त्यांनी भूमिगत लोकांसाठी काम केले होते. संजय चव्हाण यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील निरा नदीच्या काठचे भोळी गाव. वडील रामरावही आजोबांप्रमाणेच राजकारणात व समाजकारणात सक्रीय. ते तालुका काँग्रेसचे अध्यक्ष होते. पण स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पुढील काळात गढूळ झालेल्या राजकारणात पडण्यापेक्षा प्रशासकीय सेवेतूनच लोकांच्या सेवेचे कार्य करावे असे संजय चव्हाण यांना वाटले आणि त्यांनी त्यानुसार पावले टाकायला सुरुवात केली. ८९ पासून एम.पी.एस.सी. च्या परीक्षा देण्यास सुरुवात केली. ९१ साली बी. कॉम. एल्एल्. बी. झालेल्या संजय चव्हाण यांची सेल्स टॅक्स इन्स्पेक्टर म्हणून नियुक्ती झाली.

त्यांच्या वाटचालीची व पहिल्या दिवसांची कहाणी त्यांच्याच शब्दांत ...

'माझ्या नोकरीची सुरुवात पुण्याला सेल्स टॅक्स खात्यात झाली. या नोकरीत तोचतोचपणा होता. ॲसेसमेंट ऑर्डर्स काढणे, व्यापाऱ्यांकडून बॅलन्सशीट घेणे, रिटर्न्स घेणे, नोटिसा काढणे, रिकव्हरी करणे वगैरे... हे काम अगदी रुटीन काम होते. त्यात वेगळे, आव्हानात्मक काहीही नव्हते. या कामात सर्वसामान्य लोकांमध्ये मिसळण्याची संधी नव्हती. तसेच आपण काम केलेल्या कामाची पावती मिळण्याचीही संधी नव्हती. मला अशा ठिकाणी कायमचे राहायचे नव्हते. त्यामुळे आठ तास काम करून जो पगार मिळायचा ती स्कॉलरशिप समजून त्या आधारावर पुढच्या करिअरसाठी मी ऑफिस सुटल्यावर जवळच्याच गोखले इन्स्टिट्यूटच्या लायब्ररीत जाऊन अभ्यास करत असे.

### पद मिळवले

या आधारावर मी राज्यस्तरावरची परीक्षा दिली. मुलाखतीत यशस्वी होऊन मला अपेक्षित असलेले उपजिल्हाधिकारी हे पद मिळाले. पुण्यात १९९५ मध्ये दोन वर्षांसाठी नेमणूक झाली. पहिल्या वर्षी फाऊंडेशन कोर्स करत असताना तलाठी, मंडल अधिकारी, तहसिल, पोलिस स्टेशन, कोर्ट या सर्व शासकीय कार्यालयात काम कसे चालते याचा अभ्यास केला. यानंतर पहिले पोस्टिंग म्हणून माझी तहसीलदार अशी नेमणूक झाली.

पुढे वर चढत चढत माझे ध्येय मी गाठले. पुण्यात उपजिल्हाधिकारी म्हणून काम करत असतानाच मला माझ्या कामाचे खरे स्वरूप कळले. प्रत्येक जिल्ह्याला जिल्हाधिकारी आणि उपजिल्हाधिकारी असतो हे मला माहीत होते. पण उपजिल्हाधिकाऱ्याचे काम काय, त्याच्या मर्यादा कोणत्या याची जाणीव प्रत्यक्ष काम करायला सुरुवात केल्यावर झाली.

**प्रशासकीय यंत्रणेचे स्वरूप**

ब्रिटिशकाळात प्रशासकीय यंत्रणा अस्तित्वात आली. पण त्यावेळी त्याचे स्वरूप मुख्यत्वे कायदा व सुव्यवस्था राखणे असे होते. नियंत्रणात्मक प्रशासन अशा स्वरूपाची ती व्यवस्था होती. महसूल गोळा करणे, कुठे बंड झाल्यास त्याचा बिमोड करणे अशा प्रकारचे हे काम होते. स्वातंत्र्यानंतर मात्र प्रशासनाचे स्वरूप बदलून ते विकासात्मक झाले. आता 'डेव्हलपमेंट ॲडमिनिस्ट्रेशन' ही कल्पना राबवायची होती.

प्रशासनाची ही नवी संकल्पना आल्यावर, आपले सरकार आल्यावर, लोकांच्या प्रशासनाकडून अपेक्षा वाढल्या. प्रशासनाचे तीन आधारस्तंभ मानले गेले आहेत : कायदे करणारी संसद, ते राबवणारे सरकार व प्रशासनात काही कायदेशीर अडचणी आल्यास त्रुटी राहिल्यास ते सोडवणारी न्याययंत्रणा. स्वातंत्र्यानंतर भारतात घटनेने दिलेल्या निर्देशांप्रमाणे कायदे करण्यासाठी लोकप्रतिनिधी आहेत. कायदा राबवण्यासाठी प्रशासनिक यंत्रणा सक्षम होती. परंतु, आता कायद्याच्या अंमलबजावणीत लोकप्रतिनिधींचा सहभाग लोकसभा, राज्यसभा विधानमंडळ या रूपाने वाढला. काही वेळा लोकप्रतिनिधींचा कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये हस्तक्षेप होऊ लागला. कायद्याची किंवा धोरणांची, योजनेची अंमलबजावणी करीत असताना लोकप्रतिनिधींचा सहभाग वाढू लागला. त्यांचा अंमलबजावणीबाबतचा दृष्टिकोन काही वेळा कायद्याच्या चौकटीपेक्षा विस्तृत व भिन्न असतो. स्थानिक प्रश्नांचाही त्यात अंतर्भाव होऊ लागला. अशा वेळी कायदा आणि लोकप्रतिनिधींच्या अपेक्षा यांची योग्य ती सांगड घालून मार्ग काढावा लागतो.

खरे म्हणजे यंत्रणा तीच दीडशे वर्षांची जुनी होती. सर्व खात्यांमध्ये महसूल खाते हे प्रशासनाचा कणा समजले जाते. पण इतर खात्यांना पैसा पुरवणे एवढेच उद्दिष्ट न राहता विकासाचा दृष्टिकोन त्यात रुढ झाला. यंत्रणा दीडशे वर्षे जुनी असली तरी स्वातंत्र्योत्तर काळात सकारात्मक दृष्टीने लोकप्रतिनिधींचा सहभाग व कायदा ह्या दोहोंचा मेळ घालायचा होता.

**प्रशासकीय अधिकाऱ्याचे स्थान**

प्रशासन अधिकाऱ्याला एखादे काम करताना तीन स्तरांवर आघाडी लढवावी लागते. सर्वसामान्य लोकांची त्यांचे दैनंदिन जीवन सुरळीत चालावे यासाठी कामे व्यवस्थित व वेळेवर व्हावी अशी अपेक्षा असते. त्या त्यांच्या अपेक्षा पूर्ण होण्यासाठी काम करताना प्रशासन अधिकाऱ्याला लोकप्रतिनिधींचे म्हणणे ऐकणे जरुरीचे असते आणि कायद्याची चौकट उल्लंघली जात नाही हेही पाहणे अत्यंत महत्त्वाचे असते. लोकशाही शासनप्रणालीत प्रशासन अधिकाऱ्याचे स्थान दुय्यम असते आणि तो कायदा राबवणारा अधिकारीच ठरतो असे मला जाणवते.

तो जर स्वत:ला मोठा मानू लागला तर प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यात संघर्ष निर्माण होतो. एकूण तसं म्हणाल तर ही तारेवरची कसरत असते आणि सर्व बाजूंनी खंबीर प्रशासन अधिकाऱ्याने ती उत्तमपणे पार पाडणे अभिप्रेत आहे. प्रशासन अधिकारी कायद्याची अंमलबजावणी करताना त्यात सुधारणा जरूर सुचवू शकतो. कारण त्याला प्रत्यक्ष अडचणींची कल्पना असते. परंतु जोपर्यंत या सुधारणा शासन स्वीकारत नाही तोपर्यंत जुन्याच कायद्यांची अंमलबजावणी आम्हाला करावी लागते. उपजिल्हाधिकारी म्हणून काम करताना मला ह्या सर्वांचा अनुभव आला.

उपजिल्हाधिकारी हे पद फार प्रशासन यंत्रणेतील मध्यम स्तरावरील पद आहे. आव्हानात्मक काम मात्र बरेच असते. गंमतीची गोष्ट अशी की एरवी लोक आणि लोकप्रतिनिधी यांच्या कात्रीत सापडलेल्या आम्हा जिल्हाधिकाऱ्यांचे निवडणुकीच्यावेळी महत्त्व वाढते. रिटर्निंग ऑफिसर म्हणून काम करताना मात्र आमदार, खासदार किंवा इतर लोकप्रतिनिधी, पक्ष या सर्वांपेक्षा निवडणूक आयोग व आमचे विहित कर्तव्य श्रेष्ठ व महत्त्वाचे असते.

उपजिल्हाधिकाऱ्याची भूमिका प्रसंगानुरुप बदलते. अशांतता निर्माण होऊन कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास आम्हाला एक्झिक्युटिव्ह मॅजिस्ट्रेट म्हणून प्रसंगी कडक भूमिका घ्यावी लागते, तर कल्याणकारी योजना राबवताना थोडेस हळवे, लवचिक व संवेदनशील व्हावे लागते.

माझ्या आयुष्यातही असे बरेच प्रसंग आले. त्यावेळी गडहिंग्लजमध्ये मी प्रांताधिकारी होतो. तिथला उचंगी धरणप्रकल्प लोकविरोधामुळे बराच रखडून पडला होता. मी प्रत्यक्ष जाऊन लोकांशी बोललो. त्यांच्या तक्रारी, समस्या ऐकून घेतल्या. लोकांच्या मनात असलेल्या प्रकल्पाविषयीच्या व पुनर्वसनाविषयीच्या शंका त्यांना

उपजिल्हाधिकाऱ्याची भूमिका प्रसंगानुरुप बदलते. अशांतता निर्माण होऊन कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास आम्हाला एक्झिक्युटिव्ह मॅजिस्ट्रेट म्हणून प्रसंगी कडक भूमिका घ्यावी लागते, तर कल्याणकारी योजना राबवताना थोडेस हळवे, लवचिक व संवेदनशील व्हावे लागते.

विश्वासात घेऊन दूर केल्या आणि लोकांची सहमती मिळवून तो प्रकल्प कार्यान्वित केला. प्रकल्पग्रस्त रहिवाशांना शब्द दिला आणि कामाला गती मिळाली. काम करताकरता समाजसेवा करण्याच्या उद्देशाने मी प्रशासनिक सेवेत शिरलो होतो. हाती अधिकार आल्यावर मी माझे अधिकार लोकांच्या हितासाठी वापरू शकलो.

### धरणग्रस्तांसाठी गुंतवणूक योजना

दुसऱ्या एका प्रकल्पाबद्दलची आणखी एक गोष्ट. धरणग्रस्तांच्या जमिनी ताब्यात घ्यायच्या व त्यांना पैसे द्यायचे एवढेच माझे खरे काम होते. परंतु, तेवढ्यावरच न थांबता मी ज्यांना पैसे मिळाले त्यांना ते योग्यतऱ्हेने कसे गुंतवता येतील याचेही मार्गदर्शन केले. यामुळे मिळालेले पैसे अनावश्यक गोष्टीत खर्च न होता योग्य प्रकारे गुंतवले गेले आणि त्याचा पुढे लोकांना फायदा झाला. त्यावेळी रु. १ लाख मासिक प्राप्ती योजनेत गुंतवले असता दर महिना ११०० रु. व्याज मिळे. मी वाटलेल्या एक कोटी रुपयातील रु. ५० लाख अल्पबचतीत गुंतवले गेले. काही हितसंबंधित व्यक्तींनी बराच विरोध केला. पण मी ती योजना ठामपणे राबवली. लोकांचे जीवन सुखकर झाले. आजही ती माणसे मला कधी भेटतात तेव्हा मी दिलेल्या गुंतवणूक सल्ल्याबद्दल समाधान व्यक्त करतात.

### जवानांच्या कुटुंबियांसाठी काम

सैनिकांच्या प्रश्नाबद्दलही मला नेहमीच असे वाटते. युद्धप्रसंगी आपल्याला जवानांचे सारखे स्मरण होते. त्यावेळी आपण त्यांचे कौतुक करतो. परंतु तेव्हा आणि एरवीसुद्धा त्यांच्या वैयक्तिक अडचणींचा आपल्याला विसर पडतो. देशाकरता धारातीर्थी पडलेल्या जवानांच्या कुटुंबाप्रती तर आपण अधिक जागरुक असले पाहिजे.

कारगिल युद्धात गडहिंग्लज तालुक्यातील बिरंजे या शहीद झालेल्या जवानाच्या कुटुंबियांची मी आगळ्या प्रकारे मदत केली. एरवी मागे उरलेल्या पत्नीला उर्वरित आयुष्य व्यतीत करणे मुष्किल होते. त्यामुळे या जवानाला मिळालेल्या पैशाची समसमान वाटणी करून त्याचे वडील आणि पत्नी यांच्या नावाने गुंतवले. दोन भूखंड त्यांच्या नावे करून दिले. वीरपत्नीला ग्रामीण रुग्णालयात नोकरी मिळवून दिली.

याखेरीज तालुक्यातील सैन्यात असलेल्या लोकांचा आढावा घेऊन ४५ लोकांना मी त्यांच्याकडून कोणताही पाठपुरावा नसताना माझ्या अखत्यारीत भूखंड दिले. आता प्लॉट वाटणे हे चौकटीत बसणारे होते; पण तरी हे काम होऊ नये असा स्थानिक लोकांकडून दबाव आला. आपल्या गावात इतर गावातल्या सैनिकांना जागा कशाला असा त्यांचा सवाल होता. परंतु, मी माझ्या भूमिकेवर ठाम राहिलो. कालांतराने लोकांना हे सैनिक त्यांच्यातलेच एक वाटले. मला अत्यंत आनंद झाला

> आपल्याकडे सत्ता असली आणि आपण चांगले काम केले की आपल्याला आत्मसमाधान मिळते. मानसन्मान मिळतो शिवाय लोकांची सेवाही करता येते. यासाठी तुम्ही त्या पदावर पाहिजे. म्हणजे तुम्हाला अधिकार प्राप्त होतात. ज्यायोगे चांगल्या योजना राबवू शकता, अनुदान देऊ शकता, महिलांना मदत देऊ शकता. अधिकाराचे पद नसेल तर इच्छा असूनही काही करता येत नाही.

### कुळांच्या वतीने प्रस्ताव

१९५७ साली तत्कालीन मुंबई राज्यात कूळकायदा व वतने नष्ट करण्याचा कायदा आला. त्यावेळी कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड तालुका मुंबई राज्यात समाविष्ट नव्हता त्यामुळे तिथे कुळकायद्याची अंमलबजावणी होत नव्हती. पुढे महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आल्यावर चंदगड तालुका महाराष्ट्रात समाविष्ट झाला. तरी तेथे जुनेच कायदे राहिले. हेरे सरंजाम जहागिरातील २४००० हेक्टर जमीन कुळे कसतच राहिली. तथापि त्यांना सदर जमिनीची मालकी मिळत नव्हती व त्यामुळे त्यांना सदर जमिनीत सुधारणा करता येत नव्हत्या. बँकेचे कर्जही मिळत नव्हते.

माझ्या गडहिंग्लज प्रान्त कारकिर्दीत श्री. नारायण राणे महसूल मंत्रीपदी असताना कुळांच्या वतीने मी एक प्रस्ताव शासनास मांडला. तो संमत झाला. त्यामुळे हजारो कुटुंबांना मालकी हक्काने जमीन मिळाली. माझ्या हातून हे काम पार पडले. यामुळे मला विशेष आनंद झाला. आपण चांगले काम केले की आत्मसमाधान मिळते. मानसन्मान मिळतो शिवाय लोकांची सेवाही करता येते. अर्थात या कामाला मर्यादाही आहेत. एकतर तुम्ही त्या पदावर पाहिजे. म्हणजे तुम्हाला अधिकार प्राप्त होतात. त्यायोगे चांगल्या योजना राबवू शकता, अनुदान देऊ शकता, महिलांना मदत देऊ शकता. अधिकाराचे पद नसेल तर इच्छा असूनही काही करता येत नाही. सेल्स टॅक्समधून इथे येण्याचा माझा हाच हेतू होता.

### दहा वर्षांतील बदल

१९९५ पासून मी प्रशासन यंत्रणेत आहे. या दहा वर्षांमध्ये प्रशासन यंत्रणेत बराच मोठा बदल झाला. संगणकाच्या वाढत्या वापरामुळे त्यात गतिमानता आली. उदा. सातबाराचे उतारे आता सहज मिळू लागले. अर्थात जुन्या लोकांनी हा बदल मान्य करायला वेळ घेतला. पण हळूहळू विरोध मावळून कामे अधिक सुकर झाली. पण या सर्वात मला जो अनुभव गाठीशी आला त्याने बरेच काही शिकवले. आपल्याला एखादी गोष्ट मान्य नसेल; किंवा आपला दृष्टिकोन


भिन्न असला तरी,पण बहुतेकांना ती गोष्ट मान्य असेल; किंवा त्यांचा दृष्टिकोन भिन्न असला तरी लोकहितासाठी ती गोष्ट स्वीकारली पाहिजे, हे कळले.

अनुभवाने कामासाठी आलेली माणसे ओळखता येऊ लागली. पूर्वी सर्वच माणसे चांगली वाटत. आता खरे-खोटे यातला भेद करता येतो. लोकप्रतिनिधींना न दुखावता त्यांच्याबरोबर कसे काम करायचे हे शिकलो. आज मोर्चे, शिष्टमंडळ यांना अधिक आत्मविश्वासाने तोंड देऊ शकतो. त्यांचे स्वागत करणे, त्यांच्या प्रतिनिधींशी त्यांना योग्य तो मान देऊन बोलणे, शांतपणे आणि सकारात्मक दृष्टिकोनातून त्यांचे म्हणणे ऐकून घेणे हे कौशल्य मी शिकलो. आपण योग्य त्या तऱ्हेने अशा प्रसंगांची हाताळणी केली की संघर्ष टळतो आणि त्यातून योग्य ते परिणाम मिळतात असे मला आढळून आले.

सत्तेची सूत्रे बदलली की लोकप्रतिनिधी बदलतात. अशा वेळी त्रास होऊ शकतो. एखादा ग्रामीण पुढारी मंत्री होतो, तेव्हा शहरी प्रश्नांची जाणीव त्यांना असतेच असे नाही. तर शहरातील नेता हा ग्रामीण प्रश्नांबद्दल अनभिज्ञ असू शकतो. पण काळ जाईल तशी अनुभवातून नव्या राज्यकर्त्यांना योग्य ती जाण येतेच. प्रशासन कायम असते हे कळते. त्यात लगेच बदल होत नाहीत हेही त्यांना कळते. परंतु लोकहितासाठी बदल करण्याची तीव्र इच्छाशक्ती असल्याने ते प्रशासनात सुसह्य बदलासाठी नेहमीच क्रियाशील असतात.

आपण काम करताना आपल्यासमोर काही आदर्श असतात. त्या क्षेत्रातले मार्गदर्शक म्हणून श्री. अविनाश धर्माधिकारी, डॉ. नितीन करीर, श्री. श्रीनिवास पाटील यांना मी मानतो.

आता यानंतरचे टप्पे म्हणजे अतिरिक्त जिल्हाधिकारी आणि जिल्हाधिकारी. मला असे वाटते की वाढत्या अनुभवाने मी अधिक सकारात्मक काम करू शकेन.'




| | | |
|---|---|---|
| **नाव** | : | **संजय रामराव चव्हाण** |
| **पत्ता** | : | 'पिनाक सदिच्छा', पौड रोड, कोथरूड पुणे ४११०२९<br>फोन - २५४६४५०० |
| **शिक्षण** | : | बी. कॉम् . एल्एल् . बी.<br>* १९९१ साली एल्एल् . बी. परीक्षेत द्वितीय क्रमांक |
| कारकिर्द | : | प्रशासकीय सेवेत १९९५ पासून उपजिल्हाधिकारी म्हणून<br>पुणे, कोल्हापूर, सांगली, सोलापूर या जिल्ह्यात काम. |


# माझी आवडती दहा पुस्तके स्पर्धा निकाल

## बापू तारदाळकर

| | |
|---|---|
| १. युगान्त | इरावती कर्वे |
| २. एक होता कार्व्हर | वीणा गवाणकर |
| ३. काजळमाया | जी. ए. कुलकर्णी |
| ४. दि आर डॉक्यूमेंट | आयर्व्हिंग वॅलेस |
| ५. दि ट्रायल | फ्रान्झ काफ्का |
| ६. गाजलेल्या प्रस्तावना | संपा. वि.ग.कानिटकर |
| ७. अन टू धीस लास्ट | जॉन रस्किन |
| ८. वटवट | पु. ल. देशपांडे |
| ९. ज्वाला आणि फुले | बाबा आमटे |
| १०.क्राईम अँड पनिशमेंट | फ्योदोर डोस्टोव्हस्की |

**गाजलेल्या प्रस्तावना**

ऑड्रे हेपबर्नला एकदा कुणीतरी विचारलं, ''तुला कॅरी ग्रँट का आवडतो?'' ती आश्चर्याने म्हणाली, ''म्हणजे? कॅरी ग्रँट आवडायला कारण असावं लागतं?''

काफ्का, पु. ल., डोस्टोव्हस्की असली माणसं आवडायला कारण लागत नाही. इरावतीबाईंना 'युगांत' मध्ये जे प्रश्न पडतात ते मला का पडले नाहीत हा विचार सतावतो पण 'वटवट' वाचताना 'मजा आला' असे वाटते. पुस्तकापेक्षा प्रस्तावनाच भन्नाट अशीही अनेक उदाहरणे असतात हे 'गाजलेल्या प्रस्तावना' या पुस्तकावरुन प्रत्ययाला आले.

हे पुस्तक आवडण्याचे मुख्य कारण असे की पुस्तकाचे रसग्रहण प्रस्तावनेच्या माध्यमातून किती सुंदरपणे करता येते ते या प्रस्तावना वाचून कळते. 'राधामाधवविलासचंपू' या ४० पानी चोपडीला राजवाड्यांनी दोनशे अडीचशे पानांची दीर्घ प्रस्तावना लिहीली ती एखाद्या पट्टीच्या फलंदाजाने 'स्लॉग ओव्हर्स'च्या मर्यादा असूनही मुसळधार धावांचा मनसोक्त पाऊस पडल्यासारखी! रियासतकारांनी लिहिलेल्या नानासाहेब पेशव्यांच्या थोरवीची मापे त्र्यं. शं. शेजवलकरांनी प्रस्तावनेत अशा धारदारपणे काढली आहेत की ग्रंथापेक्षा प्रस्तावनाच उंची गाठून गेली! नरहर कुरुंदकरांची, श्री.म.माट्यांची, अत्र्यांची, सावरकरांची या सर्वच प्रस्तावना 'रॉयल दॅन द बुक' वाटतात.


घ. नं.४२, वॉर्ड नं.४,रसना कॉर्नर, गावभाग इचलकरंजी

# असाध्य ते साध्य करिता सायास

## बाळ राणे

ऐन पंचविशीतले ते धडपडीचे दिवस. परंतु सारंच अघटित घडलं. माझ्या शैक्षणिक क्षितिजावर तांबडं फुटलं, परंतु ते प्रकाशानं झळाळून निघण्याऐवजी अचानक काळवंडलं गेलं. एम. ए.ची परीक्षा देऊन इंग्रजीचा प्राध्यापक होण्याचं ध्येय मातीमोल ठरलं. बालपणापासून अविरत चाललेली एक झुंज निकाल लागण्यापूर्वी मध्येच अकल्पितपणे संपली.

महत्प्रयासानं मी किनारा गाठला होता. समोरचा अथांग, अमर्याद सागर मला आव्हान देत होता. आणि मध्य गाठण्यापूर्वीच माझ्या पायांभोवती ऑक्टोपसचा भयानक विळखा पडला...विवाह होऊन जेमतेम दोन महिनेही झाले नव्हते. परंतु सारं शरीर लोळागोळा होऊन निपचित पडलं. गरुडाप्रमाणे स्वकर्तृत्वानं आभाळात झेप घेण्याऐवजी गांडुळाप्रमाणे बिळात पिचण्याचं दुर्भाग्य सामोरं आलं. तथापि, बालपणापासून सानेगुरुजी कथामालेत सहभागी होणारा गुरुजींचा मी 'धडपडणारा मुलगा' होतो. नियतीसमोर हार पत्करायची नाही असा दृढ निश्चय केला. 'परिस्थिती, परिस्थिती काय! मी करीन ती परिस्थिती!' असं म्हणणाऱ्या नेपोलियनप्रमाणे प्रतिकूल परिस्थितीचं शिवधनुष्य पेलण्याचं आव्हान मी स्वीकारलं...

१९६६ च्या फेब्रुवारीमध्ये मला अचानक पाठदुखीचा त्रास होऊ लागला. सूर्य मावळतीकडे झुकला की पाठीमध्ये हळूहळू वेदना सुरू होत. रात्रीच्या पुढं सरकणाऱ्या प्रत्येक क्षणाबरोबर वेदनांची तीव्रता वाढत असे. नि:स्तब्ध रात्र आणि त्यात वेदनांनी तडफडणारा एक असहाय जीव हे व्यस्त प्रमाण आयुष्यात त्यानंतर कधी समपातळीवर आलंच नाही. पहाटे तीन नंतर हळूहळू वेदना कमी होत. त्यानंतर केव्हातली डोळा लागे. तरीही युनिव्हर्सिटीत एम. ए. ची लेक्चर्स व त्यानंतर ब्रिटिश कौन्सिल लायब्ररीतला मुक्काम ही धडपड सुरूच होती. कोणत्याही उपचारांना दाद न देणारं हे दुखणं एप्रिलच्या अखेरीस आपोआप बरं झालं. एका जीवघेण्या दुखण्यातून सुटका झाली म्हणून मी सुटकेचा नि:श्वास टाकला; परंतु आणखी चार-पाच महिन्यांतच श्वास रोखऊन धरायला लावणारा प्रसंग उद्भवणार होता याची मला किंचितही कल्पना नव्हती!

७ जून १९६६ रोजी मृगनक्षत्राच्या सुमुहूर्तावर लग्न झालं. 'शुभदा' नावाच्या एका मृगनक्षत्रानं माझ्या आयुष्यात कायमचा प्रेमाचा वर्षाव करण्यासाठी प्रवेश केला. तिच्याच आग्रहानुसार पाठदुखी थांबल्यानंतर मला चालताना त्रास होत होता म्हणून के.ई.एम. हॉस्पिटलमध्ये गेलो. .

तिथं मायलोग्राम करताना डॉक्टरांकडून काहीतरी चूक झाली असावी...त्यानंतर मला नीट चालता येईना. पायात पाय अडकू लागले. अडखळू लागले. हळूहळू पायांना मुंग्या येऊ लागल्या...मग आलेलं भयानक वेदनायुक्त अपंगत्व... दुर्गंधीयुक्त रक्त आणि पू बाहेर पडणाऱ्या क्षतांनी व्यापलेला देह... आयुष्याचं एक यातनाघर झालेलं... काखेत कुबड्या आणि कॅलिपर्समध्ये जखडलेलं शरीर अशा परिस्थिती कुर्ल्यात माझ्या मेहुण्यांनी दिलेल्या दहा बाय दहाच्या खोलीमध्ये राहताना

तिथंच पाच-सहा मुलं गोळा करून खाजगी ट्युशन्स सुरू केल्या. शिकवणं हा माझा धर्म होता. त्यामुळे पहिल्या सहा महिन्यांत मुलांची संख्या वाढली. त्याच चाळीत डबलरूम घेऊन ट्यूशन्सचं रूपांतर 'शुभदा क्लासेस'मध्ये केलं.

एम.ए.ची परीक्षा चुकली याचं मरणप्राय दु:ख झालं. एम.ए. च्या पहिल्या वर्षीच दोन्ही वर्षांचा अभ्यास करून परिपूर्ण नोटस् काढल्या होत्या. त्या वाचून मला फर्स्टक्लास किंवा हायर सेकंडक्लास मिळेल असं माझ्या प्राध्यापकांना निश्चितपणे वाटत होतं. कीर्ती

कॉलेजचा मी डॉ. स. ग. मालशे आणि प्रा. अनंत भावे यांचा आवडता विद्यार्थी. त्याच कॉलेजमध्ये प्राध्यापक होण्याची माझी महत्त्वाकांक्षा नियतीनं संपुष्टात आणली, तरी अथक परिश्रमानंतर शुभदा क्लासेसचं रुपांतर 'शुभदा एज्युकेशन इन्स्टिट्युट'मध्ये करून मी माझ्याच संस्थेचा प्राचार्य झालो!

आयुष्यात संकटं वादळासारखी घोंघावत राहिली...रोरावत राहिली. नैसर्गिक आणि मानव निर्मित अशा दोन्ही प्रकारच्या संकटांचे जबरदस्त तडाखे मला बसले. कोणतीही गोष्ट माझ्या आयुष्यात सहजासहजी मिळू नये असंच बहुधा माझ्या जीवनाचं सूत्र असावं! आम्ही जिथं राहात होतो, तिथंच 'विमान दर्शन' सोसायटीचं बांधकाम सुरू होऊन पूर्ण झालं होतं. सर्व ब्लॉक्स गेले. पहिल्या मजल्यावर फक्त एक ब्लॉक शिल्लक होता. या ब्लॉकला लागून एक टेरेस होता. टेरेस ज्या कुणी घेईल त्यालाच तो ब्लॉक विकायचा बिल्डरचा ठराव होता. क्लासच्या दृष्टीनं बेडरूमला जोडून असलेला तो टेरेस मला उपयुक्त होता.

## ब्लॉकची खरेदी

१९७४ मध्ये ब्लॉक आणि टेरेसचे मिळून पंचावन्न हजार भरायचे होते. माझ्याजवळ तर जेमतेम पाच हजारही शिल्लक नव्हती! क्लासची मुलं वाढत होती. शुभदाही शाळेत शिक्षिका म्हणून लागली होती. मात्र राहत्या जागेचं भाडं, रोजचा खर्च, कुठंही जायचं तर टॅक्सीतून प्रवास आणि माझ्या अपंगत्वावर व इतर दुखण्यावर होणारे उपचार, औषधांसाठी होणारा अफाट खर्च यामुळे सर्वत्र अंधार होता. तरीही 'निश्चयाचे बळ, तुका म्हणे तेचि फळ' या उक्तीनुसार ही जागा विकत घेण्याचा निर्धार मात्र ठाम होता. माझे श्वशूर, मेहुणे, भाऊ आणि मित्र यांच्याकडून बिनव्याची पंचवीस-तीस हजार गोळआ केले. उर्वरित रकमेसाठी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कुर्ला शाखेत अर्ज केला. कर्ज मंजूर झालं. परंतु एका हितशत्रूनं माझ्याविषयी बँक मॅनेजरला खोटंनाटं सांगून ते कर्ज नामंजूर करायला भाग पाडलं. मराठी माणसांमध्ये अशी दुर्दैवी 'चढाओढ' प्राचीन काळापासूनं सुरू आहे. चढाओढ म्हणजे एक वर चढत असेल तर दुसऱ्यानं त्याला खाली ओढण्याचं पुण्यकर्म करायचं!

तरीही ही धडपड व्यर्थ जाऊ द्यायची नव्हती. मंगळसूत्र सोडून शुभदाचे सर्व अलंकार बँकेत गहाण ठेवले. त्यावर काही कर्ज मिळालं. नंतर मी एक योजना आखली. क्लासमध्ये मी दोन नवीन वर्ग सुरू केले. पहिला वर्ग सकाळी सातच्याऐवजी नवीन वर्ग सहा वाजता सुरू केला. शेवटचा वर्ग रात्री आठच्याऐवजी आणखी एक वर्ग रात्री नऊ वाजता सुरू केला. तो सुटायला दहा-साडेदहा वाजत. विद्यार्थ्यांनीही भरभरून प्रतिसाद दिला. या वाढीव उत्पन्नामुळे बिल्डरला दरमहा दोन हजार रुपये अधिक हप्ता देऊ लागलो. दिवसातून बारा-तेरा तास सतत एका जागी बसून शिकवताना माझाही जीव हैराण होई. महिन्याचे शेवटचे दिवस ओढाताणीत जात. सर्व बाजूंनी कोंडी होती. जमाखर्चाची तोंडमिळवणी करताना नाकी नऊ येत. नको ती जागा असं वाटे! परंतु जागा घ्यायचा आमचा निर्धार अटळ होता. अखेर ३ मे १९७५ अक्षयतृतीयेला वास्तुशांती करून आम्ही आमच्या नव्या घरात नवजात कन्येसह प्रवेश केला. ज्यासाठी आम्ही अविरत कष्ट केले, धडपड केली त्याचं चीज झालं. विशेष म्हणजे आमची स्वत:ची जागा मिळाली म्हणून आमच्या स्वाभिमानी मनात समाधानाची आणि तृप्तीची पहाट फुटली.

## शेडवर संक्रांत

टेरेसवर लागलीच तात्पुरती शेड उभारून माझी 'शुभदा एज्युकेशन इन्स्टिट्युट' दिमाखात सुरू झाली. परंतु अजून अमुची सत्त्वपरीक्षा संपली नव्हती. सोसायटीनं परवानगी दिली तरी टेरेसवर शेड उभारणं अनधिकृत होतं हे मला नंतर कळलं. बिल्डरनं आमची पुरती फसवणूक केली होती. माझ्या 'त्या' हितशत्रूनं ही संधी अचूक साधली. महापालिका एल वॉर्डकडे तक्रार केली. त्याच आठवड्यात महापालिकेचे हत्यारबंद कर्मचारी आले. छपरावरचे पत्रे थाडथाड आवाज करून उडवण्यात आले. चारी बाजूंच्या पत्र्यांची तोडफोड करण्यात आली. खुर्चीवर बसून हतबुद्ध अवस्थेत मी मुकाट्यानं सारं दृश्य पाहात होतो.

खुर्चीवरून मला स्वत:ला उठताही येत नव्हतं. 'आपुले मरण पाहिले म्या डोळा' अशी शोकाकुल अवस्था झाली. दुसऱ्या दिवशी एका भल्या माणसानं तीन-चार ताडपत्र्या आणून दिल्या. त्या छपरावर टाकून क्लासेस सुरू केले. तर दोन दिवसांनी महापालिका कर्मचाऱ्यांनी त्या ताडपत्र्याही उचलून नेल्या...

भर पावसाळ्यातले ते दिवस. माझ्यावर अक्षरश: आभाळ कोसळलं आणि पायाखालची जमीन खचत होती. मग काय, ब्लॉकच्या हॉलमध्ये क्लासेस सुरू केले. मुलं-मुली दाटीवाटीनं जमिनीवर कशीबशी बसत. टेरेसवर शेड बांधण्यास परवानगी मिळाली म्हणून तत्कालीन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील, महापालिका आयुक्त चौगुले, महापौर मुरली देवरा यांच्या भेटीसाठी सात-आठ वेळा चर्चगेटला टॅक्सीनं जावं लागलं. अपंगांचं पुनर्वसन करण्याच्या बढाया मारणाऱ्या या सर्व महोदयांनी पोकळ आश्वासनं दिली. परिणाम शून्य! परंतु अशा परिस्थितीतही 'असाध्य ते साध्य करिता सायास' या तुकोबांच्या अभंग-वाणीनं धीर दिला. अखेर एक दिवस उपआयुक्त सी.एस. राणे (आडनावातलं हे साम्य नाममात्र आहे.) यांची रात्री नऊ वाजता भेट झाली. दोन माणसांच्या खांद्यावर हात ठेवून मी कसाबसा चालत त्यांच्यासमोर उभा राहिलो तेव्हा ते चकित झाले. मात्र ते सहृदय अंत:करणाचे होते. त्यांनी माझी सर्व कथा आणि व्यथा ऐकली आणि शेड बांधण्यास परवानगी देण्याचं पत्र आठ दिवसांत पाठवून दिलं. अखेर सत्याचा विजय झाला. परंतु माझी आणि शुभदाची जी दमछाक झाली, जे हाल झाले त्याचं इत्थंभूत वर्णन करणं इथं कठीण आहे. या प्रसंगी शिवसेनेच्या आम्हीच निवडून दिलेल्या मराठी नगरसेवकानं साफ दगा दिला. परंतु एक अमराठी नगरसेवक दशरथ मधुकुंटा मात्र मदतीला

धाऊन आले.

## पहिला काव्य संग्रह

याच दरम्यान माझी साहित्यक्षेत्रातही प्राथमिक धडपड सुरूच होती. योगायोगानं एक श्रेष्ठ साहित्यिक आनंद साधले यांच्याशी माझा संपर्क आला. माझ्या कवितांच्या दोन वह्या मला आतापर्यंत नेहमीच मदक करणारे माझे बालमित्र बाळकृष्ण सावंत यांनी त्या डॉ. व. दि. कुलकर्णी यांच्याकडे अवलोकनार्थ दिल्या होत्या. पहिल्या वहीमध्ये कॉलेजजीवनातल्या प्रेमकविता होत्या तर दुसऱ्या वहीतील कवितांत अपंगत्वानंतर आलेल्या दु:खाचा सच्चा आविष्कार होता. साधले व. दि.ंकडे गेले असता त्या कविता वाजून ते प्रचंड अस्वस्थ झाले. आणि एवढे मोटे साहित्यिक माझ्या घरी आले. पहिल्याच भेटीत मे म्हणाले, "राणे, तुमच्या आयुष्यात नियतीनं जे दु:ख निर्माण केलं आहे ते दूर करण्यास मी असमर्थ आहे. मी तुमच्या विलक्षण जिद्दीचं आणि झुंजार वृत्तीचं कौतुक करतो. परंतु त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे तुमची सहचारिणी. वहिनींसारखी निष्ठावान पत्नी तुम्हाला लाभली हे तुमचं भाग्य आहे." साधले पित्याच्या मायेनं बोलत होते. आमच्या वैवाहिक जीवनातील शुभदाच्या कमालीच्या संयमी, सोशिक वृत्तीचं आणि समर्पित जीवनाच वर्णन ऐकताना त्यांचं हृदय कौतुक-मिश्रित आनंदानं भरून आलं... त्यांनीच मला माझ्या सर्व निवडक कवितांचं हस्तलिखित तयार करायला सांगितलं. ते तयार होताच त्यांनी केशवराव कोठावळे यांच्याकडे शब्द टाकून मॅजेस्टिक प्रकाशनातर्फे ते १९८० मध्ये प्रकाशित केलं! हाच माझा पहिला काव्यसंग्रह 'आभाळवाट.'

कविवर्य वा. रा. कान्त यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना मला लाभली. मग मात्र माझा उत्साह दुणावला.

'दुर्दम्य' या माझ्या काव्यसंग्रहाला साहित्य संस्कृती मंडळाचं अनुदान मिळालं. कविवर्य वसंत बापट यांनी अत्यंत प्रेमानं प्रस्तावना लिहिली. साहित्यातला मला पहिला पुरस्कार मिळाला तो याच काव्य संग्रहाला. हा पुरस्कारसुद्धा उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीचा महाराष्ट्र राज्य पुरस्कार! वसंत बापट यांनी साधना प्रकाशनातर्फे पाच अंध-अपंग कवींचा 'अंतर्वेध' काव्यसंग्रह काढला. त्यात माझ्या दहा कवितांचा समावेश केला.


१९८७ मध्ये 'अमुचा पेला दु:खाचा' हे माझं आत्मचरित्र श्रीविद्या प्रकाशनाच्या मधुकाका कुलकर्णींनी समारंभपूर्वक प्रकाशित केलं. लक्ष्मणशास्त्री जोशी, माधव गडकरी, पुष्पा भावे, दिनकर गांगल यांनी प्रकाशन समारंभात या आत्मचरित्राचा मन:पूर्वक गौरव केला. त्यानंतर पु. ल. देशपांडे, रवींद्र पिंगे, मधु मंगेश कर्णिक, अरविंद गोखले यासारख्या दिग्गजांपासून आतापर्यंत अनेक लेखकांची-वाचकांची पत्रं येताहेत. त्यांच्या प्रेमगंगेत मी सचैल स्नान करतोय!

## आनंदयात्री

२००१ मध्ये मी 'शुभदा एज्युकेशन इन्स्टिट्युट' बंद करून लेखन-वाचनासाठी विरारला निसर्गरम्य ठिकाणी स्थायिक झालोय. आतापर्यंत माझी सतरा पुस्तकं प्रकाशित झाली असून मला मिळालेल्या प्रतिष्ठित पुरस्कारांची संख्या आहे तेरा. मात्र माझे प्रारंभिक धडपडीचे दिवस अत्यंत कष्टाचे गेले. दु:खाच्या भयानक वेदना मी अनुभवल्या आहेत. भोगल्या आहेत. दु:खाचा सूक्ष्म कीटक आपल्या तीक्ष्ण दातांनी मला कुरतडू लागला. त्या मरणप्राय वेदनांनी छळ केला तो देहाचा. मनाचा नाही! मनाला स्पर्श करण्याची त्याची हिंमतच झाली नाही. सिकंदर पोरसाचं राज्य जिंकू शकला. मन नाही. अखेर ते राज्य सोडूनही त्याला सीमेवरून परत फिरावं लागलं. मीसुद्धा दुर्दम्य मनोबळानं मनाच्या गाभाऱ्यातला तो कीटक आकाशाच्या पोकळीत उंचच उंच फेकून दिला आहे-पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणापलीकडे! माझे सुरुवातीचे शैक्षणिक आणि साहित्यिक क्षेत्रातले दिवस हे असे होते. प्रखर मनोबळानेच मी त्यांच्याशी झुंज दिली. अजूनही हे देहकष्ट मी सोसतो आहे. भोगतो आहे. परंतु हे केवळ सोसणं किंवा भोगणं नाही. हे एक जगणं आहे. एका वीराचं...शूराचं जगणं! नाशिकला भरलेल्या तृतीय अखिल भारतीय संमेलनाचे अध्यक्षपद मला (१३, १४ मे १९९० लाभलं.) त्यावेळी आजचे विख्यात समीक्षक आणि माझे गुरुवर्य प्रा. एम. पी. पाटील यांनी माझ्यावर 'वेदनेचा अमृतपुत्र' म्हणून लेख लिहून प्रसिद्ध केला. आयुष्यात सुख म्हणजे आणखी काय असतं? म्हणून मी एका कवितेत लिहिलंय -

*मन माझे तरी गाते*
*गोंजारत जन्मफले*
*आनंदयात्री मी असा*
*दु:ख आज झाले लुळे!*

१३ब/८, सेंट्रल पार्क, ३९७, छत्रपती शिवाजी मार्ग,
बोळिंज, विरार (प.) जिल्हा ठाणे - ४०१३०३.
दूरध्वनी (९५२५०) २५०३६८५



**चाकाची खुर्ची**
**नसीमा हुरजूक**
**किंमत : १८०रु.**
**पोस्टेज : २०रु.**

माणसाच्या अदम्य जिद्दीचं दर्शन घडवणारं,
निराश मनाला दिलासा देणारं आत्मकथन

# करिअर घडविताना

## डॉ. प्रभा श्रीकांत गोखले

आज माझे वय ७४ आहे. मी MBBS. DGO. M.D. एवढे शिक्षण घेतले आहे. पुण्याच्या बी. जे. मेडिकल कॉलेजमध्ये शरीरक्रियाशास्त्र (Physiology) ह्या विषयात ३० वर्षे अध्यापनाचे काम करून, १९८९ साली विभागप्रमुख म्हणून निवृत्त झाले. नंतर ६ वर्षे भारती विद्यापीठाच्या कॉलेजमध्ये ह्याच माझ्या विषयाचा विभाग setup करण्याचे काम करून, तेथेही अध्यापन करून १९९५ साली तेथूनही निवृत्त झाले.

हा माझा जीवनप्रवास सुखाचा, विनासायास झालेला नाही. मला खूपच झगडावे लागले. खूप जीवनसंघर्ष करावा लागला. अडचणींचे डोंगर पार करावे लागले. पण उच्चशिक्षण घ्यायचेच व काहीतरी आयुष्यात करायचेच ही जिद्द, प्रचंड इच्छाशक्ति व सकारात्मक दृष्टीकोन ह्यामुळे बरेच काही मिळवू शकले. अर्थात हे सर्व मिळवताना, फार मोठी किंमत मोजावी लागली. आता जीवनाच्या ह्या टप्प्यावर पूर्वीचे दिवस आठवताना, किंवा मागे वळून पहाताना असे वाटते की माझ्या आयुष्याच्या गणितात गोळाबेरीज केली तर बेरजेचे गुण (Plus points) अधिक पडले आहेत व त्यामुळेच मी खूप सुखी, कृतार्थ व समाधानी आहे. त्यामुळेच संघर्षाचे दिवस आठवू नये असे वाटते. पण माझी वाटचाल वाचून जर काहींना प्रेरणा मिळाली तरच ह्या पंक्तिप्रपंचाचा थोडाफार फायदा आहे.

मी पूर्वाश्रमीची प्रभा बोडस. वडील पी. डब्लू. डी. त कारकून. चार भावंडे. वडिलोपार्जित घरदार, शेती, पैसा काही नाही. सांपत्तिक स्थिती कनिष्ठ मध्यमवर्गासारखी. तशी थोडी ओढाताणीची. वाड्यांतली ३ खोल्यांची जागा. हुजुरपागेत शिकत होते. अभ्यासात चांगली गती होती. पहिल्या पाचांत कायम नंबर. दरवर्षी शिष्यवृत्ती मिळे. अभ्यास सांभाळून घरकामांत आईला मदत करावी लागे. मॅट्रिकला फक्त गणितासाठी 'नाना क्लास' लावला होता. फी होती महिना १रु. मॅट्रिकला गणितात १९८/२०० गुण मिळाले. शंकरशेट शिष्यवृत्ती १ मार्काने गेली. मुंबई विद्यापीठात मी मुलींच्यात पहिली आले. त्यावेळी आतासारखे गुणवत्तेत आलेल्या मुलांचे फोटो, सत्कार, मुलाखती असे काहीच कौतुक होत नसे. पण हे माझे यश हा माझ्या आयुष्यातला महत्त्वाचा मैलाचा दगड ठरला.

कॉलेजचे शिक्षण करण्याची वडिलांचे ऐपत नव्हती. पण स.प. कॉलेजने फ्रीशिप व शिवाय मेरिट स्कॉलरशिपही देऊ केली. त्यामुळे पुढील शिक्षणाचा मार्ग सुकर झाला. गणित चांगले असूनही, मैत्रिणींनी बायोलॉजी घेतली म्हणून मी पण बी-ग्रुप घेतला. मॅट्रिक ते इंटर ह्या तीनही उन्हाळी सुटीत नोकरी केली. इंटर नंतर तर मी मुंबईला वर्सोवाला जात असे. सर्व मैत्रिणी दीक्षितांच्या फिजिक्स क्लासला जात. मला शक्य नव्हते. त्या त्यांच्या नोटस् देत. वाड्यात १०-१२ बिऱ्हाडे. त्यामुळे अभ्यासाला निवांत जागा नव्हती. थोडे दिवस आजोळी अभ्यासास जात असे.

इंटरला चांगले मार्कस् मिळाले. आता पुढे काय हा मोठा यक्षप्रश्न. मेडिकलचा खर्च परवडणे शक्य नव्हते. मला तर जायचेच होते. माझा प्रवेश नक्की होता. माझ्या मैत्रिणीचे वडील डॉ. साने हे पुण्यातील प्रसिद्ध डॉक्टर. त्यांची दोन मुले मेडिकलला जाणारच होती. त्यांनी माझीही जबाबदारी घेण्याची तयारी दाखवली. माझा एक मामाही मेडिकलला होता. त्यामुळे पुस्तकांची सोय होत होती. बराच विचारविनिमय करून शेवटी प्रवेशअर्ज भरला. २० जून, १९४९ ला बी. जे. मेडिकलच्या चौथ्या बॅचला प्रवेश मिळाल्याची तार मुंबईहून आली. दुसरा मैलाचा दगड पार पडला.

कॉलेजचे प्राचार्य डॉ. दीक्षित हे अगदी

देवमाणूस होते. प्रत्येकाकडे वैयक्तिक लक्ष देत. माझी आर्थिक मर्यादा कळल्यावर मला पाचही वर्षे नादारी मिळाली. लायब्ररीतून व मैत्रिणींकडून पुस्तके मिळवून अभ्यास केला. पाचही वर्षांत स्वत:चे असे माझे एकही पुस्तक नव्हते.फर्स्ट MBBS पार पडले. वर्गातील निम्मीच मुले पास झाली.सेकंड MBBS ही पार पडले. एकच विषय होता. त्यामुळे खेळ, नाटक, सहली ह्यांत भाग घेता आला. प्रकृतीने बारीक दिसले तरी काटक होते. सदाशिव पेठेपासून ससूनपर्यंत दोनवेळा सायकलवरून जावे लागे. बसेस, रिक्षा फारशा नव्हत्या. प्रत्येक विषयासाठी ३-३ महिने हॉस्पिटलमध्ये ड्यूटी करावी लागे. पुण्यातील सर्व सुप्रसिद्ध डॉक्टर्स आम्हांला खूप मनापासून शिकवत. शेवटच्या वर्षाला सात विषय परीक्षेला होते. काही मैत्रिणींनी वसतिगृहात अभ्यासासाठी राहायचे ठरवले. मला शक्य नव्हते. पण मी तशीच parasite म्हणून गुपचुप राहात असे. मैत्रिणींचा मोठेपणा व प्रेम.

आता आमचा ग्रुपमध्ये अभ्यास सुरू झाला. वॉर्डमध्ये केसेस बघून त्यावर चर्चा असा दिनक्रम चालू होता. आताचे माझे पती ह्यांना सर्वजण छोटू म्हणत. ते पण आमच्याबरोबर अभ्यास करायचे. तेव्हाच ह्यांना माझ्यात इंटरेस्ट निर्माण होतो आहे असे जाणवू लागले होते. मला स्वत:ला समवयस्क नवरा नको होतो. ३-४ वर्षांनी तरी मोठा असावा असे माझे मत होते. ह्यांचा विचार पक्का होता, पण माझे मन शंभर टक्के कौल देत नव्हते. पुढे परिक्षेचा निकाल लागला. आमच्या बॅचमधील १२ जणच पास झालो. सर्व विषय सुटल्याच्या आनंदांत मी ह्यांना सरतेशेवटी होकार दिला. आता जीवनातील अवघड पर्व सुरू झाले.

माझ्या घरून लग्नाला परवानगी मिळाली, पण ह्यांच्या वडिलांचा कडवा विरोध होता. त्यांचे विरोधाचे मुद्दे अगदीच चुकीचे नव्हते. करिअर करणारी मुलगी म्हणजे मुले, संसार यांचा बोजवारा वाजेल. शिवाय मी खूप बारीक व अशक्त दिसे. ह्याच्याउलट डॉ. गोखले बी. जे. मेडिकलचे पाचही वर्षे 'श्री' बीजेमसी. शिवाय मुलाने आपले आपण लग्न ठरवले, त्यामुळे त्यांचा इगो दुखावला गेला होता. त्यांच्या पिढीला त्यांची मते योग्यच होती असे आता वाटते. माझ्या सासुबाई व दीर यांचा मात्र पूर्ण पाठिंबा होता. सासऱ्यांचा असहकार, त्यामुळे लग्न कसेबसे २६ जून १९५५ रोजी पार पडले. स्वागत समारंभ अनाथ विद्यार्थीगृहाच्या राम मंदिरात झाला. ससूनमधील बरेच डॉक्टर्स, नर्सेस, मित्र-मैत्रिणी हजर होते. आलेल्या लोकांना फक्त एक पेढा, एक फूल व नारळ असे दिले होते. त्यावेळेस तशीच पद्धत होती. आता केवढा बदल झालेला आहे.

ज्या घरात आपण पसंत नाही त्या घरात सहजीवन सुरू झाले. मला खूप भीती वाटे, त्यामुळे मी प्रचंड तणावाखाली होते. शिवाय आम्ही दोघेही मिळवत नव्हतो. त्यामुळेही खूप संकोच वाटे. ससूनमध्ये पोस्टसाठी लवकरच रुजू व्हायचे होते. घरून कसे सहकार्य मिळेल ही काळजी होती. डॉ. गोखल्यांनी मेडिसिन व मी गायनॉकॉलॉजी हा विषय M.D. साठी निवडला. तेव्हा आम्हांला महिना ६०रु. मिळत. त्यामुळे आर्थिक तंगीच होती. मी मुंबईच्या D.G.O. ह्या डिप्लोमाचा अभ्यास सुरू केला. तोच नवीन बाळाच्या आगमनाची चाहूल लागली. आनंदाऐवजी प्रचंड टेन्शन आले. आता वार्डमधील काम, त्यांत डोहाळे, घरच्या फेऱ्या, वेळीअवेळी डब्यातले जेवण, रात्रीची जागरणे ह्याचा प्रकृतीवर परिणाम झालाच. खूप थकायला व्हायचे. तसाच अभ्यास करून, ७ महिन्याचे गर्भारपण, मुंबईला जाऊन परीक्षा दिली व D.G.O ही पदवी मिळाली. डॉ. बानूबाई कोयाजींकडे तपासायला जाई. त्यामुळे जहांगीर हॉस्पिटलमध्ये बाळंतपणासाठी गेले. १० जुलै १९५६ रोजी मुलगा झाला. रजा घेऊन माहेरी गेले. तीनच खोल्यांची जागा. पण आईने सर्व व्यवस्थित केले. 'विजय' नाव ठेवले. माझ्या आजीने १०० ब्राह्मणांना जेवण घातले - पहिला पणतू झाला म्हणून.

आता पुढची विवंचना सुरू झाली. ससूनमध्ये काम करायचे तर मुलाला सांभाळायचा प्रश्न होता. तेवढ्यात नादारीवर शिक्षण केले असल्याने माझी मेडिकल ऑफिसर म्हणून गुजराथमध्ये बदली झाली. माझ्या M.D. च्या टर्मस् कशा पूर्ण होणार? तेव्हाचे सर्जन जनरल डॉ. दीक्षित हे आमचे पूर्वी प्राचार्य होते. त्यांना भेटले व माझा प्रॉब्लेम सांगितला. त्यांनी ससूनमध्येच Tutor in Midwifery ही पोस्ट मंजूर केली व मी १२० रु. पगारावर रुजू झाले. फॅमिली क्वार्टर मिळाले. विजय, त्याला पाहणारी बाई व आम्ही असा संसार सुरू झाला. सासूबाई रोज बसने त्याला आंघोळ घालण्यास येत व परत जात. थोडे दिवसांसाठी माझी नियुक्ती ब्लड बँकेत झाली. थोड्या दिवसातच मला ताप येऊ लागला. खोकलाही सुरू झाला. डॉ. मोदींचे औषध चालू केले. मुलाला आईकडे पाठवले. रजा घेतली. डॉक्टर गोखले मुंबईला रुजू झालेले. ते फक्त शनिवार, रविवार पुण्यास येत. मुंबईला तब्येत दाखवायला गेले. डॉ. बिलिमोरियांनी उजव्या फुफ्फुसात न्युमोनियामुळे मोठं गळू झालं आहे, असे निदान केले. सर्जरी करून अर्धे फुफ्फुस काढून टाकण्यास सांगितले. ऐकून खूपच धक्का बसला. कारण

**माझा जीवनप्रवास सुखाचा, विनासायास झालेला नाही. मला खूपच झगडावे लागले. खूप जीवनसंघर्ष करावा लागला. अडचणींचे डोंगर पार करावे लागले. पण उच्चशिक्षण घ्यायचेच व काहीतरी आयुष्यात करायचेच ही जिद्द, प्रचंड इच्छाशक्ति व सकारात्मक दृष्टीकोन ह्यामुळे बरेच काही मिळवू शकले.**

१९५७ साली ह्या अशा सर्जरीचे रिझल्टस् खूप निराशाजनक होते. गोळ्या व इंजेक्शने घेऊन मी खूप कंटाळले होते. त्यामुळे आम्ही दोघांनी सर्जरीचा धाडसी निर्णय घेतला. पुण्यात आलो, आमचा निश्चय सर्वांना सांगून, मुंबईला प्रयाण केले. लोकांची खूप उलटसुलट मते ऐकली. पण मन घट्ट केले होते. मुंबईला भायखळ्याला 'मसीना हॉस्पिटल'मध्ये ॲडमिट झाले. माझे आईवडील, मुलगा, आजीआजोबा मुंबईला येऊन राहिले. दीर, जाऊ दादरला होतेच.

२६ नोव्हेंबर १९५७ ला माझे ऑपरेशन झाले. अर्ध्या फुफ्फुसाऐवजी संबंधच फुफ्फुस काढायचा निर्णय सर्जनने घेतला. संबंध फुफ्फुस काढून टाकले. मला मात्र बरेच दिवस अर्धेच काढले असे सांगत. मी सतत ऑक्सिजनवरच होते. ८-१० दिवस बरे गेले. मग एकेक संकटे येऊ लागली. हृदय उजवीकडे ओढले जाऊ लागले. त्यासाठी पुन्हा छाती उघडून ३-४ फासळ्या काढून टाकल्या व उजवी बाजू पूर्ण बंद केली. नंतर खूप सेप्टिक झाले. जखमेतून पू वाहू लागला. जखमही पाठीपासून पुढपर्यंत J च्या आकाराची होती. ७२ टाके होते. तेव्हा आताइतकी प्रभावी ॲन्टिबायोटिक्स नव्हती. तब्येत अत्यवस्थ Critical stage मध्ये होती. माझे वडील व पती सतत एक महिना माझ्याबरोबर हॉस्पिटलमध्ये राहिले होते. सर्व नातेवाईक भेटून गेले. मला माझ्या प्रकृतिचे गांभीर्य जाणवत होते. मला बरे वाटावे म्हणून विजयला रोज मला भेटायला आई घेऊन येई. परमेश्वर कृपेने व माझ्या जबर इच्छाशक्तीच्या बळावर, प्रकृती हळूहळू सुधारू लागली. दीड महिन्यानंतर पुण्याला जायची परवानगी मिळाली. हॉस्पिटलचे बिल भागवायला पैसे नव्हते. माझ्या नणंदेने ते काम केले. डॉक्टरांची M.D. ची परीक्षा हुकली. एक वर्ष वाया गेले. संकटावर संकटे येत होती. पुण्याला आल्यावर तब्येत सुधारू लागली. विजयला दोन-अडीच वर्षांचा होईपर्यंत आईने सांभाळले.

## पुढील करिअर -

पुढें काय हा यक्षप्रश्न भेडसावत होता. आयुष्याच्या सुरवातीलाच एका लढाईला सामोरे जावे लागलें. पेशंटशी संसर्ग नको म्हणून M.D.Gynec ही लाईन सोडण्यास सांगितलें. बिनपगारी रजा संपली. नोकरी खंडित झाली. क्वार्टर सोडावे लागले व संसार मोडावा लागला. आता शिक्षकीपेशा करावयाचे ठरवले व शरीरक्रियाशास्त्र (Physiology) ह्या विभागांत प्रथम अर्धवेळ, मग पूर्णवेळ अशी नोकरी सुरूं केली. ती नोकरीही सुखाने चालू ठेवता येईना कारण मेडिकल बोर्डाकडून फिटनेस सर्टिफिकेट मिळेना. ३ वेळां बोर्डापुढे गेले, शेवटी कसेबसे मिळाले. आता २३०रु. पगार व व्यवस्थित नोकरी सुरू झाली.

मुलांना शिकवण्यापूर्वी स्वत: चांगली तयारी करून, वाचून विषय तयार करावा लागे. प्रथम शिकवताना दम लागे, पण डाव्या फुप्फुसाची क्षमता दीर्घ श्वसनाने वाढू लागली व मी १-१॥ तास सहजपणे शिकवू लागले. आता त्याच विषयांत M.D. करायचे ठरवले. रजिस्टर केले. पण १९६१ मध्ये दुसऱ्या मुलाची चाहूल लागली. मुंबईतील प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ यांचा सल्ला घेतला. त्यांनी मूल होऊन देण्यास हरकत नाही असा सल्ला दिला. नोव्हेंबर १९६१ मध्ये धनंजय ८व्या महिन्यांतच जन्माला आला. माझी तब्येत ठीक होती. पण पुन्हा ४ पौंडाचे कमी दिवसाचे मूल वाढवण्याची परीक्षा द्यावी लागली. त्याला वाढवायला खूप त्रास पडला. ६ महिने रजा घेतली. नंतर तो चांगला सुधारला. पण माझे M.D. चे रजिस्ट्रेशन आमच्या विभागप्रमुखांनी रद्द केले. पुन्हा नव्याने सुरवात. पण जिद्द होती. आतापर्यंतचा प्रवास जिद्दीनेच चालू होता.

डॉक्टर M.D. होऊन लक्ष्मीरोडवर प्रॅक्टिसला लागले होते. ससूनमध्येही डॉ. ग्रॅन्टकडे ऑनररी म्हणून लागले होते. थोडे आर्थिक स्थैर्य आले होते. एक जुनी फियाट गाडी घेतली होती. सासरचे वातावरण थोडे निवळू लागले होते. अध्यापन करता करता माझीही परीक्षेची तयारी, थिसीसचे काम चालू होते. पण ओळीने काही पार पडण्याचा योगच नव्हता.

१९६४ मध्ये डॉ. गोखल्यांना एका न्यूयॉर्कच्या हॉस्पिटलमध्ये फेलोशिप मिळाली. १ वर्षासाठी जाण्याचे ठरले. तिकडे गेल्यावर त्यांनी माझ्यासाठीही पोस्ट मिळवली. सासूबाईंनी मुले सांभाळण्याची जबाबदारी आनंदाने स्वीकारली धनंजय ३ वर्षांचाच होता. मी न्यू जर्सीला गेले. जेवढें शक्य होते तेवढे शिकलो, हिंडलो, परत येताना लंडन, युरोपची टूर केली. तेथे कायम स्थायिक व्हावे असे वाटले नाही. अमेरिकेतच मला पित्ताशयाचा (Gall bladder) त्रास सुरू झाला. ऑपरेशन करण्यास सांगितले होते, पण भीतीने नाही केले. भारतात परत आल्यावरही त्रास होताच. पण आधी M.D.च्या परीक्षेला बसून घ्यावे असे ठरवले. जोरात अभ्यास सुरू केला. सासूबाई व यजमान ह्यांचे पूर्ण सहकार्य होते. त्यांचे माझे मस्त ट्यूनिंग होते. M.D. परीक्षेच्या वेळीही अनेक विघ्ने आली. बरेच राजकारण झाले. पाय ओढणारे हितशत्रू असतातच. तरी मी तशीच जिद्दीने परीक्षेला बसले व व्यवस्थित पास झाले. M.B.B.S नंतर १३ वर्षांचा खंड पडून मी M.D.ची पदवी मिळवली. मनाला खूप समाधान वाटले. आणखी एक मैलाचा दगड पार केला. आता पुढची बढती लवकरच मिळेल असे वाटले. जागा रिकामी असूनसुद्धा, लवकर ऑर्डर काढली गेली नाही. आपल्या विभागाचे प्रमुख हे काही कारण नसताना जेव्हा आपल्या उन्नतीच्या आड येतात, सरकारी नोकरीत असे प्रकार नेहमीच घडतात. कारण दरवर्षी आपल्या कामाचा रिपोर्ट,वरिष्ठांकडे पाठवणेहें त्यांच्याच हातांत असते. मी कामांत एकदम चोख होते, विद्यार्थ्यांत खूप प्रिय होते व स्पष्टवक्ती होते. उगीचच पुढे पुढे करणे मला जमत नसे. पण मी धीर सोडला नाही. मुंबईच्या अनेक वाऱ्या केल्या व न्याय मिळवला. बढती मिळाली पण प्रकृती बिघडली. पित्ताशयात खूप खडे जमले होते व ते काढणे आवश्यक होते. पुन्हा मनाची तयारी, रजा १९७१ साली सर्जरी झाली. पुन्हा अशक्तपणा. त्यातूनही बाहेर पडून पुन्हा नोकरी सुरू केली. आयुष्यातील दुसरी लढाई जिंकली.

सुदैवाने माझी कुठेच बदली झाली नाही. मला चांगले सहाध्यायी भेटले. त्यामुळे बी.जे. मेडिकलमध्येच माझी ३० वर्षांची नोकरी सलग झाली. अनेक आपत्तींना तोंड देत शेवटी ह्या विभागाची प्रमुख म्हणून मी १९८९ मध्ये निवृत्त झाले.

या माझ्या शैक्षणिक प्रवासात सर्वच क्षेत्रांत खूप बदल होत गेले; त्या बदलत्या प्रवासाशी टक्कर देतच शेवटपर्यंत मजल गाठली. अनेक विभाग प्रमुखांबरोबर काम करावे लागले. प्रत्येकाची वेगळी तऱ्हा. मी रुजू झाले तेव्हा आम्ही १-२ जणीच स्त्री शिक्षक होतो. सर्व सहाध्यायी पुरुष होते. पुढे मात्र प्रत्येक विभागात स्त्रियांचे प्रमाण वाढत गेले. कारण ही नोकरी १० ते ५. रात्री अपरात्री पेशंटसाठी जागरणे, पेशंटचे टेन्शन हे काही नाही. शिवाय सुट्ट्यांचा फायदा. यामुळे बऱ्याच लेडी डॉक्टर्सनी शिक्षकीपेशा स्वीकारला.

परंतु आता दिवसेंदिवस विद्यार्थ्यांना जीव तोडून शिकवण्याचे प्रमाण कमी होत चालले आहे. आमच्या वेळेस आम्ही विषयाचा खूप सखोल अभ्यास करत असू. एक लेक्चर तयार करण्यासाठी ५-६ तास वेगवेगळी पुस्तकें वाचून तयार करायचो. मेडिकलला येणारी मुले हुशार, त्याच्यापुढे आपण कमी पडता कामा नये, अशी जिद्द होती. मुलेंही खूप अभ्यासू, गैरहजर न राहता, शिस्तीने वागणारी होती. जशी बाहेरची मुले महाराष्ट्रात येऊ लागली, तेव्हापासून रॅगिंग, गुंडगिरी, बेशिस्तपणा वाढत चाललेला दिसतो. आता मेडिकल कॉलेजमध्ये सर्व विषयांच्या तयार नोटस् मिळतात. त्यामुळे विद्यार्थी टेक्स्ट बुकचा वापर कमी करतांना दिसतात. त्यामुळे शिक्षकही बेतातबात तयारी करूनच लेक्चर घेतांना दिसतात. आमच्या वेळेस, नवीन आलेल्या शिक्षकांना आम्ही सीनियर शिक्षक Micro-teaching lessons घेण्यास सांगून तयारी करून घेत असू व मगच २०० मुलांसमोर शिकवायला उभे करत असू. शिवाय एकेका टीचरला ८-१० मुले दत्तक देत असू. त्यामुळे अभ्यासाव्यतिरिक्त मुलांच्या अडचणी सोडवण्यास, समुपदेशन करण्यास बरे पडे व शिक्षक-विद्यार्थी नातेसंबंध चांगले जिव्हाळ्याचे बनत असत. आता हे नाते कमी होत चालले आहे. विद्यार्थी बेफिकीर होत आहेत व विद्यार्थ्यांनी नतमस्तक व्हावे असे शिक्षकही कमी होत आहेत.

मी विभागप्रमुख असताना, माझा विषय सोपा व रंजन करण्यासाठी मी वेगवेगळ्या पद्धतींचा अवलंब करी. त्यामुळे मुलांना माझे शिकवणे खूप आवडे. विद्यार्थ्यांकडून उत्कृष्ट शिक्षकाचा बहुमान मला मिळालेला आहे. अध्यापनाबरोबरच रिसर्चही चालू असे. दरवर्षी आमच्या विषयाच्या अखिल भारतीय कॉन्फरन्सला आम्ही ४-५ जणी जात असू. शोधनिबंध सादर करत असू व त्या निमीत्ताने आजूबाजूचा प्रदेश पाहून येत असू.

१९८८ साली, मी पुण्याला अखिल भारतीय कॉन्फरन्स घेतली. सेक्रेटरी म्हणून वर्षभर नियोजन करून खूप यशस्वीरीत्या पार पाडली. आमच्या सबंध टीमचे खूप कौतूक झाले. १९८९च्या फेब्रुवारीत मी निवृत्त झाले. विद्यार्थ्यांनी व माझ्या विभागाने मला हृद्य निरोप दिला.

मला आयुष्यात खूप झगडावे लागले. शिक्षण, संसार, प्रकृती ह्यातील एकही गोष्ट सुरळीत पार पडली नाही. आर्थिक विवंचनाही होत्या. बरेच वेळा कर्ज काढूनच वस्तू घेतल्या. जीवनावर मर्यादा खूप पडल्या. पण प्रचंड जिद्द, इच्छाशक्ती, सकारात्मक दृष्टीकोन ह्यामुळे बरेच काही मिळवू शकले. जगभर प्रवास केला, भरपूर दानधर्म केले. बऱ्याच मुलांना आर्थिक मदत केली. नात्यातील गरजूंना आधार दिला. माझ्या यजमानांचे सहकार्य, सासूबाई व आई यांचा भक्कम आधार हे माझ्यावरचे न फिटणारे ऋण. परमेश्वर कृपेने मी समाधानी व कृतार्थ आहे.


| | | |
|---|---|---|
| नाव | : | डॉ. प्रभा श्रीकांत गोखले |
| पत्ता | : | १९/२, एरंडवणे, पुणे ४११ ००४. |
| शिक्षण | : | हुजुरपागा |
| | | १९४७ मॅट्रिक मुंबई विद्यापीठ. |
| | | मुलींच्यात पहिली. चॅटफील्ड प्राईज. |
| | | १९५४ M.B.B.S. B.J.Medical College.Pune. |
| | | १९५६ D.G.O.(Bombay) |
| | | १९६७ M.D.(Physiology) Pune. |
| | | १९५९ ते १९८९ शरीरक्रियाशास्त्र विभाग |
| | | Lecturer, Asso.Prof.,Professor & H.O.D. |
| | | १९८९ ते १९९५ भारती विद्यापीठ मेडिकल कॉलेज H.O.D. |
| | | १९८८ Organising Secretary - All INDIA Conference |

## जावे त्याच्या वंशा

### सौ. जयश्री बेलसरे

लहानपणापासूनच मला ज्योतिषशास्त्राचे आकर्षण वाटे. भविष्यातील घडामोडी ज्योतिषी कसे काय अचूक सांगतात याचे कुतूहलही वाटे. स्वत:च्या मनगटाचे जोरावर विश्वास ठेवून पुढे जाणारी व्यक्तिमत्त्वही असतात. कुठलं खरं आणि कुठलं खोटं हे ठरविणं फार कठीण आहे. पूर्वी ज्योतिषी म्हटलं की, धोतर, सदरा, डोक्यावर टोपी कपाळावर गंधाचा टिळा, अभ्यासामुळे चेहऱ्यावर दिसणारा आत्मविश्वास आणि डोळ्यावर जाड भिंगाचा चष्मा अशा वेशातील व्यक्ती डोळ्यापुढे यायची. आता काळानुरूप ज्योतिषी व्यक्तीचीही वेशभूषा बदलली आहे. ज्योतिष विश्वात विविध पद्धतीने भाकिते वर्तविणाऱ्या व्यक्ती आहेत. पंचांग गणिताधारे सांगणारे, संख्याशास्त्र, हस्तरेषातज्ज्ञ, भेदनीय, चेहऱ्यावरून, पोपटाकडून चिठ्ठी काढून सांगणारे वगैरे वगैरे. अहो एवढंच काय अंगात देव देवतांचे वारे येणाऱ्या व्यक्तीलाही ज्योतिषी म्हटलं जायचं! तसेच तंत्रविद्या, मंत्रविद्या, कर्णपिशाच्च अशा अघोरी विद्याही ज्योतिषशास्त्राच्या अंतर्गत मोडतात. अतिंद्रीय शक्तीच्या जोरावर भविष्य सांगणाऱ्यांचा तर दरबारच बघावयास मिळतो. दिव्य दृष्टी असणाऱ्यांची तर तऱ्हाच न्यारी आणि ही विविध रूपे ज्योतिषी व्यक्तीची माहीती असूनही मी चक्क ज्योतिषी म्हणजेच भविष्यवेत्ती बनण्याचे ठरविलेल!

व्यवसाय करावा असे कधी मनात आले नसतानाही मला ज्योतिष व्यवसाय करायचा योग आला. खरं तर मी एक सुखी गृहिणी. माझं माहेर पुण्यातील सदाशिव पेठेतील करंदीकरांचं, तर सासर पुण्यातील कसबा पेठेतील श्री ट्रॅव्हल्स, श्री टुरिझमचे बेलसरे यांचं. प्रवासातच ओळख झालेल्या सौ. उषाताई कांबळे यांच्यामुळे मला ज्योतिष शिकण्याचा मोह झाला. पुण्यातील प्रभात टॉकीज शेजारील सुप्रसिद्ध राजज्योतिषी वि. श. अष्टेकर यांनी आम्हाला त्यांचेकडे वि. धो. गोरेशास्त्री यांचेकडून आलेला ज्योतिष शास्त्राचा वसा दिला. आणि जणू काही असं वाटलं 'उतणार नाही मातणार नाही घेतला वसा टाकणार नाही!' या शपथेवर या शास्त्राची उपयुक्तता वाढविण्याचा मूलमंत्रच मिळाला. काळाच्या ओघात काय दडलंय याचं कुतूहल लहानपणापासूनच होतं. अहो गम्मत म्हणून ज्योतिष शिकायला गेले नी बघता बघता झाले की ज्योतिष पंडीता!

ज्योतिषाचा वंश असतो की नाही हे मला माहीत नाही, पण जावे त्याच्या वंशा तेव्हाच कळे. ज्योतिष कशाला म्हणतात आणि भविष्य आकारास कसे आणायचे असते हेच मला कळत नव्हते. 'विश्वास' आणि 'श्रद्धा' यांची ओळख होण्याइतकी सुबुद्धीही नव्हती माझ्याजवळ. पण खरं सांगू का गतजन्मीचे पुण्य होते गाठीला म्हणूनच चोविसाव्या वर्षीच चंचूप्रवेश झाला ज्योतिष विश्वात.

ज्योतिषशास्त्रानुसार २४ वे वर्ष चंद्राचे. माझ्या पत्रिकेतील भाग्यातील चंद्राने एका गृहीणीच्या जीवनात खरोखरीच भाग्योदय घडवून आणला. एकदा भाग्याचे दार उघडल्यावर विद्यार्थिनी म्हणून ज्योतिष क्षेत्रात प्रवेश केलेली मी नंतर चढती कमान ठेऊनच भराभर वेगवेगळ्या भूमिकाही बजावू लागले. भविष्य सांगू लागले, व्याख्याने देऊ लागले, ज्योतिष सभा-सम्मेलनात कुठे वक्ता, कुठे प्रमुख पाहुणे तर कुठे अध्यक्ष अशी पदे भूषविली. ज्योतिषविषयक मासिकातून लेखही लिहू लागले. चंद्रकांत शेवाळे यांच्या ग्रहांकीत या एका अंकाची मानद संपादकही झाले. अशाच एका दिवाळीला मुंबईच्या रुचीपालट तसेच पुणे येथील आपला प्रतिनिधी, ज्योतिषज्ञान, भाग्यदीप, सातारा येथील सिंहासन या मासिकांची राशी भविष्यकारही झाले. या राशी भविष्य लेखनातून आत्मविश्वास येऊन केसरी पुणे

वृत्ताच्या टी व्ही (सी पुणे) वाहिनीवरून उद्याचे भविष्य सांगू लागले. पंडित श्रीकृष्ण जकातदार यांच्या संस्थेच्या ज्योतिष पदव्या मिळविल्या आणि मंदाश्री पुरस्कारही पटकविला.

गतवर्षी गुरुकुल ज्योतिष ज्ञानपिठातर्फे 'ज्योतिष आचार्य' ही पदवी मिळाली.

विविध मासिकांतून लेख लिहिल्यामुळे महाराष्ट्रात माझे नाव झाले. एक दिवस नाशिकहून एक सद्गृहस्थ पत्ता शोधत आले. माझ्या अहोंनी दार उघडले. ''तुमच्या मातोश्री सौ. जयश्री बेलसरे, ज्योतिषी आहेत का?''

हे हसून म्हणाले, ''अहो, त्या माझ्या आई नाहीत सौ. आहेत. बसा पोहायला गेल्यात हेल्थक्लबवर. ५ वाजता येतील.''

एवढ्या लहानवयातील माझं असं आधुनिक ज्योतिषाचे रूप त्यांच्या पचनी पडले नसेल. 'येतोच ५ वाजेपर्यंत' असे सांगून गृहस्थ चक्क पळूनच गेले.

माझ्या सासूबाईंची मैत्रीण एकदिवस दुपारी गप्पा मारायला आली. थोडा ठमाकाकूसारखा अवतार असणाऱ्या या महिलेच्या हातात एक सुरनळी केलेला कागद होता.

''अग जयु, तू म्हणे ज्योतिषशास्त्राच्या परीक्षा दिल्या आहेस. तुझी सासूच सर्वांना सांगत होती भिशीच्या वेळी.''

मी म्हणाले, ''हो.''

खरं म्हणजे दुपारी जेवण झाल्यावर मला पत्रिका बघायचा अजिबात मूड नव्हता. आलेच म्हणून पळून जाण्यासाठी स्वयंपाकघरात आले तर या ठमाकाकूही माझ्या मागोमाग. ''इथेच डायनिंग टेबलवर बसून पाहू या पत्रिका'' असं म्हणत बसल्यासुद्धा आणि हातातील कागदाची सुरनळी उघडत म्हणाल्या, ''माझी मुलगी वैजूची पत्रिका आणलीय दाखवायला. अगं परवा एका ज्योतिषाकडे गेले होते. चांगले ५० रु. घेतले पत्रिका बघायचे आणि वर पत्रिकेला मंगळ असल्याचे सांगितले. मला बाई धक्काच बसला. अचानक विवाह समयी कसा काय शिरतो मंगळ पत्रिकेत काहींच्या? जन्मापासून नाही कोणी सांगितले ते! अग आमच्या वैजूला ना ताठ मंगळ आहे!''

हे ठमाकाकूंचे वाक्य ऐकून मला आश्चर्यच वाटले. कारण आजपर्यंतच्या अभ्यासात कडक मंगळ, निस्तेज मंगळ, शुभ मंगळ, अशुभ मंगळ, कमी तीव्रता असणारा मंगळ यासारखी मंगळाची अनेक रूपे मी पाहिली होती. पण समोरची अम्मा घेऊन आलेली 'ताठ मंगळ' ही कल्पनाच मुळी नवीन होती. मी विचारले, ''मावशी, 'ताठ मंगळ' म्हणजे काय?''

तेव्हा त्या म्हणाल्या, ''अग माझी मुलगी ना स्वभावाने थोडी ताठ आहे आणि आता विवाहाच्या वेळी तिला मंगळही आलाय. म्हणून माझी आई म्हणाली वैजूला 'ताठ मंगळ' असेल!''

मी विचारले ''मावशी, 'ताठ मंगळ' म्हणजे काय?'' तेव्हा त्या म्हणाल्या, ''अग, माझी मुलगी ना स्वभावाने थोडी ताठ आहे आणि आता विवाहाच्या वेळी तिला मंगळही आलाय. म्हणून माझी आई म्हणाली वैजूला 'ताठ मंगळ' असेल!''

समोरच्या बाईंची ज्योतिष व्यवसायातील पहिल्याच वेळेस पत्रिका बघतानाची मुक्ताफळं ऐकली आणि हसून हसून पुरेवाट झाली.

१९९३ मध्ये औरंगाबाद येथे ज्योतिष सम्मेलन महाराष्ट्र ज्योतिष परीषदेतर्फे आयोजित केले होते. एका रंगमंदिरात हे सम्मेलन भरले होते. १००० लोकांपुढे मी पहिल्यांदाच भाषण देणार होते. ज्योतिष विश्वातील महिलांची व्याख्याने म्हणजे चेष्टेचा दुर्लक्षिलेला विषय होता. त्यामुळेही मी भाषण करायला घाबरत होते. परंतु धीराने इतर दोन वक्त्यांच्या मध्ये बसले, आधाराची ऊब घेण्यासाठी. तर संयोजकांनी येऊन सांगितले तुम्ही मध्ये बसलाच आहात तर अध्यक्षाचेही काम करा. तुमच्या भाषणासोबत इतरांच्याही भाषणाचा मागोवा घ्या. झालं! माझंच भाषण मला आठवत नव्हतं. माझा विषय होता झटपट ज्योतिष कसे सांगायचे हा. 'चहा इन्स्टंट, कॉफी इन्स्टंट, इडली इन्स्टंट, तर ज्योतिष इन्स्टंट का नको?' या वाक्याने रंगमंदिरात खळबळ उडाली आणि केवळ एकाच तीन अंकी संख्येवरून ऐनवेळी आलेल्या जातकाचे भूत, वर्तमान आणि भविष्यकाळ कसा सांगायचा याचे प्रात्यक्षिक दाखविले.

त्यानंतर पंढरपूरला माझ्या हस्ते बक्षीस समारंभ आयोजित केला होता. इतके दिवस बक्षीस घेण्यासाठी परिचित असलेली मी, इतरांना बक्षीसे देण्यातही वेगळाच आनंद मिळतो हे जाणवले. त्यावेळेस माझ्या मनात विचार आला, असेच घरोघरी ज्योतिषी जन्मले तर एक दिवस संगणक युगासारखे ज्योतिष युगही येऊ शकेल!

मुंबईच्या रुचीपालट या मासिकात वर्ष भविष्य लिहिले ते खास महिलांसाठी होते. बहुतेक पहिल्यांदाच हा नवा उपक्रम मी राबवत होते. त्यामुळे महिलांच्या काळजाचा ठाव घेण्यासाठी दिवाळीनंतर येणाऱ्या संक्रांत सणाला कुठच्या राशीच्या महिलेने काय लुटले असता वर्ष सार्थकी लागेल असे राशीभविष्य लिहिले होते. नजरचुकीने किंवा छपाई चुकीने दोन राशींसाठी काय लुटावे हे लिहिण्याचे राहून गेले. संक्रातीच्या आधी ४-५ दिवस त्या दोन राशींच्या महिलांना उत्तर देऊन दमले. एकदा मी घरी नसताना माझ्या अहोंनी फोन घेतला आणि काय लुटा हेही सांगून टाकले! नंतर मला त्या महिलेचा तुमचे पती किती चांगले आहेत. असा फोन आला.

टीव्ही स्टार व्हावं असं कोणाला

वाटत नाही? मला तर लहानपणापासूनच कॅमेराचं वेड. परंतु कधी टिव्हीवर झळकण्याचा योगच येत नव्हता. केसरीवृत्त पुणे मध्ये रोज उद्याचे भविष्य सांगणार का अशी विचारणा झाल्यावर लगेचच 'हो' म्हणाले आणि कामाला सुरुवात झाली. केवळ तीन मिनिटे टीव्हीवर दिसण्यासाठी तीन तास घालवावे लागतात हे समीकरणही कळले. कारण स्क्रीप्ट लिखाण, पाठांतर, मेकअप, ड्रेपरी आणि शूटिंग हे सर्व आपले आपणच करावयाचे होते. भविष्य सांगताना अभिनयही पाहिजे हे पहिल्यांदा कॅमेरापुढे गेल्यावर कळले. कारण बोलणारं वाक्य आणि चेहऱ्यावरील हावभाव यांचं समीकरण जुळलं पाहिजे ना. पण १५ दिवसांतच भविष्यकथन लोकांना आवडू लागले. एकदा दुकानात गेले असता असाच टीव्हीवर कार्यक्रम चालू होता. पुढे आलेली बाई माहितीची ना ओळखीची पण ती तिच्या नवऱ्याला सांगत होती, "अहो, या टीव्हीवरच्या बाईला कुठं तरी बघितलं आहे. मला वाटतं आमच्या कॉलेजमध्ये होती. पण फार शिष्ठ होती त्यावेळी!"

मी तिचे वक्तव्य ऐकून आश्चर्यचकितच झाले. त्यांना विचारले, "आपण कुठल्या कॉलेजमध्ये शिकलात?"

उत्तर आले, "गरवारे."

"अहो, या बाई एस. पी. मध्ये होत्या."

"तुम्हाला काय माहीत?"

"अहो मीच आहे ती!"

ग्रहांकीत मासिकाची मानद संपादक झाले तेव्हा एवढे लेख आले की त्या रद्दीतून कुठले लेख निवडायचे हेच कळेना. तेव्हा कळले संपादन करणे किती कठीण. मंदाश्री पुरस्कार मिळाला तेव्हा दगडे गोळा करून रांजणात टाकणाऱ्या कावळ्यासारखे हार्ड मेथड आयुष्य जगण्यापेक्षा स्ट्रॉने पाणी पिणाऱ्या कावळ्यासारखे स्मार्ट मेथडचे आयुष्य ज्योतिषशास्त्राचा उपयोग करून जगा हा दिलेला कानमंत्र सर्वांनाच आवडला.

खूप बरं वाटतं या ज्योतिष विश्वात. लोक येतात, विश्वासात घेतात, मन मोकळं करतात. दु:खाचे डोंगर घेऊन येतात व जातातही डोंगर घेऊनच. पण येतानाचा थकवा त्यांना जाताना जाणवत नाही. कारण जाताना त्यांच्याजवळ असतो मी दिलेला दिलासा व वाढविलेला आत्मविश्वास. परत कधीतरी तीच माणसे गोड पेढे व गोड बातम्या घेऊन आनंदात येतात, पण कधी कधी असही घडतं की समोरच्याचं दुष्ट चक्र त्याला सोडतच नाही. कुणाची शोकांतिका, कुणाचा अपेक्षाभंग तर कुणाचे विकलांग मनोगत मला भारावून टाकते. मन सुन्न होते. दिसू नये ते ग्रह दाखवितात, जीवनाची दुसरी बाजू. मी फक्त व्यथित होते. अश्रू ढाळण्यासाठी नेत्र आसुसतात. पण...ज्योतिषाने स्वत: रडायचं नसतं. तर इतरांचे अश्रू पुसायचे असतात. त्यामुळे मला रडताही येत नाही. जगातील सुख ही दु:खाच्या ढिगाऱ्यावरील तुळशीपत्रासारखी असतात. सुख नेहमीच जवाएवढं असतं. पण दु:ख असतं डोंगराएवढं. 'एक धागा सुखाचा, शंभर धागे दु:खाचे. जरतारी हे वस्त्र मानवा तुझिया आयुष्याचे.' असे अनेक विचार मनात येतात. इतरांचे दु:ख पाहून ओझ्याखाली दबलेले ज्योतिषाचे मन असते. आक्रोश करणारे मन तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करीत असते. शेवटी 'ज्याचे त्याचे दु:ख, ज्याचे त्याचेच असते. जावे त्याच्या वंशा तेव्हाच कळे.'




| | | |
|---|---|---|
| नाव | : | सौ. जयश्री प्रवीण बेलसरे |
| पत्ता | : | सी-७, न्यू फ्रेंडस् सोसायटी, वनाज कंपनीसमोर, पौड रोड, पुणे ३८. फोन - २५४३६६३०, २५४२३६००, ९३७११५६६६०. |
| शिक्षण | : | बी. कॉम्. |
| व्यवसाय | : | श्री ॲडव्हर्टायझर्स (ॲडव्हर्टायझिंग एजन्सी) |
| ज्योतिषीय शिक्षण | : | ज्योतिष प्रवीण, ज्योतिष प्राज्ञ, ज्योतिष भास्कर, ज्योतिष आचार्य तसेच पुणे येथील फलज्योतिष अभ्यास मंडळातर्फे 'मंदाश्री पुरस्कार'. |

कारकीर्द :
१. सेक्रेटरी, ज्योतिर्विद महासभा पुणे.
२. आयोजक, शंकर दिगंबर बेलसरे स्मृती व्याख्यानमाला आणि ज्योतिष भूषण पुरस्कार समिती.
३. विविध मासिकांतून ज्योतिषविषयक लेख, वर्षभविष्य.
४. केसरी वृत्ताच्या पुणे दूरदर्शन वाहिनीवर काही काळ 'आपला दिवस' या कार्यक्रमात भविष्यकथन.
५. गुरुकुल ज्योतिष ज्ञान पीठ, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ॲस्ट्रॉलॉजी या संस्थेत अध्यापन.
६. पंढरपूर, डोंबिवली, नाशिक, औरंगाबाद, सातारा व पुणे येथे व्याख्याने.

## वाचकांच्या अलोट प्रेमास पात्र ठरलेले आमचे खास लेखक आणि त्यांच्या काही खास कलाकृती

### रणजित देसाई



| | |
|---|---|
| **कादंबरी** | |
| स्वामी | १४० |
| श्रीमानयोगी | ३०० |
| अभोगी | १५० |
| राधेय | १२० |
| पावनखिंड | १०० |
| माझा गाव | १५० |
| समिधा | १०० |
| बारी | १२० |
| राजा रविवर्मा | १८० |
| प्रतिक्षा | ८० |
| शेकरा | ६० |
| लक्ष्यवेध | ९० |
| **कथासंग्रह** | |
| रुपमहाल | ८० |
| मधुमती | ८० |
| आलेख | १२० |
| गंधाली | १०० |
| मोरपंखी सावल्या | ६० |
| कातळ | ९० |
| मेघ | १०० |
| आषाढ | ८० |
| वैशाख | ९० |
| प्रपात | ९० |
| बाबुलमोरा | १२५ |
| मेख मोगरी | ६० |
| **ललित** | |
| स्नेहधारा | ९० |
| **संचित** | |
| (निवडक अध्यक्षीय भाषणे) | ६० |

### वि. स. खांडेकर




| | |
|---|---|
| **कादंबरी** | |
| ययाति | २०० |
| अमृतवेल | ८० |
| सुखाचा शोध | ९० |
| पहिले प्रेम | ९० |
| जळलेला मोहोर | १०० |
| नवी स्त्री | १०० |
| **कथासंग्रह** | |
| अबोली | ५० |
| सरत्या सरी | ५० |
| दवबिंदू | ६० |
| हस्ताचा पाऊस | ६० |
| ढगाआडचे चांदणे | ६० |
| फुले आणि काटे | ६० |
| पाकळ्या | ७० |
| **रूपककथा संग्रह** | |
| सोनेरी सावल्या (अनु.) | ३० |
| वेचलेली फुले (अनु.) | ५० |
| क्षितिजस्पर्श | ८० |
| सुवर्णकण (खलिल जिब्रान) (अनु.) | ८० |
| **कुमारवाङ्मय** *(कथासंग्रह)* | |
| सूर्यास्त | ३० |
| यज्ञकुंड | ३० |
| घरटे | ३० |
| अस्थी | ३० |

### आनंद यादव



| | |
|---|---|
| **आत्मचरित्र** | |
| झोंबी | २५० |
| नांगरणी | २२० |
| घरभिंती | ३०० |
| काचवेल | २२० |
| **कादंबरी** | |
| माऊली | १२० |
| नटरंग | १४० |
| **कथासंग्रह** | |
| माळावरची मैना | ११० |
| घरजावई | १०० |
| शेवटची लढाई | ९० |
| भूमिकन्या | ९० |
| झाडवाटा | ९० |
| उगवती मने | १०० |
| **वैचारिक / ललितगद्य** | |
| स्पर्शकमळे | १०० |
| पाणभवरे | १२५ |
| ग्राम संस्कृती | १२ |
| साहित्यिकाचा गाव | ९० |
| **संदर्भ ग्रंथ** | |
| ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव | ५५ |
| मराठी लघुनिबंधाचा इतिहास | ७० |
| आत्मचरित्र मीमांसा | ९० |

मेहता पब्लिशिंग हाऊस, १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी पुणे ३०



# वाचकांचा प्रतिसाद हेच माझे टॉनिक’

कलावंताचा ‘स्व’च मुळात कलावंत आणि रसिक मिळून सिद्ध झालेला असतो. त्याशिवाय का त्या योगिराज कविश्रेष्ठांनी लिहिलंय की, ‘‘वाचे बरवे कवित्व, कवित्वी रसिकत्व.’ लिहीत असताना सतत हुंकार देणारा वाचक लेखकाच्या आसपास कल्पनेत वावरतच असतो, कधी श्रोता, कधी वाचक, कधी टीकाकार, कधी चर्चा करून मूल्यमापन करणारा...ही सर्व रसिकाचीच रूपं आहेत. ‘‘रसिक हा न लिहिणारा ‘लेखक’ असतो’’

**वाचकांच्या प्रतिसादाचे कलावंताच्या आयुष्यात काय स्थान आहे?**

**लिहीत आहेत...**


| | |
|---|---|
| डॉ. आनंद यादव | ६६ |
| प्रा. रा. ग. जाधव | ७२ |
| प्रा. राम शेवाळकर | ७५ |
| प्रा. रा. रं बोराडे | ७८ |
| विजय देवधर | ८१ |
| शिरीष पै | ८४ |
| निरंजन घाटे | ८७ |
| गंगाधर महाम्बरे | ९० |
| शिवराज गोर्ले | ९२ |
| रेखा बैजल | ९६ |
| प्रा. लक्ष्मीकांत तांबोळी | १०० |
| अशोक जैन | १०३ |
| सिसिलिया कार्व्हालो | १०५ |
| बाबा कदम | १०७ |
| डॉ. लीला गोविलकर | १०९ |
| उज्ज्वला केळकर | ११२ |
| यशोधरा भोसले | ११४ |




# लेखक-वाचक : संवाद आणि नाते

**डॉ. आनंद यादव**

मी लेखक होण्याआधी प्रथम वाचकच होतो. वयाच्या दहाव्या वर्षापासून मी साहित्याचा वाचक आहे. आजही माझी वाचकाची भूमिका सुटलेली नाही. पण आरंभीची आणि आताची माझी वाचक-भूमिका बदलत गेली आहे.

अगदी आरंभी लहानपणी मला एकटेपणा खायला उठत असे. विशेषत: माळाला गुरं चारताना, शेताची राखण करताना, रात्री वस्तीला मळ्यात गेल्यावर मी एकटाच असे. त्या जीवघेण्य शांततेचा कंटाळा येई. प्रसंगी भीती वाटे. पेंग येई...हे सर्व हटविण्याची गरज असे. त्या गरजेतून मी काही वाचू लागलो.

पण या वाचनाला आकार-उकार काही नव्हता. हळूहळू त्यातूनच गोष्टींची पुस्तकं वाचण्याचा छंद लागला. माझ्या या छंदाला प्राथमिक शाळेतील दोन शिक्षकांनी दिशा दिली. पहिले शिक्षक सौंदलगेकर गुरुजी. ते स्वत: कविता करत असत. त्यांच्या घरी अनेक कवींचे कवितासंग्रह होते. ते स्वत: क्रमिक पुस्तकातील कविता आम्हाला शिकवीत. चालीवर आणि गोड गळ्यावर ते फार सुंदर रीतीने कविता म्हणत. तिच्यातील बारकावे सांगत...विशेषत: मला ग्रामीण जीवनावरच्या कविता आवडत. गुरुजींचं साभिनय कविता वाचन, विश्लेषण अधिक आवडे...मग त्या कविता मीही तशाच म्हणून दाखवीत असे...

आमच्या मोकळ्या माळावर गुरं चारताना मी त्या कविता मोठ्यानं, साभिनय म्हणत असे. माळावर एकटाच असल्यानं कशाचा संकोच वाटण्याचं काहीच कारण नव्हतं. माझ्यावर तिथं कुणाचंही बंधन नव्हतं. त्यामुळं माझ्या मनाला कविता-वाचनात विरंगुळा मिळू लागला. मी त्या कल्पनाविश्वात दंग होऊन जाऊ लागलो. कविता पाठ करू लागलो...वर्गात साभिनय, मोठ्यानं आणि मुक्त मनानं म्हणू लागलो. शिक्षकांना आणि मुलांनाही माझं कौतुक वाटू लागलं.


माझी ही खास आवड गुरुजींच्या लक्षात आली आणि त्यांनी मला ग्रामीण कवितांचे संग्रह वाचायला दिले...त्यांतील कवितांनी माझ्यासमोर ग्रामीण विश्व उलगडलं...मग मला वाटू लागलं की आपणही अशा कविता कराव्यात...आणि मग माझ्यातील वाचकाचा नकळत साहित्यिक होत गेला.

...सौंदलगेकर गुरुजींनी कवितेची आवड माझ्यात निर्माण केली तर नाईक गुरुजींनी माझ्यात गद्य वाचनाची आवड निर्माण केली... मग मी जमेल तशा कविता आणि छोट्या छोट्या नाट्यछटा लिहू लागलो.

...हे नकळत, एका अजाण उत्साहाच्या पोटी घडत होतं. मनात येणाऱ्या भावना, कल्पना, स्वप्ने, स्वाभाविकपणे तरी मुक्तपणे कवितांत गुंफू लागलो. 'र'ला 'र' आणि 'ट'ला 'ट' अशी यमकं जुळवू लागलो...माझा हा नाद-छंद पाहून गुरुजींनी गण, मात्रा, चरण, लय, ताल, लघु-गुरू यांची मला खास माहिती दिली. संध्याकाळी, रात्री त्यांच्या घरी जाऊ-येऊ लागलो. त्यांना कविता दाखवू लागलो...ते त्या सुधारून देऊ लागले. नाईक गुरुजीही नाट्यछटा सुधारून देऊ लागले. शाळेच्या वेगवेगळ्या कार्यक्रमात माझ्याकडून त्या साभिनय सादर करून घेऊ लागले...यांतून माझ्या मनात एक वेगळं भावविश्व तयार होऊ लागलं. ते मला वास्तवातील, व्यवहारातील विश्वापेक्षा जवळचं वाटू लागलं. माझ्या स्वप्नातलं वाटू लागलं. त्यातील पात्रे किंवा माणसे मला खास माझी, मी माझ्या मनाप्रमाणे घडविलेली वाटू लागली, माझ्या अंतर्मनाशी, माझ्या भावूक प्रकृतीशी नाते सांगू लागली...मग मी त्यांच्याच विश्वात रमू लागलो. सारांश, माझ्यातील वाचकातूनच साहित्यिक जन्माला आला....

हे एवढ्यासाठी सांगितले की माझ्या आरंभीच्या साहित्याचे पहिलेवहिले सन्मान्य वाचक माझे गुरुजनच होते...ते नुसते वाचकच नव्हते तर माझ्यातील साहित्यिकाला घडवणारे, एका अर्थी त्याला सुदृढ, सशक्त करणारे, नवा जन्म देणारे माझ्यातील साहित्यिकाचे जनक-बापच होते...मला वाटते हेच नाते साहित्यिक आणि वाचक यांचे असते...चांगला वाचक साहित्यिकाला कमी-अधिक प्रमाणात घडवतो, त्याला नव्या लेखनासाठी प्रेरणा, प्रोत्साहन देतो.

...नंतरच्या एक तपाच्या काळात, म्हणजे मी एस. एस. सी. होईपर्यंतच्या काळात माझ्या साहित्याचा केवळ मीच एकटा वाचक होतो...माझं भावूक, स्वप्निल मन मला हव्याहव्याशा वाटणाऱ्या विषयांवर कविता लिहीत असे आणि त्याच कविता पुन:पुन्हा वाचत त्यात रंगून, रमून जात असे...स्वत:च्याच प्रतिमेवर प्रेम



करणाऱ्या नार्सिससससारखी माझी ती अवस्था होती...माझी कविता वाचताना आपण किती सुंदर लिहितोय असं वाटून, मी माझ्यातील कवीवर प्रेम करू लागलो. मोठमोठ्या कवींच्या कविता वाचून माझ्यातील कवींचं भरण-पोषण करू लागलो. इतरांच्या कविता वाचताना माझ्या कवितांची तुलना त्या कवींशी करू लागलो. त्यांची कविता माझ्या कवितेपेक्षा सरस का वाटते, याचा शोध पुन्हा चिकित्सक वाचन करून घेऊ लागलो...चांगला कवी, साहित्यिक हाही एक चांगला, चिकित्सक वाचक असतो; त्याच्यातील सुजाण, डोळस वाचकच त्याच्यातील साहित्यिकाला घडवीत असतो, हे मला कळून चुकलं.

नंतरच्या काळात कॉलेजमध्ये गेल्यावर माझ्यातील लेखक-वाचक या नात्याला आणखी एक नवीन परिमाण लाभलं. त्या काळात म्हणजे मी वयाची विशी ओलांडल्यानंतरच्या काळात माझ्या भाग्यामुळे मला पु. ल. देशपांडे, सुनीताबाई देशपांडे, डॉ. अनुराधा पोतदार, वि. द. घाटे, श्री. बा. रानडे, वि. स. खांडेकर, प्रा. रा. वा. चिटणीस, प्राचार्य य. द. भावे यांच्यासारखी साहित्यिक, कवी, प्राध्यापक मंडळी वाचक म्हणून लाभली...साहित्यक्षेत्रातील ही सगळी वडीलधारी, जाणकार मंडळी होती...यांनी माझ्या कविता वाचल्या. त्यांच्याविषयी मोकळेपणानं चर्चा केली. माझ्या कवितेच्या मर्यादा सांगता सांगताच तिची बलस्थानं, वैशिष्ट्येही सांगितली...त्या दिशांनी पुढे जाण्यास मला सुचवलं. काही मान्यवर कवींच्या संग्रहांचं वाचन करण्यास सांगितलं...'लिहीत राहा' म्हणून प्रोत्साहन दिलं. ह्या गुरुतुल्य वाचकांच्या मार्गदर्शनामुळं माझी त्यानंतरच्या काळातील कविता अधिकाधिक वेगळं, प्रौढ रूप धारण करत गेली...जणू या वाचकांनी माझ्यातील साहित्यिक कवीला पुनर्जन्म दिला. वहीत पडून असलेल्या माझ्या कवितेला साहित्याच्या सार्वजनिक क्षेत्रात आणण्यास मदत केली...लेखक-वाचकाचं असंही नातं असू शकतं हे माझ्या लक्षात आलं.

साहित्याच्या आवडीमुळं मी बी. ए. आणि एम. ए. साठी 'मराठी साहित्य' हा प्रमुख विषय घेतला. अनेक साहित्य-कृती अभ्यासासाठी वाचल्या. त्यामुळे माझ्यातील वाचक आणि लेखक दोघेही जाणते झाले. चांगल्या, निवडक, प्रसिद्ध आणि साहित्यक्षेत्रात प्रतिष्ठा पावलेल्या साहित्यकृती वाचाव्या लागल्याने मी जसा चांगला वाचक म्हणून अधिक सुबुद्ध, सुजाण होत गेलो; तसा लेखक या नात्यानेही चांगले साहित्यलेखन कसे करावे; या अंगानेही घडत गेलो. साहित्यकृतीचे अंतरंग कळत गेले. त्या अंतरंगाचे विविध घटक कोणकोणते असतात, हेही कळत गेले.

**एखादी साहित्यकृती वाचताना तिची सामाजिक, मानसशास्त्रीय, सांस्कृतिक, तात्त्विक, धार्मिक अंगेही मला समजून घेता येऊ लागली. त्यामुळे मी साहित्याचा नुसता 'वाचक' न राहता 'समीक्षक' या नात्याने तिची समीक्षाही करू लागलो. मला वाटते, 'वाचका'ची पुढची विकसित पायरी 'समीक्षक' ही असते.**

याच काळात साहित्यिक आणि सुजाण वाचक म्हणून जगायचे असेल तर समाजशास्त्र, मानसशास्त्र, संस्कृती, तत्त्वज्ञान, धर्म यांचीही ओळख नीटपणे होण्याची गरज आहे. हे कळल्याने त्याविषयीचे अनेक वैचारिक, शास्त्रीय, ग्रंथही वाचत गेलो. त्यांचे ज्ञान आत्मसात केल्याने 'वाचक' म्हणून मी अधिक विकसित झालो. एखादी साहित्यकृती वाचताना तिची सामाजिक, मानसशास्त्रीय, सांस्कृतिक, तात्त्विक, धार्मिक अंगेही मला समजून घेता येऊ लागली. त्यामुळे मी साहित्याचा नुसता 'वाचक' न राहता 'समीक्षक' या नात्याने तिची समीक्षाही करू लागलो. मला वाटते, 'वाचका'ची पुढची विकसित पायरी म्हणजे 'समीक्षक' ही असते.

या वाचनाने आणि अभ्यासाने माझ्यातील लेखकही अधिक सुजाण, गंभीर, विचारी झाला...त्यावेळी माझ्या हळूहळू लक्षात आले की केवळ स्फुट, भावकविता यांचे लेखन समाजाच्या सर्वांगांना, सर्व प्रकारच्या मानवी जीवनाला आणि जीवन व्यवहाराला स्पर्श करायला, सामावून घ्यायला अपुरे पडते. त्यासाठी साहित्याचे सगळेच प्रकार, आकृतिबंध आपण हाताळायला शिकले पाहिजे...असे वाटून मी एम. ए. झाल्यावर बहुतेक सर्व साहित्य प्रकारांतून निर्मिती करू लागलो...त्यांचा पहिला वाचकही मीच होऊन, माझ्यातील साहित्यिकाला मदत करू लागलो. त्याच्या साहित्यनिर्मितीत सहभागी होऊ लागलो...त्यावेळी माझ्या लक्षात आले की, लेखक हा जसा साहित्यनिर्माता असतो; तसा तो चांगला वाचकही असावा लागतो. तरच त्याच्या साहित्याची निर्मिती नेटकी होऊ शकते.

मी ज्युनिअर एम. ए. ला असताना माझी आणि कथाकार व. ह. पिटके यांची ओळख झाली. त्यांना मी माझ्या कवितांची वही वाचायला दिली. त्यांनी ती वाचली. माझ्या त्या ग्रामीण कवितांचं तोंड भरून त्यांनी कौतुक केलं आणि मला ते हस्तलिखित सुवाच्य अक्षरात लिहून राज्यपातळीवरील सरकारी पुरस्कारासाठी पाठविण्यास सांगितलं. त्यावेळी राज्यसरकार हस्तलिखितांनाही पुरस्कार देत असे... योगायोगानं १९६० साली माझ्या हस्तलिखित कवितासंग्रहाला पुरस्कार मिळाला आणि तो संग्रह १९६० सालीच 'हिरवे जग' या मथळ्याखाली प्रसिद्ध झाला...आणि मी कवी म्हणून प्रसिद्धीला आलो. दरम्यानच्या काळात मी सीनियर एम. ए. चा विद्यार्थी होतो.

१९६१ साली एम. ए. झालो आणि

जून १९६१पासून मी मराठी-संस्कृतचा प्राध्यापक म्हणून पंढरपूरला कॉलेजमध्ये रुजू झालो.

तिथं थोडं स्वास्थ्य मिळाल्यामुळे मी जाणीवपूर्वक गद्यलेखनाकडं वळलो. १९६१ च्या 'सत्यकथे'च्या दिवाळी अंकात माझी पहिली कथाही प्रसिद्ध झाली...तेथून पुढेच माझा आणि वाचकाचा नव्हे; तर वाचकवर्गाचा खरा संबंध येऊ लागला.

प्रसिद्ध न झालेल्या लेखनाचा किंवा साहित्याचा वाचकवर्ग आणि प्रसिद्ध झालेल्या साहित्याचा वाचकवर्ग सामान्यत: वेगवेगळा असतो. पहिला वर्ग परिचित असतो, स्नेहसंबंधातील असतो; तर दुसरा वर्ग बहुधा अनोळखी, केवळ वाचनाशी संबंधित आणि अपरिचित असतो. काहीसा तटस्थपणे मते व्यक्त करणारा असतो. सामान्यपणे हा दुसऱ्या प्रकारचा वाचकवर्गच आपणांस अभिप्रेत असतो.

१९६२ पासून माझ्या ग्रामीण कथा 'सत्यकथा'सारख्या मान्यवर, प्रयोगशील वाङ्मयीन मासिकातून सातत्यानं प्रसिद्ध होऊ लागल्या. तोपर्यंतच्या ग्रामीण मराठी साहित्यात, काहीशा वेगळ्या वळणाच्या त्या कथा होत्या. त्यामुळं 'सत्यकथे'च्या जाणकार वाचकवर्गाचं त्या लक्ष वेधून घेत होत्या. तशात मी १९६३ च्या जूनमध्ये पुण्यातील श्री शाहू मंदिर महाविद्यालात मराठीचा प्राध्यापक म्हणून रुजू झालो. पुण्यातच 'शिवाजीनगर' भागात राहू लागलो. त्यावेळी पुण्यातून अनेक मासिकं वेगवेगळ्या स्वरूपात निघत होती. अनेक साहित्यिक हिरीरीने कथालेखन करत होते. त्यात वडीलधारे वरिष्ठ होते, आघाडीचे प्रस्थापित होते, तसे उत्साहानं लिहिणारे तरुण साहित्यिकही पुष्कळ होते. संपादकही अशाच प्रकारचे होते...समृद्ध वाङ्मयीन वातावरण होतं. अनेक प्रकाशक आणि प्रकाशनसंस्थाही होत्या.

या सर्वांचा परिणाम असा झाला होता की पुण्यात एक सुजाण, सुबुद्ध, कलाजाणीव असलेला वाचकवर्ग तयार झाला होता...पुण्याच्या या वाचकवर्गाची खास शान होती. एखाद्या पुस्तकाला, साहित्यकृतीला त्याची मान्यतापावती मिळाली तर ती साहित्यकृती, ते पुस्तक किंवा तो साहित्यिक मराठी मुलखात 'मान्यता पावलेला' समजला जात असे.

हळूहळू अशा संपादक-प्रकाशकांत लेखक-वाचक वर्गात मी मिसळू लागलो. त्यांच्यात वावरू लागलो. त्यांच्या चिकित्सक दृष्टीचं लक्ष माझ्याकडे गेले. माझ्या 'सत्यकथे'तील कथांची चर्चा होऊ लागली. 'कथी बरी आहे' पासून ते 'कथा छान जमली आहे' पर्यंत माझ्या कथांविषयी 'शेरे' मिळू लागले...त्यातूनच माझ्या एखाद्या कथेविषयी तपशीलवार चर्चा मित्रमंडळीत माझ्या साक्षीनंच होऊ लागली. यात माझ्यापेक्षा वडीलधारे, जाणकार, डोळस साहित्यिकही असत...त्यांच्या ह्या मतांचा चर्चांचा माझ्या साहित्यिक मानसिकतेवर परिणाम होत असे. त्यातून माझी वाङ्मयीन जडणघडण अधिकाधिक होत चालली. कथानिर्मितीविषयी मी अधिक डोळस, अधिक जाणता होऊ लागलो. नव्या जोमानं, नव्या दृष्टीनं नव्या कथा लिहू लागलो...डोळस, चिकित्सक वाचकाच्या मताचा लेखकाच्या तद्नंतरच्या निर्मितीवरही परिणाम होतो, असा मला साक्षात पडताळा त्या काळात आला. त्याबरोबरच माझा माझ्या साहित्यनिर्मितीवरचा विश्वासही वाढत गेला...आपण बऱ्यापैकी एक साहित्यिक आहोत, याची जाणीवही निर्माण होत गेली. त्यातून माझी पुढील वाङ्मयीन दिशा आणि वाटचाल अधिक निश्चित होत गेली. आत्मविश्वास वाढत गेला.

**माझ्या 'सत्यकथे'तील कथांची चर्चा होऊ लागली. 'कथा बरी आहे' पासून ते 'कथा छान जमली आहे' पर्यंत माझ्या कथांविषयी 'शेरे' मिळू लागले...त्यातूनच माझ्या एखाद्या कथेविषयी तपशीलवार चर्चा मित्रमंडळीत माझ्या साक्षीनंच होऊ लागली.**

आत्मविश्वासाच्या या वाढीला वाचक वर्गातून एक तात्कालिक महत्त्वाचं कारण घडलं.

१९६५च्या जानेवारी महिन्याची ती एकवीस तारीख होती. नाटकाचे आणि नाट्यशास्त्राचे ज्येष्ठ समीक्षक के. नारायण काळे त्यादिवशी संध्याकाळी माझ्या 'मोट' ह्या कथेवर म. सा. परिषदेत टिपण वाचणार होते. दर महिन्याच्या तिसऱ्या गुरुवारी अशी बैठक घेण्याचे ठरले होते. हा दुसरा कार्यक्रम होता. फक्त निवडक जाणकार लोकांनाच निमंत्रण असे. त्यात प्रामुख्याने जाणकार वाचक-समीक्षक होते. ते मूळ कथेवर आणि टिपणावर चर्चा करणार होते.

१९६२ च्या जूनमध्ये मी पुण्याच्या श्री शाहू मंदिर महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून रुजू झालो. 'सत्यकथे'तून १९६२ पासून कथा लिहीत होतो. अजून एकही कथासंग्रह प्रसिद्ध झालेला नव्हता. या पार्श्वभूमीवर १९६४ च्या सत्यकथा दिवाळी अंकात माझी 'मोट' ही ग्रामीण कथा प्रसिद्ध झाली होती...मी नुकताच पुण्यात आल्यामुळे मी कोण, कुठचा याविषयीची फारशी माहिती साहित्यक्षेत्रातील वडीलधाऱ्या मंडळींना नव्हती. मला निमंत्रणही नव्हतं. पण मी माझे मित्र प्रा. स. शि. भावे यांच्या सांगण्यावरून त्या कार्यक्रमास गेलो होतो. अगदी पाठीमागच्या बाजूस अंग चोरून बसलो होतो. पुढे बसलेल्या लोकांत तत्त्वज्ञानाचे प्रा. दे. द. वाडेकर, प्रा. अरविंद गं. मंगरूळकर, प्रा. अनुराधा पोतदार, प्रा. गंगाधर जोगळेकर, प्रा. अरविंद कुलकर्णी, वि. द. घाटे आणि मुख्य म्हणजे पु. ल. देशपांडे बसले होते. आणखी बरेच मान्यवर होते...ही मंडळी पाहून माझ्यावर मानसिक दडपण आलं होतं...आता आपल्या 'मोट'ह्या कथेच्या चिंधड्या उडणार. तिचे धिंडवडे

निघणार. हे जाणकार समीक्षक-वाचक जे काही उलट-सुलट भाष्य करतील, ते आपणांस सोसावं लागणार...तेव्हा आपण कुणालाच पत्ता नाही ते पार मागच्या मोकळ्या खुर्चीवर बसून मुकाटपणे ऐकू या आणि चर्चा झाली की हळूच उठून निघून जाऊ या, या इराद्याने मी पाठीमागं संकोचानं अंग चोरून बसलो होतो...हे सर्व सांगण्याचा हेतू असा की गंभीर, ज्येष्ठ वाचकवर्गासमोर नवख्या, तरुण, अननुभवी साहित्यिकाची कशी घाबरगुंडी उडू शकते, याची थोडी कल्पना यावी... साहित्यिकही वाचकांना दबून असतो, त्यांच्या मतामतान्तरांना तोंड द्यायला असमर्थ असतो. त्याच्या मनावर वाचकवर्गाचा वचक असू शकतो. कारण वाचकाने अनेक प्रकारच्या साहित्यकृतींचं वाचन केलेलं असतं. त्यामुळे जाणकार वाचकाला साहित्यिकापेक्षा अधिक साहित्यकृतींची माहिती असू शकते, याची जाणीव स्वत: साहित्यिकाला असते - या कार्यक्रमात मला गंभीर वाचकाच्या सखोल जाणिवांचा आणि ज्ञानाचा असा पडताळा आला.

अतिशय गंभीर विचार करणारं चिकित्सक टिपण के. नारायण काळे यांनी वाचलं. ते माझ्या कथेचं अंतरंग उलगडून दाखविणारं, बारीकसारीक पैलू उलगडून दाखविणारं होतं...मलाही ते पैलू प्रथमच कळत होते. त्यावर उलटसुलट चर्चा भरपूर झाली. पण एकूण सूर अनुकूलतेचा होता. मला दिलासा देणारा होता. (पुढे हे टिपण आणि त्यावरील चर्चेचा आढावा सत्यकथा, मार्च १९६५ च्या अंकात प्रसिद्ध झाला होता. त्यामुळे मला ते नीटपणे समजून घेता आले.) ...त्यामुळे माझ्या कथालेखनाविषयी माझा आत्मविश्वास वाढत गेला आणि मी झपाट्याने लेखन करू लागलो...वाचकवर्गाचा असाही प्रभाव पडू शकतो.

१९६६ पासून हळूहळू माझी ललित साहित्याची पुस्तके प्रसिद्ध होऊ लागली. त्यांवर त्या कालानुसार तुरळक परीक्षणे येऊ लागली. ती बहुधा अनुकूल असत. आस्वादक वृत्तीनं लिहिलेली असत...त्यामुळं माझ्यासारख्या त्यावेळच्या तरुण लेखकाचा लेखकीय अहंकार गोंजारला जात असे. परिणामी मी साहित्यिक-वर्तुळात आत्मविश्वासपूर्वक वागू लागलो. एखाद्या प्रश्नावर, विवाद्य मुद्द्यावर विश्वासानं मत व्यक्त करू लागलो...माझ्या नकळत माझ्या वाचकवर्गानं आणि समीक्षकांनी मला माझी आत्मप्रतिमा (आयडेंटिटी) निर्माण करून दिली.

१९६० साली माझे 'हिरवे जग' हे कवितांचे पहिले पुस्तक प्रसिद्ध झाले. नंतर पाच-सहा वर्षे एकही पुस्तक प्रसिद्ध झालं नाही. १९६६ पासून मात्र दोन-अडीच वर्षांच्या अंतराने माझी पुस्तके प्रसिद्ध होऊ लागली. त्यामुळं साहित्यक्षेत्रात मला स्थैर्य प्राप्त होत गेलं. एक तरुण उमदा मराठी साहित्यिक म्हणून मी ओळखला जाऊ लागलो. १९७१ साली 'गोतावळा' या कादंबरीनं त्यावर शिक्कामोर्तब केलं.

**येथून पुढं समीक्षक वाचक वर्गाच्या आपल्याविषयी वाढलेल्या अपेक्षांची आपणास परिपूर्ती करावी लागणार, आपल्याविषयीच्या वाचकांच्या मनातील विश्वासाला आपणास पात्र व्हावे लागणार, त्यादृष्टीनं अधिक जबाबदारीनं आपण लेखन केलं पाहिजे, असं मला वाटू लागलं.**

'गोतावळा' हे माझं क्रमानं चौथं पुस्तक. तोपर्यंत या चारही पुस्तकांना महाराष्ट्र शासनाचे पाच पुरस्कार मिळाले होते. 'खळाळ' या कथासंग्रहाला प्रथम प्रकाशनाचा पुरस्कार आणि प्रौढ साहित्य प्रकारातील पुरस्कार असे दोन मिळाले...त्यामुळे मी लक्षवेधी साहित्यिक झाला होतो.

अशा रीतीने मला एका अर्थी शासकीय मान्यता मिळाली होती. माझ्या पुस्तकांवर परीक्षणे येत होती, वाचकांची पत्रेही तुरळक प्रमाणात का असेनात; पण येत होती. पण 'गोतावळा' कादंबरीनं वाचक-समीक्षक वर्गात मला खरी मान्यता मिळवून दिली. अनेक समीक्षकांनी 'गोतावळा'ची कसून आणि भरघोस समीक्षा केली. कादंबरी क्षेत्रात ती महत्त्वाची कादंबरी मानली गेली. कॉलेजच्या अभ्यासक्रमात तिचा प्रसिद्धीनंतरच्या पहिल्या वर्षातच समावेश झाला. तिच्यावर परिसंवाद झाला...त्या कादंबरीच्या या लोकप्रियतेमुळं 'गोतावळा : साद आणि प्रतिसाद' या शीर्षकाचं समीक्षा लेखांचं पुस्तक प्रसिद्ध केलं गेलं...वाचकवर्गानंही भरभरून पत्रं लिहिली. गोतावळानं भरपूर प्रसिद्धी दिली...वाचकांची पत्रे आणि टीकाकारांची समीक्षणे, हे त्याचे पुरावे होते.

वाचक-समीक्षकांच्या या प्रतिसादामुळं एक साहित्यिक म्हणून माझी जबाबदारी वाढली. येथून पुढं समीक्षक वाचक वर्गाच्या आपल्याविषयी वाढलेल्या अपेक्षांची आपणास परिपूर्ती करावी लागणार, आपल्याविषयीच्या वाचकांच्या मनातील विश्वासाला आपणास पात्र व्हावे लागणार, त्यादृष्टीनं अधिक जबाबदारीनं आपण लेखन केलं पाहिजे, असं मला वाटू लागलं.

याच काळात साहित्यकलेविषयी तात्त्विक स्वरूपाचे नवनवे विचार सैद्धांतिक पातळीवर मांडले जात होते. ते मी काळजीपूर्वक अभ्यासत होतो. त्यावर चिंतन करत होतो...साहित्य कलेचं खास वेगळेपण आणि तिचे अंतर्बाह्य स्वरूप, त्याचं प्राणतत्त्व इत्यादी समजून घेत होतो...हे सर्व साहित्यनिर्मितीला उपकारक कसं होईल, याचा ध्यास घेत होतो. ते आत्मसात करतकरतच साहित्यनिर्मिती करत होतो...जे काही वेगळं, नावीन्यपूर्ण, अनोखं सांगावयाचं आहे, तेच आणि तेवढंच आपण सांगावं, असा जणू मी त्या काळात ध्यासच

घेतला. त्याचबरोबर कलात्मकता म्हणजे नेमके काय ते समजून घेतलं. समृद्ध अनुभवाचे घटक समजून घेतले. अनुभव चैतन्यपूर्ण, प्रत्ययकारी होण्यासाठी अनुभवाच्या कोणकोणत्या घटकांवर लक्ष केंद्रित करावं लागतं, हे जाणून घेतलं...आणि गंभीरपणे आत्मनिष्ठ वृत्तीनं साहित्यनिर्मितीकडं वळलो...आपण नुसती साहित्यनिर्मिती लोकप्रियतेसाठी करावयाची आहे; एक जाणकार कलावंत साहित्यिक म्हणून आपले समाधान होईपर्यंत तिचं लेखन पुन:पुन्हा करावं लागलं तरी ते करायचंच; अशी खूणगाठ मनाशी बांधून मी साहित्यनिर्मिती करू लागलो.

– 'गोतावळा' नंतरच्या बहुतेक साहित्यकृती मी याच प्रेरणेनं निर्माण करत गेलो. 'गोतावळा'ला प्रसिद्धी आणि प्रतिष्ठा मुक्तपणे मिळत गेली. त्यामुळंही लेखनाचा माझा उत्साह वाढत गेला. मी झपाट्यानं लेखन करू लागलो. अनेक पाठ्यपुस्तकांत, क्रमिक पुस्तकांत, निरनिराळ्या अभ्यासक्रमांत, निरनिराळ्या विद्यापीठांत माझी पुस्तके अभ्यासासाठी योजली किंवा लावली जाऊ लागली. निरनिराळ्या भाषांत साहित्यकृतींची भाषान्तरे होऊ लागली, आकाशवाणीवर क्रमाने वाचन किंवा नाट्यरूपान्तरे ध्वनिक्षेपित होऊ लागली, दूरदर्शनवरही कार्यक्रम होऊ लागले.

...या सर्वांमुळे माझा वाचकवर्ग वाढला. विद्यार्थी, शिक्षक, श्रोते, प्रेक्षक, सर्वसामान्य नागरिक यांच्याकडून मला पत्रे जाऊ लागली...वाचकवर्गाचा प्रतिसाद भरपूर मिळू लागला...आवश्यक त्या वाचकांना मी उत्तरेही देऊ लागलो. त्यांचे आभार मानू लागलो...त्यांच्या प्रतिसादामुळं लेखनाचा उत्साह वाढतो हे तर खरेच. पण वाचकाचे पत्र आले की मन प्रसन्न राहते. दिवस आनंदात जातो. मनावरचे इतर प्रापंचिक, व्यावहारिक, तात्कालिक स्वरूपाचे ताण नाहीसे होतात किंवा बाजूला फेकले जातात...आपण कुणाच्या तरी आयुष्यात आनंद निर्माण करू शकतो, या कल्पनेनंच जीवनाचं सार्थक झालं, असं वाटतं. त्यामुळं मला 'वाचक' आवडतात. त्यांना वाचनाची प्रेरणा देण्यासाठी मी त्यांच्या मन:पूर्वक लिहिलेल्या पत्रांना पत्रोत्तरे देतच असतो...अगदीच बालिश, बावळट पत्रे असतील तर त्यांना सहसा उत्तरे देत नाही.

वाचकांच्या पत्रांवरून सामान्यपणे मला त्यांची वाङ्मयीन जाण, योग्यता किंवा वाङ्मयीन प्रकृती कळू शकते. त्या दृष्टीने पाहिले तर अनेक प्रकारचे वाचक असतात, असे दिसून येते. मात्र सर्वच वाचकांना लेखकाशी संवाद साधण्याची इच्छा असते. त्यातून साहित्यिकाशी मैत्री झाली तर त्यांना सात्त्विक आनंद होतो.

**अर्धसमीक्षक वृत्तीचेही बरेच वाचक असतात. ते आपल्याला साहित्यकृती का आवडली; त्याचे चिंतन करून मगच पत्रे लिहितात. अशी पत्रे विशेष आवडतात... अशा वाचकांतच एखादा जाणकार वाचक असा असतो की त्याचे पत्र मलाच विचार करायला लावते.**

अनेक प्रकारचे वाचक असतात...काही वाचक स्वत:च्या मनावर साहित्यकृतीचा परिणाम कसा आणि कोणता झाला, एवढेच लिहितात. 'साहित्यकृती वाचताना भारून गेलो. डोळ्यांत अश्रू डबडबले. शहारे आले. तरीही भान हरपून वाचतच राहिलो. वेळ कसा गेला ते कळलंच नाही.' इत्यादी लिहितात. 'असं झाल्यामुळं तुमची साहित्यकृती मला फार फार आवडली. त्यासाठी तुमचं अभिनंदन'असा शेवट करून पत्रं संपवितात.

एखाद्या साहित्यकृतीत स्वत:चे आयुष्य समान्तरपणे शोधणारेही वाचक असतात. विशेषत: माझ्या 'झोंबी' विषयीच्या वाचक पत्रांत, असे अनेक वाचक भेटतात. त्यामुळेच त्यांना ही साहित्यकृती विशेष आवडते.

पण बहुसंख्य वाचक साहित्यकृतीचे प्रांजळपणे रसग्रहण करणारे असतात. त्या अंगाने ते तिचे गुणगान करत असतात.

अनेक वाचकांना असे विश्लेषण, रसग्रहण करायचे असते; पण ते जमत नाही. म्हणून पुष्कळ वाचक साहित्यकृतीचा थोडक्यात सारांश देतात आणि 'म्हणून मला ती खूप आवडली' असे शेवटी लिहितात.

अर्धसमीक्षक वृत्तीचेही बरेच वाचक असतात. ते आपल्याला साहित्यकृती का आवडली; त्याचे चिंतन करून मगच पत्रे लिहितात. अशी पत्रे विशेष आवडतात...अशा वाचकांतच एखादा जाणकार वाचक असा असतो की त्याचे पत्र मलाच विचार करायला लावते.

क्रमिक पुस्तकातील किंवा पाठ्यपुस्तकातील माझी साहित्यकृती वाचून अनेक विद्यार्थी 'पाठ आवडला' म्हणून कळवणारे असतात. 'भाकरीचं झाड' हा माझा पाठ वाचून त्या वर्गातील सर्वच मुलांनी स्वतंत्रपणे पत्रे लिहून ती गुरुजींना दाखविली आणि मला त्या पत्रांचा बिंडा पाठविला. असे दोनतीन शाळांत पाठ घेतले आणि ती पत्रे मला पाठविली व त्यांतील प्रत्येक मुलाने माझ्या हस्ताक्षरातील, माझ्या सहीचे पत्र मागितले. असे उपक्रम शाळांतून घेतले.

'पाटी आणि पोळी' हा माझा पाठ वाचून, त्या वर्गातील मुलांनी प्रत्यक्ष उपक्रम केले. हे विद्यार्थी पुण्याच्या हायस्कूलमधील होते. त्यांनी दिवाळीच्या सुटीच्या अगोदरच्या काळात खेड्यांतील गरीब विद्यार्थ्यांसाठी खाऊ, पुस्तके, कपडे बरोबर घेतले आणि खेड्यांतील शाळांना भेटी दिल्या. नेलेल्या वस्तू विद्यार्थ्यांना भेट दिल्या. शिंपीकाम करणाऱ्या मराठवाड्यातील एका तरुण वाचकाने माझे साहित्य आवडीने आणि श्रद्धेने वाचले. त्याने वर्षभर मला रोज एक पत्र अशी ३६५ पत्रे पाठविली...पूजा बांधण्याचा हा एक प्रकार होता. मला त्याच्या श्रद्धेचं

कौतुक वाटलं.

एक विद्यार्थी तर 'झोंबी', 'नांगरणी' हे आत्मचरित्राचे भाग वाचून घरातून बाहेर पडला आणि चक्क माझ्या घरी पुण्याला राहायला आला. नागपूर विभागातला हा मुलगा होता. त्याला आर्ट्स शाखेचं शिक्षण घ्यायचे होते; पण त्याच्या वडिलांनी त्याला सक्तीने इंजिनिअरिंग साईडला घातले होते. त्यामुळे तो नाराज होऊन घरातून बाहेर पडला होता.

दुसऱ्या एका विद्यार्थ्याला मराठी पुस्तके वाचण्याची त्याच्या वडिलांनी बंदी केली होती. तो इंग्लिश माध्यमाच्या शाळेत शिकत होता. म्हणून त्याने मला त्याच्या शाळेवर पत्रोत्तर पाठविण्यास आणि त्याचा पत्ता 'इंग्रजी'मधून लिहिण्यास मला पत्रातून सांगितले होते.

शहरातील अनेक विद्यार्थी वाचकांनी, स्त्रीवाचकांनी 'झोंबी-नांगरणीतील' जीवन प्रत्यक्षात घडणे' अशक्य आहे...एवढे दारिद्र्य असूच शकत नाही...बाप कधी मुलाला शाळा शिकू नको म्हणून सांगेल काय? अशा प्रकारचे प्रश्न वाचक या नात्याने विचारले होते...मला त्यांची कीव आली.

– सारांश, असेही वाचक असू शकतात. तर विशेषत: झोंबी-नांगरणी ही पुस्तके वाचून दारिद्र्यावर मात करण्याची आणि काही झाले तरी शेवटपर्यंत शिक्षण घेण्याची अनेक विद्यार्थी वाचकांना प्रेरणा मिळाली आहे...अशी वाचकपत्रे ग्रामीण विभागांतून फार फार येतात. अशी पत्रे माझ्याकडे शेकड्यांनी आहेत. निदान तीन-चार हजार तरी असतील. ही पत्रे वाचून मला जे समाधान मिळते त्याला तोड नाही. साहित्याचा परिणाम तरुण पिढीवर कसा होतो किंवा त्यांना साहित्याचे वाचन कसे घडवू शकते, साहित्य त्यांना प्रेरणा कशी देऊ शकते; याचे ते साक्षात पुरावे आहेत, असे मला वाटते. त्यामुळे आत्मचरित्राचे चार भागांत मी लेखन केले, याचे सार्थक झाले, अशी माझी धारणा आहे.

समीक्षक हाही मूलत: वाचकच असतो. विधायक वृत्तीची, विश्लेषक आणि चिकित्सक समीक्षा मला मनापासून आवडते. कारण ती साहित्यकृतीचे मूल्यमापन आस्वादक वृत्तीने करत असते. अशी समीक्षा सामान्य वाचकाला आणि साहित्यिकालाही मार्गदर्शक, साहाय्यक ठरू शकते. माझ्या साहित्यावर विपुल समीक्षा झाली आहे. त्याबाबतीतही मी भाग्यवान आहे...पण अनेक समीक्षक तटस्थपणे, अलिप्तपणे समीक्षा करून साहित्यकृतीचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करावे, अशा मताचे असतात. ते साहित्यकृतीचा पंचनामा करतात किंवा 'पोस्टमार्टेम' करतात, असे मला वाटते. असे समीक्षक मला आवडत नाहीत. कारण ते त्यांच्या नकळत स्वत:लाच स्थापन करण्यासाठी अशा प्रकारची भूमिका घेत असतात, असे माझे स्पष्ट मत आहे. सुदैवाने असे समीक्षक माझ्या साहित्यकृतींच्या वाटेला फिरकले नाहीत. साहित्यकृतीपेक्षा समीक्षक श्रेष्ठ असतो, अशा मानभावी वृत्तीतून ही समीक्षा आकाराला येते, असे मला वाटते. मित्र-अमित्र जाणूनही पुष्कळ समीक्षक समीक्षा करताना दिसतात. साहित्यिकाला 'अजाण वत्स' समजून त्याच्या पाठीवर वडीलधारेपणाची, श्रेष्ठतादर्शक थाप मारण्याचाही प्रकार, अनेक समीक्षणांतून दिसत असतो...अनेक समीक्षक एककल्ली असतात. विशेषत: चळवळीत सापडलेले काही समीक्षक असे असतात.

**सामान्यपणे समीक्षकाच्या समीक्षेपेक्षा केवळ वाचक असलेल्या वाचकांची पत्रे मला विशेष आवडतात. प्रसिद्धीसाठी तो पत्रलेखन मुळीच करीत नसतो. जिवलग संवाद साधावा, आपल्या रसिक मनाची दाद साहित्यिकाला द्यावी, साहित्यिकाशी चार शब्द बोलावेत, जवळीक साधावी एवढाच हेतू त्या वाचकाचा सामान्यपणे असतो.**

मला प्रांजळ समीक्षा मनापासून आवडते. विद्वत्तेचा आव आणणारी छुपी, अंहकारनिष्ठ समीक्षा आवडत नाही.

सामान्यपणे समीक्षकाच्या समीक्षेपेक्षा केवळ वाचक असलेल्या वाचकांची पत्रे मला विशेष आवडतात. माझ्या मनावर त्यांचा विशेष परिणाम होतो. कारण नाही म्हटले तरी समीक्षक आपल्या समीक्षेच्याद्वारे प्रसिद्धी मिळवून स्वत:लाच स्थापन करण्याचा, आपले वेगळेपण, आपली विद्वत्ता, विदग्धता प्रस्थापित करण्याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रयत्न करत असतो. पण वाचकांचं पत्र लेखन तसं नसतं. प्रसिद्धीसाठी तो पत्रलेखन मुळीच करीत नसतो. जिवलग संवाद साधावा, आपल्या रसिक मनाची दाद साहित्यिकाला द्यावी, अशा प्रकारची आवडती साहित्यकृती लिहिणाऱ्या साहित्यिकाशी चार शब्द बोलावेत, जवळीक साधावी एवढाच हेतू त्या वाचकाचा सामान्यपणे असतो. म्हणून असे पत्र लेखन मला प्रांजळ, पारदर्शी, उत्कट आणि अनावर मनाचे प्रतीक वाटते. त्याच्या ह्या सच्चेपणामुळे वाचकाची अशी पत्रे मला विशेष आवडतात आणि माझ्या मनावर सखोल परिणामही करतात. साहित्यनिर्मितीसाठी मला अशी पत्रे उभारी देतात, माझ्याकडून नव्या साहित्यकृतीची मागणी करतात. त्यांच्या माझ्यातील या नात्यामुळे मी साहित्यनिर्मिती उत्साहाने करू लागतो. साहित्यनिर्मितीची अनेक बीजे माझ्या मनात या उत्साहामुळे पडत असतात. त्यामुळे मी वाचकांचा ऋणी आहे, कृतज्ञ आहे. त्यांनी मला उदंड प्रेम दिलं आहे...'चांगला वाचक हा शापित साहित्यिकच असतो' असे जे मला वाटते, ते यामुळेच!...रसिकतेनं साहित्यकृतीचं वाचन करून तिला दीर्घायुषी करणारा केवळ वाचकवर्गच असू शकतो.

५ भूमी,कलानगर,
पुणे सातारा रोड,धनकवडी,
पुणे ४३.





# खुशीपत्राने खूश व्हावेच लागते

**प्रा. रा. ग. जाधव**

**मा**झी लेखनकामाठी गेल्या सुमारे पन्नास वर्षांची. तिचा शुभारंभ मात्र टॉनिकच्या डोसाने नव्हे, तर कडू कडू कोयनेलच्या गोळीने झाला. शाळेत नववी-दहावीत असतानाच माझी एक कथा (?) तत्कालिन सकाळ प्रेसच्या 'साप्ताहिक स्वराज्यात' प्रसिद्ध झाली. नाव होते 'न बिघडणारे यंत्र'. ही प्रतिमा मी आईच्या एका उद्विग्न बोलण्यातून टिपली होती व कथाविषय तर घरात होणारे आईचे हात हाच होता. आई म्हणजे न बिघडणारे यंत्र, त्या यंत्राने सतत कामच करीत राहायचे, थांबायचे नाही आणि आजारीबिजारी पडायचेही नाही! माझी मातृपक्षातील ही कथा अर्थात आमच्या सर्व वाड्यात मोठी नवलाईची ठरली. आईला ती आवडली पण वडिलांना मात्र बोचली. दोनचार दिवस उलटले नि मग सकाळीच वडिलांनी मला बाजूला घेऊन चांगलीच तंबी दिली, ''काय वाटेल ते लिहितोस का रे मूर्खा? यापुढे असलं लेखन बंद. चार शब्द लिहिता आले म्हणजे काय अक्कल आली होय रे तुला? अं?'' झालं, माझी धुंदी पार उतरली. आईजवळ जाऊन रडावे असे तीव्रतेने जाणवले. त्या न बिघडणाऱ्या यंत्रामुळे माझ्या लेखनकामाठीचे तंत्र नंतर पार बदलून गेले. परिचित माणसे व त्यांचे जग यांबद्दल यापुढे काहीही लिहायचे नाही आणि जे काही लिहिले व प्रसिद्ध झाले, ते निदान घरातल्या कुणालाही कधी सांगायचे नाही. कोयनेलच्या पितृपारितोषिकामुळे हा दुहेरी धडा मी खर्डेघाशीच्या शुभारंभीच शिकलो व तो नंतर आजपर्यंत पाळतही आलो.

इतका कडू कडवट टीकाकार नंतर माझ्या नशिबी मात्र कधीही आला नाही. मी कथालेखक का झालो नाही व समीक्षकच का झालो, याचा मागोवा घेणाऱ्या भावी संशोधकाला हा कोयनेलचा किस्सा उपयोगी पडावा.

तोंडात कडूजहर चव सोसतही माझ्यातला कथाकार, कवी, ललित निबंधकार, एकांकिका व नाट्य-लेखक यांनी मोठ्या धैर्याने पुढील दहा-पंधरा वर्षे लेखनाचा किल्ला लढविला. हे ललित लेखन कधी साभार परत आले नाही, एवढीच बाब टॉनिकवजा म्हणायची! नाशिकच्या दै. गावकरीच्या बहुधा एका दिवाळी अंकात (१९५२ ते १९५९ दरम्यान) माझे एक कविता आली होती. तिची सुरुवात अशी होती :

''वेळ कधी अशी येते
सूर्य याचक बनून येतो,
एक छोटे प्रमाणपत्र
काजव्याजवळ मागू लागतो...''

ही कविता 'हंस' मासिकाचे संपादक अनंतराव अंतरकर यांनी वाचली असावी. ती त्यांना इतकी आवडली की त्यांनी 'हंस' या कथाप्रधान मासिकांतून माझ्या काही कविता आवर्जून मागवून छापल्या. माझ्या एकदोन एकांकिकाही छापल्या. एकदोन अतिअवघड असे माझे समीक्षापर लेखही प्रसिद्ध केले. या हंसन्यायाने असे एक मानसिक टॉनिक मला लाभले; जे कोणत्याही औषधनिर्मात्या कंपन्यांच्या यादीत नसावे...!

टॉनिक प्राधान्याने पण कोयनेलही अधूनमधून अशी माझ्या पिढीतील लेखनछंदी मुलामुलींची नियती होती. शालेय जीवनातच मी एकदा गडकऱ्यांचे 'पुण्यप्रभाव' हे नाटक पुढे ठेवून त्याची हुबेहूब नक्कल करणारे एक 'बाड' तयार केले. पहिल्या कोयनेलच्या गुटीमुळे हे नाटकी नाटक अर्थातच मी घरातल्या कुणालाही कळू दिले नाही. आमचे एक पुस्तकप्रेमी जोशी सर होते. त्यांना मी ते बाड दिले. काही दिवसांनी त्यांनी ते परत केले. म्हणाले, ''हा कसला उपद्व्याप केलास तू? त्यापेक्षा अभ्यासात लक्ष दे...!'' या दुसऱ्या कोयनेलमुळे माझे अभ्यासावरचे लक्ष पार उडाले व त्या वर्षी माझा वर्गातील पहिला नंबरही गेला.

मा. के. रं. शिरवाडकर हे आमच्या वर्गाला एके वर्षी मराठी शिकवीत असत. ते बहुधा त्यावेळी तत्कालिन ज्युनियर एम. ए.ला असावेत. मराठी कवितांऐवजी त्यांनी आम्हाला इंग्रजीतील रोमँटिक कवींची कविताच जास्त ऐकविली, तीमधील अवतरणे लिहून दिली. हॅम्लेटचे 'टु बी ऑर नॉट टू बी' हे उद्गार त्यांनीच पहिल्यांदा आम्हास ऐकवले. दिवाळीच्या सुटीत मी माझ्या तीस-चाळीस कविता रंगीबेरंगी स्वरूपात लिहून एक हस्तलिखित काव्यसंग्रह तयार केला. नाव 'प्रियंवदा'.

प्रास्ताविक असे : ''माझी कविता 'शंकुतला' नक्कीच नाही; पण तिची सखी 'प्रियवंदा' आहे.''

या प्रियंवदेचे खूप कौतुक के. रं. शिरवाडकर गुरुजींनी केले.

कौतुक करण्याचे बाळकडू बहुधा शिरवाडकर कुटुंबातील सर्वांनाच मिळालेले असावे. तरीही या शिरवाडकरी टॉनिकमुळे मी कविता लिहीत राहिलो; पण आधुनिक मराठी कवितेचे नुकसान होईल, एवढी मात्रा त्या टॉनिकमध्ये नव्हती, हे मी माझे आणि मराठी कवितेचे नशीब समजतो.

जाधव हे नाव (-म्हणजे आडनाव) कवीला न शोभणारे आहे, असे ऐकविणारे मित्र तेव्हाही होते; बहुधा आताही असतीलच. तरीही १९५९ साली पु. शि. रेग्यांच्या 'छंद' नियतकालिकाने घेतलेल्या दीर्घ चिंतनपर कवितेचे 'बक्षीस' (रु.२५) मला विभागून मिळाले. (दुसरे त्र्यं. वि. सरदेशमुख)...हे बक्षीस म्हणजे एक प्रकारचे टॉनिकच ना?

मला गेल्या पन्नास वर्षांत प्रकाशित होणे व असे काही पुरस्कार पारितोषिक मिळणे हीच टॉनिके ठरली. चाहत्यांची वगैरे खुशी-पत्रे कमीच. बहुधा मी उत्तरोत्तर ललित साहित्याऐवजी समीक्षाच लिहीत गेलो, त्याचाही हा परिणाण असावा. या मराठीचिये नगरी पूर्वी समीक्षकालाच खरे तर टॉनिक तर सोडाच, पण कोयनेलची गोळीही मिळणे दुरापास्त! टी. एस. एलिअट या प्रसिद्ध इंग्रजी कवि-समीक्षकाची एक कविता इथे आठवली. तिची सुरुवात बहुधा अशी होती : ''हाऊ अन्प्लेझंट इज इट टू मीट मिस्टर एलिअट!'' समीक्षकाचे दर्शनदेखील किती विरस करणारे? – अशी काहीशी स्थिती एके काळी इथे होती.

– पण ही स्थिती आता बदलत आहे. नक्कीच...! असे नसते, तर माझ्यासारख्या निव्वळ समीक्षकाला अ. भा. साहित्य संमेलनाचे 'अध्यक्षपद' कसे लाभले असते?

परवाचीच गोष्ट, म्हणजे जून २००५ च्या महिन्यातील! बाबुराव अर्नाळकरांवरील माझा एक लेख १९७२ साली 'युगवाणी' या विदर्भ साहित्य संघाच्या नियतकालिकात प्रकाशित झाला होता. अर्नाळकरांच्या जून महिन्यात सुरू होणाऱ्या जन्मशताब्दीनिमित्त सदर लेखाचे पुनर्प्रकाशन 'लोकसत्ता' व 'साधना' साप्ताहिक यात करण्यात आले. या लेखाबद्दल दूरध्वनीमार्फत बरेच टॉनिक बऱ्याच जाणकारांनी पाजले. विशेष म्हणजे आदरणीय असे ज्येष्ठ संपादक श्री. मुकुंदराव किर्लोस्कर यांचे एक सविस्तर पत्रही मला आले. एवढा उल्हासित जून महिना मी पहिल्यांदाच आयुष्यात अनुभवला. शेवटी लेखक हा दोन उत्तेजक शब्दांचाच आमरण भुकेला असतो ना? मग तो सतरा वर्षांचा असो की सत्तर...! गंमत एवढीच की सतराव्या वर्षी टॉनिक जेवढे अंगी लागते ना, तेवढे ते सत्तराव्या वर्षी नाही लागत अंगी...! टॉनिकच्या टमटम खरी तर तरुणाईतच...!

**खरे तर मी किंवा कुणीही लेखक स्वतःच्या लेखनातूनच स्वतःसाठी टॉनिक निर्माण करीत असतो. खरे टॉनिक तेच. आत्मसमाधान, आत्ममुक्ती, आत्माविष्कार, आत्मप्रकटन! पण या टॉनिकची शक्तिदायकता रसिकांच्या, वाचकांच्या अनुकूल प्रतिसादामुळे वाढल्यासारखी नक्कीच वाटते; त्या टॉनिकचा गोडवा 'वॉटरबरीज कंपाऊंड'प्रमाणे कायामन उल्हासित करतो, थोडासा कैफही आणतो.**

माझ्यातल्या कवीला माझ्या समीक्षकाने पार जिरवून टाकले आहे आणि जन्मल्याच नाहीत अशा माझ्या कवितांना माझ्या समीक्षेने स्वाहा केले आहे. तरीही...तरीही अधूनमधून माझी पद्ये समीक्षकाची नजर चुकवून बाहेर पडतातच. ''नैनं छिन्दन्ति शस्त्राणि न च दहति पावक:!' अशी असते कवितेची किमया आणि कायाही! असेच घडले एकदा. बहुधा पाचसहा वर्षांपूर्वी माननीय भानू काळे यांच्या दर्जेदार 'अंतर्नाद' मासिकात माझी 'गोदाकाठ ते कृष्णाकाठ' ही पद्यरचना प्रसिद्ध झाली. तिच्यात गोदाकाठचे थोर मराठी कवी कुसुमाग्रज यांच्या घरी कविवर्य बा. भ. बोरकरांचे वास्तव्य असतानाच्या एका प्रसंगाचे वर्णन होते. मान्यवर मराठी निवेदक, मुलाखतकार व सूत्रसंचालक आणि लेखक श्री. सुधीर गाडगीळ यांनी मुद्दाम पत्र पाठवून ते वर्णन खूप भावल्याचे कळविले होते. या प्रकाराचे मला आलेले हे पहिले खुशीपत्र! खुशीपत्राने खुश व्हावेच लागते व माणूस खुश होतोही; विशेषत: सुधीर गाडगीळांसारख्या जाणत्या पण कार्यव्यग्र मित्राने उसंत काढून पत्राने कळवावे याचाच मला विशेष आनंद वाटला, विशेष अप्रूप वाटले. पण पुन्हा वयाचा म्हणजे साठी-सत्तरीचा प्रश्न! खुशीच्या जाणिवेला अल्पजीवी ठरविणारी ही ज्येष्ठ नागरिकता!

जेव्हा दात असतात, तेव्हा चण्यांची चणचण; आणि जेव्हा चणे लाभतात, तेव्हा 'दात' गायब झालेले! लेखनकामाठी करणाराची वयाची साठी-सत्तरी ही प्रतिजैविक औषधांसाठी असते, कसल्याच टॉनिकसाठी नसते; निदान माझी प्रकृती तरी अशी आहे.

माझ्या लेखनपर्वातील टॉनिकवाहिन्या या प्राधान्याने पुस्तकांना मिळालेल्या पुरस्कार-पारितोषिकांच्या स्वरूपाच्या होत्या. जणू भारत-इराण तेलवाहिन्या! सगळ्याच सर्वथा अनपेक्षित, सुखद धक्का देणाऱ्या. 'साहित्य आणि सामाजिक संदर्भ' या माझ्या समीक्षापर पुस्तकाला १९७५-७६ च्या सुमारास पहिल्यांदा राज्यशासनाचा पुरस्कार मिळाला. याची काहीशी पूर्वकल्पना मला सातारी माझे थोर मित्र डॉ. भालचंद्र फडके यांनी दिली होती. या टॉनिकमुळे माझी खरीखुरी निकडीची गरज भागली, ती मुख्यत: पैशाची. पुरस्काराच्या रकमेची त्यावेळी मला खूप गरज होती; भुकेल्यास दोन घास अन्नाची असावी तशी!

खरे तर मी किंवा कुणीही लेखक स्वत:च्या लेखनातूनच स्वत:साठी टॉनिक निर्माण करीत असतो. खरे टॉनिक तेच. आत्मसमाधान, आत्ममुक्ती, आत्माविष्कार, आत्मप्रकटन! पण या टॉनिकची शक्तिदायकता रसिकांच्या, वाचकांच्या

अनुकूल प्रतिसादामुळे वाढल्यासारखी नक्कीच वाटते; त्या टॉनिकचा गोडवा 'वॉटरबरीज कंपाऊंड'प्रमाणे कायामन उल्हासित करतो, थोडासा कैफही आणतो. त्यात अल्कोहोलचा थोडाफार अंश असतोच असतो म्हणून! पण खरे तर, या वॉटरबरीजसाठी बहुधा कोणताही मनस्वी लेखक लिहीत नसावा... मी तरी नक्कीच नाही.

माझ्यापुरतेच बोलायचे झाले तर, मी मनाने झाल्या लेखनात, झाल्या गौरवात क्वचितच रमतो, गुंतून पडतो. खरे तर झाले गेले मी लगेचच विसरून जातो. मला ओढ असते नव्या लेखनाची, नव्या विषयांची! माझे मन तिथे गुंतलेले असते. या वृत्तीची एक गर्भित बाजू अशी असावी की जे प्रकाशात आले व झोतात आल्याचे समजते, त्याबद्दल मीच कुठेतरी मनोमन असमाधानी असतो. म्हणून समाधानाच्या शोधात मी दुसऱ्या लेखनाकडे वळतो. आपले लेखन व त्यास लाभलेला रसिकांचा टॉनिकवजा प्रतिसाद यांपेक्षा आपले असमाधान व त्यास द्यावयाचे नवे वळण हेच खरे खऱ्या लेखकाचे स्वयंनिर्मित टॉनिक असते. अशा स्वयंनिर्मित टॉनिकचा व खरे तर कोयनेलचा मी ग्राहक आहे. कुठल्या ग्राहकपेठेत हे मिळणार?

– म्हणूनच आठवणी, पूर्वानुभव, पूर्वसंचित, आत्मकथन, आत्मचरित्र यांसारखे लेखन मला, खरे तर, जमत नाही. मी भूतकाळ 'एन्जॉय' करू शकत नाही. मी भूतकाळात जगू शकत नाही, मग तो कितीही पूर्व दिव्याचा असो. माझी लेखणी वर्तमानाच्या व भवितव्याच्या शाईतच लिहिते. कोणतेही टॉनिक हे शरीरातील काहीएक कमतरता दूर करण्यासाठीच असते. माझ्या शरीरालाही त्याची गरज होती, आहे व राहील. पण लेखनकामाठीचे मात्र वेगळे. तिच्यातील कमतरता रसिक-प्रतिसादाने अंशत: पण बव्हंशी स्वत:च्याच प्रतिसादाने व असमाधानाने दूर होते, करावी लागते.

अमेय अपार्टमेंटस्, २१२ शनिवार पेठ,
पुणे ४११०३०


# काही वेगळी पुस्तके...




## युद्धकथा निरंजन घाटे

रणांगणावर प्रत्यक्ष लढणाऱ्यांप्रमाणेच सैनिकांना मदत करणारी माणसे, मग ती रसद पुरवणारी, गुप्तहेर, भूमिगत कार्यकर्ते कोणीही असो, त्यांचाही युद्धातील सहभाग हा रोमांचकच असतो. युद्धाच्या अशा अज्ञात बाजू मांडणारे पुस्तक.

किंमत : १२०रु. पोस्टेज : २०रु.

*'पोरांनो, ती विमानं जर्मनीला परत जाऊ देण्यात माझ्या मनात एक डाव होता. जर्मनांना त्याशिवाय आपण त्यांच्या वैमानिकांचे कसे हाल करतोय, हे कळायला दुसरा मार्गच नव्हता.पहिल्यांदा मी त्या विमानातला पाठीमागचा तोपची मारायचो, मग परत येऊन दिशादर्शक (नेव्हिगेटर) उडवायचा, विमान पडणार नाही याची काळजी घेत त्याच्या चिंध्या करायच्या म्हणजे ते नीट उतरेल पण पुन्हा उडणार नाही, याची खात्री करून घ्यायची. नंतर वैमानिकाला जखमी करायचे म्हणजे तो विमान घेऊन जर्मनीत जाईल पण चाक नसल्यामुळे पोट घासत विमान उतरवेल आणि त्या प्रयत्नात विमान पेटून तो माझं काम पुरं करेल. त्यामुळं जर्मनांना त्यांचे वैमानिक किती कमी दर्जाचे आहेत तेही कळेल आणि ब्रिटिश वैमानिक किती उच्च दर्जाचे आहेत तेही लक्षात येईल.'*

**पुस्तकातून...**

ड्राफ्ट किंवा मनिऑर्डर पाठवावी.

मेहता पब्लिशिंग हाऊस, १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११०३०




# माझे आप्त : रसिक

**प्रा. राम शेवाळकर**

लेखनाची सुरुवात मी कवितेने केली. त्या काळात कविता आणि कथा या वाङ्मय प्रकारांनाच साहित्यसृष्टीत बहर आलेला होता. त्या दोन्ही प्रकारांवर द्वितीय महायुद्धोत्तर दृष्टिकोनातील परिवर्तनाची नवी कांती चढलेली होती. 'अभिरुची' व 'सत्यकथा' ही दोन वाङ्मयीन नियतकालिके काव्य व कथासृष्टीतील क्रांतीच्या या नव्या प्रवाहांचे स्वागत करण्यात अग्रगामी होती. त्या काळची कविताही खरोखरच तजेलदार वाटे. त्यामुळे साहजिकच नव्याने लिहू लागलेल्यांना आशयाअगोदर त्या अभिव्यक्तीच्या शैलीचेच आकर्षण होते. त्यामुळे सत्यकथेतील त्या प्रकारच्या कथा व कवितांचा गुच्छ याकडेच उदयोन्मुखांचा ओढा असायचा.

'सत्यकथे'मध्ये आपल्या कविता याव्यात, अशी साहजिकच त्या पिढीची उत्कट इच्छा असे. सत्यकथेकडून साहित्य साभार परत आले तरीसुद्धा त्या गोष्टीची बातमी करण्याची त्यांना हौस असे.

माझ्या कविता सुरुवातीला युगवाणी, सुषमा, अभिरुचीमध्ये यायच्या. नंतर सत्यकथेमध्येही येऊ लागल्या. तोपर्यंत विद्यार्थीदशा संपत आली होती. १९५६ मध्ये माझा 'असोशी' हा पहिला कवितासंग्रह प्रकाशित झाला. त्याला मंगेश पाडगावकरांची रसोद्ग्राही प्रस्तावना लाभली होती. पाडगावकर त्यावेळी 'साधने'च्या संपादक मंडळावरही होते. त्यामुळे ती प्रस्तावना 'साधने'तही संपूर्ण छापून आली. त्यामुळेच ती अनेक जाणकारांच्याही वाचनात आली. दरम्यान माझी महाविद्यालयातील मास्तरकीही सुरू झाली होती. प्रा. पु. शि. रेग्यांच्या 'छंद'मध्येही माझ्या कविता प्रकाशित झाल्या होत्या. एका अंकात प्रसिद्ध झालेली 'हो म्हटले तू' ही कविता कविसंमेलनातून चांगलीच गाजली. परिणामी माझे लग्न झाले. त्याच्या परिणामी हळूहळू काव्यलेखन मंदावत गेले.

पुढे मी गद्यलेखन सुरू केले. ते मुख्यत: वाङ्मयीन स्वरूपाचे होते व त्याचेही स्वरूप आस्वादात्मक होते. मला आवडलेल्या संस्कृत भाषेतील अभिजात कलाकृतींचा रसास्वाद लेखनरूपाने घेण्याची माझी प्रवृत्ती होती. असे लेखन माझ्या हातून बरेच झाले. ग. दि. माडगूळकर हे त्यावेळी 'धरती' मासिकाचे संपादक होते. त्यांनी माझ्याकडून भासाच्या सर्व नाटकांवर रसग्रहण लिहून घेतले व 'धरती'मध्ये ते ओळीने प्रकाशित केले. त्याचे पुढे 'अग्निमित्र' हे पुस्तक प्रकाशित झाले. पूरक वाचन म्हणून ते विद्यापीठाच्या अभ्यासक्रमातही लावले गेले.

१९६६ मध्ये माझा 'रेघा' हा दुसरा काव्यसंग्रह प्रकाशित झाला. त्या संग्रहाची सर्व उस्तवार माझे मित्र प्रा. नरहर कुरुंदकर यांनी केली होती. कवितांची निवड, मुद्रणप्रतीची सिद्धता, व्हीनस यासारख्या मातब्बर प्रकाशकाशी करारपत्र व प्रस्तावना ही सर्व कामे त्यांनी आपणहून केली. त्यांना त्या कविता आवडल्या होत्या.

माझ्या कवितांवर त्या काळी आचार्य अत्रे, म. द. हातकणंगलेकर, शांता शेळके यांनी परीक्षणे लिहिली होती. त्यातील 'शेवाळकरांची कविता ही मराठी साहित्यातील हिरवळ आहे' हे आचार्य अत्रे ह्यांचे वाक्य त्यावेळी मनाला पुलकित करून केले होते. 'रेघा'चा प्रकाशन समारंभ वणीलाच कॉलेजच्या सभागृहात श्रद्धेय बाबा आमटे यांच्या हस्ते झाला होता. माझे नांदेडचे प्राचार्य के. रं. शिरवाडकर हे त्या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून आवर्जून आले होते. लोकनायक बापूजी अणे हेही त्या कार्यक्रमाला सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होते.

माझ्या कवितांना कविसंमेलनात दाद चांगली मिळायची. त्यात माझ्या सादरीकरणाचाही वाटा होता. काही कवितांचा पुन्हा पुन्हा आग्रह व्हायचा. कविता कुठेकुठे उद्धृतही केल्या जायच्या. अभ्यासक्रमाच्या पुस्तकातही समाविष्ट झाल्या होत्या. पत्राद्वारे दाद बाकी माझ्या गद्यलेखनाला अधिक मिळाली. त्यात 'अग्निमित्र', 'देवाचे देव', 'माहेरचे दिवस', 'द्वादशी' व 'अमृताचा घनु' ही पुस्तके अग्रभागी आहेत. त्यातही 'बाई', 'भाऊसाहेब', 'राधा', व 'करपलेला झंझावात' हे लेख विशेष गाजले.

'करपलेला झंझावात' हा लेख पहिल्यांदा 'अंतर्नाद'मध्ये प्रकाशित झाला होता. त्यावर सव्वा वर्ष 'अंतर्नाद'मध्ये पत्रे येत होती. 'केसरी'मधील एका सदरामध्ये लेखही आला होता. महाराष्ट्र टाइम्समधील 'कानोकानी' या सदरात ठणठणपाळांनी कॉलमभर त्याचे तोंडभरून कौतुक केले होते. सुरेश भटांच्या निधनांतर बेळगावच्या 'तरुण भारता'त अशोक जैन यांनी आपल्या सदरात तो लेख गौरवाने पुनर्मुद्रितही केला होता.

विद्यापीठाच्या अभ्यासक्रमाच्या पुस्तकामध्येही माझ्या काही लेखांचा समावेश झाला होता. 'मोराचे पाय' ह्या पुस्तकावर कुसुमाग्रजांनी मला एका पत्राद्वारे उत्तेजनपर अभिप्राय कळवला

होता – 'असे विचारांना चालना देणारे आणि मार्गदर्शन करणारे लेखन आज दुर्मिळ आहे. पण फार आवश्यक आहे. हे कार्य आपल्यासारखे विचारवंतच करू शकतील.'

काव्य, ललितबंध, व्यक्तिलेख, वाङ्मयीन लेख, प्रवासलेख, आस्वादात्मक, संकीर्ण अशी माझ्या स्वतंत्र लेखनाची एकूण त्रेचाळीस व संपादित सोळा, अशी एकूण एकोणसाठ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. परंतु लेखनापेक्षा माझे वक्तृत्व स्वाभाविकच विशेष लोकप्रिय आहे. व्याख्यानाकरता विदर्भ, मराठवाडा, खानदेश, कोकण, पश्चिम महाराष्ट्र, बृहन्महाराष्ट्र, शिवाय परदेश यात संचार झाला आहे. माझ्या वीस व्याख्यानांच्या एकूण चौदा ध्वनिफिती काढल्या असून एचएमव्ही व सारेगामा यांनी मिळून माझ्या दोन ध्वनिफिती व चित्रफिती काढल्या. या सर्व ध्वनिफितींचा खप व प्रसार लाखाच्या वर झालेला आहे. या उलट त्रेचाळीस पुस्तकांपैकी दुसरी आवृत्ती फक्त दोनच पुस्तकांची निघाली.

वक्तृत्व हा माझ्या व्यक्तिमत्त्वाचा गाजलेला व सर्वप्रिय सद्गुण असला, तरी त्यामुळेच माझे लिखित साहित्य झाकोळून गेले आहे. लेखनाचा प्रतिसाद दूरस्थ व अदृश्य असतो. याउलट व्याख्यानाचा प्रतिसाद हा तात्काळ व ताजा मिळतो. किंबहुना त्यामुळेच व्याख्यान देताना वक्त्याचा हुरूप वाढतो. व्याख्यानांना उत्स्फूर्त दाद मिळण्याचे प्रसंग माझ्या आयुष्यात अनेक आले. व्याख्यान चालू असताना आले, संपल्यावर आले. त्याची नोंद यापूर्वी माझ्या पुस्तकातील दोन लेखांमध्ये आली आहे.

हैद्राबादच्या व्याख्यानांमधून दोन रसिक श्रोते मला पुढील आयुष्यात जवळचे मित्र म्हणून लाभले. 'दोन दुर्योधन' या विषयावरचे भाषण ऐकून कालिदास मोहळकर हे माझ्या आयुष्यात आले. त्यांनी आपल्या आत्मचरित्रामध्येही या प्रसंगाचा उल्लेख केला आहे.

ल.रा. कांत हे कविवर्य कांतांचे बंधू हे त्यावेळी हैद्राबाद आकाशवाणीवर अधिकारी होते. माझे शाकुंतलवरचे व्याख्यान ऐकून 'आपण घरापर्यंत तरंगतच गेलो' असा अनुभव त्यांना मोहळकरांजवळ व्यक्त केला. परभणी जिल्ह्यातील सेलूला एका विधिज्ञाला शाकुंतलावरील माझे व्याख्यान ऐकून रात्रभर झोप आली नाही. हा त्यांच्या बाररूमधला रिपोर्ट आहे.

हैद्राबादला एक वृद्ध गृहस्थ श्री. लेले सपत्निक आले होते. व्याख्यान आटोपल्यावर ते भरल्या डोळ्यांनी माझ्याजवळ आले आणि मला जवळ घेऊन म्हणाले, 'माझे उरलेले आयुष्य तुम्ही घ्या!'

बुलढाण्याला रा. ल. गुप्ते नावाचे कवी होते. त्यांचे एक 'कात्यायनी' नावाचे खंडकाव्य प्रसिद्ध झाले होते.

**'मोराचे पाय' ह्या पुस्तकावर कुसुमाग्रजांनी मला एका पत्राद्वारे उत्तेजनपर अभिप्राय कळवला होता - 'असे विचारांना चालना देणारे आणि मार्गदर्शन करणारे लेखन आज दुर्मिळ आहे. पण फार आवश्यक आहे. हे कार्य आपल्यासारखे विचारवंतच करू शकतील.'**

ते कविवर्य 'बी'चे पुतणे होते. गोरेपान, शुभ्र जटा आणि मिशा. आदले दिवशी सावरकरांवरील व्याख्यान त्यांनी ऐकले. दुसरे दिवशी ज्ञानेश्वरांवरील व्याख्यान ऐकल्यावर ते डोळे पुसत पुसतच माझ्याजवळ आले व त्यांनी एक पाकिट माझ्या हातात दिले. मी त्यांना वाकून नमस्कार केला. घरी गेल्यावर पाकिट उघडले, तर त्यात व्याख्यानाचे तोंडभरून तारीफ करणारे एक पत्र होते व पाच रुपयाची करकरीत नोट होती.

अगदी ताजा अनुभव म्हणजे नाशिक साहित्य संमेलनाच्या शेवटच्या दिवशी मराठी संतसाहित्यावरील परिसंवादाचा मी अध्यक्ष होतो. अध्यक्षीय भाषण आटोपल्याबरोबर मी घाईने जायला निघालो. मला मुंबईला पोचायचे होते. म्हणून कुणाशीही न बोलता, न भेटता मी गर्दीतून वाट काढीत टॅक्सीमध्ये जाऊन बसलो. टॅक्सी सुरू झाली. चालत्या टॅक्सीच्या काचावर कुणीतरी टकटक केले, म्हणून मी काच खाली केली. एका अपरिचित गृहस्थाने हात पुढे केला आणि म्हणाले, 'मला फक्त तुमचा स्पर्श हवा आहे.' मी त्यांच्याशी हस्तांदोलन केले.


त्या तीन महिन्यांत महाराष्ट्रात ज्या ज्या ठिकाणी माझी भाषणे झाली, त्या प्रत्येक ठिकाणी उपस्थित राहून भाषण ऐकल्याचा उल्लेख त्यांनी त्यानंतर पाठविलेल्या पत्रात केला होता.

सोलापूर, नाशिक व अमेरिकेतील बोस्टन या ठिकाणी माझे भाषण आटोपल्यावर सर्व समुदायाने स्वयंस्फूर्तीने उत्थापन देऊन टाळ्यांचा कडकडाट केला. सोलापूरचे व्याख्यान एका महाविद्यालयात होते. माजी कुलगुरू डॉ.भोगीशयन हे त्याचे अध्यक्ष होते. नाशिकला रोटरी क्लबची विभागीय परिषद होती. खा. डॉ. पवार तिचे अध्यक्ष होते, तर बोस्टनला भारताबाहेरील, विशेषत: अमेरिकेतील भारतीयांचा द्वैवार्षिक मेळावा होता. मी तिथे प्रमुख पाहुणा होतो. लता मंगेशकर उद्घाटक होत्या व बाबासाहेब पुरंदरे 'जाणता राजा' घेऊन तिथे आले होते. स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्राबद्दल मी तिथे बोललो. अमेरिकेतील ते माझे पहिलेच भाषण होते. भाषण संपल्याबरोबर चार हजार लोकांचा समुदाय उत्स्फूर्तपणे उभा राहिला. त्यांच्या दोन तीन मिनिटे चाललेल्या टाळ्यांच्या कडकडाटामुळे मी भारावूनच गेलो.

अशी दाद मी रंगमंचीय कलावंतांना कृतकृत्य करणारी ठरत असते. वक्त्याच्या ललाटी हा योग लिहिलेला असावा, हे माझे भाग्य!

हॉटेल पर्णकुटी जवळ, उत्तर
अंबाझरी मार्ग, डागा ले आउट,
नागपूर - ४४००१०

सुंदर पत्रे...त्यातून उलगडणारे स्नेहल विश्व आणि हृदयाला स्पर्श करणाऱ्या, स्वतःशीच संवाद साधणाऱ्या दैनंदिनी




## स्पीड पोस्ट

**शोभा डे**
**अनु. अपर्णा वेलणकर**
**किंमत : २५०रु.**
**पोस्टेज : २५रु.**

माझ्या मुलांना पत्रं...नव्या जगात जगता.. वागताना, लढता झुंजताना उन्हातान्हात वाट शोधताना, हवी एक शिदोरी म्हणून... **शोभा डे**

**प्रत्येक आईला आणि मुलांनाही आपली वाटणारी सुंदर पत्रं...**




## प्लेझर बॉक्स भाग एक

**किंमत : १६०रु.**

## प्लेझर बॉक्स भाग दोन

**किंमत : २००रु.**

वपुंच्या लेखनाला मिळालेली दाद आणि त्याला वपुंनी दिलेला प्रतिसाद म्हणजे ही पुस्तके

**व. पु. काळे**

**पोस्टेज प्रत्येकी : २०रु.**

पुस्तक खरेदीसाठी
प्रत्यक्ष भेट द्या अथवा
ड्राफ्ट किंवा मनिऑर्डर पाठवा.

**आमच्या योजनांचे सभासद व्हा आणि २५% सवलत मिळवा!**

मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१, सदाशिव पेठ,
माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड
टेलिफोन भवन समोर,
पुणे ४११०३०





## डायरी ऑफ ॲन फ्रँक

**ॲन फ्रँक**
**अनु. मंगला निगुडकर**

**किंमत : १७५रु.**
**पोस्टेज : २०रु.**

नात्झींच्या अमानुष छळाचं दर्शन घडवणारी एका उमलत्या कळीची अनुभव गाथा




## काळोखाची लेक

**कॅथरिन दी जीजस**
**अनु. सरिता पत्की**

**किंमत : १५०रु.**
**पोस्टेज : २०रु.**

कचराकुंडीतले कागद गोळा करून पोट भरणारी ही कॅरोलिना त्यातल्या कोऱ्या कागदांवर भोवतालचं वास्तव नेमक्या शब्दात लिहायची.
ही कॅरोलिनाची गाजलेली दैनंदिनी.






# माझे वाचक आणि मी

**प्रा. रा. रं. बोराडे**

लेखक का लिहितो या प्रश्नाची वेगवेगळी उत्तरं संभवतात. माझ्यापुरतं सांगायचं झालं तर मी वाचकांसाठी लिहितो. आपलं लेखन वाचकांनी वाचावं, त्यांना ते आवडावं, त्यांच्या ते पसंतीस उतरावं, लेखक म्हणून आपल्याला मानमान्यता मिळावी म्हणून मी लिहितो. माझ्या वाङ्‌मयनिर्मितीमागे अन्य हेतू नाहीत, असे नाही. मात्र ते अनुषंगिक, गौण आहेत.

१९६० च्या आसपास मी कथालेखनाला प्रारंभ केला. तो मराठी कथेच्या भरभराटीचा काळ होता. गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, पु. भा. भावे, व्यंकटेश माडगूळकर, दि. बा. मोकाशी, शंकर पाटील, द. मा. मिरासदार आदी लेखकांचं कथालेखन ऐन बहरात होतं. हंस, मोहिनी, वीणा, पैंजण, बुवा, वसुधा, प्रपंच, मानिनी, मेनका, ललना, किर्लोस्कर, स्त्री, मनोहर आदी नियतकालिकांचे त्या काळात मासिक अंक निघत होते. मराठी कथेला त्या काळात फार मोठा वाचकवर्ग होता. मासिक अंकात प्रसिद्ध झालेल्या कथादेखील आवर्जून वाचीत असत. उपरोक्त नामवंत लेखक या मासिक अंकासाठी क्वचितच कथा लिहीत. ते प्रामुख्याने या मासिकांच्या दिवाळी लिहीत असत. त्यामुळे या नियतकालिकांचे संपादक नवोदित कथालेखकाचे कथालेखन आवर्जून छापित असत. इतकंच नव्हे तर नवोदित लेखकांच्या सतत संपर्कात असत. नवोदित कथालेखकांना कथा लिहिण्यासाठी प्रोत्साहन देत असत. ही परिस्थिती माझ्या कथालेखनाला अनुकूल राहिली. वीणा, पैंजण, बुवा, प्रपंच, वसुधा आदी नियतकालिकांच्या मासिक अंकात माझ्या कथा प्रसिद्ध होऊ लागल्या. या काळात माझ्या संदर्भात घडलेला एक प्रसंग इथं नमूद करण्यासारखा आहे.

वर नमूद केलेल्या मासिकांतून मी लिहीत असलो तरी 'वीणा' व 'पैंजण' या मासिकातून मी सातत्यानं कथा लिहीत होतो. लेखक म्हणून मी वाचकांना परिचित झालो होतो. लेखक म्हणून मला कुणी पुढं आणलं यावरून 'वीणा' चे उमकांत ठोमरे व 'पैंजण'चे ग. वा. बेहरे यांच्यात वाद झाला. उमाकांत ठोमऱ्यांनी मला पत्र पाठवून थेट माझं मत मागविलं. माझी पंचाईत झाली. मला दोघांनाही दुखवायचं नव्हतं. शिवाय अमक्याअमक्यानं मला लेखक म्हणून पुढं आणलं असं लिहावं तर दुसऱ्याला राग येणार हे उघड होतं. शिवाय 'मी पुढे आलो' असं अप्रत्यक्षपणे मान्य करण्यासारखं होतं. पण मला तसं वाटत नव्हतं. म्हणून मी उमाकांत ठोमऱ्यांना पत्र लिहिलं - 'मी लेखक म्हणून पुढे आलो आहे, असं मला अद्याप वाटत नाही. त्यामुळे मला आपण किंवा ग. वा. बेहरे यांनी पुढं आणण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.'

माझ्या दृष्टीनं हा प्रश्न मिटला खरा; पण दुसराच एक प्रश्न उद्भवला. वर ज्या मासिकांची नावे मी नमूद केली आहेत, त्या मासिकांचा वाचक साधारणत: मध्यमवर्गीय मानसिकता असलेला होता. या वाचकांना हलक्या फुलक्या ग्रामीण, विनोदी कथा खूप आवडत. ती शृंगारावरील असेल तर तिला वाचकांची विशेष पसंती असे. त्या काळात 'दीपावली' च्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झालेली 'ताण' ही कथा वाचकांना बेहद्द आवडली. तशा प्रकारच्या कथा मी लिहाव्या म्हणून मला संपादकांचा आग्रह सुरू झाला.

याच दरम्यान माझ्या एका वाचकाचे मला पत्र आले. पत्र फार मजेशीर, पण मला अंतर्मुख करणारे होते. तत्कालीन एका मासिकात प्रसिद्ध झालेली माझी एक कथा ('ताण' नव्हे) त्या वाचकाला खूप आवडली होती. ती कथा त्याला आवडल्याचं कारण नमूद करताना 'बाई कशी गटवावी?' याचं अगाध ज्ञान तुमची ही कथा वाचून मला झालं असं त्यानं मला उपरोधानं त्या पत्रातून लिहिलं होतं.

आपण लिहीत असलेल्या कथांचा असाही उपयोग होत आहे, हे प्रथमच माझ्या एका वाचकाच्या पत्रावरून मला समजलं.

आतापर्यंतच्या तुमच्या लेखकीय आयुष्याला तुम्हाला भेटलेला सगळ्यात मोठा समीक्षक कोण असं जर मला कुणी विचारलं तर मी या पत्रलेखकानं माझ्या लेखनाविषयी मला अंतर्मुख केलं असं म्हणेन.

मी विनोदी लेखन करतो हे खरं; पण स्वभावत: मी गंभीर आहे. त्या काळात मी गंभीर आशयाच्या कथा लिहीत नव्हतो असं नाही; पण अशा कथांचं प्रमाण कमी होतं. नंतरच्या काळात मी प्रामुख्यानं गंभीर व अनुषंगानं विनोदी कथा लिहू लागलो.

ज्या ग्रामीण माणसांचं जगणं माझ्या लेखनाचा विषय आहे ती माणसं माझ्या साहित्याची वाचक नाहीत, अशी एक खंत माझ्या मनात होती. पण माझ्या एका वाचकानं माझ्या मनातली ही खंत

खोडून काढली. हा वाचक विदर्भातला बहुजन समाजातला साधारण शेतकरी कुटुंबातला होता. नोकरीच्या निमित्तानं त्याचं जिल्ह्याच्या गावी वास्तव्य होतं. 'नातीगोती' हा माझा कथासंग्रह त्याला खूप आवडला होता. या कथासंग्रहातली नातीगोती त्याला स्वत:ची नातीगोती वाटली होती. या कथासंग्रहातली सासूरवाशीण लेकीची कथा त्यानं आपल्या अशिक्षित आईला वाचून दाखविली होती. आपल्या सासुरवाशीण लेकीचीच ती कथा आहे, असं तिला वाटलं होतं. या कथासंग्रहातल्या अशा प्रकारच्या कथा तिनं आपल्या लेकाकडून वाचून घेतल्या होत्या. तिलाही त्या खूप आवडल्या होत्या. 'किती नादर लिव्हलंय रं बाबा या मानसानं' असा तिनं माझ्या अशाप्रकारच्या कथांवर अभिप्राय दिला होता. तिचा हा अभिप्राय मला मोठ्या समीक्षकांपेक्षाही मोठा वाटला.

आपलं पुस्तक प्रकाशित झालं की ते नामवंत लेखक व समीक्षक यांच्यकडे अभिप्रायार्थ सादर भेट म्हणून पाठविण्याची पद्धत आहे. विशेषत: नवोदित लेखक या पद्धतीचा मोठ्या प्रमाणात अवलंब करतात. नामवंत लेखकानं, समीक्षकानं आपलं पुस्तक वाचावं, त्यांच्याकडून आपल्या पुस्तकांवर पत्राद्वारे अभिप्राय प्राप्त व्हावा असा हेतु हे पुस्तक पाठविण्यामागे असतो. माझ्या लेखकीय आयुष्यात मी या पद्धतीचा सहसा अवलंब करीत नाही. त्याचं एक कारण असं की, आपल्या प्रकाशित पुस्तकाच्या पुरेशा प्रती प्रकाशकांकडून मिळत नाहीत. शिवाय अशाप्रकारे त्रास होणारे अभिप्राय वरवरचे व जुजबी असण्याची शक्यता अधिक असते. मात्र माझ्या 'आमदार सौभाग्यवती' या कादंबरीच्या संदर्भात माझा अनुभव फार सुखद आहे. माझी ही कादंबरी मी पु. ल. देशपांडे, जयवंत दळवी व डॉ. जब्बार पटेल यांच्याकडे 'अभिप्रायार्थ सादर भेट' म्हणून पाठविली. या तिघांना ही कादंबरी पाठविण्याचे कारण थोडे वेगळे होते. माझ्या या कादंबरीवर वेगळ्या धर्तीचा सुंदर चित्रपट निघेल असे माझ्या काही साहित्यिक मित्रांचे मत पडले. या तिघांनी अथवा त्यांच्यापैकी ज्यांना शक्य असेल त्यांनी, चित्रपट क्षेत्रातल्या एखाद्या निर्मात्याला अथवा दिग्दर्शकाला ही कादंबरा चित्रपटासाठी सुचवावी, हा ही कादंबरी त्यांच्याकडे पाठविण्यामागे हेतू होता. अर्थात त्यांनी तसे कुणाला सुचवले किंवा कसे हे मला माहीत पडले नाही. मात्र त्यांच्याकडून या कादंबरीवर तातडीने व चांगले अभिप्राय आले.

असाच सुखद अनुभव मला विजय तेंडुलकर यांच्याबाबतीत आला. 'चारापाणी' ही माझी कादंबरी मी त्यांना वाचण्यासाठी पाठविली. त्यांना ती इतकी आवडली की त्यांनी या कादंबरीवरची सिरियल त्या काळात (१९९० साली) दिल्ली दूरदर्शनकडे मंजुरीसाठी पाठविली. तांत्रिक कारणामुळं या मालिकेला मंजुरी मिळाली नाही. पण या निमित्तानं विजय तेंडुलकर यांच्याशी माझा व माझ्याशी त्यांचा झालेला त्यांचा पत्रव्यवहार मला लाखमोलाचा वाटला.

शालेय तसंच विद्यापीठीय अभ्यासक्रमात माझ्या साहित्यकृतींचा सातत्यानं समावेश असतो. माझ्या साहित्याचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांची मला सातत्यानं पत्रं येतात. ही पत्रं विद्यार्थ्यांची आहेत, खुषीपत्राच्या स्वरूपाची आहेत म्हणून मी त्यांचं मोल कधीही कमी मानलेलं नाही. मी वाचकांची पत्रं कधीही दुर्लक्षित ठेवीत नाही. मला आलेल्या प्रत्येक पत्राला किमान चार ओळीचं तरी पत्र लिहितो. माझ्या चार ओळीमुळं त्या विद्यार्थ्याच्या आयुष्यात मला आनंदाचे काही क्षण पेरता येत असतील तर मी ते का पेरू नये?

वाचकांच्या पत्रव्यवहाराचे लेखकाच्या आयुष्यात काय स्थान आहे? माझ्या पुरतं बोलायचं झालं तर वाचकांची पत्रं माझ्या लेखनाला दिशा देत नाहीत; पण माझ्या लेखनाला बळ देतात. काही वाचकांची पत्रं तर एखादा मोलाचा ठेवा जतन करावा त्याप्रमाणे मी जतन करून ठेवलेली आहेत. मराठीतील नामवंत लेखक श्री. रंगनाथ पठारे यांचं एक पत्र आजही माझ्या संग्रही आहे. 'मळणी' या माझ्या कथासंग्रहातील 'भेग' ही कथा त्यांना खूप आवडली होती. ही कथा आपल्याला का आवडली हे त्यांनी पत्रात विस्तारानं लिहिलं होतं.

पत्रव्यवहाराद्वारे वाचकांचा लेखकांशी जसा संवाद घडतो तसाच तो प्रत्यक्ष भेटीतही घडतो. पत्रलेखनाला अनेक मर्यादा पडतात. लेखक-वाचक भेटीतला, संवाद मुक्त असतो.

पु. ल. देशपांडे माझ्या साहित्याचे वाचक असतील ही शक्यता मला वाटत नव्हती. पण एका अनपेक्षित भेटीत मला हे समजलं. त्याचं असं झालं, 'तीन पैशाचा तमाशा' या पु. ल. लिखित व डॉ. जब्बार पटेल दिग्दर्शित नाटकाच्या पुण्याचा बालगंधर्व रंगमंदिरात प्रयोग होता. मी एक प्रेक्षक म्हणून तिकीट काढून हे नाटक बघण्यासाठी गेलो होतो. नाटकाच्या मध्यंतरात माझी व डॉ. जब्बार पटेल यांची भेट झाली. डॉ. जब्बार व मी सोलापूरच्या दयानंद महाविद्यालयाचे विद्यार्थी. जब्बारनं मला विचारलं, ''भाईंना भेटलास का?''

**माझ्या साहित्याचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांची मला सातत्यानं पत्रं येतात. मी वाचकांची पत्रं कधीही दुर्लक्षित ठेवीत नाही. मला आलेल्या प्रत्येक पत्राला किमान चार ओळीचं तरी पत्र लिहितो. माझ्या चार ओळीमुळं त्या विद्यार्थ्याच्या आयुष्यात मला आनंदाचे काही क्षण पेरता येत असतील तर मी ते का पेरू नयेत?**

पु. ल.ना भाई म्हणतात हे मला तोपर्यंत माहीत नव्हतं. मी जब्बारला विचारलं, ''कोण भाई?''

जब्बारनं मनातल्या मनात मला वेड्यात काढलं असावं.

तो म्हणाला,''अरे, असं काय करतोस. पु. लं.ना भाई म्हणतात,हे तुला माहीत नाही का?''

"नाही."

"तुझी व त्यांची ओळख तरी आहे का?"

मी खरं तेच सांगितलं. म्हणालो,

"नाही."

"चल, तुझी त्यांच्याशी ओळख करून देतो."

जब्बारने पु. लं. शी माझी ओळख करून दिली. माझं नाव सांगितलं. पु. लं. नी मला विचारलं -

"तू 'पाचोळा' कादंबरीचा लेखक का?"

मी संकोचलो. म्हणालो, "हो."

"बरं का कालेलकर, ज्या 'पाचोळा' कादंबरीच्या बोलीभाषेबद्दल तुम्ही कौतुकानं बोलता त्या कादंबरीचा हा लेखक आहे. बरं का."

दोघंही नंतर 'पाचोळा' विषयी कौतुकानं बोलत होते व मी नतमस्तक होऊन ऐकत राहिलो.

प्रत्यक्ष घडलेला हा संवाद लेखक म्हणून जसा माझ्या मनावर कोरलेला आहे, तसाच अप्रत्यक्ष घडलेला दुसरा एक असाच माझ्या मनावर कोरलेला आहे.

"याच परिसरातल्या (मराठवाडा) बोराडे या नावाच्या लेखकाची 'पाचोळा' ही कादंबरी मी वाचली. ही कादंबरी एखाद्या चांगल्या दिग्दर्शकाच्या हातात गेली तर तिच्यावर जागतिक कीर्तीचा चित्रपट तयार होईल."

हे उद्गार आहेत चित्रमहर्षी गजानन जहागीरदार यांचे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागात विद्यार्थ्यांसमोर बोलताना काढलेले.

औरंगाबाद येथील माझे साहित्यिक मित्र प्रा. वसंत कुंभोजकर यांनी वैजापूरला (मी त्या वेळी वैजापूर येथे प्राचार्य होतो.) पत्र लिहून मला हे कळविले नसते तर एका चित्रमहर्षीचे हे उद्गार कदाचित माझ्यापर्यंत आले नसते.

अलीकडं माणसाचं जगणं विलक्षण गतिमान झालेलं आहे. चार ओळींचं पत्र लिहिण्याऐवजी मोबाईलवर बोलणं लोक सध्या अधिक पसंत करीत आहेत.

धावत्या भेटीत 'बोलणं' होतं. पण 'संवाद' होतोच असं नाही.

'शिवार' १६ विद्यानिकेतन कॉलनी,
औरंगाबाद


## या अनुवादित कादंबऱ्या आपल्या संग्रही आहेत?

| | | |
|---|---|---|
| **टाइमलाइन :** मायकेल क्रायटन | अनु : प्रमोद जोगळेकर | ३६०/- |
| **काबुलीवाल्याची बंगाली बायको** | अनु : मृणालिनी गडकरी | १००/- |
| **द रेनमेकर :** जॉन ग्रिशॅम | अनु : अनिल काळे | ३८०/- |
| **फर्स्ट टु डाय :** जेम्स पॅटरसन | अनु : रविंद्र गुर्जर | २००/- |
| **द ब्लाइन्ड असॅसिन :** मार्गरेट ॲटवूड | अनु : चारुता नानिवडेकर | २५०/- |
| **फरासि प्रेमिक** (फ्रेंच लव्हर): तसलिमा नासरिन | अनु : सुप्रिया वकील | २००/- |
| **द गोल्डन रॉन्देव्हू** : ॲलिस्टर मॅक्लीन | अनु : अशोक पाध्ये | २००/- |
| **फ्रॉम रशिया विथ् लव्ह:** इयान फ्लेमिंग | अनु : विजय देवधर | २५०/- |
| **ऑन द विंग्ज ऑफ ईगल** : केन फॉलेट | अनु : ज्योत्स्ना लेले | २५०/- |
| **शिवा डान्सिंग** : भारती कर्चनर | अनु : मंजूषा गोसावी | २५०/- |
| **सिटी ऑफ बोन्स:** मायकेल कॉनेली | अनु : अजित ठाकूर | २४०/- |
| **चाइल्ड ऑफ द होलोकॉस्ट:** जॅक कुपर | अनु : सिंधू विजय जोशी | १३०/- |
| **ओमेर्ता :** मारिओ पुझो | अनु : अनिल काळे | २२०/- |
| **गॉन फॉर गुड :** हार्लन कोबेन | अनु : अजित ठाकूर | २५०/- |
| **द डार्क क्रुसेडर :** ॲलिस्टर मॅक्लीन | अनु : अशोक पाध्ये | २४०/- |
| **सन्स ऑफ फॉर्च्यून :** जेफ्री आर्चर | अनु : अजित ठाकूर | ३५०/- |
| **लेडीज कूपे :** अनिता नायर | अनु : अपर्णा वेलणकर | २५०/- |

**जगभरातल्या विविध मानवी जीवनानुभवांचे दर्शन घडवणारी नाविन्यपूर्ण पुस्तके**

मेहता पब्लिशिंग हाऊस, १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११०३०

**आमच्या योजनांचे सभासद व्हा आणि २५% सवलत मिळवा!** ड्राफ्ट किंवा मनिऑर्डर पाठवावी.






## वाचकांचं, चाहत्यांचं समृद्ध विश्व

**विजय देवधर**

कलेचं क्षेत्र कोणतंही असो, कलाकाराला त्याच्या कलाविष्काराबद्दल त्याच्या चाहत्यांकडून प्रतिसाद, दाद मिळाली की त्याचा उत्साह दुणावतो. तेव्हा चाहत्यांचा प्रतिसाद हे नि:संशयच त्याचं टॉनिक असतं.

अनुवादित साहित्याच्या क्षेत्रात गेल्या ३५ वर्षांहून अधिक काळ मी लेखन केलेलं आहे. माझं साहित्य वाचून वाचकांनी, चाहत्यांनी मला उदंड प्रतिसाद दिलेला आहे. कितीजणांची नावं सांगावीत? जे वाचक, चाहते स्मरणात राहिले किंवा ज्यांच्याशी कायमचा ऋणानुबंध जुळून आला अशा काहीजणांचा - त्यांच्या प्रतिसादाचा-परामर्श मी इथं घेणार आहे.

पंचवीस वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेला 'साहसांच्या जगात' हा माझा कथासंग्रह वाचून आठ वर्षांच्या एका चिमुरडीनं मला लिहिलं होतं: 'लेखककाका, तुमच्या गोष्टी मला खूप आवडल्या. एखाद्या संकटात सापडले तर न घाबरता, त्याला धीरानं तोंड कसं द्यावं हे मला कळलं... आम्हा मुलांसाठी अशाच खूप खूप गोष्टी लिहा...' पुढे साहसकथांचे आणखीही संग्रह प्रसिद्ध झाले. त्यांना आबालवृद्धांकडून प्रतिसाद मिळाला. पण ती लहान मुलगी माझ्या स्मरणात राहिली आहे एवढं मात्र खरं!... माझं 'प्राणीमित्रांच्या जगात' हे पुस्तक वाचून वेंगुर्ल्याहून डॉ. जयेश पाठक यांनी पाठवलेलं पत्र-त्यातल्या एका गंमतीमुळे-असंच माझ्या स्मरणात राहिलेलं आहे. पत्रावरल्या माझ्या पत्त्यामधे त्यांना माझा उल्लेख केला होता: डॉ. विजय देवधर, वन्य प्राणी विशेषज्ञ!

माझा हा उल्लेख पाहून मला विस्मय वाटला. त्यांनी लिहिलं होतं: 'मी एक व्हेटर्नरी डॉक्टर आहे. आपल्या कथासंग्रहामधली 'मी एक पशुचिकित्सक' ही आपल्या अनुभवांवरली दीर्घकथा मला फार आवडली. सामान्यत: व्हेटर्नरी डॉक्टर म्हणजे 'गुरांचा डॉक्टर' अशीच आमची संभावना होते. पण पशुचिकित्सकाचं काम किती अवघड असतं याचं जिवंत चित्रण विविध प्राण्यांच्या उपचारांच्या हकीगतींमधून आपण केलंत व आम्हा 'व्हेट्स्ना' सन्मानाचा दर्जा मिळवून दिलात याबद्दल मानावेत तेवढे आभार थोडेच आहेत... वगैरे वगैरे! वास्तविक या कथेमधल्या हकीगती एका परदेशी 'व्हेट्' च्या आहेत. पण ही दीर्घकथा 'प्रथम पुरुषी' कथन शैलीतली असल्यानं मीच तो व्हेटर्नरी डॉक्टर आहे अशी डॉक्टर पाठक यांची समजूत झाली होती व त्यांनी मला 'डॉक्टर' आणि 'वन्यप्राणी विशेषज्ञ' अशा पदव्या देऊन टाकल्या होत्या! पत्राला उत्तर पाठवून त्यांचा हा 'गोड गैरसमज' मी दूर केला. तेव्हा त्याचं पत्र आलं की 'पुस्तकाची प्रस्तावना न वाचता मी एकदम कथाच वाचायला सुरुवात केल्यामुळे हा घोटाळा झाला'.

आकर्षक व्यक्तिमत्त्वाचा हा तरुण डॉक्टर पुढे चिंचवडला माझ्या घरी येऊन गेला. 'जिराफाचा संधीवात' ही हकिगत वाचून ॲक्युपंक्चर तज्ज्ञ - डॉ. विलास माळवे यांनीही - मला 'डॉक्टर' ही उपाधी देऊन ॲक्युपंक्चर चिकित्सेद्वारे जिराफाचा संधिवात कसा बरा केला याबद्दल चर्चा करण्याची इच्छा व्यक्त केली. पुण्यामधले काही डॉक्टर्स माझे वाचक नि चाहते आहेत. सुप्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ. श्रीकांत केळकर, डॉ. जयंत पानसे (आहारतज्ञ डॉ. के. वि. पानसे यांचे चिरंजीव) तसेच त्यांच्या पत्नी सौ. रेखा पानसे, डॉ. प्रभाकर खाडिलकर, डॉ. शिरीष खाडीलकर, डॉ. मकरंद दाणी, डॉ. मधुकर सावंत... आणि इतर अनेक. मी अनुवादिलेल्या रहस्यमय कादंबऱ्या या मंडळींना आवडतात. खुद्द डॉक्टरांकडून मिळणारं हे 'टॉनिक' पुढल्या लेखनासाठी मला उत्साह देतं.

मराठी लेखकांना भेटायच्या इच्छेनं पंधरासोळा वर्षांपूर्वी बेंजामिन भास्तेकर नावाचे गृहस्थ इस्रायलहून भारतात आले होते. ललित लेखक श्री. प्रभाकर मराठे त्यांना घेऊन मजकडे आले. विनयशील, मृदुभाषी व प्रेमळ भास्तेकरांनी प्रथम भेटीतच मला आपलंसं करून टाकलं. माझी काही गाजलेली पुस्तकं त्यांना भेट म्हणून दिली.

विमानाच्या लगेजचा भरपूर चार्ज देऊन - पुस्तकांचा मोठा भारा आपल्याबरोबर ते इस्रायलला घेऊन गेले. कमळाच्या आकाराचे - लखलखणाऱ्या धातूचे दोन अतिशय सुबक असे 'कॅंडलस्टॅंडस्' भास्तेकरांनी मला नंतर भेट म्हणून पाठवले. सोबत पाठवलेल्या पत्रात त्यांनी लिहिलं होतं : 'तुमच्या लेखनाच्या टेबलावर हे कॅंडल स्टॅंड ठेवा व त्यांच्यात शोभेच्या मेणबत्त्या लावा म्हणजे तुम्हाला माझी आठवण येत राहील व आपल्या स्नेहाची ज्योत निरंतर तेवत राहील...'



'औदुंबरबाग' ला राहणारे श्री. अनंत केशव तथा भाऊकाका सावळे यांनी 'बर्म्युडा ट्रँगल' वाचून मला पत्र पाठवले. एक दिवस ६५ रुपयांची तिकिटे लावलेले एक भले मोठे पार्सल मला आले. उघडून पाहतो तर आंबापोळी, फणस पोळी या कोकणच्या मेव्याची गोड भेट. औदुंबरबागच्या त्यांच्या वाडीवर जायचा योग आला. चार दिवसांच्या त्या वास्तव्यात त्यांनी मला कायमचं आपलंसं करून टाकलं. ते स्वत: माझ्याकडे चिंचवडला माझ्या घरी राहून साहित्यविषयक गप्पा मारून गेले. त्यांच्यासमवेत थेट गुहागरच्या समुद्रकिनाऱ्यापर्यंत भ्रमंती झाली.

गिर्यारोहक प्रमोद मांडे आणि 'माहेरची साडी' वगैरे चित्रपटात खलनायकाची भूमिका करणारे विनोद पावशे हेही योगायोगाने माझ्या चाहत्यांच्या परिवारात सामील झाले. माझं 'डेझर्टर' हे पुस्तक नाना पाटेकर यांना दिले. नानाने पुस्तक आवडल्याचा अभिप्राय कळवला. दोन वर्षांपूर्वी १५ जुलैला माझ्या वाढदिवशी विनोद पावशे फुलांचा गुच्छ आणि मोठं रंगीत पोस्टर घेऊन हजर झाले.

पंधरा वर्षांपूर्वी, शामराव कुलकर्णी यांचा निरोप आला. संगीतकार श्री. सुधीर फडके उर्फ बाबूजी यांनी माझी पुस्तकं वाचली असून मला भेटायला बोलावलं आहे. खरं तर मीच बाबूजींचा चाहता! त्यांनी स्वरबद्ध केलेली कित्येक सुरेल गाणी माझ्या संग्रहात! नंतर ज्ञानप्रबोधिनी प्रशालेत बाबूजींची व माझी भेट झाली. 'आपली भाषाशैली आम्हाला फार आवडली' ही त्यांच्याकडून मला मिळालेली दाद हा सोनेरी क्षण होता.

'मेनका प्रकाशन'चे पु. वि. बेहेरे यांनी 'दुहेरी पेच' या माझ्या अनुवादित कादंबरीचे हस्तलिखित श्री. पु. भा. भावे यांना वाचायला दिले. तेव्हा 'जितकं सुंदर हस्ताक्षर तितकंच सरस भाषांतर' अशी दाद त्यांनी दिली. ही दाद निश्चितपणेच फार मोलाची आहे. असे कितीतरी अनुभव. मोठ्या मान्यवरांचे आणि सामान्य वाचकांचे!

माझ्या कथा - कादंबऱ्या वाचून प्रभावित झालेल्या जळगावच्या केदार आणि कल्याणी कुलकर्णी आणि स्मिता शिरसाळे या तिघांनी मला जळगावला यायचं निमंत्रण दिलं. त्यांना मला प्रत्यक्ष भेटायचं होतं. वेळेअभावी मला ते शक्य नव्हतं. पण त्याच वर्षी डिसेंबर महिन्यात मी भोपाळला गेलो होतो. तेव्हा परतीच्या प्रवासात झेलम एक्स्प्रेसवर मला भेटायला त्यांनी जळगाव स्टेशनवर यावं असं मी त्यांना कळवलं. अडचण एकच होती. माझं रिझर्वेशन 'वेटिंग लिस्ट'वर असल्यानं नेमका कंपार्टमेंट नंबर मला माहिती नव्हता. आम्ही एकमेकांना पाहिलेलं नव्हतं. मग मर्यादित वेळेत त्यांनी नेमका डबा शोधायचा कसा आणि मला ओळखायचं कसं? यावर मी एक युक्ती त्यांना सांगितली - 'गाडी जळगाव स्टेशनच्या फ्लॅटफॉर्ममधे शिरेल तेव्हा खिडकीशी मी माझं एक पुस्तक धरून बसेन. त्यावरून मला ओळखा!'... या बेताप्रमाणेच पुढल्या सगळ्या गोष्टी घडल्या. ऐन डिसेंबरातल्या भर थंडीत सकाळी सहा वाजता माझी ही चाहते -त्रयी जळगाव स्टेशनवर हजर झाली. मी पुस्तक धरून खिडकीशी तयारीतच बसलो होतो - त्याने तो नेमका डबा अचूक ओळखून गाडी थांबल्यावर ती तिघं अक्षरश: धावतपळत - धापा टाकत माझ्या डब्याशी आली. मला भेटून आनंदित झाली. त्या तिघांनाही माझी काही पुस्तकं मी माझ्या स्वाक्षरीसह भेट दिली तेव्हा त्यांच्या मुद्रांवरला आनंद द्विगुणित झाला आणि तो प्रत्यक्ष प्रतिसाद माझ्या मनाला काही आगळाच आनंद देऊन गेला. त्या दिवशी गाडी जळगाव स्टेशनवर अवघी पाचच मिनिटं थांबली. आम्हाला एकमेकांशी बोलायला फक्त तीनच मिनिटं मिळाली. पण डिसेंबरच्या ऐन थंडीत केवळ मला भेटायला आलेली ती तिघं, त्यांच्या चेहऱ्यांवर उमललेला आनंद आणि तीन मिनिटांमधला संवाद या सगळ्या गोष्टी माझ्या मन:पटलावर कायमच्या कोरल्या गेल्या आहेत.

वेगवेगळ्या गुन्ह्यांच्या तपासाच्या कथा आपल्या रंजक कथनशैलीनं वाचकांपर्यंत पोहचवणारे पोलीस अधिकारी श्री. व. कृ. जोशी हे माझे उत्तम स्नेही होते. त्यांच्या कथा मला व माझ्या कथा त्यांना आवडत असत. त्यांच्याशी गप्पा मारणं हा तर मोठाच विरंगुळा असायचा!

**शामराव कुलकर्णी यांचा निरोप आला. संगीतकार श्री. सुधीर फडके उर्फ बाबूजी यांनी माझी पुस्तकं वाचली असून मला भेटायला बोलावलं आहे. खरं तर मीच बाबूजींचा चाहता! 'आपली भाषाशैली आम्हाला फार आवडली' ही त्यांच्याकडून मला मिळालेली दाद हा सोनेरी क्षण होता.**

माझ्या लेखनाची ख्याती पार मुंबईच्या 'पोलीस मुख्यालया'पर्यंतही पोचली आहे याची मला कल्पना नव्हती.

पोलीस महानिरीक्षक प्रतापसिंह पाटणकर साहेबांचा फोन मला आला. ते मला म्हणाले, ''पंधरा, सोळा वर्षांपूर्वी 'गँगस्टर्स' या नावानं प्रसिद्ध झालेला तुमचा कथासंग्रह मी वाचला होता. त्यातली 'किडनॅपर्सच्या मागावर' ही कथा माझ्या स्मरणात राहिली आहे. ज्याचं अपहरण झालं अशा एका इटालियन खाणमालकानं, पुढे सुटका झाल्यानंतर, खुद्द स्वत:च त्याला

पळवून नेणाऱ्या किडनॅपर्सना जिद्दीनं कसं शोधून काढलं आणि न्यायासनासमोर कसं खेचलं असं त्या कथेचं कथानक आहे. सर्व सामान्य लोकांच्या दृष्टीनं ही कथा उद्‌बोधक व मार्गदर्शक ठरेल व म्हणून ती 'दक्षता'मधून पुन्हा प्रकाशित करण्याचा माझा मानस आहे. कारण मुंबईत अशा स्वरूपाचे गुन्हे हल्ली वाढले आहेत. तेव्हा ही कथा प्रसिद्ध करण्यासाठी मला तुमची अनुमती हवी आहे...'' मी अर्थातच त्यांना होकार दिला. त्यानंतर सुमारे पंधरावीस मिनिटं पाटणकरसाहेब माझ्या अवांतर साहित्याविषयी माझ्याशी फोनवर बोलत राहिले...!

साहित्यावर प्रेम करणारे अत्यंत नि:स्पृह नि कर्तव्यदक्ष पोलीस महासंचालक श्री. अरविंद इनामदार यांच्या सेक्रेटरीचंही असंच एक पत्र मला काही वर्षांपूर्वी आलं होतं. श्री. इनामदार साहेब मराठी लेखकांच्या भेटीचा एक कार्यक्रम आयोजित करणार होते व त्या निमित्त मी उपस्थित रहावं असं निमंत्रण त्या पत्रात होतं. उच्चपदस्थ पोलीस अधिकाऱ्यांकडून मला मिळालेली अशी दाद ही माझ्या दृष्टीनं निश्चितच मोठ्या सन्मानाची बाब आहे, असं मला वाटतं.

पूर्वी मुंबईला नि आतापुण्यात राहणारी कौमुदी मोडक ही तर माझी फार जुनी वाचक आणि चाहती. तिचं इंग्लीश साहित्याचं वाचन दांडगं! त्यामुळे प्रत्यक्ष भेटून, किंवा फोनवरून आमच्या साहित्यविषयक गप्पा होतात. जालन्याला राहणारी स्वप्ना जोशी आणि तिची कुटुंबीय मंडळीही माझ्या लेखनाची अशीच चाहती आहेत. या दोन्ही चाहत्या माझ्या वाढदिवसाला आवर्जुन फोन करतात, भेटकार्ड पाठवतात. कोल्हापूरला एस.टी. मध्ये कंडक्टर म्हणून काम करणारे श्री. शकील शिकलगार हे माझे वाचक. गेली बरीच वर्षं दर संक्रांतीला ते मला हलवा आणि भेटकार्ड अगदी नियमितपणे पाठवत आले आहेत...! असेच आणखीही इतर बरेच चाहते नि वाचक आहेत. सर्वांचा परामर्ष घेणं केवळ अशक्य आहे....

माझे साहित्य प्रकाशित करणारे तमाम प्रकाशक हेही एक प्रकारे माझे चाहतेच! कारण त्यांच्याच माध्यमातून माझं लेखन वाचकांपर्यंत पोहोचत असतं.

तर माझ्या वाचकांचं, चाहत्यांचं असं हे समृद्ध विश्व! त्यांचं प्रेम, त्यांचा प्रतिसाद हे माझ्या दृष्टीनं केवळ टॉनिकच नव्हे तर माझ्या दृष्टीनं ती 'संजीवनी'आहे. ही संजीवनी जोपर्यंत मिळत राहील तोपर्यंत हा हात लिहीत राहणार आहे.

७/१०० कामदा कॉप्लेक्स,
हिंदुस्थान स्टोअर्स मागे,
चिंचवड, पुणे ४११ ०३३.
फोन २७४५८५२४

T BOOK CLUB
या क्लबचे सभासद व्हा. आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके निम्म्या किमतीत मिळवा!

**टी बुक क्लब म्हणजे दर्जेदार अनुवादाची हमी**

**क्लबचे सभासद व्हा आणि क्लबची पुस्तके निम्म्या किंमतीत मिळवा!**

**सभासद फी ५०रु.**

या बुक क्लबचे सभासद **५० रु.** भरून होता येते. या क्लबअंतर्गत दरवर्षी गाजलेल्या सहा इंग्रजी पुस्तकांचे अनुवाद प्रकाशित केले जातात. सभासदांना ही पुस्तके निम्म्या किंमतीत मिळतात. पुस्तके प्रकाशित होताच आपणांस त्यासंबंधीची माहिती कळवली जाते. **ही सर्व सहाही पुस्तके घेणे आपल्यावर बंधनकारक राहील.** या सहा पुस्तकांपुरती ही सभासद फी मर्यादित राहील. या क्लबच्या सभासदांना आमच्या प्रकाशनाची इतर पुस्तके २५% सवलतीत मिळतात.

**या योजनेतील सहाही पुस्तके घेणे आवश्यक !**


**२००५ सालातील क्लब- टी बुक क्लब १३**

| | | | |
|---|---|---|---|
| सिटी ऑफ बोन्स | मायकेल कॉनेली | अनु. अजित ठाकूर | २४०रु. |
| ओमेर्ता | मारिओ पुझो | अनु.अनिल काळे | २२०रु. |
| गॉन फॉर गुड | हर्लन कोबेन | अनु. अजित ठाकूर | २५०रु. |
| द डार्क क्रुसेडर | ॲलिस्टर मॅक्लीन | अनु. अशोक पाध्ये | २४०रु. |
| सन्स ऑफ फॉर्च्युन | जेफ्री आर्चर | अनु. अजित ठाकूर | ३५०रु. |
| टॉक्सीन | रॉबिन कुक | अनु.प्रमोद जोगळेकर | २५०रु. |

**सर्व पुस्तकांसाठी एकत्रित पोस्टेज ४०रु.**
पुस्तक खरेदीसाठी प्रत्यक्ष भेट द्या
अथवा ड्राफ्ट किंवा मनिऑर्डर पाठवा.

मेहता पब्लिशिंग हाऊस, १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,पुणे ४११०३०

**आमच्या योजनांचे सभासद व्हा आणि आमच्या प्रकाशनाच्या सर्व पुस्तकांवर २५% सवलत मिळवा!**




## वाचक आणि मी

**शिरीष पै**

खरोखर मी स्वत:ला एक भाग्यवान लेखिका समजते. वाचकांचं प्रेम मला भरभरून मिळालं आहे. अगदी सोळाव्या वर्षापासून मी कथा लिहायला लागले तेव्हापासून तो अगदी आजपर्यंत. माझ्या वाचकांच्या खूप आठवणी माझ्यापाशी आहेत.

मराठी साहित्यातील नामवंत लेखकांडूनही कधी ना कधी मला आली आहेत. कथालेखनाच्या सुरुवातीच्या काळात विद्वान साहित्यिक पं. महादेवशास्त्री जोशी ह्यांनी मला एक फार सुंदर पत्र लिहिलं होतं. 'चांगली कथा लिहिली की लेखकाला आपलं वाटीभर रक्त आटल्यासारखं वाटलं पाहिजे.' असं त्या पत्रातलं एक वाक्य मला अजून आठवतं.

सुप्रसिद्ध पत्रकार श्री. प्रभाकर पाध्ये ह्यांनी 'नवशक्ती'च्या स्तंभातून माझ्या कथालेखनाचं उदंड कौतुक करणारं आणि माझं उज्ज्वल भविष्य वर्तवणारं एक स्फुट लिहिलं होतं. सुप्रसिद्ध कादंबरीकार गो. नी. दांडेकर आणि समाजवादी पक्षाचे पुढारी नानासाहेब गोरे हे मी त्यांच्यावर लिहिलेल्या समीक्षालेखांनी भारावून जाऊन मला प्रत्यक्ष भेटायला आले होते.

माझी 'दीपावली'तून प्रसिद्ध झालेली 'खडकचाफा' ही कथा वाचून श्रेष्ठ कथाकार पु. भा. भावे ह्यांनी दूरध्वनीवरून माझ्याशी संपर्क साधून मला पहिला प्रश्न हा विचारला, ''का हो? हे खडकचाफ्याचं झाड कुठं भेटलं तुम्हाला?'' मोठमोठ्या साहित्यिकांनी माझी पाठ थोपटली. मात्र विनोदी लेखक पु. ल. देशपांडे ह्यांनी मात्र माझ्या 'हायकू' ह्या लोकप्रिय काव्यप्रकाराचं 'बायकू' असं विडंबन करून माझ्या हायकूंची विडंबने 'सत्यकथा' मासिकात छापली.

ही झाली थोर साहित्यिकांची माझ्या लेखनाबद्दलची प्रतिक्रिया. पण मला खरंच जिवंत ठेवलंय ते माझ्या लहान लहान वाचकांनी. एका वाचकाकडून माझ्या सुरुवातीच्या कथा - ज्या 'नवयुग' साप्ताहिकातून नेमाने प्रसिद्ध होत असत - वाचून आलेलं माझं पहिलंच पत्र मला अजून आठवतं. त्या वाचकाचं नावही अजून मला आठवतं - जे मी इथं सांगणार नाही. ह्या पत्रातून त्यानं माझी दिलखुलास प्रशंसा केली होती आणि लौकरच माझ्या भेटीला येत असल्याचं आश्वासनही मला पत्रातून दिलं होतं आणि काय सांगू, एके दिवशी खरोखरीच तो आमच्या घरी उपस्थित झाला. त्याचा अवतार बघून मी तर थक्कच झाले. रूपाबद्दल मला काहीच म्हणायचे नाही, पण माझा हा पहिला 'फॅन' म्हणजे मूर्तिमंत बावळटपणाचा अवतार होता. वेड्यासारखा आ वासून तो हसत होता. त्याला धड काही बोलताच येत नव्हतं. किती वेळ झाला तरी तो उठेचना, शेवटी मला त्याला सांगावं लागलं, ''मला जरा बाहेर जायचंय्.'' मग तो उठला, निरोप घेऊन निघून गेला. दोन-तीन दिवसातच पोस्टानं एक सिनेमाचं तिकीट त्यानं मला पाठवलं आणि त्याच्याबरोबर सिनेमा पहायला बोलावलं. माझ्या एका मैत्रिणीनं ते तिकीट देऊन स्वत:च्या धिप्पाड भावालाच पाठवलं. जेव्हा तो भाऊ त्याच्या शेजारच्या खुर्चीवर येऊन बसला तेव्हा माझा 'फॅन' आपली खुर्ची सोडून जो पळून गेला तो आजतागायत माझ्या वाट्याला आला नाही.

ही झाली माझ्या पहिल्या वाचकाची रोमहर्षक कथा.

माझ्या कथा वाचून अनेक वाचकांनी मला स्तुतीची पत्रं पाठवली आहेत. पण सर्वांत अधिक पत्रं मला जी आली ती माझ्या 'हायकू' काव्यरचना प्रकाशात आल्यावर.

सुप्रसिद्ध दूरदर्शन निर्मात्या सुहासिनी मुळगावकर ह्यांनी माझ्या हायकूवाचनाचा कार्यक्रम 'दूरदर्शन'वरून सादर केल्यानंतर ह्या काव्यप्रकारानं मराठी रसिकांच्या मनाची पकड घेतली. माझा 'ध्रुवा' हा पहिला हायकूसंग्रह प्रसिद्ध झाला त्यानंतर ह्या प्रशंसापत्रांना सुरुवात झाली.

'हायकू' हा दुसरा काव्यसंग्रह प्रकाशित झाल्यावर तर ही पत्रं दुपटी-तिपटीनं वाढली. आजतागायत मला हायकूंबद्दल पत्रं येतात आणि अनेक नवोदित वा हौशी कवी स्वरचित हायकू मला वाचावयासाठी पाठवून देतात. फक्त 'पु. ल.' मात्र तावातावानं असं का म्हणाले की जपानचा 'पिवळा ज्वर' इकडं महाराष्ट्रात वाट चुकून आला, ते मला अजून कळलेलं नाही. खरं म्हणजे मला त्यांना म्हणावयाचं होतं की, पु. लं. हा पिवळा ज्वर नसून हा पिवळा बहर आहे! पण मला त्यांच्याविषयीच्या आदरानं असं म्हणता आलं नाही. मूळचा हा जपानी काव्यप्रकार, पण मी केलेलं त्याचं मराठीकरण महाराष्ट्रानं खरोखरी डोक्यावर उचलून धरलं.

इतकं की माझं नाव 'हायकूकार' शिरीष पै असंच पडलं आहे.

माझ्या गद्य लेखनापैकी वाचकांनी सर्वात अधिक पसंत केलं ते माझं 'वडिलांच्या सेवेसी' हे आत्मचरित्रात्मक ललितलेखसंग्रहाचं पुस्तक. असंख्य असंख्य पत्रं मला आली - अगदी थेट अमेरिकेहूनही. ह्याचं मुख्य कारण हेच असावं की महाराष्ट्राच्या हृदयात चिरंतन स्थान पटकावून बसलेले माझे लोकप्रिय वडील आचार्य प्रल्हाद केशव अत्रे ह्यांच्या सुरम्यमधुर आठवणी ह्या पुस्तकातून आल्या आहेत. त्या वाचून प्रत्यक्ष त्यांचीच भेट घडल्याचा आनंद आपल्याला झाला असं वाचकांनी मला कळवलं आहे.

लेखकाला एका बाबतीत नेहमीच सुखकारक अनुभव येत असतो आणि तो म्हणजे त्याचं लेखन वाचून प्रसन्न झालेला वाचक त्याचा मित्र बनतो, त्याच्या परिवारातलाच एक होतो. कधी कधी माझ्या वाचकांचे आणि माझे स्नेहसंबंधही जडलेले आहेत. पुण्याची सुविद्या पंडित ही माझी गेल्या पन्नास वर्षांची मैत्रीण माझ्या कथा वाचूनच माझ्या भेटीला आली आणि माझ्या जीवनभराची मैत्रीण होऊन बसली. काही वाचक आपल्या सुखदु:खाच्या कहाण्या मला सांगतात, माझ्यापाशी आपलं काळीज खुलं करतात. अशा दोन स्त्रियांची मला अजून आठवण येते.

पैकी पहिली तर तरुण मुलगी होती - अवघी सतरा-अठरा वर्षांची. सुधा नाव होतं तिचं. तिच्या पहिल्याच पत्रात तिनं मला लिहिलं होतं की तुमच्या कथेतली आदर्श माता माझ्या मनावर ठसली आहे. तुमच्या एका कवितेत तुम्ही म्हटलं आहे, ''बाळ म्हणाले 'आई' मी गंगेत बुडाले.'' अशी आदर्श आई मला व्हायचंय.'' पुढं ही मुलगी मला दूर गावाहून भेटायलाही आली. आमची चांगलीच मैत्री झाली. एकमेकींना आजही सातत्यानं पत्र लिहू लागलो. पुढं तिचं लग्न ठरलं, झाली, ती सुखानं संसार करू लागली. हे सारं सारं ती मला पत्रानं कळवत राहिली. पुढे तिला दिवस गेले तेव्हा अतिशय आनंदानं तिनं मला पत्र लिहिलं. आता ती 'आई' होणार होती. आणि नंतर...नंतर तिची पत्रंच यायची बंद झाली. मला वाटलं, असेल बाळाला सांभाळण्याच्या गडबडीत - पाठवील नंतर पत्र. पण पत्र काही आलं नाही. एके दिवशी एक अपरिचित तरुण माझ्या भेटीला आला. त्यानं स्वत:ची ओळख करून दिली. तो तिचा नवरा होता. मला इतका आनंद झाला. उत्सुकतेनं मी विचारलं, ''कशी आहे सुधा?'' तर त्याचे डोळे पाण्यानं भरून आले - तो चाचरतच म्हणाला, ''सुधा ह्या जगात....नाही!!'' ''काय म्हणता?'' मी चमकून म्हणाले. तो म्हणाला, ''हो! आपल्या बाळाला जन्म देतानाच तिचा मृत्यू झाला. आता...मीच सांभाळतो माझ्या बाळाला.'' माझ्या दुर्दैवी वाचक मैत्रिणीची कहाणी इथंच समाप्त झाली.

**लेखकाला एका बाबतीत नेहमीच सुखकारक अनुभव येत असतो आणि तो म्हणजे त्याचं लेखन वाचून प्रसन्न झालेला वाचक त्याचा मित्र बनतो, पुण्याची सुविद्या पंडित ही माझी गेल्या पन्नास वर्षांची मैत्रीण माझ्या कथा वाचूनच माझ्या भेटीला आली आणि माझी जीवनभराची मैत्रीण होऊन बसली.**

दुसरी अशीच एक दुर्दैवी स्त्री माझ्या भेटीला आली. देखणी, स्मार्ट, फॅशनेबल...माझी 'निमकहराम' ही गोष्ट वाचून ती मला भेटायला दूर गावाहून आली. आली ती भडाभडा बोलतच सुटली, ''ताई...ताई...खूप बोलायचं, मला तुमच्याशी. खूऽऽप,'' आणि ती आपली हकीगत कितीतरी वेळ मला सांगतच सुटली. ती म्हणाली की, जर तिच्या नवऱ्याला हे कळलं की ती मला भेटायला आली तर तो तिला बदडूनच काढील. कारण त्यानं पैसे खाल्ल्याची हकीगत आमच्या 'मराठा'तूनच प्रसिद्ध झाली होती. एका मोठ्या मंदिराच्या विश्वस्तांपैकी तो एक होता. माझ्या कथेची वाचक स्त्री ही वास्तविक त्याच्या लग्नाची बायको नव्हती, तर लग्नाशिवाय त्याच्याकडे तशीच राहणारी त्याची प्रेयसी होती. समाजाच्या दृष्टीनं एक रखेली. माझ्या 'निमकहराम' ह्या कथेतला कॅप्टन - साहेबांनी त्यांच्या प्रेयसीला जसं बनवलं होतं तसंच तिच्या प्रियकरानं - म्हणजे ह्या पैसेखाऊ विश्वस्तानं तिला बनवलं होतं.

त्याच्या नावानं कडाकडा बोटं मोडत ती म्हणाली, ''ढेकूण आहे तो ढेकूण. माझं रक्त पितोय, रोजच्या रोज. त्याच्या मनाविरुद्ध वागले तर अमानुष छळ करतो तो माझा.'' बोलता बोलता ती भानावर आली. म्हणाली, ''चला, पळते मी. खोटं बोलून गाडी घेऊन आलेय मी. मला वेळेवर पोचलं पाहिजे.'' घाईघाईत माझा निरोप घेऊन निघूनही गेली. ''ताई, परत येईन.'' असं म्हणत म्हणत. पण फिरून काही आली नाही, भेटली नाही.

हो, आणखीन् एक आठवलं. सत्तरीला आलेली एक वृद्ध स्त्री माझा एका ललितलेख वाचून मला भेटायला आली होती. एक पुरुष स्त्रीचा कसा छळ करतो हे त्या लेखात मी वर्णन केले होते. ती म्हणाली, ''गेला पन्नास वर्षं मी माझ्या नवऱ्याचा जाच सहन करते आहे. आता नाही सहन करणार मी हा छळ. आता मी त्यांच्याकडून घटस्फोट घेणार आहे!'' थक्कच झाले मी. लग्नानंतर पन्नास वर्षांनी घटस्फोट?

आपलं लेखन जेव्हा असं वाचकाच्या हृदयाचा ठाव घेतं तेव्हा लेखकाला आपण लिहिल्याचं सार्थक वाटतं. कधी ना कधी माझ्याही आयुष्यात वाचक माझं लेखन वाचून मला इतके जवळ आले की माझी कहाणी ही त्यांची कहाणी होऊन गेली आणि त्यांची कहाणी ती ही माझी कहाणी होऊन गेली. मला वाचकांची पत्रं आली ती नेहमी

स्तुतीचीच आली. एकच पत्र मात्र ह्याला अपवाद ठरलं - माझं 'मी माझे मला' हे पुस्तक वाचून एका वाचकानं मला पत्र लिहिलं, ''काय हो, कोण समजता तुम्ही स्वत:ला? तुमच्या उड्या सगळ्या वडलांच्या जिवावर आहेत. तुमच्या पुस्तकाचं नाव काय तर म्हणे 'मी माझे मला!' काय सारखं 'मी' 'मी' लावलंय? स्वत:पलिकडे काही दिसतंय का दुसरं तुम्हाला जगात?'' आणि हेच 'मी माझे मला' पुस्तक वाचून सुप्रसिद्ध विनोदी लेखक वसंत सबनीस इतके खूष झाले होते की त्यांनी 'ललित' शिफारशीत माझ्या ह्या पुस्तकाचा यंदा सर्वात अधिक आवडलेले पुस्तक म्हणून उल्लेख केला होता.

माझं 'कळी एकदा फुलली होती' हे नाटक वाचूनही मला अनेक पत्रं आली होती. माझ्या 'कुणीच नाही' आणि 'मैलोन् मैल' ह्या ललित लेखसंग्रहांनाही वाचकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला होता.

पण अलिकडे मात्र वाचकांचा प्रतिसाद माझ्या वाट्याला फारसा येत नाही. नाही म्हटलं तरी माझं वर्षाला एखाद दुसरं पुस्तक तरी प्रसिद्ध होतंच. अलीकडे 'उद्‌गारचिन्हे' आणि 'मनातले हायकू' हे दोन संग्रह प्रसिद्ध झाले. पण वाचकांचं एकही पत्र नाही! मात्र गेल्या काही वर्षात मी नियतकालिकातून विशेषत: दैनिकातून जे स्तंभलेखन केले त्याला तेवढा वाचकांनी उत्तम प्रतिसाद दिला.

'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये मी दर रविवारी 'सय' नावाचे सदर लिहीत असे. त्याचे वाचकांनी खूप कौतुक केले. पण त्याच 'सय'मधील लेखांचा 'सया' हाच लेखसंग्रह प्रसिद्ध झाला तेव्हा 'एक सामान्य लेखन' असा शेरा मारून 'महाराष्ट्र टाइम्स'मध्येच 'सयांचे' पुस्तक परीक्षण आले!


अलीकडे 'नवाकाळ' ह्या दैनिकातून मी 'नवयुग', 'मराठा'च्या ज्या आठवणी लिहिल्या त्याबद्दल मला पत्रे नाही तरी असंख्य फोन आले. विशेषत: दैनिक 'मराठा' बंद कसा पडला ह्याविषयीचा लेख वाचकांना अत्यंत आवडला. तो वाचून आमचे सी. ए. मला मुद्दाम मला भेटायला आले. मनाला धन्यता वाटली, की चला, आपण जे लिहिले ते वाचकांना आवडले! मी स्वत:ला कुणी फारशी मोठी लेखिका समजत नाही. उद्या आपलं लिखाण वाऱ्यावर उडून जाणार आहे हे मला चांगलं ठाऊक आहे. (राहिलेच शिल्लक तर कदाचित चारदोन हायकू राहतील!) पण मानवी जीवनात 'आज' महत्त्वाचा आहे.

आज आपण कुणाला तरी आवडतो, आजही कुणाला तरी आपण हवे आहोत ह्याचं महत्त्व मानवी जीवनात फार मोलाचं आहे. म्हणूनच आजही आपलं लेखन लोक आवडीनं वाचतात ही जाणीवच मला अजूनही लिहिण्याची प्रेरणा देते.

८ श्रॉफ हाऊस,
ग्राऊंड फ्लोअर, केळुस्कर मार्ग
शिवाजी पार्क, दादर (प)
मुंबई ४०० ०२८.


**२००४ व २००५ मधील वाचकांच्या सर्वाधिक पसंतीचे कथासंग्रह**

**व. कृ. जोशी**



'हॅलो मी इन्स्पेक्टर प्रधान बोलतोय' १२०/-
पोलिसकथा १५०/-
भीषण हत्याकांड ९०/-
रक्तदान १३०/-
निरपराध बळी १००/-

**व. पु. काळे**



गोष्ट हातातली होती! १००/-
दोस्त १२०/-

**आशा बगे**



पाऊलवाटेवरले गाव ११०/-
प्रतिद्वंद्वी १२०/-

**रत्नाकर मतकरी**



खेकडा ८०/-
कबंध १००/-
निर्मनुष्य १००/-

**सुमेध रिसबूड (वडावाला)**
सामक्षा २००/-

**डॉ. सुनीती अशोक देशपांडे**
अंतर-पर्व १३०/-

अनुवाद : मृणालिनी गडकरी
काबुलीवाला आणि इतर कथा : रवीन्द्रनाथ टागोर १००/-

मेहता पब्लिशिंग हाऊस, १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११०३०





## मला आलेली पत्रे

**निरंजन घाटे**

मेहता ग्रंथजगतसाठी वाचकांच्या पत्रांबाबत लिहायला सांगण्यात आलं तेव्हा जरा दचकलो. पूर्वी वाचकांची बरीच दीर्घ पत्रे येत असत. आजकाल लोक पोस्टात जा, पाकीट आणा, पेन उचला, ते कागदावर टेकवा, हा उद्योग करीत नाहीत. ते फोन उचलतात. नंबर फिरवतात आणि धडाक्यानं बोलायला सुरुवात करतात.

सकाळी सातसाडेसातच्या आधी आणि रात्री दहा नंतर जर फोन असेल तर 'झोपेतनं उठवलं नाही ना?' या वाक्यानं सुरुवात होते. असा फोन परगावचा असेल तर मग 'छे हो! जागाच होतो!' (तुमच्याच दूरध्वनीची वाट बघत होतो!) हे मनात बोलून पुढं बोलणं सुरू होतं पण बहुतेक वेळा असे फोन एखाद्या खरोखरच गरजू व्यक्तीचे असतात किंवा एखाद्या वृद्ध व्यक्तीचे असतात. एकदा रात्री अकरा सव्वाअकराला दूरध्वनी खणखणला. माझ्या पत्नीने तो घेतला. मी जर लिहीत असलो किंवा झोपलेला असलो तर 'ती' अमूक वेळी फोन करा! असं सांगते. तिनं मला खुणेनंच फोन घे असं सांगितलं.

'माफ करा, इतक्या उशिरा फोन केला. माझं वय चौऱ्याऐंशी वर्षांचं आहे. मला झोप फार लागत नाही. माझा नातू तुमची पुस्तकं वाचतो. तो काय वाचतोय ते बघायला मी ते पुस्तक वाचायला घेतलं. रंगून गेलो. मग म्हटलं लगेच फोन करावा. आता लक्षात राहात नाही. ते माझा 'यंत्रलेखक' नावाच्या संग्रहातल्या विज्ञानकथा वाचत होते. नातवाकडून आजोबांकडे असा हा उलटा प्रवास त्यांनी दूरध्वनी संपर्क साधल्यामुळे मला कळला.

मी १९७० च्या सुमारास मासिक व नंतर साप्ताहिक मनोहरमधून नियमित लेखन सुरू केले. त्याकाळी लेखकाचा पत्ता नियतकालिकांमधून छापला जात नसे. सर्व पत्रे संपादकांकडे जात असत. मग संपादक ती निवडून छापत किंवा लेखकाला पाठवीत असत. अशा पत्रात आपलं नाव असलं की साहजिकच अभिमान वाटत असे. एकदा महाबळांना (श्री. भा. महाबळ - मनोहरचे कार्यकारी संपादक) मी म्हटलं, 'महाबळ, च्यायला, पत्र छापता पण माझं नाव वगळता.' तेव्हा महाबळ म्हणाले, ''अरे, आधीच लेका तू एवढा आगाऊपणा करतोस, तुझा मजकूर चांगला आहे, असं छापलं तर माझ्या डोक्यावरच बसशील.''

१९७५ साली मी 'मुहंमद अली : द ग्रेटेस्ट' असा लेख मनोहरच्या दिवाळी अंकात लिहिली होता. तो त्याच्या 'अली : आय ॲम द ग्रेटेस्ट' ह्या पुस्तकावरूनच लिहिलेला होता. त्यावर खूप पत्रे आली होती. नंतरही बराच काळ तो लेख लोकांच्या स्मरणात होता. तो छापील पत्रे किंवा नंतर आलेली पत्रे कापून ठेवावी, किंवा जपून ठेवावी असं मात्र वाटलं नाही.

ह्यानंतर आणखी एका संपादकांचा अनुभव नमूद करणं भाग आहे. बरेच संपादक/उपसंपादक लेखात काटछाट करतात, शीर्षके बदलतात. वाचक नाराज झाले तर लेखकाच्या स्पष्टीकरणातील संपादक/उपसंपादकांची चूक दाखविणारा भाग वगळतात किंवा परस्पर माफी मागून मोकळे होतात. ह्याबाबत किर्लोस्कर आणि नंतर लोकप्रभाचे संपादक ह. मो. मराठे यांच्याबाबतचे अनुभव मात्र खूप चांगले आहेत.

एकदा कुठल्या तरी उपग्रहाबद्दल मराठे यांना ताबडतोब मजकूर हवा होता. त्यांचा मला पुणे विद्यापीठात निरोप आला. दूरध्वनीद्वारे ते म्हणाले, ''आज ती बातमी आहे. मला संध्याकाळी किंवा उद्या सकाळी मजकूर दे, अंक छापून तयार आहे. तेवढंच बाकी आहे.'' मी घरी गेल्यावर संदर्भ बघितले. दुसऱ्या दिवशी सकाळी साडेनऊला शंकर कदम दारात हजर झाला. मी त्याला मजकूर दिला. दिवसभर आपलं काहीतरी घाईत चुकलंय किंवा विसरलंय असं वाटत होतं. पुढच्या भेटीत ती चूक (आता आठवत नाही, बहुधा अवकाश वीराचं नाव चुकीचं होतं. १९७४-७५ मधली गोष्ट आहे ही.) मी मराठे यांना सांगितली. तोपर्यंत अंक छापून झाला होता. अंक छापून आल्यावर एका वाचकाने नेमकी तीच चूक निदर्शनास आणली. त्या पत्राखाली 'ही चूक अनवधानाने झाली, त्याबद्दल आम्ही दिलगीर आहोत.' अशी ओळ होती. हाच अनुभव पुढे मला लोकप्रभात 'पाकिस्तानी अणुबॉंब' ह्या विषयावरील लेखाचे वेळी आला. 'ही चूक संपादकीय अनवधानाने झाली, त्याबद्दल आम्ही दिलगीर आहोत.' असे अनुभव फार विरळा. त्यामुळे हे मुद्दाम सांगितले. ह. मो. मराठेंनी इतर संपादकांप्रमाणे ती चूक लेखकावर ढकलली नव्हती. त्याचबरोबर वाचकांची ती चूक दाखवणारी पत्रे छापतांना ती पत्रे संपादित स्वरूपातच छापून त्याखाली हे स्पष्टीकरण दिले होते.



प्रत्यक्षात ती चूक ही 'तात्काळ लेख हवा' ह्या मागणीतून झाली होती. त्यावेळीही मी मराठे यांच्याशी संपर्क साधून त्यांना ती कळवली होती, तेव्हा अंकाची बांधणी सुरू होती. त्यामुळे ती चूक वाचकांपर्यंत पोहोचली होती. एवढ्या वाचकांनी लेख चांगला आहे पण चूक झाली हे कळवलं, ह्याचा अर्थ वाचक आमचा अंक आणि तुझा लेख वाचतात ह्याची ती पावतीच आहे, असं त्यांनी मुद्दाम फोनवरून संपर्क साधून कळवलं होतं व नंतर पत्रही पाठवलं होतं.

ह्या उलट एक अनुभव आहे. एकदा एका वृत्तपत्रातील उपसंपादकाने फोन केला. विजेसंबंधी तुमच्याकडे काही आहे का? तेव्हा कुठेतरी वीज पडून ५-६ व्यक्ती मेल्या होत्या. मी तेव्हा दिवाळीसाठी लेखन करीत असल्याने मला खरं वेळ नव्हता पण योगायोगाने 'आकाशातील वीज आणि तिच्या करामती' असा एक लेख लिहून तयार होता. मात्र त्यात वीज का पडते किंवा तिच्यापासून वाचण्याचे उपाय ह्यावर शब्दही नव्हता. हा लेख छापतांना 'विजेपासून वाचण्याचे उपाय' ह्या शीर्षकाने छापण्यात आला. मला दोन वाचकांची पत्रे आली. त्यांना मी परिस्थिती सांगितली. ते शीर्षक मी दिलेले नाही, हे स्पष्ट केलेच पण त्या लेखातील मधलाच एक परिच्छेद जागेअभावी मागं पुढं काय आहे ह्याचा विचार न करता काढला आहे, हे स्पष्ट केलेच पण माझ्या कडच्या झेरॉक्सप्रतीमधील मजकूरही दाखवायची तयारी असल्याचे कळवले. त्यांचे समाधान झाल्याचे दिसले.

त्या वृत्तपत्राने मात्र तिसऱ्याच एका व्यक्तीने पाठविलेले एक अर्वाच्य पत्र जसेच्या तसे प्रसिद्ध केले. ते पत्र त्यांनी मला दाखवले असते तर मी त्याला लगेच उत्तर दिले असते. माझ्या लेखानंतर तीन आठवड्यांनी ते पत्र छापले गेले होते. मी तिकडे दुर्लक्ष केले. त्या उपसंपादकाला मी 'इतरवेळी फोन करता, यावेळी का केला नाही' असे विचारले. तेव्हा 'ते पत्र परस्पर छापले गेले. वाचकांचा पत्रव्यवहार मी बघत नाही.' असे उत्तर मिळाले. पुढे हे गृहस्थ म्हणाले, 'तुम्ही उत्तर द्या! अशी पत्रा-पत्री बरी असते. तेवढीच जागा भरते.' 'मी काही त्याला उत्तर देणार नाही. इतर वेळेस तुम्ही बारीकसारीक शब्दांना आक्षेप घेता. मात्र ह्यातील अनेक शब्द आणि शैली आक्षेपार्ह आहे, ती कशी चालते?' ह्या प्रश्नाला त्यांच्याकडे उत्तर नव्हते.

**सर, तुम्ही याबद्दलची माहिती कळवा किंवा त्यावर एक लेख लिहा. तुमचे बरेच लेख आमच्या सूचना फलकावर लावले जातात; म्हणजे ते वाचून तरी आमच्या त्या शिक्षकांना ही प्राथमिक माहिती कळेल.'**

यानंतर माझ्या सुदैवाने त्या विषयातील काही तज्ज्ञ व्यक्तींनी माझी बाजू उचलून धरली. दरम्यान त्या मूळ पत्रलेखकाला मी भेटीस बोलावले. त्याच्या लेखांची शीर्षकेही वृत्तपत्रात बदलली गेल्याचे त्याने मान्य केले. त्याचे लेख संपादकांनी वेळोवेळी कापल्यामुळं त्यानं वृत्तपत्रात लिहिणं बंद केल्याचं तो म्हणाला. 'मी नेहमी असंच लिहितो! वृत्तपत्रवाले वाटेल ते छापतात.' असं त्यानं सांगितलं. पुढं त्या वादात त्याचा पराभव झाला. वृत्तपत्राने मला 'आतातरी तुमचं स्पष्टीकरण द्या!' असं सांगितलं. त्यावेळीही त्या स्पष्टीकरणात 'माझ्या मूळ लेखाचे शीर्षक बदलले आणि मजकूर वेडावाकडा कापला' ही बाब छापली गेली नव्हती.

पत्रलेखकांच्या बाबतीतला आणखी एक अनुभव असाच मजेशीर आहे. ही पत्रं खरंतर जपून ठेवायली हवी होती. हा अनुभव माझ्यासह अनेक विज्ञानलेखकांनी घेतला आहे. हे एका मोठ्या महाविद्यालयात प्राध्यापक होते. त्यांना अनेक मान-सन्मान मिळाले होते. महाराष्ट्रात सर्वत्र त्यांचे लेख छापून येत होते; पण हे गृहस्थ सर्व वृत्तपत्रांना खोट्या नावांनी पत्रे लिहीत असत. त्या पत्रात दुसऱ्याची निंदानालस्ती आणि ह्यांचे लेख कसे चांगले, असा मजकूर असे. माझ्या लेखांबद्दलची अशीच त्यांची पत्रे एका संपादकांनी मला दाखवली. मी त्यावर काय बोलणार? तेव्हा ते संपादक म्हणाले, 'तुम्ही चांगलं लिहिता याचं हे प्रमाणपत्र आहे. हे गृहस्थ उगीचच पत्रे लिहिणार नाहीत.' ते वारले आणि मग ही पत्रे आपोआप बंद झाली.

एकदा एका मुलीचं पत्र मला आलं. ह्या मुलीचं पत्र जपून ठेवायला हवं होतं, असं आता मला वाटतं. हे पत्र फार बोलकं होतं. ती बी.एस्सी. च्या दुसऱ्या वर्षात शिकत होती. तिला जैवतंत्रज्ञानाचा अभ्यास करायचा होता. मात्र तिचे शिक्षक काय सांगतात ते तिला कळत नसे. तिच्या मते ते कुणालाच कळत नव्हतं. त्यांचं इंग्रजी अतिशय कच्चं होतंच पण जीवशास्त्राची मूलभूत माहितीसुद्धा त्यांना नसावी, असं त्यांच्या शिकवण्यावरून वाटायचं. बरं, त्यांना योग्य ती माहिती सांगायला गेलं तरी ते विद्यार्थ्याला त्रास द्यायचे. 'तुमच्या क्लासच्या मास्तरला बघून घेईन.' हे त्यांचं परवलीचं वाक्य होतं. त्या मुलीला गुणसूत्र आणि जनुकं (जीन) यांचं स्पष्टीकरण हवं होतं. तिचं म्हणणं असं, 'सर, तुम्ही याबद्दलची माहिती कळवा किंवा त्यावर एक लेख लिहा. तुमचे बरेच लेख आमच्या सूचना फलकावर लावले जातात; म्हणजे ते वाचून तरी आमच्या त्या शिक्षकांना ही प्राथमिक माहिती कळेल.' मी तिला

हवी ती माहिती आकृत्यांसह कळवली. पुढं ती मुलगी पदवीधर झाली. तिचा मला आभाराची पत्रंही आली होती. ती उच्च शिक्षणासाठी बहुधा परदेशी गेली असावी.

मुहमद अली प्रमाणेच किर्लोस्करमध्ये मी आयझॅक ॲसिमोव्ह वरती जो लेख लिहिला तो गाजला होता. त्यालाही खूप पत्रे आली होती. ती सगळीच स्तुतिपर होती त्यामुळं ती लक्षात राहिली तरी त्यातलं एखादं पत्र वेगळं असं लक्षात राहिलं नाहीतर त्या लेखाला चांगला म्हणणारी बरीच पत्रं आली एवढंच लक्षात आहे. तसाच एक बऱ्याच जणांना आवडलेला लेख म्हणजे 'सुपर कॉम्प्युटरचा बाप- मानवी मेंदू' किंबहुना ह्या लेखानंतर मानवी मेंदूवर मी आणखी लेख लिहावे, असं बऱ्याच संपादकांनी सुचवलं. ह्या लेखांचे पुस्तक म्हणजे आत्मवेध.

१९७४ ते ७७ ह्या काळात मी मनोहरमध्ये एक विनोदी सदर चालवत होतो आणि वटवट ह्या विनोदी मासिकात बराच मजकूर लिहीत असे. त्यावेळी माझ्या असं लक्षात आलं की विनोद न कळणारी मंडळी भयंकर चिडकी पत्रं लिहितात आणि वैयक्तिक निंदा नालस्ती करतात. त्या काळात 'मटका' नावाचा जुगार प्रचंड जोरात चालत होता. ते आकडे लावण्यासाठी योग्य आकडा कळावा म्हणून लोक कशाचाही आधार घेत. व्यंगचित्रातील टकल्या माणसाच्या डोक्यावरच्या केसांचाही आकडा लावण्यासाठी उपयोग केला जात असे. अशा माणसांची टिंगल करणारी एक कथा मी लिहिली होती. त्यातला कथानायक देवळातून बाहेर पडतो, त्याला समोर एक ट्रक जाताना दिसतो. त्या ट्रकच्या मागे 'सत्याचा वाली परमेश्वर' असं लिहिलेलं असतं; म्हणून तो 'सात' ह्या आकड्यावर पैसे लावतो आणि त्याला बरेच पैसे मिळतात. त्यामुळे रोज त्याच देवाला जाऊ लागतो आणि बाहेर आल्यावर रिक्षा, ट्रक वगैरेच्या मागे जे काही असेल त्याचा अर्थ लावून पैसे लावतो.

ही गोष्ट प्रसिद्ध झाल्यानंतर एका आजोबांचं पत्र आलं. आजकालच्या तरुणपिढीनं लाज सोडली आहे. हिंदूच्या देवांची टिंगल करता. हिम्मत असेल तर इतर धर्मीयांना दुखवा. तुमचं वाटोळं होईल. यापुढं तुमची एकही ओळ छापून येणार नाही, असा शापही त्या पत्रात होता.

मध्यंतरी आदिवासींच्या चालीरीतींवर पत्र लिहित असताना एक पत्र आलं. त्यात अतिशय अश्लील मजकूर होता. मला भेकड म्हटलं होतं. पत्राखाली सही नव्हती. मी सहज पोस्टाच्या एका अधिकाऱ्यास ते पत्र आणि पाकीट दाखवलं. त्यानं ते पत्र लष्करी पोस्टातून आलं असून जर मराठा लाईट इन्फन्ट्रीच्या अधिकाऱ्यांना विनंती केली तर ह्या माणसाचा पत्ता लागू शकेल; असं सांगितलं. पण त्यासाठी अधिकृत तक्रार करावी लागेल. पुढे ह्या व्यक्तीला पोस्टाचा गैरवापर केला ह्या कायद्याखाली शिक्षा होईल आणि त्याला कदाचित नोकरीसही मुकावं लागेल, असं सांगितलं तेव्हा मी तक्रार करायचा विचार रद्द केला.

बरीच पत्रं वारंवार येतात ती म्हणजे संदेश आणि सही पाठवा. जर घरी कार्ड असेल तर मी लगेच उत्तर पाठवतो. मात्र फोटो, बायोडेटा पाठवा ह्या पत्रांना उत्तर देत नाही.

मध्यंतरी मानसशास्त्रीय लेखमालेनंतर बऱ्याचजणांची पत्रे आली. त्यांना मी मानसोपचार तज्ज्ञाचा सल्ला घ्यावा, मी डॉक्टर नाही असे कळवले. अशा बऱ्याच प्रकारच्या पत्र-आठवणी आहेत. पण मी उत्तर पाठवून झाले की ही पत्रे काही दिवसांनी फाडून टाकतो. कारण ती जपून ठेवून करायचे काय हा प्रश्न.


दोन व्यक्तींचा मला विशेष उल्लेख करावासा वाटतो. ते दोघं म्हणजे सुमेध रिसबूड-वडावाला आणि पंकज काळुवाला हे दोन मित्र. हे पोस्टाने मित्र बनले खरे पण फोनमुळे आता पत्रे न लिहिता थेट संपर्क साधू लागले. ह्या दोघांचीही अक्षरे चांगली मोठी, अक्षरात आणि ओळींमध्ये भरपूर जागा सोडलेली. पत्राला व्यवस्थित समास सोडलेला आणि मुख्य म्हणजे पत्राबरोबर एखादं अंतर्देशीय पत्र किंवा तिकीट लावलेलं पाकीट असे.

सुमेध बरेचदा अंतर्देशीय पत्र पाठवायचा. त्याच्या चार घड्या घालून त्या प्रत्येक चौकोनात तो लिहायचा. त्यात त्याचं काय चाललंय, माझं काय चाललंय, काय वाचलं, कोण भेटलं ह्याची माहिती, पुण्यात कोणकोण भेटलं ह्याची चौकशी, नवीन वाचलेल्या पुस्तकाबद्दल चर्चा असे. एवढ्या मोठ्या लेखकाची पत्रं जपून ठेवायली हवी होती असं आता वाटतं.

पंकज काळुवाला हा एक तरुण माझ्या लेखनाचा चाहता आहे. तो त्याच्या दातिवरे नावाच्या गावात विज्ञानप्रसाराचं काम करतो. माझं एखादं पुस्तक वाचलं की त्याचं व्यवस्थित परीक्षण करून पाठवतो. दातिवरे ह्या गावी येऊन ताजी मासळी खावी, असं आमंत्रण देतो. त्याच्या प्रदीर्घ पत्राला काय उत्तर द्यावं, हा मला नेहमीच प्रश्न पडतो. मी त्याला 'तुझ्याकडे नक्की येणार!' असं आश्वासन देतो; पण अजून तरी ते जमलेलं नाही. अलीकडे मात्र तोही पत्रं पाठवायचं सोडून फोन करू लागलाय. असे हे पुलंच्या भाषेत बोलायचं तर माझे 'पौष्टिक' अनुभव. बरेच आहेत; पण ह्यावेळी एवढे पुरेत असं वाटतं.

**सुमेध बरेचदा अंतर्देशीय पत्र पाठवायचा. त्याच्या चार घड्या घालून त्या प्रत्येक चौकोनात तो लिहायचा. त्यात त्याचं काय चाललंय, माझं काय चाललंय, काय वाचलं, कोण भेटलं ह्याची माहिती, पुण्यात कोणकोण भेटलं ह्याची चौकशी, नवीन वाचलेल्या पुस्तकाबद्दल चर्चा असे. एवढ्या मोठ्या लेखकाची पत्रं जपून ठेवायली हवी होती असं आता वाटतं.**

१०२५ ब सदाशिव पेठ,
श्री चिंतामणी सोसायटी,
नागनाथ पाराजवळ,
पुणे ४११०३०.




# राष्ट्रपती म्हणाले, ''मी सुद्धा एक कवी आहे.''

**गंगाधर महाम्बरे**

आपल्या साहित्याला दाद देणाऱ्या वाचकांची पत्रे, भेटी किंवा संवाद हा प्रत्येक साहित्यिकाच्या आनंदाचा विषय असतो, असायला हवा.

गेल्या उण्यापुऱ्या पाच दशकांपासून मी विविधप्रकारचं लेखन करीत आहे. तसं पाहिलं तर एक गणित विषय सोडून मी अगणित विषयांवर लिहिलं आहे. ललित लेखनाखेरीज एखाद्या सर्वस्वी नव्या विषयावर लेखन करायचा मनात विचार आला की अगदी मुळापासून मी त्या विषयाचा अभ्यास सुरू करतो. याचं एक उदाहरण द्यायचं म्हणजे केवळ मराठीतच नव्हे तर सर्व भाषांमध्ये जे 'मेडिकल ट्रान्स्क्रिप्शन' या विषयावर एकुलतं एक पुस्तक प्रसिद्ध झालं आहे ते मी लिहिलं आहे. अन्य काही औद्योगिक विषयावरची पुस्तकं सर्वप्रथम लिहिण्याचं श्रेय मला मिळालेलं आहे. (उदा. महात्मा गांधीप्रणित उद्योग व्यवसाय.)

ललितलेखनापेक्षा औद्योगिक विषयांवरच्या माझ्या पुस्तकांना फार मोठा प्रतिसाद लाभत आला आहे.

'मराठी भावगीतकार' या नात्यानं मला रसिक वाचकांचं (आणि श्रोत्यांचंही) खूप प्रेम मिळत आहे. पन्नास वर्षांपूर्वी लिहिलेली 'संधिकाली या अशा', 'पूर्वेच्या देवा' सारखी माझी गीतरचना कवितासंग्रहातून वाचून किंवा प्रसिद्दी माध्यमांतून ऐकून आजही माझे रसिक मला खुषीपत्रं पाठवतात.

'तू विसरूनि जा' या माझ्या भावकवितेत 'उत्पात' हा शब्द आल्यामुळे आम्ही ध्वनिमुद्रिकांतून तुमच्यामुळे आशा भोसलेंच्या आवाजात अमर झालो आहोत, असं सांगणारा पंढरपूरचा एखादा उत्पात-कुलोत्पन्न दूरध्वनीवरून सुखसंवाद साधतो तेव्हा पावन झाल्यासारखं वाटतं.

एका महिलेनं आपल्या आजारपणात मी लिहिलेलं आणि माणिक वर्मांनी गायलेलं 'शुभं करोति कल्याणम्' हे गीत एकदा नभोवाणीवर ऐकलं आणि आपल्या मुलीला त्याची रेकॉर्ड आणायला सुचवलं. त्यानंतर काही काळात ते गीत ऐकून बरं वाटू लागल्यावर श्री. एरंडे नावाच्या त्यांच्या शेजाऱ्याकडून त्यांनी मला ही घटना कळवली होती.

माझ्या 'उष:काल' या कवितासंग्रहातील ही संपूर्ण कविता या ध्वनिमुद्रिकेत का घेतली नाही अशी विचारणा करणारीही काही पत्रं आली होती.


कवितांच्या मूळ कवीलाही अज्ञात असलेल्या एका 'प्रभावी' हकिगतीबद्दल लिहायला हवं. एकदा मला एका श्रोत्यानं सांगितलं, ''आत्ताच तुमची 'रामायणात माझ्या सीता कशास आली' ही कविता रामदास कामतांच्या आवाजात मी पुणे नभोवाणीवर ऐकली. त्यांच्याकडूनच मला तुमचा पत्ता मिळाला. मी माझ्या पत्नीला परत कधीही सासरी आणायचं नाही म्हणून माहेरी सोडून आलो होतो. आता हे गीत ऐकल्यावर मी तिला नांदण्यासाठी परत घेऊन येत आहे.''

'रामायणात माझ्या' हे भाऊसाहेब खांडेकरांचं आवडतं गीत होतं. आपल्या अखेरच्या दिवसात हृदयनाथ मंगेशकरांच्या मुंबईतील निवासस्थानी रहात असताना त्यांनी माझ्याकडून हे गीत म्हणून घेतलं होतं.

स्वाध्यायप्रणेते पांडुरंगशास्त्री आठवले माझं 'निळा सावळा नाथ' हे भक्तिगीत माझ्यासमवेत गायले होते ते इथं आठवतं. 'रसिका तुझ्याचसाठी' ही परवीन सुलतानांनी म्हटलेली माझी भावकविता ऐकून ऑस्ट्रेलिया, अमेरिकेतील रसिकांचीही पत्रं आली आहेत.

माझी औद्योगिक विषयांवरील पुस्तकं प्रस्थापित उद्योजक, नवउद्योजक, विद्यार्थी व प्राध्यापकांमध्ये लोकप्रिय आहेत. काही प्राध्यापक म्हणतात, ''तुमचं पुस्तक हाती आल्याशिवाय आम्ही आमच्या कॉलेजच्या 'व्यावसायिक उद्योजकता' हा विषय घेणाऱ्यांना कसं शिकवायचं ते सांगा!'' हा उल्लेख प्रा. कडवेकर व प्रा. कोठावदे यांच्या सबोतच्या माझ्या सहलेखनातील पुस्तकांना उद्देशून असतो.

बाबूराव पारखे यांनी एकदा कळवलं, ''मी तुमचं 'महिलांसाठी उद्योग व्यवसाय' हे पुस्तक वाचलं. आवडलं. मी 'उद्याचं ब्युटी पार्लर्स' या विषयावर खास लेख लिहिला आहे. तो या पत्रासोबत जोडत आहे. तुमचं जेव्हा अशाप्रकारचं पुढील पुस्त्क निघेल तेव्हा



त्यात हा माझा लेख समाविष्ट करावा. 'मेडिकल ट्रान्स्क्रिप्शन' वाचून एका डॉक्टरानं लिहिलं की तुम्ही कथन केलेल्या या व्यवसायातील खऱ्याखोट्या कथा वाचल्या आणि त्या वाचून झाल्यावर मी माझा चालणारा दवाखाना बंद न करता पूर्ववत चालूच ठेवण्याचा (सु)विचार करीत आहे.''

मी लिहिलेलं फाळके चरित्र वाचून दिनकर चौधरी या फिल्म इन्स्टिट्यूटच्या पहिल्याच बॅचमधील विद्यार्थ्यानं कळवलं आहे की, 'मी इन्स्टिट्यूटचा विद्यार्थी असल्यापासून तुम्ही फाळके चरित्रासाठी घेत असलेले श्रम जवळून पाहिले आहेत. तुम्ही फाळक्यांचे पहिले चरित्रकार असून तुमच्या पुस्तकावर इंग्रजी आणि हिंदीत चित्रपट तयार करण्याचा मी संकल्प केला आहे.

मॉरिशसमध्ये भरलेल्या जागतिक मराठी परिषदेच्यावेळी पु. ल. देशपांडे म्हणाले होते की, 'माझी प्रवासावरील पुस्तकं वाचून लोक जगातील अनेक देशात फिरले, पण मी महाम्बरेचं पुस्तक वाचून इथं आलो आहे. (या परिषदेच्या अधिवेशनाच्या आदल्याच वर्षी मी मॉरिशसला गेलो होतो.)

दि. २० डिसेंबर १९९५ रोजी श्री. संतोष उमाकांत पाध्ये यांनी एक प्रदीर्घ पत्र लिहून मला कळवलं की, ''मी हे तुमचं पुस्तक वाचून मंत्रमुग्ध झालो व त्यावेळेपासून ऑटोमोबाईल इंजिनिअरिंग हे क्षेत्र काय आहे याबद्दल मला जिज्ञासा निर्माण झाली व मनापासून आपणास गुरू मानून त्या क्षेत्राचा समग्र अभ्यास करण्याचा निश्चय केला. माझ्या वडिलांच्या प्रोत्साहनामुळे मी ठाण्यातील प्रोग्रेसिव्ह इन्स्टिट्यूट जॉईन करून याचवर्षी माझा कोर्स पूर्ण केला आहे. सदर परीक्षा इंडियन टेक्निकल एज्यु. सोसायटी, कालिना, मुंबई ९८ मार्फत दि. ५ नोव्हेंबर १९९५ रोजी झाली. हे सर्व आपले पुस्तक वाचून झाले आणि त्याबद्दल मी आपला ऋणी आहे...''

अशाप्रकारे माझी पुस्तकं वाचून मला अनेकांनी जो प्रतिसाद दिला तो मला खरोखरच मोलाचा वाटतो. सामान्यांपासून असामान्य व्यक्तींचे मिळणारे हे प्रतिसाद खरोखरच माझे टॉनिक आहे. 'मौलिक मराठी चित्रगीते' या पुस्तकाला राष्ट्रपती कलाम यांच्या हस्ते सुवर्णकमल व रोख पुरस्कार स्वीकारताना निवेदकानं 'मराठीतील एक सुप्रसिद्ध कवी' असं माझ्यासंबंधी बोलल्यावर राष्ट्रपतींनी आनंदानं माझे हात आपल्या हाती घेत म्हटलं होतं, ''मी सुद्धा एक कवी आहे हे तुला माहीत आहे का?''

**'मौलिक मराठी चित्रगीते' या पुस्तकाला राष्ट्रपती कलाम यांच्या हस्ते सुवर्णकमल व रोख पुरस्कार स्वीकारताना निवेदकानं 'मराठीतील एक सुप्रसिद्ध कवी' असं माझ्यासंबंधी बोलल्यावर राष्ट्रपतींनी आनंदानं माझे हात आपल्या हाती घेत म्हटलं होतं, ''मी सुद्धा एक कवी आहे हे तुला माहित आहे का?''**

शिवरंजनी, १२ कलानगर,
पुणे - ४३.





**कवडसे** **योगिनी वेंगुर्लेकर** **नवे कोरे..**


*बाईचं स्वातंत्र्य काय मोलाचं ? तिची गुलामी संपवण्याची ताकद तिच्यात आहे का? तिची निर्मितीची ताकद तिला समजली असूनही ती आता कशी जगणार? त्याच चक्रात राहणार की?...या अनादी प्रश्नाचं उत्तर शोधण्याच्या प्रवासाला तुमचं मन तयार आहे? नक्की ठरवा काय ते; कारण हा प्रश्न आता लगेच नाही तरी कधी तरी वेगानं बदलत जाणाऱ्या जगात तुमच्यासमोर उभा राहणारच आहे....*

**पुस्तकामधून...**

**सामान्य माणसांच्या जगण्यातले असामान्य क्षण उजळून टाकणारे प्रकाशाचे कवडसे पकडणाऱ्या तेजस कथा**

**किंमत : १२०रु.**
**पोस्टेज : २०रु.**



# हा आंतरिक प्रतिसाद अभूतपूर्वच!

**शिवराज गोर्ले**

**मा**झी तशी जरा गंमतच आहे. म्हणजे असं की लेखक म्हणून मी यश मिळवलं होतं - आणि तेही अगदी 'घवघवीत' म्हणावं असं- तरीही मला एकही वाचक नव्हता! कारण मी वाचकांसाठी लिहितच नव्हतो - मी लिहीत होतो प्रेक्षकांसाठी.

जवळजवळ वीस वर्षांपूर्वी मी काहीसा 'सणकी' निर्णय घेऊन, मी चांगल्या नामांकित कंपन्यांमध्ये अधिकारपदावर काम करीत होतो - पण एका पुस्तकानंच माझं विचारविश्व म्हणा...भावविश्व म्हणा - ढवळून टाकलं. ते पुस्तक म्हणजे अमेरिकन लेखिका 'आइन रॅन्ड'चं 'दि फाऊन्टनहेड'. ती एक जबरदस्त कादंबरी होती. पण त्या कादंबरीनं एक सत्य माझ्या तोंडावर फेकलं - 'तुला आयुष्यात जे काही व्हायचं होतं ते तू झाला आहेस का? तुला मनापासून जे करावंसं वाटतं, तेच तू करतो आहेस का? तसं करत नसशील आणि नोकरीबिकरी करून आरामात राहत स्वत:चा एक प्रकारे 'छळ'च करून घेतोयस!'

मी मनातून हललोच. मला आठवलं - अगदी शाळकरी वयापासून मला तर लेखक व्हायचं होतं. पण हे सांगणार कुणाला? पूर्ण वेळ लेखक होणं ही काही आपल्याकडे - तेव्हा तरी- करिअर नव्हती. बँकेत चिकटायचं, प्राध्यापक व्हायचं - आणि दुसरीकडे लिहीत रहायचं! मी ऑफिसर झालो होतो, पण दुसरीकडे लिहीत काहीच नव्हतो!

आपण आठएक वर्षे बिनलेखनाची अशी वाया घालवली आहेत, हे जाणवलं, तसा मी नोकरीचा राजीनामा दिला आणि पूर्णवेळ लेखक व्हायचं ठरवून टाकलं.

मला कल्पना आहे - मी लेखक का झालो, हा आपला विषय नाहीये - पण हे सांगणं यासाठी आवश्यक होतं की माझी परिस्थिती जरा वेगळी होती. माझ्याकडे लेखननिष्ठा होती की नाही...जीवनाची व्यापक अनुभूती होती की नाही हे प्रश्न दुय्यम ठरणार होते. वाचकांचा म्हणा, प्रेक्षकांचा म्हणा - प्रतिसाद लाभला नसता तर मला पुन्हा नोकरी करावी लागली असती - शेवटच्या कंपनीत 'एम. डी.' नी 'परत यावंसं वाटलं तर दरवाजा खुला आहे,' असं म्हटलंही होतं; पण माझ्यासाठी तो पर्याय खुला नव्हता. ऐतिहासिक भाषेत सांगायचं, तर मागं जायचे दोर मी कापून टाकले होते! दुसऱ्या शब्दांत सांगायचं तर, प्रतिसाद हे माझं टॉनिक नव्हतं, प्रतिसाद हे माझं 'ब्रेड अॅन्ड बटर' असणार होतं!

**हाऊसफुल्ल प्रतिसाद**

नोकरी सोडून पूर्णवेळ लेखक व्हायचं ठरवलं, तेव्हा मी एक पानही लिहिलेलं नव्हतं - म्हणजे व्यावसायिक दृष्टीनं पहिलं नाटकच लिहावंसं वाटलं. शाळकरी वयात खूप नाटकं (फुकट!) पाहिलेली होती. पडदा उघडण्यापूर्वी भारदस्त शब्दात जी अनाऊन्समेंट व्हायची ती मला भुरळ घालायची. अशा एखाद्या नाटकाच्या अनाऊन्समेन्ट मध्ये लेखक म्हणून आपलं नाव उच्चारलं जावं, असं स्वप्न मी रंगमंदिरात बसल्या बसल्या अनेकदा पाहिलं होतं.


म्हणूनच पहिलं नाटक लिहिलं - बुलंद. त्याच्यासाठी योग्य निर्माता शोधणं चालू होतं. पण आता मी पूर्ण वेळ लेखक होतो. स्वस्थ बसून चालणार नव्हतं. त्या वेळी वसंत कानेटकरांचं 'प्रेमाच्या गावा जावे' हे हलकं फुलकं (मी त्याला विनोदी नाटक मानत नाही) नाटक गाजत होतं. दोनशे प्रयोग झाले होते. एके दिवशी मी ते नाटक पाहिलं. हाऊसफुल्ल प्रयोग होता. प्रेक्षकांचे हशे येत होते. वातावरण मस्त-प्रसन्न होतं. प्रयोग पाहून मी बालगंधर्वच्या 'कॅफेटेरियात' गेलो. तिथे माझे नाटकवाले काही मित्र जमत असत. 'कसं वाटलं नाटक?' त्यांनी मला प्रश्न केला. मी म्हटलं, 'छान आहे. पण हे विनोदी नाटक नव्हे - यापेक्षा कितीतरी धमाल विनोदी नाटक मी लिहू शकेन!'

मित्र म्हणाले, 'मग लिही की!'

आणि पुढच्या आठ दिवसांत मी लिहिलं, 'कुर्यात सदा टिंगलम्!' त्याला झटकन निर्माता मिळाला. त्यावेळी 'स्टार' नसलेला मोहन जोशी नाटकातली मध्यवर्ती भूमिका करणार होता. त्यानं मला विचारलं, ''नाटकाला कसा प्रतिसाद मिळेल असं तुम्हाला वाटतं?''

मी उत्तरलो, ''प्रेमाच्या गावा जावे चे दोनशे प्रयोग होऊ शकतात तर टिंगलम् चे चारशे तरी नक्कीच होतील.''

'टिंगलम्' रंगभूमीवर आलं. पहिल्या प्रयोगाला भरपूर फुकटे - 'सॉरी, निमंत्रित असतात. पण नंतर तिकीट काढणारे प्रेक्षक यावे



लागतात. ते काही येईनात. इकडे समीक्षकांनी एकमुखाने 'टिंगलम्' हे नाटकच नव्हे. म्हणजे नाटक म्हणावं अशी त्याची पात्रता नाही, असं जाहीर केलं. लेखक म्हणून मला यथेच्छ झोडपलं. मला समीक्षकांची काळजी नव्हती - ते काय फुकटच प्रयोग पाहतात. मला हवे होते माझं नाटक पाहून मनसोक्त हसणारे, एन्जॉय करणारे प्रेक्षक. पाच-सहा प्रयोगातल्या थंड्या प्रतिसादामुळे, नाटक बंद करावं की काय असा विचार सुरू झाला आणि माझं धाबं दणाणलं!

मग मी जाहिरातीची कल्पना निर्मात्याला सुचवली. मी जाहिरातीसाठी कॅप्शन्स व कार्टून्सच्या कल्पना दिल्या. पहिल्याच 'कॅप्शन'मध्ये मी मराठीतल्या नामवंत विनोदकारांची पुण्याई वापरायचं ठरवळं - कॅप्शन अशी होती - 'चिं. वि. जोशी, आचार्य अत्रे आणि पु. ल. देशपांडे यांनी महाराष्ट्राला हसवलं - म्हणूनच आम्ही 'टिंगलम्' बसवलं.'

नाटक बसवणं, असं म्हणतात, म्हणून मी तो शब्द वापरला. पण त्यामुळेच प्रेक्षकांनी नाटक उचललं. उचललं म्हणजे अक्षरश: उचलून डोक्यावर घेतलं! बघता बघता 'टिंगलम्' ला 'हाऊसफुल्ल'चे बोर्डस् झळकू लागले.

प्रेक्षकांचा प्रतिसाद पाहण्यासाठी मी रंगमंदिराच्या काचेमागे उभा रहायचो. अक्षरश: वाक्यावाक्याला प्रेक्षकांचे हशे उसळायचे आणि माझ्या अंगावर रोमांच फुलायचे. मूठमूठ मास अंगावर चढायचं. पाठीमागून असं पाहून/ऐकून समाधान होईना. म्हणून मी काही प्रयोगांना स्टेजवर जायचो.

नाटक सुरू असताना निळ्या विंगांना असणाऱ्या छोट्या छिद्रांना डोळे लावून प्रेक्षागृहात पाहायचो. प्रेक्षक हसताना अक्षरश: उडायचे. खोटं वाटेल - पण क्वचित चक्क 'ब्लॅक'नं तिकीटं विकली जाऊ लागली. मराठी नाटकाचं तिकीट ब्लॅकनं घेतलं जाईल यावर माझा विश्वास नव्हता - पण ब्लॅक करणाऱ्या अब्दुलनंच मला येऊन सलाम केला, तेव्हाच माझाही विश्वास बसला.

त्याच सुमारास पुण्यात 'प्रभात'ला माझे संवाद असलेला महेश-लक्ष्या जोडीचा 'थरथराट' चित्रपट चालू होता. तोही 'हाऊसफुल्ल' होता - तिकडेही अब्दुलच ब्लॅक करत होता - आजही रस्त्यात मी दिसलो की रिक्षा थांबवून तो सलाम करतो - चहा घेऊया म्हणतो!

नाटक-चित्रपटाचे प्रेक्षक लेखकाला भेटत नाहीत. पत्रं पाठवीत नाहीत. म्हणूनच नाटकाचे प्रयोग, हाऊसफुल्लचे बोर्डस्, थिएटरमधे उसळणारे हशे आणि बाहेर होणारी 'ब्लॅक' ची तिकीट विक्री - हेच टॉनिक म्हणावं लागेल.

तरीही 'कुर्यात सदा टिंगलम'चे - जे वीस वर्षात आहे, बाराशेहून अधिक प्रयोग झाले. त्या नाटकाचा काही मोजकाच पण छान प्रतिसाद माझ्यापर्यंत पोहोचला. तो थोडक्यात सांगतो.

❖ लंडनमध्ये जन्मलेल्या मराठी मुलांनी - ज्यांना मराठी फक्त बोलता येतं, वाचता येत नाही. त्यांनी टिंगलमच्या कॅसेटवरून संहिता रोमन लिपीत लिहून काढली व 'टिंगलम्' चे तिकडे दोन प्रयोग केले. त्यातल्या एका मुलाच्या आईनं मला पुण्यात आल्यावर भेटून आवर्जून सांगितलं, 'तुमच्या नाटकामुळे आमच्या मुलांना पुणेरी संस्कृती कळली!'

❖ अमेरिकेत प्रयोगासाठी अनुमती मागणाऱ्या तिकडच्या मराठी रसिकांनी 'तुम्ही हुंडाबंदी हा विषय इतका सुंदर व धमाल हाताळलाय की पूछो मत' असं कळवलं तेव्हा मी गहिवरलोच! पुण्याच्या समीक्षकांनांही नाटकाचा विषय कळला नव्हता!

❖ एका प्रयोगानंतर मी 'बालगंधर्व' लाच बसलो असताना एक नवविवाहित जोडपं भेटायला आलं. त्यातल्या नववधूनं म्हटलं, 'आमचं लग्न ठरल्यावर दोन्ही घरच्यांना आम्ही तुमचं टिंगलम दाखवलं. त्यामुळे हुंडा, देणंघेणं, रुसवे-फुगवे असं काही झालं नाही. उलट सतत तुमच्या नाटकातले विनोद आठवीत - अगदी हसतखेळत आमचं कार्य पार पडलं.'

❖ मी 'किर्लोस्कर' मासिकाचा संपादक असताना काही कामानिमित्त एक ज्येष्ठ वाचक भेटायला आले. मीच तो 'टिंगलम' कार हे कळल्यावर त्यांनी म्हटलं, 'तुमची टिंगलमची कॅसेट मला व माझ्या नातीला प्रचंड आवडते. केव्हाही ती लावून आम्ही अगदी वेड्यासारके हसत असतो!' दुसऱ्या दिवशी ते नातीलाही मुद्दाम भेटायला घेऊन आले.

मी सहा नाटकं लिहिली. बारा चित्रपट लिहिले. बहुतांशी विनोदी. करुण अशा एकाच चित्रपटाचे पटकथा संवाद लिहिले. तो म्हणजे 'चिमणी पाखरं' त्यात कॅन्सरग्रस्त आई आपल्या मुलांना मृत्युपूर्वी चांगल्या कुटुंबात दत्तक देऊन मरते. ही कथा होती. तो चित्रपट पाहिलेला एक तरुण माझ्या बहिणीला योगायोगाने भेटला. तिच्याकडून नंबर घेऊन त्यानं मला फोन केला. तो अविवाहित होता. लग्न न करता फक्त एखाद्या अनाथ मुलीला दत्तक घेऊन वाढवायचं असं त्यानं ठरवलं होतं. पण घरच्या विरोधानं

**पहिल्याच 'कॅप्शन'मध्ये मी मराठीतल्या नामवंत विनोदकारांची पुण्याई वापरायचं ठरवळं - कॅप्शन अशी होती - 'चिं. वि. जोशी, आचार्य अत्रे आणि पु. ल. देशपांडे यांनी महाराष्ट्राला हसवलं - म्हणूनच आम्ही 'टिंगलम्' बसवलं.' नाटक बसवणं, असं म्हणतात, म्हणून मी तो शब्द वापरला. पण त्यामुळेच प्रेक्षकांनी नाटक उचललं. उचललं म्हणजे अक्षरशः उचलून डोक्यावर घेतलं! बघता बघता 'टिंगलम्' ला 'हाऊसफुल्ल'चे बोर्डस् झळकू लागले.**

तो थांबला होता. त्या दिवशी त्यानं फोनवर म्हटलं, 'सर, चिमणी पाखरं पाहून माझा निर्णय आता पक्का झालाय. तसं मी घरी सांगून टाकलंय.'

**वाचकही मिळू लागले.**

विनोदी लेखक म्हणून प्रसिद्धी मिळाल्यावर ह. मो. मराठे, ह. ल. निपुणगे अशा काही संपादकांनी दिवाळी अंकासाठी माझ्याकडून विनोदी कथा मागण्याचं व ते छापण्याचं धाडस केलं. तसा मी 'प्रिन्ट मिडिया'त आलो. काही संपादकांनी कथेबरोबर लेखकाचा पत्ताही छापण्याचं औदार्य दाखवलं - त्यामुळे मला वाचकांची पत्रं येऊ लागली. माझ्या विनोदाची दाद थेट वाचकांपासून माझ्यापर्यंत पोहोचू लागली. (हशे थेट कानांवर आले नाहीत तरी ते पोहोचू लागलेच.) या सर्व पत्रांतून कथेबद्दल 'धमाल' हे विशेषण असतं. मी एकटाच वेड्यासारखा हसत होतो... किंवा आम्ही सगळ्यांनी कथा एन्जॉय केली - हे अभिप्राय असतात, ते मला पुरेसे होतात.

नंतर मी विनोदी व्यक्तिरेखा लिहू लागलो. त्याला येणाऱ्या नंतर मी विनोदी व्यक्तिरेखा लिहू लागलो. त्याला येणाऱ्या जवळजरल प्रत्येक वाचकाच्या पत्रात 'तुम्ही पु. लं. ची आठवण करून दिलीत' हे वाक्य असायचं - तेच माझं 'टॉनिक' ठरायचं. आता त्या व्यक्तिरेखांचं 'नग आणि नमुने' हे पुस्तक निघालं आहे. त्याला आलेलं पुण्याच्या रा. वि. देवधरांचं हे पहिलंच पत्र - 'नग आणि नमुने या साहित्यकृतीचं थोडक्यात वर्णन करायचे झाले तर मी म्हणेन - केवळ अप्रतिम. विनोदी व्यक्तिरेखांचं 'व्यक्ती आणि वल्ली' नंतर हे दुसरंच पुस्तक असावं. आपली काही व्यक्तिचित्रे तर पु. लं. च्या तोडीस तोड वाटतात!'

एका प्रकाशकाच्या कन्येनं तर पत्रानं कळवलं, 'माझं नवं नवं बाळ आणि तुमचं नग आणि नमुने - हेच दोन माझे सध्याचे विरंगुळे आहेत.'

असा प्रतिसाद कुणाची उमेद वाढवणार नाही? मध्यंतरी मी शंतनुराव किर्लोस्कर व एसेम जोशी या दोन व्यक्तिरेखांवर आधारित 'सामना' ही कादंबरी लिहीली. तिलाही खूप वाचकपत्रे आली. एका ग्रामीण युवकानं तर लिहिलं, 'तुमची सामना वाचून मी जीवनात काही करण्याची प्रेरणा घेतली आहे - तरी उत्तर पाठवण्यात हयगय करू नये!' 'सामना' कादंबरी वाचून शेतकरी संघटनेचे झुंजार नेते शरद जोशी यांचं 'तुमची कादंबरी ही पूर्वेच्या क्षितिजावर उमललेली नवी आशा वाटते' या अभिप्रायासहचं पत्र मी जपून ठेवलं आहे - फ्रेम केलेलं नाही, एवढंच.

मजेत जगावं कसं?

मी एकोणीस/वीस वर्षं पूर्ण वेळ लेखक म्हणून जगलो - थोडंबहुत नाव, यश मिळवलं. (पैसा मराठी लेखक किती मिळवणार - काही' सन्मान्य अपवाद वगळता!) पण तरीही मला 'फॅन मेल'चं भाग्य लाभलं नव्हतं. ते लाभलं ते माझ्या 'मजेत जगावं कसं?' या पुस्तकानं. पहिली दोन हजारांची आवृत्ती अवघ्या नऊ दिवसांत संपली. आठ महिन्यांत नऊ हजार प्रती संपल्या. हा झाला सांख्यिक विक्रमी प्रतिसाद. पण वाचकांची पत्रे, त्यांचे फोन...हा आंतरिक प्रतिसाद केवळ अभूतपूर्व आहे.

त्यातल्या काही निवडक पत्रांचा सारांश येथे देऊ इच्छितो.

आपले मजेत जगावं कसं - हे पुस्तक वाचलं आणि काय आश्चर्य. सगळ्या जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन तुम्ही बदलून टाकलात. प्रत्येक दिवसाकडे, दिवसाकडे नव्हे, प्रत्येक क्षणाकडे आनंदानं बघत कसं जगायचं, हे तुम्ही खूपच सुंदर शब्दांत लिहिलं आहे.' – सुनील शिरवाडकर, नाशिक.

'मजेत जगावं कसं' हे तुमचं पुस्तक हाती आल्यानंतर दुसरं काही न करता सात-आठ दिवस वाचण्यात दंग झालो. वाचता वाचता, विचार करता करता अंतरंगी बदलत गेलो. तुम्ही व प्रकाशक यांनी हे पुस्तक प्रसिद्ध करून एक सामाजिक योगदानंच केलेलं आहे.' - डॉ. प्र. चिं. शेजवलकर, पुणे.

'मी एक उच्चरक्तदाब व डायबेटिकमुळे पक्षाघात झालेला रुग्ण. डावी बाजू संपूर्ण निकामी झालेली. सिंगापूरला मुलाकडे रहात आहे. नुकतेच मुलाचे एक स्नेही पुण्यास दिवाळीसाठी आले असतांना त्यांनी आपले 'मजेत जगावं कसं?' हे पुस्तक आणलं व मला वाचायला म्हणून दिलं. पुस्तकाच्या मुखपृष्ठावरूनच 'मजेत जगावं कसं?' हे जाणवायला लागतं. सबंध पुस्तक वाचून संपवलं. याआधी मी डॉ. अरविंद बावडेकरांचं 'कॅन्सर माझा सांगाती' हे पुस्तक वाचलं आहे. ही दोन्ही पुस्तकं मला - माझ्यासारख्या एका जरा-जर्जर माणसाला जगण्याचं एक मोठं बळ देतात. विशेषत: सकारात्मक दृष्टिकोन वाढवून जगण्यातला आनंद कसा घ्यावा हे सांगायला अतिशय उपयुक्त वाटतात. खरंच माझ्या हातातला अर्धा पेला रिकामा होता. दुसऱ्या हाताने तो भरू शकत नव्हतो. तो भरण्याचं काम तुमच्या पुस्तकाने केलेले आहे. तुमचं नाव शिवराज गोर्ले ऐवजी आनंद गोर्लेच असायला हवं होतं!' – जगदीश जोशी, सिंगापूर.

लेखक म्हणून याउपर अधिक काय लिहिणे...अपेक्षिणे? इति लेखनसीमा!...

> **मी एकोणीस-वीस वर्षं पूर्ण वेळ लेखक म्हणून जगलो - थोडंबहुत नाव, यश मिळवलं. पण तरीही मला 'फॅन मेल'चं भाग्य लाभलं नव्हतं. ते लाभलं ते माझ्या 'मजेत जगावं कसं?' या पुस्तकानं. विक्रमी खप, वाचकांची पत्रे, त्यांचे फोन...हा आंतरिक प्रतिसाद केवळ अभूतपूर्व आहे.**

३४/२ प्रीतम नगर,
कर्वे पुतळ्याजवळ,
कोथरूड, पुणे ३८.


# सुखी, आनंदी ,यशस्वी जीवनाचा मूलमंत्र देणारी सुबोध पुस्तके




**हसत जगावं**

डॉ. रमा मराठे


**१००रु.**




**चला!उठा! कामाला लागा!**

स्वाती शैलेश लोढा
अनु. अंजनी नरवणे

**१२०रु.**




**द मॅजिक ऑफ थिंकिंग बिग**

डेव्हिड जोसेफ श्वार्ट्झ
अनु. प्रशांत तळणीकर

**२००रु.**



**हसता हसता आरोग्य**

मदन कटारिया
अनु. दिगंबर गाडगीळ


**९०रु.**




**तो आणि ती**

जॉन ग्रे
अनु. डॉ. रमा मराठे

**२५०रु.**




**चिंतामुक्त जीवन**

आर. डी. मुनोत


**१६०रु.**




**मनावर विजय**

एकनाथ ईश्वरन्
अनु. वैशाली जोशी

**१२५रु.**




**प्रियाराधन आणि विवाह**

डॉ. विजय नागस्वामी
अनु. भारती पांडे

**१५०रु.**

मेहता पब्लिशिंग हाऊस, १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११०३०





# वाचकांचा प्रतिसाद हेच माझे टॉनिक

रेखा बैजल

त्या दिवशी मी बर्फात अडकलेल्या आणि मृत्यूच्या जबड्यात सापडलेल्या एका सैनिकाची कथा लिहीत होते. लिहिता लिहिता मला विचित्र संवेदना व्हायला लागल्या. छातीत धडधड...थंडी वाजून आल्यासारखे हात पाय थंड पडले...मी ताबडतोब लिहिणं बंद केलं. 'कुठला तरी' चॅनल लावला आणि थोडावेळ 'काहीतरी' पाहिलं. मला हळूहळू बरं वाटलं.

लिहिताना एक विश्व उभं करायचं असतं. त्या विश्वाशी आपण एवढे एकरूप होतो की त्या अनुभूती आपल्यास जाणवायला लागतात. त्या विश्वातले प्रश्न, समस्या त्या वेळी आपल्याला छळत असतात. आपलं आयुष्य जगता जगता माणसाची दमछाक होते आणि त्यात हे भरीस भर ओढवून घेतलेले दुखणं. ओढवून म्हटल्यापेक्षा परमेश्वरानं शब्दांचं देणं दु:खात भिजवून माझ्या ओंजळीत टाकलंय. पुलं सारख्या लेखकाला 'त्यानं' आयुष्यावर विनोदाच्या साखरेचा लेप लावून शब्दांचा गोड हलावा दिला. मला मात्र...हे माझं भांडण त्या देणाऱ्याशी. मी जे लिहिते त्याचा मलाही त्रास होतो खूपदा. 'व्हेंट' वगैरे काही नाही.

देवीच्या भगतासारखं खूपदा स्वत:ला कोरडे मारणंच असतं. एकूणच लिखाणाची प्रक्रिया अवघड. गाणं म्हणावंसं वाटलं...तंबोरा जुळवला...त्या क्षणी मनात उमललेले सूर गळ्यातून मुक्त केले. हे संगीताचं विशुद्धपण. पण लिखाणाचं तसं नाही. कथा-कादंबरी सुचते. मग दिवाळी अंकाची वाट पाहणं...त्या नंतर प्रकाशकाची वाट पाहणं...छापल्यावर रसिकानं ते वाचणं. इथे सुचणं हा लिखाणाचा प्रोसेस संपतो. हे वाट पाहणं हेच अरण्य आणि हीच तपश्चर्या.

त्यात ही समीक्षकी वृत्तीनं मी जेव्हा माझ्या लिखाणाकडे आणि लिहिण्याच्या-सुचण्याच्या प्रक्रियेकडे पाहाते तेव्हा लक्षात येतं की माझं स्त्रीपण, बाईपण बाजूला ठेवून मी ती अनुभूती घेते आणि व्यक्त करते.

माझ्या कथांचं विश्व स्त्रीपल्याडचं आहे. त्यात कधी तिसरं महायुद्ध आहे तर कधी वेद-उपनिषदं आहेत. कधी विज्ञानकथा तर कधी 'आदिम'काळची 'स्वप्नस्थ' वाटचाल. हे आणखी अवघड जातं. कारण जालन्यासारख्या ठिकाणी मी एक गृहिणी. जालन्याचं वातावरण असं की समृद्ध, विशाल आणि मुक्त अनुभवविश्व मिळणं अशक्य. अशा वेळी आपल्या आयुष्याच्या अनुल्लंघनीय भिंतीत आपण कोंडले जातो. विविध अंगांनी जीवन येऊन जे भिडायला हवं, अनेकांगी दर्शन व्हायला हवं ते माझ्यासाठी दुर्लभ.

अशी सगळी तगमग, उलघाल आपल्या मी पणाला भिनत जाते. आपल्या क्षमतेचं एक वर्तुळ असतं. त्या परिघाआतच आपल्या जाणिवा फिरत असतात. पण आपण मात्र आपलंच स्वत:चं आदर्श रूप त्या परिघाबाहेर ठेवतो. आपल्याला तिथपर्यंत पोहोचायचं असतं. पण आपली मर्यादित क्षमता आपल्याला तिथपर्यंत पोहोचू देत नसते. बुद्धी हे मान्य करते; पण मन नाही. ही मन आणि बुद्धीची कुतरओढ तशी असह्य असते. ह्यात मानसिक झीजच होत असते.

पण अशा वेळी ही झीज भरून काढणारं ऊर्जास्थळ माझ्या पेटीत दोन-तीन फाइलींमध्ये बद्ध करून ठेवलेलं आहे. ह्या वाटचालीत खूपदा थकल्यासारखं वाटतं. एकटं वाटतं. आपल्या जगण्यातला खूपसा आवेश लिखाणामध्ये निघून गेला आहे आणि जीवन जगण्यासाठी मनाला चेतना कमी पडते आहे असं जाणवायला लागतं तेव्हा मी त्या ऊर्जास्थलापाशी जाते. फाईल बाहेर काढते आणि वाचकांची पत्रं वाचू लागते.

कितीही 'स्वान्त सुखाय' असं कलेचं रूप मानलं तरी रसिकाचा विचार प्रत्येक कलेत केलाच जातो. कलावंताचा 'स्व'च मुळात कलावंत आणि रसिक मिळून सिद्ध झालेला असतो. त्याशिवाय का त्या योगिराज कविश्रेष्ठांनी लिहिलंय की, ''वाचे बरवे कवित्व, कवित्वी रसिकत्व.' लिहीत असताना सतत हुंकार देणारा वाचक लेखकाच्या आसपास कल्पनेत वावरतच असतो, कधी श्रोता, कधी वाचक, कधी टीकाकार, कधी चर्चा करून मूल्यमापन करणारा...ही सर्व रसिकाचीच रूपं आहेत.

माझा पहिला श्रोता आहे शिवकुमार. माझे पती. कथा सुचणं ही एक ठिणगी पडणं असतं. सुचण्याचा क्षण हा खरा क्षण असतो. त्यानंतरचं लिखाण म्हणजे आपणच आपल्याला केलेलं डिक्टेशन. ही ठिणगी मनात पडल्याक्षणी 'ते' जिथे असतील तिथे फोन लावते. ''बरं का हो...आज नं...'' ही सुरुवात झाली की ते पुढचं काय ते ओळखत असतात.

''काय सुचलं...?''

मला सुचलेली वन लाईन स्टोरी मी त्यांना सांगायला जाते आणि सांगता सांगता फुलत जाते. जवळ जवळ दहा मिनिटांचा फोन कॉल लागलेला असतो.

सुचल्याक्षणी सांगण्यातला आनंद काही वेगळाच असतो.

ह्या सुहृदाला सांगून झालं की कथालेखन होतं. यथावकाश कथा छापून येते.

आणि मग सुरू होतं एक आनंदचक्र. रात्रीच्या काळ्या अंधारात अचानक उल्केनं पृथ्वीकडे धाव घ्यावी आणि आसमंत उजळून टाकावा तितकं अनपेक्षित रसिकाचं पत्र येतं...

हो. रसिकाच्या पत्राचं मला इतकं महत्व वाटतं. माझ्या कथेला दिलेला त्याचा तो हुंकार असतो. त्याची माझी ओळख नसते, दृष्टभेट नसते. पण तो सुजाण वाचक आहे हे मला पुरेसं असतं. आणि त्याला माझी कथा आणि कथेतला विचार पुरेसा असतो. ही एक मानसिक भेटगाठच म्हणावी.

मला पहिलं पत्र आठवतं ते माझ्या 'मेनका' ह्या मासिकात प्रकाशित झालेल्या 'देवव्रत' ह्या कादंबरीवर आलेला अभिप्राय. हैद्राबादच्या विद्या मक्तलने तो अभिप्राय पाठवला होता. कुणी आपला निर्मितीचा आनंद वाटून घेतंय ही भावना प्रथम मनाला स्पर्शून गेली.

मग पत्राला उत्तर...उत्तराला उत्तर...असं वाढत जाणारं नातं. त्यानंतर माझं लिखाण सातत्यनं सुरू झालं. शब्दरूपातून होणारी अमूर्त भेट, मैत्री हे वेगळं विश्व माझ्या विश्वाला विस्तारत नेऊ लागलं. आपलं विश्व रसिक विस्तारतो हे रसिकाचं स्थान!

प्रत्येक अभिप्रायाच्या पत्रानं माझ्या अंगावर दोन मुठी मांस चढायचं. निश्चितच. पण धन्य त्या माझ्या रक्तातल्या कोलेस्टेरॉलची की ज्यामुळे मी ही 'मांस' चढण्याची प्रक्रिया काबूत आणली अन्यथा माझा 'अदनान सानी' झाला असता.

विनोद बाजूला ठेवला तर खरंच सांगते की वाचकाचा अभिप्राय हा माझा आयुष्यातला आनंद आहे. ती माझी आयडेंटिटी होऊ लागली. माझी वाटचाल बरोबर आहे की नाही...कुठे चुकलं, कुठे चांगलं आहे ह्याचं भान मला ही पत्रं देत होती. भेटणारे रसिक देत होते.

**विनोद बाजूला ठेवला तर खरंच सांगते की वाचकाचा अभिप्राय हा माझा आयुष्यातला आनंद आहे. ती माझी आयडेंटिटी होऊ लागली. माझी वाटचाल बरोबर आहे की नाही...कुठे चुकलं, कुठे चांगलं आहे ह्याचं भान मला ही पत्रं देत होती. भेटणारे रसिक देत होते.**

देवव्रत वाचून असंच एक पत्र श्री. पी. एम. कावडिया ह्यांचं आलं. हे गृहस्थ मुंबईचे. सिनेट मेंबर. गोदावरी कारखान्याचे डायरेक्टर. खूप मनमोकळं पत्रं आणि एकच नाही अगदी महिन्यापूर्वीसुद्धा त्यांचं पत्र आलं. पंचवीस वर्षांपूर्वी त्यांनी जे पत्र लिहिलं होतं आणि आजही ते लिहितात ते इंग्रजीत. अगदी मनमोकळ्या गप्पा असतात. 'डिअर रायटर, डियर रेखा...' मराठीत अशी संबोधनं अनोळखी व्यक्ती वापरत नाही. पहिल्या पत्रातलं ते संबोधन पाहून मी बिचकले. मग 'आपला एक मित्र' ही संकल्पना खूप आवडली. 'आमच्या काळी' मित्र ही आजच्यासारखी संकल्पनाच नव्हती. नंतर कळत गेलं की माझ्या ह्या मित्राची माझ्यापेक्षा मोठी उच्च शिक्षित मुले आहेत. अजूनही ह्या मित्राची न् माझी प्रत्यक्ष भेट झाली नाही. पण हा आत्मिक ऋणानुबंध जोडला गेला.

काही वाचक समीक्षण करत पत्र लिहितात. कथा का आवडली, कादंबरी का आवडली हे इतक्या समर्पक शब्दात सांगतात की त्यांचा आस्वाद घेण्याच्या क्षमतेचं कौतुक वाटतं. बँकेत असलेले श्री. किशोर शिंदे (कदाचित नाव चुकत असेल) ह्यांची पत्रे अशीच रसग्रहण करणारी असायची. त्यांच्या त्या शब्दांजवळ जात मी दूरवरून माझं लिखाण न्याहाळायचे. श्री. अशोक घोरपडेही त्याच जातकुळीतले.

दिवाळी अंकाच्या वेळी नुसती धांदल असते. कथा द्या म्हणून फोन, पत्रं. काही वेळा गडबडीत कथा लिहिली जाते. नीट विचार मांडला जात नाही. दिवाळी अंकाचा मोह टाकण्याएवढी योगसाधना माझी झाली नसावी. पण ती साधना करायला हवी हे सांगणारं पत्र अचानक येतं.

''...दिवाळी अंकातली कथा वाचली. बुंदी पाडू नका.'' असं कान पकडून खडसावणारं पत्र आपल्याला भानावर आणतं.

'युगावर्त' लिहिलं. प्रकाशन गुरुवर्य शिवाजीराव भोसले आणि श्री. शंकर सारडा ह्यांच्या हस्ते होणार होतं. दोन दिवस आधी नगरला अलका सांखलानं एक दशग्रंथी व्युत्पन्न ब्राह्मणाकडे मला कौतुकाने नेलं. वेदोपनिषदावर कादंबरी लिहिली आहे म्हणून. त्यावेळी त्या ब्राह्मणाचं वय (यज्ञ वगैरे करतात म्हणून मुद्दाम 'ब्राह्मण' हा उल्लेख करते आहे) असावं चाळीसच्या आत. ते यात्रिक. आणि त्यांची पत्नी एमबीबीएस डॉक्टर. 'युगावर्त' मधली माझी मनोगतातली भूमिका वाचूनच माणूस तडकला. 'असलं लिखाण संस्कृतीला बिघडवतं, ते कचऱ्यासमान असतं.' इ...मुक्ताफळं माझ्या तोंडावर फेकली. मी बावरले. पण दोनच दिवसांनी सरांचे आणि सारडांचे प्रकाशनात आशीर्वाद मिळाले. आणि दोनतीन महिन्यांनी श्री. माधव कुलकर्णी (औरंगाबाद) मला भेटायला आले. त्यांची माझी ती पहिली भेट होती. ''आजपर्यंत आर्य वाङ्मय, वेद, उपनिषद वाचले नाहीत. ती कर्मकांडं असाच गैरसमज मनात होता. पण युगावर्त वाचलं. नंतर उपनिषदं वाचली. मनातला गैरसमज दूर झाला...ही कादंबरी मुद्दाम

मित्रांना वाचायला दिली. आपल्या ह्या प्राचीन संस्कृतीची ओळख व्हावी म्हणून...'' ह्या आशयाचं खूप काही बोलले. मी भरून पावले. त्या याज्ञिकाचा शाप काही मला भोवला नाही. परभणीच्या अनिल मोरेंनी तर युगावर्तातला नायक शौनक म्हणजे आपण स्वत: आहोत असं वाटण्याएवढं प्रेम त्यांनी युगावर्तावर केलं. 'अग्निपुष्प' ह्या तिसऱ्या महायुद्धावरच्या कादंबरीच्या वाचकांनीही उदंड प्रतिसाद दिला. त्यातलं एक न विसरणारं पत्र पुढीलप्रमाणे,

''मी लायब्ररीत गेलो. लेखिकांच्या वाटेला मी कधी जात नाही. पण दुसरं कोणतं चांगलं पुस्तक नव्हतं म्हणून 'अग्निपुष्प' घेतलं. वाचायला लागलो आणि आश्चर्यचकित झालो. एक लेखिका असून तुम्ही असा विषय मांडावा...'' लेखिकांच्या वाट्याला हिणवणं येतं त्या संबंधीचं हे बोलकं पत्र...पण कौतुक करणारं.

एक पत्र तर इस्राईलच्या वाचकाचं आलं. श्री. बेंजामिन. ते मराठी चांगलं जाणतात. त्यांनी 'स्वप्नस्थ' वाचलं आणि त्यावर मुक्त चिंतनात्मक लेख लिहिल्यासारखं पत्र लिहिलं. ''रसिक हा न लिहिणारा 'लेखक' असतो'' हे अशा वेळी पटतं.

खूपदा स्त्री म्हणून काही गैरसमजांना बळी पडावं लागतं. प्रा. विजयिनी जोशी (मेहेकर) माझी मैत्रीण. गप्पांमध्ये ती म्हणाली...''XXX नी तुझं 'अग्निपुष्प' वाचलं. इंग्रजी कल्पना उचलली बरे लेखिकेनं...'' वगैरे वगैरे. भारतीय विचारवंतांना असे विषय सुचतच नाहीत, ते फक्त इंग्रजीतच सुचतात ह्या त्यांच्या दुराग्रहाला आपला लांबून प्रणाम.

अहमदाबादच्या सुषमा चौसाळकर आणि वासंती तोडकर ह्यांनी तर सतत माझ्यावर कौतुकाचा वर्षावच केला. वासंतीताईंनी त्यांच्या मुलाच्या स्मृतिदिनासाठी मला अहमदाबादला बोलावलं. कथाकथनाला. आपल्या दिवंगत मुलाचा स्मृतिदिन असा करण्यातलं त्यांचं दृढ हृदय लक्षात यावं. त्या वेळी कितीतरी गुजराती मैत्रिणी मिळाल्या. वासंतीताईंचं आणि सुषमाचं निर्मळ प्रेम मिळालं. आपल्या आयुष्यातले हे आनंदोत्सव न विसरता येण्यासारखे असतात.

अशी अनेक नाती बनत गेली...विसरत गेली...नव्यानं ओळखी होत गेल्या.

आयुष्याच्या प्रवाहाला हे वेगवेगळे किनारे मिळत गेल्यानं आयुष्य समृद्ध झालं.

काही व्यक्ती आयुष्यात आल्या. आयुष्याच्या वारुळाला त्यांनी राऊळ करून टाकलं. हे शब्दांचेच ऋण आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन साताऱ्याला भरलं असतानाचा प्रसंग. विद्याधर गोखले संमेलनाध्यक्ष होते. फारसं कधी संमेलनात न जाणारी मी; त्या वर्षी कशी काय गेले देव जाणे! मी ४ वाजता उद्घाटन समारंभाला मंडपात चालले तो माझं नाव घोषित होत होतं.

''रेखा बैजल आल्या असतील तर स्टेजजवळ यावं.'' मी गांगरले.

''काय झालं बुवा?...'' मी व्यासपीठाजवळ गेले तेव्हा संयोजकांनी सांगितलं की, ''तुम्हाला संमेलनाध्यक्ष निवड करतात तो मर्ढेकर पुरस्कार जाहीर झाला आहे. तुम्ही समोरच बसा.''

दोन बोटं अधांतरी चालणारा धर्मराज मी त्यावेळी झाले.

ती. अण्णांनी पुरस्कार देतादेता म्हटलं, ''कार्यक्रम संपल्यावर भेट.''

नंतर भेटल्यावर ती. अण्णांनी आपल्या सडेतोड स्वभावाप्रमाणे सांगितलं, ''तू काळी का गोरी मी पाहिलं नव्हतं. तुझी-माझी ओळख नव्हती. पण केवळ तुझ्या मेरिटवर तुला हा पुरस्कार मिळाला आहे.''

माझ्या डोळ्यांत अश्रू — हे क्षण आजही भूतकाळाच्या अंधारात लखलखत असतात.

**रेखा बैजल यांना वि. वा. शिरवाडकर यांनी पाठवलेले पत्र**

वि. वा. शिरवाडकर
शिवाजी रस्ता, नाशिक - १.

सप्रेम नमस्कार,
पत्र मिळाले.

उत्तर पाठवायला उशीर होत आहे. क्षमा असावी.

'स्वप्नस्थ' संग्रह वाचला. आवडला.

त्यातील कल्पकता विलक्षण प्रभावी आहे. कित्येकदा अद्भुतापर्यंत पोचणारी. पण या कल्पकतेला जीवनविषयक (आणि मरणविषयकही) सूक्ष्म विचाराची, सखोल चिंतनाची जोड असल्याने त्या कथा केवळ कल्पनाविलास वाटत नाहीत. काव्यात्मकता तर सर्वत्र दरवळलेली आहे. 'स्वप्नस्थ' ही अशा कथातील सर्वाधिक चांगली वाटली.

संवादात कोठे जाणवणारी कृत्रिमता सोडली तर, आकाश, अस्तित्व, फिनिक्स या वेगळ्या प्रकारच्या कथाही चांगल्या वाटल्या.

पूर्वी लिहिल्याप्रमाणे, मी या विषयातील माहीतगार नाही. वाचनही कमी. पण आपण आपल्या काव्यात्म शैलीमुळे, विचारचिंतनामुळे या वाङ्मयप्रकारात खूप काही करू शकाल असे मला वाटते.

पुढील प्रवासासाठी मनःपूर्वक शुभेच्छा

आपला
वि. वा. शिरवाडकर

ह्याच शब्दांमुळे प्रा. शिवाजीराव भोसले यांच्यासारखी व्यक्ती माझ्या आयुष्यात गुरुस्वरूप आली. सर घरी आले, घराला, मुलांना आशीर्वाद दिला. 'युगावर्त'चं प्रकाशन आपल्या हस्ते केलं.

हे आकाशातून स्रवणारं प्रेम आणि आशीर्वाद कितीतरी बळ देऊन जातात.

हा लेख लिहायचा म्हणून काल सर्व फाइली खाली काढल्या. त्यात वपुंचं पत्र होतं. मला आणि ह्यांना लिहिलेलं. काळजीनं, प्रेमानं, वात्सल्यानं ओथंबलेलं. वाचता वाचता डोळ्यात पाणी आलं. वपु असते तर लगेच फोन लावला असता. पण आता वपु 'आउट ऑफ कव्हरेज एरियात' गेले. कायमचे. पण स्मृती तेवढ्याच ताज्या आहेत.

शब्दांनी मला काय दिलं?

स्मिता शेवडेसारखी जिवाला जीव देणारी मैत्रीण दिली. सुंदर अक्षरात पत्र लिहिणारे खरेंसारखे सुहृद दिले. अत्यंत कल्पक चित्रं आणि सही करून अभिप्रायातली लज्जत वाढवणारे चं. बा. देशपांडेसारखे वाचक दिले. आभाळासारखी माणसं आयुष्यावर प्रेमळ छायेसारखी आली.

'जलपर्व' लिहिताना श्री. माधवराव चितळेंना भेटले. आंतरराष्ट्रीय ख्यातीचा माणूस किती साधा असावा ह्याचा प्रत्यय आला. पाणी प्रश्नाबद्दल ते केवढ्या तळमळीनं बोलतात! त्यांची प्रस्तावना 'जलपर्व'ला मिळणं हे भाग्य समजते.

जालन्यासारख्या ठिकाणी राहून खूपदा गालिब म्हणतो तसं वाटतं,


''हम वहाँ है जहाँ पर हमकोही
कुछ हमारी खबर नही आती''

पण माझे वाचक, गुरू, सुहृद आठवले की जाणवतं...'छे...आपला ठिकाणा तर केवळ जालन्यात नाही...ह्या सर्वांच्या हृदया-हृदयात आहे.''


'शब्द', आयकर कॉलनी
जालना ४३१२०३
फोन : ०२४८२-२३२८३१

## प्रेरणादायी चरित्रे


मेहता पब्लिशिंग हाऊस, १९४१, सदाशिव पेठ,माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड टेलिफोन भवन समोर,पुणे ४११०३०




**छत्रपती राजर्षी शाहू महाराज**
**तु. बा. नाईक**
पुरोगामी विचारांना आचाराने दृढमूल करणाऱ्या लोकनेत्याचे संग्राह्य चरित्र
**१००रु.**



**थॉट लिडर्स**
**श्रीनिवास पंडित**
अनुवाद सुप्रिया वकील/ विलास वाडकर
यशस्वी उद्योजकांची रसरशीत शब्दचित्रे
**३००रु.**



**इंदिरा**
**कॅथरिन फ्रँक**
अनुवाद लीना सोहोनी
इंदिराजींचे एकमेव संपूर्ण जीवनचरित्र
**४००रु.**




**आधुनिक भारताचे प्रेषित स्वामी विवेकानंद**
**गौतम घोष**
अनुवाद माधव मोर्डेकर
एक अद्वितीय जीवनगाथा
**१८०रु.**



**जीवनयात्रा : अभिनेता दिग्दर्शक मा. विनायक**
**भाई भगत**
चतुरस्त्र व्यक्तिमत्वाचा चित्रदर्शी आढावा
**१५०रु.**

ड्राफ्ट किंवा मनिऑर्डर पाठवावी.




# 'माझी वाट, माझी चाल'

**प्रा. लक्ष्मीकांत तांबोळी**

गुरवानं घरोघर बेल घालत हिंडावं तसा मी कथा, कविता, कादंबरी, ललितलेख असं लिहीत गेलो. फार लिहिलं नाही. थोडंफार लिहिलं. बरचसं फुटकळ. तसंच किरकोळ. मात्र भरताड कमी. सुचलं ते लिहिलं.

हात लिहिता राहिला. अक्षरश: बोटावर मोजण्याइतकीच पुस्तकं निघाली. काही 'वाजली', काही नावाजली गेली. महाराष्ट्रभर नाव झालं. चार-पाच पुस्तकं होतील येवढा ऐवज अजूनही गाठीशी आहे.

उमेदवारी वगैरे म्हणायला लेखन ही काही 'कारकीर्द' आहे असं मी मानत नाही. माझ्यापुरती तरी ती एक आंतरिक उर्मी आहे. गरज, मागणी यातून काही लेखन झालं पण ते अपवादात्मक. वयाच्या तेराव्या वर्षापासून लिहू लागलो ते आजतागायत लिहितो आहे. माझं पहिलं लेखन अर्थातच शाळकरी वळणाचं होतं. परभणीच्या 'समर्थ' (संपादक : रं. प. देशमुख) वार्षिकात मॅट्रिकला असतानाच एक निबंध प्रसिद्ध झाला. स्वत:चं नाव छापील स्वरूपात पाहताना जो आनंद झाला त्या आनंदाची सर कशालाही नाही. नागपूरच्या 'मुलांचे मासिक'मधून कविता आली. य. गो. जोशी यांच्या 'प्रसाद'मधून कथा प्रसिद्ध झाली. प्रसाद, नवयुग, दीपलक्ष्मी, अजिंठा दिवाळी अंकांच्या कथास्पर्धेतून बक्षीसेही मिळाली. लेखनाचा उत्साह वाढतच राहिला. बी. ए. ला. शिकत असताना 'हुंकार' (१९५१) हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला. दरम्यान माझ्या कविता प्रतिष्ठान, मराठवाडा दिवाळी अंक, साधना, छंद, मनोहर, रंग, किर्लोस्कर अशा नियतकालिकांतून प्रसिद्ध होत राहिल्या. 'सत्यकथेत', 'घारी घारी कवड्या दे' हा ललितलेख आला. माझ्या कवितांचे ज्यांनी कौतुक केले त्यात भालचंद्र कहाळेकर, इंदिरा संत, अनंत भालेराव ही ठळक नावे. माझा कविमित्र रवींद्र बोरगावकर तर सतत साथसंगत करीत होता. वाचन-लेखन हीच माझी ऊर्जा होती. 'हुंकार' या पहिल्या काव्यसंग्रहावर सदा कऱ्हाडे, आरती प्रभू यांनी मन:पूर्वक लिहिले. मौज, छंद, साधना, विविधवृत्त यामधून परीक्षणे आली. शिरीष पै, शांता ज. शेळके यांनी मायेने माझ्या कवितेला गोंजारले. अनंत भालेरावांनी तर माझ्यासह माझ्या कवितेलाही सांभाळले. जोपासले. नरहर कुरुंदकर, राम शेवाळकरांनी मशागत केली. खतपाणी घातले. जिथे कुठे माझ्या कवितेला कीड लागली असे वाटले तिथे फवारणी केली. एक मात्र खरे की मी कुणाचेही बोट धरून लिहिले नाही किंवा कुणाच्या पावलांवर पाऊल ठेवून वाटचाल केली नाही.

'तवंग' हा माझा कथासंग्रह १९६८ साली प्रकाशित झाला. त्याला गंगाधर गाडगीळ यांनी रु. १०० घेऊन प्रस्तावना दिली. ही प्रस्तावना म्हणजे 'विकतचं श्राद्ध' असा प्रकार झाला. प्रस्तावनेत गाडगीळांनी माझ्या कादंबरीलेखनाची वैगुण्ये दाखविली. खूप वाईट वाटलं पण ती निराश झालो नाही. याच कथासंग्रहातील 'सैनिकी रक्त' नावाची कथा शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट झाली. १९७४ पासून गेली ३१ वर्षे ती आठव्या व पाचव्या इयत्तेसाठी साऱ्या महाराष्ट्रभर शिकवली जाते. आजही ही कथा शिकलेले कुठे कुठे भेटतात. त्या कथेतील मेजर शंकरराव कदम या व्यक्तिचित्राचा तपशीलासह उल्लेख करतात तेव्हा आनंद वाटतो.

महाराष्ट्र सारस्वतात माझ्या 'दूर गेलेले घर' या कादंबरीने मला टेकण्यापुरती का होईना पण जागा करून दिली. मराठवाडा (आताचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा) विद्यापीठ, पुणे विद्यापीठ, गुलबर्गा युनिव्हर्सिटी, उस्मानिया अशा विद्यापीठांतून या कादंबरीचा अभ्यासक्रमात समावेश झाला. कादंबरी आवडल्याचे अनेकांनी कळविले. राज्यपुरस्कारही मिळाला. प्रारंभी दीर्घकथा म्हणून ती साधना दिवाळी अंकात प्रसिद्ध झाली. त्या अंकाचे संपादन शंकर सारडा यांनी केले होते. मॅजेस्टिकचे केशवराव कोठावळे यांनी मोठ्या अगत्याने ही कादंबरी प्रसिद्ध केली. माझे कौतुकही केले. पुढे तीन आवृत्त्या निघाल्या. 'प्रतिमा प्रकाशन'चे अ. वि. पारगावकर यांनी दोन आवृत्त्या प्रसिद्ध केल्या. हैदराबादचे प्रा. सुरेश जायस्वाल यांनी हिंदी अनुवादही केला आहे. रणजित देसाई, विद्याधर पुंडलिक यांनी या कादंबरीची दखल घेतली. माधव मनोहर, उषा मा. देशमुख यांनी तिच्यासंबंधी मन:पूर्वक लिहिले. हे सगळे मनाला उभारी देणारेच ठरले.

आज २००५ साली देखील कोल्हापूरचे कवी अनिल द्रविड



त्या कादंबरीचे स्मरण ठेवून पत्र पाठवतात हा अभूतपूर्व आनंदक्षण वाटतो.

१९७० साली मी 'दूर गेलेले घर' लिहिली. त्याच वर्षी माझा 'अस्वस्थ सूर्यास्त' हा कवितासंग्रह निघाला. अभिनव प्रकाशन, मुंबईचे वा. वि. भट यांनी तो छापला. नारायण सुर्वे यांनीच भटांची ओळख करून दिली. या संग्रहावरदेखील खूप लिहून आले.

कविवर्य वा. रा. कांत, केशव मेश्राम, उषा मा. देशमुख, माधव मनोहर, वामन तेलंग आणि आलोचना (नाव आठवत नाही) मधील परीक्षण काव्यरसिकांचे माझ्या कवितेकडे लक्ष वेधणारे ठरले. वाङ्मय प्रकारांच्या वार्षिक आढाव्यात 'अस्वस्थ सूर्यास्त'चा गौरवाने उल्लेख केला गेला. त्यावर्षी (१९७१) काव्यविभागात कुणालाच पारितोषिक दिले गेले नाही. अर्थात, 'अस्वस्थ सूर्यास्त' मला वेगळीच अस्वस्थता देऊन गेला. १९६० ते ८० या दशकात महाराष्ट्र राज्य पुरस्काराची केवढी प्रतिष्ठा होती हे आजच्या 'पुरस्कारांचा सुकाळ' झालेल्या काळात तर तीव्रतेने जाणवते. पुरस्काराचा तिरस्कार वाटावा असा आताचा जमाना. असो.

पुढे मी कृष्णकमळ, अंबा, गंधकाली या कादंबऱ्या लिहिल्या. 'सलाम साब' हा कथासंग्रह प्रसिद्ध झाला. वाङ्मयीन गुणवत्तेसंबंधी मी काय सांगू; पण 'कृष्णकमळ' कादंबरीवर आधारित 'बंदिवान मी या संसारी' हा चित्रपट अरुण कर्नाटकी यांनी त्यांच्या राजलक्ष्मी चित्रमंदिर या बॅनरखाली काढला. या चित्रपटाची सर्वार्थाने 'चित्तरकथा'च झाली. (अन्यत्र यासंबंधी मी लिहिले आहे.) ही कादंबरी विजय हरी वाडेकर यांनी 'राजस' दिवाळी अंकात आधी छापली. नंतर ती पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाली. ग. दि. माडगूळकर, केशव तोरो, शांता ज. शेळके यांना ती आवडली होती. मराठवाड्याच्या बोलीतली ती कादंबरी अनेक सर्वसामान्य वाचकांना आवडली. समीक्षकांनी मात्र तिच्याकडे लक्ष दिले नाही.

आजचे आघाडीचे कादंबरीकार विश्वास पाटील त्या कादंबरीची माझ्याकडे वारंवार मागणी करतात, वाचण्याची उत्सुकता दाखवितात यातच मला समाधान वाटते.

अल्फा (झी), सह्याद्री खजिना या वाहिन्यांवरून केव्हातरी चित्रपट दाखविला जातो. 'कृष्णकमळ'ची आठवण ठेऊन अनेकजण फोन करतात. बरे वाटते. पण माझी मूळ कादंबरी आणि चित्रपट याचा कुठे ताळमेळच राहिलेला नाही.

**मी ओळखला जातो कवी म्हणून. अनेक कविसंमेलनातून कविता वाचल्या. रसिकांची दादही मिळाली. व्याख्यानांच्या निमित्ताने बऱ्याच ठिकाणी हिंडतो. तिथेही श्रोते माझ्या लेखनाचा, कवितांचा उल्लेख करतात - तेव्हा लिहिलेले सगळेच अगदी वाया गेले असे कसे म्हणावे? मी 'मंचीय' कवी नसलो तरी निव्वळ एकान्तात वाचनापुरता कवी नाही. काव्यवाचनामुळे अधिकाधिक लोकांपर्यंत पोचता आले. प्रतिसाद अनुभवला हे काय कमी आहे?**

मी ओळखला जातो कवी म्हणून. अनेक कविसंमेलनातून कविता वाचल्या. रसिकांची दादही मिळाली. व्याख्यानांच्या निमित्ताने बऱ्याच ठिकाणी हिंडतो. तिथेही श्रोते माझ्या लेखनाचा, कवितांचा उल्लेख करतात - तेव्हा लिहिलेले सगळेच अगदी वाया गेले असे कसे म्हणावे? मी 'मंचीय' कवी नसलो तरी निव्वळ एकान्तात वाचनापुरता कवी नाही. काव्यवाचनामुळे अधिकाधिक लोकांपर्यंत पोचता आले. प्रतिसाद अनुभवला हे काय कमी आहे?

हल्ली मासिके उरली नाहीत म्हणून दिवाळी अंकांतून कविता देतो. हंस, दीपावली, कवितारती, साधना, मौज अशा दिवाळी अंकांतून कविता प्रसिद्ध होतात. जाणकार दखल घेतात. काहीजण कवितांच्या ओळी पत्रातून कळवतात. भेटीत माझ्याच कविता मलाच ऐकवतात. कविता लिहिल्याचे सार्थक झाल्यासारखे वाटते. आनंद अंतरकर, विजया राजाध्यक्ष यांसारखे माझ्या कवितेविषयी अगत्य बाळगणारेही आहेत. पुष्कळदा आपणच कमी पडतो की काय असेही वाटते.

'मी धात्री, मी धरित्री'नंतर मी माझ्या कवितांचा संग्रह काढला नाही. दिवाळी अंकांतून विखुरलेल्या या निवडक कवितांचा संग्रह निघावा असे वाटते. पण कवितासंग्रह काढणार कोण? मी स्वत:च माझ्या मालिका कवितांचा 'गोकुळवाटा' नावाचा संग्रह फेब्रुवारी २००४ मध्ये प्रसिद्ध केला. प्रारंभी कृष्णहृदय आणि राधाहृदय या नावांनी अनुक्रमे 'लोकमत' मंथन पुरवणी आणि 'लोकप्रभा' साप्ताहिकातून कृष्णहृदय व राधाहृदय ही मालिका कविता प्रकाशित झाली. वाचकांचा अपूर्व प्रतिसाद मिळाला. 'गोकुळवाटा'चे सात-आठ ठिकाणी संहितावाचनाचे कार्यक्रमही केले. आपण काहीतरी वेगळे लिहिले आहे असे वाटले. विजया राजाध्यक्ष, श्रीधर शनवारे, राम शेवाळकर, प्रदीप वर्मा, आजच्या पिढीचे कवी संदीप खरे, मधू जामकर, प्रसन्नकुमार पाटील यांनी पारखी नजरेने त्याची दखल घेतली. पण अपेक्षेइतके पदरी काही पडले नाही. अनेकांना पुस्तक पाठविले. प्रतिसादाची प्रतीक्षा होतीच. पण.... जाऊ द्या.

एके दिवशी लता मंगेशकरांचा फोन आला. त्यांचा लडिवाळ स्वर थेट शब्द होऊन माझ्या कानांशी गुंजत राहिला, '' 'गोकुळवाटा' आवडल्या.''

''मॅडम चार ओळी लिहून कळवा. पत्र पाठवा.'' मी बोलून गेलो. बोलणे इतके आणि येवढेच. मी पत्राची वाट पाहतोय. येईल कदाचित येणार नाही. पण एका काव्यप्रेमी स्वरसम्राज्ञीला आपल्या कविता आवडल्या हे कळले तो दिवस सोनियाचा झाला. हे यश काय कमी आहे? कुठला कोण लक्ष्मीकांत तांबोळी पण त्याला लता मंगेशकर फोन करतात, कविता आवडल्याचे सांगतात - अशा क्षणांनीच तर बळ मिळते.

अपेक्षाभंगाचे घाव तर पाचवीलाच पूजलेले. अपयशाचे व्रणही न बुजलेले. अशा वेळी 'बोल जैसे कल्लोळ अमृताचे' अशी प्रचीती देणारा हा अनुभव श्वासान्तापर्यंत मला जपावाच लागणार.

गेली पंचेचाळीस वर्षे लिहितोय. थकलो नाही की कंटाळलो नाही. खूप काही लिहावंसं वाटतं पण लिहून होत नाही. 'रियाज'तर सुरू ठेवलाच पाहिजे. आधीच सांगून टाकलंय - सुचत गेलं तसं लिहीत गेलो. अलीकडे तर पहिल्यासारखी कविताही होत नाही. अर्धवट अपुऱ्या कविता डायरीत पडून असतात. कवितांचे असे कितीतरी गर्भपात सहन केले आहेत. काही तर आतल्याआतच जिरल्या आहेत. हे दु:ख कोणाला सांगावे? पूर्वी कविमित्रांशी पत्राचार व्हायचा. कमी-अधिक कळवलं जायचं. अलीकडे सगळंच थांबलं आहे. समकालीन मंडळी नेहमीच परस्परांविषयी सावध मौन बाळगून असते की काय कळत नाही. पूर्वी निरपेक्ष, निर्मळ मनानं लोक कळवायचे. मनसोक्त दाद द्यायचे किंवा झडझडून टीका करायचे. आता सगळेच हिशेब मांडताहेत की काय असे वाटते. एक चमत्कारिक सावधक्षण सर्वांनाच घेरून आहे. परिणामी 'उपेक्षेनं मारणं' ज्याला म्हणतात, तो अघोरी प्रकार सुरू आहे. सृजनाला मारक अशीच ही अवस्था आहे. नाठाळ मंडळींचे आपल्या विशिष्ट कंपूत तडमताशा वाजविणं सुरूच असतं.

जात-पात, प्रदेश-परिसर, मतप्रणाली, आपला-तुपला इत्यादींनी बिघडलेलं आजचं वाङ्मयीन पर्यावरण कुठल्याही एकाकी, एकट्या, व्रतस्थ सृजनात्म्याला क्लेशाशिवाय काय देणार?

संवाद हरवलेल्या आजच्या वर्तमानात आपणच आपल्या अंतर्मनात डोकावून पाहायचं. स्वत:शीच बोलायचं. आपणच आपल्याशी वाद घालायचा. अशा मन:स्थितीतून अकस्मात 'दोहा' हाती आला. माझं 'दोहादोहन' सुरू झालं.


२००३ पासून 'दोहा' लिहितोय. आता 'दोहाई'साठी दुवा मागतोय. हा प्रयोग इतरांसाठी नाही तर माझा माझ्यासाठीच. तरीही कुणीतरी वाचल्याचं सांगतो. माझाच दोहा मला ऐकवतो. वर्गात एखादा शिक्षक फळ्यावर लिहून ठेवतो. सामान्यांचा हा प्रतिसाद तज्ज्ञांपेक्षा मोलाचा वाटतो.

नुसता प्रयोगासाठी प्रयोग याला तसा अर्थ नसतो. इतरांचे त्यात सामील होणे आवश्यक. टी. व्ही. मुळे 'तुम्हाला पाहिलंय, तुम्ही दिसलात' ही आजची भाषा. कोणे एकेकाळी आकाशवाणीमुळे 'तुम्हाला ऐकलंय' असे लोक म्हणायचे. 'तुमचं वाचलंय, तुम्हाला वाचलंय' असं कधी आता कुणी म्हणेल काय? - याची मी वाट बघतोय. लेखक, कवी यांना लिहितं ठेवणारी ही दाद मी तरी नगण्य मानत नाही. 'उत्पत्स्यते मम कोऽपि समानधर्मा' या भवभूतीच्या उद्‌गारावर माझी अजूनही श्रद्धा आहे. माझा वाचक कुठेतरी असेलच की, माझ्यासारखाच

एकटा - एकाकी !

रविराज, ५०, भाग्यनगर,
नांदेड - ४३१६०५
फोन :- (०२४६२) २६४९७८

नवे कोरे...




एका सर्जनची मुलगी संसर्गजन्य मांसापासून बनवलेले हॅम्बर्गर खाल्याने मृत्यूमुखी पडते आणि.. आपल्या मुलीच्या मृत्यूचा शोध घेता घेता त्याच्या समोर येते ती मांसउद्योगातील माणूसपणाला काळिमा फासणाऱ्या कृष्णकृत्यांची अखंड मालिका... संवेदना गोठवून टाकणारी....

**टॉक्सिन** **रॉबिन कुक** अनुवाद : **डॉ. प्रमोद जोगळेकर**

**रॉबिन कुक यांची अजून एक**
**मेंदूला झिणझिण्या आणणारी कादंबरी.**

किंमत : २५० रु. पोस्टेज २५रु.






# खुषीपत्रे व नाखुषीपत्रेही

**अशोक जैन**

प्रख्यात कादंबरीकार ना. सी. फडके वाचकांच्या पत्राला 'खुषीपत्रे' म्हणत. ते 'अंजलि' दिवाळी अंक काढीत. त्यात त्यांची नवी कोरी कादंबरी असे आणि वाचकांची ढीगभर खुषीपत्रं छापलेली असत. खरंतर लेखकाचे कौतुक करण्याची लेखी कळविण्याची मराठी वाचकाची सर्वसाधारण प्रवृती नाही! लिखाणात काही चूक असेल तर ती मात्र तो बिनचूकपणे कळवतो! तेही उघड्या पोस्टकार्डावर!

अशी पत्रं पाठवण्यात पुणेकरांचा भरणा जास्त असतो असं गंमतीनं म्हटलं जातं.

याचा अर्थ वाचकांची खुषीपत्रं येतच नाहीत असं नव्हे. पण एकूण अशी पत्रं लिहिण्याची मराठीत प्रवृत्ती कमी आहे एवढंच!

गायकाला किंवा रंगमंचावरील कलाकाराला जशी प्रेक्षक लागलीच दाद देतो तशीच लेखकाच्या दृष्टीनं वाचकाची दाद महत्त्वाची व प्रेरणादायी असते. मलाही वाचकांची खूप पत्रं येतात. पण त्यात जाणकार वाचक फार थोडे असतात. बरेच वाचक मी पुस्तकात वा लेखात जे लिहिले आहे त्याचाच गोषवारा मला कळवतात! एकदा एका वाचिकेने माझ्या राजधानीतून पुस्तकात वर्णिलेल्या घटनांची जंत्रीच चार पानी पत्र लिहून मला कळवली. विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिका लिहिताना जी पुरवणी दिली जाते त्या पुरवणीच्याच कागदावर हे पत्र लिहिले होते हे सहज लक्षात येत होते. मी या पत्रात पाठविलेल्या उत्तरात आपण रसिक आहात असं दिसतंय' असा उल्लेख केला. त्यावर 'अय्या, तुम्ही प्रतिभावंत म्हणजे भारी हुशार, कस्सं ओळखलंत बरं?' असं त्यांचं पत्र आलं (पुन्हा पुरवणीच्याच कागदावर) त्यानंतर त्यांना पत्र पाठवायचं धाडस मी केलं नाही.

डोंबिवलीचे एक व्यासंगी वाचक श्री. प्रकाश चांदे यांनी माझ्या राजधानीतून या पुस्तकातील तपशीलाच्या काही चुका कळवल्या. मी त्यांचं कौतुक करणारं पत्र पाठवलं. एवढेच नव्हे तर या पुस्तकाच्या पुढील आवृत्तीत या चुका सुधारल्या व प्रस्तावनेत चांदे यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेखही केला. चांदे यांनी त्यांचा व माझ्यातील पत्रव्यवहार 'औदुंबर'च्या दिवाळी अंकात छापून आणला!

एक अत्यंत सुजाण, साक्षेपी व सुसंस्कृत वाचिका मला भेटली. ती म्हणजे परभणीची कु. अंजली अंबेकर. सरकारी नोकरीत लेखा व कोशागर विभागात असूनही तिला साहित्य, कला, संस्कृती यांची उत्तम जाण आहे. पत्रातूनच तिचा परिचय झाला व आता ती जणू आमच्या कुटुंबाचीच सदस्य झाली आहे. तिचं अक्षर सुरेख आहे. प्रत्येक पत्रात नवीन वाचलेलं पुस्तक, पाहिलेला सिनेमा, ऐकलेलं संगीत यावर ती भरभरून लिहिते. अलिकडेच तिनं 'झोर्बा द ग्रीक' या सुंदर चित्रपटाची सीडी पाहिली. त्याआधी ही कादंबरी तिने वाचली व झोर्बाची ऑडिओ सीडीही ऐकली होती. प्रत्यक्ष चित्रपट पाहावयास ती आसुसलेली होती. बाहेर मुसळधार पाऊस कोसळताना तिनं झोर्बा पाहिली नि पत्रात लिहिलं 'कित्येक दिवसानंतर चैतन्य उराशी कवटाळणारा जिवंत माणूस भेटला!'' असा समजूतदार रसिक वाचक भेटणं विरळाच!

काही वाचक लेखकाकडून विचित्र अपेक्षा बाळगतात. अमिताभ बच्चन खासदार असताना मी दिल्लीत महाराष्ट्र टाइम्सचा विशेष प्रतिनिधी होतो. माझी आणि अमिताभची तेव्हा चांगली ओळख होती याचा उल्लेख दिल्लीवरील माझ्या राजधानीतून पुस्तकात आहे. मला नंदुरबारहून एका वाचकाचं पत्र आलं. (माझं नंदुरबारला भाषण झालं तेव्हा स्वागत करणाऱ्यात तो होता म्हणे!) माझी व अमिताभ बच्चनची दोन मिनिटे गाठ घालून द्या अशी विनंती त्याने पत्रात केली. माझ्या पुस्तकाबद्दल काहीच कळवलं नव्हतं. याच पुस्तकात सरकारी अधिकाऱ्यांचा उल्लेख आहे. तो वाचून एका वाचकानं आपल्या कन्येची बदली करावी अशी मला विनंती केली! या दोघांनाही मला जड अंत:करणानं नकार कळवावा लागला.

मी अनुवादिलेल्या इंदिरा गांधी (मूळ लेखिका - पुपुल जयकर) व बिझिनेस महाराजे (मूळ लेखिका - गीता पिरामल) (प्रकाशक अनुक्रमे राजहंस व मेहता पब्लिशिंग हाऊस) या पुस्तकांवर मला सर्वाधिक पत्रे आली आहेत.

मी जवळजवल चाळीस वर्षे पत्रकारितेत काढली. बातम्या दिल्या, लेख, सदरे लिहिली. त्याला आलेला वाचकपत्रांचा अनुभव संमिश्र आहे. आणीबाणीच्या काळात वृत्तपत्रावर सेन्सॉरशिप लागू करण्यात आली होती. प्रत्येक बातमी लेख सरकारी अधिकाऱ्यांकडे सेन्सॉर करायला पाठवावा लागे. त्या काळात मुंबई मराठी पत्रकार संघात विख्यात लेखक व पत्रकार प्रभाकर पाध्ये यांचं भाषण होतं.

त्यांनी केंद्र सरकार व इंदिरा गांधी यांच्यावर टीका केली. तशीच्या तशी बातमी दिली असती तर सेन्सॉरनं ती छापायला परवानगीच दिली नसती. पण मी अशा खुबीनं ती बातमी दिली की, त्यांच्या भाषणाचा गाभा त्यातून अचूक प्रकट झाला. पण सेन्सॉरच्या कात्रीतून ती सुटली.

ती वाचून पाध्ये बेहद्द खूष झाले व त्यांनी महाराष्ट्र टाइम्सचे संपादक श्री. गोविंद तळवलकर यांना पत्र पाठवून ही बातमी देणाऱ्या वार्ताहराचे अभिनंदन करावे असे कळवले. माझ्या कारकीर्दीत मला मिळालेली ही मोलाची शाबासकी.

लेखाच्या आरंभी खुषीपत्रांचा उल्लेख केला आहे. पत्रकाराला 'नाखुषी' पत्रांनाही सामोरे जावे लागते. एका हिंदुत्ववादी वाचकाने मला 'हलकट' अशोक जैन असे संबोधून पोस्टकार्ड पाठवले. पत्रावर पत्ता लिहिताना 'हलकट अशोक जैन' असंच त्यानं लिहिलं होतं. या 'शूर' वाचकानं स्वत:चं नाव मात्र लिहिलं नव्हतं. संघ विचाराने लोक अनेकदा निनावी पत्रं पाठवतात असा बहुतेक पत्रकारांचा अनुभव आहे.

माझ्यावर टीका करणाऱ्या पत्रांचा वर्षाव झाला तो मी पांडुरंगशास्त्री आठवले व त्यांच्या स्वाध्याय परिवार यांच्याविषयी महाराष्ट्र टाइम्समध्ये लिहिलेल्या लेखावर. मी पांडुरंगशास्त्रींसमवेत बडोदा इथं गेलो होतो. त्यांच्या दौऱ्यात अनेक गोष्टी खटकल्या. परंतु जे घडलं व वाटलं तेच मी लिहिलं. पण ते वाचून एरवी बंधूप्रेमाचा डंका पिटणारी स्वाध्यायी मंडळी खवळली. मला शिव्या देणाऱ्या पत्रांचा मुसळधार पाऊस पडला. धमक्यांचे शेकडो फोन आले. माझ्या लेखाला विरोध करणारी पत्रं मी म. टा. मध्ये संपूर्ण पानभर छापली.

एकदा एक अत्यंत सुखद अनुभव आला. माझ्या एका लेखावर खूष होऊन एका वाचकाने मला चक्क पुरणपोळ्या भेट पाठवल्या. ही गोड भेट पाठवणारे होते प्रसिद्ध सिने अभिनेत्री उर्मिला मातोंडकर हिचे वडील! त्यांच्याशी माझी तोंडओळख आहे. हे पुरणपोळीचं 'पुराण' मोठं मजेशीर आहे.

डॉ. श्रीराम लागू यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना चार्ली चॅप्लिनचा पुतळा भेट देण्याचं मी ठरवलं होतं. पेण येथील गणेश मूर्तीकार आनंद देवधर यांच्याकडून मी तो बनवून घेतला. या देवधरांचा परिचय झाला तो संगीत शिक्षिका प्रा. विजया टिळक यांच्यामुळे. टिळक यांचा परिचय झाला तो त्यांनी लोकसत्तामध्ये केलेल्या पुस्तकाच्या एका परीक्षणामुळे. गेली वर्षानुवर्षे तेच तेच विनोद करणाऱ्या शिरीष कणेकर यांच्या एका पुस्तकाचं अत्यंत मर्मग्राही परीक्षण त्यांनी केलं होतं. चॅप्लिनच्या पुतळ्याबद्दल मी साधना दिवाळी अंकात लेख लिहिला. त्यात हा सर्व संदर्भ होता व कणेकर यांच्याबद्दल माझं परखड मत मी नोंदवलं होतं.


तो लेख श्री. मातोंडकर यांना अत्यंत आवडला. त्यांना कणेकरांचा काही फारसा सुखद अनुभव आला नव्हता. आपल्या एका कार्यक्रमाला उर्मिलानं प्रमुख पाहुणी म्हणून यावं अशी कणेकरांची इच्छा होती. पण शूटिंगच्या तारखांमुळं तिला शक्य नव्हतं. तिच्या नकारामुळे कणेकर खवळले. त्यांनी वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या आपल्या सदरात उर्मिलाविषयी काहीबाही टीकात्मक लिहिले. त्यामुळे साहजिकच उर्मिलाचे वडील कणेकरांवर नाराज होते.


एवंगुणविशिष्ट कणेकरांचा मी परखड समाचार घेतला याचा मातोंडकरांना आनंद झाला व म्हणून त्यांनी मला पुरणपोळ्या पाठवल्या होत्या!

वाचकाची प्रतिक्रिया टॉनिकच काय पुरणपोळीही असू शकते हे दर्शवणारा हा आगळावेगळा अनुभव!

७०४ बी, साकार, कल्याण कॉम्प्लेक्स.यारी रोड, वर्सोवा,
अंधेरी (प.) मुंबई - ६१.
दूरध्वनी - २६३६०३२३

**माझ्यावर टीका करणाऱ्या पत्रांचा वर्षाव झाला तो मी पांडुरंगशास्त्री आठवले व त्यांच्या स्वाध्याय परिवार यांच्याविषयी महाराष्ट्र टाइम्समध्ये लिहिलेल्या लेखावर. जे घडलं व वाटलं तेच मी लिहिलं. पण ते वाचून एरवी बंधूप्रेमाचा डंका पिटणारी स्वाध्यायी मंडळी खवळली. मला शिव्या देणाऱ्या पत्रांचा मुसळधार पाऊस पडला. धमक्यांचे शेकडो फोन आले. माझ्या लेखाला विरोध करणारी पत्रं मी म. टा. मध्ये संपूर्ण पानभर छापली.**






**भारतातल्या महान उद्योगपतींची वेधक शब्दचित्रे**

**मूळ लेखिका : गीता पिरामल**
**अनु. अशोक जैन**

**बिझिनेस महाराजे**
**किंमत : २५०रु.**
**पोस्टेज : २५ रु.**

**बिझिनेस लेजंड्स**
**किंमत : ३००रु.**
**पोस्टेज : ३० रु.**

मेहता पब्लिशिंग हाऊस, १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ३०




## सेवेतून समर्थतेकडे

**डॉ. सिसिलिया कार्व्हालो**

कबीराचा एक दोहा मला आवडतो,

शब्द शब्द सब को ये काहे
शब्द के हात ना पाँव
एक शब्द औषध करे
एक शब्द करें घाँव

शब्द : मग ते लिखित स्वरूपाचे असोत व मौखिक स्वरूपाचे...आणि कुणाचेही असोत, त्याची अभिव्यक्ती वा उच्चारण...माणसाला निरोगी बनवते...रोगमुक्त करते...वा जखमीही करते. जखमा झाल्यावर त्यावर लेप लावायलाही शब्दच धावून येतात. लेखकाने निर्माण केलेल्या शब्दसृष्टीत रसिक 'रिघतो'. त्या विश्वात तो न्हाऊन निघतो व त्याच रसिकतेने तो लेखकाला ते कळवतोही. त्याच्या पसंतीची ही पावती लेखकाच्या मनावरील सारे ताण हलके करणारी असते. लेखनासाठी घेतलेल्या मानसिक श्रमाचा तो अनमोल मोबदला असतो. या 'भांडवलावर' आपले नवे लेखन उभे करण्यास लेखकाला हुरूप येतो.

लेखन प्रसिद्ध होण्याच्या प्रारंभिक काळातील...म्हणजे साधारणपणे वीस-बावीस वर्षापूर्वीची गोष्ट असेल. एक तर ख्रिस्ती समाजात लेखक कमी. लेखिका तर अत्यल्प आणि साहित्यिक मूल्य असलेलं लेखन करणाऱ्या स्त्रिया तर अगदी एका हाताच्या बोटांवर मोजता येतील इतक्या. (अल्पसंख्याक समाजात स्त्रिया अत्यल्प असण्याचं कारण त्या विशिष्ट धर्माचा विलक्षण पगडा व प्रोत्साहन देणारे लोक कमी हे असावे...हा माझा अनुभव) स्थानिक पातळीवर माझं लेखन प्रसिद्ध झालं...तेव्हा गावातील काही ज्येष्ठ नागरिकसंघाचे लोक आमच्या घरी आले. ते माझ्या वडलांच्याही ओळखीचे होते. वडलांशी बोलणं झालं...माझ्याशीही बोलले. तेव्हा त्या पाहुण्यांच्या नजरेत मला आश्चर्य दिसलं.

दुसऱ्या दिवशी दोघेजण पुन्हा आले. त्यापैकी एका आजोबांनी माझ्या हातात खाऊचा पुडा देऊन म्हटले, ''मला वाटलं...सिसिलिया म्हणजे एखादी पोक्त, प्रौढ बाई असावी. तुझ्या लेखनावरून माझा तर समज झाला होता.'' मला खूप आनंद झाला. आपलं लेखन त्यांना आवडतं. ते आपल्या लेखाची वाट बघत असतात. या विचारानें लेखन करण्याचा हुरूप वाढत गेला.

विविध वाङ्मयप्रकारातील लेखन मी केलं...सोलापूरहून प्रा. त्र्यं. वि. सरदेशमुख यांचं एकदा पत्र आलं. 'तुझं लेखन मला आवडतं. मी आवर्जून वाचतो.' तेव्हा एवढा मोठा लेखक आपलं साहित्य वाचतो कळल्यावर आपण जबाबदारीने लेखन केलं पाहिजे याची जाणीव मला समृद्ध करून गेली. आजही त्यांच्या वयाच्या चौऱ्याऐंशीव्या वर्षी टेलिफोनवरचा त्यांचा थरथरता आवाज... अभिनंदनाचे शब्द...आपल्याला लेखनाचे बळ देतात.

कविवर्य कुसुमाग्रजांनी माझा कवितासंग्रह वाचल्यावर लिहिलेले पत्र म्हणजे माझ्या लेखनाला सोन्याचे मोल प्राप्त करून देणारा अमोल ठेवा आहे. साहित्यिक वर्तुळातही कविवर्यांनी त्याची वाच्यता केली व मलाही प्रत्यक्ष भेटीत त्याबद्दल सांगितले हे मला माझे मोठे भाग्य वाटते.

नामवंत लेखक स्त्री-पुरुषांना आम्ही एकमेकांचे लेखन वाचल्यावर कळवतो व मोकळेपणी त्यांचं अभिनंदन करतो...तेव्हा एकमेकांच्या मनाच्या मोठेपणाचा प्रत्यय तर येतोच...पण आपल्या लेखनासाठी पोषक वातावरणही निर्माण झाल्याचा आनंद वाटतो.

जगाच्या कानाकोपऱ्यातील अनेक वाचक...कुठून कुठून पत्रं पाठवून आपल्या लेखनाविषयी कळवतात याचं मला नेहमीच अप्रूप वाटत आलेलं आहे. त्यांच्या विचारविश्वात ते आपल्या विचारांना सामावून घेतात...त्याची दखल घेतात. ही किती मोठी गोष्ट आहे!

'आवडलेलं पुस्तक' या सदरात, एका वर्तमानपत्रात, माझ्या पुस्तकाचा उल्लेख पाहून वाचकांच्या रसिकतेची कमाल वाटली. काहीही पूर्वपरिचय नसलेली, कसलीही अपेक्षा न ठेवता आपलं मनोगत कळवतात. तेव्हा वाटतं...खरंच या लोकांसाठी आपण लिहावं...आपण लिहिलेल्या शब्दांना पंख फुटावेत व अशा रसिकांपर्यंत आपलं लेखन पोहोचावं.

आपल्याही नकळत अशा रसिकांपर्यंत आपलं लेखन पोचलेलंही असतं. म्हणूनच तर आपलं लेखन वाचल्यावर आपले परिचितही जेव्हा मुखदुर्बल होतात...अभिनंदन करण्याएवढाही मोठेपणा व मोकळेपणा त्यांच्याकडे नसतो, तेव्हा त्यांच्या वागण्यावर डोळेझांक करून पुढे जाण्याचं सामर्थ्य अपरिचित पण विदग्ध रसवृत्तीच्या

लोकांनी आपल्याला दिलेलं असतं.

'मोगऱ्याचा मांडव' या ललितसंग्रहाला राज्यपुरस्कार मिळाला तेव्हा, फोनवरून व पत्ररूपाने अभिनंदनाचा जो वर्षाव झाला, त्याला सुमारच नव्हता. आपल्या साहित्यावर व लिहितो म्हणून आपल्यावर प्रेम करणारे एवढे रसिक आहेत ही भावनाच सुखदायक आहे. म्हणूनच लेखनाचे शिवधनुष्य आपण सहज पेलू शकतो.

वर्तमानपत्रं-मासिक-दिवाळी अंक यात ज्या ज्या वेळी लेखन प्रसिद्ध झालं, त्या त्या वेळी वाचकांची अमाप पत्रं मिळाली. प्रसारमाध्यमांचा वाचनावर परिणाम झालेला आहे...असं जेव्हा म्हटलं जातं...त्यावेळी वाटतं...आपल्यालाच जर एवढी पत्रं येतात...तर कितीतरी...व मोठ्या प्रमाणावर लेखन करणाऱ्या साहित्यिकांना किती पत्रं येत असतील? म्हणजे कितीतरी लोक वाचन करीत असतात!

कवी हा बोलका रसिक असतो आणि रसिक हा मुका कवी असतो... असे म्हटले जाते. तेव्हा त्याचा अर्थही हाच असतो, की आपल्याला जे व्यक्त करावंसं वाटतं...तेच नेमकं... कोणीतरी... नेमकेपणानं व्यक्त केलेलं असते. याचा रसिक वाचकाला आनंद होतो व तो लेखक-कवींना तसे कळवतो.

आणखी एका आजोबांचा अनुभव मला महत्त्वाचा वाटतो. पंच्याऐंशी वर्षांचे श्री. अगस्टीन घोन्साल्वीस हे गृहस्थ काठी टेकीत टेकीत रस्त्यातून चालले होते; तर गर्दीतून झपझप चालत ते माझ्यापर्यंत आले. बालकाच्या उत्साहाने ते म्हणाले, ''अरे! सिसिलिया, बरं झालं...तू भेटलीस ते! तुझी दोन पुस्तकं वाचली...आवडली...हे तुला सांगायचं होतं.'' 'परीस' आणि 'मुठीतले आकाश' या दोन पुस्तकांविषयी ते बोलत होते. 'परीस' कथासंग्रहातला मिथकांचे नवे अर्थ सांगण्याचा प्रयत्न त्यांना आवडला होता.

ते म्हणाले, ''बायबलच्या 'जुन्या करारा'तील मिथकं...म्हणजे भाकडकथा आहेत. इव्हने फळ खाल्ल्याने पाप घडलं...वगैरे खोटं असावं. त्यांनी देवाची आज्ञा मोडली म्हणून पृथ्वीतलावर मानव आला.'' असं बरंच काही ते सांगत होते आणि बरोबरच सांगत होते. एक तासभर त्यांनी माझ्याशी संभाषण केलं...त्यांची वाचनाची सवय. त्यावर चर्चा हे सारं ऐकून मी हरखून गेले. अधिक आनंद झाला. तो अशासाठी की...या वयातही धर्मविषयक त्यांचे पुरोगामी विचार. एकीकडे ख्रिस्ती धर्माधिकारी आपल्या लेखनामुळे आपल्यावर दडपण आणण्याचा प्रयत्न करतात आणि दुसरीकडे वयोवृद्ध माणसे आपलं कौतुक करतात.

एकाच समाजातील हा विरोधाभास...!

दुसरीकडे ख्रिस्ती बाई मराठी भाषेत लेखन करते...ही अन्यधर्मीय मराठी माणसांकडून मिळणारी पसंतीची पावती.

अशा तिठ्यावर उभे असताना.. चांगल्या साहित्याची पक्वान्नं शिजत राहतात...रसिकवाचक त्याचा पोटभर आस्वाद घेतो. त्यांच्या तृप्ततेचे पडसाद त्यांच्या प्रतिसादातून उमटत राहातात व आपले लेखन व आपले मनही संपृक्त होत राहते...

ही किती आनंदाची गोष्ट आहे! शब्दांची सेवा केली की शब्दांचं सामर्थ्य प्राप्त होतं...ते असं!

> **जगाच्या कानाकोपऱ्यातील अनेक वाचक...कुठून कुठून पत्रं पाठवून आपल्या लेखनाविषयी कळवतात याचं मला नेहमीच अप्रूप वाटत आलेलं आहे. त्यांच्या विचारविश्वात ते आपल्या विचारांना सामावून घेतात...त्याची दखल घेतात.**
> **ही किती मोठी गोष्ट आहे!**
> **काहीही पूर्वपरिचय नसलेली, कसलीही अपेक्षा न ठेवता आपलं मनोगत कळवतात. तेव्हा वाटतं...खरंच या लोकांसाठी आपण लिहावं...आपण लिहिलेल्या शब्दांना पंख फुटावेत व अशा रसिकांपर्यंत आपलं लेखन पोहोचावं.**

अ - १०३, जॉना विला
माणिकपूर, चर्च रोड,
वसई (पश्चिम) ४०१२०२

नवे कोरे...




**पुरुषांच्या आधाराशिवाय बाई एकटी राहू शकते? सुखाने, आनंदाने जगू शकते? की बाईलाही पुरुष हवाच असतो शेवटी?**

**लेडीज कूपे**

**मूळ लेखिका : अनिता नायर अनुवाद : अपर्णा वेलणकर**

**किंमत : २५०रु. पोस्टेज : २०रु.**

**स्वतःच्या शोधात निघालेल्या स्त्रीची आरपार कथा**




## आठवणी वाचकांच्या

**बाबा कदम**

**मा**झ्या पहिल्या, 'प्रलय' या कादंबरीचे वाचक होते. आचार्य अत्रे! त्याना माझी प्रलय ही कादंबरी वाचणे भागच पडले. कारण ती कादंबरी त्यांनाच अर्पण केलेली होती. आता ज्यांना लेखक कादंबरी अर्पण करतो, त्यांना ती वाचावीच लागते असा कांही दंडक नाही. पण माझे भाग्य, त्यांनी ती कादंबरी संपूर्ण वाचली. तुम्ही म्हणाल त्याला पुरावा काय? मी सरकारी वकील, म्हणजे पोलीस प्रॉसिक्यूटर असल्यामुळे पुराव्याशिवाय कसलेही विधान करीत नसतो. आचार्यानी ती कादंबरी संपूर्ण वाचली याला पुरावा, त्यांनी 'मराठा'त प्रलयवर लिहिलेला अग्रलेख! आचार्यांनी त्या कादंबरीवर लिहिलेल्या विस्तृत अग्रलेखात म्हटले आहे, 'प्रलय' पहिलीच तरीही उत्कृष्ट! संस्थानी जमाना, संस्कारशील व्यक्ती यांचे मनोज्ञ दर्शन कादंबरीत घडते, त्याचबरोबर कोर्ट, पोलीस, तपास, कायद्यातील गुंतागुंती यांचाही लेखकाने बारकाईने अभ्यास केल्याचे जाणवते. ग्रामीण व शहरी पार्श्वभूमी असलेल्या या कादंबरीकाराची सूम निरीक्षणशक्ती पदोपदी प्रत्ययाला येते. 'प्रलय' ही पहिली न वाटण्याइतकी सहजता तीत आहे. भविष्यकाळातही लेखक प्रसिद्ध झाल्याशिवाय रहाणार नाही.'

मराठी साहित्यातील भीष्माचार्यांचा आशीर्वाद लाभल्याने आजवर ८७ कादंबऱ्या मी लिहिल्या.

दुसरे माझे वाचक होते नी. गो. पंडितराव! त्यांचे कधी काळी कोल्हापूरात वास्तव्य होते. त्यामुळे 'प्रलय'मधील ग्रामीण व शहरी विभाग त्यांच्या परिचयाचे होते. त्यानी लिहिलं, ''बाबा, तुमच्या लेखणीत प्रचंड ताकद आहे. लोकांच्या प्रशंसेची वा टीकेची दखल न घेता सातत्याने लिहीत रहा, लेखक म्हणून तुमचा भविष्यकाल उज्ज्वल आहे.''

या दोन व्यक्तींच्या अभिप्रायामुळे 'मला लिहायला जमेल की नाही' असे पूर्वी जे वाटायचे, ते बिलकुल वाटेनासे झले, त्यानंतर समाजातल्या सर्व स्तरातून मला सतत पत्रे येत राहिली. त्यात वृद्धापासून ते १६-१७ वर्षांच्या तरुणतरुणीपर्यंत व्यक्ती होत्या. काही व्यापारी होते, तर काही क्लार्क, शिक्षक, प्राध्यापक, डॉक्टर, कष्टकरीही होते. याचं कारण मी सत्य घटनेचा आधार असल्याशिवाय एकही कादंबरी लिहिलेली नाही. माझ्या वाचकांना कादंबरीतल्या घटना कुठेतरी घडलेल्या आहेत याची पहिल्या प्रकरणापासून जाणीव होत रहाते.

केवळ महाराष्ट्रातूनच नव्हे, तर जिथे जिथे म्हणून मराठी वाचक आहे तेथून वाचकांची खुषीपत्रे येत राहिली. यात, मद्रास, कलकत्ता, येथून पत्रे तर आलीच, पण, इंग्लंड, अमेरिका, इस्त्रायल येथूनही मराठी वाचकांची पत्रे आली. इस्त्रायलमधे 'डिमोना' नावाचे गाव आहे, त्या गावांत कुलाबा जिल्ह्यातून स्थलांतर करून गेलेली 'ज्यू' जमात मोठ्या प्रमाणावर आहे. डिमोनात या पूर्वीच्या कुलाबा जिल्ह्यातील नागरिकांनी एक लायब्ररी सुरू केलीय. तीत पु.ल.देशपांडे, व्यंकटेश माडगूळकर, द.मा.मिरासदार यांच्या समवेत माझ्याही एकूण एक कादंबऱ्या ठेवलेल्या आहेत.

आता कदाचित तुम्हीही अतिशयोक्ती वाटेल. पण १०-११ वर्षापूर्वी दहा पुरुष आणि आठ बायका डिमोनावरून भारतात आल्या होत्या, त्या कोल्हापूरला मुद्दाम मला भेटायला येऊन गेल्या. तशी ती माणसे वर्ष दोन वर्षातून आपल्या जन्मभूमीच्या भारताच्या भेटीवर येतच असतात. त्या बायका आमच्या सौ. माईंच्यासाठी बदाम आणि केशर घेऊन आल्या होत्या. पुरुषांनी मला सूटचं कापड आणि 'सिवास रिगल' भेट म्हणून आणले होते. सौ. माईनी त्यांच्यासाठी कोल्हापूरी पांढरा रस्सा (चिकन) बनवला होता.

पश्चिम अमेरिकेतील शालिनी सराफ, पूर्वाश्रमीच्या शालिनी देशपांडे यांचे पत्र आले. 'बाबा, मी तुमची वाचक आहे. आत्तापर्यंतच्या तुमच्या सर्व कादंबऱ्या वाचल्या, खूप आवडल्या. पहिले प्रकरण वाचले की 'पुढे काय पुढे काय' अशी जिज्ञासा निर्माण होते, अन् कादंबरी पूर्ण केल्याशिवाय हातावेगळी करताच येत नाही. माझी तुम्हाला एक विनंती की तुम्ही अमेरिकेला यदाकदाचित् आलात तर सॅन डिओगोला माझ्याकडे रहायलाच या! तुम्हाला ग्रॅड कॅनियन, लासवेगास हा मेक्सिकोच्या परिसराजवळील प्रदेश आम्ही दाखवून आणू.'

अमेरिका? मी मनाशी म्हणालो या जन्मात कुठली आलीय अमेरिका? पण ''असेल हरिच्या मनात, तर क्षणात तो बसवेल विमानात.'' असं घडलं. चि. उमेश, सौ.माई व मी युरोप आणि

अमेरिकेचा दोन महिने दौरा केला. वचन दिल्याप्रमाणे सराफबाईंनी आम्हाला दक्षिण अमेरिकेतील अविस्मरणीय अशी निसर्गस्थळे दाखवली. निघायच्या आधल्या रात्री बार्बेक्यू आणि स्कॉचची पार्टी दिली.

या झाल्या समाजातील उच्चभ्रू वाचकांच्या आठवणी आता एकदोन खालच्या वर्गातील वाचकांच्या आठवणी! आजऱ्याजवळ उत्तूर या गावी चित्तर बंदुकीने चित्तर मारण्यासाठी गेलो होतो. चित्तर हा पक्षी उडता टिपावा लागतो. त्यासाठी ४-२ हाकेवाले सोबत घ्यावे लागतात. झुडुपांत दडलेले चित्तर ते हाक्यात उडवतात. गावची हद्द ओलांडून आम्ही ओढ्याकाठी आलो असताना एक गुराखी तरुण म्हैशीच्या पाठीवर झोपून कसलेतरी पुस्तक वाचत होता. आमच्या हाक्यातील पांडू मोरबाळे हा त्या गुराख्याजवळ गेला आणि त्याने त्याला विचारले, 'एवढं तल्लीन होऊन काय वाचतोस रे?'

'बाबा कदमांची इन्साफ कादंबरी वाचतोय.'

'ते बघ बाबा कदम, चित्तराच्या शिकारीला आल्यात.'

त्या गुराखी मुलाचा विश्वासच बसेना. तो म्हैशीच्या पाठीवरून उतरला आणि माझ्याजवळ येऊन चक्क माझ्या पाया पडला.

असंच एकदा मी बार्शीला चाललो असताना मोडलिंबच्या बसस्टँडवर तांबोली पान शॉपमधे आवळ्याची सुपारी आणायला गेलो होतो. तर दुकानदार एकाग्र होऊन माझी 'सन्नाटा' कादंबरी वाचत होता. माझ्याकडे लक्षच द्यायला तयार नव्हता, मी म्हणाले 'तुम्ही या लेखकांना ओळखता का?'

'नाही!'

''मागच्या बाजूचा लेखकाचा फोटो बघा बरं.''

त्यानं पाह्यलं, परत मला न्याहाळलं हं आणि म्हणाला, 'आज धन्य झालो, तुमचं दर्शन घडलं. तुम्ही काय पाहिजे ते मागा माझ्याकडं!'

मी म्हणालो 'कांही नको, फक्त आवळासुपारीची एक पुडी द्या.'

अशा किती म्हणून वाचकांच्या आठवणी सांगाव्या? एस.टीत, रेल्वेत, लोकलमधे मला माझे वाचक भेटले. पण युरोप अमेरिकेला जाताना एका हवाई सुंदरीनं माझा ऑटोग्राफ घेऊन म्हटलं 'I am your fan, Baba' त्या क्षणी विमानानं हवेत झेप घेण्याअगोदरच मी हवेत उडू लागलो.

**पश्चिम अमेरिकेतील शालिनी सराफ, पूर्वाश्रमीच्या शालिनी देशपांडे यांचे पत्र आले. 'बाबा, मी तुमची वाचक आहे. आत्तापर्यंतच्या तुमच्या सर्व कादंबऱ्या वाचल्या, खूप आवडल्या. पहिले प्रकरण वाचले की 'पुढे काय पुढे काय' अशी जिज्ञासा निर्माण होते, अन् कादंबरी पूर्ण केल्याशिवाय हातावेगळी करताच येत नाही.**

आनंद, ताराबाई पार्क
सर्किट हाऊस जवळ,
कोल्हापूर

## माझी आवडती दहा पुस्तके स्पर्धा निकाल

### १० उषा साठे

१. कवडसे पकडणारा कलावंत (चेकॉव्ह आणि त्याची कथा) — विजय पाडळकर
२. शाळा — मिलिंद बोकिल
३. रावीपार — गुलजार
४. ही श्रींची इच्छा — श्रीनिवास ठाणेदार
५. चक्रीवादळ — प्रभाकर पेंढारकर
६. रंग सुखाचे — डॉ. रमा मराठे
७. इजिप्तायन — डॉ. मीना प्रभू
८. निसटलेले — आशा बगे
९. जीवनशैली — डॉ. ह. वि. सरदेसाई
१०.वाइज अँड अदरवाइज — सुधा मूर्ती

### 'कवडसे पकडणारा कलावंत'

'कवडसे पकडणारा कलावंत' या पुस्तकात विजय पाडळकरांनी अंतोन चेकॉव्ह या रशियन लेखकाच्या कथांतील काही कथा छान उलगडून सांगितल्या आहेत. 'कोरस गर्ल' या कथेतील 'दु:खामुळं माणसं अधिक समजदार होतात की अधिक हट्टी' हे वाक्य कथेचं मर्मच सांगते. अशाच सुंदर वाक्यांनी प्रत्येक कथेचं सार सांगत पाडळकर आपल्याला पुस्तकाकडे खेचून घेतात आणि आपणही पुस्तकातील आनंदाचे कवडसे पकडतच जातो.

२/९, दीपज्योती,राजाजी पथ, गल्ली क्र. ४,
डोंबिवली (पूर्व) ४२१२०१





# वाचकांचा प्रतिसाद हेच माझे टॉनिक

डॉ. लीला गोविलकर

''वाचकांचा प्रतिसाद हेच माझे टॉनिक'' या विषयावर लेखन करण्याबद्दलचे पत्र आले, आणि मनात अनेक आठवणींनी गर्दी केली. आपला वाचकवर्ग कोणता आहे याची मला कल्पना होती. त्यांच्या प्रतिक्रिया माझ्यापर्यंत केवळ पत्राद्वारेच पोहोचत होत्या असे नाही. त्यांच्या बोलण्यांतूनही त्यांची माझ्या लेखनाबद्दलची प्रतिक्रिया- आवडनिवड - मला जोखता यायची.

त्याचा नंतरच्या लेखनावर परिणामही व्हायचा. मुख्य म्हणजे आपला असा खास वाचकवर्ग तयार होतोय - झालाय - हीच गोष्ट छोट्या - मोठ्या लेखकांना लेखणी सरसावायला पुरेशी असते!

लेखक त्याच्या अक्षरांनी वाचकांच्या मनापर्यंत पोहोचत असतो, लेखनाच्या क्षेत्रात स्थिरावत असतो. भविष्यकाळची दारेही त्याच्यासाठी किलकिली होत असतात. आजच्या विरत चाललेल्या वाचनसंस्कृतीच्या काळात निदान ग्रंथालयातील टिचभर जागा तरी त्याच्यासाठी आरक्षित राहू शकते. पण त्याच्या लेखणीला उत्साहाचा हिरवा - पिवळा चारा देऊ करणाऱ्या वाचकांची प्रत्यक्ष नोंद मात्र क्वचितच होत असते. वाचकांची ही प्रतिक्रिया लेखकांपर्यंत विविध मार्गांनी येत असते. कधी पत्रोत्तराने, कधी परीक्षणाने, कधी तोंडी! कधी प्रश्न विचारून, कधी उपरोधाने डिवचून, कधी निखळ शाबासकी देऊन! या अनेक मार्गांनी 'लिहिते रहा' असे म्हणणारे हे माझे वाचक, 'आम्हास आम्ही पुन: पहावे! काढून चष्मा जुना पुराणं!' अशी सतत नव्याने विचार करण्याची प्रेरणा देत असतात. त्यांच्या प्रशंसेच्या उद्‌गारातून मन सुखावते; पण विरोधाच्या धारेमुळे पोहण्याचे बळ मिळते. आज तुमच्या या पत्रामुळे या दोन्ही ध्रुवांतील बऱ्यावाईटाचा लेखाजोखा मनाशी मांडण्याची संधी आली याबद्दल धन्यवाद!

कथा, नाटक, कादंबरी यांच्या वाटेला मी गेले नाही. कधीमधी केलेल्या कवितांमधून दोनतीन कवितासंग्रह जन्माला आले, इतकेच. प्रसिद्धीच्या झगमगत्या वाटा आपल्यासाठी नाहीत ही समज प्रथमपासूनच होती. अशा माफक अपेक्षा असल्याने, नगरमधल्या छोट्या - मोठ्या कविसंमेलनांतून वाचलेल्या या कवितांना मिळालेली 'वाहवा' छान वाटायची. मनातल्या कवयित्रीला या कवितांची जातकुळी सामान्याची आहे, याची जाण होतीच. तरीही 'न पेलणाऱ्या एखाद्या सुराला' कवितेत पकडता आले तर त्याला श्रोत्यांकडून दाद मिळायची. मन सुखावायचे.

यामुळे एक गोष्ट मात्र झाली. मनात वेळी-अवेळी आठवणाऱ्या इंदिरा संत, बा. सी, मर्ढेकर, बा.भ.बोरकर, विंदा करंदीकर इत्यादी थोरामोठ्यांच्या कवितांच्या ओळींप्रमाणे माझ्याच कवितांच्या ओळीही मनात पिंगा घालायच्या. आणि नवोदितांच्या कवितासंग्रहांना प्रस्तावना लिहिताना, 'त्यांच्या मनातील अशा आवडत्या ओळी कोणत्या असतील? हे शोधण्याचा खेळ मनात सुरू व्हायचा आपल्या सारख्याच इतर नवोदितांना व्यासपीठ देण्याच्या कल्पनेतून सहकारी तत्त्वांवर सोळा-सतरा कवितासंग्रहांचे एकत्रित प्रकाशन करण्याचा प्रयोग आम्ही काही प्रौढ प्राध्यापकांनी यशस्वी केला.

प्रा.वा.ल.कुलकर्णी, प्रा. गंगाधर गाडगीळ, प्रा. न. र. फाटक, इत्यादीच्या आधुनिक विश्वात घडलेला माझा साहित्यिक पिंड.' (हा वा.ल.कुलकर्णींचा खास शब्द!) नगरला प्राध्यापकी करण्यासाठी आल्यावर इथल्या संतसाहित्याच्या ब्रह्मांडाचा वेध घेण्यात रंगला. कविसंमेलने, साहित्यचर्चा, शिबिरे इत्यादी निमित्ताने अनेक ठिकाणी हिंडायला मिळाले. त्या त्या ठिकाणी मी वाचलेल्या निबंधांवर प्रतिक्रियांच्या रूपाने मार्गदर्शन मिळाले. ते लेख तद्विषयक ग्रंथांतून प्रकाशित झाले. 'ज्ञानेश्वरी आणि विसावे शतक'' या डॉ. स्नेहल तावरे संपादित ग्रंथातील 'ज्ञानेश्वरीतील नेतृत्वाचे गुण' या लेखाचा परीक्षण लेखात मुद्दाम उल्लेख झाला. 'संत एकनाथ - एक समग्र अभ्यास' या डॉ. अशोक कामत व डॉ. सतीश बडवे यांनी संपादित केलेल्या पुस्तकातील 'नामाचा एका अर्थात एकनाथांचे प्रचारकौशल्य' हा लेख समीक्षक डॉ.प्र.ल.गावडेंना उल्लेखनीय वाटला. ते लिहितात, ''प्रचार कौशल्याच्या एका महत्त्वपूर्ण मुद्द्याच्या आधारे डॉ. लीला गोविलकर यांनी 'नामाचा एका' ही रूढ नसलेली एक नवी वचनोक्ती फार चांगल्या पद्धतीने विशद केली आहे.'' 'श्रीबापरखुमादेविवरां'च्या 'वारीविषयक अंकातील 'फाज वारीचे स्वरूप कसे असावे?' या माझ्या लेखातील विचारांची नोंद डॉ. प्रल्हाद वडेरांसारख्या समीक्षकांनी घेतली. पत्रात ते लिहितात, ''आपण वारीचे जे विकेंद्रीकरण सुचविले आहे ते आजच्या परिस्थितीत अत्यंत उचित आहे.'' पण ते प्रत्यक्ष कार्यवाहीत आणण्याची



धारणा वारकरी समाजाची व्हायला पाहिजे. डॉ. प्र.ल.गावडेंच्या परीक्षणलेखांतील उल्लेखांनी. डॉ. वडेरांच्या पत्रानी, 'आपली विचारांची दिशा योग्य आहे, हे मिळणारे समाधान या वाटेवर चालायला पुरेसे होते. संतसाहित्याच्या संदर्भात, अभ्यासक दृष्टीने उपासकांच्या भावना समजून घेणारा समीक्षक वर्ग मर्यादितच आहे. त्यामुळेच अशा पत्रव्यवहाराचे अप्रुप!'

ग्रंथापेक्षा नियतकालिके व नियतकालिकांपेक्षाही वर्तमानपत्रातील सदर लेखन हे लोकांपर्यंत लवकर पोहाचते, तितक्याच वेगाने ते विसरलेही जाते. पण या प्रकारच्या लेखनाबद्दलच्या प्रतिक्रिया अगदी ताजा ताजा असतात. तरुण भारत (दैनिक) मधल्या 'साहित्यिकी' पेक्षा दैनिक लोकसत्तामधील 'मंथन', 'विचार-सुविचार' ही सदरे सर्वसामान्यापर्यंत मला लवकर घेऊन गेली. एका लेखात मी म्हटले होते - ''श्रीशनिदेवांना आपल्या भक्तांची काळजी आहे. जर महिलावर्ग ओलेत्यांनी ओट्यावर चढून पूजा करू लागला, तर शनिभक्तांचे चित्त विचलित झाल्याशिवाय थोडेच राहिल? म्हणून तर त्यांनी अशी बंदी घातली नसेल?'' यावरची पत्ररूपाने आलेली एक प्रतिक्रिया पुढीलप्रमाणे, ''अंधश्रद्धा निर्मूलनवालेही स्त्री-पुरुषसमानतेच्या अंधश्रद्धेच्या आहारी गेले असावेत!'' जवळजवळ दोन वर्षाच्या कालखंडातील सदरलेखनाने समाजात मला एक वेगळा चेहरा मिळाला.

आज तुमच्या पत्राच्या निमित्ताने 'मागे वळून पाहताना' माझी एक सवय माझ्या लक्षात येतेय.

कुणी मागणी केल्याशिवाय मला लिहायचा मुहूर्त मिळत नाही. मनात खूप विचार असतात. कल्पनाही सुचतात. वाचन हा तर माझा जन्मभराचा विसावा आहे. वर्गात शिकविताना त्याचा मला खूप उपयोगही होतो. पण स्वत: होऊन मी एखाद्या लेखकाला किंवा वर्तमानपत्राला पत्र लिहून माझी पसंती/नापसंती कळविलेली मला आठवत नाही. पण 'भारतीय साहित्यशास्त्र'. 'कार्यालयीन मराठी', 'भाषाविज्ञान' इत्यादी माझ्या पुस्तकांबद्दल येणाऱ्या अभ्यासकांच्या, विद्यार्थ्यांच्या, वर्तमानपत्रातील किंवा नियतकालिकातील प्रतिक्रियांची मी मात्र मनाने अपेक्षा करीत असते. विशेषत: या सगळ्या प्रकारच्या लेखनात मी संस्कृत-इंग्रजीतील उदाहरणांवर अवलंबून न राहता मराठी साहित्यातील उदाहरणांची जी निवड करते, त्याची दखल जेव्हा घेतली जाते. तेव्हा आपल्याला नीटपणे विचार मांडता आलंय याचे समाधान मिळते.

एम्. ए. नंतर डॉक्टरेट करायचे ठरविले. विषय शोधण्यात वेळ जाऊ नये. म्हणून ज्याच्या कुणी फारसे वाटेला गेलेले नाही, असा विषय निवडला. तो म्हणजे 'मराठी व्याकरण' आणि अभ्यास करता करता त्या विषयात मनापासून रमले. हे क्षेत्र तसे दुर्लक्षितच. त्यामुळे महाविद्यालयीन मराठीसाठी त्याच्यावरच्या लेखनाची गरज निर्माण झाली. हा विषय विद्यार्थी-प्राध्यापकवर्ग लक्षात घेऊन लिहिता, लिहिता, न चोखाळलेल्या अनेक वाटा बुद्धीला जाणवायला लागल्या. प्राध्यापक असल्याने विषय मांडण्यात स्पष्टता व सोपेपणा आला. प्रबंधाच्या तोंडी परीक्षेच्या वेळी 'या विषयात संशोधन करणाऱ्या तुम्ही एकट्याच महिला दिसता.' हे डॉ. मंगरुळकरांचे उद्‌गार सुखावणारे व प्रोत्साहन देणार होते. 'आपले असे एक खास क्षेत्र आपल्याला मिळतेय्.' या विश्वासाने मी मराठीचे व्याकरण लिहिले.

या माझ्या पहिल्यावहिल्या पुस्तकावरची 'आलोचने'तील समीक्षा मला विचार करायला लावणारी होती. सबकुछ प्रतिकूलपण वर्गात शिकविताना, माझी विषयाची बैठक पक्की होत होती. अनेक नवे मुद्दे तपशिलात देऊन स्पष्ट करण्याची गरज जाणवत होती. विशेषत: सातशे वर्षांच्या परंपरेत मराठीचे जे खास विशेष प्रस्थापित झालेले आहेत. त्यांच्याकडे लक्ष वेधायचे होते. मेहता प्रकाशनाने ही संधी मला दिली. या प्रकाशनाने हे पुस्तक मराठीच्या सर्व थरांतील अभ्यासकांपर्यंत पोहोचविले आहे. हे त्या त्या क्षेत्रातील अभ्यासकांच्या प्रतिक्रियांवरून लक्षात येते.

मुंबईच्या 'मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात गेल्यावर बी.ए.एम्.ए.च्या विद्यार्थि-प्राध्यापकांच्या वेळोवेळींच्या प्रश्न-स्वागतांनी 'आपण हा दुर्लक्षित विषय निवडल्याने लोकांचे लक्ष वेधून घेऊ शकलो' याचे समाधान मिळाले.

**अनेक नवे मुद्दे तपशिलात देऊन स्पष्ट करण्याची गरज जाणवत होती. विशेषतः सातशे वर्षांच्या परंपरेत मराठीचे जे खास विशेष प्रस्थापित झालेले आहेत. त्यांच्याकडे लक्ष वेधायचे होते. मेहता प्रकाशनाने ही संधी मला दिली. या प्रकाशनाने हे पुस्तक मराठीच्या सर्व थरांतील अभ्यासकांपर्यंत पोहोचविले आहे. हे त्या त्या क्षेत्रातील अभ्यासकांच्या प्रतिक्रियांवरून लक्षात येते.**

विद्यार्थ्यांसाठी केलेले हे लेखन विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमापुरतेच मर्यादित राहिले नाही. ते साचेबंद व रूढ विचारसरणीपेक्षा वेगळे आहे. इंग्रजी-संस्कृतच्या आखीव साच्यातून मराठीकडे पाहण्यापेक्षा मराठीचे खास विशेष सांगण्यावर भर देताना, व्याकरणाच्या रूढ व प्रस्थापित विचारांना धक्के बसणे स्वाभाविकच होते. त्यामुळे प्रस्थापितांचा विरोध मी गृहीतच धरला होता. नंतरच्या काही मराठीच्या व्याकरणलेखनात यापैकी काही मुद्दे स्वीकारलेही गेले 'मराठीच्या

व्याकरणाच्या इतिहासा'त माझ्या पुस्तकातील विचारांची थोडी दखल घेतली गेली. (माझ्या दृष्टीने किरकोळ असलेल्या) चुका उपरोधाच्या सुरात सांगितल्या. जोशी, दामले इत्यादींच्या सामान्यरूप न करण्याच्या माझ्या (अ)सामान्य मराठीबद्दल विरोधी प्रतिक्रिया दिली. पण असे लेखन करण्यामागे काही भूमिका असू शकते. त्या भूमिकेचे खंडन करण्याची गरज समीक्षकांना वाटली नाही. मुख्यत: माझ्या भूमिकेबद्दल मला काहीच मार्गदर्शन होऊ शकले नाही.

अगदी अलिकडे 'भाषा आणि जीवन'च्या एका अंकांतही या माझ्या व्याकरणाच्या पुस्तकावर परीक्षण आले. परीक्षणकाराचा व्याकरणाच्या क्षेत्रातील अधिकार मानण्यासारखा आहे. परीक्षण तसे मुद्द्याला धरून होते. पण गैरसमज व पूर्वग्रहदूषितता यामुळे माझ्या व्याकरणविषय भूमिकेचे निरपेक्षपणे मूल्यमापन झाले नव्हते. त्यांच्या या परीक्षणलेखाला मी 'पुन: एकदा व्याकरण वाचून उत्तरही तयार केले होते. पण ते फारच विस्तृत वाटले. म्हणून तो खटाटोपच सोडून दिला. पण ही व्याकरण विषयक माझी भूमिका विशद करण्याची संधी 'भाषा आणि जीवन'मध्ये एका मराठीच्या व्याकरणाच्या पुस्तकाच्या परीक्षणाच्या निमित्ताने मला मिळाली. सुरवातीला अंधुकपणे जाणवलेल्या मराठी व्याकरणातील मुद्द्याच्या गाभ्यापर्यंत जाण्याची संधी या परीक्षणामुळे मला साधता आली.

नवीन विचारांच्या वाट्याला पुष्कळदा उपेक्षा येते, किंवा त्यांच्याकडे दुर्लक्षच होते. मला माझ्या व्याकरणाच्या पुस्तकाच्या संदर्भात या विरोधी/प्रतिकूल प्रतिक्रियांचे त्याचसाठी आभार मानावेसे वाटतात.'

'भाषा आणि जीवन'मधल्या माझ्या या परीक्षणलेखाची नोंद घेणारी काही पत्रे माझ्याकडे आहेत. त्यापैकी मुंबईच्या डॉ. अलका मटकरांचे पत्र प्रातिनिधिक म्हणून सांगता येईल. त्या पत्रात लिहितात,

''आपल्याला पत्र लिहिण्याचे कारण म्हणजे अगरी आम्ही बी.ए - वर्गापासून आपले 'मराठीचे व्याकरण' हे पुस्तक सोबत घेऊनच वाटचाल करीत आलो आहोत. व्याकरण म्हणजे मुळात काय? त्याचे विषय-उपविषय आपल्या या ग्रंथातून जितक्या सहजपणानं, स्पष्टपणानं विद्यार्थ्यांना समजतात तितके अन्य ग्रंथांतून समजत नाहीत. पुढे एम्.ए.ला व्याकरणांतल्या समस्यांना सामोरे गेलो तरीही एका हाताशी आपलेच पुस्तक होते. आमच्या माजी मराठी विभागप्रमुख डॉ. उषाताई देशमुख आपल्याविषयी आम्हास भरभरून सांगायच्या.

'भाषा आणि जीवन' २००४च्या अंकाला आपला प्रा. परब यांच्या व्याकरणाच्या पुस्तकावरचा शास्त्रशुद्ध अभ्यासपूर्ण लेख वाचताना असे वाटत गेले की आपल्या व्याकरणावरील पुढील ग्रंथांची अभ्यासकांना नितांत गरज आहे. आपल्या नव्या ग्रंथांची वाट पाहात आहोत.

अशी पत्रे मनाला खूप हुरूप देतात. मनावर उत्साहाची झुळूक येते. अशाच उत्साहाच्या झुळका गौरवग्रंथासंबंधीच्या पत्रांनी अनुभवायला मिळाल्या. त्यापैकी औरंगाबादच्या प्रा. वसंत / दीक्षितांचे पत्र प्रातिनिधिक म्हणून उल्लेखिता येईल. ते लिहितात,''...अचानक 'समीक्षा-विविधा' तुमच्याविषयीचा गौरवग्रंथ (पाहून) सुखद स्मृती मनात रेंगाळायला लागल्या. ...कवयित्री, समीक्षक, जनसमुहात वावरणाऱ्या साहित्यिका, सांस्कृतिक क्षेत्रात निरलसपणे काम करणाऱ्या, विद्वान असूनही विद्वत्तेचा बडेजाव न दाखविणाऱ्या,...मुंबईहून येऊन नगरसारख्या शहर-खेड्याला सुसंस्कृत बनविण्यात अखंड मग्न असणाऱ्या....

अशा पत्रातील खरेखोटे कळण्याची क्षमता आपल्यात असते. पण तरीही लोकांना आपल्याबद्दल व आपल्या लेखनाबद्दल असे काही वाटते हे वाचून आनंद न होणे अस्वाभाविक आहे. पत्राचा मायना आहे, 'evergreen', ५/६ वर्षापूर्वी निवृत्त झाल्यानंतरही आपल्या लेखन कामातील ही evergreen वृत्ती दुसऱ्यांनी लक्षात घेतलेली पाहून मन सुखावणे हा मनुष्यस्वभाव आहे.

पत्रे जतन करून ठेवणे (व मोकळ्या वेळात, त्यांचे रवंथ करीत आनंदी होणे) हा माझा स्वभाव नाही. तुमचे लेखनाविषयीचे पत्र आल्यानंतर मात्र जी चार-दोन पत्रे हाताशी लागली त्यांच्या आधारे वाचकऋण फेडण्याची संधी घेत आहे.''

**''आपल्याला पत्र लिहिण्याचे कारण म्हणजे अगरी आम्ही बी.ए - वर्गापासून आपले 'मराठीचे व्याकरण' हे पुस्तक सोबत घेऊनच वाटचाल करीत आलो आहोत. व्याकरण म्हणजे मुळात काय? त्याचे विषय-उपविषय आपल्या या ग्रंथातून जितक्या सहजपणानं, स्पष्टपणानं विद्यार्थ्यांना समजतात तितके अन्य ग्रंथांतून समजत नाहीत. पुढे एम्.ए.ला व्याकरणांतल्या समस्यांना सामोरे गेलो तरीही एका हाताशी आपलेच पुस्तक होते.**

व्यंकटेश, प्रोफेसर कॉलनी,
अहमदनगर






## आहे ऋणाईत मी

**उज्ज्वला केळकर**

*सोना भेटली. आवडली. जाण्यापूर्वी जे गणाचं आहे, ते त्याला देऊन टाकायचं ही भूमिका, त्यातली प्रांजळता आणि मनात येईल ते पुढाकार घेऊन करायचं धाडस हे सर्वच आवडलं. कथेची मांडणीसुद्धा. तेव्हा तुमचं अभिनंदन, मनापासून.*

***आपला,***
***व. पु. काळे***

*स्त्री मासिक - ऑक्टोबर १९७८, पान एकवीस*

माझी पहिलीच कथा 'सोना' प्रसिद्ध झाली आणि हे पत्र आलं. सुंदर हस्ताक्षरातलं, कलात्मक मांडणी असलेलं देखणं पत्र. दर्दी रसिक व. पु. काळे यांचं पत्र. वाचून आभाळ ठेंगणं झालं, असं नाही, मनच आभाळ झालं. मनात आलं, कथालेखनाच्या अनोळखी वाटेवर आपली पावलं नव्हे, बोटं बऱ्यापैकी वळताहेत तर... म्हणजे पुढेही ती वळवायला आणि आळवायला हरकत नाही. पत्र कुणाचंही असतं तरी आनंदच झाला असता. पण व. पु. या जाणकाराचं असल्याने आनंदाबरोबरच आत्मविश्वास आणि उत्साह वाढला. सृजनाला टॉनिकच मिळालं जणू!

ही कथा आवडल्याची दहा-बारा पत्रं आली. टी. व्ही. चा इडियट बॉक्स आपल्यापुढे प्रेक्षकांच्या नजरा खिळवून ठेवण्याच्या आधीचा तो काळ.

निदान मध्यमवर्गीय पांढरपेशा मंडळींना तरी रिकामपणाचा फावला वेळ फुरसतीने वाचन करण्यात घालवण्याची सवय होती. आपल्या आवडीनावडी, प्रतिक्रिया तत्परतेने लेखका-प्रकाशकापर्यंत पोहोचवण्याची संवेदनशीलता आणि उसंत होती. आजच्या इतका आयुष्याला वेग आलेला नव्हता. साहित्याच्या माध्यमातून वाचकांपर्यंत पोचल्यावर पत्ररूपाने आलेल्या त्यांच्या प्रतिक्रिया लेखनाची निकड जागवून गेल्या होत्या.

कॉलेजमध्ये असताना कविता लिहीत होते. ते वयच काहीसं रोमँटिक असण्याचं. थोडं कल्पनेनं जगण्याचं. प्रत्यक्ष प्रेमापेक्षा प्रेमाच्या कल्पनेवर प्रेम करण्याचं. अशरीरी, प्रेम, प्लेटॉनिक लव्ह वगैरे वगैरे शब्द विचारांनी भारलेलं. माधव ज्युलियन, पाडगावकर, कुसुमाग्रज, इंदिरा संत यांच्या विरह वेदनेच्या कवितांवर भाळलेलं. म्हणजे 'काढ सखे गळ्यातील' पासून 'आठवणीच्या जुन्या पुलावर' सारखे अनेक अनेक अनुभव मनोमनी अनुभवलेले. त्यातच काव्यप्रेमी मित्र-मैत्रिणींचा ग्रुप. त्यामुळे एकमेकींशी संवाद करायचा तोही कवितेमधून.

एके दिवशी अशरीरी प्रेमाचं खांडेकरी सूत्र घेऊन विरह वेदना व्यक्त करणारी कथा लिहिली. एस. वाय. बी. ए. ला डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे मराठी शिकवायचे. स्पष्टवक्तेपणाबद्दल त्यांची दांडगी ख्याती. म्हणून मी मझी कथा त्यांना वाचायला दिली. माझी कथा परत देताना ते म्हणाले, 'उचल तुझे कागद. काही लिहायचे असेल, तर पुस्तक परीक्षणं लिही. समीक्षा लिही.'

त्यांचं म्हणणं असं की त्यामुळं अभ्यासाची सवय लागते. परीक्षेच्या दृष्टीने पुस्तकांवर आपले विचार मांडता येणे महत्त्वाचे. पु. ग. सहस्रबुद्धे यांनी माझी कथा वाचली की नाही, हे मला कधीच कळलं नाही. पण त्यांच्या एकूण व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव आणि दरारा असा की माझं साहित्यविषयक गद्यलेखन समीक्षेतूनच सुरू झालं.

कवितेची मुळात असलेली आवड. नंतर प्रा. अनुराधा पोतदार कॉलेजमध्ये आल्यानंतर विद्यार्थिनीच्या नात्याने त्यांच्याशी आलेला संपर्क यामुळे कवितेचा इवलासा का होईना झरा, हळू हळू झुळझुळत होता.

१९६३-६४ साली 'माणूस' मधून एका पृष्ठावर कविता प्रसिद्ध होत व त्या कवितांबद्दलचं आस्वादक विवेचन देत. त्यावेळी गोपीनाथ तळवलकरांनी माझं इतकं कौतुक केलं होतं की कविता विसरावी आणि दादच याद रहावी. 'अशा पहाटे' ही कविताही 'माणूस' मध्ये आली. पुढे दहाबारा वर्षांनी वामन देशपांडे एकदा घरी आले. 'अशा पहाटे' ही कविता ऐकवली. वामन देशपांडे म्हणाले, ''ही कविता तुमची नाही. तुम्हाला आवडलेली कविता म्हटलीत का?'' मी म्हटलं, ''नाही! कविता माझीच आहे!'' ते म्हणाले, ''मी ही मागेच वाचलीय.'' त्यांनी चक्क माझीच कविता पुन्हा मला ऐकवली. मी वाङ्मयचौर्य केलं असावं, असा संदेह त्यांच्या दृष्टीत; तर माझी कविता कुणी कुठे खपवली, या विचाराने मी अस्वस्थ.

मग त्यांना विचारलं, ''माणूस'मध्ये तुम्ही वाचलीत का ही कविता?''

''असेल, पण कवयित्रीचं नाव वेगळं होतं हे मला नक्की आठवतंय!''

''मी तेव्हा उज्ज्वल केळकर नव्हते. कुमुदिनी आपटे होते.''

आजही वामन देशपांडे यांना ती कविता पाठ आहे. तसंच गोपीनाथ तळवलकरांच्या आस्वादक समीक्षेचे संस्कार कळत नकळत झाले.

लग्नानंतरही कवितेचा झरा अगदी अस्फुटसा पण झुळझुळत राहिला. स्त्री, किर्लोस्कर, नवयुग आणि रविवार पुरवण्या यातून माझ्या कविता येत. किर्लोस्करमधील 'पेपर' ही कविता वाचून श्री. विनायक कुलकर्णी यांनी गडहिंग्लजहून पत्र लिहिलं. '' 'पेपर'मधील कल्पना इतकी वास्तववादी आहे की मनाला चटका लावून न गेली तरच नवल! कवितेतील प्रत्येक शब्द अर्थपूर्ण आहे.'' तर 'परीचा गाव' ही कविता वाचून वि. वा. मिराशी या ७० वर्षांच्या गृहस्थांनी आपल्या नातवंडांना ती आवडल्याचं फोंडाघाटहून कळवलं होतं.

पुढं माझा 'चंद्रपालखीची वाट' हा कवितासंग्रह प्रकाशित झाला. कविमित्र गो. स. चरणकर यांनी कळवलं, 'आपली शब्दकळा व प्रतिमाविश्व निखालस वेगळे आहे. शब्दगर्भातून उमलणारी भावना अतिशय तेजस्वी व प्रकाशमान आहे.' पद्मा गोळे यांनी लिहिलं - 'स्त्रीला उत्कटपणे जाणवणारं भावविश्व, प्रणय, वात्सल्य इ. तसंच व्यवसायातील तडजोडीतले कोमल क्षण तुम्ही उत्कटपणे, जाणतेपणे टिपले आहेत. तुमची चिंतनशीलताही जाणवते.'

खारेपाटणचे श्री. शरद काळे यांनी लिहिलं, 'तुमच्यातला अस्तित्वशोधक कलावंत, हळवाईने हरपल्या अगर वांछित चांदणस्वप्नांचे वेध घेताना जाणवला.'

अर्थात सर्वच प्रतिक्रिया काही अशा 'गुडी...गुडी...' नव्हत्या. तरी अपेक्षाही नव्हतीच. संजीवनी मराठे यांनी 'वृत्तावर हात बसायला हवा. वैयक्तिकाकडून सामूहिकाकडे नकळत जायला हवं. त्या दोहोंचं बेमालूम मिश्रण व त्यातून सौंदर्यप्रत्यय घडायला हवा.' अशी सूचना केली. शंकर रामाणी यांनीही 'अभ्यास, चिंतन अधिक हवे' अशा अर्थाचा अभिप्राय व्यक्त केला.

कवी सुधांशु यांच्यावरील लेख प्रसिद्ध झाल्यावर त्यांचेच पत्र आले. 'हा लेख म्हणजेदेखील एक कविताच आहे. त्यातील भाषा काव्यमय आहे. रचनेत सौष्ठव आहे. शब्दात नाद आहे. कवितेसारखंच तुमचं गद्यलेखनही सुंदर कसं?''

या दरम्यान अनेक ललित-वैचारिक-सामाजिक-शैक्षणिक विषयावरचे लेख लिहिले.

'रियाद'- सौदी अरेबिया येथून शरद पाटील यांनी आमच्या सगळ्या मित्रमंडळींत 'परक्याचं पोर' या कथेचं वाचन केलं असं कळवलं.

**एक पत्र आलं 'फ्रॉम'म्हणून लंडनचा पत्ता. लंडनला आमचं कुणीच नसल्यामुळे चुकून दुसऱ्या कुणाचं तरी पत्र असावं असं वाटलं. पण नाव-पत्ता माझाच होता. उत्सुकतेने लिफाफा उघडला. लंडनहून अनंत साठे यांनी 'परक्याचं पोर' ही कथा आवडल्याबद्दल कळवलं होतं.**

त्याचवेळी एक पत्र आलं 'फ्रॉम'म्हणून लंडनचा पत्ता. लंडनला आमचं कुणीच नसल्यामुळे चुकून दुसऱ्या कुणाचं तरी पत्र असावं असं वाटलं. पण नाव-पत्ता माझाच होता. उत्सुकतेने लिफाफा उघडला. लंडनहून अनंत साठे यांनी 'परक्याचं पोर' ही कथा आवडल्याबद्दल कळवलं होतं.

मी लिहिलेल्या व छापून आलेल्या कथा त्यांच्याकडे पाठवणं नंतर स्वभाविकच होतं. माझ्या कथांचं पुस्तक काढावं अशी, त्यांची आग्रहाची पत्रं यायची. पण त्यांच्याशी संपर्क होता, त्या पाच-सात वर्षात माझा कथासंग्रह निघाला नाही. आता चार कथासंग्रह निघालेत. तर माझ्या कथांवर प्रेम करणाऱ्या या स्नेह्याशी संपर्क उरला नाही.

माझे एकूण चार कथासंग्रह प्रकाशित झाले. तीन गंभीर कथांचे तर 'फास्ट फूड' हा विनोदी कथांचा. त्यातील 'फास्ट फूड'ही कथा 'स्त्री'च्या सप्टेंबर ९५ च्या अंकात प्रसिद्ध झाली. त्यावर अहमदाबाद येथून सुशिला जोशी यांचं पत्र आलं. त्यांनी ही कथा गुजराथीत अनुवादित करण्याची इच्छा प्रदर्शित केली. 'खूब सुंदर और विचारोत्तेजक रचना पढकर पत्र लिखनेका मोह रोक न सकी. अति आधुनिक तेज रफ्तारवाली जिंदगी के रवैये को आपने बडे ही मनोरंजक ढंग से प्रस्तुत किया है.'

विनोद निर्मळ आणि मार्मिक असल्याचं वि. वा. शिरवाडकरांनी कळवलं. तर 'कृष्णस्पर्श' मधील 'डेथ डे' ही कथा वाचून सुभाष भेंडे यांनी लिहिलं, 'विषय अंगावर येणारा. मराठी कथाविश्वात तरी सॅडिस्ट माणसाची इतकी खळबळजनक कथा दुर्मिळ!'


स्पर्श, सोना, हसीना, कृष्णस्पर्श, मुखवटा सगळ्याचं कथांमधलं वैशिष्ट्य उलगडत त्यांनी शेवटी लिहिलं,

'तुमच्याकडे बुजुर्ग समीक्षकाचं अजून लक्ष कसं गेलं नाही?'

या प्रश्नाचं उत्तर मला माहीत आहे. सहजपणे लक्ष जावं इतकं विपुल लेखन माझ्याकडून झालं नाही. जे थोडं फार लेखन झालं, लेखनाच्या वाटेनं जेवढं पुढं जाता आलं, तेही रसिक वाचकांच्या कौतुकाच्या पाठबळावरच!

म्हणून त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना म्हणावंसं वाटतं - 'आहे ऋणाईत मी.'

१७६/२, गायत्री,
फ्लॅट नं. १२, चव्हाण कॉलनी,
साखर कारखान्यासमोर,
सांगली ४१६ ४१६.




## टॉनिक्स...अँटिबायॉटिक्स...

**यशोधरा भोसले**

**प्रा**णी आहे. पण यातल्याच एखाद्याच्या अंगात लिखाणाचा 'व्हायरस' शिरला की त्याचा होतो लेखक! असा 'इन्फेक्शन' झालेला माणूस मग आपल्या कळपापासून दुरावतो. तो होतो एकटा...अंतर्मुख, आत्मकेंद्रित आणि अप्पलपोटा!

लेखन हेच आपल्या जीवनाचे ध्येय आणि फलित असे मानून तो जगत राहतो.

सच्च्या लेखकाची हीच भूमिका असावी असे मला मनापासून वाटते. शिवाय लेखकाने निर्मिती केल्यानंतर त्या साहित्यकृतीपासून संपूर्णत: अलग व्हावे कारण प्रत्येक साहित्यकृती ही स्वत:च्याच अवकाशात जगणारी, एकात्म, संपूर्ण, स्वायत्त व स्वतंत्र अशी जिवंत कलाकृती असते. ती लिहून पूर्ण झाली की लेखकाने पुन्हा तिच्या मोहात पडू नये. वाचकानुनय करत परिसंवाद, चर्चासत्रे, मुलाखती (साहित्य संमेलनातल्या!) अशा फंदात पडू नये अशा मताची मी आहे. म्हणून २००३ साली 'बंजाऱ्याचे घर' हे माझे ललित लेखनाचे पहिले पुस्तक प्रसिद्ध झाले तेव्हा त्याबद्दल पोटात बरीच धाकधूक असूनही वाचकांच्या अभिप्रायांविषयी मी फारशी काळजी किंवा पर्वा केली नाही.

पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे लवकरच या पुस्तकाबद्दल वाचकांची पत्रे यायला सुरुवात झाली. यात म. द. हातकणंगलेकर, सोमनाथ कोमरपंत, सरोजिनी वैद्य, सुनीलकुमार लवटे अशा ज्येष्ठ व विद्वान मंडळींची कौतुकभरले आशीर्वाद देणारी पत्रे होती. लहानपणी ज्यांच्या अनेक फौजदारी खटल्यांच्या कथा वाचत आम्ही उन्हाळ्याची सुट्टी घालवायचो त्या बाबा कदमांचे कोल्हापूरहून आलेले पत्र बघून मी थक्क झाले होते.

मराठी साहित्य व समीक्षेत मोलाची कामगिरी करणाऱ्या या मंडळींबरोबर रत्नागिरी, बीड, बार्शी, मंगळवेढा, लातूर अशा दूरच्या ठिकाणांहूनही अनोळखी वाचकांनी पत्रे पाठवून या लिखाणाला मनापासून दाद दिली. यात वाचनालयात वर्गणी भरून पुस्तकांसाठी नंबर लावून ती मिळवणारे, आपल्या मित्रमंडळीत त्यावर चर्चा करणारे व सामूहिकपणे वाचन करणारे असे वाचकही होते. अशा वाचकांना 'सर्वसामान्य' म्हणणे ही किती मोठी चूक आहे हे त्यांनी मला शिकवले.

हे सगळे होत असताना एक रुखरुख मला सतत लागून राही. लहानपणी ज्यांनी आमच्यावर कला व साहित्याचे संस्कार करून आमची अभिरुची अक्षरश: घडवली ते माझ्या शाळेचे प्राचार्य श्री. चित्तरंजन पाठक हे पुस्तक पाहू शकले नव्हते. पाठकसर शाळेत अतिशय कडक शिस्तीचे भोक्ते. पण तेवढेच कलाप्रेमी, साहित्याचे मर्मज्ञ-वाचक होते. ते स्वत: उत्तम लेखक होतेच पण निवृत्तीनंतर माझ्या आईच्या (लेखिका श्रीमती माधवी देसाई) अनेक कथांचे गुजराथीत भाषांतर करून त्यांनी त्या 'अखंड आनंद'मध्ये प्रसिद्ध केल्या होत्या. माझे पुस्तक त्यांनी बघायला हवे होते, त्यांना कोण आनंद झाला असता! शेवटी एके दिवशी धीर करून पुस्तक मी त्यांच्या पत्नी श्रीमती नलिनीबेन यांना बडोद्याला पाठवले. आणि बाईंनी माझ्या विनंतीनुसार पुस्तकातली अर्पणपत्रिका, मनोगत व 'माहेर' हा लेख वाचून उत्तर पाठवले, ते गुजराथीतून!

'तारी सरळ भाषा, शैली अने रजूआत सुंदर छे. प्रथम प्रयत्नेच तने सफलता मळी छे, ते अभिनंदनीय छे. आमच हमेशा लखती रहे अने प्रगती करती रहे एवी अंतरथी शुभेच्छा पाठवू छूं.'' म्हणजे माझे मराठी लिखाण त्यांनी प्रयत्नपूर्व वाचून काढले. कुठे शब्द अडले पण अर्थ कळायला त्यांना कोणतीही अडचण आली नाही आणि त्यांचे गुजराथी वाचताना मलाही कुठे अडले नाही. पाठकसरांनी बांधलेला गुजराथी-मराठीचा पूल अशा रीतीने आम्हाला पुन्हा जोडून गेला.

असेच एक पत्र माझे मराठीचे शिक्षक आणि स्वत: उत्तम साहित्यिक असणाऱ्या श्री. गोपाळराव टोकेकरांचे आले. ''सोसावं सगळ्यांनाच लागतं. प्रत्येकाच्या दु:खाच्या परी वेगळ्या असतात. वेदनेतूनच नवनिर्मिती होत असते. असं चार भिंतीआड शिकवताना खूप सोपं वाटत होतं. तेव्हा तुम्हा चिमुरड्यांना ते कितपत कळत होतं त्याबद्दल तेव्हाही खात्री नसायचीच. पण तुझ्यासारख्या कित्येकांना ते कळत होतं आणि आयुष्यात स्वतंत्रपणे जगायला ते उपयुक्त ठरलं असं आता वाटतंय.'' भरभरून कौतुक व आशीर्वादही या पत्रातून त्यांनी दिले आहेत. पण इथे एका उत्तम जाणकार साहित्यिक-शिक्षकाने आपल्या नवोदित लेखिका-विद्यार्थिनीशी, मधले पिढीचे अंतर पुसून टाकून एक सहकंप व सहवेदनेचे नवे नाते प्रस्थापित केले हा त्यांचा मोठेपणा!



या पुस्तकावर अनेक प्रतिक्रिया आल्या, आजही त्या येतच आहेत. पण त्यातच एका व्यक्तीची प्रतिक्रिया अशीही होती, ''या पुस्तकाला खरं तर कितीतरी पुरस्कार मिळायला हवे होते. नाही ना मिळाले, सो सॅड यशू!'' इथे कुणाला हव्यास आहे पुरस्कार सोहळ्यात मिरवून घेण्याचा? एवढ्या मोठ्या साहित्यिक आणि गुरुवर्यांचे आशीर्वाद भक्कमपणे पाठीशी उभे असताना आणि कसले 'ॲवॉर्ड' आणि 'रिवॉर्ड' पाहिजेय कुणाला? सो सॅड, नां?

ज्या उत्तममामा राठोडांमुळे मला हक्काचे घर मिळाले ते उत्तममामाही हे पुस्तक बघू शकले नाहीत; पण त्यांची पत्नी उमाताईंचे आशीर्वादाचे पत्र आले. ''उत्तमचं उत्तम चित्रण केलं आहेस. त्याचं चालणं, बोलणं, हसणं, ऑफिसचा परिसर अगदी हुबेहूब माझ्या डोळ्यांसमोर उभा आहे...त्यातली तीन घरं मला परिचित आहेत आणि बाकीच्या अपरिचित घरातही मी रमले. तुझं लिखाण मला खूप आवडलं. तू उत्तमला 'बंजाऱ्याच्या घरा'त दाखल करून त्याचं ऋण फेडलंस! अशीच खुब लिहित जा.'' या अंतरंगातली कळ कशी अचूक त्या अंतरंगापर्यंत पोचली याची ही पोचपावतीच!

नागपूरच्या किशोर गलांडे यांचेही एक अतिशय सुंदर, सुवाच्य पत्र आले. ''बंजाऱ्याचे घर' वाचल्यावर आमचं बालपणी रहात असलेलं रेल्वे क्वार्टर आतून बघायला गेलो. तिथे रहात असलेले गृहस्थ म्हणाले, ''यशोधरा भोसल्यांचं बंजाऱ्याचे घर वाचलंत?''

अशी कितीतरी पत्रे...आणि त्यातल्या गंमती!

आत्ता मी अगदी शांतपणे हे लिहीत आहे. पण हे प्रत्येक पत्र आले तेव्हा तो लिफाफा बघून मी थरारून गेलो होते, त्या पत्राची घडी उलगडताना मला धडधड होत होती. त्या ओळी वाचताना कितीकदा माझे डोळे भरून येत होते. माझ्या जवळपास अशी माणसे होती, आहेत की ज्यांनी माझ्या लिखाणाबद्दल विनोबाजींच्या पावलावर पाऊल टाकून कडक मौनच पाळले आहे. तर काही अशीही की जी, ''तुझं काही बाई सगळंच वेगळं, उच्चच अगदी, आम्हाला काही ते समजत नाही बाबा.'' असा पवित्रा घेऊन मला पार भुईसपाट करून मोकळी झाली. अजिबात पर्वा करायची नाही हे ठरलेले असूनही असे वाक्य वार करून जातेच. आता हळूहळू याचीही सवय व्हायला लागली. म्हणून वाचकांची पत्रे माझ्या लेखी मोलाची आहेत.

'अपूर्व, अलौकिक, एकमेव...' या व्यक्तिचित्रणात्मक लेखांच्या पुस्तकावर तसेच मराठीतून शालेय शिक्षण घेतलेल्या व आता कॉलेजमध्ये 'टूरिझम मॅनेजमेंट' शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लिहिलेल्या 'प्रवास पर्यटनाचे नवे पैलू' या पुस्तकांवरही वाचकांचे अभिप्राय येऊ लागले आहेत.

म्हणजे कसेही असो, तक्रार करणारे वा कौतुकाचे गोड शब्द घेऊन येणारे, ते यायलाच हवे. हौशी वाचक, अगदी सदाशिव पेठेतलेसुद्धा, आपली प्रतिक्रिया नोंदवून ठेवल्याशिवाय लेखकाला काही सोडत नाहीत. ही त्यांची हौस अशीच उत्स्फूर्तपणे कायम राहो. आपल्याकडे वाचकांना 'सर्वसामान्य' वगैरे म्हणण्याची एक वाईट पद्धत आहे. कारण तो गल्ली बोळा-चाळीत राहणारा, सार्वजनिक वाचनालयातून पुस्तके मिळवून वाचणारा, साहित्यसंमेलनांना उत्साहाने लाखोंच्या संख्येने हजर राहणारा माणूस असतो ना! पण हाच माणूस मोठ्या उत्साहाने वाचतो, अतिशय संवेदनशीलपणे वाचतो आणि ते आवडले की स्वखर्चाने पत्र वा फोन करून अभिप्राय देतो, कौतुक करतो, प्रसंगी भेटवस्तू, मिठाईही पाठवून स्वत:ची नोंद घ्यायला लावतो. कोल्हापूरच्या प्रतिभा आळतेकर, नागपूरच्या उद्योजिका उषाताई राणा या अशा जातकुळीच्या वाचक आहेत. ज्यांच्या जिवावर आज हा सगळा साहित्याचा व्यवहार सुरू आहे, त्यांना 'सर्वसामान्य' कसे म्हणता येईल? ते आहेत म्हणून आपण आहोत हे लेखकांनी कधीही विसरून चालणार नाही. फक्त माझ्यापुरते बघायचे तर वाचकांची पत्रे माझ्या लेखी किती मोलाची, महत्त्वाची आहेत हे मला खरोखरी नेमक्या शब्दांत सांगता येणार नाही. मला सतत उत्साही व शक्ती पुरवणारी ती 'टॉनिक्स' आहेत. पण कधी अतीच झाले तर ठोकून बरोब्बर जागच्या जागी ठेवणारी 'ॲंटिबायॉटिक्स'ही आहेत. म्हणून वाचकाचे पत्र अगदी साध्या कार्डावर चार ओळींचे असले तरी ते मी खजिन्यातल्या अमूल्य रत्नासारखे संभाळून ठेवते.

**आपल्याकडे वाचकांना 'सर्वसामान्य' वगैरे म्हणण्याची एक वाईट पद्धत आहे. कारण तो गल्ली बोळा-चाळीत राहणारा, सार्वजनिक वाचनालयातून पुस्तके मिळवून वाचणारा, साहित्यसंमेलनांना उत्साहाने लाखोंच्या संख्येने हजर राहणारा माणूस असतो ना! पण हाच माणूस मोठ्या उत्साहाने वाचतो, अतिशय संवेदनशीलपणे वाचतो आणि ते आवडले की स्वखर्चाने पत्र वा फोन करून अभिप्राय देतो, कौतुक करतो, प्रसंगी भेटवस्तू, मिठाईही पाठवून स्वतःची नोंद घ्यायला लावतो.**

परवा नव्या पुस्तकाबद्दल चर्चा करताना मनोज (आचार्य) नेहमीच्या उत्साहाने म्हणाला, ''आता पुढच्या पुस्तकांवर आपण तुमचा पत्ता, फोन आणि ई-मेलही देऊ या.''

आता ते केल्यामुळे काय काय घडेल या विचाराने माझी सध्या झोप उडालेली आहे.

१२/अे, रेशम अपार्टमेंट्स,
सात बंगला, वर्सोवा,
अंधेरी (प) मुंबई - ६१

# झेप...



यतीन तांबे १११७
डॉ. दीपा साठ्ये १२३
चारुदत्त आफळे १२६
पंकजा वल्ली १३१


# ... नव्या क्षितिजाची

आज अनेक नवनवीन कार्यक्षेत्रे निर्माण होत आहेत.
'मागील पानावरून पुढे चालू'असा दृष्टिकोन न ठेवता
सर्वस्वी नवी क्षेत्रे ,नवी क्षितिजे धुंडाळणारी
कितीतरी प्रतिभावान व्यक्तिमत्त्वे
समाजात वावरताना दिसतात.
इतरांपेक्षा वेगळा मार्ग निवडणाऱ्या
व्यक्ती समाजाला प्रवाहित करीत असतात.
प्रगतीचे एक नवे दालन खुले करीत असतात.
वेगवेगळ्या क्षेत्रात नव्या वाटा धुंडाळणाऱ्या
काही प्रतिभावंतांच्या या कहाण्या...
तरुणाईला नवे मार्ग दाखवणाऱ्या...

# झेप... ...नव्या क्षितिजाची

**मशीनचा डॉक्टर : यतीन तांबे**
**शब्दांकन : सुनीता दांडेकर**



**‘फ्रिक्शन वेल्डिंग’ या भारतात सर्वस्वी नवीन टेक्नॉलॉजी मध्ये स्वत: असंख्य प्रयोग करून या क्षेत्रातील ‘अव्वल’ स्थानावर पोहोचलेल्या यतीन तांबे यांची ही संघर्ष गाथा**

आपला मुलगा डॉक्टर किंवा इंजिनियर व्हावा असं बहुतेक सगळ्याच मध्यमवर्गीय आई-वडिलांना वाटत असतं. मुलांच्याबाबतीत त्यांच्यासमोर असलेला तो एक चकाकता दीपस्तंभ असतो. आज या शिक्षणाच्या शासनानं आणि महाविद्यालयांनी बाजार केला आहे. पण तरीही लागेल तेवढा पैसा उभा करून इंजिनियरिंग शिक्षणाकडेच प्रत्येकजण धावतो आहे. याचं स्पष्ट कारण टेक्निकल शिक्षणाचं आजच्या आधुनिक युगात वाढलेलं महत्त्व. परंतु केवळ इंजिनियरिंगची डिग्री मिळवली म्हणजे आजच्या युगातल्या टेक्नीकल विश्वात तुम्ही संचार करू शकताच असं नव्हे. हे विश्व जिंकायचं असेल तर हवी त्यातील सखोल ज्ञान चिकित्सक वृत्तीनं मिळवण्याची तयारी. त्यासाठी अथक परिश्रम करण्याची संशोधक बुद्धिमत्ता.

या क्षेत्रात नव्यानं स्वतंत्रपणे वाट चालत असलेले पुण्याचे यतीन तांबे हे अशा संशोधक वृत्तीचे आणि जिद्दीचे मूर्तिमंत प्रतीक आहेत. दिखाऊपणापेक्षा मूळातून ज्ञान मिळवण्याचा संस्कार व्यक्तीला कसा उंचीवर नेतो हेच त्यांच्या यशप्रवासावरून दिसून येते.

बेताची आर्थिक परिस्थिती असलेल्या यतीन यांचे आई-वडील, मोठी बहीण, धाकटा भाऊ एवढं कुटुंब. वडिलांचा घड्याळ दुरुस्तीचा व्यवसाय.

यतीन यांचा पुढील शिक्षणाचा प्रवास हा थोडा थांबत थांबत झाला. दहावीला ७७ % मार्कस् मिळाले. अभ्यासापेक्षा खेळाकडे अधिक ओढा होता. नवीन कॉलेज, नवीन मित्र, कॉलेज लाईफ आणि अभ्यासाकडे पुरेशा गांभीर्यानं न पाहिल्यामुळे १२वीला गणितात चक्क नापास!

घरची परिस्थिती बेताची. धाकटा भाऊही हुषार. त्याला मार्कस् चांगले मिळाले. तेव्हा आता आपण घरचा घड्याळ दुरुस्तीचा व्यवसाय करत रहायचे आणि भावाला शिकवायचे असेच ठरवून टाकलेले. त्यावेळी वडिलांनी ठाण्याला बदलून जाण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे त्यांनीही लगेच शिक्षणाबद्दल काही विचारले नाही. एक वर्षभर यतीनने दुकान सांभाळले. सर्व स्थिरस्थावर झाल्यावर वडिलांनी पुन्हा ॲडमिशन घेण्यास सांगितले. खरे म्हटले तर तेव्हा यतीनला शिकायचे नव्हते! एक वर्ष गॅप आणि बारावी नापास अशा स्थितीत कशाला शिकायचे? असे त्याला वाटत होते. पण त्याच्या वडिलांचा मुलांनी डिग्री मिळवण्याबाबत विशेष आग्रह होता. त्यामुळे आपल्या गावातच कुर्डूवाडीला ॲडमिशन घेतली. त्यावेळी विषय निवडताना यतीनने बायॉलॉजीची निवड केली नाही. सहा महिन्यांनी वडिलांना हे समजल्यावर कॉलेजमधील एक शिक्षक आणि वडिल यांनी खूप लेक्चर दिले. बारावीमध्ये गणितात सतरा मार्कस् मिळविणारा तू, इंजिनियर होऊ शकणार आहेस का? ते तुला शक्य आहे का? असे शिक्षकांनी विचारले.

खरं म्हटलं तर त्या शिक्षकाचं हे वाक्यच जणू यतीनच्या मनोवृत्तीला वेग देणारं ठरलं. जिद्दी व्यक्तीच्या जिद्दीला कोणीतरी

पेटवणारा लागतो. ते काम या वाक्यानं केलं. यतीनने फक्त सहा महिने अभ्यास करून गणितात ९८ % मार्कस् मिळवले!

आता पुन्हा ॲडमिशनचा प्रश्न उभा राहिला. त्याचवेळी धाकटा भाऊही चांगल्या मार्कांनी बारावी पास झाला. त्याला मेडिकलला प्रवेश घ्यायची इच्छा होती. पण सोय म्हणून इंजिनियरिंगकडेही फॉर्म भरलेला होता. यतीनने ठरवून टाकलं की आपण परत घड्याळाचं दुकानच पहायचं आणि भावाला शिकवायचं. दुर्दैवाने किंवा सुदैवाने त्याला मेडिकलला प्रवेश मिळाला नाही. दोघांसाठी फीचे पैसे जमा करणे वडिलांना अशक्य होतं. पण तरीही दोघांनाही शिकवायचं हे वडिलांनी पक्क ठरवलेलं होतं. आपल्या मित्राकडून पैसे आणण्यासाठी यतीनला जाण्यास सांगितलं. यतीन पुण्यात त्याचा मित्र रणजित कोप्पीकर याच्याकडे आला. तेथून पैसे आणण्यासाठी मुंबईला जायचे होते. पण रणजितच्या वडिलांनीच पैसे दिले. घरी पोहोचल्यावर पाहिलं तर घरात सर्वजण आनंदात आहेत. वडिलांनी सांगितलं की, ''तुमच्या दोघांच्या ॲडमिशन झाल्या आहेत.''

''कशा काय?''

कॉलेजच्या प्रिन्सिपॉलनी (मादनाईक) सांगितले की, ''मला तुमची दोन्ही मुलं माझ्या कॉलेजमध्ये हवी आहेत. तुम्ही काही काळजी करू नका. मी एकाची फी भरतो!''

कॉलेज शिक्षण सुरू असताना वडील खूप आजारी पडले. त्यांना पॅरालिसिसचा ॲटॅक आला. ते जवळजवळ तीन महिने हॉस्पिटलमध्ये होते. त्यांच्याजवळ सतत रहावे लागल्यामुळे अभ्यास करायला वेळ मिळाला नाही आणि यतीन वर पुन्हा एकदा नापासचा शिक्का बसला!

थोडे स्थिरस्थावर झाल्यावर वडिलांनी सांगितले, ''आता सहा महिने अभ्यास करून राहिलेल्या विषयांच्या पुन्हा परीक्षेस बस.'' पण सहा महिने फुकट घालवण्यापेक्षा कुठेतरी ट्रेनिंग घ्यावे असे यतीनला वाटत होते. त्यासाठी यतीन पुण्याला आला. खडकीला मित्राकडे राहून ट्रेनिंगसाठी कोणत्या कंपनीत जाता येईल का याचा प्रयत्न करू लागला. अनेक ठिकाणी खेटे मारले, पण काम काही होईना. शेवटी एका मित्राच्या वडिलांमुळे इलेक्ट्रॉनिका मशिन टूल्स लि. या कंपनीत प्रवेश मिळाला. परंतु, तिथे ट्रेनिंग मिळेल पण स्टायपेंड वगैरे दिला जाणार नाही असे सांगितले. पण मिळालेल्या संधीचा फायदा घेण्याचे यतीनने ठरवले आणि इलेक्ट्रॉनिकामध्ये दाखल झाला.

त्यावेळी त्याची स्थिती अत्यंत बिकट होती. खिशात फक्त १० रु. घेऊन त्याने पुणे गाठले होते. वडिलांनी पैसे पाठवणे शक्य नाही असे कळवले. खडकीला मित्राकडे राहून तेथून पुणे-सातारा रोज असा रोजचा सायकल प्रवास सुरू झाला. दररोज ट्रेनिंगनंतर लक्ष्मीरोडला प्रत्येक घड्याळाच्या दुकानात जायचे आणि काम मिळवण्याचा प्रयत्न करायचा. पार्टटाइम नोकरीसाठी अशी अनेक दिवस वणवण करूनही नोकरी काही मिळेना. शेवटी एक दिवस असाच नोकरी मागायला पूना वॉच कंपनीत गेला असताना त्यांनी विचारले, ''तू कोण? कुठला?'' ''मी कुर्डूवाडीगावचा. आणि बोलता बोलता ओळख निघाली आणि ती पार्टटाइम नोकरी त्या ओळखीच्या जोरावरच मिळाली. झाले! सकाळी साडेसहा-सात वाजता खडकीवरून सायकलने निघायचे ते पुणे-सातारा रोडवरील इलेक्ट्रॉनिकात दिवसभर ट्रेनिंग. पाचसाडेपाच वाजता सातारारोडवरून निघून लक्ष्मीरोडवर पूना वॉच कंपनीत रात्री साडेआठ-नऊ पर्यंत पार्टटाइम नोकरी. परत नऊ वाजता सायकलवरून खडकीपर्यंत असा प्रवास सुरू झाला. तीनसाडेतीन तासाच्या नोकरीत असे किती पैसे मिळणार? जेमतेम एकवेळच्या जेवणाचे पैसे मिळत.

परिस्थिती बिकट होती. पण मनात काम करण्याची आचही तेवढीच तीव्र होती. जे काम करायचे ते मन लावून करायचे हा संस्कार होता. त्यामुळे इलेक्ट्रॉनिकात ट्रेनिंग पूर्ण व्हायच्या आधीच कंपनीच्या मालकांनी (प्रकाश रत्नपारखी) सांगितले, ''तुझे काम चांगले आहे. तू बी.ई. झालास की लगेच जॉईन हो!''

यतीनने ट्रेनिंग पूर्ण केले. परीक्षा दिली. चांगल्या मार्कांनी (with distinction) पास झाला आणि परिक्षेच्या आधीच रत्नपारखींचे जॉईनिंग लेटर हातात होते.

इलेक्ट्रॉनिका जॉईन व्हायचा निर्णय घेतला कारण दुसरा कुठला पर्याय नव्हताच.

पण आता खडकीला मित्राकडे जेवणासह रहाणे योग्य वाटत नव्हते. सहा-साडेसहा महिने मित्राने मदत केली होती. पण त्याच्यावर भार होऊन राहणे मनाला पटत नव्हते. मग सुरू झाला जागेचा शोध. खूप खटपटीनंतर शेडगे लॉजमध्ये जागा मिळाली आणि जेवणासाठी खानावळही! थोडाफार दिनक्रम सुरळीत झाला. अगदी निकडीवर असलेल्या आर्थिक प्रश्नांची थोडीफार सोडवणूक झाली. आणि मग सुरू झाली. नवीन काहीतरी शोधण्याची, आव्हानं स्वीकारण्याची स्वत:ला शोधत जाण्याची धडपड.

इलेक्ट्रॉनिकातल्या तीन-साडेतीन वर्षांत यतिनने सगळ्या डिपार्टमेंटमध्ये काम केले. प्रत्येक डिपार्टमेंटमधल्या कच्च्या-पक्क्या दुव्यांचंही निरीक्षण केलं आणि कोणाला जमणार नाहीत अशी काही कामंही आपणहून आव्हान स्वीकारून यशस्वी करून दाखवली. करिअरच्या या सुरुवातीच्या टप्प्यात यतीन खूप काही शिकला. त्याला चांगले अधिकारी भेटले आणि कामाची आच असेल तर कुठेही यश मिळतं याचं प्रत्यंतर याच टप्प्यात त्याला अनुभवायला मिळालं.

या शिदोरीवर त्यानं पुन्हा बाहेरच्या जगात पाऊल टाकलं. अधिक पैसा आणि बुद्धीला अधिक चालना देणाऱ्या कामासाठी!

लेवल टेक या नवीन कंपनीत डेव्हलपमेंट डिपार्टमेंटला रुजू झाल्यावर कंपनीचे सर्व प्रॉडक्टस समजण्यासाठी मालकांनी एक महिना प्रॉडक्शन डिपार्टमेंटला पाठवलं. लेवल टेक ही कंपनी प्रोसेस कंट्रोल इक्वीपमेंटस् बनवीत असे. त्या कंपनीच्या प्रॉडक्शन मॅनेजरचे काम समाधानकारक नव्हते. मालकाशी त्यांचे खटके उडत - आणि त्या महिन्यातच ते प्रॉडक्शन मॅनेजर सोडून गेले.



मालकांनी यतीनलाच विचारले की तू प्रॉडक्शन मॅनेजर म्हणून काम करायला तयार आहेस का? क्षणाचाही विलंब न करता यतीनने होकार दिला. आणि प्रत्यक्ष उत्तम रिझल्टसाठी थोडा वेळ देण्याची विनंती केली. मालकांनी ती मान्य केली.

थोड्या दिवसांतच यतीननं कामाचं स्वरूप बारकाईनं अभ्यासलं. कोणत्या गोष्टीमुळे प्रॉडक्शनचा वेग कमी पडतो हे शोधून काढलं.

तेथे कामाची शिस्तबद्धता नव्हती. तेथे एक मोठी रॅक होती व त्याच्या वेगवेगळ्या कप्प्यात अधर्वट केलेले जॉब पडलेले होते. एखादी असेम्ब्ली करून मटेरियल मिळाले नाही की ते तसेच अर्धवट ठेवून दिलेले होते. नवीन कामाच्या वेळी परत नवीन मटेरियल मागवले जायचे.

त्यावेळी साधारणपणे महिन्यात १ ते १॥ लाखापर्यंत प्रॉडक्शन होत असे. यतीनने ८ जूनला चार्ज घेतला. तेव्हापासून त्यानं रॅकमध्ये पडलेली सर्व अर्धवट कामे, लागेल तेवढेच मटेरियल मागवून पूर्ण करून घेतली. कामात शिस्त आणली आणि याचा परिणाम म्हणजे ८ जून ते ३१ जून या काळात प्रॉडक्शन ९.३३ लाखावर गेलं!

मालकांना आश्चर्याचा धक्काच बसला. यतीननं नक्की काय जादू केली हे त्यांनाही कळलं नाही.

अशा तऱ्हेनं इलेक्ट्रॉनिकात रिसर्च अँड डेव्हलपमेंटमध्ये अनुभव मिळाला तर लेवल टेक मध्ये प्रॉडक्शन डिपार्टमेंटचा अनुभव मिळाला. या कंपनीत यतीननं लवकरच प्रॉडक्शनवर संपूर्ण ताबा मिळवला आणि अत्यंत यशस्वी प्रयोग केले. त्याचा परिणाम म्हणून १-१॥ वर्षांत त्याला २/३ वेळा प्रमोशन आणि भरपूर पगारवाढ मिळाली.

पण एका जागी थांबणं हा यतीनचा स्वभावच नव्हता. एखादी गोष्ट आत्मसात केली की त्याची नजर अजून पुढच्या ध्येयावर खिळलेली असायची. संपूर्ण आत्मीयतेनं काम करायचं पण विश्वासला, आत्मसन्मानाला थोडाजरी ओरखडा पडला तरी तो सहन करायचा नाही असा स्वभाव. त्यामुळे तडकाफडकी लेवलटेक सोडून पुन्हा नवीन संधीचा शोध सुरू झाला.

लेवल टेकमध्ये असतानाच वर्षापूर्वी फिलिप्सला एक इंटरव्ह्यू झाला होता. त्याची आठवण झाली आणि यतीननं फिलिप्सला फोन लावून चौकशी केली. तिथे असं कळलं की त्याची निवड झाली होती. पण त्यानं घर बदलल्यामुळं संपर्क होऊ शकला नव्हता!

या सगळ्या प्रवासात यतीनला वारंवार वाटत होतं. आपण स्वत:चाच काहीतरी व्यवसाय सुरू करावा. पण पुन्हा फिलिप्ससारखी संधी समोर आल्यावर त्याचा फायदा घ्यायचा त्यानं ठरवलं.

फिलिप्समध्ये यतीनला लाऊडस्पीकर डेव्हलपमेंटमध्ये नियुक्त केलं गेलं. आत्तापर्यंत लाऊडस्पीकर डेव्हलपमेंटबद्दल यतीनला काहीच माहिती नव्हती. अनुभव नव्हता. म्हणजे पुन्हा एक नवं क्षेत्र, नवं आव्हान!

क्षेत्र नवं असलं तरी कामाचा सखोल, सूक्ष्म अभ्यास आणि नवनिर्मितीची उत्कट इच्छा या गोष्टी माणसाला यश देतात. यतीननं पद्धतशीरपणे अभ्यास करत चार इंची स्पीकर बनवला जो इतर स्पीकरपेक्षा अधिक सुपिरिअर होता.

या स्पीकरचं प्रॉडक्शन करण्यासाठी त्याची ट्रायल घेतली गेली. परंतु, प्रॉडक्शनमधील काम करणाऱ्या व्यक्तींची 'बदल नको' ही वृत्ती आड आली. पण यतीननं माघार घेतली नाही. ह्या स्पीकरचं उत्तमप्रकारे प्रॉडक्शन होईल अशी त्याला खात्री होती. मालकांनी सांगितलं की तू बंगलोरला जा. तेथे फिलिप्सचे सबकॉन्ट्रॅक्टर आहेत, त्यांच्याकडे जर हा स्पीकर स्वीकारला गेला तर तेथे याचं प्रॉडक्शन करू. यतीननं ते मान्य केलं. बंगलोरला जाऊन त्यानं त्याचं यशस्वी प्रॉडक्शन केलं. त्याला मिळालेला प्रतिसादही अभूतपूर्व होता.

या मोठ्या यशानंतर फिलिप्समध्ये परत काही नवीन करावं असं त्याला वाटू लागलं. पण मोठ्या कंपनीत असलेलं वातावरण या नवीन बदलाला, नवीन आव्हानांना पोषक नव्हतं.

पुन्हा एकदा यतीननं बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. पुन्हा काही दिवस एका दुबईस्थित व्यक्तीची संपूर्ण फॅक्टरी चालवायला घेतली. व्हिडीओ कॅसेट तयार करण्याची ती फॅक्टरी होती. सर्व मशिन्स अत्यंत अत्याधुनिक होती. कोणतीही माहिती नसताना हळूहळू मशीनचा अभ्यास करत करत यतीननं ती सुरू केली आणि कॅसेट निर्मितीमध्येही यशस्वी टप्पा गाठला. पण तरीही मनातली अस्वस्थता लपत नव्हती. अजूनही आपला योग्य मार्ग सापडला आहे असे यतीनला वाटत नव्हते.

अशावेळी त्याची मेंगाळेंशी गाठ पडली. यतीनची कोणत्याही प्रकारचं काम करण्याची क्षमता आणि नवीन काहीतरी करण्याची महत्त्वाकांक्षा त्यांनी जोखली आणि एका संपूर्ण नवीन क्षेत्राची दारं त्याच्यापुढं उघडली!



त्यांनी एक फ्रिक्शन वेल्डिंगचं मशीन आणलेलं होतं. फ्रिक्शन वेल्डिंगही एक नवीन टेक्नॉलॉजी आहे. ती भारतात फारशी लोकप्रिय नाही. पण युरोपियन देशात ही टेक्नॉलॉजी लोकप्रिय आहे.

फ्रिक्शन वेल्डिंग म्हणजे कोणतेही वेल्डिंग रॉड अथवा मटेरियल न वापरता कोणताही धातू कोणत्याही धातूला जोडणे. हा जोड मूळ धातूंपेक्षाही मजबूत असतो. ही टेक्नॉलॉजी ऑटोमोबाईल, इलेक्ट्रिकल, ॲग्रिकल्चर, एरोस्पेस, न्युक्लीयर, हायड्रॉलिक अशा अनेक प्रकारच्या विभागातील वेगवेगळे जॉब बनवण्यासाठी वापरता येते. ही टेक्नॉलॉजी वापरून असे जॉब कमी किमतीत (गुणवत्ता राखून) करता येतात.



**फ्रिक्शन वेल्डींग मशीन**

युरोपात गेले असताना मेंगाळेंनी एक फ्रिक्शन वेल्डिंगचे मशीन पाहिलं. ऑटोमोबाईल क्षेत्रातील असल्याने त्यांनी विचार केला की फ्रिक्शन वेल्डिंग करून बरेचसे ऑटोमोबाईल कंपोनंट्स बनवता येतील आणि त्यात पैसेही वाचवता येतील. त्यांनी ते मशीन आणलं. त्या मशिनची माहिती देणारा जर्मन माणूसही बरोबर आणला. त्यानं मशीन जोडून दिलं. चालू करून दिलं. जॉबही करून दाखवले. तो माणूस परत गेल्यावर आठ दिवसांनी मशीन बंद पडलं. एवढ्या प्रचंड मोठ्या आणि किमती मशीनला हात लावायला कोणी धजत नव्हतं. त्यामुळं दोन वर्षे ते मशीन पडून होतं. मेंगाळेंना यतीनबद्दल खात्री वाटली की हा हे मशीन नक्की चालू करेल!

यतीनला तोपर्यंत फ्रिक्शन वेल्डिंग म्हणजे काय याची सुतराम कल्पना नव्हती. तरीही मेंगाळ्यांनी त्याला अतिशय आकर्षक ऑफर दिली.

ते म्हणाले, ''हे मशीन चालू कर. मला ऑटोमोबाईल कंपोनंटसच्या निर्मितीचा मोठा व्यवसाय उभा करायचा आहे. फ्रिक्शन वेल्डिंग करणारे पुण्यात काय भारतातही कोणी सापडेल असं वाटत नाही. तू मशीन पहा, जॉब कर, त्याच मार्केटिंगही पहा. सर्व गोष्टी तू सांभाळ. ही एक मोठी संधी तुला द्यावी असे मला वाटत आहे!''


यतीनला त्यांनी आकर्षक आर्थिक संधी दिल्या आणि संपूर्ण स्वातंत्र्य देऊ केलं.

एका संपूर्णपणे नव्या क्षेत्रात पुन्हा एकदा यतीननं प्रवेश केला. फ्रिक्शन वेल्डींग म्हणजे काय, ते कशाप्रकारे काम करतं, कोणकोणत्या प्रकारचे जॉब त्यावर करता येतात याचा बारकाईनं शोध सुरू झाला. यतीननं मेंगाळ्यांना सांगितलं की, ''मी हे मशीन नक्की चालू करेन, जॉबही करेन - पण पुढील दोन वर्षांत माझ्याकडून यातून फायदा होईल अशी अपेक्षा बाळगू नका. कारण ही टेक्नॉलॉजी पूर्णपणे नवीन आहे. मला ती आधी शिकली पाहिजे. समजून घेतली पाहिजे. ग्राहकांना ती वापरण्यातले फायदे पटवून देता आले पाहिजेत. हे सर्व करून सेटअप बसायला वेळ मिळाला पाहिजे.'' मालकांनी होकार दिला.

आणि हा मशीनचा डॉक्टर मग या मशीनला जणू तपासू लागला. प्रथम त्याचा सारा टेक्निकल डाटा त्याने जमा केला आणि मशीन चालू करायचं ठरवलं. चालू करण्यापूर्वी काय केलं असेल तर प्रथम मशीन फडकं घेऊन पुसायला घेतलं - यतीनचं म्हणणं असं की, जेव्हा आपण मशीन पुसतो तेव्हा मशीनच्या प्रत्येक पार्टवर लेबल लिहिलेल्या असतात. सेन्सर असेल तिथे सेन्सर नं. लिहिलेला असतो. प्रत्येकवेळी पुसताना त्या सगळ्या गोष्टी डोक्यात फिट बसत जातात. प्रत्येक गोष्टीचा उपयोग, त्याचं काम हे मनात पक्कं होत जातात.

त्यामुळे कोणाही नोकराला न सांगता स्वत:चं मशीन स्वत: पुसणंच यतीन पसंत करतो. अशाप्रकारे मशीन सुरू केलं. मशीन सुरू झालं, पण एका ठराविक ठिकाणी ते थांबत असे. त्या ठिकाणी ते मशीन का थांबत होतं, याचं कारण कोणाला सापडत नव्हतं. यतीननं त्याचा पिच्छा पुरवला, त्याच्या लक्षात आलं की सर्कीटमध्ये फिडबॅक दिलेला असतो, एखादी ॲक्शन आपण सुरू केली तर ती ॲक्शन पूर्ण झाल्यावर पुढच्या ॲक्शनसाठी मशीनला तसा फिडबॅक द्यावा लागतो. त्या ठराविक ठिकाणी मशीनला फिडबॅक मिळत नव्हता. फिडबॅक का मिळत नाही याचा शोध घेत असता असं लक्षात आलं की त्या ठिकाणी प्रेशर खूप कमी आहे. प्रेशरची लेव्हल ॲडजस्ट केल्यावर संपूर्ण मशीन चालू झालं. मशीनला काही झालेलं नव्हतं.

मशीन तर चालू झालं, पण फ्रिक्शन वेल्डिंगचा मुख्य उपयोग कोणतेही दोन वेगवेगळे धातू एकमेकांना जोडणे. यातील बारकावे



अजून माहीत नव्हते. तयार केलेले जॉब तुटता कामा नयेत. प्रत्येक धातूचे पॅरामिटर्स असंख्य. दोन धातूंचे कोणते पॅरामिटर्स एकमेकांना मॅच होतील हे शोधणे म्हणजे गवतातून मोहरीचा दाणा शोधण्यासारखंच कर्मकठीण!

अशातऱ्हेचे पॅरामिटर्स कोणीही देत नाही. कोणतीही कंपनी मशीन कशासाठी वापरणार, जॉब कोणते करणार हे विचारते व त्याप्रमाणे पॅरामिटर्स सेट करून देत असते.

मग यतीननं एक उद्योग सुरू केला. बाजारातून धातूंचे तुकडे आणायचे. ते अनेकदा जोडून पाहायचे. त्याची निरिक्षणं नोंदवायची आणि पॅरामिटर्स लिहून काढायचे. या अथक परिश्रमानं त्यानं जवळजवळ नेहमी लागणारे पॅरामिटर्स मिळवले.

आता प्रत्यक्ष काम करण्याचा आत्मविश्वास आला आणि प्रथम काम मिळालं तेही अत्यंत कठीण! ॲल्युमिनियम आणि कॉपर यांचा जोड करण्याचं.

ज्या अनेक धातूंच्या जोडाचे प्रयोग केले त्यातला फक्त ॲल्युमिनियम आणि कॉपरचाच जोड यशस्वी झाला नव्हता आणि पहिलं काम आलं तेही त्याच धातूंचं!

जॉबचं सगळं मटेरियल येऊन पडलं. ट्रायल घेतल्या. पण यश येईना. जोड पडल्यावर तुटू लागला. प्रचंड दडपण आलं. पुन्हा झटून शोध घेणं सुरू झालं. कुठेच काही संदर्भ मिळेना. एका मासिकात फक्त एक फोटो मिळाला. त्या फोटोखाली त्यासाठी - लागणारा फोर्स लिहिलेला होता. त्यावरून विचार करता करता असं लक्षात आलं की या फोटोप्रमाणे शेप घेतल्यानंतर जॉब बनू शकेल. पुन्हा ट्रायल सुरू झाल्या. अनेक ट्रायल करून झाल्यावर अखेर यश मिळालं आणि तो जॉब पूर्ण करून दिला.

पहिलं काम यशस्वीपणे केल्यावर यतीनचा आत्मविश्वास खूप वाढला. त्यानं अनेक धातूंच्या जोडांवर प्रचंड प्रयोग केले आणि कोणाकडेही नसेल असे पॅरामिटर्स टेबल तयार केले.

एकदा एका फ्रिक्शन वेल्डिंगमध्ये डॉक्टरेट केलेल्या व्यक्तीची यतीनशी गाठ पडली. त्याला वाटले आपण त्यांच्याकडून अधिक काही शिकून घ्यावे.

यतीनचं काम पाहिल्यावर ते म्हणाले, ''अरे यतीन, मी माझ्या आयुष्यातील सर्वात मोठी कामगिरी म्हणून ॲल्युमिनियम कॉपरचा जोड बनवलेला एक पीस माझ्याकडे जपून ठेवला आहे. पण तू तर हे काम सहजपणे करतो आहेस!''

एकदा हॉटेल ताजमहलमध्ये इंडियन मशिन टूल्स असोसिएशनने एक इंटरनॅशनल सेमिनार आयोजित केला होता. त्या सेमिनारला जगभरातले तज्ज्ञ येणार होते. त्या सेमिनारमध्ये फ्रिक्शन वेल्डिंगवरही एक लेक्चर होतं. यतीनने त्या सेमिनारला जायचे ठरवलं.

सेमिनारच्या दोन दिवस आधी समजलं की फ्रिक्शन वेल्डिंगचं लेक्चर रद्द झालं. मेंगाळे म्हणाले, ''यतीन, तूच हे लेक्चर दे!''

इंटरनॅशनल सेमिनारमध्ये फ्रिक्शन वेल्डिंगवर लेक्चर द्यायचं हा विचार यतीनसाठी एक झटका होता. पण त्यानं त्याचीही तयारी दाखवली.

दोन दिवसात स्लाईडस् तयार केल्या. ऐनवेळी तयारी करून तीनशे-साडेतीनशे व्यक्तींसमोर यशस्वीपणे लेक्चर दिलं. नंतर अनेक सेमिनार्सची आमंत्रणं आली.

आता मात्र आपण स्वत:चं काहीतरी सुरू करावं असं यतीनला प्रकर्षानं वाटू लागलं. पण २/२।। कोटींचं मशीन घेणं केवळ अशक्य होतं. स्वत:चा व्यवसाय करावा असं वाटत होतं. पण त्यासाठी सोसावी लागणारी आर्थिक असुरक्षीतता कशी पेलावी हा प्रश्न होता. एखादी चांगली ऑफर आली तर स्वीकारावी का स्वीकारू नये हे ठरवता येत नव्हतं - अशा अस्थीर मनस्थितीत घराची संपूर्ण जबाबदारी यतीनच्या पत्नीनं स्वीकारली आणि त्याला संपूर्ण स्वातंत्र्य दिलं. कोणत्याही आर्थिक अडचणींचा विचार न करता स्वत:च्या भव्य स्वप्नांची पूर्ती करण्यासाठी त्याने सर्व ताकदीनिशी उतरावं असं तिनं सांगितलं. तिनं अत्यंत योग्य वेळी भक्कम असा नैतिक आणि आर्थिक आधार दिला. या आधारामुळे आपलं ध्येय गाठणं यतीनला सोपं झालं.

अशावेळी एक संधी चालून आली. एका कंपनीचा वरीष्ठ अधिकाऱ्याशी यतीनचे जवळचे स्नेहसंबंध होते. ती व्यक्तीही प्रयोगशील होती. त्यांनी एक अत्यंत वाईट स्थितीतील, कोणीही चालवू शकणार नाही असं, जणू भंगार बनलेलं इंपोर्टेड मशीन यतीनला देऊ केलं, ''यावरून काही काम करू शकत असलास तर बघ.''

यतीनला जणू परमानंद झाला. कारण कितीही वाईट स्थितीतलं मशीन उत्तम स्थितीत आणण्याची जणू जादूच त्याच्याकडं होती.

अत्यंत अल्प किमतीत ते मशिन यतीननं खरेदी केलं. संपूर्ण मशिन उघडून आवश्यक ते सर्व बदल करून घेतले. सर्व सुधारणा केल्या आणि मशीन चालू केलं व कामंही सुरू केली.






**फॅक्टरी**

आज भारतात फ्रिक्शन वेल्डिंग करणारी माणसं नाहीत. त्यामुळं यतीनकडे प्रचंड काम आहे. आपल्या स्वतंत्र व्यवसायाची अधिक शिस्तबद्ध पायाभरणी करण्यासाठी त्यानं आपला मित्र अतुल जोशी याला भागीदार करून घेतले. आज तो प्रॉडक्शन पाहतो. अजून एक अत्याधुनिक मशिन यतीननं खरेदी केलं. कामाचा व्याप आज प्रचंड वाढला आहे.

यतीनच्या संपूर्ण प्रवासात त्यानं सतत स्वत:च्या निर्मितीक्षमतेसाठी नवनवीन क्षेत्रं शोधली. आज स्वत:चा कारखाना असतानाही त्याला असे वाटते की आज फ्रिक्शन वेल्डिंगमध्ये कोणीही प्रतिस्पर्धी नाही. कदाचित उद्या असे प्रतिस्पर्धी निर्माण होतील. त्यावेळी फक्त जॉबवर्कवर अवलंबून न राहता स्वत:चं मशीन आपण तयार करावं. यासाठीची तयारी आजच सुरू केलेली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर ज्याप्रमाणे मशीनचे सर्व कंट्रोल कॉम्प्यूटराइज्ड असतात, त्याप्रमाणे त्याने आपल्या मशीनमध्ये सर्व अत्याधुनिक कंट्रोल निर्माण केले आहेत. त्यानुसार बदल करून घेतले आहेत आणि पुढील काळात आंतरराष्ट्रीय स्तरावर अत्युच्च ठरेल असं संपूर्ण भारतीय फ्रिक्शन वेल्डिंग मशीन आंतरराष्ट्रीय बाजारात आणण्याचं त्याचं स्वप्न आहे. पुढील ४।। ते ५ वर्षातच हे स्वप्न पुरं होईल. स्वत:चा व्यवसाय सुरू करून केवळ २।। ते ३ वर्षांत हा एवढा मोठा पल्ला यतीननं गाठला आहे तो केवळ नवनिर्मितीच्या स्वत:तील उर्जेला सतत चेतवत राहिल्यामुळंच.

अत्यंत कठीण आर्थिक परिस्थितीतून जागतिक स्पर्धेत उतरण्यापर्यंतचा यतीनचा हा प्रवास थक्क करणारा आहे. केवळ उच्च शिक्षण महत्त्वाचं नसून ज्ञानाची तीव्र आस आणि शोध घेत नवीन निर्मितीसाठी अखंड परिश्रम हेच यशाचं रहस्य आहे. इंजिनियरिंगच्या कोणत्याही एका शाखेत स्वत:ला न बांधता इलेक्ट्रॉनिक्स, हायड्रोलिक्स, मेटलर्जी, मेकॅनिकल अशा विविध शाखांचा सखोल अभ्यास हे यतीनच्या वेगळेपणाचं गमक आहे.

---

यतीन तांबे
फ्रिक्शन वेल्डींग टेक नॉलॉजीज
एफ २, विष्णू-मालती इंडस्ट्रियल इस्टेट, सर्व्हे नं.७७,
एन.डी. ए. रोड, शिवणे, पुणे - ४११०२३

# झेप...

## पुण्यातल्या पहिल्या मेडिको कॉस्मेटिक सेंटरच्या निर्मात्या: डॉ. दीपा साठये

# ...नव्या क्षितिजाची



**आरोग्यशास्त्र व सौंदर्यशास्त्र याचा सुयोग्य मेळ घालून 'आरोग्यदायी सौंदर्यवर्धन' ही संकल्पना दृढ करणारे 'श्यून मेडिको कॉस्मेटिक सेंटर 'स्थापन करणाऱ्या डॉ. दीपा साठये यांच्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील भरारीचा हा आलेख**

स्वत:च्या सौंदर्याची जाणीव मुलींना बालवयापासूनच झालेली असते. मात्र निसर्गत: लाभलेल्या सौंदर्याला अजून खुलवण्यासाठी मेकअप, आभूषण, वेगवेगळ्या प्रकारच्या सौंदर्य प्रसाधनांचा व नवनवीन डिझाईनच्या ड्रेसेसचा वापर केला जातो. बरेचदा खरे सौंदर्यवर्धन कसे केले जाते हे माहीतही नसते, किंवा त्याबद्दल ज्ञानही नसते. ह्याचबरोबर वेगवेगळ्या प्रसारमाध्यमातून मिळणारे अपुरे ज्ञान, जाहिरातींचा मारा, ह्यामुळे चुकीच्या आणि अयोग्य सौंदर्यप्रसाधनांचा वापर होतो व त्वचेला खूप हानी पोहोचते. आमच्याकडे येणाऱ्या अशा प्रकारच्या पेशंटचा वाढता आकडा हाच ह्या गोष्टीचा पुरावा आहे.

मूळची मी मुंबईची. १९९० साली पुण्यातून होमिओपॅथीची डिग्री घेतली. केवळ कुतूहल आणि आवड म्हणून सौंदर्यशास्त्राचे अभ्यासक्रम केले. शिकत असतानाच असं लक्षात आलं की या शाखेत खूप अपूर्णता आहे, खूप वरवरचे आहे. एवढ्याने ब्युटी पार्लरकडे येणाऱ्या स्त्रियांचे प्रश्न मनासारखे सोडविले जात नसावेत. हे शास्त्र वैद्यकशास्त्रावर आधारित ठेवले तर अधिक उपयुक्त ठरू शकेल.

माझ्या डोळ्यासमोर माझी भूमिका जास्त स्पष्ट दिसू लागली होती. शरीर आणि सौंदर्यशास्त्र यांचे अभ्यासक्रम चालवणाऱ्या 'सिडेस्को' या आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध असणाऱ्या संस्थेच्या परीक्षेस मी १९९३ मध्ये बसले आणि प्रथम क्रमांक मिळवला. सिडेस्कोचे मुख्य कार्यालय झुरिक (स्वित्झरलंड) येथे असून ३४ देश त्याचे सदस्य आहेत.

'आरोग्यदायी सौंदर्यवर्धन' हीच संकल्पना मनात ठेवून 'श्यून मेडिको - कॉस्मॅटिक सेंटर'ची निर्मिती झाली. 'श्यून'हा जर्मन शब्द असून त्याचा अर्थ 'सुंदर' असा होतो. तर 'श्यून' हे केवळ ब्यूटी पार्लर नसून हे अेक मेडिको-कॉस्मॅटिक सेंटर आहे. एक डॉक्टर आणि स्त्री या दोन्ही भूमिकांतून मला सौंदर्यवाढीसाठी आरोग्याची काळजी आवश्यक वाटते. आजच्या गतिशील जीवनात सातत्याने वाढणारे मानसिक, शारीरिक ताण त्वचाविकारांना पूरक ठरतात. त्यामुळेच सौंदर्यशास्त्राला वैद्यकदृष्ट्या शास्त्रीय ज्ञानावर आधारित गोष्टींचा वापर करणे गरजेचे आहे. 'आरोग्यदायी सौंदर्यवर्धन' हे खऱ्या अर्थाने तेव्हाच साकार होईल.

१९९३ साली सुरू झालेले श्यून पुण्यातले पहिले असे क्लिनिक की जिथे एकाच ठिकाणी सौंदर्यवर्धनासाठी पार्लरच्या सर्व सुविधा होत्याच व त्याचबरोबर वैद्यकीय पाठबळही उत्तम दर्जाचे होते. 'आमच्या'ह्या केंद्रात जेव्हा मी म्हणते तेव्हा ह्यातून आम्ही अनेक तज्ज्ञ संघटित काम करतो हे स्पष्ट होते. मी त्वचा व केसांच्या तक्रारींसाठी होमिओपॅथिक औषधे देते तर, अनुभवी ॲलोपॅथिक डरमॅटोलॉजिस्टही कॉस्मॅटिक सर्जरी, व सर्व प्रकारच्या त्वचारोगांवर औषधोपचारही करतात. केसांसाठी आयुर्वेदिक व

पंचकर्म औषधांचा पद्धतीचा जास्त चांगला उपयोग होतो म्हणून वैद्यही आमच्या पेशंटना सल्ला देतात कित्येक त्वचेच्या तक्रारी ह्या केवळ आहारात योग्य तो बदल केल्यास बऱ्या होतात, त्यासाठी आहारतज्ज्ञाचीही गरज आम्हाला भासते. ह्या विविध उपचारपद्धतींचा गेली १२ वर्षे आम्ही यशस्वीरीत्या समन्वय साधून आहोत. (२००२ साली कर्वेरोडवर मोठ्या वास्तूत स्थलांतर करून अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज 'श्यून' आत्मविश्वासाने




**सिडको इंटरनॅशनल जी.एस.ई. प्रोग्रॅम ऑस्ट्रेलिया (१९९८)**

कार्य करीत आहे.)

'सिडेस्कोच्या' आंतरराष्ट्रीय परीक्षकमंडळावर १९९४ मधे माझी निवड झाली. अशी निवड होणारी मी पहिलीच भारतीय होते.

माझ्या बरोबरीच्या डॉक्टर मित्रमैत्रिणींमधे मी हे क्षेत्र निवडल्याबद्दल त्यावेळी बरीच नाराजी होती, ''डॉक्टर असून पार्लर काय चालवते'', ''मेडिकलची अेक सीट वाया घालवली'' अशा प्रकारच्या बऱ्याच प्रतिक्रिया आल्या.

आपल्या देशात एका विवाहित स्त्रीचे करीअर हे तिच्या जोडीदारावर खूप अवलंबून असतं. माझ्या व्यावसायिक यशाचे बरेचसे श्रेय माझे पती डॉ. राम साठ्ये यांना आहे. त्यांनी सर्वार्थाने माझ्या ह्या नवीन संकल्पनेला पाठिंबा दिला. वारंवार येणाऱ्या विविध अडचणींना सामोरे जाताना त्यांची मदत ही अमोल आहे.

रोटरी इंटरनॅशनलतर्फे ऑस्ट्रेलियाला जाण्यासाठी भारताच्या राजदूत म्हणून (ग्रुप स्टडी एक्सचेंज प्रोग्रॅम) साठी महाराष्ट्रातून चौघींची निवड झाली त्यात माझा समावेश होता. दीड महिन्यांचा हा कालावधी खूप काही शिकवून गेला. ३ वर्षाच्या लहान अथर्वला घरी ठेवून गेले होते. रामवर सोपवून. खूपच मोठी आणि मानाची कामगिरी आमच्यावर होती. एवढ्या शिकलेल्या, कर्तबगार आणि अतिशय सफाईदार इंग्रजी बोलू शकणाऱ्या चार भारतीय स्त्रिया ऑस्ट्रेलियासारख्या परक्या देशांत मोठ्या आत्मविश्वासाने वावरत आहेत हे दृश्य तिथल्या ऑस्ट्रेलियन नागरिकांना नावीन्यपूर्ण होते, कारण आमच्या भारताचे चित्र इतर देशांत काही वेगळेच दाखवले जाते. मिडियाद्वारे. आम्ही ११ ऑस्ट्रेलियन्स्च्या घरी राहिलो, त्यांच्या संस्कृतीशी अगदी जवळून ओळख झाली. सुमारे १५ ते २० छोट्यामोठ्या गावांना, शहरांना आम्ही भेटी दिल्या. या सगळ्या ठिकाणी आम्ही 'स्लाइड शो' केले. प्रत्येक कार्यक्रमातून आम्ही आधुनिक भारताचा एक वेगळाच त्यांना माहित नसलेला चेहरा त्यांच्यासमोर आणला. तिथल्या कुटुंबांनी आम्हाला मोठा प्रतिसाद दिला. एक गोष्ट मात्र कायम जाणवायची ती म्हणजे समानता. ती म्हणजे स्त्री आणि पुरुष असो, किंवा वरिष्ठ आणि कनिष्ठ ह्यांच्यातली समानता, सर्वांना समान वागणूक. आपल्या देशातील समानता ही केवळ वरवरची आहे, इतर देशातील नागरिक ही समानता खऱ्या अर्थाने जगत आहेत. त्यांची स्वच्छता, निसर्गावरील प्रेम व आदर हे ते त्यांच्या कृतीतून दर्शवतात.

ऑस्ट्रेलियात मी नृत्याचे बरेच कार्यक्रम केले. कथ्थकबरोबरच मराठी लावणीलाही खास प्रतिसाद मिळाला. त्या वेळी मला माझ्या आईची खूप आठवण येत असे. लहानपणी तिनेच हट्टाने नृत्य शिकवले, त्याचे चीज झाले असे वाटते.

तिथे बऱ्याच कॉस्मॅटोजिस्टस् बरोबर माझ्या गाठीभेटी झाल्या. भारतातील डॉक्टर्स कुठेही कमी नाहीत, हे त्यांना भेटल्यानंतर माझ्या लक्षात आले. जर कुठे कमी असू तर ते म्हणजे 'कामाची अंमलबजावणी' आणि दुसरे म्हणजे 'शिस्त'. तिथला समाज जागृत आहे. स्त्रियांमधली जागृतीही आश्यर्चकारक आहे. भारतीय स्त्रिया जागृत नाहीत असे नाही. पण घर आणि मुलंबाळं नोकरी व्यवसाय या सगळ्या चक्रातून बाहेर पडून स्वत:चा विचार कमीजणी करतात.

गुजरातमधील भूकंपानंतर मन अतिशय अस्वस्थ होते. मुंबईच्या मेहता ट्रस्टतर्फे काही अमेरिकन NG0 ना घेऊन तिथल्या भूकंपग्रस्त ठिकाणांना भेटी दिल्या व तिथल्या परिस्थितीवर रिपोर्ट तयार करण्याचे काम करावयास मिळाले. त्यानुसार ट्रस्टचे मालक श्री. मफतलाल मेहता मदत पाठवणार होते. भारतीयांनी ही भूकंपाची स्थिती कशी हाताळली ह्यावर फ्रान्समधे 'वर्ल्ड असोसिअेशन ऑफ डिझास्टर मॅनेजमेन्ट ॲण्ड इमरजन्सी मेडिसिन'च्या कॉन्फरन्समधे

प्रेझेन्टेशन दिले. त्यानंतर जिनीवा (स्वित्झरलॅन्ड) येथे इंटरनॅशनल कमिटी ऑफ रेड क्रॉसमधे डिझॅस्टर मॅनेजमेन्टचा कोर्स करण्याची संधी मिळाली. वेगवेगळ्या देशातील ह्या क्षेत्रातील काम करणाऱ्या लोकांची ओळख झाली; खूप काही शिकायला मिळाले. आपल्या देशात रोज हजारोंनी प्राण जातात. ॲक्सिडेन्ट, साथीच्या रोगांमुळे अथवा नैसर्गिक आपत्तींमुळे. आपण ह्या सर्व गोष्टींना तोंड देण्यासाठी किती असमर्थ आहोत हे कळते. आपल्याला अजून खूप प्रगत होण्याची गरज आहे, संघटित होण्याची गरज आहे हे दिसले.

जिनीवात कोर्स करत असताना फ्रान्स, जर्मनी, नेदरलॅन्ड, येथील विविध सौंदर्यशास्त्राशी निगडीत संस्थांनाही भेटी दिल्या. त्यांच्यातील अभ्यासूवृत्ती नावाजण्यासारखी आहे, नीटनेटकेपणा, परफेक्शनिस्ट ॲटिट्यूड, वक्तशीरपणा, स्वच्छता खूप काही शिकायला मिळालं.

नैसर्गिकता आणि आधुनिकता ह्याचा उत्तम समन्वय युरोपमधे बघायला मिळाला. 'अरोमा थेरपी'शी खूप जवळून ओळख झाली. आपल्या आयुर्वेदात त्याची पाळेमुळे सापडतात, विविध वनस्पती, पानं-फुलं, त्यांच्या अर्कापासून तेलाची निर्मिती केली जाते. ह्या तेलांचा वासांचा परिणाम आपल्या मनावर व शरीराच्या आंतरिक पेशींवरही होतो. अनेक प्रकारच्या तक्रारींसाठी उदा. त्वचेच्या केसांच्या समस्या, मासिक पाळीशी निगडित त्रास, झोपेचे विकार, नैराश्य, ताणतणाव इत्यादि समस्यांवर मात करण्यासाठी अरोमा थेरपीचा उपयोग होतो. शरीर व मन प्रफुल्लित होतं. अरोमाथेरपी ही एक नैसर्गिक कला असून तिचा विकास होणे गरजेचे आहे. लोकांना सौंदर्यशास्त्राची शास्त्रोक्त पद्धतीने माहिती करून देण्यासाठी योग्य मार्गदर्शनाची गरज आहे.

'सिडेस्को' इंटरनॅशनलच्या वार्षिक कॉन्फरन्सेसच्या निमित्ताने २ वेळा भारताचे प्रतिनिधित्व करण्याचा योग आला. हाँगकाँग, सिंगापूर, थायलंडपेक्षा इंग्लंडचे सौंदर्यशास्त्र जास्त प्रगत आहे. प्रत्येकवेळी परतल्यावर मनांत एका निश्चयाने कामास प्रारंभ करायचे, आपल्या देशांत सौंदर्यशास्त्र अजून प्रगत व शास्त्रोक्त कसं करायचं?

गेली दहा वर्षे 'श्यून' मधे आम्ही ट्रेनिंग प्रोग्रॅम्स घेतो. 'सिडस्को'च्या परीक्षेसही मुलींना बसवतो. पार्लर चालवत असलेल्या ब्युटिशियन्सनाही अपग्रेडेशनसाठी ट्रेनिंग देतो.


रोटरी इंटरनॅशनल ब्युटी कॉन्फरन्स हाँगकाँग (२०००)

कोथरूडच्या अंधमुलींच्या शाळेत गेली चार वर्षे 'श्यून' तर्फे अंधमुलींना 'बॉडी मसाज'चे प्रशिक्षण दिले जाते. आज ३८ मुली स्वत:च्या पायावर उभ्या आहेत. काहीही भांडवल न लागणारा असा हा स्वयंरोजगार त्यांना मिळाला आहे. आत्मविश्वासाने आज ह्या मुली, त्यांच्या मोबाईलवर अपॉइन्टमेन्ट घेऊन होमव्हिझिटस् देतात.

अंधमुलींना मसाज शिकवण्याची प्रेरणा मला आमच्या दानशूर मफतकाकांकडून मिळाली. काकाजींनी आळंदीला अंधमुलींसाठी खूप मोठं वसतीगृह बांधलं आहे, तिथल्या एका समारंभास गेले असताना मनांत विचार आला की, काकाजी उद्योगपती असल्यामुळे ते समाजासाठी खूप काही करत आहेत. तर आपणही आपल्या प्रोफेशनच्या आधारे काहीतरी त्यांच्या स्वावलंबनासाठी केले पाहिजे. तेव्हा मसाजची कल्पना मनात आली.

आज यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे आमही एक 'शास्त्रोक्त मसाजचा' सर्टिफिकेट कोर्सही तयार करीत आहोत तो फक्त अंध व्यक्तींसाठी आहे. या ऑडिओ- व्हिजुअल कोर्स अंध व्यक्तींसाठी संपूर्ण थिअरी व प्रॅक्टीकल स्टेप्स कॅसेटद्वारा ते ऐकू शकतील व शिकवणाऱ्या डोळस व्यक्तीसाठी रेफरन्ससाठी व्हिडिओ सीडी असेल. हे काम करत असताना एक वेगळेच आत्मसमाधान मिळत आहे. त्याची तुलना कशाशीही होऊ शकत नाही.

---


डॉ.दीपा साठये
४१/१६, श्रीया अपार्टमेंट्स,
तरटे कॉलनी, कर्वे रोड, पुणे-४

# झेप... ...नव्या क्षितिजाची

**राष्ट्रीय कीर्तनकार :चारुदत्त आफळे**



**कीर्तनासारख्या परंपरागत पण वेगळ्या आणि आव्हानात्मक क्षेत्रात संगीत, नाट्यसंगीताच्या प्रभावी वापरासह अनेक नवीन प्रयोग करुन या क्षेत्राला आधुनिक रूप देणाऱ्या चारुदत्त आफळे यांचा आगळा प्रवास**

‘‘**मी** चारुदत्त गोविंद आफळे.’’ अशी मी लहानपणी कुणाला ओळख करून दिली की लगेच प्रश्न यायचा की - ‘‘गोविंद म्हणजे ते कीर्तनकार गोविंदस्वामी -- तेच का?’’ मग आमचं पटकन उत्तर ‘‘हो.’’ मग लोकांची ठराविक पुढची वाक्य - ‘‘अहो गोविंदस्वामी म्हणजे काय विचारता? हे धिप्पाड व्यक्तिमत्त्व, ओघवती वाणी, दहा दहा हजार श्रोत्यांना रस्त्यावर खिळवून ठेवणं - असं कीर्तन. आता असं ऐकायला मिळणं अवघडच हो.’’ अशा एकमेकांशी गप्पा झाल्या की मग त्यातल्या एकाकडून लगेच प्रश्न- ‘‘मग तुम्ही काय? कीर्तन वगैरे काही करता की नाही?’’ आमचं उत्तर म्हणजे- ‘‘करतो. अधून मधून. अजून शाळा शिकतोय. कीर्तनही शिकतोय.’’ मग शाबासकी देताना लोकांची वाक्ये- ‘‘करा करा. छान आहे. पण त्यांच्यासारखं आता अवघडच.’’

खरंच होतं ते. बालपणापासून माझ्या कानावर सतत पडणारी ही वाक्यं मला मोठ्या जबाबदारीची जाणीव करून देत होती. मी -- आफळेबुवांचा मुलगा. माझं शाळेतही वागणं, बोलणं कीर्तनकार घराला साजेसं असायला हवं हे कळत होतं. सुदैवाने वळतही होतं व त्यात मन आनंद घेत होतं. रोज व्यायाम देवपूजा संध्या केल्याशिवाय, कपाळी गंध न लावता शाळेत जायचं नाही. या सर्व गोष्टी झाल्याच पाहिजेत व कोणीही कितीही हसो, गंध लावलेच पाहिजे. अगदी सिग्नलच्या दिव्यांसारखे तीनचार रंगांचे ठिपके नकोत. नुसते शेंदुराचे, चंदनाचे एक बिंदुवत पण नीट दिसेल असे गंध दोन भुवयांत पाहिजे. कितीही भांडण झाले तरी अचकट विचकट शिव्या तोंडात येता कामा नये. शाळेतील सर्व गोष्टी घरी सभ्यतेने गुरुजींची टिंगल न करता सांगितल्या जायला हव्या. हे सगळे नियम का? कोण जाणे-पण आनंदाने पाळले जात होते.

शाळेच्या स्नेहसंमेलनात कधी छोटं कीर्तन, कधी एकपात्री, कधी भक्तिगीत, नाट्यगीत गायन कधी सौ. चावरे बाईंच्या मार्गदर्शनाखाली ‘सकाळ नाट्यवाचन स्पर्धेत’ सहभाग हे सारं चालू होतं. घरून प्रोत्साहन होतं. महाविद्यालयातही पुरुषोत्तम करंडक एकांकिका, फिरोदिया करंडक विविधगुणदर्शनात कधी गायन कधी वादन, मराठी वाङ्मयमंडळाकडून व्याख्याने, वादविवादस्पर्धा यात सहभाग घेत होतो.

‘शॅापर्स’ सारख्या नाट्यसंस्थेकडून श्री. सुधीर मुंगी यांच्या दिग्दर्शनाखाली केलेली पथनाट्ये- या साऱ्या अंगांनी माझं कलाक्षेत्रं विकसित होत गेलं. पण कॉलेज संपल्यावर मी नोकरीला लागायचं की नाट्यकलाकार म्हणून आयुष्य जगायचं, की कुणी गायक म्हणून नाव कमवायचं ते सर्वस्वी माझ्या मनावर आहे, असं वडिलांनी अनेकदा सांगितलं होतं. पण कीर्तनकार म्हणूनच पुढे व्रत चालवावं असं मनानं घेतलं ही खरंच मी तरी रामकृपा समजतो. कारण तसं कधी ठरलं मनात ते आठवतही नाही. पण मनापासून कीर्तन व्रत घेतलं हे खरं. मी शाळा महाविद्यालयात जात होतो तेव्हा आमचे घरीच कीर्तन महाविद्यालय सुरू होतं. तेव्हा

शाळेचे तास संपले की घरी गृहपाठ करतानाही कान तिकडे असायचा. त्या मुलांना झांजा वाजवता यायला इतका वेळ का लागतो तेच कळायचं नाही. पण झांज वाजवणं, तबल्यावर ठेका धरणं, पेटीवर चाल सापडवणे हे सारे उद्योग (बाबांच्या साथीदारांचे वादन) पाहून पाहून माझे सुरू झाले. तेव्हा जाणवले नाही, पण त्या सर्व गोष्टी न शिकता भराभर जमू लागल्या. तेव्हा घरचे व परिचितही लोक म्हणून लागले. ''अहो- तो पूर्वीचे घेणं घेऊन आलाय- पूर्वजन्मीच्या पुण्याईच्या गोष्टी आहेत या. झकास कीर्तनही करेल नक्की'', या वाक्यातली अद्‌भुतता तेव्हा कळत नव्हती पण आज मी ही जेव्हा विद्यार्थ्यांना कीर्तन शिकवतो तेव्हा हे जाणवतं की, खरच अनेक गोष्टी आपल्याला पूर्वपुण्याईनेच आल्या असल्या पाहिजे. मग एवढं सगळे, संगीत अभिनय सभाधीटपणा आहे तर मग कीर्तन का न व्हावे?

यात आणखी भर पडली बाबांच्या कीर्तनांची सुट्टीच्या दिवशी कधी पेटीच्या साथीला, कधी तबल्याच्या साथीला. कधी झांजा वाजवायला सुद्धा बाबांबरोबर जायचो तेव्हा त्यांच्या कीर्तनाची गर्दी, माणसांनी तुडुंब भरलेले रस्ते, गडगडाटी कीर्तन चार चार तास ओघवती वाणी, ऐतिहासिक आख्यानामधील आवेश, क्रांतिकारकांच्या यातनांचे दु:ख व लोकांना पोट धरधरून हसायला लावणारा विनोद हे सार पाहून मन म्हणजे हे जमलं पाहिजे. त्यात ते कीर्तनात यांच्या तरुणपणीची गोष्ट सांगत - लोकहो, मला चांगली सिनेमा नटाचीही संधी मिळाली होती, (मला म्हणजे गोविंदस्वामींना) 'शेजारी' या प्रभात फिल्म कंपनीच्या चित्रपटात, व्ही. शांताराम यांचे मार्गदर्शनाखाली केशवराव दाते यांसारख्या दिग्गज कीर्तीच्या नटाबरोबर काम मिळालं. परंतु आई ओढून घेऊन गेली. म्हणाली- गोविंदा तुला नवस करून मागून घेतला तो यासाठी नाही, कीर्तन कर. छत्रपती संभाजी महाराजांच्या धर्मपत्नी सौ. येसूबाई महाराणींनी जेव्हा सज्जनगडावर समर्थ रामदासस्वामींच्या समाधीवरील मंदिर बांधलं. तेव्हा अनेकांना अनेक सेवा वाटून दिल्या - कुणी दिवाबत्ती, कुणी झाडलोट, कुणी पूजाअर्चा. तर त्यात स्वामींच्या वाङ्मयाचा प्रसार करण्यासाठी कीर्तन सेवेकरी म्हणून आफळे घराण्याला त्या काळापासून वतन चालू केलं. आपापल्या परीन त्या त्या पिढीनं हा कलेचा वारसा चालू ठेवला. पण मला पोर नाही म्हणून मी गडावर स्वामींना नवस बोलले 'की ही तुमची सेवा आमच्या घरातली. ती बंद पाडू नका. मुलगा द्या त्याला कीर्तनकार करीन. त्यानंतर दासनवमीच्या दिवशी गोविंद आफळे यांचा जन्म म्हणून त्यांचं नाव गोविंदस्वामी पडलं. रामदास स्वामींचं कार्य - सामर्थ्याची उपासना व उपासनेचं सामर्थ्य हे समाजात जागृत करायचं, वाढवायचं. यासाठी तुला मागितला. धार्मिक चित्रपटात नाटकात कामं कर पण आधी कीर्तनकार हो. नाट्यकलाकार आफळे कीर्तन करतो अशी कीर्ती नको तर कीर्तनकार आफळेबुवा कधी कधी नाटकातून चित्रपटातून कामे करतात असं झालं पाहिजे.' तेव्हा बाबा आजीला म्हणाले ''आता कीर्तनाला माणसं घेत नाहीत. कीर्तन करून काय मिळवू?'' तेव्हा आजीनं समर्थांच्याच ओळीचा आशीर्वाद दिला 'नभी जैसी तारांगणे तैसे लोक येतील.' आणि तो आशीर्वाद सफल झाला. म्हणून आज मी तुमच्यासमोर आफळेबुवा म्हणून उभा आहे.

हा प्रसंग बाबांच्या कीर्तनात अनेकवेळा ऐकला. तेव्हा मनात येई की एवढा मोठा कीर्तनाचा वारसा असताना - त्या साठी आवश्यक कला मला अवगत असताना इतर कुणाच्या नोकरीपेक्षा समर्थांचीच नोकरी का नाही? ठरलं. कीर्तन करायचं. मी बी.ए. पास झालो. आणि बाबा आजारी झाले - पुढे दोन वर्ष आजार वाढत गेला आणि माझ्या एकविसाव्या वर्षी बाबा जग सोडून गेले. त्यामुळे शाळा कॉलेज शिकत असताना सुट्टीत ऐकलेली आख्याने पूर्वरंग एवढ्या शिदोरीवर या क्षेत्रात उतरायचे म्हणजे थोडी भीती वाटली. पण पुढे सराव झाला. काही वर्ष कीर्तन प्राथमिक अवस्थेतच होतं. मग अनेकांनी प्रेमानं काही सूचना केल्या - वाचन अभ्यास पाठांतर वाढत गेलं - तसं कीर्तनाचं बर स्वरूप आलं. या वाटचालीत, सुंदरबुवा मराठे, श्री. दत्तदासबुवा घाग, श्री. श्रीपादबुवा ढोले. माझी ज्येष्ठ भगिनी सौ. क्रान्तीगीता महाबळ साऱ्यांच्याच सूचना मार्गदर्शन याचा खूप उपयोग झाला व होतो आहे.

पूर्वीही आणि आताही एका गोष्टीचा मात्र थोडा त्रास होतो तो म्हणजे नेहमी बाबांच्या कीर्तनाशी तुलना करून माझं कीर्तन ऐकलं जातं. त्यामुळे कीर्तन झालं की लोक सांगतात - हा विषय सांगताना बुवा असा विनोद करायचे. वगैरे वगैरे. यातील काही सूचनांचा मी जरुर विचार केला. पण सुदैवाने देवानं माझा विवेक जागा ठेवला व त्या बाबांच्या कीर्तनातली जी विधानं जे विनोद माझ्या वयाला शोभणार नाहीत ते मी, लोकाग्रह झाला तरी टाळत गेलो.

कीर्तनक्षेत्रात शिरताना आईबाबांनी खूप सूचना दिल्या होत्या. त्या आज मोलाच्या वाटतात. बाबा स्वानुभवानंच सांगत - बाबारे, कीर्तनात आवेशपूर्ण बोलण्यानं आवाज थकून जातो. तो सांभाळायला हवा. आवाज थकल्याने इतरांइतका गायनाचा रियाज सांभाळता येणार नाही. त्यामुळे तुझे समानवयी मित्र गायनात पुढे जाऊन एका मैफिलीचे दहा हजार वीस हजार मिळवू लागतील. तू वीस वर्षे कीर्तन करूनही त्याची बिदागी पाचशे, हजार, दोन हजार. जास्तीत जास्त पाच हजार इतकीच वाढणार. बाकी कलाकारांना न्यायला आणायला गाडी, रहायला छान हॉटेल, कार्यक्रमाला उत्तम माईक सिस्टिम. पण कीर्तनकाराला एस.टी.चे भाडे, रहाणे धर्मशाळा, जेवण खानावळीचे व कार्यक्रमाला मंगलाष्टके म्हणायच्या योग्यतेचे माईक. ही परिस्थिती राहणार याचे वाईट वाटता कामा नये. अर्थात या व्यवस्थेला अपवाद म्हणून काही ठिकाणी निवासव्यवस्था छान असते. पण इतर कलाकारापेक्षा दुय्यम दर्जाची वागणूक राहते. याचे पूर्वी वाईट वाटत असे, पण आता या गोष्टीचे वाईट वाटत नाही. पण आता खरचं नाही वाटत वाईट.

कीर्तनातील गुणवत्तेचा विचार घेता त्यात संगीत उत्तम हवे हे जाणून बाबांनी मला छान तालीम दिली. त्या लहानवयात कीर्तनकार होणे नक्की नसले तरी - जरी उत्तम गायक झाला तरी हे ज्ञान

लाभाचेच आहे या दृष्टीने - प्रथम पासून भारत गायन समाजात श्री. पित्रेबुवांकडून आणि ज्येष्ठ सारंगीवादक श्री. मधुकर खाडिलकरांकडून - प्राथमिक गाण्याचे धडे दिले. नंतर शिलेदार कंपनीत ऑर्गनची साथ करण्याची संधी मिळाली. बाबांबरोबर कीर्तनाला पेटी वादनाचा सराव होताच त्यातून दोन हातानी पेटी वाजवायची हौस. माझी आई आणि बहिणी या छंदापायी वैतागून जात. कारण मी त्यांना भाता मारायला लावत असे. आणि दोन हातानी पेटी वाजवून सराव करत असे. माझी हौस लक्षात घेऊन बाबांनी एक पायपेटी श्री.रानडेंकडून आणून घरी ठेवली होती. त्यामुळे नाटक वाजवायला जमेल म्हणून गेलो. माझ्या वादनाच्या अचूकतेसाठी श्रीमती. जयमाला शिलेदार, कीर्ती शिलेदार यांचे बहुमोल मार्गदर्शन व सहकार्यही मिळालं. त्या कसून तालीम करून घ्यायच्या. कारण प्रत्यक्ष नाटक वाजताना सर्व वाद्यांच्या आवाजात स्टेजवरील गाणे पुरेसे मोठ्याने ऐकू येत नाही, तेव्हा वादकाने अंदाजानेच जोरात साथ करावी लागते. पण तो अंदाज येण्यासाठी तालीम आवश्यकच. त्यामुळे खूप नाट्यगीते हातात बसली डोक्यात बसली. ज्यांचा आज कीर्तनात उत्तम वापर करता येतो आहे व त्यामुळे लोकानाही ते अधिक आवडते आहे. कित्येक वेळा कीर्तनापूर्वी लोक सांगतात, तुम्ही नाट्यगीते शिकला आहात, आम्हाला ते ऐकायची आवड आहे तेव्हा आज कीर्तनात प्रसंगानुकूल पण चार पाच नाट्यपदे घ्या. त्यांची इच्छा मी पुरवू शकतो, यात शिलेदारांचा वाटा लाख मोलाचा आहे. एक दोन नाटकात मी कामही केले. त्यावेळी दिमाखात कसे गावे, उभे रहावे यासाठी सौ. दीप्ती भोगले व स्वत: जयराममामा शिलेदार यांनीही दिग्दर्शन केले. शिलेदारांकडे जाण्याचा आणि मोठा लाभ म्हणजे पं. शरद गोखले यांचा खूप सहवास मिळाला. शाळेत असताना पुणे विद्यार्थीगृहात ते एक शिक्षक म्हणून परिचित होतेच. पण तेव्हा असं समोर बसून विद्या घ्यावी इतकं भानही आलं नव्हतं. अर्थात एका बाजूला श्री. आगाशेबुवांकडे गायन तालीम चालूच होती. पण नंतर मात्र पं. शरद गोखले, यांच्या पत्नी सौ. नंदा गोखले यांनी अथक परिश्रम घेऊन माझा गळा नाट्यगीताला योग्य असा केला. सर्व स्तरावरील हुकमत, आलापांची स्वत: निर्मिती करायची क्षमता, ख्याल चिजांचे सौंदर्य तसेच नाट्यदृष्ट्या शरीरावर मुद्रेवर कोणताही दोष न येता उघड्या डोळ्यांनी प्रसन्न मुखाने गायन सादर करणे मिळाले. 'कट्यार काळजात घुसली' या नाटकासाठी एका छोट्या मुलाची आवश्यकता होती. म्हणून भरत नाट्य संशोधन मंदिराच्या या नाट्यप्रयोगासाठी माझे छोट्या मुलाचे काम श्री. विष्णुपंत वष्ट (पूर्वीचे प्रसिद्ध ऑर्गन वादक - पं. वसंतराव देशपांडे, छोटा गंधर्व, शिलेदार या सर्वांबरोबर गायनाच्या कार्यक्रमांबरोबरच ऑर्गनचीही साथ देणारे वष्ट) यांनी बसवून घेतले. पण अचानक नाट्यसंपदा, मुंबई यांचे व्यावसायिक रंगभूमीवरील याच नाटकाचा प्रयोग पुण्यात होता. त्यांच्या बरोबर काम करणारा मुलगा ऐनवेळी येऊ शकला नाही. म्हणून धावपळ झाली. माझा पत्ता वष्टांनी सांगितला श्री. प्रभाकर पणशीकरांचा निरोप घेऊन श्री. चित्तरंजन कोल्हटकर घाईनं घरी आले, मला घेऊन गेले आणि व्यावसायिक रंगभूमीवर शालेय वयातच पदार्पण झालं. पं. वसंतराव देशपांडे, पं.भार्गवराम आचरेकर, प्रकाश घांग्रेकर, प्रसाद सावकार, फैय्याज यांचा सहवास, मार्गदर्शन व १०० प्रयोगांचा अनुभव गाठीला बांधला गेला. बाबा नाटकात खुशीने पाठवत. म्हणून संगीत नाटक कीर्तनातूनच पुढे तयार झालं. आपल्या घरातलंच ते आहे. त्याचा लाभ कीर्तनात होणारच आहे. खुशाल जा. आणि आज तो लाभ पदोपदी दिसतो आहे. 'कट्यार' याच नाटकात पुढे थोडा मोठा झाल्यावर चांद, उस्मान या पैकी कधी याची कधी त्याची - अशी खाँसाहेबांच्या शागीर्दाची भूमिका केली. त्यासाठी तशा गायकीचे विशेष गळ्यातून नीट यावेत म्हणून पं. पद्माकर कुलकर्णी चिंचवडचे यांकडे गाण्याची तालीम घेतली. श्री. रवींद्र घांगुर्डे यांचेही साहचर्य तेथे मिळाले. आता आज मी त्या नाटकात पुढे नायकाची म्हणजे सदाशिवची व खाँसाहेबांचीही भूमिका केली. ती रसिकांना आवडली. तेव्हा मिळणाऱ्या प्रत्येक गाण्यानंतरच्या टाळ्यांच्या वेळी आठव होतो तो बाबांचा- आईचा, सर्व गुरुंचा, वष्टांचा. आज दोनही क्षेत्रात माझे नाव ओळखले जाते ही या सगळ्यांचीच कृपा. एका बाजूला वेगवेगळ्या विषयांची कीर्तने येत. त्याचा अभ्यास, पाठांतर सराव ही लढाई चालू असतानाच पुढे मत्स्यगंधा, ययातीदेवयानी, सौभद्र, मानापमान, लावणी भुलली अभंगाला, शारदा, पंडितराज जगन्नाथ, आतून कीर्तन वरून तमाशा, संशयकल्लोळ, स्वरसम्राज्ञी अशा अनेक नाटकातून प्रमुख भूमिकांसाठी मागणी आली. माझ्यापरीनं मी ती पूर्ण करत गेलो. या वाटचालीत खूप मोठा वाटा होता संगीत मार्गदर्शक श्री. राजीव परांजपे यांचा. सारी गाणी ते माझ्या गळ्याची कुवत लक्षात घेऊन मला झेपेल असं त्यांचं रूप करून घोटून बसवून घ्यायचे. (अजूनही घेतात.) त्यांचे भरवशावर मी प्रयोग जिंकत असे, साथीला श्री. राजीव परांजपे आणि प्रसाद जोशी असायचे व साऱ्या माझ्या अपूर्णता भरून काढायचे. लोकांपर्यंत पूर्ण आनंद पोचवायचे. आजही ते नाट्यसंगीताच्या कार्यक्रमांच्या निमित्ताने, 'सूर ताल' या टीव्हीमालिका निमित्तानं ते गाणी घोटून घेत असतात. कुठल्या तरी निमित्तानं ही तालीम होते हे वाईट आहे, या प्रकाराने गाणं मागं राहातं अशी जाणीव देतात व मी पुण्यात असेन तेव्हा तेव्हा येत रहा गात रहा असा हट्ट धरून मेहेनत करून घेतात. तसेच नाट्यसंवादांसाठी दिग्दर्शक श्री. रवींद्र खरे - यांची मेहेनत मला आज कीर्तनातही उपयोगाची झाली आहे. मागील उल्लेखित सर्व नाटकांना दिग्दर्शक तेच होते. पण 'रणदुंदुभी' नाटकात, पूर्वी मा. दीनानाथ मंगेशकरानी गाजवलेली स्त्री भूमिका - ती करण्याचे जेव्हा आव्हान आले तेव्हा ती भूमिका कठोर मेहनतीने श्री. खरे यांनी माझ्याकडून बसवून घेतली. आज कीर्तनात कंसाच्या अभिनयाबरोबरच देवकीचे संवादही लोकांना भावतात याची शाबासकी त्यांना आहे. नाटकाच्या वाटचालीत डॉ. राम साठ्ये, श्री. चंदू डेग्वेकर, अगदी पं. रामदास कामत यांनीही मला वेळोवेळी संवाद, अभिनय व गायनाचं मार्गदर्शन दिलं, प्रोत्साहन दिलं. संगीत नाटकांबरोबर - तो मी नव्हेच, इथे ओशाळला मृत्यू, वऱ्हाडी माणसं अशा गद्य नाटकातूनही कामं

केली. त्यामुळे प्रभाकर पणशीकर, प्रकाश इनामदार यांचंही मार्गदर्शन लाभत राहिलं. किती जणांचा उल्लेख करू?

आज माझ्या यशामागे एवढी प्रभावळ व त्यांचे कष्ट आहेत आशीर्वाद आहेत. कीर्तनातील पोवाडा भारूड वगैरे ऐकून काही मुलं एकत्र आली म्हणाली या लोककलांचा कार्यक्रम बसवा. ठीक आहे म्हटल व ते ही मंचस्थ केलं. शिवाजी खैरे, प्रवीण सूर्यवंशी, प्रसाद जोशी यांचे मदतीने पराग ठाकूर, शाहीर हिंगे, शा. हेमंत मावळे, भारूडकार श्री. भोकसे, साऱ्यांच्या सहकार्याने आशीर्वादाने 'लोककला महाराष्ट्राची' कार्यक्रम केला व केसरीवाडा गणेशोत्सवात, दगडूशेठ गणपती समोर तो सादर करायचा बहुमानही मिळाला. संगीत नाटकसेवेसाठी पुणे मराठी ग्रंथालयाचा 'पाटणकर' पुरस्कार, गोखले पुरस्कार, नाट्यपरिषदेकडून 'भातखंडे' पुरस्कार, पुण्याकडून 'पुणे की आशा' पुरस्कार, मा. दीनानाथ मंगेशकर पुरस्कार, सासवडवासीयांकडून 'प्रबोधनकार' पुरस्कार यांबरोबरच लोककला प्रबोधिनीचा तात्यासाहेब हिंगे शाहीर पुरस्कारही - ग्राहकतीर्थ श्री. बिंदुमाधवराव जोशी यांचे हस्ते मिळाला.

प्रत्यक्ष कीर्तन सादरीकरणांपेक्षा कॅसेट द्वारा कीर्तन प्रसार अधिक होतो या विचाराने कीर्तनाच्या कॅसेट काढायचे मनात होते. पण कुणाकडे जावे? व आपणहून जाणे बरे दिसेल का? कारण व्हिनस कंपनीने माझी गणेशस्तुती कीर्तन कॅसेट व देवीमाहात्म्य कॅसेट ध्वनिमुद्रण करून घेतले. पैकी गणेश कॅसेटचे उद्घाटन जोरात झाले. पुढे काय विक्री समाधानकारक मिळाली नाही की काय कोण जाणे? पण देवी कॅसेट आलीच नाही. त्यामुळे कसे होईल ही भीती. योगायोगाने सावरकरांचे 'उत्तरक्रिया' नाटक आम्ही बसवले होते त्याचा प्रयोग मुंबईत असताना झपाटा कंपनीचे मालक श्री. वसंत खेर नाटकाला आले. व त्यातील 'तुम्ही आम्ही सकल हिंदू बंधु बंधू' हे गीत ऐकून त्यानी सर्व संतमालेवर कीर्तन कॅसेट करण्यासाठी आमंत्रित केले. सर्व संत नामदेव शिंपी, सावतामाळी, नरहरी सोनार, एकनाथ पंडित, जनाबाई दासी, कान्होपात्रा गणिका, गोरा कुंभार, रोहिदास चर्मकार, तुकोबा, रामदास संन्यासी. सारे आपापले कर्तव्य पूर्ण करीत समाजशिक्षण साधित, आत्मोद्धार साक्षात्कार साधणारे. साऱ्यांची जीवनचरिते कॅसेटवर केली. व याच्या प्रचारार्थ एक नाटक बसवावे असे मनात आले. या चरित्रांतीलच महत्वाचे प्रसंग एकत्र गुंफून रंगमंचीय सादरीकरण करावे असे ठरले त्यातून 'तीर्थ विठ्ठल क्षेत्रविठ्ठल' नाटकाचा जन्म झाला. आधी तो कार्यक्रम नुसताच कीर्तनकार व त्याला प्रश्न विचारणारा कुणी अशा रूपात लिहिला व तो मी सुधीर मुंगी यांना दाखवला. कारण महाविद्यालयात मी असताना त्यांच्या डॉपर्स संस्थेकडून सादर झालेल्या 'आवर्त' नावाच्या पथनाट्यात मी भूमिका केली होती. तेव्हा त्यांचे दिग्दर्शन मला आवडले म्हणून या वेळी त्यांच्याकडे गेलो तर ते म्हणाले नुसता प्रश्न विचारायचा व बुवानी उत्तर द्यायचे या पेक्षा आपण नाटकाप्रमाणे एन्ट्री एक्झिट थोडे सूचक नेपथ्य व पात्रांचे संवाद करून ते रंगमंचीय कीर्तन नव्हे, रंगमंचस्थ नाटक करू तरच ते प्रभावी होईल. व अक्षरश: आम्ही तीनपात्रे - मी नितीन श्रोत्री व प्रवीण सूर्यवंशी - सारे एकत्र बसून ते नाटक झालं असंच म्हणावं लागेल. कारण मी कथा सांगायचो. मग सुधीरजी त्याची फोड करायचे. यातील एवढाच भाग तुम्ही बोला- पुढे गावकऱ्याने ही बातमी पाटलाला दिली असे आहे - तर प्रवीण तू गावकरी - नितीन तू पाटील - आता हे वाक्य होताच प्रवीण या विंगेतून येईल, नितीन इथे उभा असेल. आफळे - तुम्ही आत जाल व बाकी पुढील प्रसंग पाटीलच सांगेल - हे हे बोलून झालं की तुम्ही या. आता पुढची कोणा संताची कथा ती सांगा - मग ती या प्रसंगातून त्यात कसे जाता येईल ते पाहू-'' असे करत करत ते नाटक उभे राहिले. पारंपरिक कथा - त्याचे माझे कथन - व त्याला सुधीर मुंगींचे दिग्दर्शन व नितीन, प्रवीण यांच्या 'अभिनय व नृत्याची' साथ. यातून हे रंगमंचस्थ संतकथांवरील नाटक तयार झाले. नेपथ्य शाम भुतकरांनी केले. संगीत साथीची बाजू - ऑर्गन - राजीव परांजपे मृदुंग - नंदकुमार भांडवलकर यानी सांभाळले प्रकाश योजना श्री सुधीरजींनीच सांभाळली. व पूर्वी हे नाटक 'भले तरी --' या नावाने व आज 'तीर्थ विठ्ठल' या नावाने आम्ही सादर करीत राहिलो.

शालेय विद्यार्थ्यांपासून ते उच्चपदस्थ अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला व मिळतो आहे. कधीही कीर्तनाला न जाणारा मोठा प्रेक्षक वर्ग फक्त रंगमंदिरातच जाणारा श्रोताही या निमित्ते आम्हाला मिळाला . प्रेक्षक म्हणतात - ''असे नाट्यरूप आहे म्हणून मजा येते आहे नाहीतर या संतकथा ऐकायला आम्ही काही देवळात गेलो नसतो. व या संत वाङमयात आम्हालाही आवडतील अशा अनेक गोष्टी आहेत हे आम्हाला कधी कळलं नसतं.'' या नाटकाबद्दल खूप खूप धन्यवाद.

या प्रकाराबरोबरच कीर्तन क्षेत्रातही काही नवनवीन उपक्रम घेतले तर त्याची गर्दी वाढेल. या विचाराने - विविध गावात कीर्तन महोत्सव घेण्याची नवीन कल्पना कीर्तनकुलाकडून सुरु झाली व गावोगावच्या आयोजकानी व कीर्तनकारांनीही ती योजना उचलून धरली. आज खरंच १५-२० हजारांची गर्दी कीर्तनमहोत्सवाना होत आहे. भव्य सभागृह वा पटांगणात आयोजन, रोज नवीन नामवंत कीर्तनकार, उत्तम साथीदार, सुंदर नेपथ्य, प्रभावी ध्वनीयंत्रणा या सर्वाचा मेळ जुळून - आज बीड, अंमळनेर, इन्दूर, उज्जैन, बडोदा, मुंबई, पुणे, नागपूर, अंबाजोगाई - सर्व सर्व ठिकाणी अशा सात दिवस महोत्सवांचं लोण पसरलं आहे. त्यामुळे फक्त धार्मिक सणावेळीच कीर्तन असे न राहता. सुटीला सुद्धा वा इतर वेळीही असा महोत्सव सुरू झाला आहे. अगदी मागील वर्षी - नागपूरच्या कीर्तन समितीने तर नाट्यकीर्तन महोत्सव घेतला. म्हणजे ज्या पौराणिक आख्यानांवर नाटके लिहिली अशीच आख्याने लावायची. शाकुंतल - मत्सगंधा, सौभद्र असे सात दिवस. गर्दी इतकी झाली की पटांगणातील लोकांना कीर्तन दिसण्यासाठी अंतरा अंतरावर ७० एम.एम. चे पडदे उभे करून त्यावर कीर्तनाचं थेट प्रक्षेपण दाखवावे लागले. व कीर्तनकारातही अशा महोत्सवात बाजी मारली पाहिजे म्हणून संस्कृत, संगीत, निरुपण रसाळ आख्यान, यांची

अधिकाधिक उत्तम सादरीकरणाची एक आनंदी ऊर्जा याने निर्माण होत आहे. व इतरवेळी संगीत न ऐकणारा कधी सवाई गंधर्व महोत्सवाला गेला हे स्वत:चे मोठेपण समजू लागतो - तसे आज इतरवेळी कीर्तनांना न जाणारे हजारो लोक कीर्तनमहोत्सवाला मी होतो असे अभिमानाने सांगून कीर्तनातील विषयांची चर्चा परस्परात करताना दिसतात त्याची परीक्षणे वृत्तपत्रात मोठ्या प्रमाणात येताना दिसतात तेव्हा समर्थांची उक्ती पटते. निराश होणे नाही - ''केल्याने होत आहे रे आधी केलेचि पाहिजे.''

कीर्तनाच्या विविध महोत्सवातून कीर्तनभूषण, कीर्तनकेसरी अशी मानपत्रे मिळत गेली. मिळत आहेत. श्री. दिलीपबुवा डबीर, श्री. मोहनबुवा कुबेर, श्री. न. चिं. अपामार्जने, श्री. गजाननबुवा राईलकर यांसारख्या मान्यवर कीर्तनकारांकडूनही आज-मार्गदर्शन मिळते व त्याबरोबर प्रोत्साहनाची थापही पाठीवर पडत आहे. नारद विद्यामंदिरात एक वर्ष वासंतिक कीर्तन वर्गात शिकवायला गेलो, दादर, गोवा येथील कीर्तनविद्यार्थ्यांसाठी सुटीचे काळात वर्ग घेतले. आता सूरसंवर्धन संस्थेच्या वतीने पुण्यात चालणाऱ्या कीर्तन महाविद्यालयात एक आध्यापक म्हणून काम पाहतो आहे. नामदेव चित्रपटात ज्ञानदेवांची भूमिका, हे ही काम मी केलं. राजदत्त दिग्दर्शित टिळक आगरकरांवरील दूरदर्शन मालिका 'मर्मबंध' यातही काम केलं. श्री. विनय धुमाळे यांच्या गणेशदर्शन मालिकेतही कीर्तनकाराचं काम केलं. लोकराजा शाहू मालिकेत बालगंधर्वांचं स्त्रीवेषात काम केलं, बालगंधर्वांवरील माहितीपटात काम केलं, तर पुणे विद्यापीठाकडून शेती विषयासाठीच्या 'तरडगावची बोरशेती' या माहिती पटात बोरांची लागवड असंही कीर्तन केलं.

आज कीर्तनाला मागणी खूप आहे. लोकांना ऐतिहासिक क्रांतिकारकांची चरित्र भावताहेत आवडत आहेत. ती ऐकून कित्येक विद्यार्थी व्यायामाची दीक्षा घेऊन निर्व्यसनी होत आहेत. देवळांमधील उत्सवांबरोबरच शाळेत व कॉलेजातही मुद्दाम जाऊन वेळप्रसंगी स्वत: थोडे पैसे खर्च करून माईक आणून मी अनेक कीर्तने केली. त्याची फळं आज मला दिसत आहेत. खूप मुलं येऊन सांगतात आमचं कीर्तन ऐकून - ते ते क्रांतिवीर आम्हाला कळले, आवडले म्हणून मीही व्यायाम करतो. गुटखा सोडला. घोडेस्वारी शिकलो, भोसला मिलिटरी कोर्स केला. रोज नाम माळ करतो, वृत्ती शांत झाली आहे. एक ना दोन, खूप मुलं भेटतात. बोलतात. आनंद वाटतो-

पण या सर्व गदारोळात आर्थिक स्थिती नेहमीच खालीवर होत राहते. कार्यक्रम आले, बिदागी मिळाली तर बिले भागली नाहीतर थकबाकी. सहसा फार ताण होत नाही. पण मधे अमेरिका टूर केली. पण त्याच वेळी लादेन हल्ला झाला. सारेच फसले. थोडेच कार्यक्रम करून परतलो. पण मग कर्ज हप्ते आणि घर भागवणे जरा जड झाले. अमेरिकेत मराठी संमेलनात कीर्तन झाले. कॅनडातही नाट्यसंगीताचा कार्यक्रम सर्वांना खूप आवडला. एक दौरा ठीक झाला. पण एक फसला. यात थोडी ओढाताण, तगादे...कटकटी आल्या.

पण माझ्या पुण्यातील अनुपस्थितीत या साऱ्यांना तोंड देणे व घर प्रसन्न ठेवणे या गोष्टी करत असलेली माझी पत्नी सौ. शुभांगी ही या सर्व कार्यामधील माझ्या उत्साहामागची शक्ती आहे. ओढाताण असतानाही ती प्रसन्न असते. हे मी लिहिले म्हणून, नाही तर बाहेरील कुणालाही आतील चणचण जाणवणारही नाही हे कौशल्य तिचं.

तशीच माझी दोन मुलं. थोरली मधुरा, धाकटा वज्रांग. मधुरा कथ्थक शिकते, वजांग्र गाणे शिकतो. तबला वाजवायचा प्रयत्नात आहे. आम्हा तिघांना काही ना काही नाद आहेत आणि शुभांगीला तिघांना नीट ठेवणे. हा अवघड छंद आहे. या धावपळीतूनही चांगले भावगीत, चित्रपटगीते यांचे विविध कलाकारांचे कार्यक्रम ऐकणे, सामाजिक संस्थांच्या मदतीसाठी आयोजित करणे, घरच्यांना बरोबर नेणे, उत्तम अभिरूची मुलांना देणे या सर्व गोष्टी ती करत आहे. कौतुकाचे क्षण सतत येतात. येत आहेत. पण या साऱ्या कौतुकात या साऱ्यांचा वाटा आहे. ही जाण मनाला व्रतापासून ढळू देत नाही. कारण कीर्तन काय, नाट्यगीत संगीत नाटक काय आजही उत्तम अर्थार्जनाचे ते साधन नाही. उत्तम संस्कार बिंबवण्याचे हे कार्य आर्थिक ओढाताण घेऊनच करावे लागते वा पुढेही असेच चालवावे लागेल, माहीत नाही. पण गुरूंचा आशीर्वाद, घरच्यांची साथ, सहकार्याचे प्रोत्साहन व रसिकांची दाद मला साऱ्या गोष्टींचा विसर पाडून व्रताच्या मार्गाने जायला शक्ती देत आहे. पुढे कधी खूप सुबत्ता येईलही पण त्याचाही विनियोग हा घरातील सर्वांच्या संमतीने आजही ठरविला आहे तो उत्तम कीर्तनकार तयार करणे, शाळा महाविद्यालयात कीर्तन पोचवून विद्यार्थ्यांना संस्कारित करणे. उत्तम गायक नट नायिका निर्माण करून उत्तम अभिजात नाटके लोकांपुढे आणणे. संगीत नाटकांच्या विविध व्हीसीडी मधे मी आहे. अलूरकरांच्या ऑडिओ कॅसेट मधेही माझी कीर्तने आहेत. पण जिवंत प्रत्यक्ष कीर्तनानंद लक्षावधी विद्यार्थ्यांपर्यंत विविध भागातून पोचवायला अनेक विद्यार्थी अनेक प्रचारक, अनेक शाहीर, अनेक समाजसेवा व्रती, अनेक विद्रोही साहित्याला उत्तम अभ्यासाने उत्तम साहित्य देणारे साहित्यिक खूप काही करायचे आहे. यासाठी माणसे मिळत आहेत, मिळतील. पण सर्व नेटाने काम करून समर्थांचे आनंदवनभुवन पुन्हा भारतात निर्माण व्हावे म्हणून सतत कार्यरत आहे. आशीर्वाद अपेक्षा सर्वांकडून.

चारुदत्त आफळे
१९२१, सदाशिव पेठ, भिकारदास मारुती मंदीर,
पुणे ३०



समर्पिता

शरद दळवी किंमत : २२०रु

रामायणकालापासूनच्या स्त्रीत्वाची दाहक कहाणी

# झेप...

## काश्मीरमधल्या पीडितांची दीदी :पंकजा वल्ली

**शब्दांकनः सुनीता दांडेकर**



# ...नव्या क्षितिजाची

**काश्मीर सारख्या प्रदेशात जेथे दहशतवादाने थैमान घातले आहे, जेथे जाण्याचा विचारही कोणी करणार नाही अशा ठिकाणी स्वत:च्या जीवाचीही पर्वा न करता सेवेचा तेजोदीप अखंडपणे चेतवणाऱ्या पंकजा वल्लीची ही रोमांचक कार्यगाथा**

**ही** कहाणी आहे एका विजेची. विजेसारख्या तेजानं तळपणाऱ्या एका तेजस्विनीची. तिच्यात विजेची आग आहे आणि ज्योतीची शांत स्नेहलताही आहे.

भारतात अनेक सामाजिक, राजकीय प्रश्नांनी उग्र स्वरूप धारण केले आहे. त्याचे पडसाद आपल्या कानापर्यंत पोहोचतात. वृत्तपत्रातल्या बातम्यांमधून आपल्या पर्यंत पोहोचलेल्या गोष्टी आणि प्रत्यक्ष परिस्थिती यात महदंतर असते. राजकीय नेते पुढारी या उग्र समस्यांचाही आपल्या प्रसिद्धीसाठी आणि राजकीय स्वार्थासाठी वापर करीत असतात.

पण अनेकजण असेही आहेत जे मूकपणे आणि अखंडपणे काम करीत आहेत. आपल्या जीवाचीही पर्वा न करता काम करणाऱ्या या व्यक्ती म्हणजे मानव्याचं, उदात्ततेचं जितंजागतं प्रतिक असतात. त्यांच्या अंत:करणात असतो तेजाचा, सत्याचा आणि करुणेचा अखंड तेवणारा तेजोदीप. त्याच्या उजेडात त्यांचं अंत:करण उजळून निघालेलं असतं. या तेजापुढं समोर येणाऱ्या साऱ्या संकटांची शक्ती जणू क्षीण होत असते.

ही कहाणी आहे अशाच व्यक्तीची. एका स्त्रीची पंकजा वल्लीची.

अं अं अम्मा ऽ अम्मा ऽ पापाजी पापाजी ऽऽ

ठो ऽ ठो ऽ ठो ऽ

आ ऽ ऽ ऽ

बंदुकींचे आवाज आणि हृदयभेदक किंकाळ्या यांनी सारा आसमंत भरून गेला. सगळीकडे रक्ताचा चिखलमासांचा नुसता चिखल झाला. आणि त्यातच दीड वर्षाची एक चिमुरडी अत्यंतिक भयानं रडत होती. अं अं अम्मा -

काश्मीरमधला डोडा जिल्हा. सततच्या दहशतवादानं जनजीवन विस्कळीत झालेले. पण भिऊन तरी किती दिवस राहणार? रोजचे व्यवहार तर करायला हवे. लोकांच्या मनात धैर्य निर्माण करणारे सोमराजजी. त्यांनी लोकांना धीर दिला. 'घाबरू नका. घाबरून राहिलात तरी मराल आणि नाही घाबरलात तरीही मरालच! जीवनच इतके क्षणभंगूर झाले आहे तर घाबरायचे कशाला? आहे त्या आयुष्यात छोटे छोटे आनंद जरूर साजरे करा.'

सोमराजजींच्या धीर देण्याने लोकांमध्ये जागृती होऊ लागली. आणि फेब्रुवारी मार्च महिन्यात दोन कुटुंबांनी लग्नाच्या वाजत गाजत मिरवणूकी काढायचे ठरवले.

आतंकवाद्यांना याचा सुगावा लागला. आपल्या दहशतीला हा सुरुंग आहे असे त्यांना वाटले. आणि ---

त्या वरातींवर त्या निरपराध स्त्री पुरुषांवर त्यांनी एके ४७ रायफलींनी बेछूट गोळीबार केला! २५ जण तर जागीच मेले. आणि कित्येक जखमी दवाखान्यात पोहोचेपर्यंतही तग धरू शकले नाहीत!

सोमराजजींना सर्वात जास्त गोळ्या लागल्या होत्या. २३ गोळ्या शरीरातल्या वेगवेगळ्या भागात घुसल्या होत्या. शरीराची

जणू चाळणच झाली होती. पण ते जिवंत होते!

आणि ती छोटी मुलगी? तिलाही गोळी लागली होती. पण तिचे आई वडील आणि सर्व नातेवाईक मारले गेले होते! काय करणार ती चिमुरडी?

तिच्यासाठी धावून आली ती पंकजा. तिनं त्या चिमुरडीला 'काकी'ला जवळ घेतले. तिची सुश्रुषा केली. आणि तिला सांभाळण्याचा निर्धार केला.

कोण होती ही पंकजा?

पंकजा एका तामिळी अय्यंगार कुटुंबातली मुलगी. विजयवाडा येथे राहणारी. घरचे वातावरण हे समाजकार्याला पोषक. वडील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे निष्ठावंत कार्यकर्ते आणि आई राष्ट्रसेविका समितीची ज्येष्ठ कार्यकर्ती. 'व्यक्तीच्या जीवनात समाजऋण हे महत्वाचे' असा संस्कार असलेले हे कुटुंब. त्यामुळे पंकजाने शिक्षणातही विषय निवडला तो समाजशास्त्र हाच. समाजशास्त्र या विषयात तिने एम. ए.ची पदवी मिळवली. आणि पुढील शिक्षणासाठी विशाखापट्टमला गेली. आणि तेथेच शाळेत शिक्षिका म्हणून रुजू झाली. एकीकडे समितीचे कार्यही करतच होती.

पण मनातली अस्वस्थता लपत नव्हती. आपले जीवितकार्य काही वेगळेच आहे याची जाणीव अंतर्मन सतत देत होते.

समाजासाठी आपण अधिक वेळ दिला पाहिजे ही धारणा स्वस्थ बसू देत नव्हती. आणि पंकजाने निर्णय घेतला. नोकरी सोडून पूर्णवेळ समितीच्या कार्याला वाहून घ्यायचे.

काही वर्षे इतर प्रान्तात काम केल्यावर १९९७ साली पंकजा जम्मू येथे हजर झाली. त्यावेळी जम्मूकाश्मीरमधील आतंकवाद शिगेला पोहोचला होता. इतक्या स्फोटक प्रदेशात पाय टाकायला कुणी धजत नव्हते. आणि आशावेळी पंकजाने जम्मू मध्ये प्रवेश केला.

सुरवातीलाच वर उल्लेख केलेला प्रसंग घडला. आणि परिस्थितीचे गांभीर्य पंकजाच्या लक्षात आले. तिचे मन विदीर्ण होऊन गेले. माणूसच माणसाशी इतक्या क्रूरपणे वागू शकतो? आपल्याच मुलाबाळांचे भवितव्य असे अंधारमय करून टाकण्याचा अधिकार यांना कोणी दिला? 'काकी' सारखी अजून कितीतरी मुले असतील की त्यांना दोन घास भरवणारेही कोणी भेटले नसेल! काय करतील ही मुले?

काय करणार? अशीच मुले तर अतिरेकी संघटनेत जमा होतात! आणि पुढे तीही तेच अत्याचार करतात! किती भयावह आहे ही परिस्थिती.

पंकजाचे मन तडफडू लागले. 'नाही हे थांबले पाहिजे! थांबलेच पाहिजे! मी थांबवेन हे सारे! माझ्या जीवाचे काही झाले तरी चालेल पण ही मुले वाचली पाहिजेत. त्यांना अतिरेकी होण्यापासून वाचवले पाहिजे.'

पंकजाचे विचारचक्र फिरू लागले. एव्हाना काकी तिच्या जवळच राहात होती. अशा मुलांना सांभाळण्याचे आणि एकत्र करण्याचे अवघड काम पंकजाने हातात घेतले. समितीचीच कार्यकर्ती असल्याने समितीने तिच्या या कामासाठी ५०००० रु. ची मदत पुरवली. पंकजाने सोमराजजींच्या मदतीने 'सुशीला सदन' सुरू केले. ६४टक्के अपंगत्व आलेल्या सोमराजजींनी आणि त्यांच्या पत्नीने सुशीला सदनच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आनंदाने स्वीकारली. 'सुशीला सदन' आज नेटाने आपले काम करत आहे.

अशा अनेक वर्षे दहशतीच्या छायेत असलेल्या प्रदेशात काम करताना अनंत अडचणी येतात. माणसांचे अनेक नमुने पहायला मिळतात. संकटं आणि दु:ख याचं इतकं विदारक दर्शन इथं घडतं की त्याच्या कल्पनेनंही अंगावर काटा उभा राहतो.

पंकजा ही सर्व आव्हानं पेलत अत्यंत कठीण काम करत आहे.

डोडा जिल्ह्यातल्याच टाटरी गावात आतंकवाद्यांनी हल्ला केला आणि कुटुंबच्या कुटुंब नष्ट केली. आख्खं गावच त्यांनी स्मशान बनवून टाकलं. या गावातल्या फक्त ३ मुली आणि २ मुले वाचली! त्यांनाही गोळ्या लागलेल्या होत्या.

या महाभयंकर संहारानंतर स्थानिक प्रशासनानं प्रथम काय केलं असेल तर पंकजाशी संपर्क साधला. आणि शुश्रुषेची विनंती केली. समिती आणि पंकजा त्या ठिकाणी धावून गेले. त्या गावाचं पुनर्वसन करण्यात समितीनेच पुढाकार घेतला.

एका मुसलमान मुलीला आतंकवाद्यांनी पळवून नेले. २३-२४ जण तिच्यावर रोज बलात्कार करीत. आठ महिने हा अत्यंतिक छळ त्या मुलीने सहन केला. आणि एक दिवस जीवाच्या कराराने ती निसटून आपल्या वडिलांकडे आली. पण वडील काय करणार? ते तर तिच्या पेक्षाही असहाय्य! वडिलांनी तिला सुरक्षेकरिता सेनाधिकाऱ्यांकडे नेले. व तिच्या सुरक्षेची विनंती केली. सेनाधिकाऱ्यांनी त्या मुलीला पंकजाकडे आणले. आणि तिचा सांभाळ करण्याची विनंती केली!

पंकजाने ही जबाबदारी आनंदाने स्वीकारली. समितीने ४ वर्षे या मुलीचा सांभाळ केला. अथक प्रयत्नाने आणि मध्यस्थीने तिचे लग्न एका मुसलमान मुलाशी लावून दिले. आज या मुलीने समिती कार्यासाठी स्वत:ला वाहून घेतले आहे. हिंदू मुसलमानांमध्ये असलेली द्वेषभावना नष्ट करण्याचा वसा या मुलीने घेतला आहे.

आतंकवादी मुलींवर बलात्कार करतात. मग त्यांना चरित्रहीन ठरवून समाजाबाहेर काढतात व त्यांना पाकिस्तानात नेऊन वेश्याव्यवसायास लावतात. आत्तापर्यंत पंकजाने अशांपैकी १६ जणींना वाचवून त्यांचे पुनर्वसन केले आहे.

तेथे ख्रिश्चन व मुसलमान मुलींना हिंदू मुलांशी लग्न करण्याची इच्छा असते पण अशा मुलींना मारून टाकले जाते. पंकजाने अशा मुलींना आईप्रमाणे आधार देऊन त्यांची लग्ने सुरळीतपणे लावून दिली.

अशी किती कामे सांगावी? दर दिवसाला पुढे काय वाढून ठेवले आहे हे माहित नसताना पंकजा विलक्षण निर्धाराने काम करत आहे. समितीच्या इतर प्रान्तातल्या कार्यकर्त्याही तिला वेळोवेळी मदत करतातच.

सेवाकार्यात तिच्या अंत:करणातल्या करुणेचा ओघ अनेकांना शांत करतो. तर संघर्षात जणू वीजच अवतरते.

अतिरेक्यांच्या 'ब्लॅक लिस्ट'मध्ये पंकजाचे नाव बऱ्याच वरती आहे. तिच्यावर केव्हा हल्ला होईल हे तिलाही माहित नाही. पण असा हल्ला झालाच तर तिच्या अंत:करणातील वीज कशा तऱ्हेने कडाडून उठेल. ते एक परमेश्वरच जाणे!

'समाजसेवा' या शब्दाला प्रसिद्धीचे आणि मानसन्मानाचे आवरण जोडणारे बरेच समाजसेवक असतात. त्यांना खऱ्या अर्थाने 'सेवा' करायची असते ती स्वत:च्याच प्रसिद्धीची पण जीवाचीही पर्वा न करता ज्या खचखळग्यातून आणि संकटांच्या पर्वतांवरून पंकजा वाट चालते आहे ती तिची वाट; तो प्रवास केवळ अद्वितीय!

राष्ट्र सेविका समिती, अहिल्या मंदीर,धंतोली, नागपूर ४४००१२

## माझी आवडती दहा पुस्तके स्पर्धा निकाल

### ८ सौ. अनिता मुसळे

| | | |
|---|---|---|
| १. | आमचा काय गुन्हा | रेणू गावस्कर |
| २. | अमृतवेल | वि. स. खांडेकर |
| ३. | असे संस्कार संस्कार | डॉ. स्नेहलता देशमुख |
| ४. | मृत्युंजय | शिवाजी सावंत |
| ५. | स्वामी | रणजित देसाई |
| ६. | सामर्थ्य तुमच्या मनाचे | विलास मुणगेकर |
| ७. | झटकून टाक जीवा | डॉ. राजेंद्र बर्वे |
| ८. | हॅरीपॉटर (१) जे. के. रोलिंग | अनु. विकास शुक्ल |
| ९. | झोंबी | आनंद यादव |
| १०. | दुनियादारी | सुहास शिरवळकर |

## आमचा काय गुन्हा

प्रथमत: मुखपृष्ठावरील निरागस बालकांचे फोटो, पुस्तकास साजेसे नाव, सहाजिकच पुस्तक वाचण्यास मन प्रवृत्त होते. या पुस्तकातील सर्व कथा हृदयस्पर्शी आहेत. अनेक राज्यांतून आलेली भटकी, उन्मार्गी, अनाथ, निराधार, बालगुन्हेगार अशा अनेक अवस्थेतील मुले या संस्थेत सांभाळली जावून त्यांच्या मनावर रेणूताई कशाप्रकारे संस्कार करतात, त्यात त्यांना येणाऱ्या अडचणी, आलेले अनुभव, डेव्हिड ससूनमधील प्रत्येक मुलांविषयीची त्यांना वाटणारी चिंता, मुलांचे आजचे हक्क, सामाजिक बांधिलकी, तो उद्याचा उत्तम नागरिक होण्यासाठीची त्यांची तळमळ, हे खरोखरीच मोठ्या धीराचे आणि संयमाचे काम आहे. हे पुस्तक वाचताना डोळ्यांच्या कडा ओल्या झाल्याशिवाय राहात नाही. यातील सर्वच कथा विचार करायला लावणाऱ्या असून प्रत्येक कथेवर समर्पक अशी चित्रे आहेत, पुस्तक वाचताना असे वाटते की आपण चित्रपट तर पहात नाही ना!

सी, १०१ अमरेंद्रश्री सोसायटी, गणेशमळा, पुणे - ३०

### ९ सौ. लता विद्वांस

| | |
|---|---|
| १. भेदिले सूर्यमंडळा | रवीन्द्र भट |
| २. दुनियादारी | सुहास शिरवळकर |
| ३. चौघीजणी | अनु.शान्ता ज. शेळके |
| ४. नॉट विदाऊट माय डॉटर | अनु. लीना सोहोनी |
| ५. नांगरणी | आनंद यादव |
| ६. तुंबाडचे खोत | श्री. ना. पेंडसे |
| ७. बर्म्युडा ट्रँगल | अनु.विजय देवधर |
| ८. स्वामी | रणजित देसाई |
| ९. मृत्युंजय | शिवाजी सावतं |
| १०.इट्स ऑलवेज पॉसीबल:किरण बेदी | अनु. लीना सोहोनी |

## नॉट विदाऊट माय डॉटर

ड्रेटाईटला राहणाऱ्या एका अमेरिकन स्त्रीस तिच्याच इराणी नवऱ्याकडून नातेवाईकांस भेटावयास जावयाचे आहे असे सांगून तिला तिच्या छोट्या मुलीसकट इराणला आणले जाते व तेथेच बंधक म्हणून ठेवले जाते. ज्या देशात स्त्रियांना कस्पटासमान वागणूक मिळते पाश्चात्यांचा तिरस्कार केला जातो त्या देशात राहण्याच्या कल्पनेने ती भयभीत होते व लवकरात लवकर तेथून मुलीसकट सुटण्याचा प्रयत्न सुरू करते. सुटकेचा मार्ग संकटमय व भयप्रद होता. आजपर्यंत असला प्रवास एका लहान मुलीस घेऊन कोणीही केला नव्हता. लेखिकेने आपल्या मनांतील वादळ अतिशय प्रभावी पद्धतीने मांडले आहे. एका आईची आपल्या मुलीसकट सुटण्याची धडपड पाहिली की आपल्या भावना हेलावून निघतात.

ओघवती भाषा, हृदयास जाऊन भिडणारे प्रसंग; प्रसंगांची मालिका इतकी सुंदर गुंफली आहे की सतत उत्सुकता वाटत राहते व एकदा वाचावयास घेतलेली कादंबरी पूर्ण करूनच ठेवतो. एका आईचे संवेदनशील मन, आपल्या लहान लेकरासाठी ती किती मोठ्या संकटांशी सामना करू शकते हे वाचून मन अचंबीत होते.

९३ लोकमान्यनगर, 'आल्हाद' इंदौर (मध्यप्रदेश) ९.



आज प्रत्येक गोष्टीचे तंत्र झाले आहे. स्वयं-अभ्यास, स्वयं-विकास, व्यक्तीमत्व-विकसन या आणि अशा विषयांना आज चक्क 'बाजारभाव' आलेला आहे. कारण अत्यंत वेगवान दिनक्रमात मुलांसाठी अधिक वेळ काढणे आईवडिलांना शक्य होत नाही. आणि मग शोध सुरु होतो मुला-मुलींच्या भावविश्वाचे पोषण करु शकणाऱ्या विविध उपक्रमांचा.

मुलांनी वेगवान स्पर्धेच्या युगात यशस्वी होण्यासाठी व्यक्तीमत्वविकास या विषयाच्या शास्त्रशुद्ध प्रयोगांची तीव्रतेने गरज वाटू लागली आहे.

परंतु यासाठी हवी मुलांबद्दलची आत्मीयता. अंतःकरणाची ऋजुता आणि आंतरिक ओढीने काम करण्याची प्रेरणा! अशा प्रेरणेने मुलांसाठी काम करणाऱ्या काही व्यक्तींचे हे विचारमंथन. त्यांनी मुलांसाठी केलेल्या विविध प्रयोगांची ही मालिका पालकांना, शिक्षकांना आणि सर्वांनाच उद्‌बोधक ठरेल.


राजीव तांबे १३५
सुरेखा पाणंदीकर १३७
माधवी कुंटे १४०
सुनीता नागपूरकर १४४
प्रकाश पारखी १५०
श्याम कुरळे १५४
मंजुषा आमडेकर १५८
अलका साठे १६२

## मुलांचे भावविश्व फुलविताना



# अभ्यास घेणारे? आणि सहवास देणारे?

**राजीव तांबे**

पालक सभांच्या वेळी हमखास विचारला जाणारा प्रश्न म्हणजे, 'मुलांचा अभ्यास कसा घ्यावा हो?' या कठीण आणि कळीच्या प्रश्नाचे उत्तर मात्र अगदी(च) सोपे आहे. (हृदयविकाराचा त्रास असणाऱ्या पालकांनी, पुढील उत्तर वाचण्याअगोदार 'स्वत:ची' काळजी घ्यावी.)

तर, मुलांचा अभ्यास घेऊच नये!

कारण 'घेता' येण्यासारखी ती गोष्टच नाही!!

हे (अनपेक्षित) उत्तर ऐकल्यावर, प्रश्न उभा राहतो की, मग करावे काय?

त्यासाठी आपल्याला 'गृहपाठ'या संकल्पनेचाच पुनर्विचार करावा लागेल.

**'गृहपाठ म्हणजे घरी करायचा अभ्यास नसून घराने करायचा अभ्यास आहे.'**

जेव्हा सारे घर मुलासोबत शिकू लागेल, मुलाचा प्रश्न हा आपलाच प्रश्न म्हणून शोध घेऊ लागेल तेंव्हाच मूल लवकर शिकू लागेल.

केवळ पाठ्यपुस्तक संपविणे किंवा धड्याखालची प्रश्नोत्तरे सोडवणे म्हणजे अभ्यास नव्हे. आणि न समजता केलेले पाठांतर/घोकंपट्टी म्हणजे तर अजिबात अभ्यास नव्हे!

पाठ्यपुस्तक आणि दैनंदिन जीवन याचा सहसंबंध ओळखायला/शोधायला मुलांना मदत करणे म्हणजे अभ्यास.

मुलांचं कुतूहल चाळवणं, त्यांना प्रश्न विचारायला उत्सुक करणं, आणि अतिशय मैत्रीपूर्ण वातावरणात त्यांनी स्वयं अध्ययन करावं यासाठी घरात पोषक वातावरण तयार करणं ही सुजाण पालकत्वाची महत्वाची लक्षणं आहेत.

मुलांचा अभ्यास जाणीवपूर्वक नक्कीच घेऊ नये. पण मुलांनी नकळत शिकावं यासाठी काही पुढील गोष्टी सूचविता येतील.

* रोज संध्याकाळी, दिवसभरात घडलेल्या वेगवेगळ्या गोष्टी एकमेकांना थोडक्यात सांगणे.
* शाळेतल्या गोष्टींबाबत गप्पा.
* पेपर/पुस्तक वाचून दाखविणे.
* फिरायला बाहेर पडल्यावर, आपणास माहित असलेल्या परिसराची सविस्तर माहिती सांगणे.
* गावातील वेगवेगळे कारागीर/कलाकार यांच्याशी बोलण्याची संधी मुलांना देणे.
* शून्य खर्चाचे, वेगवेगळे उपक्रम.
* मुलांची निरीक्षणशक्ती/ कुतूहल चाळवेल असे काही प्रश्न मुलांना विचारून, त्याचे उत्तर शोधण्यासाठी त्यांना प्रेरित करणे/मदत करणे (शोधून देणे नव्हे.)

उदा.१ स्कूटरमधे डिझेल भरलं आणि टेम्पोमधे पेट्रोल भरलं तर काय होईल? आणि तसेच का होईल? गावातील कुणी स्कूटरवालेकाका आणि टेम्पोवाले मामा यांना प्रश्न विचारून, (आणि शक्य असेल तर इंजीन दाखवून) मुलांनी उत्तर शोधणे सहज शक्य आहे.

२. साबुदाणे कुंडीत पेरले असता ते रुजतील का? त्यातून रोप येईल की येणार नाही? का?

* परिसरातील वेगवेगळ्या धर्माच्या प्रार्थना-स्थळांना भेटी देणे. तेथील रितीरिवाज जाणून घेणे.
* काही गोष्टी 'करून पाहण्यास' मुलांना

संधी देणे. आणि आलेल्या अनुभवांचे वर्गीकरण/विश्लेषण करण्यास त्यांना मदत करणे.

उदा.

१. पाच कप चहा करायला आणि पाच कप लिंबाचे सरबत करायला, सारखीच साखर लागेल का?

२. एक कप पाण्यात किती चमचे मीठ विरघळतं? जेव्हढं मीठ विरघळतं तेव्हढीच साखर पण विरघळते का?

३. एक किलो शेंगदाण्यापासून किती लिटर तेल मिळते असे वाटते? का? कसे शोधाल?

◆ **गप्पागोष्टी**

एव्हाना तुमच्या लक्षात आलं असेल, गप्पा-गोष्टी हे अभ्यासासाठी अतिशय प्रभावी माध्यम आहे. विशेषत: मुलांचे संवाद कौशल्य (म्हणजे मराठीत, कम्युनिकेशन स्कील्स्) विकसित होण्यासाठी हॅण्ड पपेटस्‌चा चांगला उपयोग होतो. हॅण्ड पपेटस् उपलब्ध नसतील तर साध्या खाकी किंवा पांढऱ्या लिफाफ्यावर चित्र काढले आणि त्यात हात घातला की झाले पेपर तयार.

अशी गमतीशीर पपेटस् मुलांच्या हातात घातली आणि त्यानी बोलावं म्हणून, त्यांना थोडी चावी मारली की, नेहमी अबोल वाटणारी मुले ही सरसरीतपणे बोलू लागतात. याची प्रामुख्याने तीन कारणे आहेत.

१. हातात पपेट् घातल्यावर, मुले चटकन परकाया प्रवेश करतात. नकळत स्वत:ची आयडेंटीटी विसरतात.

२. शिकविलेल्या किंवा पाठ केलेल्या नव्हे तर 'आपल्या स्वत:च्या भाषेत' समोरच्याशी संवाद साधतात.

३. आपण आपल्या मनातलं मांडू शकतो, संवाद साधू शकतो, याचा नव्याने साक्षात्कार झाल्याने त्यांचा आत्मविश्वास दुणावतो.

## भाषिक कौशल्ये

मुलांची भाषिक कौशल्ये विकसित करण्यासाठी पपेटस्‌चा वेगवेगळ्या प्रकारे उपयोग होतो. (याबाबत सविस्तर लेख, पुन्हा कधीतरी...) 'मासा आणि कासव' या दोन पपेटस्‌मधे झालेला संवाद, वानगीदाखल पुढील प्रमाणे होता :

मासा : ए बोल ना रे कासवा. तू नदीतला की समुद्रातला?

कासव: अं... मी समुद्रातला!
मला खारं पाणी पिऊन जाम कंटाळा येतो.

मासा : आज मी खूश आहे, कासवा!

कासवा: का रे?

मासा : अरे आज गुरुवार आहे. आज मला कुणी कापणार नाहीत! खाणार नाहीत!!

कासव: हां! म्हणजे तुझं नाव पापलेट!!

## गणित

गणिताचा अभ्यास म्हणून विचार करताना, काही गोष्टी कटाक्षाने लक्षात ठेवल्या पाहिजेत, त्या अशा :

* गणिताविषयी भीती/अनास्था निर्माण होईल असे काही बोलायचे नाही.

* गणित हा विषय प्रत्यक्ष अनुभवाचा आणि अनुभवण्याचा आहे. त्यामुळे बेरीज, वजाबाकी, गुणाकार आणि भागाकार या चार मूलभूत क्रियांचा प्रत्यक्ष अनुभव देणं अत्यंत गरजेचं आहे. त्याचप्रमाणे या चार मूलभूत क्रियांचा परस्परसंबंध उकलण्यास त्यांना मदत करणे तितकेच आवश्यक आहे.

* गणिताचे आपल्या दैनंदिन जीवनातील स्थान काय? रोजच्या व्यवहारात त्याचे महत्त्व काय? गणितच नाही, असा कुठल्या व्यवहार/कुठली कृती आहे का? याविषयीची जाणीव त्यांना करून देणे, किंबहूना याबाबत त्यांना सजग करणे.

* गणित म्हणजे 'करून पाहा आणि शोधून काढा' यासाठी त्यांना उद्युक्त करणे.

## सर्वात महत्त्वाच्या दोन गोष्टी :

१. गणित सोडवताना जर मुलाची चूक झाली, तर त्याला 'तू चुकलास' असे न म्हणता आणि त्याची फक्त चूकच त्याला न दाखवता, 'काय बरोबर आहे' हे त्याला दाखववावे! आणि... थोडासा प्रयत्न केला तर, तो बरोबर गणित करू शकतो, हा विश्वास त्याच्यात रुजवावा!!

२. अशी शक्यता असू शकते की, मुलाने विचारलेल्या एखाद्या गणिती प्रश्नाचे उत्तर, आपण चटकन देऊ शकत नाही. अशावेळी त्या प्रश्नाचे उत्तर, मुलासोबत शोधण्यास/मुलासोबत शिकण्यास अजिबात कमीपणा वाटून घेऊ नये.

खरं म्हणजे, शिकवणं नव्हे तर सोबत शिकणं, एकमेकांच्या मदतीनं आपापल्या कक्षा रुंदावणं म्हणजेच अभ्यास घेणं नव्हे तर अभ्यास अनुभवणं! एकमेकांच्या साथीने!!

चालणाऱ्या मुलाला कडेवर घेणं म्हणजे त्याला मदत करणं नव्हे तर त्याला शिकण्यापासून/अनुभवापासून वंचित करणं. मुलांना अभ्यास करताना दरवेळी तुमचा सहभाग नको, तर 'तुमचा सहवास'हवा आहे.

तुमच्या आश्वासक सहवासाने प्रेरित होऊन मुले अभ्यास करतात, तुमच्यापासूनच प्रेरणा घेतात...पण...तुम्हाला उगाचच वाटतं, की 'तुम्ही त्यांचा अभ्यास घेता!'

खरं सांगा, तुम्हाला काय वाटतं?

तुम्ही फक्त घेणारे? की सहवास देणारे?

मला कळवाल?

तुमच्या 'सहवास पत्रांची' मी वाट पाहतोय.

ए/२०२ पूर्णिमादर्शन,श्रीखंडे वाडी,
डोंबिवली (पू) ४२१ २०१.
फोन नं.९५२५१-२४५४३४३
मो.०९३२२३९९८५९

# मुलांचे भावविश्व फुलविताना



# ऐका कहाणी ऐका कहाणी

**सुरेखा पाणंदीकर**

'सुनो कहानी' म्हणजेच 'ऐका कहाणी' अशी झांज वाजवत मी सुरुवात केली की मुलंच काय पण गावातली मोठी माणसंसुद्धा गोळा व्हायची. कारण कथाकथन हे एक आकर्षक माध्यम आहे.

आपण भारतीय तर गोष्टीवेल्हाळ. त्यामुळेच आपल्याकडे कथाकथनाची परंपरा प्राचीन व जिवंत आहे. आपण कथाकथनाचा प्रभाव व महत्त्व जाणले आहे. त्यामुळेच 'मृत्यूनंतर काय?' सारख्या सखोल अध्यात्मिक प्रश्नाची चर्चा ही नचिकेत व यम यांच्या गोष्टीतूनच केली गेली आहे.

गौतम बुद्धांनी ज्ञान प्राप्त झाल्यावर बौद्धधर्माची शिकवण लोकांना कळेल की नाही हे पहाण्यासाठी मुलांबरोबर वीस दिवस घालवले. गोष्टीरूपाने त्यांना नवधर्माचे सार सांगितले आणि नंतरच प्रचाराला सुरुवात केली. त्याच गोष्टी पुढे जातक कथा म्हणून थोड्याबहुत फरकाने प्रसिद्ध झाल्या.

**भारताला 'विश्वाचा कथाकार' म्हणून ओळखतात. आपल्याकडे लोककथा, धर्मकथा व रामायण, महाभारताच्या व इतर कथांचा इतका प्रचंड खजिना आहे.**

ह्या कहाण्या सांगूनच आई-वडील, आजी-आजोबा मुलांना साहित्याची ओळख करून देत असत. साहजिकच मुद्रणकला आल्यावर गोष्टी पुस्तकातून छापल्या जाऊ लागल्या तेव्हा मुलं वाचूही लागली.

इलेक्ट्रॉनिक माध्यमांमुळे सध्या वाचन कमी होऊ लागलं आहे. म्हणून गोष्टी सांगून पुन्हा मुलांना पुस्तकाकडे व वाचनाकडे आकर्षित करायला पाहिजे.

**कथाकथन हे इतर माध्यमांपेक्षा सोपे व बिनखर्चाचं आहे. हे ओळखूनच आज प्रकाशक, पुस्तक विक्रेते ह्या माध्यमाचा उपयोग करायला तयार होत आहेत.**

वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी काय करावे? गोष्टी सांगताना जर पुस्तकातील चित्रे दाखवली तर मुलं गोष्ट संपल्यावर लगेच पुस्तके विकत घ्यायला तयार होतात, असा आशय नॅशनल बुक ट्रस्टच्या पुस्तक यात्रेत राजस्थानच्या प्रत्येक गावात आला. तेव्हा मी सांगितले की तुमच्यातून जो कोणी गोष्ट, चुटके किंवा कोडे घालेल त्याला मी पुस्तके देईन. मग गोष्ट सांगण्यासाठी मुलांची धक्काबुक्की व्हायची. प्रत्येक गावात २०-२५ पुस्तकं मला द्यावी लागायची. पण मला आनंद वाटायचा की माझ्या गोष्टी ऐकल्यामुळे मुलांना पुस्तके वाचण्याची इच्छा झाली. दुसरीकडे वाईट वाटायचं की आपण मुलांना स्वस्त पुस्तकं देऊ शकत नाही.

गोष्टी सांगून मनोरंजन, तर होतेच पण शालेय अभ्यासाचे विषयही सोपे करून शिकवता येतात.

औरंगाबादला नॅशनल बुक ट्रस्ट व महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग आयोजित शिक्षकांच्या प्रशिक्षण/वर्कशॉपमध्ये हत्ती व कुत्रा ह्यांच्या दोस्तीची गोष्ट सांगण्यात आली. तेव्हा त्या अनुषंगाने अनेक विषयांचे संदर्भ स्पष्ट झाले.

भूगोल - हत्ती कुठे जास्त असतात - केरळमध्ये - केरळ कुठे आहे - भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर.

हत्ती काय खातो - ते कुठे विकतं?

अशा तऱ्हेने मुलांशी संवाद साधत, गोष्टीतून सामान्य ज्ञानही देता येते.

सामान्य ज्ञान - हत्ती राजाची स्वारी - पण आता राजा नाही तर लोकशाही आहे - म्हणजे आपल्या सर्वांचं राज्य मग कुत्र्याची त्याची मैत्री - टाटाटूट इ.

इतर अनेक गोष्टींचा उपयोग गणित शिकवायलासुद्धा होऊ शकतो.

इतिहास म्हणजे तर काय गोष्टच. गोष्टीरूपाने ऐकल्यावर एक अध्यापिका म्हणाल्या, मी २२ वर्षे मुलांना शिकवते आहे. पण असा अनोखा प्रयोग करण्याचे सुचले नाही. पण आता नक्की त्याचा वापर करू.

राजस्थानमधल्या पुरुष शिक्षकांना वाटायचे की गोष्टं सांगणे हे बायकी काम. आपण नाही करणार, आपल्याला नाही जमणार. कारण आम्हाला गोष्ट सांगायला येतच नाही. अन् आता रिटायरमेंटला आल्यावर काय करायचे शिकून? मी म्हणाले, आताच जास्त जरुरी आहे, कारण **रिटायर झाल्यावर तुम्हाला मोकळा वेळ असेल तेव्हा आजूबाजूच्या मुलांना गोष्टी सांगून तुम्हाला आनंद व ज्ञान देता येईल.''**

परवाच देवेशभाईंचं पत्र आलं : 'सुरेखाजी, आपकी बात एकदम सही. मै रिटायर होकर कहानियाँ सुनाकर पढने की आदत बच्चोंमे डाल रहा हूँ और मैं बालपुस्तकालय शुरू करना चाहता हूँ।'

राजस्थानच्या 'कामा' गावातला पाच वर्षांचा नन्हू माझ्या मांडीवर बसला. गावातल्या लोकांना वाटलं शहरी बाई चिडणार; पण आमची इतकी मस्त मैत्री झाली की नंतर गावातल्या लोकांनी दिलेल्या तिखट जेवणाने माझ्या डोळ्यात पाणी आलं तर ह्या नन्हूने धावत जाऊन गुळाचा खडा आणला 'ल्यो खाल्यो' म्हणत माझ्या तोंडात घातला आणि आपल्या चिकट हातानेच माझ्या डोळ्यातले पाणी पुसू लागला.

**कथाकथनाचा उपयोग मानसिक संतुलन बिघडलेल्या मुलांवर उपचार म्हणून होऊ शकतो.** गुजरातच्या भूकंपानंतर व आता सुनामीमुळे अनाथ झालेल्या डिप्रेशनमध्ये गेलेल्या मुलांमध्ये पुन्हा जगण्याची आशा निर्माण करण्यासाठी आम्ही केला. कथा कथन, बालगाणी म्हणत आम्ही त्यांना रंगीत आकर्षक चित्रांची पुस्तकं दाखवायचो. सुरुवातीला नाही पण दोनतीन गोष्टी ऐकल्यावर, गोष्टी बरोबर असलेल्या पपेटस पाहून मुले आपल्या एकाकी कोशातून बाहेर येऊ लागली. दुसऱ्या दिवशी तर काही मुले मांडीवर बसत, हाताशी लोंबकळत व साडीच्या पदराशी खेळत आपलेपणा दाखवत होती. नेहमी आपलं प्रेमाचं माणूस म्हणजे आई, आजी-आजोबाच गोष्ट सांगतात, त्यामुळेच गोष्ट सांगणाऱ्या आम्हाला मुलं आजी किंवा मावशी म्हणत. चार दिवसांनंतर निरोपाच्या वेळी सगळ्यांचेच डोळे भरून आले.



**राष्ट्रीय बालपुस्तकालय संमेलनात**
**छोट्या व मोठ्या प्रतिनिधींसाठी कथाकथन (२९ एप्रिल २००५)**

'मछ्छलीपट्टनम्'मध्ये सोप्या इंग्लिशमध्ये गोष्ट, चित्र, पपेटस व झांजांच्या नादावर गाणी ह्यांद्वारे संवाद साधला. त्यांच्याबरोबर सुरवातीपासून असलेली शासकीय समाजसेवक व कलेक्टर म्हणाले की गेल्या सहा महिन्यांत म्हणजेच सुनामीच्या तडाख्यानंतर आज पहिल्यांदा या मुलांना हसताना पाहतो आहोत. **कलेक्टर राधाकृष्णन यांनी 'कथाकथन' हे पण एक 'स्ट्रेस मॅनेजमेंटचं' साधन होऊ शकतं हे सांगितलं.** बिल क्लिंटननी गौरव करून त्यांना अमेरिकेतील विद्यापीठातून 'स्ट्रेस मॅनेजमेंट'वर भाषण देण्यासाठी आमंत्रण दिले.

सिंगापूरच्या बालगुन्हेगार संस्थेतला अनुभव तर विलक्षण.

सुरुवातीला आठ ते पंधरा वर्षांची मुलं आम्हाला कथाकथन नको म्हणत पाठ फिरवून बसली. मी म्हटले, 'ठीक आहे. आपण गाणी म्हणू या. कुठलं म्हणूया बरं!' त्यावेळेस शाहरुखखानचं 'समझ सको तो समझो दिलवर जानी, हम है हिंदुस्थानी. थोडे ऐसे है थोडे वैसे भी' त्या मुलांना तोडक्या-मोडक्या शब्दांत पण चालीत येत होतं. मग आम्ही गाणं म्हटलं. झांजाच्या तालावर त्यांच्याबरोबर नाच केला. नंतर 'We shall overcome' म्हटले.

'आता थकलो ना बसून गोष्ट ऐकू या' म्हटल्यावर 'हो' उत्तर आलं. अन् मी वाल्या कोळ्याचा वाल्मिकी कसा झाला ही गोष्ट सांगितली.

जेव्हा परत निघाले तेव्हा आपल्या सावत्र बापाच्या खुनासाठी संस्थेत आणला गेलेला, रॉन नावाचा मुलगा, मला मिठी मारून विचारू लागला ''मॅम मला वाल्मिकी होता येईल? मला व्हायचंय. मला पण कविता - रामायणासारखी लिहायची आहे.''

मी म्हटलं, ''का नाही होणार वाल्मिकी तू? अभ्यास कर.



**'सुनामी' च्या काही मुलांशी गोष्ट सांगून ओळख करून घेत आहे. (मे २००५)**

पुस्तकं वाच. तुझ्या शिक्षिकांचं व वॉर्डनचं ऐक. नक्की होशील वाल्मिकीसारखा आणि मला कविता पाठव मात्र हं.'

मधूनमधून संस्थेच्या डायरेक्टरचं पत्र येतं की रॉन खूप सुधारला आहे. आता तो स्कूल फायनलला बसणार आहे. त्याच्या दोन कविता सिंगापूरच्या बालमासिकात प्रसिद्धही झाल्या आहेत.

असा आहे गोष्टींचा चमत्कार!

पण नेहमीच सुखद अनुभव येतात असे नाही.

एकदा दिल्लीतल्या प्रतिष्ठित शाळेत सातवी-आठवीच्या मुलांना 'हिंदी दिवसा'निमित्त कथाकथन करायला बोलावलं.

ही मुलं म्हणजे श्रीमंताची लाडावलेली मुले. 'आम्हाला नाही हिंदी बोलायचं.' तुमची मातृभाषा कोणती? गप्प. घरी कुठल्या भाषेत बोलता? घरी कोणाशी बोलायचं? मम्मी-पप्पा नसतातच. शाळेच्या नियमानुसार मुलांना शिक्षाच काय पण जोरातही बोलायचं नाही हे आम्हाला शिक्षकांनी सांगितलं. पोरं नळीतून फुंकत एकमेकांना फुटाणे मारत होती. विशेषत: मुलींना मी रागावले तर म्हणे 'तुम्हाला तर नाही मारले.' 'मारूनच बघा माझ्या हातात भरपूर जोर आहे.' मी म्हणाले. अन झांजा वाजवत साथीदारांबरोबर नर्सरीतल्या मुलांना शिकवतात ते 'मछली जलकी रानी है' शिशुगीत सुरू केले. ती मुलेही गाऊ लागली. आणखी दोन-तीन कविता म्हटल्यावर 'बंदर बंदर मस्त कलंदर' ची गोष्ट सुरू केली. खरं तर ती गोष्ट पाच-सहा वर्षांच्या मुलांना सांगते. मी ती सांगितली तर ती मुले त्यात रंगून गेली. कारण त्यांचं हिंदीचं ज्ञान इंग्लिशच्या वर्चस्वामुळे तेवढंच होतं. राग आला पण वाईटही वाटलं की ह्यांना आईबापाचं प्रेम मिळत नाही. त्यांच्या शिक्षिका म्हणाल्या, 'मॅडम, पहिल्यांदा मुलं इतकी समरस झालेली पाहिली. आम्हाला तर ऐकतच नाहीत. पगार चांगला मिळतो म्हणून आम्ही नोकरी करतो. घरी त्यांना प्रत्येक विषयासाठी शिक्षक. बारावीला साठ टक्के मार्क ट्यूशनच्या जोरावर मिळवून ही पोरं परदेशात शिकायला जातात. मग वर्गात कशाला लक्ष देतील? आई-वडिलांना वेळच नाही, म्हणून शाळेत पाठवतात एवढंच.

ह्याच्या उलट दिल्लीच्या झोपडपट्टीतल्या किंवा कार्पोरेशनच्या सरकारी शाळांचा अनुभव. मुलं कथाकथनात इतकी रंगून जातात की सोडत नाहीत. दक्षिण आफ्रिकेच्या केपटाऊनमधल्या गरीब मुलांच्या शाळेतही असाच अनुभव आला. तिथे तर मुलांनी गोष्टींबरोबर भारतीय नाच शिकवा म्हणून हट्ट धरला, तेव्हा मी चक्क आपला झिम्मा शिकवला व 'सर सर गोविंदा येतो' म्हटलं. पोरं, शिक्षक व पालक सगळे सामील झाले. त्याची व्हिडिओ फिल्म घेतली. अशीच फिल्म हॉलंडमध्ये कथाकथनाच्या भारतीय पद्धतीवर भाषण केलं तेव्हा घेऊन हॉलंड टीव्हीवर दाखवली.

मूल जेवत नसेल तर भीम किंवा हनुमानाची गोष्ट सांगून आई त्यांना जेवण खायला लावते.

तुमचे स्पायडरमॅन, सुपरमॅन अलिकडचे. आमचे हनुमान, भीम शतकानुशतके मुलांचे 'हिरो' आहेत.

मुलांना रामापेक्षा हनुमान आवडतो कारण तो काहीही करू शकतो. आकाशात उडून डोंगर आणतो. पाताळात जाऊन राक्षसांना मारतो. भीम गाडाभर जेवण खाऊन बकासूराला मारतो.

आजी किंवा आजोबा छानछान गोष्टी सांगतात. कथाकार देवळात अगर गावातल्या चावडीत, मैदानावर पुराणातील गोष्टी सांगत. सद्य:परिस्थितीशी तिला जोडत.

अशा तऱ्हेच्या कथाकथनाचं प्रात्यक्षिक दाखविल्यावर एक शिक्षक म्हणाले, 'My God you are genius'.

तर म्हटलं, 'मी जिनीयस नाही. आमची संस्कृती व परंपरा जिनीयस आहे, कारण कथाकथनाच्या द्वारे आम्ही उत्तम संस्कार, ज्ञान, मनोरंजन सर्व साधतो. बालपणापासूनच संस्कार झाले पाहिजेत नाही का?

डब्ल्यू -२, ग्रीन पार्क,नवी दिल्ली - ११० ०१६.
फोन : ६५१८७२२,६९६८८५६

# मुलांचे भावविश्व फुलविताना



## झोपडपट्टीतल्या मुलांचं जग

माधवी कुंटे

माझे शाळेतले पहिले दिवस फार कसोटीचे होते. तसं पाहिलं तर शिक्षकाचा प्रत्येक दिवस त्याच्या सहनशक्तीची, समजून घेण्याच्या ताकदीची, समजून सांगण्याच्या ताकदीची परीक्षा पाहणारा असतो. पुढे पुढे शिक्षक सरावतो तरीही परीक्षा असतेच.

मी ज्या शाळेत नोकरीला सुरुवात केली ती हिंदी माध्यमाची शाळा होती. एका ओढ्याच्या काठाला शाळा होती आणि तीनचतुर्थांश मुलं ओढ्यापलिकडच्या झोपडपट्टीतून येत. सुरुवातीला संख्या कमी होती आणि मुलांचा समुदाय हा सर्वसमावेशक होता. म्हणजे सर्व जातीधर्मांची, अगदी जैन, शीख, हिंदू, मुस्लिम अशी मुलं होती.

शाळेच्या सुरुवातीला पावसाळ्याचे दिवस! पाठचा ओढा अगदी सुसाट वाहत असे. बहुतेक वेळा मधल्या सुट्टीनंतर पाचव्या तासाला बरीच मुलं नसायची. नंतर सहाव्या तासाला मुलं आली तर खालचे पाय घाणेरडे, अंग भिजलेले असा प्रकार असे. मी आठवी हिंदीची वर्गशिक्षिका होते. तेव्हा प्रिन्सिपॉलना सांगून टाइमटेबलमध्ये थोडा फेरफार करून घेतला आणि आठवड्यात तीन दिवस पाचव्या तासाला माझ्या वर्गावर जाऊ लागले. पाचव्या तासाला मी परत झटपट हजेरी घेतली.

तेव्हा मॉनिटरला बाजूला घेऊन विचारलं की, 'ही मुलं सकाळी हजर होती. आत्ता कुठं गेलीत तुला माहित आहे का रामशरण?'

तो म्हणाला, 'बेहेनजी आधे जन पीछे नदीपर मछली पकड रहें हैं! कोई लोग 'नंबर टू' के लिये गये हैं!'

हा काय प्रकार आहे मला समजेना. मी आधी वर्ग मॉनिटरच्या ताब्यात देऊन प्रिन्सिपॉलना सांगून ओढ्याकाठी गेले.

आमचे आठ-दहा बहाद्दर ओढ्यात गुडघ्यापर्यंत पाण्यात उभे! त्यांच्या हातात साड्यांची धडुती होती ती त्यांनी दोघादोघांनी मिळून पाण्यात धरलेली. वहात्या पाण्याबरोबर अगदी बारक्या मासोळ्या त्यात आल्या की दोघं जण ते कापड उंच उचलत. पाणी गळून गेलं की छोट्या मासोळ्या काठाला आणून टोपल्यात टाकत.

मी पुढे आल्यावर सगळे स्तंभित झाले.

मी वैतागून म्हटलं, "अरे, हे काय चाललंय? ह्या चिखलात तुम्ही माखून घेता आहात, ओले होता आहात. हे नसते उद्योग काय करताय? आणि पाचवा तास सरळ बुडवताय काय? तुमच्या आईवडिलांच्या कानावर हे गेलं तर? म्हणजे मी तर तसं सांगणारच आहे. काही शिस्त आहे की नाही?"

त्यांच्यापैकी गिरीश जरा धिटाईनं म्हणाला, "बहेनजी, माँ ने ही कहा था, कुछ मछली मिले तो ले आना! रोटी तो है नही! चावलके साथ कुछ बना लेंगे!"

"और सामता प्रसाद कहाँ गया है?"

"बहेनजी वह दो नंबर के लिये गया है!"

"का? सकाळी जाता येत नाही का?"

"बहेनजी, दोनच संडास आहेत. तिथे मोठी

लाइन असते. मोठी माणसं आमच्यावर डाफरतात की बाहेर तिकडे बसा. तिकडच्या रिकाम्या जागा घाण झाल्या आहेत. मग नंबर लागेतो उशीर झाला तर शाळेला उशीर होतो.''

''चार वाजता उठायचं मग!''

''बेहेनजी त्याची आई भाजी विकते. शाळा सुटल्यावर तो आईबरोबर भायखळ्याला जातो. रात्री भाजीच्या जुड्या बांधतात. नंतर गृहपाठ करतो. झोपायला बारा वाजतात.''

या मुलांपैकी बहुतेकांनी सकाळी अंघोळी केलेल्या नसायच्या. कारण पाणीच मिळायचं नाही आणि बरीच जणं म्हशींच्या तबेल्यात कामं करायची. कुणी तबेल्यात झोपायचं. म्हशींच्या अंगाला ते राईचं तेल लावत आणि तेच तेल स्वत:च्या अंगाला लावून घेत. युनिफॉर्म एकच! तो धुतलेला नसायचा. ह्या सगळ्यांमुळे वर्गात एक विचित्र दर्प पसरलेला असे. कित्येक जणांच्या पायात चपला नव्हत्या. आधी मूलभूत गरजाच पूर्ण होत नव्हत्या. आयुष्यात सगळ्याचीच वानवा होती. मी हे सगळं पहिल्यांदा अनुभवत होते. याहून वाईट गोष्टी मुलांकडून ऐकत होते. सुरुवातीला काही मुलं बेरड वाटायची. उद्धट आणि अभ्यास नकोच असा पवित्रा असलेली मुलं पाहिली की राग यायचा.

## प्रगती

प्रगती ही त्या पैकी एक मुलगी. तिला बघितलं की मला चीड यायची. कितीदा तरी मी तिला वर्गाबाहेर काढायची. मग एकदा वर्गातल्या मुलांची जुहूबीचला ट्रीप न्यायची ठरली. दहा रुपयेच प्रत्येकानं द्यायचे होते. एकटी प्रगती येणार नव्हती. का? तर तिला घरून पैसे मिळणार नव्हते. शेवटी तिचे पैसे मी भरले. त्या ट्रीपमध्ये प्रगती मोकळी झाली. तिची एकच खोली. सावत्र आई. बाप दारू पिऊन घरी आला की प्रगतीला रात्री घराबाहेर काढे. मग एक दीड तासानं तिला आत जायला मिळे. घरात अखंड काम आणि शिव्यांचा राबता होता. सावत्र आईचं तान्हं बाळही सांभाळावं लागे. गृहपाठ होणार कुठून? केस कुठून विंचरणार? कपडे केव्हातरी धुणार. युनिफॉर्म वाळला नाही तर? तोंडात शिव्या आणि अंगात बेडरपणा असल्याशिवाय जगणं शक्यच नव्हतं. बहुतेक मुलांची अशी वेगळी चित्तर कथा होती.

ते सगळं ऐकल्यावर माझा जीव घुसमटून जाई.

इथे मी कोणते नियम अंमलात आणणार होते?

कशा तऱ्हेनं शिस्त लावणार होते?

## अर्जुन

पाचवीत शिकणाऱ्या अर्जुनला एकदा मी म्हटलं होतं की, ''तू अभ्यास करत नाहीस, मग मोठेपणी काय करणार? हे असं उनाडून तू तुझ्या आईवडिलांसाठी कमाई करून त्यांना सुखात कसा ठेवणार?'' त्यावर तो म्हणाला होता, ''बेहेनजी, मै बडा होकर स्मगलर बननेवाला हूँ!'' त्याक्षणी मी अवाक् झाले.

माझी चूकही माझ्या लक्षात आली. शिक्षणाचा मी कमाईशी संबंध जोडायला नकोच होता. ह्या मुलांना रागावून मारून ओरडून काही उपयोग नव्हता. त्यांना मान्यताप्राप्त शिस्तीचे नियम लावता येणार नव्हते. त्यांची परिस्थिती आणि त्यांची धारणा मी कशी बदलू शकणार होते? त्यांचे आईवडील मला बेशक म्हणायचे, ''बेहेनजी, इसे अब आपके हवाले किया है! आप इसे मारो, काटो, जान लेलो हमें कोई शिकवा नहीं! हमे मत बुलाना!'' ह्या मुलांच्या गरजा जाणणं, त्यांना समजून घेणं, त्यानुसार काही गोष्टी करणं हा एक प्रयोगच होता. नंतर मग एकंदर शिकण्यात त्यांना रस उत्पन्न होईल, आनंद वाटेल अशा काही गोष्टी करायला हव्या होत्या.

प्रगतीला जेवण मिळत नव्हतं. तिच्यासाठी मी घरातून माझ्या डब्यात पोळी-भाजी जास्त आणू लागले. अक्रमकडे चपला नव्हत्या. मी वर्गातून वर्गणी काढून त्याला साध्या चपला घेतल्या. आमच्या शाळेचे एक ट्रस्टी श्रीमंत गृहस्थ होते. त्यांच्याकडे मी गेले. आणि एकंदर चर्चा करून प्रत्येकासाठी युनिफॉर्मची दुसरी जोडी मिळवली.

बहुसंख्य मुलं अंबावाडीच्या वस्तीत राहात. तिथल्या चार प्रतिष्ठित दुकानदारांशी चर्चा करून मुलांना रात्री अंघोळीला पाणी मिळेल अशी व्यवस्था करायला हवी असं सांगितलं. म्युनिसिपालिटीकडे अर्ज करून तिथे तीन सार्वजनिक नळांची व्यवस्था झाली. मुलांना मी निक्षून सांगितलं की आता तुम्ही रात्री अंघोळ करायची आणि तुमचे कपडे रात्री धुऊन टाकायचे. नखं, हात, पाय, डोकं स्वच्छ हवं.

वर्गात काही हुशार मुलं होती. काही श्रीमंत घरातून येणारी दुकानं असलेली इतर व्यापार असलेली मुलं होती. वर्गातील मुलांचे गट पाडून एकेका गटात पाच मुलांची विभागणी केली आणि त्या त्या गटप्रमुखानं गटातील मुलांच्या अडचणी शक्यतो एकत्र येऊन सोडवायच्या. गरज लागली तर मला सांगायचं असं ठरवलं. अभ्यासाला वेळ न मिळणं आणि जागा नसणं ही मोठ्यात मोठी अडचण होती. मुलं जर जेऊन परत क्लाससाठी म्हणून शाळेत आली तर तेवढा वेळ अनिवार्यपणे आईवडील त्याला काम सांगत नाहीत. स्वत: कसंही जमवून घेतात हे लक्षात आल्यावर मी आमच्या प्रिन्सिपॉल सरांना विनंती केली, की ह्या मुलांना अभ्यासासाठी थोडी जागा शाळेत देऊ करावी.

सर हसले आणि म्हणाले, ''आपल्या शाळेच्या गुजराती माध्यमाची मुलं ठीकठाक घरची आहेत. पण हिंदी माध्यमात बहुतेक मुलांची ही अवस्था आहे. सगळ्यांना कुठून जागा देऊ? दुपारचं सत्र लगेच सुरू होतं. वर्ग रिकामे नसतात. ग्राऊन्ड अपुरं आहे. तीन वर्ग एकदम पीटीला आले तरी पंचाईत होते.'' पण मी चिकाटीनं सरांशी बोलणं चालू ठेवलं.

शाळेच्या तीन लहानलहान इमारती होत्या 'यू' शेपमध्ये होत्या. त्यांपैकी दोन इमारतींच्या बेचक्यात मोकळी जागा होती. तिथे एक मोठं झाडही होतं. त्याचा आधार घेऊन त्या जागेवर शेड घालून घेतली.

तिथे गटप्रमुखांबरोबर मुलं येऊ लागली. स्पेलिंग घोकून घेणं, स्पेलिंगचे भाग पाडून त्यानुसार लक्षात ठेवणं, प्रश्नोत्तरं करणं, धड्याचं रूपांतर नाटकात करणं, एकमेकांची प्रश्नोत्तर म्हणवून घेणं, वह्या एकमेकांमधे बदलून प्रश्नोत्तरं तपासणं, सुविचार मिळवणं अशा अनेक गोष्टी ह्या पत्र्याखालच्या वर्गात चालू झाल्या. एकमेकांच्या संगतीनं अभ्यास अगदी छान होऊ लागला. हा अभ्यासवर्ग सुरू होऊन प्रत्येक गटाचं ठरलेलं काम सुरू झालं की मी निघत असे. माझ्या खर्चाने मी दोन-तीन डिक्शनरी आणल्या. काही माहितीपर पुस्तकं आणली. अभ्यासवर्ग संपला की मुलं ती पुस्तकं शाळेच्या छोट्याश्या ग्रंथालयाच्या ग्रंथपालाकडे देत.

ग्रंथपालांच्या मागे मी लागले होते की कुठून तरी एन्सायक्लोपीडिया मिळवा. शाळेनं दिलेल्या रकमेत एवढा महागडा संच त्यांना घेणं शक्य नव्हतं. शिवाय इंग्रजी एन्साक्लोपीडिया मुलांना कसा समजणार? ही एवढी पुस्तकं ठेवायला कपाटही अडलं असतं. अशा त्यांच्या अडचणी होत्याच.

बाबूलाल म्हणून माझा एक विद्यार्थी होता. त्याच्या वडिलांचं रेल्वे लेव्हल क्रॉसिंगला लागून मोठ्ठं वाणसामानाचं दुकान होतं. बाबुलालच्या वडिलांकडून देणगी मिळवून मी चिल्ड्रन्स एन्साक्लोपीडियाचा संच घेतला. आता तो आणल्यावरच कुरकुरत का होईना ग्रंथपालांनी जागा करून नीट ठेवला. तिथे दोन टेबलं होती आणि रोजची वर्तमानपत्रेही येत. मुलं एन्सायक्लोपीडिया, डिक्शनरी यांचा उपयोग करायला ग्रंथालयात येत तेव्हाच त्यांनी महत्त्वाची वाटलेली बातमी एका वहीत उतरवावी असं मी सांगितलं. ते मुलांना आवडलं. वेगवेगळ्या पुस्तकातून मुलं सुविचारही उतरवू लागली. मोठं ग्रंथालय असणं आणि मुलांनी त्याचा भरपूर उपयोग करणं हा आदर्श झाला. तसं तो बहुतेक शाळांमधून नसतं. पण जे ग्रंथालय होतं त्याचा मुलं हळूहळू वापर करू लागली होती.

## चित्रसहल

एकदा मला आमचे ड्रॉईंगचे माळीसर म्हणाले, ''बेहेनजी, तुमच्या वर्गातल्या खूप मुलींचं ड्रॉईंग चांगलं आहे. त्यांची एक 'चित्रसहल' न्यावी असं मला वाटतं.'' मला ती कल्पना आवडली. मी आमच्या प्रिन्सिपॉल सरांसमोर मांडली. एव्हाना माझ्या अभ्यासवर्गाबद्दल इतर शिक्षकांमध्ये नाराजी आणि थोडा मत्सर पसरला होता. पण आपल्या वेळात ट्युशन घेण्याऐवजी असल्या उचापती करण्यात कुणाला रस नव्हता. शिवाय हिंदी माध्यमाची एकेकच तुकडी. आम्ही आठ-दहा जणं शिक्षक होतो. एकमेकांना सांभाळून घेत होतो. त्यामुळे ह्या असल्या गोष्टींमध्ये आमचा वेळ फुकट जात नाही तोवर तिला करू दे काय ते! अशी सर्वांची धारणा होती. म्हणून याबाबतीत थोडी कुरकुर झाली. पण शेवटी सरांनी परवानगी दिली. जवळच नॅशनल पार्कमध्ये आम्ही सहल नेली. चालत जायचं. चालत यायचं. आपापला डबा आणायचा. खर्च नाही. अशी ही कल्पना होती. माळी सरांनी मुलांना नेहमीचं ड्रॉईंगचं साहित्य दिलं.

सप्टेंबरचा महिना असावा तो. एका उंचवट्यावर पिवळी जर्द रानशेवंती फुलली होती आणि वाऱ्यावर मंदपणे डोलत होती. तिथे मुलांनी चित्र काढायला बसायचं ठरवलं. आपापली पॅड्स तेवढी त्यांनी घेतली. मुलांनी एवढी सुरेख चित्रे काढली की मी बघत राहिले.

त्या दिवशी मी उत्स्फूर्तपणे मुलांना तिथे 'डॅफोडिल्स' ही कविता शिकवली. त्या दिवशी मुलांमध्ये जो उत्साह होता. शिकण्यातलं चैतन्य होतं, चेहऱ्यावर जो आनंद होता तो पाहून मला वाटलं, हे असंच असायला हवं शिक्षण! दुर्दैवाने ते शक्य नाही हे ही लक्षात होतंच. पण मुलांची ड्रॉईंगमधली गती बघून पुढे माळी सरांनी थर्मोकोलच्या साहाय्यानं जीवमात्राची उत्क्रांती ह्या विषयावरची चित्रे कापून रंगवून घेतली. त्यांचं सुंदर प्रदर्शन दोन दिवस सगळ्या दौलतनगरला खुलं ठेवलं. सगळ्यांनी मुलांचं खूप कौतुक केलं. मुलांना सारखं काहीतरी करायला हवं असतं म्हणून मग मी गोष्टींची रूपरेखा देऊन त्यावरून चित्रांचे चार्ट बनवून घेतले. ते पुढे निबंधांसाठी सर्वच शिक्षकांना उपलब्ध झाले.

असं असलं तरी सगळं सदोदित ठीक नसे. भांडणं करणं, कुणीतरी अभ्यासातून इतरांचं लक्ष विचलित करणं, गप्पाष्टकं सुरू करणं, घाणेरडी मासिकं आणणं असेही प्रकार घडले. मला याचा छडा लागत असल्याने ते प्रकार थांबवताही आले. क्वचित प्रसंगी काही मुलांना वर्गातून दूर करण्याचे कटू प्रसंग आले. पण एक प्रसंग मात्र फारच हादरवून टाकणारा घडला.

## व्हिडिओ पार्लर

अभ्यास वर्गातून तीनच्या सुमाराला मुलं काही काही कारणं काढून पळून जायला लागली. पुन्हा गृहपाठ करायचा शिल्लक राहू लागला. प्रश्नोत्तर येईनाशी झाली. वर्तमानपत्रातील महत्त्वाची बातमी सुवाच्य अक्षरात लिहायची टाळाटाळ होऊ लागली. गटप्रमुखांपैकी एका मुलानं मला सांगितलं की नवीन व्हिडियो पार्लर्स उघडली आहेत. तिथे दुपारी दोन रुपये घेऊन सिनेमा दाखवतात. सिनेमेही घाणेरडे असतात. आता ह्यावर मी कसा वचक ठेवणार होते? मला काही सुचत नव्हतं. मी अस्वस्थ होते. शेवटी रमा दुबे म्हणून माझी विद्यार्थिनी होती. तिचं घर अंबावाडीतच होतं. पण एकंदर परिस्थिती बरी होती. आई चार इयत्ता शिकलेली होती. मी रमाच्या आईला म्हटलं, ''माझी किती मुलं तुमच्या जवळ असलेल्या व्हिडिओ पार्लर मध्ये येतात ते मला पहायचंय. शाळा सुटल्यावर मी तुमच्याकडे येईन. मग दोनचा की तीनचा शो असेल त्याला मी जाईन.''

ती म्हणाली, ''जनाना वहाँ जाता नही! फिरभी मै मालिक की बीवीसे बात करके अंदरकी तरफ कुर्सी लगवाती हूँ!''

त्याप्रमाणे माझी व्यवस्था झाली. आतून मी बघत होते. माझे विद्यार्थी बिनदिक्कतपणे दोन दोन रुपये देत होते. हे कुठून आणत

होते पैसे? आणि इथे अडीच तास घालवत होते. तेव्हा आईवडिलांना वाटत होतं की मुलं अभ्यासवर्गात आहेत. ह्या फसवणुकीचं मला फार वाईट वाटत होतं. एकेकाला बाहेर नेऊन चांगल्या दोनचार भडकावाव्यात असा राग आला होता. एक दोघांनी तर सिगरेटीही काढल्या होत्या. सिनेमा सुरू झाल्यावर मी परत रमाकडे गेले आणि सुटायच्या वेळी बाहेर जाऊन उभी राहिले. मला बघताच पोरं घाबरली. मी तिथे आलेल्या सगळ्यांना गोळा केलं. मग झाडाझडती सुरू झाली. त्यांच्याजवळ बोलायला तोंड नव्हतच. माना खाली घालून ते गप्प उभे होते. मी व्हिडिओ पार्लरवाल्याशी बोलले. 'मुलांना मी येऊ देणार नाही' असं त्यानं आश्वासन दिलं खरं पण ते खोटं होतं. हे मीही जाणत होते. हा त्याचा धंदा होता. शिवाय पार्लर्सवर झोपडीदादांचा वरदहस्त होता. ही पार्लर्स बंद करणं हे माझ्या आवाक्यातील काम नव्हतं. उद्या त्यांनी तिथे आणखी दारू, जुगार सुरू केला तरी काय करणार होते मी?


मुलांना तिथे जाण्यापासून रोखणं एवढंच मला करता येण्याजोगं होतं. हातावर पोट असलेले आईवडील या मुलांवर लक्ष कुठून ठेवणार होते? भरपूर मुलं असलेल्या दारू पिऊन मारहाण होणाऱ्या कधी उपाशीपोटी राहणाऱ्या घरांमधून सुसंवाद कुठून होणार होता? ही मुलं तरी पैसे कुठून आणत होती? ह्या पार्लर्सकरता एजंट म्हणून कामं करत होती? तिकिटं ब्लॅक करत होती? चोऱ्या करत होती? माझं डोकं भणाणून गेलं होतं.


मुलांना मी शाळेत आणलं. रागावून उपयोग नव्हता. आपली चूक त्यांनी मान्य केली होती. पण अभ्यास करून कंटाळा येतो असं त्यांचं म्हणणं होतं. म्हणजे त्यांनाही मनोरंजनाची गरज होती. तेव्हा टीव्ही आले होते. पण घरोघर टीव्ही नव्हते. चॅनेल्स असे भरमसाट नव्हते. व्हिडिओ पार्लर्स त्यामुळे तुफान चालायची. पुन्हा एकदा मी सरांकडे धाव घेतली. शाळा सुटल्यावर म्हणजे संध्याकाळी सहा ते साडेसात मुलांना खेळायला ग्राऊंड मिळावं अशी विनंती केली. पण संध्याकाळच्या वेळी याची जबाबदारी कोण घेणार? शेवटी तिथेच राहणारा वॉचमन तिवारी आणि एक प्यून कदम यांनी ही तयारी दर्शवली. पुन्हा एकदा मी आमच्या विश्वस्तांकडे हात पसरले. व्हॉलीबॉलचं सामान आलं, हुतूतूचं ग्राऊंड आखलं, बुद्धिबळाचे दोन संच आले. पीटीचे नायक सर तिथे आपणहून फेऱ्या मारायला लागले. शाळेतली इतर मुलंही संध्याकाळी खेळायला येऊ लागली. प्रॉक्झी पीरियडला म्हणजे कुणी शिक्षक गैरहजर असले तर त्या तासाला आम्ही शिक्षकांनी स्पेलिंग गेम, गावांच्या नावांच्या भेंड्या, नकाशे टांगून एकेका शहराचं वैशिष्ट्य सांगण्याचा खेळ, असे खेळ तयार केले. हळूहळू मुलांचा व्हिडिओ पार्लरमधला राबता कमी झाला.

ही मुलं नववीत गेली. त्यांच्याबरोबर माझंही प्रमोशन झालं. म्हणजे मी नववीची क्लासटीचर झाले. पण दहावीत हीच मुलं गेली तेव्हा मात्र त्यांना माझा निरोप घ्यावा लागला. तेव्हा मुलांनी हट्टच धरला की मी त्यांची क्लासटीचर व्हावं. ते शक्य नव्हते. पण मुलांनी माझ्यासाठी जो अनौपचारिक निरोपसमारंभ केला तो अभूतपूर्व होता. आपले श्रम सार्थकी लागले असं वाटलं. माझा त्या बॅचच्या बहुतेक मुलांनी कॉलेजचं शिक्षण घेतलं. कुणी कामधंदा, कुणी व्यापार करू लागलं. कुणी हॉटेल टाकलं, तर कुणी नोकरी सुरू केली. पण ह्या मुलांचे शाळेशी अनुबंध मात्र मजबूत राहिले. माझ्याशी संपर्क कायम राहिला. ही मुलं अजूनही भेटली की तेव्हाच्या आठवणी काढून हळवी होतात. त्यांच्या आयुष्यातल्या यशाचं श्रेय उगीचच मला देऊ करतात. शिक्षकाला तरी याहून अधिक काय हवं असतं?

नारायण निवास, हनुमान रोड,
विलेपार्ले (पूर्व) मुंबई - ४०००५७
दूरध्वनी - २६११६१७, २६११६४८०

**उत्तुंग यशाकडे घेऊन जाणारे, आश्वासक मार्गदर्शक**





अंतीम यशाकडे नेणारा मार्गदर्शक

आत्मविश्वास जागवण्यासाठी

यशाची पहिली पायरी... उत्तम स्मृती ती वाढवण्यासाठी

यशाचा कानमंत्र (५०रु.)

आत्मविश्वासाचा कानमंत्र (४०रु.)

उत्तम स्मृतीचा कानमंत्र (५०रु.)

पोस्टेज प्रत्येकी २०रु. एकूण २५रु.

मूळ लेखक अनंत पै

अनुवाद : चारुलता पाटील

# मुलांचे भावविश्व फुलविताना



## माझे शैक्षणिक प्रयोग

**सौ. सुनीता नागपूरकर**

गोदरेज उद्योग समूहाने आपल्या कर्मचाऱ्यांच्या मुलांसाठी चालू केलेले 'उदयाचल स्कूल' हे 'बेस्ट इन एशिया' म्हणून नावाजले जाते.

गोदरेज वसाहत म्हणजे मिनी इंडिया. केवळ भारताच्या कानाकोपऱ्यातूनच नव्हे तर परदेशांमधून इथं नोकरीसाठी लोक आलेले. सर्व जाती, धर्म आणि पंथ गुण्यागोविंदाने नांदणारे. त्याचं प्रतिबिंब शाळेत पडलेलं.

चार माध्यमांची शाळा असली तरी 'वॉटर प्रूफ कंपार्टमेंटस्' असं तिचं स्वरूप नव्हतं. उलट इंग्रजी शेजारी गुजराती, पलीकडे मराठी तर अलिकडे हिंदी अशी वर्गरचना असायची. शिक्षकही वेगवेगळ्या मिडियमला शिकवायचे. काही तासिका चारी माध्यमांना कॉमन होत्या.

भाषेमुळे वैचारिक देवाण-घेवाण सुकर व्हावी, सगळ्यांमध्ये सुखसंवाद व्हावा, एकोपा नांदावा हा हेतू. 'वसुधैव कुटुंबकम्' असं वातावरण जपलं जायचं.

माझ्या वर्गात असणारी मुलं, त्यांचं माध्यम मराठी असलं तरी भाषेवर कोंकणी, वऱ्हाडी, मालवणी, कानडी आणि गुजरातीचाही ठसा असायचा.

त्यांचा बौद्धिक स्तर भिन्न. आर्थिक परिस्थिती, परिसर आणि संस्कारही वेगवेगळे असायचे.

शिकवताना एक मोठा प्रश्न उभा राहायचा तो असा की एकाच पद्धतीने लिहिलेले प्रमाणभाषेचे पुस्तक सरसकट शिकवणे योग्य आहे का? शिकवताना लक्षात यायचं की पुस्तक काही विद्यार्थ्यांना पचते, काहींना फक्त रुचते तर काहींच्या डोक्यावरून जाते.

विद्यार्थ्यांनी भाषेची कौशल्ये आत्मसात करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यावरच त्याच्या भावी ज्ञानाची इमारत ठामपणे उभी राहते.

नुसता विचार करण्यापेक्षा काहीतरी कृती केली पाहिजे असं ठरवलं आणि पाठ्यपुस्तकाशिवाय मातृभाषा शिकविण्याचा धाडसी निर्णय घेतला. भाषेचा साचेबंदपणा दूर करायचा. तिची परिसराशी सांगड घालायची. विद्यार्थीकेंद्री स्वरूप द्यायचे असे मी ठरविले.

त्यासाठी इ. ४ थी चा वर्ग मुद्दाम निवडला. कारण या वयोगटातील विद्यार्थ्यांच्या मेंदूची पूर्णपणे वाढ झालेली असते. या वयात इतर चिंता नसतात. अजून सेक्स भावना जागी झालेली नसते. अशा सर्वार्थाने फ्रेश असलेल्या विद्यार्थ्यांवर जे संस्कार होतात ती त्यांची जन्मभरासाठीची जडणघडण करतात.

### पूर्व तयारी -

संकल्पाला सिद्धीचं रूप देण्यासाठी उदंड तयारीची गरज होती. त्यादृष्टीने प्रयत्न सुरू केले. अभ्यासक्रम (सिलॅबस) बारकाईने अभ्यासले. वर्षभरात कोणकोणत्या कौशल्याची पूर्तता करायची याचे टाचण तयार केले. त्यानुसार तक्ते, खेळ, कोडी, व्याकरणावर आधारित कार्डे आणि इतर बरेच शैक्षणिक साहित्य तयार केले. प्रिन्सिपॉल आणि पालक दोघांची प्रयोगासाठी परवानगी घेतली. मागच्या इयत्तेमधून आलेली Cumulative Record




**माझा महाराष्ट्र प्रकल्प**

Cards डोळ्याखालून घातली. (यात विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, सवयी, शारीरिक-मानसिक ठेवण, घरातील वातावरण इ. ची पहिल्या दिवसापासूनची नोंद असते.)

## प्रयोगाची सुरुवात -

५ जूनला पाऊस आणि मुले बरोबरच आली. मुलांचे स्वागत करून त्यांना प्रयोगाची कल्पना दिली. पावसापासूनच प्रयोगाला सुरुवात करायचे ठरविले होते. म्हणून डिस्प्ले बोर्डावर पावसाचा सुरेख देखावा तयार करून ठेवला होता. रिमझिमत्या पावसात मुलांना सहलीला नेले. आल्यावर जे पाहिले आणि अनुभवले त्यावर आधारित लेखन घेतले. लिखाण वाचल्यावर सुटलेल्या मुद्द्यांची, पर्यायी शब्दांची चर्चा केली. आणि पुनर्लेखन करून घेतले. दोहोंमधला फरक काढून घेतला.

भटकंतीत पाहिलेल्या इतर वस्तू आणि शब्द काढून घेतले ते असे,

☆ नादयुक्त शब्द -सळसळ, सरसर, खळखळ, धो धो इ.

☆ कपडे - रेनकोट, छत्री, इरले इ.

☆ पशूपक्षी - नाचणारा मोर, पावशा, भिजलेली जनावरे इ. गांडूळ, बेडूक.

☆ पावसाळ्यातला निसर्ग - गवत, हिरवे डोंगर, भरलेली खाडी, इंद्रधनुष्य.

☆ पावसाळ्यातील आजार - सर्दी, पडसं, खोकला, ताप इ.

☆ खेळ - शीगरूपी, वॉटरपोलो इ.

शब्दांचा वाक्यात उपयोग करून घेतला.

नादयुक्त शब्दांच्या थेंबांच्या आकाराच्या चिठ्ठ्या तयार करून त्यावर शब्द लिहिले.

पशू, पक्षी, गवत, सूर्य, इंद्रधनुष्य, डोंगर, खाडी इ. ची चित्रे काढून घेतली. हे सारे काम गटांमध्ये वाटून दिले होते.

हे तयार झालेले साहित्य डिस्प्ले बोर्डावर सेट केले.

डिस्प्ले बोर्डावरचा देखावा तयार झाल्यावर त्याच्या साह्याने भूगोलातील 'जलचक्र' घेतले. ह्या समवाय पद्धतीमुळे वेळेची बचत होते. वाचलेला वेळ इतर कामासाठी वापरता येतो.

कार्डबोर्डाच्या चिठ्ठ्या मुलांनी कापायच्या आणि त्यावर स्केचपेनने त्यांनीच लिहायचे. असे ठरले होते. ज्याचे अक्षर चांगले त्यालाच लिहायची संधी मिळेल हे सुचविले. या संदर्भात एक मजेची आठवण सांगते.

एक दिवस एका मुलीची आई वर्गात चक्क भांडायला आली आणि म्हणाली,

"तुमच्या प्रयोगापायी माझी लेक रात्ररात्र जागतीय! इतका



अभ्यास दिल्यावर पोरं धसका घ्यायची! उगाच घातलं तुमच्या वर्गात!''

मला काही समजायच्या आत ती मुलगी घाबरून म्हणाली,

''आई, टिचरांनी दिलेला गृहपाठ मी करीत नव्हते. अक्षर सुधारत होते. मला चिठ्ठ्या लिहिण्याची संधी हवी होती म्हणून!''

एरवी 'अक्षर सुधार' म्हणून सगळीजणं थकली. त्याच मुलीला न सांगता आपले अक्षर सुधारावेसे वाटले. त्यासाठी ती रात्ररात्र जागायला लागली. विद्यार्थ्यांना केवळ उपदेश न करता उद्युक्त केले तर चांगला परिणाम होतो.

वर्तमानपत्रांमधल्या पावसाच्या बातम्या विद्यार्थ्यांनी आणायच्या. त्याचे वाचन झाल्यानंतर त्यातील नवीन शब्दांचे श्रुतलेखन. यामध्ये वाचन, श्रवण आणि लेखन हे तीनही हेतू साध्य होतात.

समानार्थी शब्द काढून घेण्यासाठी एक मस्त कल्पना लढवली. कार्डबोर्डचा एक ग्लास कापून डिस्प्ले बोर्डावर लावला. पण मुलांना बोध झाला नाही. २ दिवसांनी ग्लासवर 'पाणी' अशी चिठ्ठी लावली. मग मुलांनी प्रत्येक स्ट्रॉवर जल, नीर, तोय, पय, वारी इ. शब्द लिहून चिठ्ठ्या लावल्या.

एरवी शिक्षकाच्या मुखातून निघालेले शब्द मुलांच्या वह्यात विसावतात. परीक्षेत ओकले की विसरतात. हा अनुभव तुमचा, माझा सर्वांचा. हे शब्द विद्यार्थ्यांनी स्वत: प्रयत्नाने शोधले. सुंदर अक्षरात लिहिले. ग्लास, स्ट्रॉ, त्यावरल्या चिठ्ठ्या हे सारेच देखणे. त्यामुळे ते वारंवार वाचले गेले. मनात ठसले. ते कधी विसरणे शक्य आहे का?

मुलांनी हे शब्द अथवा पाहिजे ती माहिती स्वत: शोधावी यासाठी आमच्या वाचनालयात सुमारे साडेपाचशे पुस्तके आधीच आणून ठेवली होती. आमच्या शाळेत 'ओपन शेल्फ' लायब्ररी आहे.

ग्लासपाठोपाठ मी एक मुलगा आणि मुलगी यांची चित्रे विरुद्ध दिशेला तोंडे करून लावली. मुलांनी ताबडतोब विरुद्ध अर्थाच्या २५-३० जोड्या लिहिल्या. दिवस x रात्र, सरसर x हळूहळू, ओला x कोरडा इ.इ.

समान अर्थाचे आणि विरुद्ध अर्थाचे शब्द लिहिण्यासाठी दोन पुस्तिका तयार केल्या. एक जोड पानाच्या आकाराची दुसरी फुलीच्या आकाराची. जो शब्द मिळेल तो त्या त्या पुस्तिकेत लिहायचा. पूर्ण वर्षभर.

विद्यार्थी 'र'ची जोडणी नीट करीत नाहीत असं लक्षात आल्यावर कार्डबोर्डाच्या लांब पट्ट्या बोर्डावर लावल्या. त्यावर एकेक शब्द लिहिला. टीचरांनी बोर्डावर एखादा प्रकार लावला की तो आपण उत्तम अक्षरात पूर्ण करून दाखवायचा आणि शाबासकी मिळवायची हे मुलांना चांगले समजले होते.

मुलांना उत्तेजनाची, शाबासकीची, छोट्याशा बक्षिसाची आवश्यकता असते हे खरं, पण त्याची चटक लागू नये, अतिरेकही होऊ देऊ नये.

'र' च्या जोडणीच्या चिठ्ठ्या

ग्रह | गृह | प्रसाद | पर्व | महाराष्ट्र | पऱ्या

गद्यानंतर पद्याकडे वळणे आवश्यक होते. यासाठी वर्तमानपत्रे, मासिके आणि पुस्तकांमधून पावसाची गाणी, कविता मुलांकडून आणवल्या. त्यांचे वाचन, चाल लावणे, नवीन शब्द इ. चा अभ्यास झाल्यावर त्यापैकी मतदान पद्धतीने दोन कविता डिटेल शिकण्यासाठी निवडल्या. सर्व कवितांचा कव्हरसह संग्रह तयार केला.

यावेळची एक मजेची आठवण सांगते. माझी मुलांसाठीची एक कथा म. टाइम्समध्ये आली होती. मुलांनी ती वाचली. एरवी मी आल्याबरोबर मुले आनंद व्यक्त करीत. पण यावेळी एकजात सर्वांचे चेहरे गंभीर आणि दु:खी. मी त्यांना विचारलं,

''काय रे, गोष्ट आवडली नाही का?''

''खूप आवडली. पण मुलांसाठी तुम्हाला कित्ती पैसे खर्च करावे लागले? त्यामुळे आम्हाला खूप वाईट वाटलं.''

माझा खर्च कसा झाला याचा मी विचार करत असतानाच एक मुलगी म्हणाली,

''टीचर, आमच्या डॉक्टरांचा कुत्रा हरवला म्हणून त्यांनी याच पेपरात लिहिलं. एवढ्याशा मजकुरासाठी पाचशे रुपये पडले. तुमची गोष्ट तर पानभर आहे. शिवाय चित्रं पण आहेत मग कित्तीतरी पैसे लागले असतील ना!''

मुलं किती निरागस असतात! मी जाहिरात आणि लिखाण यांच्यातील फरक समजावून गोष्टीबद्दल मला पैसे मिळणार सांगितलं. हे ऐकून त्यांना आनंद झाला.

अभ्यासासाठी तयार केलेली ग्रेडेड कार्डे हाताळणे थोडे अडचणीचे वाटायला लागले. त्यासाठी खोक्याचा सुबक दूरदर्शन संच बनवला. त्यात रोज १ कार्ड ठेवलं जायचं. अभ्यासासाठी दूरदर्शनचा उपयोग होतो ही संकल्पना मनात रुजली.

त्यावेळी मुंबई दूरदर्शनवर मुलांसाठी सोमवारी किलबिल हा कार्यक्रम असायचा. तो बघून दुसऱ्या दिवशी धीटपणाने आळीपाळीने तो सादर करायचा. त्यातून आवडलेल्या तीन कथावस्तू (script) निवडल्या.

गटानुसार लेखन, सादरीकरण करवून घेतले. ही नाटुकली प्रेअरमध्ये सादर केली. त्यामागे माझे पुढील उद्देश होते, ते बऱ्यापैकी साध्य झाले -

१. सूत्रावरून नाटुकले लिहिणे.

२. सामुदायिक प्रयत्नाने ते बसविणे.

३. योग्य पोशाख, आवश्य वस्तूंची निवड करणे.

त्यानंतरची पायरी म्हणजे वक्तृत्व स्पर्धा.

पाहुण्यांना लेखी निमंत्रण तयार करणे. त्यांना घेऊन येणे. स्वागत, परिचय, सूत्रसंचालन आणि समारोप ह्या आवश्यक पण अभ्यासक्रमात नसणाऱ्या गोष्टींचा अभ्यास केला.

तोवर मुलांना आवडणारे सण आले. त्यांचे ३ गट केले. १) धार्मिक सण, २) परधर्मातील सण, ३) राष्ट्रीय सण.

जो सण येईल तो वर्गात साजरा करणे. त्याचे सामाजिक, धार्मिक आणि वैज्ञानिक महत्त्व समजावणे. त्या त्या जातीच्या-धर्माच्या व्यक्तीस त्या दिवसाविषयी माहिती सांगावयास बोलावणे.

सणांची नावे, धर्मगुरू, देवळांची नावे, पोषाख, पक्वान्ने, प्रार्थना सणामधील हेतू याविषयीच्या पुस्तिका तयार केल्या.




**अशी शिकविली गांधीजींची तत्त्वे**

आधी महात्मा गांधींच्या जीवनावर आधारित प्रकल्प तयार केला होता. तो गांधी जयंतीच्या वेळी डिस्प्ले बोर्डावर सादर केला आणि त्यांच्या जीवनातील विविध पैलूंचा मुलांना झेपेलशा पद्धतीने परामर्श घेतला. त्यांच्या चौदा तत्त्वांची ओळख करून दिली.

मिळालेल्या ज्ञानाची चाचपणी करण्यासाठी स्पर्धा आयोजित केली. 'प्रश्न तुमचा उत्तर आमचे (What' the good word) या प्रकल्पातील उताऱ्यांवरून नाम, सर्वनाम, क्रियापद हा व्याकरणाचा भाग घेतला. यासाठी काही शैक्षणिक साधने तयार केली होती.

दूरदर्शनप्रमाणेच चित्रपट हेही शिक्षणप्रक्रियेतील महत्त्वाचे साधन आणि प्रभावी माध्यम आहे. हे लक्षात घेऊन ॲटनबरोचा गाजलेला 'महात्मा गांधी' हा चित्रपट दाखवला.

चित्रपटाला जायच्या आदल्या दिवशी माझ्या वर्गातल्या अत्यंत हुशार आणि कृतिशील, अनुकरणप्रिय विद्यार्थ्याची आई आली. डोळ्यांत पाणी आणून तिने विनवणी केली,

"टीचर माझा एकुलता एक पोरगा, आमच्या घराण्याचा वारस. त्याला आम्ही फार जपतो. रोज शाळेत मी त्याला सोडायला येते. सुटल्यावर न्यायला. आम्ही त्याला एकटा कधीच सोडीत नाही. इतकी पोरं न्यायची म्हणजे माझ्या पोराकडं दुर्लक्ष होणार. त्याचं काही बरंवाईट झालं तर! तुम्ही माफ करा त्याला नेऊ नका."

ही शैक्षणिक सहल आहे. तुमच्या मुलाला मी माझ्या जबाबदारीवर घेऊन जाते वगैरे समजूत घालून मी तिला परत पाठविले. आणि त्या मुलाला त्याबद्दल आईच्या वागणुकीबद्दल विचारलं तेव्हा त्यानं केलेलं स्पष्टीकरण थक्क करणारं होतं. वैचारिक दरी दाखवणारं, मोठ्यांना विचार करायला लावणारं सुद्धा. तो म्हणाला,

"टीचर, गेल्या गणपतीत गावी माझ्या हातून पूजा करायची म्हणून गावी गेलो. आरती झाल्यावर मी घरामागच्या तळ्याजवळ गेलो. तिथं लालभडक कमळाचं फूल होतं. मी त्यावर जाऊन उभा राहिलो."

"मग! मग काय झालं?" मी घाबरून विचारलं.

"काय होणार टीचर! धप्पदिशी पडलो. आठ दिवसांनी कणकवलीच्या हॉस्पिटलात जागा झालो. तेव्हापासून मला कुणी एकटं सोडीत नाहीत."

"अरे, पण एवढ्याशा कमळावर चढताना तुला पडू अशी भीती वाटली नाही?"

त्यावर त्यानं दिलेलं उत्तर विचार करायला लावणारं होतं. तो म्हणाला,

"वा टीचर! माझ्या आईहून जाडीजुडी बाई, लक्ष्मी आरामात कमळवर मांडी घालून बसते; तर मला काय होणार? कमळावर बसल्यावर कसं वाटतं ते मला पहायचं होतं, म्हणून बसलो. आता पडलो त्याला काय करणार?"

अजूनही मी पाण्यातच होते. पाण्याच्या संदर्भातले वाक्प्रचार आणि म्हणींचे संकलन केले. त्यासाठी २ प्रकारच्या पुस्तिका बनविल्या. वाक्प्रचारांसाठी कलशाच्या आकाराची आणि म्हणींसाठी माशांच्या आकाराची पुस्तिका बनविली. ज्या मुलांचे ड्रॉईंग उत्तम होते त्यांनी प्रत्येक पुस्तिका फारच सुंदर बनविली. रंगही योग्य असायचे. लांबून पाहिले तर खरेच पान वाटायचे. (जे जमत नसे त्यावेळी हस्तकामाच्या शिक्षिकेची ते मदत घेत.)

वाक्प्रचार, म्हणींचा अर्थ झाल्यावर त्यावर आधारित परिच्छेद तयार करून तो वर्गात लावला जायचा. ह्यापेक्षा धडे आणखीन वेगळे थोडे असतात?

वर्गात बरेच उपक्रम व्हायचे. त्याचा रिपोर्ट तयार करून तो वर्तमानपत्राकडे पाठवला जायचा. लोकसत्ता, नवाकाळ, सन्मित्र अशा बातम्यांना आवर्जून स्थान द्यायची. त्यामुळे मुलांचा आत्मविश्वास वाढला आणि ती अधिक उत्साहाने वर्गातल्या उपक्रमात सहभागी व्हायला लागली.

बऱ्याच कवितांचे वाचन, मनन, झाल्यावर वर्गातल्या मुलांनी बऱ्याच कविता केल्या. त्या छानच वठल्या. मी त्या मुंबई आकाशवाणीला पाठविल्या. पंधराच दिवसांत त्यांनी कविता स्वीकारून अर्ध्या तासाच्या गंमत-जंमतसाठी रेकॉर्डिंगला बोलावले. तो कार्यक्रम अप्रतिम झाला.

आकाशवाणीवर रेकॉर्डिंगला गेलो तेव्हा एक मुलगी मागे

रेंगाळली. प्रत्येक रेकॉर्डरूममध्ये ती उड्या मारमारून काचेतून उत्सुकतेने बघत होती. त्यावेळ मी तिला काही बोलले नाही. रेकॉर्डिंग पार पडल्यावर जाताना तिला मी म्हटलं,

''कल्पना अशी उड्या मारमारून तू काय बघत होतीस?''

''टीचर, मला लता मंगेशकरला पाहायचं होतं. तुम्हाला माहीताय टीचर, आमच्या रेडिओवर सारखी लता मंगेशकरची गाणी लागतात. त्या कुठल्यातरी रूममध्ये बसून गात असतीलच ना!''

या अजाण मुलीवर मला रागवावंसं वाटेना. मग मी तिला प्रश्न केला,

''आज कोण वार आहे?''

''अय्या टीचर! एवढं पण विसरलात? आज आहे मंगळवार.''

''आपला कार्यक्रम आपण कधी ऐकणार आहोत?''

''शनिवारी, खरंच टीचर! आपलं जसं रेकॉर्डिंग झालं, तसं लता मंगेशकरांचंपण हे लोक करत असणार! माझ्या कसं लक्षात आलं नाही! ते लोक माझ्या वेडेपणाला हसले असतील ना!''

मुलांना उठसूट रागावण्यापेक्षा त्यांच्या कृतीमागचं कारण समजून घ्यावं आणि त्याला त्याची चूक समजावून द्यावी. म्हणजे दुहीचे प्रसंग कमी होतात.

एरवी स्वतंत्रलेखन (निबंध) विषय देऊन, चर्चा करून त्यावर विद्यार्थी लिहितात. खरंतर याला स्वतंत्रलेखन का म्हणायचं? मी थोडा वेगळा पर्याय अवलंबिला.

१) वेगवेगळ्या कथांचे मुद्दे सायक्लोस्टाईल करून ते वाटणे. त्यावर कथा तयार करणे.

२) वेगवेगळी चित्रे देऊन त्यावर लिहिणे.

३) जीवनात घडलेल्या प्रसंगाचे वर्णन करणे.

४) वाचनालयातील आवडलेल्या पुस्तकाविषयी लिहिणे. इ.

वर्षात एकूण २० स्वतंत्रलेखने झाली. त्यापैकी ज्याला 'उत्तम' शेरा असेल अशी २ स्वतंत्र लेखने पुस्तकरूपात करणे. एकूण ३२ मुलांनी प्रत्येकी २/२ पुस्तके इतकी अप्रतीम तयार केली की ती वाचनालयात ठेवली. शिक्षक व पालक विद्यार्थ्यांच्या कुवतीचा त्यांच्या बुद्धीचा विचारच करीत नाहीत. आपली मते त्याच्यावर धडाधड लादत जातात. आणि त्यांच्यातील सर्जनशीलता मारून टाकतात. मुलांच्या कलाने घ्यावे. त्यांना चुकू द्यावे. जो चुकेल तो चांगला शिकेल. फुलं कशी त्यांच्या मर्जीने फुलू दिली तर चांगली फुलतात. आवश्यक असेल तेव्हाच आणि तेवढंच खतपाणी घालावं. फुलांसारखंच मुलांचं!

विविध उपक्रम, शैक्षणिक साहित्य आणि सगळ्यांचं सहकार्य याच्या बळावर पुस्तकाशिवाय वर्षभर मातृभाषा घेतली. आणि त्यात यशस्वी झाले. याचा अर्थ असा नव्हे की शिक्षणप्रक्रियेत काही पाहायचेच नाही ही सीमित वृत्ती नसावी. काही धड्यांऐवजी परिसराशी सांगड घालता आली तर अवश्य घालावी. विद्यार्थ्यांची ज्ञानलालसा जागृत करावी. त्यांच्या कृतिशीलतेचा उपयोग करून घ्यावा. उत्साहाला संधी उपलब्ध करून द्यावी. त्यांच्या रसरशीत आणि जिवंत अनुभवांचे आगत्याने स्वागत करावे. धाकापेक्षा प्रेमाने आपलेसे करावे.

इथे एक प्रसंग सांगावासा वाटतो. एके वर्षी माझ्याकडे ६वी तुकडी आली. एकूण एक रिपिटर्स. कानफाट्या नाव पडलेले सारे! इतर शिक्षक त्या वर्गाला 'टोणगेवाडी' म्हणायचे. पार पोहोचलेली. मी ठरवलं यांना शिकवण्यापेक्षा आधी त्यांना प्रेमाने वागवून शिक्षकाविषयी विश्वास जागा करायचा. एरवी कुणीही गुन्हा केला तरी हे निमूटपणे शिक्षा भोगायचे. (शिक्षा म्हणजे कुठं पूर्ण धडा लिही, ग्राऊंडला फेऱ्या मार, वर्गाबाहेर उभा रहा. इ.इ.) ती म्हणत,

''उगाच खिटपिट करू नका टीचर, हात पुढं केलाय ना? मारा हव्या तेवढ्या छड्या. उगाच डोकं खाऊ नका.''

बागेतले नारळ वीक, मारामारी कर, खिडकीतून ये जा कर असे उपद्व्याप सुरू असायचे. अशा वेळी मी न रागावता चिडता कृतीमुळे होणारा परिणाम समजवायची. तेवढ्या पुरतं ते मुलांना पटायचं. पण परत ये रे माझ्या मागल्या. महिन्यातून किमान २/३ वेळा तरी मला ॲम्ब्युलन्स मागवावी लागायची. (काचा लागणं, तारेचं कुंपण घुसणं, इत्यादीसाठी)

एकदा असेच मुलांनी नारळ विकले. तक्रार आल्यावर मी म्हटलं,

''तुम्हाला सांगून थकले. तुम्ही ऐकत नाही. शिक्षेचा उपयोग होत नाही. गुन्ह्यासाठी शिक्षा घ्यायलाच हवी. ती मी घेत जाईन. मी आज डबा खाणार नाही आणि वर्ग सुधारल्याशिवाय खुर्चीचा उपयोग करणार नाही.''

वर्गाच्या म्होरक्याला डबा विहिरीत रिकामा करायला भाग पाडले. चार दिवस आठी तास उभी राहिले. शेवटी मुलांनी रडत म्हटलं,

''टीचर आजपासून आमची कसलीही तक्रार येणार नाही. तुम्ही बसा.''

खरोखरच पूर्ण वर्ष मुलांनी कसलाही गुन्हा केला नाही हे विशेष. (इथे गांधीजींच्या असहकार, आत्मक्लेश, उपवासाचे तंत्र मी अवलंबिले होते.)

थोडक्यात सांगायचं झालं तर विद्यार्थी जेवढ्या लवकर स्वप्रयत्नाने ज्ञान घेईल तेवढा तो यशस्वी होईल. त्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये जिद्द निर्माण करावी. ज्ञानलालसा जागृत करावी. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे Thinking Development ला प्राधान्य द्यावं. हे माझे स्वानुभवाचे बोल आहेत.

माझा हा प्रकल्प खूप गाजला. N.C.E.R.T. नवी दिल्ली ने राष्ट्रीय पुरस्कार दिला. दूरदर्शनने आणि विविध प्रसिद्धी माध्यमांनी याची दखल घेतली.

वरील प्रकल्पाव्यतिरिक्त मी अनेक प्रयोगात्मक प्रयोग केले.



त्यापैकी काही प्रकल्पांची थोडक्यात माहिती देते.

### शब्दकोश प्रकल्प

इंग्रजीमध्ये अगदी तिसरी चौथीपासून विद्यार्थी शब्दकोश ( Dictionary) हाताळतात. शब्दार्थ, प्रतिशब्द इ. समजावून घेतात. पण मराठीमध्ये विद्यार्थी शब्दकोशाचा वापर करीत नाहीत. कारण त्यांना वापरता येण्याजोगा शब्दकोश नाहीच. पण तो तयार करावा ही संकल्पनासुद्धा कोणाच्या मनात येत नाही. खरंतर या संस्कारक्षम वयात त्यांना शब्दकोश वापरण्याची सवय लागायला हवी.

यादृष्टीने मी हा प्रकल्प हाती घेतला आणि विद्यार्थ्यांच्या मदतीने तो साकार केला. त्याचं थोडक्यात स्वरूप असं होतं.

ती

तीर - बाण

वाक्यात उपयोग - हरणाला तीर लागला.

तीर - नदीकाठ

वाक्यात उपयोग- मी नदीच्या तीरावर फिरायला जातो.

कार्डबोर्डचे ६ x ४ चे तुकडे कापले. ते ठेवण्यासाठी पाकिटे तयार केली. प्राथमिक शाळेतल्या मुलांना कठीण वाटणारे शब्द संकलित केले. त्या शब्दाचा अर्थ, प्रतिशब्द, विरुद्ध अर्थाचा शब्द, वाक्यात उपयोग, व्याकरण इ. त्यावर लिहिले.

सुमारे साडेसहाशे शब्दांचा शब्दकोश तयार झाला.

मुलांना वेळोवेळी शब्दकोश वापरण्यास उद्युक्त केले. काम झाल्यावर कार्ड परत योग्य त्या पाकिटात ठेवण्याचा आग्रह धरला.

यामुळे विद्यार्थ्यांची शब्दसंपत्ती वाढते. ती अन्यत्र वापरता येते. त्यामुळे बोलताना आत्मविश्वास वाटतो. असे अनेक फायदे होतात.

### वृत्तपत्र प्रकल्प

मुलांना लहान वयात वर्तमानपत्राचे महत्त्व पटावे. ते वाचण्याची गोडी लागावी यासाठी हा प्रकल्प राबविला.

वर्तमानपत्राचा जन्म - त्याची वेगवेगळी रूपे - अंतरंग - त्यावरील सुविचार - वर्तमानपत्राचे उपयोग - वर्तमानपत्राचे फायदे - इ. चे बारकाईने अभ्यासल्यावर मुलांनी 'बालवाणी' नावाचे वर्तमानपत्र उत्स्फूर्तपणे सुरू केले.

मुलांनी सुरुवातीला वर्तमान पत्राविषयी काय वाटते ते गद्यात, पद्यात, दवंडीच्या रूपाने लिहिले. त्यानंतर 'बालवाणी' सुरू केली. त्यात मुलंच संपादक, बातमीदार, स्तंभ लेखक होती. इतर वर्ग आणि शाळेतल्या बातम्या मुले लिहीत. शाळेतील इतर शिक्षक आणि विद्यार्थी मुद्दाम 'बालवाणी' वाचत आणि सूचना करत. काही उत्साही विद्यार्थी आपला जन्मदिवस आणि फोटो संपादकमंडळाकडे आणून देत.

उदा. वर्तमान पत्राच्या आकारात

रामपुरात भयंकर मारामारी

५ ठार तर १०० जखमी

संपादकाने पेपरात बातमी छापली.

वाचताच पाचावर धारण बसली.

घराच्या वाटेने धुम पळाले.

पण ते खोटेच ठरले.

खोट्या बातम्या कशाला छापता?

आम्हाला असं घाबरवून सोडता?

### कथा प्रकल्प

वाचनाची आणि लिखाणाची गोडी लागावी. शब्दसंपत्तीत भर पडावी म्हणून हा प्रकल्प हाती घेतला. मुलांनी कथा तयार केल्या. कथेतील विषयानुसार कटाऊट होते.

उदा. घर कथा - घराचा आकार

प्राणी कथा - हत्तीचा आकार.

कथेनंतर प्रत्येकाने २ प्रमाणे तक्ता तयार करायचा होता.

मातृभाषेप्रमाणेच विज्ञान, गणित, भूगोल, परिसर अभ्यासावरही प्रकल्प केले. पैकी भूगोलाचा प्रकल्प पहायला नजमा हेपतुल्ला आल्या होत्या. त्यांनी सर्व प्रकल्प लक्ष देऊन पाहिला. मुलांच्या कामाचे मनापासून कौतुक केले. त्यावर मी लिहिलेली आणि विद्यार्थ्यांनी सादर केलेली संगीतिका पाहिली.

आपण विद्यार्थ्यांच्या विषयी नेहमी तक्रार करतो. ती उद्धटपणे वागतात. सारखा टी.व्ही. बघतात. भटकतात. अभ्यास करीत नाहीत वगैरे वगैरे. पण हा दोष मुलांचा? की शिक्षक-पालकांचा? विचार करायला लावणारी गोष्ट आहे.

त्यांच्या उत्साहाला आपण योग्य वळण लावू शकतो का? त्यांच्यातल्या प्रचंड क्रियात्मक शक्तीला योग्य ते खाद्य पुरवून उपयोग करून घेतो का? अती जपतो का? दुर्लक्ष करतो का? लाडाने नको त्या गोष्टी करतो का? डोळसपणे मुलांमध्ये वाढत जाणाऱ्या कृतीविकृतीकडे बघतो का? प्रश्न अनंत आहेत. शांतचित्ताने जाणीवपूर्वक विचार केला तर त्यांची उत्तरे नक्की सापडतील. मात्र त्याप्रमाणे थोडा वेळ काढून पाठपुरावा करायला हवा.

'सुनीत' यु. को. बँक कॉलनी,पटवर्धन बाग, एरंडवणा,
पुणे ४११ ००४.

# मुलांचे भावविश्व फुलविताना



## नाट्यछटांतून व्यक्तिमत्त्व विकास

**प्रकाश पारखी**

नाट्यछटा म्हटले की आठवतात दिवाकर. अर्थात ते सुद्धा मागच्या पिढीला. कारण १९११ साली दिवाकरांची पहिली नाट्यछटा दै. केसरीत प्रकाशित झाली आणि एका पाठोपाठ ५१ सुंदर नाट्यछटांचा खजिनाच दिवाकरांनी मराठी साहित्याला अर्पण केला. हा वेगळा साहित्यप्रकार विलक्षण लोकप्रिय झाला.

तो फक्त सादरीकरणाकरता. स्नेहसंमेलने, मेळे, विविध करमणुकीच्या कार्यक्रमात दिवाकरांच्या नाट्यछटा या हुकमी मनोरंजनाचे साधन म्हणून सादर केल्या जात; पण फार क्वचितच नवीन नाट्यछटांच्या लेखनाचा प्रयत्न झाला. दिवाकरांनी साहित्याचे अनेक प्रकार हाताळलेत कवितेपासून ते तीन अंकी नाटकापर्यंत. दोन पात्री, तीन पात्री पण नाट्यछटा हा प्रकार मात्र दिवाकरांच्या नावे नोंदवला गेला. डॉ. लागू म्हणतात त्याप्रमाणे नाट्यछटा ही पाठांतरासाठी किंवा मुलांनी सादर करावी अशी कल्पना समजात रुजली. पण खरं तर दिवाकरांच्या काही नाट्यछटा मोठ्या माणसांनाही अंतर्मुख करायला लावतील. सादरीकरणातही मोठ्यांचा कस लागेल अशा आहेत. विजय तेंडुलकरानी प्रस्तावना देऊन त्या पुन्हा पुनर्मुद्रित करण्यात आल्या. पण या साहित्यप्रकाराचे खरे सामर्थ्य आम्हाला आता कळू लागले आहे.

### दिवाकर नाट्यछटा स्पर्धा

१९९२ साली कृष्णदेव मुळगुंद यांच्या सूचनेवरून मुलांना एकट्याला सहज सादर करता याव्यात यासाठी दिवाकर स्मृती नाट्यछटा स्पर्धा सुरू केल्या. दिवाकर हे नू. म. वि. शाळेत शिक्षक होते. म्हणून त्याच वास्तूत या स्पर्धांचा शुभारंभ झाला. या स्पर्धेचा प्रतिसाद दुसऱ्या वर्षी प्रचंड वाढला. गरवाले बालभवनात या स्पर्धा आयोजित करताना अनेक अडचणी आल्या. अनेक गोष्टी लक्षात आल्यात. या स्पर्धेचा प्रतिसाद वाढत जाणार. त्यामुळे त्याचे आयोजन शिस्तबद्ध करायला हवे. सादरीकरणाला दिवाकरांच्या नाट्यछटा फक्त ५१ मुलांसाठी करता येण्यासारख्या म्हणजे चार पाचच. मग काय 'चिंगी वर्षाची झाली नाही' ही नाट्यछटा २५ मुलींनी केली. 'बोलावणे आल्याशिवाय नाही' ४० मुलांनी केली. परीक्षकांना नाट्यछटा पाठ झाली. निकाल कसा लावणार?

मग दिवाकरांप्रमाणे अजून नाट्यछटा कोणी लिहिल्या आहेत? त्यांची पुस्तके बाजारात कुठे उपलब्ध आहेत याची माहिती आम्ही पुरवू लागलो. डॉ. ललिता गुप्ते यांचे 'इंद्रधनुषी' नाट्यछटा हे सुंदर पुस्तक पालकांपर्यंत पोहोचले. अनेकांनी त्यातील नाट्यछटा सादर करून पुरस्कार मिळवले पण स्पर्धक वाढतच चालले होते.

मग आम्ही लेखन कार्यशाळा घेतल्या. त्यात शिक्षक, पालक व विद्यार्थीही सहभागी झाले.

नाट्यछटा लेखनाला आम्ही पुरस्कार ठेवले आणि गेल्या १५ वर्षात हजारो नवीन नाट्यछटा लिहिल्या गेल्या. त्यात अनेक विषय हाताळले गेले. मुलांच्या भाव विश्वातील अनेक विषयांना




**दिवाकर नाट्यछटा स्पर्धा २००४ दहा गटातील प्रथम क्रमांकाबरोबर प्रमुख पाहुणे आमदार गिरीष बापट, श्री. श्याम भुर्के**

तेथे महत्त्वाचे स्थान दिले गेले. नोकरी करणारी आई, दप्तराचे ओझे, शाळेतून घरी आल्यावर दिसणाऱ्या कुलुपाला उद्देशून नाट्यछटा लिहीली गेली. पाळणाघर, रिक्षावालेकाका, आजी-आजोबा हवे. अशा अनेक विषयांवर मुलांचे भाववेध उलगडत गेले. विविध विषय सादर करताना ते मुलांनी ऐकले पण पाहिजेत याकरताही काही नियम करावे लागले. आपली नाट्यछटा सादर झाली की निघून जायचे. शेवटच्या स्पर्धकाला एकही प्रेक्षक नाही. तेव्हा आम्ही २०-३० मुलांचा गट करून तेवढ्या नाट्यछटा झाल्याशिवाय मुलांनी सभागृह सोडायचे नाही हा नियम केला. नाट्यछटा त्याच्या वयोगटाला साजेशी हवी असाही नियम केला. कारण छोट्या मुलींना साड्या घालून किंवा मुलांना धोतर, पगड्या घालून पाठवू लागले.

खरं म्हणजे नाट्यछटा म्हणजे मनोगत. रॉबर्ट ब्राऊनिंगच्या मोनोलॉग या काव्यप्रकारातून दिवाकरांनी याची प्रेरणा घेतली. त्यामुळे त्या पात्राचे ते मनोगत वाटावे यासाठी सादरकर्त्या मुलांच्या वयाप्रमाणेच त्याची नाट्यछटाही त्याचे मनोगत वाटावी अशी हवी. त्यासाठी रंगभूषा व वेशभूषा याला शून्य गुण ठेवलेत. विषयाची निवड, सभाधीटपणा, पाठांतर वाचिक आणि आंगिक अभिनय यालाच गुण ठेवले. नाट्यछटांचा प्रतिसाद वाढला तशा अनेक गोष्टी लक्षात आल्या. मुलांना व्यासपीठ मिळत नाही. शाळेच्या संमेलनात सर्वच मुलांना व्यासपीठ मिळत नाही. या स्पर्धेत मात्र शाळेची परवानगी लागत नाही. त्यामुळे अनेक हौशी पालकांना स्पर्धेची संधी मिळाली. सुरुवातीला अभ्यास, परीक्षा, शाळा सोडत नाही अशा तक्रारी करणारे पालक काही झाले तरी स्पर्धेत भाग घ्यायचाच या जिद्दीने उतरतात. एका पालकाने अनुभव सांगितला की स्पर्धेच्या वेळी त्या मुलाची परीक्षा चालू होती. पण मुलाच्या हट्टीपणामुळे भाग घेतला आणि स्पर्धेच्या दिवशी जो पेपर होता त्या पेपरात त्याला सर्वात जास्त मार्क्स पडलेत. यावरून अभ्यासाच्या प्रचंड तणावाखाली असलेल्या आजच्या विद्यार्थ्यांना गरज आहे एखाद्या खेळाची, एखाद्या नाट्यछटेची. या वयात अशा विविध उपक्रमात त्यांचे मन रमत असेल तर त्यांचे मानसिक आरोग्यही चांगले राहते. दोन मिनिटे सुद्धा एखादे चॅनल न पाहणारी मुले दोन तास नाट्यछटांचा कार्यक्रम न कंटाळता बघतात. कितीतरी नाट्यछटांच्या विषयाची मांडणी इतकी सुंदर झाली की पालकांनीही सुंदर दाद दिली. पालकांचे शिक्षकांचे एकप्रकारे प्रबोधन व्हावे इतक्या सुंदर नाट्यछटांचे सादरीकरण केले जाते. 'दप्तराचे ओझे' मधील त्या मुलाची वेदना प्रत्येक मुलाला आपली वाटते. आजी-आजोबा हवे असे सांगताना न कळत एक सामाजिक प्रश्न हाताळला जातो. माझी ताई किंवा दादा एस. एस. सी. ला आहे ही नाट्यछटा करताना पालक कितीतरी अतिशयोक्तीने वागत असतात. दहावीच्या अभ्यासाचा



केवढा बाऊ करतात, याचे वास्तववादी चित्र आपल्या डोळ्यासमोर उभे राहते. दिवाकरांनी नेमके हेच केले आहे. नाट्यछटा लिहितांना नुसतीच करमणुक हा उद्देश ठेवला नव्हता. त्यामध्ये स्वभाव वैशिष्ट्ये, सामाजिक व्यंगे, स्वभावातील दोष मोठ्या मार्मिकपणे नाट्यछटेत प्रकट होतात. एखादे तीन अंकी नाटक परिणाम घडवणार नाही एवढा परिणाम ही तीन मिनिटाची नाट्यछटा करते. दिवाकरांची एकही नाट्यछटा तीन मिनिटांपेक्षा मोठी नाही. त्यामुळे वयोगटाप्रमाणे आम्ही वेळ वाढवत गेलो तेव्हा लक्षात आले की वेळ वाढवला की त्या नाट्यछटेत पाणी घालणे सुरू होते आणि ती निरस होते. त्यामुळे तीनच मिनिटात मोठ्ठा आशय नाट्यपूर्ण सादर करणे. म्हणजे नाट्यछटा एकट्याने सादर करावयाच्या पण एकाच पात्राचे संवाद इतर पात्रे प्रेक्षकांना जाणवतील असा आभास निर्माण करावयाचा. पण त्या पात्रांचा संवाद म्हणायचा नाही. ती पात्रे काय बोलताहेत हे एकाच पात्राच्या संवादातून कळले पाहिजे.

नाट्यछटा म्हणजे काय हे समजण्यासाठी आम्ही कार्यशाळा घेतल्या. पारितोषिक विजेत्या मुलांनी सादर केलेल्या नाट्यछटांचे कार्यक्रम केले. प्रथम ऑडिओ कॅसेट, ऑडिओ सी.डी. व नंतर व्ही. सी. डी. प्रकाशित केल्या. त्यामुळे नाट्यछटा या माध्यमाचा प्रसार गेली १४ वर्षे आम्ही करत आहोत. नाट्यछटा म्हणजे काय? ती कशी लिहावी? कशी सादर करावी? स्पर्धा कशा घ्याव्यात? परिक्षण कसे करावे? या विषयावर आमचे पुस्तक 'बहुरंगी' नाट्यछटा व 'बहुढंगी' नाट्यछटा, निवडक नाट्यछटा भाग १ व २ अशी अनेक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. इतरही प्रकाशकांनी नाट्यछटेची पुस्तके प्रकाशित केली आहेत.

**अश्विन चितळे**

नाट्यछटा सादरीकरणामुळे सभाधीटपणा आला. मनातले विचार मुले मोकळेपणाने मांडू लागली तर कलाकार म्हणून घडतांनासुद्धा याचा उपयोग झाला. अश्विन चितळे याने नाट्यछटा स्पर्धेत भाग घेऊन बक्षीस मिळवले होते व 'श्वास' चित्रपटाच्या स्क्रीन टेस्टमध्ये त्याने नाट्यछटा सादर करून प्रवेश मिळवला व पुढे राष्ट्रपती पुरस्काराचा मानकरी ठरला.

सक्षम कुलकर्णी यानेही सतत दोन वर्षे नाट्यछटा स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकवला होता. त्यानंतर बालनाट्य, टि.व्ही. सिरीयल, नाना पाटेकर बरोबर 'पक् पक् पकाक्' चित्रपटात महत्त्वाची भूमिका सादर केली. अश्विन फडके सतत तीन वर्षे प्रथम क्रमांक मिळवून अनेक व्ही. सी. डी. फिल्म्स, बालनाट्ये गाजवून या वर्षीच्या शाहू मोडक पुरस्काराचा मानकरी ठरला.

सुरुवातीला या स्पर्धा फक्त शाळेच्या स्तरावर होत्या. १ली ते १०वी पर्यंतचेच गट केले होते. परंतु १४ वर्षांत १०वी पास होऊन पुढे गेली त्यांना रुखरुख वाटू लागली. 'आम्हाला नाही का भाग घेता येणार?' अशी विचारणा होऊ लागली. काही पालक व शिक्षकांनीही भाग घ्यावासा वाटू लागला. मग आम्ही सुरू केला 'खुला गट' आणि १लीत न गेलेली शिशु मंडळीही हट्ट करू लागली. त्यामुळे शिशु गटही स्वतंत्र घ्यावा लागला. यावर्षी शिशु गटातील स्पर्धकाने प्रथम क्रमांक मिळवला. शाखी कुलकर्णीला. तिचे सादरीकरण बक्षीस समारंभाचे वेळी ठेवले होते. मोठ्या कलाकारांनाही जमणार नाही एवढी समज तिने दाखवली. नाट्यछटेला प्रेक्षक टाळ्या व हशाने दाद देत होते. ती दाद स्वीकारून थांबून ती पुढे जात होती. इतक्या लहान वयात तिला मिळालेला अनुभव तिचे सारे आयुष्य समृद्ध करणारा आहे. हा धीटपणा व हे कौशल्य तिला भविष्यात नक्कीच उपयोगी पडणार आहे. पण नाट्यछटा प्रकाराचा अभ्यास करून तयारीने सादर करण्याच्या वृत्तीचा अभाव आहे. व्यासपीठ मिळतंय मग करा काहीतरी असा विचार बऱ्याच



संस्थेची 'म्युझीकल पाढे' कॅसेट सीडी प्रकाशित करताना शाखी कुलकर्णी, प्रकाश पारखी,सुनील सुकथनकर,सुमित्रा भावे,सौ.लीनी फडके

जणांचा असतो. पण काही मात्र तयारीने येतात. शिशुगटापासून ते ६० ते ७० वयोगटापर्यंतचे आजी-आजोबासुद्धा हौसेने भाग घेतात.

**बक्षीसाचा आग्रह**

काही पालकांचा मात्र स्पर्धेत भाग घेतला की बक्षीस मिळालेच पाहिजे असा अट्टाहास असतो. मग त्या मुलावर एवढे दडपण आणतात की त्यातल्या आनंदालाच तो मुलगा पारखा होतो. स्पर्धेत भाग घेतला म्हणजे चांगला विषय, चांगली तयारी हवीच; पण बक्षीस मिळाले नाही, मुलगा जर चुकला तर त्याला रागावणे. काही पालक तर बक्षीस मिळावे यासाठी अनेक गैर मार्ग पत्करतात. परिक्षकांना भेटणे, संयोजकांना खूष करायचा प्रयत्न करणे वगैरे. आमच्या मुलाला जर बक्षीस मिळाले नाही तर त्याला ते सहन होणार नाही. त्याला ताप येईल, उत्तेजनार्थ तरी बक्षीस द्याच. पालकांच्या या वर्तनामुळे मुलांवर किती वाईट परिणाम होत असेल. स्पर्धेत अपयश म्हणजे काही जीवनातील शेवटची संधी नव्हे. पराभव स्वीकारण्याचा खिलाडूपणा त्याच्या अंगी कसा येईल हे

पाहिले पाहिजे. मुलांनी न घाबरता व्यासपीठावर जाऊन तीन मिनिटे न चुकता नाट्यछटा सादर केली हेच महत्त्वाचे. त्यामुळे रंगमंचाचा अनुभव हेच खरं लाख मोलाचं बक्षीस आहे. पण बक्षीस मिळविण्याकरता आपले आई-बाबा गैर मार्ग अवलंबित आहे हे जर त्या मुलाला कळले तर? खरं तर पालकांना आम्ही नेहमी सांगतो, आमच्या बक्षीस समारंभाला हजर रहा. कारण प्रत्येक गटातील प्रथम क्रमांकाची नाट्यछटा सादरीकरण हे पहायला मिळते. आपण कुठे कमी पडलो याचे आत्मचिंतन मुलाच्या मनात सुरू होते. अनेक पालक आमच्या या आगळ्यावेगळ्या बक्षीस समारंभाची वाट पहात असतात. नुकत्याच पार पडलेल्या बक्षीस समारंभात ज्येष्ठ सिनेदिग्दर्शिका श्रीमती सुमित्रा भावे म्हणाल्या की 'आतापर्यंत अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय समारंभ पाहिले; पण आपल्या या समारंभाची गोडी काही वेगळीच आहे.'

शिशुगटापासून खुल्या गटापर्यंत दहा गट केले आहेत. त्यातील प्रत्येक गटातील प्रथम क्रमांक नाट्यछटा सादर करतो. मग एक पाहुणा प्रेक्षकांमधून रंगमंचावर येऊन त्याला व त्याच्या गटातील इतरांना पुरस्कार देतो. मग पुढच्या गटातील प्रथम क्रमांकाचे सादरीकरण. मध्यंतराशिवाय सलग दोन तास चालणारा हा कार्यक्रम कंटाळवाणा न होता रंगतच जातो.

गेली १४ वर्षे या स्पर्धा आर्थिकदृष्ट्या तोट्यातच जातात. काही रोटरी, काही सामाजिक कार्यकर्ते, शताब्दी वर्षानिमित्त आनंद मासिकाप्रमाणे मुलांसाठी काम करणाऱ्या संस्था सहकार्य करतात. संस्थेच्या ठेवीतले व्याज यातून तोटा भरून काढला जातो. तरीसुद्धा या स्पर्धा पुढे चालू राहण्यासाठी निरपेक्ष आर्थिक व शारीरिक मदतीची आवश्यकता आहे. ती मिळाली तरच मुलांचे व पालकांचे भावविश्व समृद्ध करणारा हा कलाप्रकार सर्वांपर्यंत पोहोचविण्यास आमच्या नाट्यसंस्कार कला अकादमीस यश मिळेल.

धन्यवाद!

नाट्यसंस्कार कला अकादमी, पुणे
२०५, शुक्रवार पेठ पुणे - २
मोबाईल - ९४२२३०३३०३

**ही पुस्तके फक्त मुलांसाठी.... नाहीत मुळीच मोठ्यांसाठी!**

ही पुस्तके फक्त मुलांसाठी.... नाहीत मुळीच मोठ्यांसाठी!



**किंमत प्रत्येकी ३०रु**
पोस्टेज
प्रत्येकी २०रु.
सर्व पुस्तकांसाठी २५रु.

| | |
|---|---|
| **टिंबक टू आणि इतर कथा** | मंजूषा आमडेकर |
| **चतूर बोकोबा आणि इतर कथा** | वृषाली पटवर्धन |
| **नशीबवान शेखर आणि इतर कथा** | वृषाली पटवर्धन |
| **सुंठ बिस्किटाचा माणूस आणि इतर कथा** | चारुता पुराणिक |
| **निद्राराणी आणि इतर कथा** | विजया देशपांडे |
| **जादूचं खीरपात्र आणि इतर कथा** | अरुंधती पंडित |
| **गम्मत गोष्टी** | मंजूषा आमडेकर |
| **धमाल गोष्टी** | मंजूषा आमडेकर |
| **मजेदार लोककथा** | मंजूषा आमडेकर |
| **आदर्श लोककथा** | मंजूषा आमडेकर |



वेगवेगळी दहा पुस्तके...प्रत्येक पान रंगीत...मोठी ठळक अक्षरे...छान छान चित्रे...नवीन मजेदार गोष्टी

**नवीन मजेदार गोष्टी...छान छान चित्रे...मोठी ठळक अक्षरे...प्रत्येक पान रंगीत...वेगवेगळी दहा पुस्तके**






# मुलांचे भावविश्व फुलवताना

**श्याम कुरळे**


**को**ल्हापूर शहरापासून सुमारे पंचवीस किलोमीटर अंतरावर असलेल्या ग्रामीण परिसरातील शाहूनगर (परिते) येथील भोगावती सहकारी साखर कारखान्याच्या परिसरात असलेल्या भोगावती हायस्कूलमध्ये जून १९६८ ते सप्टेंबर २००१ या ३३ वर्षांच्या कालावधीत शिक्षक, पर्यवेक्षक, उपमुख्याध्यापक व शेवटची १६ वर्षे मुख्याध्यापक म्हणून मी अध्यापन व शालेय प्रशासनाचे कार्य केल्यामुळे हजारो मुलांशी माझा संपर्क आलेला आहे. त्यामुळे शाळेत येणारे प्रत्येक मूल हे एक शक्तिकेंद्र असते असे माझे ठाम मत बनले आहे. विद्या, कला आणि क्रीडा यांपैकी कोणत्या ना कोणत्या क्षेत्रात ते प्रावीण्य संपादू शकते, असा माझा अनुभव आहे.

विद्यार्थ्यांमधील नेमके गुण हेरून त्यागुणाची वाढ करण्यासाठी योग्य ते मार्गदर्शन करण्याची जबाबदारी शिक्षकांची असते. त्यासाठी शाळांमधून वार्षिक स्नेहसंमेलने आयोजित केली जातात. अशा स्नेहसंमेलनांमधून विविध कला आणि क्रीडा प्रकारातील विद्यार्थ्यांच्या अंगच्या विविध गुणांचे दर्शन घडते. त्यांच्या बौद्धिक गुणांची कसोटी शालेय परीक्षांमधून तर लागतेच, शिवाय शासकीय शिष्यवृत्ती परीक्षांमधून कुशाग्र बुद्धिमत्तेचे विद्यार्थी चमकतात. विद्या, कला आणि क्रिडा अशा तीन प्रकारात विभागलेल्या विद्यार्थ्यांच्या अंगभूत गुणांना विकसित करण्यासाठी पुरेपूर संधी मिळावी, या उद्देशाने आम्ही सर्व अध्यापक मंडळी एकत्र बसून वार्षिक कामकाजाचे नियोजन करीत असू. यामध्ये बुद्धिमान विद्यार्थ्यांसाठी परीक्षा समिती, वक्तृत्व, निबंध लेखन, कथाकथन, सुंदर-वळणदार हस्ताक्षर लेखन यामध्ये विशेष अभिरुची असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा समिती, क्रीडा प्रकारात गती असलेल्या विद्यार्थ्यांसाठी क्रीडा समिती, चित्रकलेत आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी चित्रकला समिती, नाट्याभिनय, गायन-वादन-नर्तनाचे अंग असलेल्या विद्यार्थ्यांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम समिती अशा प्रमुख पाच समित्यांची स्थापना केलेली असे. प्रत्येक समितीमध्ये एक समितीप्रमुख अध्यापक असे. त्या समिती प्रमुखास सर्व प्रकारचे सहकार्य करण्यासाठी ज्या त्या विभागाची आवड असणारे अध्यापक त्या त्या समितीत विभागले जात असत. विद्यार्थ्यांनाही ज्याच्या त्याच्या आवडीनुसार निरनिराळ्या समित्यांमधून विभागले जात असे.

अशा प्रकारे अध्यापकांच्या कामाची विभागणी केल्यामुळे नित्याचे शालेय अध्यापन सांभाळूनही सकाळी शाळा सुरू होण्यापूर्वी किंवा शाळा सुटल्यानंतर शिक्षक आपापल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत असत. अशा प्रकारच्या कार्यपद्धतीमुळे परीक्षा विभागातून मार्गदर्शन लाभलेल्या कित्येक विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय शिष्यवृत्तीपासून जिल्हा शिष्यवृत्तीपर्यंत अनेक वेळा शिष्यवृत्त्या पटकाविल्या. एस. एस. सी. परीक्षेत एका विद्यार्थिनीने तर मागासवर्गीय विद्यार्थिनींत राज्यात प्रथम येण्याचा बहुमान पटकाविला. स्पर्धा समितीच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेल्या विद्यार्थ्यांनी जिल्हा पातळीवरील वक्तृत्व, निबंध, हस्ताक्षर स्पर्धांमध्ये सहभागी होऊन कित्येक पारितोषिके

पटकाविली. विज्ञान प्रदर्शनासाठी आमच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या उपकरणांना राज्य पातळीपर्यंत बक्षिसे मिळाली.

क्रीडा प्रकारामध्ये आम्ही प्रामुख्याने भर दिलेला होता तो जलतरण प्रकारावर. याचे कारण असे की, भोगावती नदीला उन्हाळ्यात परिते येथील बंधाऱ्यात फळ्या टाकून पाणी अडवले जात असे. त्यामुळे स्विमिंग टँक मध्ये असलेल्या संथ पाण्यात पोहण्याचा सराव करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळत असे. सुदैवाने आमच्या शाळेत जलतरण स्पर्धेत अनेक पारितोषिके प्राप्त केलेले व पट्टीचे पोहणारे क्रीडा शिक्षक होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आमचे सुयश मिळविण्साठी त्यांची सतत धडपड सुरू असे. भोगावती परिसरात आमच्या जलतरणपटु विद्यार्थी-विद्यार्थिनींचे भव्य सत्कार झाले. पुढे नोकरीच्या दृष्टीनेही त्यांचा चांगलाच फायदा झाला. प्राधान्याने पोलिसखात्यात व राज्य परिवहन मंडळात ड्रायव्हर, कंडक्टर म्हणून आमचे विद्यार्थी तर कार्यरत आहेतच, शिवाय वैद्यकीय व्यवसाय, बांधकाम खाते इतकेच नव्हे त सचिवालयापर्यंतच्या अनेक क्षेत्रात आमचे विद्यार्थी सेवारत आहेत. आम्हाला या गोष्टीचा अतीव आनंद व अभिमानही वाटतो. अनपेक्षितपणे कुठेतरी एकेकाळचे हे आमचे विद्यार्थी भेटतात. आता त्यांच्यात खूप बदल झाल्यामुळे



**भोगावती हायस्कूलमध्ये भरविलेल्या जिल्हा पातळीवरील विज्ञान प्रदर्शनास लाभलेला विद्यार्थ्यांचा अभूतपूर्व प्रतिसाद**

जलतरणपटु विद्यार्थी पोहोण्याचा सराव करीत असत. सुट्टीच्या दिवशी कोल्हापुरातील अंबाई टँकमध्ये पोहण्याचे प्रशिक्षण देण्यासाठी आमचे क्रीडा शिक्षक विद्यार्थी-विद्यार्थीनींना नेत असत. अशाप्रकारे पोहण्याचा सराव करून तयार झालेले आमच्या शाळेचे जलतरणपटु तालुका पातळीवरील जलतरण स्पर्धा जिंकत हळूहळू जिल्हा, राज्य व शेवटी देशपातळीवर सुवर्ण, रौप्य व ब्राँझ पदकांची लयलूट करू शकले. या विजेत्यांमध्ये मुलांच्या बरोबरीने मुलीही होत्या हे विशेष. कोणत्याही स्पर्धेत विजय मिळविणाऱ्या मुलामुलींचे प्रार्थनेच्या वेळी आमच्या शाळेत आम्ही पुष्पगुच्छ देऊन सत्कार करीत असू. त्यामुळे मुला-मुलींना प्रोत्साहन मिळून कोणत्या ना कोणत्या स्पर्धेत मी त्यांना ओळखू शकत नाही. पण ते कृतज्ञतेने नमस्कार करून शाळेतील सोनेरी दिवसांच्या पूर्वस्मृतींना उजाळा देतात आणि मला खूप खूप धन्यता वाटते.

आमचे भोगावती हायस्कूल भोगावती सह. साखर कारखान्याच्या परिसरात असल्यामुळे तेथील कारखान्याच्या स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताक दिन व गणेशचतुर्थी समारंभात शाळेने सक्रिय सहकार्य देण्याची कारखान्याची अपेक्षा असे. कारखानाही शाळेला अपेक्षित सहकार्य देत असे. कारखान्याचा गणेशोत्सव अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरा होत असे. या गणोशोत्सवात अनंत चतुर्दशीपर्यंत करमणुकीचे कार्यक्रम दररोज सादर होत असत. हे कार्यक्रम पाहण्यासाठी भोगावती



**सांस्कृतिक कार्यक्रम समिती समवेत एकांकिकेतील बालकलाकार**

कारखान्याच्या परिसरातील परिते, घोटवडे, कौलल वगैरे गावातील रसिक बहुसंख्येने हजर असत. या कार्यक्रमात आमच्या शाळेलाही एक दिवस करमणुकीचा कार्यक्रम सादर करण्यासाठी आवाहन केले जात असे. आम्ही ते आवाहन एक आव्हान समजून स्वीकारत असू.

सुदैवाने आमच्या शाळेत लेखक म्हणून मी स्वत:, दिग्दर्शनाची उत्तम जाण असलेले श्री. बापूसाहेब संकपाळ व संगीताची उपजत आवड असलेले श्री. दिनकरराव जाधव अशी त्रिमूर्ती एकत्र येणे, हा आमच्या शाळेच्या दृष्टीने एक सुयोगच जुळून आलेला होता. श्री. संकपाळ यांचा आग्रह मी स्वत:च समूहगीते, नृत्यगीते व शालेय विद्यार्थ्यांना सादर करण्यासाठी योग्य अशा एकांकिका लिहाव्या असा असे. त्यांच्याच आग्रहामुळे सुरुवातीस मी विद्यार्थी जीवनावरील 'आम्ही नापास का झालो?' ही एकांकिका लिहिली. दिग्दर्शनासाठी ती श्री. बापूसाहेब संकपाळ यांच्याकडे सोपविली. संगीताची बाजू श्री. दिनकरराव जाधव यांनी उत्तम रीतीने सांभाळली. गणेशोत्सवातील करमणुकीच्या कार्यक्रमासाठी तयार करण्यात आलेल्या भव्य रंगमंचावर ती एकांकिका आम्ही सादर केली. त्या एकांकिकेत मुख्याध्यापकांसह सर्व अध्यापकांना 'आम्ही नापास का झालो?' असा रोखठोक सवाल करून शैक्षणिक प्रक्रियेतील उणिवांकडे निर्देश करीत विद्यार्थ्यांनी ती एकांकिका इतक्या तन्मयतेने सादर केली की रसिकांनी सर्वांचे अंत:करणपूर्वक कौतुक केले. त्यानंतर ती एकांकिका आम्ही कोल्हापूर जिल्हा मुख्याध्यापक संघाच्या जिल्हा पातळीवरील एकांकिका स्पर्धेत सादर केली आणि लेखनासाठी मला, सादरीकरणासाठी शाळेला प्रथम क्रमांकांची पारितोषिके व अभिनयासाठी मुलांना बक्षिसे मिळाली.

त्यानंतर पुणे आकाशवाणीने शालेय विद्यार्थ्यांसाठी राज्य पातळीवरील समूहगीत स्पर्धा जाहीर केली. त्या स्पर्धेसाठी मी स्वत:च समूह गीत लिहावे अशी आमच्या शाळेच्या सांस्कृतिक कार्यक्रम समितीच्या वतीने सर्व सदस्यांनी इच्छा व्यक्त केल्यामुळे मी 'ऊठ शेतकरी राजा' हे ग्रामीण परिसराला अनुरूप असे गीत लिहिले. ते गीत श्री. दिनकरराव जाधव व श्री. संकपाळ सरांनी संगीतबद्ध केले. स्पर्धेच्या मुदतीपूर्वी पंधरा दिवस मी स्वत:, जाधव व संकपाळ सर असे आम्ही तिघे समूह गीतासाठी मुला-मुलींची निवड करून रोज शाळा सुटल्यानंतर दोन तास मुला-मुलींच्या गाण्याचा सराव करून घेत होतो. शेवटी गीतगायनाची मनासारखी तयारी झाली. आमच्या शिक्षण संस्थेने त्यावेळी संस्थेसाठी एक मॅटॅडोर गाडी घेतलेली होती. त्या गाडीतून आम्ही समूहगीत स्पर्धेसाठी निवडलेली ६ मुले व ६ मुली अशा बारा स्पर्धक मुला-मुलींसह मी, संकपाळ आणि जाधर सरांसह पंधराजण पुणे आकाशवाणी केंद्रावर दाखल झालो. त्यावेळी पुणे आकाशवाणी केंद्रावर वीणा चाफळकर नावाच्या कर्तव्यदक्ष केंद्राधिकारी समूह गीत स्पर्धेच्या प्रमुख होत्या. त्यांनी आमचे आस्थापूर्वक स्वागत केले. स्पर्धेसाठी महाराष्ट्रातून अनेक ठिकाणच्या शाळांचे संघ आलेले होते. स्पर्धेत आमच्या संघातील मुला-मुलींनी सुरेल आवाजात इतक्या तन्मयतेने गीत गायिले, की स्पर्धेसाठी नेमलेले परीक्षकही मंत्रमुग्ध होऊन

माना डोलावू लागले. त्यामुळे आमच्या मुलांनी गायिलेले समूहगीत पहिल्या पाच क्रमांकात कुठेतरी नक्कीच बसू शकेल, असा आम्हाला आत्मविश्वास वाटू लागला. शेवटी सर्व स्पर्धक शाळांच्या समूह गीतांचा कार्यक्रम पार पडला. स्पर्धेचा निकाल तयार करण्यासाठी सर्व परीक्षक स्वतंत्र दालनात गेले. आमचा जीव अगदी टांगणीला लागला होता. अर्ध्या तासानंतर परीक्षक बाहेर आले आणि परीक्षकांच्या प्रमुखाने निकाल वाचून दाखवायला सुरुवात केली - भोगावती हायस्कूल - प्रथम क्रमांक!

निकाल ऐकताच आमच्या शाळेच्या मुला-मुलींनी आमच्या गळ्यात पडून एवढा जल्लोष केला, की पुढील निकाल ऐकण्याचे कोणास भानच राहिले नाही. सर्व निकाल जाहीर झाल्यानंतर आमच्या समूहगीताच्या संचास अडीच हजार रुपयांचे रोख पारितोषिक व शाळेसाठी प्रशस्तिपत्र देण्यात आले. आमच्या संघातील मुला-मुलींच्या आनंदास एवढे उधाण आले होते, की त्याची भूकतहानही हरपली होती. कधी एकदा शाळेत जातो आणि ही आनंद वार्ता शाळेतील गुरुजन आणि विद्यार्थ्यांना सांगतो अशी त्यांना उत्सुकता लागून राहिलेली होती. 'सर, आता थांबायला नको, शाळेकडे चला' असा त्यांनी आमच्या मागे सारखा लकडा लावलेला होता. तरीही आम्ही गडबड घाई न करता मुलांना गोडधोड खाऊ घातले आणि दुसऱ्या दिवशी मुलांसह शाळेत आलो. आम्ही काही बोलण्यापूर्वी सर्वांनी आमचे हार्दिक अभिनंदन केले. आम्ही त्यांना विचारले, 'तुम्हाला कसे कळले?' तेव्हा आम्हाला वृत्तपत्रातील ठळक बातमी शीर्षक त्यांनी दाखविले. ते शीर्षक होते, 'पुणे आकाशवाणीच्या समूहगीतस्पर्धेत भोगावती हायस्कूलचा प्रथम क्रमांक!'

त्या नंतर तेच गीत आमच्या संघाने जिल्हा मुख्याध्यापक संघाच्या समूहगीत स्पर्धेत सादर केले. तेथेही आमच्या बालचमूने प्रथम क्रमांक पटकाविला. पुढे अनेक शाळांनी ते गीत अनेक ठिकाणच्या समूह गीत स्पर्धेत सादर केले. तेथेही त्यांनी पारितोषिके पटकाविली. त्यावेळी विद्यार्थी आणि शिक्षकांच्या चेहऱ्यावर पाहिलेले समाधान हा माझ्या जीवनातील अमूल्य आणि अविस्मरणीय ठेवा आहे. आजवर तो मला अतीव आनंद देत आलेला आहे.

या सर्व घटनानंतर कोणत्याही स्पर्धेत मीच एकांकिका व समूहगीते लिहावीत असा शिक्षकांसह विद्यार्थ्यांचाही मला गोड आग्रह होत राहिला. मलाही तो टाळता आला नसल्यामुळे मी देशभक्तिपर आठ-दहा समूह गीते व पंधरा एकांकिका लिहिल्या. त्या सर्व माझ्या शाळेतील मुलांनी तर गाजवल्याच, शिवाय महाराष्ट्रातील वाड्या-वस्त्यावरील सुमारे दीडशे शिक्षण संस्थांतून त्या एकांकिकांचे प्रयोग सादर झाले. त्या एकांकिका पुण्याचे 'जोशीब्रदर्स', मुंबईचे 'त्रिदल' प्रकाशन, कोल्हापूरचे 'प्रचार' व 'सन्मित्र' प्रकाशन यांनी प्रकाशित केल्या. त्यांच्या अनेक आवृत्त्याही प्रकाशित झाल्या. माझ्या विद्यार्थ्यांनी कोल्हापूर जिल्हा मुख्याध्यापक संघाने आयोजित केलेल्या एकांकिका स्पर्धेत सादर केलेल्या एकांकिकांना सलग तीन वेळा पारितोषिके पटकावून हॅटट्रिक केलेली आहे. मलाही लेखनासाठी सलग तीन वेळा पारितोषिके मिळाल्यामुळे तेथेही हॅटट्रिक साधली गेलेली आहे. मुलांना रुचतील, त्यांच्यावर संस्कार करतील आणि त्यांच्याच भावविश्वातील विषयांवर त्या आधारलेल्या असतील अशी दक्षता जाणीवपूर्वक घेतली गेल्यामुळे त्या एकांकिका आनंद आणि सुख-समाधान देऊ शकल्या. सन १९८२ मध्ये कोल्हापुरातील 'सन्मित्र' प्रकाशनने प्रकाशित केलेल्या 'त्रिताल' या एकांकिका संग्रहास राज्य पुरस्कार मिळाला.

भोगावती हायस्कूलमध्ये मुख्याध्यापक म्हणून शेवटची सोळा वर्षे प्रशासकीय कामे कर्तव्य म्हणून मी सांभाळली असली, तरी मी आधी शिक्षक आणि नंतर मुख्याध्यापक असल्याची सतत जाणीव ठेवली. मुलांमध्ये रमण्यातच मला खरा आनंद लाभला. एखादा शिक्षक रजेवर असला तर त्याच्या तासावर जाणे म्हणजे एक प्रकारची शिक्षाच असे काही शिक्षकांना वाटते, पण मला ती एक प्रकारची पर्वणीच वाटे. त्या तासाला मुले मला गोष्ट सांगण्याचा आग्रह करीत असत. मग मी मुलांना स्वत:च लिहिलेल्या गोष्टी सांगत असे. त्या गोष्टी मुलांना खूप आवडल्याची खात्री होताच त्या गोष्टी वृत्तपत्रांच्या साप्ताहिक आवृत्त्या किंवा केवळ मुलांसाठी असलेल्या मासिकांकडे पाठवत असे. अशा प्रकारे माझ्याकडून शे-दीडशे बालकथा लिहिल्या गेल्या. त्यांची पुस्तकेही प्रकाशित झाली. मुलांना लिहिते करण्यासाठी दरमहा 'तुषार' नावाचे भित्तिपत्रक मी सुरू केले होते. त्यामध्ये मुलांच्या कथा, कविता, निबंध, चित्रे व विनोद असत. माझ्या कथा-कविता समवेतच मुलांच्या कथा-कवितांना आकाशवाणीच्या 'बालजगत' कार्यक्रमातून ध्वनिक्षेपित करण्यासाठी मी प्रयत्न करीत असे.

अशा प्रकारे मुलांच्या भावविश्वात रमताना बालसाहित्यिक म्हणून मी घडत गेलो. आजवर माझी शंभर पुस्तके प्रकाशित झाली. त्यामध्ये सत्तर पुस्तके बालवाङ्मयाचीच आहेत. या कार्याची दखल घेऊन कराडच्या टिळक विद्यालयाने पहिला 'साने गुरुजी पुरस्कार' मला बहाल केला. विविध सामाजिक, साहित्यिक संस्थांनी आजवर माझ्या बालसाहित्यातील पुस्तकांना वीसेक पुरस्कार दिलेले आहेत. शेकडो शिक्षण संस्थांच्या वार्षिक स्नेहसंमेलनात प्रमुख अतिथी म्हणून मुलांना मार्गदर्शन करण्याची संधी मला प्राप्त झालेली आहे. मुलांच्या शैक्षणिक, सांस्कृतिक तसेच कला व क्रीडाविषयक उन्नतीसाठी मी जे काही केले, त्याचे अमृतमधुर फळ ५ सप्टेंबर १९९८ साली प्राप्त झालेल्या राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्काराच्या रूपाने माझ्या पदरी पडले. भोगावती परिसरात गावोगावी जल्लोषी वातावरणात माझे भव्य सत्कार समारंभ झाले. एका शिक्षकाच्या जीवनाचे सार्थक याहून वेगळे आणखी काय असू शकेल? मुलांचे भावविश्व फुलवताना नकळत माझे भावविश्वही टक्क फुलून आले!

'अक्षर' १०१८ ए, प्लॉन नं. १६,
आपटेनगर पाण्याच्या टाकीजवळ,कोल्हापूर -४१६०१२.
दूरध्वनी ९५२३१ - २३२०६०३

# मुलांचे भावविश्व फुलविताना



## स्वतःच्या मुलीला शिकवण्याच्या निमित्ताने केलेले प्रयोग

**मंजूषा आमडेकर**

**सुरुवात**

पेशाने आणि वृत्तीने मी लेखिका आणि अनुवादक आहे. त्यातही मी बालवाङ्मय जास्त लिहिते. त्यामुळे 'बालसाहित्य' हेच माझं अंगण आणि क्षितिज. या क्षेत्रात काम करता करता असं मी निश्चित केलं की 'मुलांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करणे' हेच माझं ध्येय आहे. त्यामुळे मी आता ज्या प्रयोगाबद्दल लिहिणार आहे, तो प्रयोगही याच विषयाशी संबंधित आहे आणि त्यातूनच माझ्या मुलीचं भावविश्व कसं फुललं ते मी सांगणार आहे.

हा प्रयोग व्यक्तिगत पातळीवर करता येण्यासारखा आहे. त्यामुळे कोणत्याही स्त्रीला स्वत:च्या मुलाच्या संदर्भात घरच्या घरी, विनामूल्य करता येईल. वेळ साधारणपणे रोज दहा मिनिटं ते पुढे अर्धा तास इतका अत्यल्प लागतो. यासाठी मुलाचं वय कमीत कमी दोन ते अडीच वर्षं असावं. कारण मूल चांगलं बोलायला लागणं जरुरीचं आहे. (वरती मी 'स्त्री' असा उल्लेख केलाय, तो केवळ लहान मूल आईच्या सहवासात जास्त वेळ असते म्हणून. अन्यथा मुलाचे बाबा, आजी, आजोबा, इतर कुणालाही तो प्रयोग करता येणारच आहे.)

**प्रेरणा आणि बदल**


'हाऊ टू मल्टिप्लाय युवर बेबीज इंटेलिजन्स' या पुस्तकात मुलांना वाचायला शिकवण्याच्या प्रयोगाची माहिती आहे. हे पुस्तक मी वाचलेलं नाही; पण या प्रयोगाची मला जी ऐकीव माहिती मिळाली त्यावरून मलाही असा प्रयोग करून पाहण्याची प्रेरणा मिळाली. मुलांना वाचायला शिकवण्यासाठी त्यात लेखकाने A to Z अक्षरांचे साधारण पुस्तकाच्या आकाराचे बोर्ड तयार करून घ्यायला सांगितलेय. म्हणजे एका बोर्डवर एक अक्षर याप्रमाणे. पण पेंटरकडून असे बोर्ड करून घेण्याच्या खर्चिक प्रकारापेक्षा मी माझ्या पद्धतीप्रमाणे घरच्या घरीच आहे त्या वस्तूंमध्ये हा प्रयोग करायचं ठरवलं.

शिवाय मला मराठी शिकवायचं होतं. इंग्रजी ही विश्वभाषा आहे आणि आजच्या जगात वावरणाऱ्या मुलांना उत्कृष्ट इंग्रजी येणं आवश्यक आहे. त्यामुळे माझी मुलगी इंग्रजी शाळेत जाते; पण आमची मातृभाषा मराठी असल्यामुळे तिला मराठी उत्तम आलं पाहिजे अशी माझी आग्रहाची भूमिका आहे. त्यामुळे मला मराठी शिकवण्याच्या दृष्टिकोनातूनही वरील प्रयोगात बदल करणं आवश्यक होतं. त्यामुळे मूळ प्रयोगातून 'लहान वयापासून मुलांना वाचायला शिकवता येऊ शकेल' एवढीच कल्पना मी घेतली. (२ - २।। वर्षे वयापासून)

**माझा प्रयोग**

**१ ली पायरी :** माझ्याकडे बरीच जुनी व्हिजिटिंग कार्डस् पडलेली होती. त्या कार्डांच्या मागे मी ठळक अक्षरात स्केचपेनने अ ते ज्ञ अक्षरं आणि ० ते १० अंक लिहिले. (एका कार्डावर एकच अक्षर किंवा अंक याप्रमाणे) बस्स! एवढंच! माझ्या प्रयोगाची तयारी झाली.

आता पहिल्या टप्प्यात मी रोज मुलीला (मालविका) एकेक कार्ड दाखवायचं आणि त्या त्या अक्षराचा उच्चार करून तिलाही तो उच्चार




करायला लावायचं, अशी सुरुवात केली. पत्त्यांचा कॅट असतो तसाच हा कार्डांचा गठ्ठा म्हणजे आमचा अक्षरांचा खेळच होता. सगळी कार्डं एकेकदा दाखवली की ठेवून द्यायची - तिच्या हाताला लागतील अशी. याला फक्त दहा ते पंधरा मिनिटं लागली.

आता तिला जरी अक्षर, अंक वगैरेंबद्दल काही कळत नसलं तरी तिने एक आकृती म्हणून अक्षरं लक्षात ठेवली. म्हणजे उदाहरणार्थ 'बदक' या शब्दात तिला 'ब' ही आकृती दिसली की ती मोठ्याने 'ब' असा उच्चार करायला लागली.

असा आठवडाभर प्रयोग केला.

**२ री पायरी :** आता मी नवीन कार्डं घेतली. त्या एकेका कार्डाच्या मागे एकच अक्षर रिपीट झालेले शब्द लिहिले. उदा. काका, बाबा, दादा, पापा, लिला, टाटा वगैरे. मग आठवडाभर रोज तिला एकेकदा कार्ड दाखवायचं, शब्द मोठ्याने म्हणायचा आणि तिच्याकडूनही तो उच्चार करून घेऊन कार्ड ठेवून द्यायचं, असा क्रम ठेवला.

आता तिला गंमत वाटायला लागली. मग ती एरवीही मध्येच कधीतरी येऊन स्वत:च कार्ड उचलून बघायला आणि ओळखायचा प्रयत्न करायला लागली. ओळखता आलं नाही तर विचारायला लागली.

आता इथे एक गोष्ट महत्त्वाची. मूल रस घेतंय असं दिसलं की पालकांनी उत्साहाने हात धुवून मागे लागायचं नाही. कोणत्याही प्रकारची सक्ती होता कामा नये. मुलांना स्वत:हून रस घेऊ द्यायचा.

फक्त अगदी सुरुवातीला लाडीगोडी लावून, मुलांच्या कलाकलाने घेऊन, थोडं मागे लागून प्रयत्न करावे लागतात हे खरं आहे!

**३ री पायरी :** मी पुन्हा नवीन कार्डं घेतली. आता त्यावर मी तिच्या परिचयांचे शब्द लिहिले. यात वस्तू, पदार्थ, माणसांची नावं, अवयव वगैरे समाविष्ट केले. उदा. खाऊ, बाहुली, खेळणी, दूध, भात, चिमणी, आई, आजी, हात, पाय वगैरे.

आता तिला एक मजेशीर गोष्ट कळली की, आपण ज्या वस्तू बघतो, खातो, पितो त्या वस्तूंची नावं आपल्याला कार्डावर दिसतात. म्हणजे बाहुली ही वस्तू --- अशी दिसते आणि शब्द 'बाहुली' असा दिसतो. त्यामुळे ती-ती वस्तू आणि तो विशिष्ट शब्द यांचा तिने मनातल्या मनात काहीतरी नातेसंबंध निश्चित केला.

**४ थी पायरी :** आता मी आणखी काही कार्डं घेऊन त्यावर बाराखड्या लिहिल्या. त्यांचा उच्चार करण्यात मालविकाला फारच गंमत वाटली. मग ती येता जाता 'ट टा टि टी टु टू टे टै टो टौ टं ट:' असं काहीतरी बडबडायला लागली.

**५ वी पायरी :** तिच्यासमोर मी वर्तमानपत्र पसरून ठेवलं आणि हातात पेन दिलं आणि एक कोणतंही अक्षर देऊन वर्तमानपत्रात शोधून त्यावर काट मारायला सांगितली. अशी वेगवेगळी रंगीत पेनं देऊन वेगवेगळी अक्षरं ओळखून त्यावर काट मारता मारता ती अक्षरं तिच्या पक्की लक्षात तर बसलीच; शिवाय तिच्या हेही लक्षात आलं की एकच अक्षर बाबा, बटाटा. साबण, बोट, बेडूक, साबुदाणा अशा कितीतरी शब्दांत दिसतंय आणि ते अक्षर जर नुसतं 'ब' असं न लिहिता त्याला काना, मात्रा वगैरे जोडलं असेल तर त्याचा उच्चार बाराखडीतल्या अक्षरांसारखा 'बा बो बि बा' वगैरे सारखा करायचा.

त्यामुळे हळूहळू तिच्या हेही लक्षात आलं की 'बे' या अक्षराचा किंवा आकृतीचा उच्चार बेदाण्यातल्या बे सारखा करायचा, बाळमधल्या बा सारखा नाही.

**६ वी पायरी :** आता या टप्प्यावर तिला या अक्षरांबद्दलची सगळी कल्पना स्पष्ट होत आली होती. मग मी रोजच्या आयुष्यातले छोटे प्रसंग लहान लहान वाक्यात लिहून एकेक परिच्छेद तिला वाचायला द्यायला लागले. अक्षरांचा टाईप मोठा ठेवला.

**७ वी पायरी :** आता आमचं असं ठरलं की छोटी पुस्तकं - मोठ्या टाईपमधील - तिने स्वत: वाचायची आणि छोट्या टाईपमधील मोठी पुस्तकं मी तिला वाचून दाखवायची.

मग आम्ही शेजारीशेजारी बसून वाचायला लागलो. मी वाचत असताना तिला मधून मधून जाणून घ्यायचं असायचं की मी कुठपर्यंत आलीय, आत्ता वाचतेय ते वाक्य कुठे लिहिलेय, किती पानं वाचून झाली आहे वगैरे. हा तपशील तिच्या दृष्टीने महत्त्वाचा होता. मग मी ओळींवरून बोट फिरवत सावकाश वाचायला लागले. मग मध्येच पेजनंबर बघून दहा पानं वचून झाली असं दिसलं की ती डोळे मोठ्ठे करून आश्चर्याने 'आई ग, दहा पानं वाचली?' असं म्हणायची. तिच्या दृष्टीने तो पराक्रमच होता.

अशाप्रकारे सातत्याने न कंटाळता मी काही वर्ष प्रयत्न केल्यावर मालविकाचे वाचन, स्वतंत्र वाचन हळूहळू वाढत वाढत आत्तापर्यंत तिने पुष्कळ पुस्तकं वाचली आहेत. ती आता ९ वर्षांची



आहे. पण तिने हॅरी पॉटरसारखी लठ्ठ पुस्तकं वाचली आहेत. यात मराठी अनुवादही वाचला आहे आणि इंग्रजी पुस्तकही.

आता तिच्यात वाचनाची इतकी आवड निर्माण झाली आहे की तिने वाचावं यासाठी मला काहीही प्रयत्न करावे लागत नाहीत. फक्त तिला नवनवीन पुस्तकं आणून द्यायची. बस्स!

पण तोपर्यंतचा सगळा काळ मला जाणीवपूर्वक कष्ट घेत रहावं लागलं.तिला हुरूप यावा म्हणून थोडं आमिषही दाखवावं लागलं. कधी 'सरप्राइज गिफ्ट' द्याव्या लागल्या. उदा. मी तिने एखादं पुस्तक वाचून पूर्ण केलं की रात्री हळूच तिच्या उशीखाली काहीतरी वस्तू ठेवून द्यायचे. रंगपेटी, कलरिंग बुक, खेळणं वगैरे. तिला मी सांगितलं होतं की, या वस्तू खुश होऊन देवबाप्पा देतो तुला. मग ती पण पुस्तक वाचून झालं की दुसऱ्या दिवशी उठल्या उठल्या उशीखाली पाहायची. थोडी मोठी झाल्यावर एक दिवस म्हणाली, "आई मला माहिताय, या वस्तू तूच उशीखाली ठेवतेस, देव नाही." 'कसं कळलं' विचारल्यावर म्हणाली, 'आपोआपच.'

आमचं असंही ठरलं होतं की ती जे काही वाचेल ते तिने तिच्या शब्दांत मला सांगायचं. यामुळे ती स्वत:चं म्हणणं शब्दांमध्ये व्यवस्थित मांडायला शिकली. तिच्या कल्पनाशक्तीचा विकास झाला. तिने एके दिवशी स्वत:च एक गोष्ट रचून मला सांगितली. एक कविता करून दाखवली.

३-४ वर्षांपूर्वी नवीन घरात राहायला गेल्यावर आम्ही छानसे दिवे खरेदी करण्याकरता एकदा दिव्यांच्या दुकानात गेलो होतो. तेव्हा तिथे गेल्यावर मालविका म्हणाली, 'आई, इथे अल्लाउद्दीनचा जादूचा दिवा मिळतो का गं?' मला हसू आलं. पण मी तिला 'मिळाला तर काय करशील?' असा प्रश्न विचारल्यावर तिने तिच्या समजुतीनुसार बऱ्याच कल्पना सांगितल्या. अक्षरओळख लहानपणीच झाल्यामुळे ती लिहायलाही लवकर आणि सहज शिकली. वाचनामुळे सामान्यज्ञान वाढलं. नकळत मूल्यशिक्षण होत गेलं. चांगलं वागणं, आपल्या वस्तू जपणं, इतरांना मदत करणं, प्रेमानं वागणं हे सगळं ती शिकत गेली. छोट्या छोट्या गोष्टीतून आनंद मिळवणं, काहीतरी सृजनशील काम करणं यातून फुलणारं तिचं भावविश्व बघताना मीही खूप आनंदित झाले.

**मुलांचं वाचन कमी झालं :**

आता कुणी म्हणेल हा एवढा खटाटोप कशासाठी? मुलं शाळेत गेल्यावर वाचायला शिकतातच ना? तर मग यावर माझा प्रश्न असा आहे, की शाळेत जाऊन लिहा-वाचायला सगळीच मुलं शिकतात. पण केवळ शाळेत जायला लागल्यामुळे किती मुलांना वाचनाचा छंद जडला? उलटपक्षी, बहुसंख्य पालकांची आणि शिक्षकांची अशी तक्रार आहे की मुलं वाचत नाहीत.

**दृक्‌श्राव्य माध्यमाचा प्रभाव :**

दृक्‌श्राव्य माध्यमाचा शोध लागण्यापूर्वीच्या काळात मुलांपुढे फारशी प्रलोभनं नव्हती. पुस्तक वाचन हाच करमणूकीचा पर्याय होता. त्यामुळे त्या काळात वाचनाची गोडी मुलांना लागावी म्हणून पालकांना फारसे प्रयत्न करावे लागत नव्हते. सध्याची मुलं दृक्‌श्राव्य माध्यमाच्या युगातली आहेत. टी. व्ही., संगणक, व्हिडिओ गेम्स यांचा मुलांवर जबरदस्त पगडा आहे. पण त्याबद्दल मुलांना दोषी धरता येणार नाही. कारण या गोष्टी भुरळ पाडणाऱ्या आहेतच. 'टॉम अँड जेरी' आवडत नाही असं म्हणणारा मोठा माणूस तरी आढळेल का? तिथे मुलांची काय कथा?

त्यामुळे मुलं वाचत नसतील तर दोष पालकांचा आहे. अगदी लहान वयापासून रोज थोडेसे कष्ट घेतले तर मुलांना वाचायची गोडी लागेल. पालकांनी स्वत:च टी. व्ही. बेताचा पाहिला तर मुलांना सतत टी. व्ही. बघत लोळायचा आगळा छंद जडणार नाही.

पालकांनी स्वत: रोज काहीतरी वाचावं; मुलं अनुकरणातून शिकतील. आमचं मूल इंग्रजी शाळेत जातं म्हणून त्याला मराठी येत नाही ही सबब सांगू तर नका; आणि मुलांसमोर या गोष्टीचा कौतुकाने उल्लेख करणं टाळा.

दर रविवारी मुलांना जवळपास घेऊन जाणं, निसर्गाचं बारकाईनं निरीक्षण करायला शिकवणं, प्राणी, पक्षी, पानं, फुलं यातली वैविध्यपूर्ण माहिती सांगणं, त्यांच्यबरोबर बसून छोट छोटे कलाकुसरीचे प्रोजेक्ट करणं यासाठी पालकांनी वेळ काढायला हवा. त्याकरता फार वेळ लागत नाही. मनात इच्छा असेल तर गृहिणी, आजी-आजोबा, नोकरी-व्यवसाय करणारे आई-वडील या सर्वांना वेळ काढता येणं निश्चितपणे शक्य आहे.

आजचा काळ असा आहे की गांधीजींसारखा कुणी महात्मा येऊन जनजागरण करेल म्हणून वाट बघ बसण्याला अर्थ नाही. स्त्रियांसह आज संपूर्ण समाज सुशिक्षित आहे, सुधारलेला, प्रगत आणि जबाबदार आहे. त्यामुळे आपल्या मुलांचं भावविश्व फुलवण्याचे प्रयोग घरच्या घरी कौटुंबिक पातळीवरच होण्याची गरज आहे. हे कष्ट घेतले नाहीत तर दृक्‌श्राव्य माध्यमाचे मुलांवर होणारे वाईट परिणाम अटळ आहेत.

**दृक्‌श्राव्य माध्यमाचे दुष्परिणाम :**

लहान मुलं मोठ्या माणसांबरोबर बसून मोठ्यांच्या चमत्कारिक दूरदर्शन मालिका बघत असतात. त्या बघून त्यांच्या मनात सूड, अनैतिकता, चंगळवाद वगैरे गोष्टींचे थैमान सुरू होतं. मुलं स्वार्थी, उर्मट, हट्टी होत चाललीत. आपण 'मज्जा' करण्यासाठीच जन्मलोय आणि हवं ते मिळवण्यासाठी काहीही केलं तरी चालतं हीच आजची नीतिमूल्ये होऊन बसली आहेत. कंटाळा आणि ताण-तणाव मुलांना ग्रासून टाकताहेत. टी. व्ही. पहात, लोळत, खात राहण्याने लठ्ठपणाची समस्य मुलांना लहान वयातच भेडसावयाला लागलीय. मुलांमध्ये चष्म्याचं प्रमाण वाढलंय. ही यादी खूप मोठी आहे हो. पण याला ही अजाण मुलं जबाबदार आहेत का? माझ्या मते आपण पालकच जबाबदार आहोत. आपण सर्वजण पैसा-

प्रसिद्धी-करियर-चैनीचे जीवन या सगळ्यांच्या मागे पळतोय. 'रॅट रेस' ज्याला म्हणतात ती जीवघेणी स्पर्धा चाललीय सगळीकडे. यात बळी जातोय तो मात्र पुढच्या पिढ्यांचा - लहान, अजाण मुलांचा. हे कुठंतरी थांबलं पाहिजे. पुन्हा एकदा वाचनाकडे वळलं पाहिजे.

**का वाचायचं?**

वाचनामुळे मुलांचं भावविश्व फुलतं, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे एकेक पैलू चमकायला लागतात, त्यांचा सर्वांगसुंदर विकास घडतो, भाषिक विकास होतो, स्वत:ला मुलं अभिव्यक्त करायला शिकतात, ज्ञान मिळतं, माहिती मिळते, कल्पनाशक्तीचा विकास होतो, आत्मविश्वास निर्माण होतो, प्रत्येक मुलात असलेला विशिष्ट गुण आपोआप तासला जाऊन तो मुलगा मोठा होऊन आवडीच्या क्षेत्रात चमकायला लागतो. आयुष्यातला निर्भेळ आनंद घ्यायला शिकतो.

**मुलं पुस्तकात काय शोधतात?**

बालमानस शास्त्रानुसार सर्व मुलांमध्ये काही विशिष्ट बालसुलभ प्रवृत्ती असतात. उदा. कुतूहल, सृजनशीलता, संग्रह करण्याची वृत्ती, स्वत:च्या वगळेपणाची जाणीव, लढाऊ वृत्ती, आज्ञापालन, अनुकरण, स्पर्धा, सहानुभूती, प्रेमाची भावना, कल्पना शक्ती आणि नाविन्याचे आकर्षण. या सर्व वृत्तींचा परिपोष करणारे घटक मुलं पुस्तकात शोधत असतात. त्यांना अशा वेळी स्वतंत्र पुस्तकांबरोबरच अनुवादही वाचायला दिले पाहिजेत.

**अनुवाद :**

मुलांना अद्‌भुत प्राणी, विचित्र प्रसंग, विलक्षण गोष्टी, घटना यात खूप रस असतो. आपल्या आसपासच्या जगाव्यतिरिक्तच्या देशांमध्ये काय चालतं, दुसऱ्या देशातली मुलं-माणस कशी राहतात, काय खातात-पितात, खेळ-सण-उत्सव कसे साजरे करतात, हे सर्व मुलांना जाणून घ्यायचं असतं. या बाबतीत अनुवादित पुस्तकं मुलांना बसल्या जागी सगळ्या विश्वाचं दर्शन घडवतात. जगभरातल्या विलक्षण गोष्टींचा कल्पनेत अनुभव देतात.

मुलांचं सामान्यज्ञान वाढवतात. नावीन्य आणतात. गंमत आणतात. जगातल्या सर्वच भाषा शिकणं एकाच व्यक्तीला शक्य नसल्यामुळे अनुवाद वाचण्याने आपल्याला फायदा तर होतोच; पण मुलांच्या भावविश्वाच्या कक्षा प्रचंड प्रमाणात रुंदावतात.

पण हे सगळं घडण्यासाठी मुळात वाचनाची गोडी मुलांमध्ये बालपणापासून लावणं अतिशय महत्त्वाचं आहे. १९०० साली यादव शंकर बावीकर या लेखकाने 'वाचन' नावाचे पुस्तक लिहिले होते. त्यात त्यांनी वाचनाचे फायदे दिलेत. त्याविषयी विद्वानांची मतं दिली आहेत.

**सिसेरो** - लेखन आणि वाचन यामुळेच माणूस प्रगत झाला.

**लॉर्ड बेकन** - मुळाक्षरं ही जहाजांसारखी आहेत. ही जहाजं कालरूपी समुद्राच्या दूरदूरच्या बंदरावरून ग्रंथाच्या रूपाने ज्ञानाच्या मालाची देवाण-घेवाण - ने-आण करतात.

**विनायक कोंडदेव ओक** - ग्रंथ कल्पतरू आहेत. ते संपत्ती, युद्धसामर्थ्य, ईश्वरप्राप्ती इत्यादी वाट्टेल ते देतात; बदल्यात मागतात फक्त 'लक्ष'. पाश्चात्यांच्या मते वाचनप्रियतेमुळेच ते इतकी प्रगती करू शकले आहेत. पण आपल्याकडे मात्र बहुसंख्य माणसे निरुद्योगीपणाचे छंद करत वेळ वाया घालवत असतात असे त्यांचे मत आहे.

तर थोडक्यात काय, मुलांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी त्यांना वाचतं करण्यासाठी सर्वांनी झटलं पाहिजे. लेखकांनी उत्तम लिहून, प्रकाशकांनी दर्जेदार पुस्तकं छापून आणि पालकांनी ती वाचायची आवड स्वत:च्या मुलात रुजवून प्रयत्न केले पाहिजेत.

**उदाहरण आणि समारोप :**

कोणतंही मत मांडणाऱ्या माणसाची एक जबाबदारी असते - ते सिद्ध करण्यासाठी एखादं वास्तवातलं उदाहरण द्यायची. तर ते उदाहरण मीच आहे.

मला लहानपणीच वाचायचा वेडा छंद जडला. त्या छंदाने मला पुष्कळ काही दिलंय. माझं संपूर्ण आयुष्य घडलंय त्यामुळे. मला जर पुस्तकांची, शब्दांची सोबत मिळाली नसती तर माझ्यात कल्पनाशक्ती आणि सृजनशीलतेचा विकास झाला नसता. मी लेखन करू शकले नसते. मला स्वत:च्या भावना शब्दात व्यक्त करून मन मोकळं करून ते पुन्हा नव्या कल्पनांनी भरून टाकता आलं नसतं तर मी माझ्या खडतर आयुष्याला कसं तोंड देऊ शकले असते?

तसे चढ-उतार सगळ्यांच्याच आयुष्यात येतात. पण हे प्रमाण साधारणपणे १०% असेल तर माझ्य बाबतीत ८०% होतं. पण तरीही मी आज काहीतरी सृजनशील, भरीव काम करतेय याचं

श्रेय मी वाचनालाच देऊ इच्छिते. कारण मला वाचनामुळे लिहिता आलं नसतं तर मी आयुष्यात काय केलं असतं, याची मी कल्पनासुद्धा करू शकत नाही.

म्हणूनच मुलांसाठी उत्तम लेखन करून वाचनाचा वारसा किंवा ठेव पुढच्या पिढीला देणं हेच मी जगण्याचं ध्येय ठरवलं आहे. कारण लहान मुलांच्या आस्तित्वाइतकं सुंदर जगात दुसरं काही वाटत नाही मला आणि वाचनामुळे माझं भयंकर नुकसान झालं असं म्हणणारा माणूस आजपर्यंत मी पाहिला किंवा ऐकलेला नाही.

या प्रयोगाचे नाव मी 'अक्षरमैत्री' असे ठेवले आहे. या प्रयोगातून साधारणपणे दोन महिन्यात मूल अक्षरं ओळखायला लागून सावकाश वाचायला शिकू शकते. मात्र तिथेच न थांबता सातत्याने प्रयत्न केला तरच मुलाला वाचायची गोडी लागेल. अन्यथा शिकलेली अक्षरे विसरून जायला वेळ लागत नाही.

१९ रेशमा रेसिडेन्सी,
लोकमान्य कॉलनी, कोथरुड,
पुणे ४११ ०३८.

# मुलांचे भावविश्व फुलविताना



'आजी, माझे पपा मला बाहुली आणणार आहेत.' पण ती मी कोणालाही देणार नाही. ही प्रतिक्रिया ४ वर्षाच्या मुलीची.

मॅडम, मी रोज रोज पुस्तक काढणार नाही. रोजच माझं पुस्तक का वापरायचं?

ए, समीर मी माझी कंपासपेटी तुला वापरायला देणार नाही.

हे आणि असेच अनेक संवाद सध्या विद्यार्थ्यांकडून ऐकायला मिळतात. याचा मनात विचार सुरू होतो.

खर म्हणजे 'मुलं ही देवाघरची फुलं.' निष्पाप, निरागस, प्रेमळ, मनमोकळी, भरपूर हसणारी! स्वत:च्याच कल्पना विश्वात रमणारी. जे जे शिकवावं ते ते शिकणारी. सभोवतालच्या माणसांचा, परिस्थितीचा त्यांच्यावर होणारा परिणाम आणि त्याला प्रतिसाद देणारी! मग त्यांच्या मनात स्वत:च्या वस्तूंबद्दल एवढ आकर्षण का असावं?

आपल्या वस्तू काही काळासाठी दुसऱ्यांना न देण्याची वृत्ती कोठून येत असेल?

सध्याच्या शतकात 'छोटे कुटुंब सुखी कुटुंब' याचा नारा आहे. पण त्यामुळे घरात आजी, आजोबा नाहीत. मुल ही लॅच की चिल्ड्रेन झाली आहेत. त्यांचे आई बाबा नोकरी करतात. त्यामुळे शाळेतून घरी आल्यावर टेबलावर ठेवलेले खाणे, टी. व्ही. पहाणे, संध्याकाळी थोडे खेळणे, रात्री अभ्यास करणे आणि झोपणे असा दिनक्रम! यामध्ये संवाद साधायला वेळच नाही. मुलांच्या मनात काय चालले आहे हे जाणून घेण्यास वेळ नाही. त्यामुळे ही सर्व जबाबदारी पूर्वी जे आजी आजोबा घेत असत ती आता शिक्षकांवर येऊन पडली आहे. मराठी शाळांत शिक्षिकांना 'बाई' म्हणून संबोधतात. 'बा' म्हणजे बाबा, 'ई' म्हणजे आई! शिक्षकांवर दोघांची जबाबदारी आहे.

मुलांच भावविश्व म्हणजे काय? भावनांचं विश्व. होय! कोणत्या भावना? साधं उदाहरण पहा. वर्गात फळ्यावरचं लिहून झालं की फळा मी पुसू लागले की मुली ओरडतात बाई थांबा! मी त्यांना म्हटलं,''अगं, बाई थांबता का? असं म्हणा. यातून तुमची विनयशीलता दिसते.''

'सवय' हा आपल्या वागणुकीचा आत्मा आहे. एकदा का विनयशीलता अंगी बाणली की पहा संवाद किती छान होतो. आज घरी गेल्यावर भावाला म्हणा की, 'दादा जरा मला तुझी पेन्सिल देतोस का?' तो ताबडतोब पेन्सिल देईल. तेव्हा मुलांच्या भावविश्वात आपल्याला स्वत:ला शिरण्याची गरज आहे.

मुलं अनुकरणप्रिय असतात. 'शाळेत वेळेवर आलं पाहिजे' हा नियम मुलांनी पाळावा असं वाटत असेल तर शिक्षक म्हणून मुलांपेक्षा आधी १० मिनिटे मी शाळेत उपस्थित राहिले पाहिजे. आदर, कृतज्ञता, उपकार, सत्य बोलणे अशा अनेक गोष्टी मुलं अनुकरणाने शिकतात. नको असलेल्या व्यक्तीचा फोन आल्यावर घरी मी नाही असे सांग, असे जर घडत असेल तर मुलं खरे बोलावे यावर विश्वास ठेवणार नाहीत.

एकदा असंच झालं! मी गतिरुद्ध मुलांच्या



शाळेत शिकविते. तेथील एक विद्यार्थी रोज उशीरा येत असे. रोज वेगवेगळी कारणे सांगायचा. एक दिवस मला शाळेत जायला उशीर झाला. त्यावर त्याने मलाही विचारले की मॅडम उशीरा का आलात? त्यावर मी त्याला सांगितले, की अरे मी काल रात्री सिनेमा पहात बसले, त्यामुळे सकाळी उठायला उशीर झाला. त्यावर तो एकदम म्हणाला, मॅडम माझे बाबा कामावरून रोज उशीरा येतात. ते घरी आल्याशिवाय मी झोपत नाही आणि मग मला उठायला उशीर होतो आणि मी शाळेत उशीरा येतो. मग मी त्याला म्हटलं की इतके दिवस तू वेगवेगळी कारणं का सांगत होतास? भीतीपोटी तो हे सांगत नव्हता. पण मी प्रामाणिकपणे माझं कारण सांगितल्यावर तो बोलता झाला. त्याची आई, बदलीमुळे दुसऱ्या गावी होती त्यामुळे नकळत त्याला बाबांची काळजी वाटायची. यासाठी मुलांच्या भावना जाणून घेणे फार महत्त्वाचे असते.

**झोपडपट्टीतील मुले**

शिक्षण म्हणून नोकरी केल्यावर अशा अनेक घटना समोर येतात. झोपडपट्टीतील विद्यार्थिनींना शिकविताना फारच वेगळा अनुभव आला. एक विद्यार्थिनी दोन दिवस वर्गात नव्हती. तिसऱ्या दिवशी तिला विचारल्यावर 'माझा बाप मेला' असे उत्तर आले. मी तिला म्हटलं,''अगं, असे म्हणू नये.''त्यावर, ''रोज दारू पिऊन कुठेतरी पडायचे, आम्ही घरी उचलून आणायचे. दुसऱ्या दिवशी आम्हीच कमावलेले पैसे यांना दारूला द्यायचे नाहीतर मार खायचा.'' हे ऐकल्यावर मी सुन्न झाले. परिस्थिती माणसाला कसं वागायचं हे शिकवत असते. त्यावर मी तिला म्हटलं, ''आता तू छान शीक, मोठी हो. कोणतीही मदत लागली तर सांग.'' तिने कष्टाने अभ्यास केला. १० वी पास झाली.

**गर्भावरचे संस्कार**

मुलांच्या जन्माच्या आधीपासून त्या गर्भावर केलेले संस्कार मुलांच्या भावना फुलविण्यास मदत करतात हे आता विज्ञानाने सिद्ध केले आहे. अभिमन्यूची गोष्ट शास्त्रज्ञ मानतात. म्हणून आपले पूर्वीचे डोहाळजेवणाचे समारंभ आवश्यक आहेत. गर्भवती स्त्री जेवढी आनंदी असेल तेवढे बाळाचे विश्व समृद्ध होते. म्हणूनच भावनांचे विश्व फुलविताना बाळाच्या जन्माआधीपासूनचा विचार केला पाहिजे.

२१व्या शतकात सण, समारंभ, उत्सव जरा जास्तच प्रमाणात साजरे केले जातात. त्याचबरोबर वाढदिवस साजरे करणे त्यासाठी पार्ट्या करणे गरजेचे बनले आहे. वाढदिवस म्हणजे भेटवस्तू आली. कोणी काय भेटवस्तू दिली यावर पुन्हा त्यांच्याकडे वाढदिवसाला जाताना आपण काय भेट द्यायची याचा विचार होतो. चॉकलेट, गाड्या, बंदुका, विविध विध्वंसक खेळणी याऐवजी सुकामेवा, वाचनीय पुस्तके, अभ्यासाशी निगडीत खेळणी यांचा उपयोग करावा. मुलांनाही अशी खेळणी आनंदाने स्वीकारण्यास सांगावे. यामुळे विध्वंसक प्रवृत्तीला आळा बसेल. दुसऱ्यांच्या दु:खात सहभागी होणं खूप सोपं आहे, पण दुसऱ्यांच्या आनंदात सहभागी होणं खूप कठीण!

**दोन मैत्रिणींची गोष्ट**

असंच एकदा आमच्या शाळेतील दोन खूप जवळच्या मैत्रिणी, खूप हुशार. एक एकदा पहिली तर दुसऱ्या वेळेस दुसरी पहिली. परंतु एस.एस.सी. बोर्डात एकजण गुणवत्ता यादीत आली आणि दुसरी अजिबात आली नाही. पहिली बोर्डात आलेल्या मैत्रिणीला एकदा भेटली आणि नंतर ती मार्कलिस्ट न्यायला शाळेतही आली नाही. तेव्हा आम्ही काही शिक्षिका तिच्या घरी गेलो आणि तिला खूप समजावले. बोर्ड म्हणजे सर्वस्व नाही इ. पण ती म्हणाली, आम्ही दोघी बरोबर अभ्यास करीत होतो पण मला न सांगता ती जास्त अभ्यास करीत होती म्हणून ती बोर्डात आली. हा तिचा विचार तिच्या मनातून काढण्यास आम्हाला खूप कष्ट घ्यावे लागले. दोन वर्षानंतर दुसरी १२वी बोर्डात आली. पहिली आली नाही. तेव्हा पहिली तिच्याकडे गेली आणि तिचे अभिनंदन केले. यावर तिला आपली वागणूक चुकल्याचा पश्चात्ताप झाला. आणि आता दोघी पुन्हा चांगल्या मैत्रिणी झाल्या आहेत.

**घातक स्पर्धा**

सध्या स्पर्धा ही अनेक गोष्टीत घातक ठरत आहे. खरं म्हणजे स्पर्धा माणसाला हवीच! परंतु विकृत स्पर्धा नको. शेजारी कलर टीव्ही, वॉशिंग मशीन, खूप चांगले कपडे मग मला का नको? मग माझी परिस्थिती नसताना कोणत्याही मार्गाने त्या मिळविण्याचा प्रयत्न केला जातो असे घडू नये याची सवय लहानपणापासून लागावी यासाठीच शाळांमध्ये गणवेश, डब्यात पोळी-भाजी आणण्याची सक्ती अशा गोष्टी केल्या जातात.

भावना ही न दिसणारी गोष्ट आहे. विज्ञानयुगात मन, आत्मा, भावना या गोष्टींना फारसं महत्त्व दिल जात नाही कारण ते दिसत नाही. त्यावर संस्कार करायचे म्हणजे कोणावर संस्कार करायचे? परंतु वर्तन-परिवर्तन घडवून आणण्याचं कौशल्य वडीलधाऱ्यांकडे असते आणि त्याचाच परिणाम म्हणून उत्तम संस्कारित पिढी तयार होण्याची गरज आहे.

कधी कधी न बोलताही वागणुकीवर मुलांच्या मनात काय चाललं आहे ते कळू शकतं. अशीच एक हुशार विद्यार्थिनी. परंतु काही वेळा ती पेपरात अशा चुका करायची की आम्हा शिक्षकांना आश्चर्य वाटायचं. मी एकदा तिला विचारल्यावर ती म्हणाली, बाई, मी हे लिहिल्याचं मला स्मरत नाही. तोंडी ती बरोबर सांगत होती. ती म्हणाली माझ्याकडून असं कोणीतरी लिहून घेतं. यावर मी विज्ञानशिक्षिका कसा विश्वास ठेवणार? पण हळू हळू तिच्याशी बोलल्यावर तिला भुतं दिसतात, त्यासाठी ती जप करते, देवळात जाते. अभ्यासाला वेळ मिळत नाही असे सांगू लागली. तेवढ्या

काळापुरते तिच्याच विचारांशी मी सहमत झाले आणि आमच्या ओळखीच्या समुपदेशकाकडे तिला घेऊन गेले. समुपदेशन आणि तिचा ज्यावर विश्वास होता तो जप दिला गेला. त्यांनी तिला सांगितले की तुझा ज्या दिवशी पेपर असेल त्या दिवशी तू अभ्यास कर; तुझ्यासाठी (भुतांसाठी तिच्या मनातल्या) मी जप करतो. यामुळे तिने उत्तम अभ्यास केला आणि यश मिळविले. म्हणजे कधी कधी त्यांच्या भावविश्वात आपल्याला जावे लागते आणि त्यांना मदत करावी लागते.

अशी अनेक उदाहरणे स्वत:च्या अनुभवातून देता येतील. परंतु आपल्याला विचार करायचा आहे, तो पुढे येणाऱ्या पिढ्यांचा!

सध्या आपण तरुण वर्गाला खूप नावे ठेवतो. त्यांच्यात शिस्त नाही. भावना नाहीत, स्वार्थी आहेत एक ना अनेक! पण त्यासाठी आपणच म्हणजे आई, बाबा आणि शिक्षक यांनी दुसरे कोणीतरी संस्कार करावे असे न म्हणता आपल्या उदाहरणाने थोडे त्यांच्या सारखे थोडे आपल्यासारखे करून, मध्यमार्गाने तरुण पिढीला मार्गावर आणले पाहिजे. सर्वच तरुण पिढी वाया गेलेली नाही...त्यांच्यापुढे योग्य आदर्श ठेवले पाहिजेत. ही तरुणाईची उर्जा वापरून समाज सुदृढ बनला पाहिजे.

सामर्थ्य आहे संस्कारांचे, जो जो करील तयांचे परंतु तेथे अधिष्ठान पाहिजे संस्कार करण्याचे.


९३ए/२ सेनापती बापट रोड,<br>
लोकमान्य सोसायटी,<br>
पुणे ४११ ०१६.<br>
फोन नं. २५६५५५५९



मुलांच्या सर्वांगिण विकासात
तुम्हाला प्रत्येक टप्प्यावर मदत करणारे जवळचे मित्र...
म्हणजेच ही पुस्तके




मुलांनी आत्मनिर्भर बनावे यासाठी पालकांनी काय करावे याचे शास्त्रशुद्ध विवेचन

**असे घडवा मुलांचे व्यक्तिमत्व**
**डॉ.रमा मराठे**
**किंमत : १२०रु.**




आदर्श पालकत्वाचा वस्तुपाठ

**मुलांच्या समृद्ध जीवनासाठी**
**डॉ.सुचित तांबोळी**
**किंमत : १२०रु.**




मुलांच्या उज्ज्वल यशासाठी त्यांच्यात आत्मसन्मान कसा निर्माण करावा याचे सुबोध मार्गदर्शन.

**आपल्या मुलांच्या यशस्वितेचा कानमंत्र**
**अनंत पै अनु. प्रशांत तळणीकर**
**किंमत : ८०रु.**



अभ्यासासकट इतरही अनेक गोष्टीत मुलांना हुषार करण्यासाठी

**पाल्य व्यक्तिमत्वाचा कानमंत्र**
**संजीव परळीकर**
**किंमत : ६०रु.**




मुलांशी कसे वागावे असा प्रश्न पडणाऱ्या पालकांची गीता

**तुम्ही अन् तुमची मुलं!**
**पार्किन्सन/रुस्तुमजी/पावरी**
**अनुः अविनाश भोमे**
**किंमत : ८०रु.**



मुलांची अभ्यासाबद्दलची जाणीव वाढवणारे,गृहपाठ व परिक्षेची तयारी याबद्दलचे हसत खेळत मार्गदर्शन

**सुजाण पालकत्व**
**मीना टाकळकर**
**किंमत : ६०रु.**

**पोस्टेज**
**प्रत्येकी २०रु**
**एकत्रित ३०रु.**



# खास दीपावलीनिमित्त

## दीप योजना

कमीत कमी १०००रु. ची आमच्या प्रकाशनाची कोणतीही पुस्तके घ्या व त्यावर ३५०रु.ची पुस्तके मोफत मिळवा.आमच्या सभासदांसाठी १०००रु.च्या पुस्तकांवर ५००रु.ची पुस्तके मोफत!

**मुदत**

१ ऑक्टोबर ते २८ फेब्रुवारी २००६ पर्यंत




**पोस्ट खर्च वेगळा पाठवावा. (अंदाजे १००रु.)**
**एकूण रकमेचा ड्राफ्ट किंवा मनिऑर्डर पाठवावी**

### दीप योजनेतील मोफत पुस्तकांची यादी

| | | |
|---|---|---|
| समिधा | रणजित देसाई | १०० |
| बारी | रणजित देसाई | १२० |
| प्रतिक्षा | रणजित देसाई | ८० |
| आलेख | रणजित देसाई | १२० |
| मेघ | रणजित देसाई | १०० |
| आषाढ | रणजित देसाई | ८० |
| वैशाख | रणजित देसाई | ९० |
| पंख जाहले वैरी | रणजित देसाई | ५० |
| पांगुळगाडा | रणजित देसाई | ६० |
| तुझी वाट वेगळी | रणजित देसाई | ६० |
| स्नेहधारा | रणजित देसाई | ९० |
| संचित (अध्यक्षीय भाषणे) | रणजित देसाई | ६० |
| नवी स्त्री | वि. स. खांडेकर | १०० |
| अबोली | वि. स. खांडेकर | ५० |
| दवबिंदू | वि. स. खांडेकर | ६० |
| ढगाआडचे चांदणे | वि. स. खांडेकर | ६० |
| समाधीवरली फुले | वि. स. खांडेकर | ६० |
| अश्रु आणि हास्य | वि. स. खांडेकर | ९० |
| प्रसाद | वि. स. खांडेकर | १५० |
| क्षितिजस्पर्श | वि. स. खांडेकर | ८० |
| सांजसावल्या | वि. स. खांडेकर | ८० |
| वन्हि तो चेतवावा! | वि. स. खांडेकर | ७० |
| सहा भाषणे | वि. स. खांडेकर | ७० |
| तारका | वि. स. खांडेकर | ४० |
| नटरंग | आनंद यादव | १४० |
| माळावरची मैना | आनंद यादव | ११० |
| भूमिकन्या | आनंद यादव | ९० |
| झाडवाटा | आनंद यादव | ९० |
| स्पर्शकमळे | आनंद यादव | १०० |
| का रे भुललासी | व. पु. काळे | १२० |
| तू भ्रमत आहासी वाया | व. पु. काळे | ७० |
| दुनिया तुला विसरेल | व. पु. काळे | ५० |
| प्रेममयी | व. पु. काळे | १०० |
| रंगपंचमी | व. पु. काळे | २०० |
| सांगे वडिलांची किर्ती | व. पु. काळे | ७० |
| माणसं | व. पु. काळे | १७० |
| एक एक पाऊल : ओशो | अनु. भारती पांडे | ८० |
| मी धार्मिकता शिकवतो, धर्म नाही : ओशो | अनु. मृणालिनी गडकरी | ९० |
| साक्षात्काराची देणगी : ओशो | अनु. प्रज्ञा ओक | १५० |
| वुइ दि नेशन (नानी पालखीवाला) | वि. स. वाळिंबे | २०० |
| वॉर्सा ते हिरोशिमा | वि. स. वाळिंबे | ३०० |
| लज्जा (कादंबरी) | अनु. लीना सोहोनी | १२५ |













| | | |
|---|---|---|
| निर्बाचित कबिता (कविता) | अनु. मृणालिनी गडकरी | ७० |
| आंधळी : कॅथरीन पियर्स | शान्ता शेळके | १०० |
| गोंदण | शान्ता शेळके | ५० |
| कविता स्मरणातल्या | शान्ता शेळके | १०० |
| सांगावेसे वाटले म्हणून... | शान्ता शेळके | ९० |
| सुवर्णमुद्रा | शान्ता शेळके | ८० |
| मजल दरमजल | अनु. भारती पांडे | ८० |
| व्हॉट वेंट रॉंग? | अनु. लीना सोहोनी | २०० |
| रंग सुखाचे | डॉ. रमा मराठे | ८० |
| निसर्गपुत्र (अनुवादित) | निरंजन घाटे | ८० |
| पर्यावरण प्रदुषण | निरंजन घाटे | १३० |
| वसुंधरा | निरंजन घाटे | २५० |
| विज्ञानाचे शतक | निरंजन घाटे | २०० |
| युगंधर (विज्ञान) | निरंजन घाटे | १०० |
| नवे शतक | निरंजन घाटे | १५० |
| पोलिसकथा | व. कृ. जोशी | १५० |
| भीषण हत्याकांड | व. कृ. जोशी | ९० |
| खेकडा | रत्नाकर मतकरी | ८० |
| तनमन | रत्नाकर मतकरी | ४० |
| मुलांसाठी गमती-जमतीचा स्वयंपाक : रोहिणी सिंग | अनु. आशा परुळेकर | ६० |
| मायक्रोवेव्ह ओव्हन | राजश्री नवरे | ७० |
| परिशोध : एस. एल. भैरप्पा | उमा कुलकर्णी | १०० |
| अंतराळ : शांतिनाथ देसाई | उमा कुलकर्णी | १०० |
| अवस्था : यु. आर. अनंतमूर्ती | उमा कुलकर्णी | ११० |
| सीमारेषा | माधवी देसाई | २०० |
| हरवलेल्या वाटा | माधवी देसाई | ८० |
| धुमारे | माधवी देसाई | ७० |
| सागर | माधवी देसाई | ६० |
| वडवाई | अंजनी नरवणे | २०० |
| तत्वमसि | अंजनी नरवणे | १४० |
| टेक् २५ : भावना सोमय्या | अंजनी नरवणे | ४०० |
| गहाण पडलेली टेकडी : मारिया श्रेस | अंजनी नरवणे | १२० |
| कॉंगो : मायकेल क्रायटन | अनु. अरुण मांडे | १६० |

| | | |
|---|---|---|
| ज्युरॅसिक पार्क : मायकेल क्रायटन | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | २५० |
| द लास्ट डॉन : मारिओ पुझो | अनु. अनिल काळे | ३५० |
| क्रोमोझोम-६ : रॉबिन कुक | अनु. वैशाली जोशी | ३५० |
| दि फिस्ट ऑफ गॉड : फ्रेडरिक फोरसिथ | अनु. अनिल काळे | ३०० |
| डॉ. झिवागो : बोरिस पास्तरनाक | अनु. आशा कर्दळे | २५० |
| ३००१ द फायनल ओडिसी : आर्थ सी. क्लार्क | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | १६० |
| काळोखाची लेक : कॅथरीन दी जीजस | अनु. सरिता पदकी | १५० |
| देवदास : शरच्चंद्र चट्टोपाध्याय (बंगाली) | अनु. मृणालिनी गडकरी | ९० |
| संस्कार : यू. आर. अनंतमूर्ती | अनु. लोकापूर/ कानिटकर | ८० |
| टोकियोच्या नभांगणातील चमकत्या तारका : फिलिस् बर्नबॉम | अनु. सुधा नरवणे | १८० |
| द्वंद्व : विजयदान देथा (राजस्थानी कथा) | अनु. वनिता सावंत | १५० |
| रावीपार : गुलजार | अनु. पाडळकर/वेल्हाळ | १५० |
| फुलांचे बोल : आन्ना साक्से (रशियन कथा) | अनु. सुनीती देशपांडे | १०० |
| द स्ट्रीम विदिन (बंगाली कथा) | अनु. मीना वैशंपायन | १३० |
| रेशीमगाठी | कांचन घाणेकर | १०० |
| भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रिया : नवाझ मोदी | अनु. वासंती फडके | ३०० |
| योद्धा शास्त्रज्ञ : राष्ट्रपती ए.पी.जे.अब्दुल कलाम | माधव मोर्डेकर | ४० |
| सेक्स, स्कॉच, अँड स्कॉलरशिप : खुशवंतसिंग | अनु. अनिल किणीकर | १२५ |
| मोरावळा | शिवाजी सावंत | ६० |
| मदर टेरेसा : ॲन सेबा | अनु. अनंत बेदरकर | २५० |
| टाईमपास : प्रोतिमा बेदी | अनु. सुप्रिया वकील | १८० |







| | | |
|---|---|---|
| देव जो भूवरी चालिला : साईबाबा | | |
| रंगास्वामी पार्थसारथी | अनु. लीना सोहोनी | १२० |
| द जॉय ऑफ कॅन्सर : | | |
| अनुप कुमार | अनु. माधुरी शानभाग | १५० |
| मनावर विजय : | | |
| एकनाथ ईश्वरन् | अनु. वैशाली जोशी | १२५ |
| मुलांवरचे संस्कार | | |
| (राज्य पुरस्कार) | शं. व्यं. काश्यपे | ९० |
| संस्कार कथा | शं. व्यं. काश्यपे | ६० |
| प्रियाराधन आणि विवाह | | |
| : डॉ. विजय नागस्वामी | अनु. भारती पांडे | १५० |
| सुखद मातृत्व | डॉ. रत्नावली दातार | ७० |
| डॉक्टरांकडे जाण्यापूर्वी | डॉ. विकास/ | |
| | विनिता गोगटे | २५० |
| हसता हसता आरोग्य | अनु. दिगंबर गाडगीळ | ९० |
| एकच पेला शिवाम्बूचा | डॉ. शशि पाटील | ९० |
| आपले सौंदर्य आणि | | |
| त्याची निगा | अनु. मीना टाकळकर | १०० |
| प्रवास-पर्यटनाचे नवे पैलू | यशोधरा भोसले | १५० |
| शिवणकला एक छंद : सलवार कमिज, | | |
| स्कर्ट ब्लाऊज, इव्हिनिंग गाऊन्स, मिडी | हेमा कळके | ८० |
| विज्ञान गमती | डॉ. अरुण मांडे | ५० |
| विज्ञान जमती | डॉ. अरुण मांडे | ६० |
| विश्वातील सजीवसृष्टी | अनु. डॉ. बाळ फोंडके | ६० |
| संप्रेरकांची सुसंगती : | | |
| पी. डी. गुप्ता | अनु. मीना किणीकर | ५० |
| शास्त्र-गंमत जत्रेत चौकस चिंगी : | | |
| कुलकर्णी/भागवत/गंभीर | अनु. मीना किणीकर | ७० |
| हिरवे जनुक : | | |
| शाकुंतला भट्टाचार्य | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | ६० |
| संभव असंभव | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | ८० |
| बिजलीदेवीची कहाणी | गोविंद लक्ष्मण परांजपे | ८० |
| नामशेष झालेले प्राणी | डॉ. किशोर पवार | ५० |
| शरीरातील विविध संस्था - | | |
| फुफ्फुसे, हृदय, मेंदू | वैशाली जोशी | २५ |

| | | |
|---|---|---|
| अंतःस्त्राव, गर्भाशय, जठर | वैशाली जोशी | २५ |
| स्नायू, अस्थि | वैशाली जोशी | २५ |
| व्हर्च्युअल रिॲलिटी (कथा) | डॉ. बाळ फोंडके | १५० |
| पृथ्वीवर माणूस उपराच! (संशोधन) | सुरेशचंद्र नाडकर्णी | ७० |
| अज्ञाताचे विज्ञान (संशोधन) | सुरेशचंद्र नाडकर्णी | १३० |
| सुंदर आपली फुलबाग | आ. बा. पाटील | १०० |
| सुंदर आपला रोपमळा | आ. बा. पाटील | १२० |
| एकवचनी | संजय राऊत | ३५० |
| ख्यातनाम इतिहासकार : | | |
| अरूण शौरी | अनु. सुधा नरवणे | १५० |
| बिग इगोज, स्मॉल मेन | | |
| : राम जेठमलानी | अनु. माधव मोर्डेकर | ८० |
| द अदर साईड ऑफ | | |
| सायलेन्स : उर्वशी बुटालिया | अनु. नारायण आवटी | २५० |
| महात्मा (जोतीराव फुले) | डॉ. रवींद्र ठाकूर | ३०० |
| फॅक्टरी गेट | रंगा मराठे | १५० |
| तीन दगडाची चूल | विमल मोरे | १५० |
| शापित राजहंस | अनंत तिबीले | २५० |
| मृद्गंध | इंदिरा संत | १६० |
| कांचनकण | शिवाजी सावंत | ७० |
| आठवणींचा मोहर | राजाभाऊ गवांदे | १६० |
| बंजाऱ्याचे घर | यशोधरा भोसले | १५० |
| धागे : गुलजार | संपादन : अनंत दीक्षित | ६० |
| ओसरलेले वादळ | कुमार केतकर | १२० |
| गज़ल | डॉ. सुरेशचंद्र नाडकर्णी | १८० |
| रिवणावायली मुंगी | राजन गवस | १३० |
| कावळे आणि माणसं | उत्तम कांबळे | १०० |
| उत्तरार्ध | विजया राजाध्यक्ष | १३० |
| खसखशीचा मळा | द. ता. भोसले | ७५ |
| गुंता सोडविताना | अनुराधा गुरव | ११० |
| पाणी कुठंवर आलं गं बाई... | दया पवार | २५ |
| नको स्वातंत्र्य स्त्रीला | दिलीप परदेशी | ५० |
| मराठी कादंबरीचा इतिहास | चंद्रकांत बांदिवडेकर | १७० |
| मराठी रोमँटीक काव्यप्रतिभा | रमेश तेंडुलकर | १३० |



# आमचाही एक साहित्यिक अड्डा

**प्रथम क्रमांक**

## रसिकमैत्र

**सुचेता नाडकर्णी**

मला वाचनाची आवड आहे, परंतु म्हणावे तसे मराठी वाचन झाले नव्हते म्हणून निवृत्तीनंतर पुण्याला येण्याचा अट्टाहास केला. समान आवडी असणारे मैत्र मिळावेत, साहित्यिक चर्चा करणारी मित्रमंडळी असावीत असा विचार मनात घोळत होता. रसिकमैत्रने ती इच्छा पुरी केली.

आमच्या साहित्यिक अड्ड्याचे नाव आहे 'रसिकमैत्र'. याची स्थापना ६ ऑगस्ट १९९५ साली श्री माधव गडकरी यांच्या हस्ते कोथरूडच्या अंबर हॉल मध्ये संपन्न झाली.

'शब्दश्री' नावाचा एक बारा जणींचा अड्डा आहे. त्यात मंदाकिनी भारद्वाज, धनश्रीताई हळबे यांच्या सारख्या लेखिका व नलुताई जोशी अश्विनी पंडित अशा दर्जेदार वाचन करणाऱ्या इ. मैत्रिणी आहेत. या गटाने असा विचार केला की इतर सर्वसामान्य वाचक भगिनींसाठीही एक वेगळा मोठा गट असावा, जिथे त्यांना चांगले वाचन करावे, स्वत: वाचलेल्या पुस्तकाचे परीक्षण करून वाचून दाखवावे, आपल्या लिखाणाचे वाचन करायला एक व्यासपीठ असावे. उत्तम लेखक, कवी यांच्याशी गाठभेट व्हावी, चर्चा कराव्या, मुलाखती घ्याव्या अशा उदात्त हेतूने या मैत्रिणींनी पदरचे पैसे घालून एका नव्या गटाची उभारणी केली आणि अत्यंत रसिकपणे नाव दिले 'रसिकमैत्र'. या वर्षी आमच्या रसिकमैत्रला ९ वर्षे पूर्ण झाली. आता हे दहावे वर्ष आम्ही उत्साहाने साजरे करणार आहोत.

सुरुवातीला आम्ही एखाद्या मैत्रिणीच्या घरी जमत असू, परंतु पुढे सभासद संख्या वाढल्यावर मोठ्या जागेची गरज भासू लागली. आमच्या ज्येष्ठ भगिनी लेखिका आशाताई रोटकर यांनी आपले घरच आमच्या हवाली केले. त्या नसल्यातरी माहेरवाशीणीच्या हक्काने आम्ही आमचे कार्यक्रम तिथे करत असू. पुढे चार वर्षे झाल्यावर आशाताईंनी जागा बदलल्यावर मयूर कॉलनीतील 'ईशदान' सोसायटीच्या अध्यक्षांना आम्ही विनंती केली. चार वर्षे अत्यंत नियमितपणाने होणारे कार्यक्रम त्यांना सांगितल्यावर त्यांनी आनंदाने थोडे मानधन स्वीकारून आम्हाला हॉल दिला. आता आम्ही तेथे दर महिन्याच्या तिसऱ्या बुधवारी दुपारी ४ ते ५.३० या वेळेत भेटतो. ३०-४० जणी तरी असतो.

वर्षातून दोन तीन कार्यक्रम हे सर्वांसाठी खुले असतात. त्यावेळेस एखाद्या साहित्यिकाला आमंत्रित करतो. आत्तापर्यंत आम्ही फादर दिब्रेटो, द. मा. मिरासदार, रवींद्र पिंगे यांना बोलविले. आणि आनंद लुटला. 'गप्पा शांताबाईंशी' या कार्यक्रमात आमच्या तीन मैत्रिणींनी शांताबाई शेळके यांच्याशी संवाद साधला. शांताबाईंची तब्येत थोडी नरम होती पण त्या इतक्या रमल्या, कार्यक्रम इतका बहारदार झाला की त्यांनी अनेक कविता आपणहून म्हणून दाखवल्या. अनिल अवचटांना सुधीर गाडगीळांनी बोलते करून सर्वांना खूष केले. शैला मुकुंद आणि प्रज्ञा ओक यांचे 'अत्रे नावाचे वादळ' जबरदस्त वठले. कल्पना देसाई-गोसावी यांनी 'अजून सायरन वाजतोच आहे' हा हिरोशिमावरील कार्यक्रम सादर करून आम्हाला थक्क केले! डॉ. निर्मला जोशी यांनी मनुस्मृतीवर दोन व्याख्याने देऊन मनुविषयीचे अनेक गैरसमज दूर केले.

केवळ साहित्यिक कार्यक्रमच असतात असे नव्हे तर काळाची पावले ओळखून श्री. चंद्रशेखर टिळक यांचा आर्थिक व्यवहार, बँकिंग वरील कार्यक्रम आयोजित केला. शुभदा कर्णिक यांनी 'अलास्का' प्रवासाचे वर्णन केले तर सुहास काणे यांनी दक्षिणध्रुवावरील मोहमेच्या स्लाईड्स दाखवून आपले लष्कर, तंत्रज्ञ, इंजिनियर्स, शास्त्रज्ञ यांचा आपल्याला अभिमान वाटायला लावला. नलिनीताईंचे मोगरा फुलला, डॉ. अंशुमती दुनाखे व मी मिळून भूमिकन्या बहिणाई असा कार्यक्रम केला. भारती शहाणे जैन यांनी तीर्थयात्रेचे मनोरंजक वर्णन केले.

सुरुवातीच्या काळात कविता कशी वाचावी याची जाण करून देण्याकरता व. दि. कुलकर्णी आले होते. जेव्हा अनुवादित पुस्तके वाचली गाजू लागली. तेव्हा श्री विरूपाक्ष व सौ. उमाताई कुलकर्णी यांना बोलाविले. कविता सुचते कशी, ती कशी म्हणावी हे दाखविण्याकरिता संजीवनी बोकील व सुधीर मोघे आले. आम्हा ५०-६० जणींसाठी त्या दोघांनीही अत्यंत प्रेमाने आपल्या कविता म्हणून दाखविल्या. आमच्या अनेक मैत्रिणी सुरेख कविता करतात. मग एक असा काव्यगायनाचा कार्यक्रम होतो आणि अचानक आपल्या लक्षात येते की आपणही कविता लिहू शकतो. कधी स्वलिखिते, कथा, वर्णने, परीक्षणे यांचे वाचन होते. कधी आम्ही दोन गट पाडतो आणि चक्क चढाओढ लावतो. कवितेची दुसरी ओळ सांगितली जाते. आपण पूर्ण कडवे, कवितेचे नाव, कवीचे नाव सांगायचे. मैत्रिणींचे पाठांतर व सामूहिक कविता म्हणण्याचा जल्लोश शाळकरी पोरींनाही मागे टाकतो. मने प्रफुल्लीत होतात. कोजागिरीला चंद्राची तर कधी प्रेमाची गाणी म्हणतो.

वाचलेल्या पुस्तकांवर, लेखकांच्या बायकांनी लिहिलेली आत्मचरित्रे चर्चेला घेतो. मते वेगळी असतात पण वादावादी नसते. आजपर्यंत आमच्यात कधी वाद, भांडणाचा प्रसंग आला नाही आणि कधी येऊही नये.

आमचा वर्धापनदिन आम्ही आनंदाने साजरा करतो. सुरुवातीला आमच्या मैत्रिणीच कार्यक्रम करीत. अध्यक्ष वगैरे नसायचे. आता अध्यक्ष बोलवितो. डॉ. माधवी वैद्य, डॉ. आनंद यादव, सुमित्रा भावे, आशा साठे यांना बोलविले. या वर्षी स्मिता तळवलकर येणार आहेत.

अध्यक्षांच्या भाषणानंतर अहवालवाचन, भोजन असे पहिले सत्र असते. दुपारी साहित्यिक खेळ खेळतो. तंबोला असो की मेमरी गेम. गाण्याची एक ओळ दिली की नाटकाचे, नाटककाराचे नाव ओळखावे. मेमरी गेममध्ये मांडलेल्या वस्तू मनात ठेवून त्यावरून आठवणारी पुस्तकांची, नाटकांची नावे, लेखक ओळखून दाखवावे, एका शब्दाला अनेक पर्यायी शब्द सुचवावे असे अनेक खेळ आमच्या नलुताई जोशी जमवून आणतात. त्या खेळानंतर एखाद्या विषयाच्या दोन्ही बाजूंनी परिसंवाद ठेवतो मैत्रिणी हिरीरीने भाग घेतात.

तोच प्रकार आमच्या सहलीच्या बाबतीत असतो. आम्ही सहलीसाठी फार लांब जात नाही. जवळपास जातो जेणेकरून जास्तवेळ साहित्यिक फिरक्या घेता येतात. एकदा आम्ही साऱ्यांनी गोलाकार बसून सुधीर मोघ्यांचे 'शब्द धून'चे वाचन केले. प्रत्येकीला वाचायला मिळाले. सगळ्या खुश!

हल्लीच सुधीर मोघ्यांची भेट झाली तेव्हां त्यांना हे सांगितल्यावर ते फारच खूष झाले. ते म्हणाले, ''आपण परत एकदा असे बसू. तुम्ही वाचन करा. मी कसं सुचत गेल ते सांगीन आपण गप्पा मारू.'' याला म्हणतात दाद!

आम्ही विमल लिमयांना कविता वाचनासाठी बोलाविले तेव्हां गप्पात त्या आणि त्यांच्या मैत्रिणी येरवडा तुरुंगातील स्त्रीकैद्यांसाठी जे काम करतात त्याची माहिती मिळाली. त्यांच्या इतर तीन कवी मैत्रिणींचा मायलेकी हा कार्यक्रम दाद घेऊन गेला. संजीव दामले यांनी आपला 'घर घर'या एकपात्री प्रयोगाचा शुभारंभ खास आमच्यासाठी अत्यल्प मानधन घेऊन केला हे अभिमानाने सांगावे असे वाटते.

जानेवारी महिन्यात आम्ही दिवाळी अंकाची परीक्षणे करतो. आपल्या मनातील विचार मैत्रिणींशी जुळतात ही सुखद भावना जाणवते.

आमचे रसिकमैत्र सर्वांचे आहे. अध्यक्ष, चिटणीस असे कुणी नाही पाच मैत्रिणी जबाबदारी घेतात. इतर सर्व मदत करतात.

रसिकमैत्रने मला भरपूर मानसिक समाधान, विचारवंत मैत्रिणी दिल्या. महिन्याला एकदाच दीड तासापुरत्याच भेटत असल्याने इतर गप्पा, गॉसिपला वेळच नसतो. एकमेकींचे विचार जुळतात, गप्पा होतात पण माझ्यासारखीला प्रत्येकीचे नाव माहीत असेलच असे नाही.

रसिकमैत्रसारखेच साधना कलामंचच्या साहित्यिक कक्षाचे पुस्तक भिशी गट आहेत. १२ जणांचा गट असतो. वैशिष्ट्ये म्हणजे आपण भिशीच्या पैशानी घेतलेली पुस्तके २ वर्षाकरता कक्षाच्या लायब्ररीसाठी द्यायची व नंतर ती आपल्याला परत मिळतात. अशा प्रकारे उत्तम पुस्तकांचा संच आपल्याला वाचायला मिळतो. मी त्याची एक सभासद आहे.

भारतीय स्त्री शक्ती जागरण मंचाचे वाचक मंच आहेत. मी तेजस् वाचक मंचाची सभासद आहे. या गटाचे वैशिष्ट्य म्हणजे एका पुस्तकाचे परीक्षण लिहून आणावे व त्याचे वाचन, त्यावर चर्चा करतात. वेगवेगळी मते कळतात. आमच्या गटाची अशी परीक्षणे मी संगणकावर उतरवते. त्यामुळे वर्ष अखेर एक सुरेख पुस्तिका तयार होते.

एकूण अशा अड्ड्यांनीच आपली वाचन संस्कृती जपली आहे. आणि माझाही खारीचा वाटा आहे हे लक्षात आले की पुण्याला आल्याचे भरून पावते.

बी/१० इंद्रधनु हौसिंग सोसायटी
तेजस नगर, कोथरुड,
पुणे ४११ ०३८.
फोन नं. २५३८१७२६.



# आमचाही एक साहित्यिक अड्डा

**द्वितीय क्रमांक**

**संवादिनी**

**रेवती पैठणकर**

डहाणूकर कॉलनी. सुशिक्षित, मध्यमवर्गीय, वाचनप्रेमी मराठी माणसांची वसाहत. अनेक सांस्कृतिक, समाजोपयोगी उपक्रम इथे नेहमीच चालू असतात.

सुमारे दहा वर्षांपूर्वी श्री. दांडेकर यांनी अशा या सुसंस्कृत वसाहतीमध्ये वाचन चळवळ उभी करण्याचे स्वप्न पाहिले. त्यांनी व त्यांच्या समविचारी सहकाऱ्यांनी मिळून डहाणूकर कॉलनीमध्ये साधना कलामंचाची स्थापना केली. या साधना कलामंचातर्फे एका अभिनव वाचनालयाची सुरुवात करण्यात आली. यात प्रत्येकी बारा वाचकांचे गट तयार करण्यात आले. या गटातील सदस्यांनी भिशीप्रमाणे एकत्र येऊन दर महिन्यात ठराविक रक्कम गोळा करायची. ही रक्कम ज्या व्यक्तीकडे जमायचे असेल तिला द्यायची व त्या व्यक्तीने साधारण त्या रकमेएवढी पुस्तके विकत घ्यायची. अशा तऱ्हेने प्रत्येक महिन्यात ही पुस्तकेच वाचनालयात जमा करायची व इतर वाचकांसाठी जमा करायची. एका वर्षानंतर ज्याला त्याला आपापली पुस्तके परत घेऊन जाता येतात. अशा प्रकारे वाचनालयाच्या प्रत्येक सदस्याला वाचनालयात स्वत: व इतरांनी जमा केलेली पुस्तके वाचण्यासाठी उपलब्ध असतात.

असा हा अतिशय चांगला उपक्रम साधना कलामंचाच्या माध्यमातून चालवला जातो. हे जे गट स्थापन केले जातात, त्याला पुस्तक भिशी असे संबोधले जाते.

आमच्या पुस्तक भिशीतील काही सदस्य सुमारे आठ वर्षांपूर्वी याच वाचनालयाच्या माध्यमातून एकत्र आले. आठ वर्षे या वाचनालयाच्या नियमानुसार आम्ही पुस्तके आणली, वाचली, इतरांसाठी उपलब्ध केली, परत मिळाली. पण सर्व सदस्यांना वाचनालयाच्या वेळा सांभाळणे जमत नव्हते. आमच्या गटातील बहुतेक सर्व सदस्या या प्राध्यापक, चार्टर्ड अकौंटंट अशा व्यवसाय वा नोकरी करणाऱ्या आहेत. ऑफिसच्या वेळा सांभाळून पुस्तकांसाठी वाचनालयात जाणे अशक्य झाल्यानंतर सर्वानुमते नाईलाजाने साधना कलामंचाच्या वाचनालयाचे गट क्र. ९ चे सदस्यत्व रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याप्रमाणे श्री. दांडेकर यांच्याशी चर्चा करून त्यांच्या संमतीने त्यांचा प्रेमपूर्वक निरोप घेऊन आम्ही आमचे सदस्यत्व रद्द केले.

अशा पद्धतीने गेल्या तीन वर्षांपासून आम्ही १३ जणी पुस्तक भिशीच्या निमित्ताने एकत्र येत आहोत. साधना कलामंचाचे संस्थापक श्री. दांडेकर यांच्या सुविद्य पत्नी सौ. दांडेकर याही आमच्या भिशीच्या एक सदस्या आहेत.

दर महिन्याला एकेका सदस्याकडे भिशीसाठी जमायचं हे आमचं आणि इतर भिशींमधील साम्य. पण हे साम्य येवढ्यावरच संपतं. एकमेकींकडे जमल्यानंतर आपापसात स्पर्धा करून खाणं-पिणं करणं ही गोष्ट आम्ही कटाक्षानं टाळली आहे. जिच्याकडे भिशी असेल तिथे त्यादिवशी इतरांची सरबराई करण्यात वेळ घालवला तर पुस्तकांच्या चर्चेत भाग घेता येणार नाही म्हणून हा नियम. भिशीच्या दिवशी एक म्हणजे फक्त एकच सहज उचलून तोंडात टाकता येण्यासारखा एकच पदार्थ. तोही विकतचा आणि फार फार तर चहा/कॉफी एवढेच खाणे/पिणे असावे हा एक नियमच आहे.

प्रत्येक जण १३ महिन्यांमध्ये २ हप्त्यात आपल्या आवडीची ४०० रुपयांची पुस्तके विकत घेते. घरात असणारी पुस्तके भिशीची म्हणून वापरायची नाहीत हा अजून एक नियम. यामुळे नवीन पुस्तके घेतली जातात. घरातील पुस्तके पण आम्ही एकमेकींना वाचायला अर्थातच उपलब्ध करून देतो. पण त्याव्यतिरिक्त ४०० रुपयांची पुस्तके विकत घेतली जातातच. ही पुस्तके आपापसात फिरवून, वाचून व चर्चा करून झाली की जिची तिला परत दिली जातात. त्यामुळे प्रत्येकीच्या पुस्तक संग्रहात भर पडते. या सर्व पुस्तकांची व्यवस्थित नोंद किमतीसहीत ठेवली जाते.

पुस्तके खरेदी करतानाही फक्त खपाच्या आकड्यांकडे पाहून खरेदी न करता, डोळसपणे खरेदी केली जाते. पुस्तकांची परीक्षणे



लालन सारंग यांच्या समवेत संवादिनी सदस्या

वाचून त्यावर चर्चा होऊन बऱ्याच वेळा नावांची नोंद करून पुस्तके घेण्यात येतात. प्रत्येकीच्या आवडीला अर्थातच प्राधान्य दिले जाते. ज्ञानगंगा सारख्या फिरत्या पुस्तकालयांना भिशीच्या दिवशी बोलावूनही आम्ही पुस्तकांची खरेदी केली आहे.

फक्त पुस्तकं खरेदी करून, वाचूनच आम्ही थांबत नाही तर दर दोन/तीन महिन्यांनी एखाद्या लेखकाला किंवा कलावंताला आमच्या भिशीच्या दिवशी बोलावून त्याच्याशी मनसोक्त गप्पा मारतो. आत्तापर्यंत आमच्या मैफिलीत श्री. मुकुंद टांकसाळे, श्रीमती आशा कर्दळे, श्रीमती लालन सारंग यांनी सहभाग घेतला आहे.

सतत हलके/फुलके नर्म विनोदी विषय कसे सुचतात याविषयीची मुकुंद टांकसाळे यांच्याशी चर्चा खूपच रंगली. त्यामध्ये पूर्वीच्या काळातील चिं. वि. जोशींसारख्या नामवंत विनोदी लेखकांपासून, पु.लं. पर्यंतच्या सर्व लेखकांची व त्यांच्या शैलीची चर्चा झाली.

श्रीमती आशा कर्दळे यांच्याशी त्यांच्या 'विदेश' व अनुवादित 'अखेरचे पत्र' यावर सुरेख संवाद साधला गेला. आशाताईंनी अनुवाद केलेल्या 'अखेरचे पत्र' या पुस्तकाच्या प्रती आता सहजासहजी उपलब्ध नाहीत. खुद्द आशाताईंकडेही नाही असे पुस्तक सदस्या सौ. मेहेंदळे यांनी याच चर्चेनंतर खास प्रयत्न करून सर्वांना वाचायला मिळवून दिले.

अभिनयासारख्या क्षेत्रात टिकून राहण्यासाठी काय काय केलं जातं, कलाकारांकडे बघण्याची दृष्टी कशी असते, पूर्वीच्या काळातील कलाकारांचे आर्थिक व्यवस्थापन व आजच्या पिढीतल्या कलाकारांचे आर्थिक व्यवस्थापन यावर श्रीमती लालन सारंग यांच्याशी भरभरून चर्चा झाली.

ज्या ज्या लेखक कलाकारांना आम्ही पाचारण केले त्या सर्वांनी आम्हाला पुरेपूर वेळ दिला आणि तोसुद्धा कोणत्याही मानधनाची अपेक्षा न ठेवता.

लालनबाई खरे तर आमच्या भिशीच्या सदस्या होऊ इच्छितात पण अंतरामुळे अजून ते शक्य झालेले नाही.

ज्यावेळेस आम्ही अशा मान्यवरांना बोलावतो त्यावेळेस भिशीत असणाऱ्या अशा सर्व व्यक्तींनाही मुक्त प्रवेश असतो. कॉलेजमधल्या व इंग्रजी माध्यमात शिकणाऱ्या मुलामुलींना आम्ही अशावेळी आवर्जून बोलावतो. त्यातून त्यांना काहीतरी शिकायला मिळावे व मराठी वाचनाची आवड निर्माण व्हावी हा हेतू असतो.

फक्त वाचन व चर्चा एवढ्यावरच न थांबता सामाजिक बांधिलकीचे भान ठेवणे हे आमचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. जुलै २००५ मध्ये पावसामुळे जो हाहाकार झाला, त्यावेळेस पूरग्रस्तांना मदत करण्यातही आमची भिशी मागे नव्हती. भिशीच्या एक सदस्या रेवती पैठणकर ज्या लायन्स क्लब, पुणे, कोथरूडच्या अध्यक्षाही आहेत त्यांनी चालवलेल्या मदत केंद्राच्या माध्यमातून धान्यस्वरूपी मदत आम्ही दिली.

इतकी वर्षं एकत्र राहिल्यावर गेल्या काही महिन्यात एक विचार पुढे आला की, किती दिवस आपण असं बिननावाचं राहणार? असा हा विचार केल्यानंतर लगेचच चर्चेची फेरी होऊन वेगवेगळी नावं पुढे आली. त्यातूनच 'संवादिनी' या नावाला जास्तीतजास्त पसंती मिळाल्यामुळे आम्ही आता आमच्या या गटाचं 'संवादिनी' असं नामकरणही केलं आहे. हार्मोनियम किंवा पेटीचं दुसरं नाव 'संवादिनी' आहे. कोणतंही गाणं रंगवायला राग बदलले तरी कायम साथ द्यायला, गायकांची मैफिल फुलवायला संवादिनीची साथ अत्यावश्यक असते. त्याचप्रमाणे आम्हा वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या सदस्यांना एका विचारधारेमध्ये आणून, बांधून ठेवायचं काम ही भिशी करते, म्हणून तिचं नाव 'संवादिनी'.

साहित्य व इतर विषयांवर चर्चा करताना अनेकदा आवाज चढतात, वादविवाद होतात पण अशावेळी सदस्यांतल्या शिक्षिका जाग्या होऊन सर्व सदस्यांना पुन्हा समेवर आणतात व संवादिनी नाव सार्थ करतात.

आमच्यातील एक सदस्या रश्मी हेब्बाळकर यांनी स्वत: अनुवादित कवितांचं एक पुस्तकही प्रकाशित केलं आहे. त्यांच्या प्रकाशन समारंभात त्यांचं कौतुक करायला आमच्यातील बऱ्याच जणी उपस्थित होत्या. ज्यांचे लेख प्रसिद्ध होत असतात अशा सर्वांना आम्ही उत्तेजन देत असतो.

संवादिनीच्या माध्यमातून तरुणपिढीत वाचनाची आवड निर्माण करण्याची इच्छा आहे.

सूर जुळलेल्या आमच्या संवादिनीतर्फे कविता वाचन, 'विदेश' सारख्या पुस्तकांच्या अभिवाचनाचे कार्यक्रम तयार करण्याचा मानस आहे.

कसे पावाल परमार्थाला
त्यासाठी पाहिजे खल केला
सद्ग्रंथांचा ॥

या तुकडोजी महाराजांच्या ओवीप्रमाणे वाचनाची आवड सर्वांमध्ये निर्माण व्हावी हीच सदिच्छा.

२०५, भारत भवन, १३६० शुक्रवार पेठ.
पुणे ४११००२.
दूरध्वनी - २४४७८५२८/९८९००९५११८

# आमचाही एक साहित्यिक अड्डा



तृतीय क्रमांक

## चौकोनी कुटुंबातला आमचा अड्डा

अनिता दाते

मेहता मराठी ग्रंथजगतमधील साहित्यिक अड्ड्याबद्दल वाचले आणि वाटले, चला आपणही आपल्या आगळ्या-वेगळ्या सााहित्यिक अड्ड्याबद्दल लिहू या.

आगळावेगळा अशासाठी की हा रोजचा अड्डा आमच्या चौकोनी कुटुंबापुरता मर्यादित आहे. माझ्या सासूबाई आणि अनेक वेळा हवापालटासाठी येणारे माझे मोठे दीरही त्यांच्या मृत्यूपर्यंत ह्यात सहभागी होत असत. माझी बहीण-भाऊ ह्या अड्ड्यात पूर्वी पत्राद्वारे आणि अलिकडे फोनद्वारे यात सहभागी होतात.

असा हा अड्डा फक्त एवढाच मर्यादित का बरे? त्याचे सविस्तर उत्तर आधी द्यायला पाहिजे. त्याचे कारण म्हणजे आमच्या घराचे विशिष्ट स्थान.

आधीच रायगड जिल्ह्यात नारळसुपारीच्या बागा असलेल्या गावांची रचना बाग आणि घर अशी असते. त्यामुळे मूळातच प्रत्येक घर दुसऱ्या घरापासून लांब असते. त्यातही आमचे घर अगदी गावाबाहेर. आजूबाजूला बिलकुल शेजार नाही. एखाद्या किल्ल्यात रहावे असे. पाच मिनिटावर वस्ती आहे; पण ती कोळीबांधवांची. पहिली पिढी जेमतेम साक्षर आणि पुढली पिढी फारतर सातवीआठवी शिकलेली. ते सर्वजण दिवसभर काबाडकष्ट करत असतात. त्यामुळे त्यांच्यशी 'पुस्तक' ह्या विषयावर बोलणे केवळ अनाठायी.

म्हणजे साहित्यिक अड्डा जमवायचा तर आम्हाला ८/१० किलोमीटरवर असलेल्या अलिबागलाच जावे लागणार.

तेथील सर्व साहित्यिक कार्यक्रमांना आम्ही हजेरी लावतो पण असे कार्यक्रम तेथेही संख्येने कमीच असतात.

त्यामुळे साहित्यिक गप्पांची भूक आम्ही घरीच भागवतो. आम्हा दोघांनाही वाचनाची आवड असल्याने मुलांवर आपोआपच तो संस्कार झाला आणि आमच्या चर्चेत आमची दोन्ही मुले कशी आणि कधी सहभागी होऊ लागली तेच आम्हाला कळले नाही. अड्डा अगदी घरगुती असल्याने दिवसातून त्याची अनेक सत्रे भरतात.

पहिली एवढी धावती बैठक सकाळच्या चहाच्या वेळी होते. मला सकाळी पाचला उठण्याची सवय आहे. साहजिकच शांत वेळी स्वयंपाकघरातील कामे उरकता उरकता रेडिओ ऐकणे मला फार आवडते. इतर वेळी ऐकू न येणारी गाणी-भजने कानावर पडतात. टी.व्ही.प्रमाणे एका जागी बसून रहावे लागत नाही. कामाच्या ठिकाणी छोटा रेडिओ हलविता येतो. रेडिओवर झालेले 'आमचा बाप अन् आम्ही', 'महानायक', 'संत गाडगे महाराज' या पुस्तकांचे वाचन मी भक्तीने ऐकले. अलीकडे चालू असलेला रोज एकेका साहित्यिकावर होणारा कार्यक्रम मला उद्बोधक वाटतो. हे सर्व माझे ऐकून होतेय तो इतर मंडळी उठून आमची चहाची बैठक जमते. तेव्हा आज ऐकलेले रेडिओवरचे कार्यक्रम, काही विशेष माहिती, आदल्या रात्री पतीने किंवा मुलांनी वाचलेले पुस्तक किंवा पाहिलेला चित्रपट ह्याची चर्चा थोडक्यात होते. कारण मी सोडून सर्वांनाच आपापल्या कार्यस्थळी जाण्याची घाई असते.

दुसरा मोठ्ठा अड्डा जमतो तो जेवण उरकून सर्वजण टि.व्ही. समोर बसतो तेव्हा. टिव्हीचे कार्यक्रम सर्व लक्ष त्यावरच केंद्रित करण्याइतके महत्त्वाचे वाटत नाहीत. उलट ते अनेकदा सहनशीलतेच्या पलिकडले वाटतात. साहजिकच हा विषय वेगळ्या उत्तम तऱ्हेने कसा सादर करता येईल. अमूक कादंबरीवर पाणी न घालता मालिका केली तर कशी छान होईल. एखादे नाटक प्रत्यक्ष स्टेजवर पाहिलेले असेल तर तेच नाटक छोट्या पडद्यावर कंटाळवाणे का वाटते इत्यादी विषयांची चर्चा होते.

सगळ्यांना वाचनाची आवड असली तरी प्रत्येकाचे आवडीचे विषय वेगळे आहेत. सगळ्यांनी सर्व पुस्तके वाचणे वेळेअभावी

अशक्य असते. त्यामुळे प्रत्येकजण आपल्या पुस्तकावर चर्चा घडवून आणायला उत्सुक असतो.

माझे इंग्रजी वाचन यथातथाच आहे. त्यामुळे इतर सदस्य इंग्रजी वाचन कसे आवश्यक आहे, त्या पुस्तकातून वेगवेगळे विषय कसे हाताळलेले असतात, किती बारकावे असतात, विषयांची व्याप्ती किती प्रचंड असते हे सांगतात.

मी वैदिक स्त्रिया, दलित साहित्य ह्याबद्दल बोलत राहते. घरी कोणी पाहुणे असतील तर तेही ह्यात सामील होतात. माझा भाऊ, बहीण आणि साहित्याची आवड असणारे आले असतील तर हा अड्डा मध्यरात्रीपर्यंत चालतो.

पूर्वी आम्ही भाऊ-बहीण एकमेकांना मोठी मोठी पत्रे पाठवून साहित्याबद्दल, आवडलेल्या पुस्तकाबद्दल, नाटकाबद्दल लिहीत असू. हल्ली ती जागा टेलिफोनने घेतली आहे. पण त्या लांबच लांब पत्रांची सर फोनला येत नाही. मला स्वत:ला पत्र हे माध्यम जास्त आवडते. त्यामुळे अजूनही अधूनमधून पत्र पाठवून ही मजा आम्ही लुटतो.

अलिकडे आमच्या ह्या अड्ड्यात माझी एक मैत्रीण सतत सहभागी होऊ लागली आहे. त्याचे श्रेय मात्र 'मराठी ग्रंथ जगत'लाच जाते.

२००२ च्या दिवाळी अंकात एखाद्या पुस्तकाचा आपल्यावर खूप परिणाम होऊन आपले जीवन बदलले अशा पुस्तकावर लिहायचे होते. ह्या स्पर्धेत माझा आणि डोंबिवलीच्या सौ. उषा शरद साठे ह्यांचा लेख प्रसिद्ध झाला होता. त्या लेखाखालील माझा पत्ता वाचून उषा साठे ह्यांनी मला पत्र पाठविले आणि तेव्हापासून आमची पत्रमैत्री सुरू झाली. त्यांचेही कुटुंब पुस्तकप्रेमी असल्याने आणि त्या शहरात रहात असल्याने बाजारात आलेल्या ताज्या ताज्या पुस्तकांचा आस्वाद घेत असतात आणि त्याबद्दल भरभरून लिहून मला पाठवित असतात. त्यामुळे नवेकोरे ताजे पुस्तक नाही मिळाले तरी सविस्तर परीक्षणाचा आनंद आम्हाला मिळतो. त्याबद्दल मी मराठी ग्रंथ जगतची ऋणी आहे.

तर असा हा आमचा 'आमचे आम्ही' साहित्यिक अड्डा. ह्या अड्ड्याला तशा खूप मर्यादा आहेत. पण ह्या मर्यादा अपरिहार्य आहेत. अनेकांना आमच्या ह्या अड्ड्याबद्दल वाटते कारण घरातील सर्वांना वाचनाची आवड असणं आणि त्यावर चर्चा करायलाही आवडणं हा योग दुर्मिळच! शेवटी काय पुस्तकवेडं मन तसा नाही तर असा अड्डा जमवतोच.


'सावली' बंगला,
मु. पो. थळ, ता. अलिबाग,
जि. रायगड – ४०२२०७.
दूरध्वनी - ०२१४१-२३८११९



www.mehtapublishinghouse.com

**प्रत्येक पुस्तकाची सविस्तर माहिती असलेली संपूर्णपणे मराठी असलेली वैशिष्ट्यपूर्ण वेबसाईट.**

**केवळ वर्षभरातच ५०००० ग्राहकांनी साईटला भेट दिली आहे!**
कॅलिफोर्निया, व्हर्जिनी, न्यूजर्सी, वॉशिंग्टन, न्यूयॉर्क, व्हिस्कोसिन, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, युनायटेड किंग्डम, हाँगकाँग, सिंगापूर, तैवान,युनायटेड अरब अमिराती, जर्मनी , चीन, कोरिया, स्वीडन, फ्रान्स, कुवेत,नेदरलॅण्ड, जपान, इस्त्रायल, आयरलॅण्ड इत्यादी जगातील विविध भागांबरोबरच भारतात व महाराष्ट्रात ही साईट सर्वाधिक लोकप्रिय ठरली आहे.

**आमच्या वेबसाईटची ठळक वैशिष्ट्ये**

- लेखकांच्या नावांनुसार, वाङ्मयप्रकारानुसार, पुस्तकाच्या नावानुसार पुस्तके इंग्रजी स्पेलिंगद्वारा 'सर्च'करण्याची सुलभ सुविधा.
- पुस्तकांची संपूर्ण यादी अकारविल्हे पाहण्याची सोय
- प्रत्येक पुस्तकाचे संपूर्ण स्वरूप स्पष्ट करणारी, पुस्तकाचा सारांश तसेच पुस्तकातील निवडक भाग व वृत्तपत्रीय परिक्षणे या स्वरूपातील सविस्तर माहिती
- नवीन पुस्तकांची माहिती इमेलद्वारा त्वरित पाठवण्याची तत्पर सेवा
- आमच्या सवलत योजनांची सविस्तर माहिती
- क्रेडिट कार्डद्वारा ऑनलाइन शॉपिंगची सुविधा

आजच भेट द्या.
व आपली मागणी नोंदवा.

RNI NO-MAHMAR/2000/2739 Licence to post WITHOUT PREPAYMENT/PR/RNP/PNW/M/96/2003-2005 L. NO.LWP-50/
Posted at Marketyard Pso, Pune
Posting Date 21 October 2005.


खास दीपावलीनिमित्त

# दीप योजना

कमीत कमी १०००रु. ची आमच्या प्रकाशनाची कोणतीही पुस्तके घ्या व त्यावर ३५०रु. ची पुस्तके मोफत मिळवा.

आमच्या सभासदांसाठी १०००रु. च्या पुस्तकांवर ५००रु. ची पुस्तके मोफत !

अधिक माहितीसाठी पहा पान क्र. १६५

योजना २८ फेब्रुवारी २००६ पर्यंत !

दीप योजना एक 'खास' योजना






या अंकातील मुलांसाठीचे खास सदर

# बालनगरी



यात परीकथा, कोडी, गमतीजमती, शब्दांच्या कसरती, चित्रे रंगवा आणि मजेदार स्पर्धा.

बुक-पोस्ट

प्रति,

______________________

______________________

______________________

______________________

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे ३०. येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : प्रेसोग्राफ, ५२६, नारायण पेठ, पुणे ३०.